श्री अनंतसुत विठ्ठल उर्फ कावडीबाबा विरचित

# श्री दत्तप्रबोध



## अध्याय पहिला

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वतयै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीदत्तात्रेयाय नमः ।

ॐ नमोजी गजवदना । मंगलाधीशा मंगलकारणा । अमंगलादि विघ्नहरणा । दयाघना हेरंबा ॥१॥

जयजयाजी वक्रतुंडा । कुबुद्धिछेदका प्रचंडा । सिद्धिदायका अखंडा । दीर्घशुंडा नमो तुज ॥२॥

जय फरशअंकुशधारणा । जय सिंदूरासुरसंहारणा । भक्तवत्सला भयहरणा । दीनतारणा गजमुखा ॥३॥

जयजयाजी लंबोदरा । गणाधिपती तूं सुंदरा । सकलाधिष्ठा उदारा । गुणगंभीरा एकदंता ॥४॥

नमो तूतें जी विनायका । भालचंद्रा सुखदायका । प्रीती करिसी गुणगायका । अष्टनायकांसमवेत ॥५॥

जयजयाजी चिंतामणी । पावसी भक्ताच्या कामनीं । हेतु नुरवीसी त्या मनीं । सकळ भ्रामणी चुकविसी ॥६॥

जयजयाजी मोरया । तुजविण ग्रंथा नयेची रया । काय करील चतुर या । तुझा वर या पाहिजे ॥७॥

पर्जन्यावांचोनी नुगवे कण । विशाळ कूप जीवनेवीण । धातुहीन पुरुषपण । नसतां प्राण काय जैसा ॥८॥

तैसी तुझी कृपा नसता । केवीं रसयुक्त होय कविता । श्रेयालागीं एकदंता । हृदयीं चिंता झोंबली ॥९॥

आतां तुझ्या कृपेसाठीं । कोण करुं आटाआटी । पडिलों बहुतची संकटीं । कृपादृष्टी पाहे तूं ॥१०॥

तुझें नाम विघ्नहरु । सिद्धिबुद्धीचा दातारु । महिमा तुझी गा अपारु । नकळे पारु श्रुतिशास्त्रा ॥११॥

एकाक्षरमंत्र जपून । कितेकीं केलें अनुष्ठान । त्यावर प्रसाद तोषवून । वदविसीगुण अनुपम्य ॥१२॥

मी तव हीनदीन पामर । न घडे कांहीं तो विचार । ग्रंथहेतु मनीं थोर । केवीं पार पावेल हा ॥१३॥

मज तों नकळे साधन । म्हणोनी करी नामस्मरण । तूं अनाथनाथ मूषकवाहन । करी पावन दीनातें ॥१४॥

तूतें अनन्य शरणागत । झालों गजवदना निश्चित । करी आपुलें ब्रीद सत्य । कृपावंत होउनी ॥१५॥

मागें कवीच्या हृदयी । राहोनि वदविसी पाही । आतां या हृदय मुळीं । नाहीं ऐसें काई म्हणावें ॥१६॥

गजवदना तुझें अधिष्ठान । सर्वां घटीं आहे पूर्ण । मजविशीं कैसा शून्य । राहसी होऊन हेरंबा ॥१७॥

हें तो तुम्हां नोव्हे उचित । येणें ब्रीदा होईल घात । मी तव अन्यायी पतित । पादाक्रांत पैं झालों ॥१८॥

तुमचिया नामापुढें । पापविघ्न काय बापुडें । वेदशास्त्री पवाडे । अगाध गाढें वर्णिलें ॥१९॥

गणगंधर्वयक्ष स्तविती । देवमानव गुण गाती । स्तुतिस्तोत्र मुनी जपती । नामख्याति अगाध ॥२०॥

त्याची नामें करुनी । प्रवर्तलों तुझिया स्तवनीं । तरी अपराध क्षमा करुनी । अभयदानीं तोषवा ॥२१॥

आतां करोनी अति त्वरा । मज दीनातें अंगीकारा । पापविघ्नें निवारा । फरशधरा गणपति ॥२२॥

या ग्रंथाची रचना । सिद्धीस न्यावी गजवदना । सर्वपरि विज्ञापना । केली चरणा तुझिया ॥२३॥

ऐसी प्रार्थना करितां । तों हृदयीं आविर्भवला मंगळदाता । पायीं ठेवितांचि माथा । दे अभयता ग्रंथासी ॥२४॥

मग जयजय शब्दें करुन । गर्जतां आनंदलें मन । पाहोनि सगुणत्वाचें ध्यान । तेंचि वर्णन आरंभिलें ॥२५॥

जेथें ठेविला प्रेमें भाळ । तें सुकुमार चरण कोमळ । सुरंग तळवे रातोत्पळ । घोटी सुनीळ द्वयभागीं ॥२६॥

पदांगुली विराजित । पंचद्वय सुशोभित । नखचंद्रिका सतेज युक्त । तेचि वंदित पुढतीं ॥२७॥

पावलावरी साजरिया । गुंजारवती घागरिया । तोरड आणि वांकिया । ब्रीदावळी या गर्जती ॥२८॥

जानुजंघानागर । अटस मांडया प्रबळ थोर । कटीं वेष्टिला पीतांबर । बंदी फणीवर डोलती ॥२९॥

क्षुद्रघंटा कटीं वाजती । उदर विशाळ नामी वरुती । हृदयीं स्तनें डोल देती । दिव्य आकृती तेथीची ॥३०॥

चतुर्भुज बाहुदंड । पाहतां दिसती प्रचंड । मेखळा अंगीं अखंड । नसे खंड तियेतें ॥३१॥

बाहुवटीं बाहुभूषणें । जडित मणिमय करीं कंकणें । पृथक् मुद्रिकांचें लेणें । शोभले तेणें पाणी ते ॥३२॥

आरक्त करतळ आणि रेखा । रेखिल्या अती त्या सुरेखा । करागी तो चंद्र देखा । दशधा निका प्रगटला ॥३३॥

द्वय करीं ते फरशांकुश । दुष्ट विघ्न कर्ते नाश । एक वरद पाणीविशेष । निजभक्तास द्यावया ॥३४॥

ठरला जो का चतुर्थ कर । सर्व काजीं अतितत्पर । केवी वदूं तो विस्तार । सारासार जाणता ॥३५॥

भुजदंड दंडीं शोभती । नाना बिरुदें चमकती । कृपाकर शरणागती । द्यावया प्रीति वरद तो ॥३६॥

कंठस्थूल निकट जाणा । मुक्ताहार जडित नाना । एकावळीचा सलंबपणा । नाभीस्थाना पावला ॥३७॥

रत्नमिश्रित मुक्ताहार । पदकीं हिरा सतेज थोर । तेणें शोभलें हृदयोदर । तेज अपार नगाचें ॥३८॥

शुंडामंडित भव्य वदन । तया शोभती शूर्पकर्ण । एकदंत शुभ्रवर्ण । नेत्र सान चमकती ॥३९॥

भोंवया आणि भाळ । शोभा देती विशाळ । द्वयभागी गंडस्थळ । केश कुरळ सलंब ॥४०॥

भाळीं शोभे अंबुधर । चर्चित मृगमदकेशर । वरी सतेज थोर । मुकुट सुंदर लखलखित ॥४१॥

तयावरी दिव्य मणि । मण्यावरी शोभे फणी । कर्णी कुंडलें पाहुनी । होय तरणी सलज्ज ॥४२॥

मुक्ता घोषाची झल्लाळी । शोभते दोही कुंतली । कोटीसूर्यप्रभा फांकली । ऐसी नव्हाळी रुपाची ॥४३॥

अतिपुष्ट तो उंदीर । वहन तयाचें प्रियकर । ऋद्धिसिद्धि जोडोनि कर । ढाळिती चामर तयावरी ॥४४॥

ऐसा मंगळकारक हेरंब । वदे करी ग्रंथारंभ । नमोनि करी प्रारंभ । समारंभ स्तवनाचा ॥४५॥

जयजय गणपती गुणालया । धुंडीराजा तूं मोरया । जय जय दूर्वांकूरप्रिया । महाकाया तुज नमो ॥४६॥

जयजयाजी कमळभूषणा । मंदारप्रिया शमीधारणा । जयजय विमळा विघ्ननाशना । हे गजानना तुज नमो ॥४७॥

जय चतुर्दशविद्यासागरा । ऐश्वर्यसंपन्ना उदारा । सिंदूरचर्चिका सर्वेश्वरा । ज्ञानागरा नमो तूंतें ॥४८॥

जयजय सुरवररक्षका । प्रचंड दैत्यसंहारका । विष्णुरुपा अज्ञाननाशका । कवि पोषका नमो तुज ॥४९॥

जयजयाजी गौरीनंदना । बलपराक्रमा शिवकंदना । सकळनियंता कार्यकारणा । जाणसी खुणा अंतरीच्या ॥५०॥

स्तवनीं तोषोनि मोरेश्वर । अभयप्रसाद दे सत्वर । म्हणे वदे निरंतर । चित्ता स्थिर करोनिया ॥५१॥

जे इच्छा धरिली मानसीं । तैं निर्विघ्न जाईल सिद्धीसी । नमितां तैं अतिवेगेसीं । हृदयनिवासीं राहिला ॥५२॥

ऐसा श्रीगणेश स्तविला । स्तवितांची प्रसाद लाधला । आतां नमूं सरस्वतीला । वाक्शब्द भक्ता जिचेनी ॥५३॥

नमो ब्रम्हनंदिनी कुमारी । जगदंबिके वागीश्वरी । प्रणवरुपिणी जगदांतरी । तुज नमस्कारी आदरें ॥५४॥

जयजय जगन्माते । रसना वदे तव सत्तें । तुझें ठाण असतां वरुतें । होय सरते बोल मग ॥५५॥

तुझे कृपेचें महिमान । अगाध जाणती कविजन । तुझें नीरसयुक्त भाषण । ग्रंथीपूर्ण पावलें ॥५६॥

तुझिया कृपेची खेळ । मुके तोचि होती वाचाळ । नवजे वाणीते बरळ । सरळ सुंदर वर्णिते ॥५७॥

जेथे तुझें ठाण नाहीं । त्या वाणीचा फजिता पाहि । मुके बोबडे तोतरे राही । गुंते ठायी बोलता ॥५८॥

जरी वाचाळ करी बडबड । त्या बोला नुपजे आवड । कांटाळोनी म्हणती द्वाड । कपाळफोड मांडिली ॥५९॥

तया वाणी नाहीं रस । म्हणे हा बोलतो फिके निकस । ऐकणारा उपजे त्रास । म्हणती यास पीटारे ॥६०॥

म्हणती वात्रटा जाय उठोन । पुरे पुरे तुझें भाषण । हें तव अवकृपेचें लक्षण । कळलें पूर्ण जगन्माते ॥६१॥

हें वर्म जाणोनि चित्तीं । तुज नमितो जी सरस्वती । स्तवितसे मी अनन्योक्ती । कृपा चित्तीं येउं दे ॥६२॥

तूं आदिशक्ति गुणमाया । नत जालों तुझिया पायां । वत्सावरी किजे दया । करोनी छाया कृपेची ॥६३॥

जयजय वो जगदंबे । विश्वंभरिते तूं अंबे । रससारज्ञे प्रलंबे । वत्सा अविलंबे सांभाळी ॥६४॥

तूं माता माझी स्नेहाळ । अर्भकाची पुरवी आळ । जाणसी अंतरीचें सकळ । ये उतावेळ धांवोनी ॥६५॥

अज्ञान बोलाचे भाषणीं । तुज पाचारी प्राकृत वचनीं। स्तुतिस्तोत्र गीर्वाणीं । मजलागोनि न येतें ॥६६॥

जे जे महाकवि जाले । जपानुष्ठानें तूतें यजिलें । स्तुतिस्तोत्रें कवचें भले । तुज वश केले यंत्रतंत्रे ॥६७॥

नाना साधनें साधितां पूर्ण । होसी तयां तूं सुप्रसन्न । जाणोनि या कार्याकारण । छाया सघन त्या करिसी ॥६८॥

तो अधिकार नाहीं मज । कैसेनि घडे माझे काज । येई माते म्हणोनि तुज । नामें सहज उच्चारी ॥६९॥

सरस्वती ये म्हणउन । तुज करितो पाचारण । बाळशब्दा देशी मान । तरी भूषण थोर तुझें ॥७०॥

समर्थासी समर्थ सांभाळी । याची कोण तरी नव्हाळी । हीनदीनांतें प्रेमें कवळी । त्याची ब्रीदावळी सत्य पै ॥७१॥

जे का थोर योग्य असती । ते दीनावरी करिती प्रितीं । त्याचेच चराचरीं वाखाणिती । गुण गातीं आदरें ॥७२॥

माते तूं सर्वांहूनि थोर । सदयपणें तुझा बडिवार । ते ऐकोनी साचार । जोडोनी कर प्रार्थितो ॥७३॥

करुणाघने आदिजननी । तुज विनवितो दीनवचनीं । मज तोषवी मंगळजननी । कृपा करोनी येधवां ॥७४॥

ऐसी करुणा भाकतां हृदयीं । ध्यानीं प्रगटली लवलाहीं । प्रभा फांकली सर्वां ठायीं । वर्णूं काई रुपातें ॥७५॥

निरखोनी पाहतां डोळेभरी । ठाण दिसे हंसावरी । ब्रह्मवीणा शोभला करीं । शुभ्रांबरीं मिरवत ॥७६॥

सुहास्य वदन अतिसुंदर । मुक्तालेणी अतिनागर । कुंदपुष्पी शुभ्रहार । शुभ्रचीर तेजाळ ॥७७॥

शुभ्रकंचुकी कुचमंडळीं । मृगदळ रेखिला दिव्यभाळीं । करकंकणें मुद्रिकावळी । दशांगुळीं विराजे ॥७८॥

कंठीं साजरें कंठाभरण । कर्णी डोलती कर्णभूषण । अंगीं मुक्तावळी सघन । सुवर्णसुमन नग नाना ॥७९॥

चंद्रहारजडित पदक । हृदयीं शोभतें अलोलिक । बाजुबंद वाक्या देख । अतिसुरेख रत्नचुडे ॥८०॥

सिंहकटिबंद साजिरा । जाळिपेटया रुळे करा । शोभा तेणें पातली चिरा । मुक्तकिनारा रत्नावळी ॥८१॥

पदीं रुळ तोडे पैंजण । अंगुळीया शोभती भूषण । झणत्कारती रुणझुण । आरक्तवर्ण पदतळें ॥८२॥

साजिरें मातेचें मुखकमळ । नाकीं सुपानी मुक्ताफळ । बोलतां दंतांचा झळाळ । कंठ मंजूळ गायनी ॥८३॥

इचें स्वरुपाची तुलना । न येचि भुवनत्रयीं कोणा । लावण्यवती हीना । सलज्ज मना पाहतां ॥८४॥

आदिमाया हे ब्रह्मकुमारी । बैसली दिसे हंसावरी । ते पाहतां नेत्रचकोरी । आनंद अंतरी न समाये ॥८५॥

अतिशुभ्र अंगकांती । कांहीं कनकवर्णदीप्ती । पक्ष सलंब विराजती । नयन दिसती आरक्त ॥८६॥

चंचुपुटे विशाळ । सुरंगरंगे तेजाळ । घोस मुखीं मुक्ताफळ । चरणकमळ आरक्त ॥८७॥

यापरी ध्यानीं शारदा । पाहतां वंदिलें त्या पदा । पार नसेची आल्हादा । शीणखेदा विसरलों ॥८८॥

सप्रेमें माता निरखोन । करुं वाटे जीवा स्तवन । अल्पज्ञ आणि बळहीन । कवळू गगन चालिला ॥८९॥

तैसें वाटलें मम जीवा । स्तवनें करुं कांहीं सेवा । अतिथोर नपवे भावा । कोण केवा दीनाचा ॥९०॥

परि दशी जेविं चंद्रासी । कीं काडवाती सुभानूसी । तेवींच आतां मातेसी । स्तवूं प्रेमेसीं बोबडें ॥९१॥

जयजय शारदे भवानी । जगन्माते विश्वस्वामिनी । त्रैलोक्यपाळके ब्रह्मनंदिनी । जगदोद्धारिणी जगदंबे ॥९२॥

जयजय दुर्गे सरस्वती । प्रणवरुपिणी आदिशक्ति । निगमागम तुज स्तविती । प्रसादप्राप्ती इच्छोनी ॥९३॥

चहूं वाचेसी सौरस । माते तुझाची कृपारस । सर्व सत्ताविशेष । चाले निवास असतां ॥९४॥

जयजय ज्ञानशक्ति उद्‌बोधे । गुणवंते तूं अगाधे । चराचरव्यापके अभेदे । चित्सुधे चिन्मात्रे ॥९५॥

जयजय मूळ पीठवासिनी । सर्वात्मके मंगलदायिनी । जय भुवनत्रयगामिनी । हंसासनी कमळाक्षे ॥९६॥

जयजय उदारे सर्वज्ञे । निजानंदे गुणप्रज्ञे । कृपा करी वो सर्वज्ञे । कविवरज्ञे सदय तूं ॥९७॥

मी दीन अनाथ शरणागत । धरोनी प्रार्थी काव्यहेत । जीवींचें जाणोनि वृत्त । करी साह्यार्थ प्रीतीनें ॥९८॥

परिसोनी बोबडिया बोला । आनंदे माय चोजवी बाळा । पोटीं धरोनी वेल्हाळा । पुरवी लळा तान्ह्याचा ॥९९॥

तेची माय सरस्वती । शरणागता बोले प्रीति । ना भी वत्सा तुजप्रति । साह्य निश्चिती मी असें ॥१००॥

हृदयीं तुझ्या विघ्नेश । तो सकळ विघ्ना करी नाश । सिद्धिदाता सर्वेश । सिद्धि काव्यास पूर्ण करी ॥१॥

माझें ठाण रसनाग्रीं । वसोनी वदवीन रसभरी । आतां निर्भय असोनी अंतरीं । ग्रंथ करी सुरस हा ॥२॥

ऐसी वदे वाग्वल्ली । वदोनिया अदृश्य जाली । रसनेस्थळीं राहिली । भावे नमिली आदरें ॥३॥

आतां नसूं तो सद्‌गुरुनाथ । जो सदैव उदार भाग्यवंत । सर्वज्ञपणें विराजित । सर्व गुह्यार्थ जाणता ॥४॥

जो अज्ञानाचा नाश करी । जो ज्ञानदीप उजळीं अभ्यंतरीं । जो ने भवाचिया पैलपारीं । शरण्या तारी निजकृपें ॥५॥

जो अविनाश निर्मळ । जो अचळ आणी अढळ । जो निवटी देहाची तळमळ । हरी तत्काळ अहंता ॥६॥

जो दीन जनातें तारी । अघोर पापियां उद्धरी । जो या त्रिविध तापातें हरी । निर्मळ करी क्षणमात्रें ॥७॥

जो तल्लीन ब्रह्मानंदी । सेवका बैसवी निजपदीं । जो तोडिता आधिव्याधी । उपाधीस नुरवोनी ॥८॥

तो आनादि सद्‌गुरु अनंत । जो व्यापकपणें विख्यात । त्याचे चरणी अनन्ययुक्त । होवोनि नत प्रार्थितों ॥९॥

जयजयाजी सद्‌गुरुराया । ज्ञानसिंधुगुणालया । विज्ञानरुपा सदया । शरण पायां दीन हा ॥१०॥

सद्‌गुरु दयाळा समर्था । विकाररहिता कृपावंता । तमशोषणा प्रकाशभरिता । तव पदिं माथा अर्पिला ॥११॥

जयजय सद्‌गुरु दिगंबरा । सर्वव्यापका सर्वेश्वरा । ब्रह्मानंदा निर्विकारा । तव पदिं थारा दीनाचा ॥१२॥

जय सद्‌गुरु चैतन्यघना । मोहच्छेदका दुःखभंजना । तत्त्वावबोधा सर्वशून्या । दीनपावना सुखमूर्ति ॥१३॥

जय सद्‌गुरु स्वानंदराशी । अभेदभेदा उन्मनिवासी । ब्रह्मावबोधा चित्सुखासी । कृपें भेटविसी आपुल्या ॥१४॥

तूं दीनबंधु दीनानाथ । इहीं परत्रीं तारक समर्थ । जाणसी अंतरीचें आर्त । कृतकृतार्थ करवीसी ॥१५॥

तुजवीण कोण्ही थोर । भुवनयत्रीं न देखों साचार । शोधोनि पाहतां ग्रंथांतर । महिमा अपार सद्‌गुरुचा ॥१६॥

सद्‌गुरुदैवताहोनी । आगळा नसेचि त्रिभुवनीं । उपमा देतां गुरुलागुनी । पदार्थ कोण्ही नसेची ॥१७॥

जरी म्हणवी ती मातापिता । तरी करविती माईक गुंता । सद्‌गुरु तूं मायानाशिता । त्रिविधतापता नुरविसी ॥१८॥

यालागीं तूं निरुपम । शरणागताचा विश्राम । दूर करोनि भवभ्रम । देसी आराम स्वात्मत्व ॥१९॥

सद्गुरु अनंता कृपाघना । कोण जाणे तुझिया महिमाना । म्हणोनि अनन्यभावें चरणा । जालों शरण दातारा ॥२०॥

हीनदीन मी शरणागत । तव पदाचा अंकित । असें क्षीण नेमस्त । थोर पतित अपराधी ॥२१॥

मूढ मलिन अज्ञान । अर्भक नेणता पूर्ण । अनधिकारी जाण । कुश्चळमलीन पापराशी ॥२२॥

अगणित अन्यायी दोषी । परी शरण आलों पायापासीं । आतां क्षमा करोनि कृपाराशी । मज दीनासी अंगीकारा ॥२३॥

तुम्ही कृपेचे सागर । मी शरणागत पामर । अंगीकारोनी कृपाकर । मस्तकावर ठेविजे ॥२४॥

तूं गुरुराज आमुची माउली । दीनादुर्बळाची साउली । अनाथ वत्साची गाउली । पाखर घाली कृपेचा ॥२५॥

शरणागतासी तारावें । खळदळ दुष्ट मारावें । अहंबुद्धीतें हारावें । पूर्ण करावे मनोरथ ॥२६॥

गुरुमाय तूं होसी स्नेहाळ । मी अज्ञान तुझें लडिवाळ । मम मनींची जाणोनि आळ । होवोनि कृपाळ पुरवी जे ॥२७॥

तुजवीण कोणा छळावें । इतरें काय तें पुरवावें । त्वा माउली धावोनि यावें । वोसंगा घ्यावें बाळका ॥२८॥

तंव तो कृपाळू सद्गुरुराणा । आनंदे प्रगटोनि बोले वचना । बाळका बहु विज्ञापना । काय कारणा मांडिली ॥२९॥

कां गा पडिलासी संकटीं । कोण पडिली तुज अटी । कोण अर्थ धरोनि पोटीं । स्तवन निकटीं आरंभिलें ॥३०॥

शब्द कृपेचे ऐकतां । तात्काळ चरणीं ठेविला माथा । मागुती जालों विनविता । अंतरार्था पुरवावया ॥३१॥

जयजय सद्‌गुरु परात्परा । आदिअनादि विश्वोद्धारा । माझी विनंती अवधारा । सदयउदारा निर्विकल्पा ॥३२॥

आपुलेनी कृपाबळें । मज दीना पावन केलें । हेतु सकळ पुरविले । गुज दाविलें एकांती ॥३३॥

मोक्ष पदाचिया वाटा । मज दाविला ज्ञानचोहटा । पुरविलें तुम्ही बाळहट्टा । दाविला साठा ऐक्यत्वें ॥३४॥

न करवितां साधन । दाविलें मज तें गुप्तधन। आतां कांहीं व्हावें उत्तीर्ण । हें तो कारण असेचि ना ॥३५॥

परी एक असे विनंती । विनवितां रोष न यावा चित्तीं । कृपा करोनी सत्वरगती । अभयप्रीती देईजे ॥३६॥

तव बोले गुरुराज । कवण अर्थ तो सांगे मज । आतां न धरी संकोच लाज । करीन काज परिसोनी ॥३७॥

मग जयजयकारें टाळी । पीटिली आनंदहृदयकमळीं । पुढतीं भाळ चरणकमळीं । ठेवुनी आरंभिली प्रार्थना ॥३८॥

जयजय स्वामी गुरुनाथा । हा काळ जातो वृथा । कांहीं वदावें ग्रंथा । ऐसें चित्ता वाटतसे ॥३९॥

म्हणाल बहु कवि जाले । त्यांनीं अनेक ग्रंथ केले । वरदी अत्यंत भले । जेणें तरले जड मूढ ॥४०॥

तेथें तुझा पाड किती । त्यापुढें कायसी मती । ऐसें म्हणाल निगुती । तरी विनंती अवधारा ॥४१॥

जरी गरुडें घेतलें गगन । तरी चिमणीनें रहावें गृह धरुन । श्रीमंतें केलें देवार्चन । दीनें पूजन न करावें ॥४२॥

समर्थें संपदा जोडिली । दीनासि चिंता केवीं जाली । त्याची प्रपंचता खुंटली । कळोनि आली स्वामीबोले ॥४३॥

या बोलातें ऐकून । सद्गुरु करिती हास्यवदन । बारे आपुली शक्ति पाहून । सर्व कारन करावें ॥४४॥

तुझिया मनीचा हेत । मी जाणतो गा समस्त । चालवी आतां रसाळ ग्रंथ । गुह्य कथार्थ नानाविध ॥४५॥

एकाग्र करोनी मन । आठवुनी सद्गुरुध्यान । करी ग्रंथाचें लेखन । न्यून तें पूर्ण करीन मी ॥४६॥

कृपा उपजोनी सद्गुरुनाथा । म्हणे बा न करी कांहीं चिंता । मीच ग्रंथ वदविता तूं निमित्ता । मात्र राहे ॥४७॥

या परी श्रीगुरु अनंत । आनंदें वरप्रदान देत । धावूनी चरणीं जडला सुत । प्रेम हृदयांत न समाये ॥४८॥

भावें धरितां दृढ चरण । सद्गुरु देतसे अभयदान । निर्विकल्पें करी लेखन । जयकल्याण सर्वदा ॥४९॥

श्रीगुरुप्रसादा संपादिलें । भाग्य विशेषची लाधलें । मन संतोषातें पावलें । आनंदमेळे डुल्लत ॥५०॥

आतां नसूं मातृदेवता । तेवीं आदरें नमूं पिता । मज जे का उभयता । जन्मदाता असती ॥५१॥

उभय संयोगमेळीं । संभव माते उदरकमळीं । नवमास ओझें पाळीं । अनेक आंदोळी सोसोनी ॥५२॥

कामें उदंड करी देखा । गर्भासी लागों नेदी धका । रसनेच्या रससुखा । विसरवी बाळका दुःख न हो ॥५३॥

हळूहळू पाउलें टाकी । जपोनी गर्भातें राखी । गर्भव्यथा सोसी निकी । धन्य ते की माउली ॥५४॥

जोंवरी गर्भाचा वास । तोंवरी दुःख भोगी विशेष । प्रसूतिव्यथा प्राणनाश । सोसी जीवास बहुतची ॥५५॥

ऐसिया दुःखातें भोगून । साहिलें बाळाचें जनन । मधु मुखातें लाउन । दिधलें स्तन कृपेनें ॥५६॥

न्हाणोनि केलें निर्मळ । स्नेहें भरिलें सीरताळ । रात्रंदिवस जपे स्नेहाळ । दुःखी तळमळ होतसे ॥५७॥

बहुतची मळमूत्र साहिलें । सोंवळें बाळका वाहिलें । रस नाना संकोचिले । मज वाढविलें बहुप्रीतीं ॥५८॥

निर्गुणी अनामी असतां । त्यासी नाम ठेवी माता । सुखसोहाळे भोगवितां । नाणी चित्ता कंटाळा ॥५९॥

ह्मागी ओकीं सांभाळी । भरली न टाके पत्रावळी । रोदनीं धावे लावी खेळीं । पुरवी आळी सांडी काज ॥६०॥

लागेल बाळा दृष्टी । म्हणोनी घे इठीमीठी । गळां वाघनखें रीठी । घाली पेटी दृष्टमणी ॥६१॥

चालतां रांगतां पडे झडे । पोटीं धरोनी माता रडे । सांडी ओंवाळोनी एकीकडे । वाडेकोडें वस्तु नाना ॥६२॥

उभयतां पाळिती कौतुकें । भातुकें देती अलोलिकें । अळंकार घालिती निके । आनंदें सुखें खेळविती ॥६३॥

केलें लहानाचें थोर । बाळकाचा झाला कुमर । विद्यारंभ मौंजीप्रकार । विवाह सत्वर करविला ॥६४॥

सुखसंतोषें वाढविलें । सकळ संस्कार घडविले । प्रपंच परमार्था दाखविलें । प्रौढ केलें उभयतें ॥६५॥

धन्यधन्य ते मातापितर । तयां माझा नमस्कार । फेडावया उपकार । मज तो प्रकार दिसेना ॥६६॥

ग्रंथ धुंडाळोनी पाहतां । सर्वांत श्रेष्ठ मातापिता । पुत्रासी देव यापरता । नाहीं सर्वथा वेद बोले ॥६७॥

हें जणोनि करावें सेवन । तरी मी मशककीटक हीन । कैंचें मातें अंगवण । सेवाधन वेंचावया ॥६८॥

न घे मातें त्यांची सेवा । मुखरोग्यासी कैंचा मेवा । काय करुं हतभाग्य दैवा । लाभ बरवा घेववेना ॥६९॥

मी तों पामर पापराशी । न घडेची सेवा कांहीं मजसी । तेचि कृपाळू निश्चयेसी । जडमूढासी पाळिलें ॥७०॥

लौकिकसंबंधें करुन । उभयतांचे वंदिले चरण । परी मागतों कृपादान । प्रीतीकरुन ते देती ॥७१॥

धन्य तेची भूमीवर । जयां देव मातापितर । सेवा करिती जे निरंतर । तयां नमस्कार पैं माझा ॥७२॥

त्यांचे जे कां चरणरेण । ते मम मस्तकीं जाण । त्यांच्या पादुका वाहीन । सेवक म्हणवीन तयांचा ॥७३॥

असो राधिका माझी माता । अनंत नामें माझा पिता । तोची सद्गुरु उपदेशिता । चरणीं माया तयाच्या ॥७४॥

अनन्यभावें जालों शरण । तेणें दिधलें अभयदान । न पाहतां गुणावगुण। केलें पावन अनाथा ॥७५॥

अनंतची माझा सद्गुरु । अनंतची होय विघ्नहरु । या ग्रंथाचा दातारु । नेता पैलपारु अनंत ॥७६॥

अनंतशक्ति राधिका । तेची वागीश्वरी अंबिका । तिच्या कृपाबळें देखा । ग्रंथ नेटकां चालेल ॥७७॥

त्यांनींच बोधिलें वर्म मजसी । आदरें शरण जाय संतांसी । लक्ष ठेवी त्यांचे सेवेसी । स्तुतिस्तवनेंसी गौरवी ॥७८॥

तोषवोंनी करी प्रसन्न । विनटे प्रीतिभाव धरुन । मग सहजची कल्याण । सुखसंपन्न होसी तूं ॥७९॥

ते साह्य असतां । कायसी या ग्रंथाची चिंता । न वर्णवे त्याची योग्यता । करिती सत्ता देवावरी ॥८०॥

हे आज्ञा शिरीं वंदोनी । शरण आलों संतांलागोनी । अतिविनयें कर जोडोनी । मस्तक चरणीं वोपिला ॥८१॥

महाराज तुम्ही संतमूर्ती । अवताररुपें प्रगटला क्षितीं । उद्धरावया दीनांप्रती । अज्ञान निवृति करावया ॥८२॥

व्यास वाल्मीक शुक । उद्धव अक्रूर मारुती देख । ब्रह्मा विष्णु शिवादिक । अवतार निःशंक संत तुम्ही ॥८३॥

जी तुम्ही धर्मस्थापना । तारावया या पतितजना । करावया भक्तिनिरुपणा । अवतारधारणा तूमची ॥८४॥

तुम्ही केवळ ईश्वर । करावया जगदुद्धार । प्रगटलां सगुणत्वें साचार । कलिमल दुस्तर नाशावया ॥८५॥

अहो जी तुम्ही योगिराज । सदय ज्ञाते सतेज । तुम्हा पुढें दीन आज । चरणरज इच्छितों ॥८६॥

संत तुम्ही शांत दांत । मूर्तिमंतची वेदांत । करोनि सर्व सिद्धांत । महिमा अद्‌भुत दावितां ॥८७॥

तुम्हां संतांची स्थिती गती । न लभे कवणाचिया हातीं । जरि चातुर्य करी युक्ती । तया कल्पांतीं सांपडेना ॥८८॥

जरी जाला वेदपाठक । किंवा तपोधन अधिक । कीं यागादिकर्ता मख । तया साम्यक नसे संतीं ॥८९॥

तुमच्या कीर्तींचे पवाडे । लिहितां भूपत्र असे थोडें । विष्णु होवुनिया वेडे । मागेंपुढें उभेची ॥९०॥

अगाध तुमचें थोरीव । दासची केला रमाधव । पाहोनी तुमचें वैभव । घोटिती देव लाळ कीं ॥९१॥

तुम्ही ब्रह्मांनंदसागरीं । सदा भोगितां प्रेमलहरी । वास तुमचा चिदंबरीं । शांत अंतरीं दयाभूत ॥९२॥

तुम्ही संत अद्वय निःसंग । पर ब्रह्मीं तुमचा भोग । सदाचरणीं भक्तियोग । साधोनि चांग विचरतां ॥९३॥

साधु तुम्ही दिनदयाळ । अंतर तुमचें अतिकोमळ । शरणागतांचें प्रतिपाळ । होवोनी कृपाळ करितसां ॥९४॥

ऐसिया कीर्तीतें ऐकोन । मी याचक आलोंसे धावोन । अनन्यप्रेमें वंदूनि चरण । अभयदान मागतसें ॥९५॥

परिसोनि बाळकाचे बोल । जेवीं आनंदति स्नेहाळ । तेवीं संतमाउलीचा मेळ । देती डोल आनंदें ॥९६॥

म्हणती बा रे अनंतसुता । बहु श्रमलासी स्तुति करतां । बैस अंतरीच्या अर्था । सांग आतां आम्हासी ॥९७॥

संकोच न धरी कांहीं । सांगे पुरेल हेतु पाही । अभय ऐकतां लवलाही । भाळ पायीं ठेविला ॥९८॥

द्वय करांतें जोडोनी । विनवितां झालों ततक्षणीं । लक्ष ठेविजे प्रार्थुनी । संतजनीं आदरें ॥९९॥

सर्व साधूंनीं काव्य केलें । कोण्ही अभंग पदें बोलिले । कित्येकी ग्रंथ रचिले । श्लोक आर्या कितीकांच्या ॥२००॥

कित्येकीं दोहोरे चौपाई । कटीबंद आणि सवाई । गड्डाळिका ठाई ठाई । चूर्णिका त्याही बोलिले ॥१॥

केकावळी छंदबंद । कोण्ही रचिले आख्यानप्रबंध । ऐसें कवींनीं नानाविध । अनुभवसिद्ध गाइलें ॥२॥

प्राकृत आणि संस्कृती । जैसी जया असे गती । ईश्वरें दिधली मती । तैशा रिती वाखाणिलें ॥३॥

ते तो प्रासादिक सिद्ध जाले । जगीं मान्यतेसी आले । देवसंती अंगीकारिले । कीर्ती भरलें त्रिभुवन ॥४॥

समर्थाचें भाग्य देखोन। रंक अंतरीं उदासीन । मज कां न पवे नारायण । तेवीं मनीं इच्छितें ॥५॥

संत चातुर्यज्ञानखाणी । अंतरार्थ वोळखिला मनीं । म्हणे बापा अजिचे रजनी । निजे प्रार्थुनि देवापुढें ॥६॥

तो दीनवत्सल श्रीअनंत । पुरविल तुझे मनोरथ । जो स्वप्नी देईल दृष्टांत । तो आम्हातें निरोपी ॥७॥

संतआज्ञा वंदोनी प्रीतीं । हृदयीं ध्याइला कमळापति । हेतु ऐसी करोनि स्तुति । केली एकांती निद्रा पुढें ॥८॥

तो उत्तरशेष उरली रजनी द्विजें तांबूल घातला वदनीं । जिव्हेसी केश सलंबपणीं । निबिडदाटणी उगवले ॥९॥

दंतांतुनी निघाला मांसतंतु । तो ओढितां असंभाव्य निधतु । किती काय न कळे अंतु । श्रमतां तोडितु करी बळें ॥१०॥

तंव उदया पातला तमारी । जागृत जालों झडकरी । जावोनि संतमांदीभीतरी । भावें नमस्कारी तयांतें ॥११॥

मम वृत्ति देखोनि आनंदघन । संत म्हणती दिसतें सुलक्षण । आतां वृतांत पुसायालागुन । प्रसादचिन्ह वाटतें ॥१२॥

जगद्गुरु संतराजेंद्र । वैराग्यशीळ ज्ञानसमुद्र । हृदयीं होवोनि कृपें आर्द्र । म्हणती सुभद्र तुज असे ॥१३॥

सांगे वृत्तांत रजनीचा । जो तुज जाला असेल साचा । पल्लव न फोडी कल्पनेचा । मिथ्या वाचा न बोलें ॥१४॥

मग जोडुनी द्वयपाणी । करी संतांपुढें विनवणी । जे अस्वस्थ घडली रजनीं । सत्य निरुपणीं निवेदिले ॥१५॥

तो परिसोनि वृत्तांत । आनंदमय जाले साधुसंत । म्हणती प्रसाद लाधला निश्चित । अति अद्भुत सदयत्वें ॥१६॥

या दृष्टांताचा नवलाव । आम्हां दिसतो अति अपूर्व । तूतें तुष्टोनि रमाधव । करी गौरव प्रासादिक ॥१७॥

देखिला द्विज तो अनंत । मुख्य प्रसाद तांबूल प्राप्त । कवित्व बुद्धीचा हेत । पृथक् दावीत रसनेसी ॥१८॥

कवित्वबुद्धीचा प्रसार । अतिसधन होय विस्तार । आतां तंतूचा प्रकार । अतिसुंदर असे तो ॥१९॥

कवित्वासी नव्हे खंडण । करिसी तितकें चाले पूर्ण । आतां न धरी अनुमान । दृष्टांतलक्षण जाणविलें ॥२०॥

हेचि संतांची अभयता । न घडो कवितेसी न्यूनता । तया असो सुरसरसता । सर्वी मान्यता आगळी ॥२१॥

संत साधु सिद्ध मुनी । वर देतां अभयवचनीं । हर्षयुक्त होविनि मनीं । लोटांगण घातलें ॥२२॥

यापरी संतांतें स्तविलें । त्यांनीं बाळातें अपंगिलें । आवडीचें भातुकें दिल्हें । मज तोषविलें दीनातें ॥२३॥

यावरी जे श्रोते सज्जन । त्या पदीं माझें साष्टांगनमन । जे सज्ञान चतुर विचक्षण । ग्रंथश्रवणकर्ते त्यां ॥२४॥

अहो तुम्ही रसज्ञ पंडित । महासुशील आणि शांत । अर्थज्ञ गुणज्ञ विख्यात । तुम्हां प्रणिपात आदरें ॥२५॥

तुम्ही सर्वज्ञ निपुण । जाणते भाविक विराजमान । प्रेमळ सदैव संपन्न । आनंदघन महामूर्ति ॥२६॥

तुम्ही ग्रंथरसाचीं पात्रें । धन्यधन्य तुमचीं श्रोत्रें । अहो तुम्ही ग्रंथाचीं सूत्रें । बैसला सत्पात्रें सभेस ॥२७॥

तुम्ही ज्ञानपेठेचे जोहारी सुरेख । ग्रंथरत्नांचे परीक्षक । सारवस्तूचे ग्राहक । संग्रहकारक अतियोग्य ॥२८॥

जी तुम्ही विवेकसागर । ग्रंथसरोवरीचे हंस थोर । अर्थमुक्तांचे वेंचनर । धन्य निवडणार दूध पाणी ॥२९॥

तुमचेनि ग्रंथविलास । वाढतां होय अधिक रस । वक्तिया पोटीं उल्हास । दिवसेदिवस वाढतसे ॥३०॥

म्हणवोनि करितों विनंती । अवधान द्यावें या ग्रंथीं । चुकलें सांभाळा निगुतीं । हीनमती मी असें ॥३१॥

मी पामर अत्यंत दीन । नसतां अधिकार मजलागुन । तुम्हां सलगी इच्छी मन । मन निरुपण कांहीं इच्छी ॥३२॥

जरी तुम्ही कृपा कराल । तरी वदेल हा लडिवाळ । न स्वीकारितां फोल । होतील बोल निर्धारें ॥३३॥

यास्तव जोडोनि पाणी । भाळ ठेवितों पुढतीं चरणीं । तुमचेनि साह्यपणीं । वाचा निरुपणीं वदेल ॥३४॥

ऐकोन वक्त्याचे वाग्वाद । श्रोते मानिती बहुत आनंद । म्हणती स्तुति अगाध । होवोनि सद्‍गद कासया ॥३५॥

आम्ही श्रवणार्थी क्षुधित । कीर्तनरसीं अत्यद्‍भुत । पान करवा निश्चित । कोण काव्यार्थ असे तो ॥३६॥

तुम्हा वदविता श्रीअनंत । येथें ही तोची श्रवण करित । उभय पक्षीं सांभाळित । भेदरहित जगदात्मा ॥३७॥

कर्णपात्र वोढवलें । मनही एकाग्र समर्पिलें । तरी आतां उतावेळें । पाहिजे वाढिलें परिपूर्ण ॥३८॥

आजी दैव आलें उदयास । उद्गार आज्ञा ईश्वरी तुम्हांस । तरि तृप्त करावें श्रोतियांस । अति उल्हास सकळातें ॥३९॥

आम्ही अन्यथा न बोलों वचन । नाहीं वदलों कुचेष्टपण । करा जी आतां निरुपण । करुं श्रवण आवडीं ॥४०॥

श्रोते वक्ता समरस । उभय अंतरी उल्हास । येथोनि आरंभ विशेष । ग्रंथरस वाढता ॥४१॥

आतां नमूं ऋषि भारद्वाज । जो तपोनिधी तेजःपुंज । ज्याचें दर्शन होता सहज । पूरवी काज अंतरीचें ॥४२॥

सकळ तीर्थे असती चांग । त्यांत उत्तम तो प्रयाग । तयाचा तो उत्तम भाग । वेष्टित संग गंगेचा ॥४३॥

तेथेंचि असे तो उत्तम । मुख्य भारद्वाजाचा आश्रम । करितां यात्रेचा क्रम । असे विश्राम ते ठायीं ॥४४॥

आश्वलायनशाखा ऋग्वेद । भारद्वाजगोत्री प्रसिद्ध । वेलविस्तार विविध । जाला भेद उपनांवें ॥४५॥

असो भारद्वाजगोत्रीं जाण । जन्म जाला मजलागुन । म्हणोनिया प्रेमें करुन । त्याचे चरण वंदिले ॥४६॥

आतां नमूं ते कुळदेवता । श्रीमत्सद्गुरु अनंता । देवची नाहीं या परता । सर्वात्मकता येथेंची ॥४७॥

याविरहित जें दैवत । तयाचेचि असती अंगभूत । अनंतरुपें नटला निश्चित । म्हणोनी प्रणिपात त्या पदा ॥४८॥

जैसे एका देहासी । इंद्रियें शोभती जैसीं । नामें वेगळाली तैसीं । विभक्तपणासी दैवतें ॥४९॥

यालागीं दैवतेंद्र । होय सद्‌गुरु कृपासमुद्र । या पदीं माझा नमस्कार । भाळ निरंतर त्या पाई ॥५०॥

धरोनी सप्रेम आवडी । साधिली नमनाची परवडी । स्तवितां अत्यंत गोडी । जाली जोडी ग्रंथमिषें ॥५१॥

प्रथम नमिला तो गजवदन । जो सिद्धिबुद्धिदाता मंगलभूषण । पुढें सरस्वतीतें नमितां जाण । झाली प्रसन्न वागीश्वरी ॥५२॥

मग त्या सद्‌गुरु अनंता । स्तवितां तोषोनि वारी चिंता । तयानंतर मातापिता । जन्मदाता स्तवियेलें ॥५३॥

तदुत्तर संतमहंत । तया जालों शरणागत । ते होवोनि कृपावंत । प्रसाद प्राप्त करविला ॥५४॥

ग्रंथरसाचे जाणते । ते मग स्तवी आदरें श्रोते । नमस्कारितां तयांतें । जाले श्रवणातें सादर ॥५५॥

प्रीती नमिला तो भारद्वाज । ज्या गोत्रीं जन्म जाला मज । जो हृदयीं ध्यातां महाराज । घडे काज इच्छिलें ॥५६॥

आदिअनादि कुळदैवता । भावें नमिलें त्या अनंता । जो अनंतब्रह्मांडें नियंता । त्या कृपावंता स्तवियेलें ॥५७॥

जेथोनि कथेचा रस । वाढविता श्रीजगदीश । कर्ता नोहे मी निःशेष । ज्याचा विलास तोचि कथी ॥५८॥

चित्तचालक चैतन्यघन । हृदयनिवासी नारायण । ज्याचे सत्तामात्रें करुन । इंद्रियें संपूर्ण वागती ॥५९॥

तोचि या ग्रंथाचा कर्ता । रसनेलागीं बोलविता । कर्णेंद्रियासी ऐकविता । श्रोतावक्ता तोचि येथें ॥६०॥

येऱ्हवीं मुक्यानें काय बोलावें । पांगुळें तरी काय चालावें । बधिरें केविं ऐकावें । शक्ति निर्जीव केविं कीजे ॥६१॥

परि या ईश्वराचे अगाध खेळ । जयावरी हा होय कृपाळ । अचाट करणी करवी चपळ । वाढवी प्रबळ भलतेंची ॥६२॥

शहाणेच करवी वेडे । वेडेची शहाणे रोकडे । कृपें अवकृपें जोडे । करणें निवाडे काय ते ॥६३॥

यास्तव दीनाची विनवणी । असे सज्जनाचे चरणीं । कर्तेपणाची करणी । संतजनीं जाणिजे ॥६४॥

मी अत्यंत पामर । जेविं काष्ठयंत्रप्रकार । परि तो दाविता चमत्कार । विरक्त निर्धार असे कीं ॥६५॥

तोचि श्रीस्वामी अनंत । पिता सद्‌गुरु तोचि समर्थ । म्हणोनी ग्रंथीं नाम अनंतसुत । दास अंकित संतांचा ॥६६॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । श्रवणेंची पुरती मनोरथ । सदा परिसोत संतमहंत । प्रथमाध्याय गोड हा ॥२६७॥

॥ इति प्रथमोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय दुसरा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ॥

ॐ नमोजी श्रीदत्ता । अविनाशरुपा समर्था । निर्विकारा मायातीता । दुःखहर्ता जगदात्मा ॥१॥

नमो तूतें गा दिगंबरा । त्रिगुणात्मका दयासागरा । चिद्धना तूं सर्वेश्वरा । सदय उदारा महामूर्ती ॥२॥

जयजयाजी महासिद्धा । विमळरुपा आनंदकंदा । चिद्विलासिया परमानंदा । भेदाभेदातीत तूं ॥३॥

जय महामुनी योगिराया । षड्गुणसंपन्ना गुणालया । आनंदकंदा अभया । तुझिया पायां प्रणम्य ॥४॥

तूं अद्वयपणें निरंतर । तुझा न कळे कवणा पार । तूं सिद्धमुनींत योगींद्र । जोडिती कर देवऋषि ॥५॥

महाराज अत्रितपोधन । कांता अनसूया पतिव्रतापूर्ण । यांचें तोषवावया मन । जालासी नंदन तयांचा ॥६॥

या जगदोद्धारासाठीं । प्रगटसी धरोनी त्रिपुटी । शरणागता देसी भेटी । योग हातवटी दाविसी ॥७॥

जयासि देसी कृपादान । तया करिसी आपणासमान । किंवा भातुकें इच्छित देऊन । हरिसी अज्ञान क्षणमात्र ॥८॥

ऐशा तुझ्या कीर्ति अपार । कीं दत्तमूर्ती उदारधीर । अनाथ दीनांचा अंगीकार करितो उद्धार पतितांचा ॥९॥

म्हणोनिया दीनदयाळा । शरण तुझिया चरणकमळा । कृपा करोनी ये वेळा । पुरवी लळा अंतरींचा ॥१०॥

जयजयाजी अवधूता । तूंचि माझी मातापिता । तूंचि समर्थ माझा दाता । बंधु चुलता सखा तूं ॥११॥

तूंच आप्त आणि स्वजन । तूंचि माझें ऐश्वर्यनिधान । तूंचि माझें यश कल्याण । पाळिता पूर्ण तूंचि माझा ॥१२॥

तूंचि माझें कुळदैवत । परंपरेसी गुरुनाथ । मी बाळ तुझा अंकित । करी सनाथ अनाथा ॥१३॥

मम अंतःकरणींचें गुज । तूं जाणसी महाराज । दीनजनाचें करणें काज । हें तो सहज तुम्हांतें ॥१४॥

मी तों अत्यंत क्रिमीर । हालवू पांहे मेरुमांदार । तुझ्या कृपेवीण कंकर । अणुभार नुचलेची ॥१५॥

तूं जरी कृपा करिसी । तरी मेरुपुष्प मशकासी । म्हणोनी अनन्य तुम्हासी । होवोनि दानासि मागतों ॥१६॥

कांहीं घडावें निरुपण । हेंची इच्छीतसे मन । परी पडलों बुद्धिहीन । म्हणोनी चरण लक्षितों ॥१७॥

केधवां येसी तूं माऊली । करिसी कृपेचि साउली । क्षुधित आशा लागली । ये गे माउली धावून ॥१८॥

कंठ जाला सद्गदित । तुझ्या नांवे पाचारित । तुवां तारिले बहुत । त करी सत्य ब्रीदावळी ॥१९॥

धेनु वत्साते त्यागितां । सिंहे बाळातें मोकलितां । हरणी पाडसा अव्हेरितां । कोण सांभाळितां तयांसी ॥२०॥

ऐसें न करी तूं मातें । मी बाळ तुझें नेणतें । उचलोनी घेइ स्नेहभरिते । लळे पुरते करी माझे ॥२१॥

ऐशी करुणा भाकितां । दया उपजली गुरुदत्ता । शब्दध्वनी अवचिता । जालो ऐकतां कर्णरंध्रीं ॥२२॥

गालवऋषीचे स्थानीं । मम जयंतीच्या दिनीं । तूं संकटीं पडिलासी म्हणोनी । आलों धावूनी भेटलों ॥२३॥

वृद्ध द्विजरुपातें धरिलें । मम जन्मकथन तुज बोधिलें । कीर्तनी सप्रेम श्रोते जाले । नवल वाटलें सकळांतें ॥२४॥

मीच स्वयें कीर्तनीं प्रगटलों । स्वानंद रसातें भरिता जालों । प्रसाद देउनी तूतें गेलों । तैंच पावलों तुज बापा ॥२५॥

आतां कासया प्रार्थीसी । तो आठव आणी मानसीं । मी वसतों भाविकांपासीं । मनोरथासी पुरवीतों ॥२६॥

न करी न करी आतां कल्पना । निववी आतां संतसज्जनां । श्रोते भाविकांच्या मना । तोषवी जनां अबलातें ॥२७॥

घेई लेखणी मसीपत्र । कथा वदे सतेज पवित्र । आत्मचर्चाज्ञान विचित्र । प्रश्नादर श्रोतियांचा ॥२८॥

कांहीं लीला आणि लाघव । सत्कथेचा करी गौरव । जें गुह्य ग्रंथी अपूर्व । वर्णी समुदाव तोषे जेणें ॥२९॥

ही ऐकतां प्रसादवाणी । तन्मय वृत्ती जाली मनीं । सुखसंतोषातें पावुनी । सप्रेम नयनी वाहे नीर ॥३०॥

आठव नसे वदावया । शून्य स्थिती जाली काया । वृत्ती गेली मुरोनिया । सावध व्हावया शुद्धि नाहीं ॥३१॥

श्रोते म्हणती नवल । धन्य वक्ता हा प्रेमळ । गुरुदत्त होवोनि दयाळ । प्रसाद सफळ दिल्हा या ॥३२॥

म्हणती वक्तिया सावधान । क्षुधितां करवी भोजन । आमुचे आवडीचें पक्वान्न । अविट जाण तुजपासीं ॥३३॥

आतां वेगीं सावध होई । अपेक्षित तें आम्हां देई । उदंड भांडार तव हृदईं । ठेविलें पाहीं अवधूतें ॥३४॥

त्याचे विभागी आम्ही श्रोते । म्हणोनी सावध करितों तूंते । अकिंचनपणें आपस्वार्थे । गिळोंनि त्यातें न राहे ॥३५॥

धरी गा आतां उदारता । तोषवि आम्हां भाग्यवंता । अपेक्षित दे पदार्था । वसो सदयता तव हृदयीं ॥३६॥

ऐकोनि श्रोतियांचें वचन । सावधानें करी भाषण । आहो जी तुम्ही सर्वसंपन्न । देतां भूषण पामरा ॥३७॥

मी पतित हीन जड । निर्बुद्धी अत्यंत मूढ । अविचारी कुव्यसनी द्वाड । वाणी धड बोल नसे ॥३८॥

एसियातें श्रृंगारितां । गौरववचनें वाढवितां । सत्कारबहुतचि करितां । परि हें योग्यता कैची येथें ॥३९॥

खराअंगीं चंदन । मर्कटासी भूषण । अस्वलासी प्रावरण । मान्य कवण कैसेनी ॥४०॥

तया आदरें संवादा । करीतसां या मतिमंदा । मी काय जाणें अनुवादा । प्रश्नभेदा भेदावया ॥४१॥

तुम्ही ईश्वराच्या मूर्ती । ज्ञाते सतेज जेवीं गभस्ती । तुम्हांपुढें कायसी मती । मजप्रति निरुपाया ॥४२॥

तुम्ही प्रबोधरुपें धुरंधर । ऋषिमुनींचे अवतार । तुम्हांपुढें मी पामर । काय उत्तर कैसे करुं ॥४३॥

श्रोते म्हणती नोव्हे ऐसें । तुझे बोल अनारिसे । कोमळ आणी मधुरसे । आम्हां सरिसे प्रिय बहु ॥४४॥

पुढतीं विनवी श्रोतियाला । अंगीकाराल या बाळबोला । तरी वेडयावांकुडया शब्दांला । अर्पीन तुम्हांला भलतेसे ॥४५॥

नाहीं मजसी ज्ञानमती । दृष्टी नाहीं ग्रंथअर्थी । कोण कैसिया संमती । मेळ उगती न जाणें ॥४६॥

नाहीं केला वेदाभ्यास । नाहीं पढलों शास्त्रास । नाहीं पाहिलें पुराणास । नाहीं शब्दास ओळखिलें ॥४७॥

प्राकृतातेंही नोव्हे जाणता । नाहीं ऐकिल्या प्राज्ञवार्ता । परी सद्गुरु अनंत बोलविता । त्याची सत्ता कळेना ॥४८॥

तोचि श्रोतियांच्या प्रश्नासी । पूर्ण कर्ता कृपाराशी । कर्ता या ग्रंथासी । निमित्तासी सुत पुढें ॥४९॥

तव श्रोते म्हणती पुरें । या संबोधनाचीं अक्षरें । परिसोनी प्रश्न सविस्तरें । सांगे त्वरें आम्हांसी ॥५०॥

तव आकाशीं कथांबुधर । तेथें वेधले मनचकोर । तृप्त करी गा सत्वर । आम्ही सादर पानासी ॥५१॥

श्रोते म्हणती गालवस्थानी । जन्म कथिला श्रीदत्तांनीं । तो निवेदा आम्हांलागुनी । प्रसादवाणी परिसू ती ॥५२॥

जो तुम्हीं प्रश्न केला । तो यथामति निवेदीन सकळां । आवरोनिया मनचंचळा । कथा सुढाळा श्रवण कीजे ॥५३॥

श्रोता वक्ता सावधानें । उभयां साध्य समसंधानें । तेथें रसानी काय उणें । विशेष गुणें वाढे तो ॥५४॥

श्रवण श्रवणातें देइजे । चित्त कथेसी अर्पिज । एकाग्रता साधिजे । रस घेइजे सांठवणी ॥५५॥

दत्तें द्विजरुपें मज निरोपिलें । तें तुम्हां सांगेन भलें । तें आदरें वहिलें । श्रवण केलें पाहिजे ॥५६॥

अहो जो निर्गुण निर्विकार । निरामय निराभास ईश्वर । मायातीत चिद्धनपर । जो निरंतर निरंजन ॥५७॥

जया आगमनिगम वाखाणिती । श्रुती जयातें वर्णीती । पुराणें भाटीव ज्याचें करिती । जया गाती बहुमतें ॥५८॥

तो हा साकाररुपें करुन । क्षीरब्धिवासी नारायण । जया म्हणती रमारमण । शेषशयन विश्वंभर ॥५९॥

अरुपतेंचि रुपा आलें । अनामासीच नाम जालें । विस्तीर्णरुपें विस्तारलें । तयाचा न कळे पार कोण्हा ॥६०॥

गुणरुपा नाहीं अंत । महिमेसी नाहींच प्रांत । कीर्तिनामा नाहीं गणित । म्हणोन अनंत म्हणती तया ॥६१॥

तया अनंतापासून । जाला असे चतुरानन । त्या ब्रह्मदेवापासून । अत्रि जनन पावला ॥६२॥

तो योगेश्वर अत्रिमुनी । अनुसूया नामें त्याची पत्नी । ते पतिव्रता लावण्यखाणी । सदाचरणी सुशीला ॥६३॥

पतिचरणीं सदृढभाव । पतिच असे तिजला देव । पतिवांचोनि अपूर्व । अन्य ठाव दिसेना ॥६४॥

करी पतीचें पूजन । पतिच तिचें जपध्यान । अखंड सेवी पतिचरण । यावीण साधन नेणेची ॥६५॥

सेवी पतीचे चरणतीर्थ । पतिपदीं निवेंदी अर्थ । पतीवांचोनि परमार्थ । नये मनांत दुसरा ॥६६॥

पतीची आज्ञा वंदी शिरीं । पति सांगे तेंचि करी । करकमळें चरण चुरी । लक्ष वरी ठेवोनी ॥६७॥

द्वय कर ते जोडून । करी पतीचें स्तवन । तया न घालितां भोजन । अन्नपान न घेते ॥६८॥

कित्येक असती युवती । जगीं पतिव्रता म्हणविती । वरी भावातें दाविती । अर्थ चित्तीं कनकाचा ॥६९॥

न्यून पडतां किंचित । बोले भ्रतारा विपरीत । मना ऐसे पुरतां अर्थ । गोंडा घोळीत शुनीपरीं ॥७०॥

तैसी नोव्हे ती अनसूया । सत्यपणें जिची क्रिया । न धरीच कोठें मोहमाया । पतिपायां सेवीतसे ॥७१॥

ऐका पतिव्रतेचें लक्षण । षड्‌गुणें जी का संपन्न । श्लोकीं बोलिले कविजन । तेचि शोधून काढिले ॥७२॥

श्लोक । कार्येषु मंत्री वचनेषु दासी । भोज्येषु माता शयनेषु रंभा ।धर्मानुकूला क्षमया धरित्री । भार्या च षड्‌गुण्यवतीह दुर्लभा ॥७३॥

पतिस्वहितीं सर्वज्ञता । वागे कैसी पतिव्रता । मंत्री जेवी राज्यरक्षिता । स्वामिचित्ता जाणोनी ॥७४॥

नुलंघीच कदापि वचन । सर्व जाणे कार्याकारण । सन्मुख सदा कर जोडून । राखी प्रसन्न भूपातें ॥७५॥

जैसा जैसा प्रसंग पडे । राज्यकार्य जेथें अडे । पडतां संग्राम जावोनी भिडे । पद गाढे रक्षित ॥७६॥

राज्यप्र जावाहिनी । तोषोनि राखी स्नेहेकरुनी । संग्रह समारंभ राजभुवनीं । ठेवी जपोनी साक्षेपें ॥७७॥

केधवां राव काय पुसेल । म्हणोनी सावध राहे पळोपळ । मानापमान जाणे सकळ । धूर्त प्रबळ सर्व काजीं ॥७८॥

राजमंडपीं सांकडें येती । राजाज्ञें परस्परें निवडिती । रात्रंदिवस जागृती । विवरे चित्तीं कामकाजें ॥७९॥

करीं राज्याचे रक्षण । न होय कदा पराधीन । राव दर्पातें वाढवून । यश गहन संपादी ॥८०॥

चातुर्य बळ पराक्रमें । जिंकी परभूप संग्रामें । नीति स्वधर्म जाणोनि क्रमे । सदा रसे सन्मार्गी ॥८१॥

पापदृष्टी अंगीं नसे । सुशिलत्वें सदा वसे । प्रथम गुण ऐसा असे । हाचि विलसे पतिव्रते ॥८२॥

आतां दुसऱ्या गुणाचा क्रम । तो परिसाजी अति उत्तम । वाटे बोलतां सुगम । कठीण परम चालवितां ॥८३॥

द्वितीय गुणाचे ठाईं । दासी पद आणिले पाही । नीच न म्हणा कदाही । उत्तम देहीं गुण घ्यावा ॥८४॥

नीचकार्य गृहधंदा । तेथेंचि राबे दासी सदा । सकळांची राखी मर्यादा । मुखें वादा न घाली ॥८५॥

गृहस्वामी आणि स्वामिनी । लक्ष ठेवी उभय चरणीं । निद्रासनें सिद्ध करोनी । पाद संवाहनीं दिवानिशीं ॥८६॥

प्रभातें उठोनी पिसणें । मग झाडावीं गोठाणे । सडासंमार्जन शुभ्र करणें । बाळें खेळवणें स्वामीचीं ॥८७॥

बाह्य क्रियेसाठीं । उदकसंचय उठाउठी । निसणे टिपणें खटपटी । करितां भ्रकुटी आकर्षीना ॥८८॥

वाती करोनी दीप लावणें । गुरेंढोरें सोडुनी बांधणें । पडलें झडलें सांभाळणें । जीव लावणें प्रपंचीं ॥८९॥

न्हाणीं धुणीं स्वामिनीची । वेणीफणी गुंफणी नगांची । करी भाषणें आवडीचीं । नरकमुताची स्वच्छता ॥९०॥

कामें करितां नाणी मळ । रागें भरतां नव्हे गढूळ । चुकल्या ताडितां गृहमंडळ । सांडोनी पळ साधीना ॥९१॥

क्षण एक बैसे संकोचित । सवेंचि कार्यासि लागत । आज्ञापितां जोडी हात । सादर चित्त सेवेसी ॥९२॥

या गुणांचें जें सार । तो पतिव्रता जाणे विचार । आतां तृतीय गुणप्रकार । तोही सविस्तर सांगतो ॥९३॥

भोजनीचा क्रम सांगतां । उपमेसी आणिली माता । श्रोते म्हणती आश्चर्यता । विकल्प चित्ता वाटतो ॥९४॥

वक्ता म्हणे सावधान । विकल्पित न करावें मन । कवि देखोनि ग्राह्यगुण । पद स्थापन करीतसे ॥९५॥

जाणोनि बालकाची खोड । माता तयापरी करी कोड । मातेमुखीं लागे गोड फार । थोडें तेंहि दे ॥९६॥

जी बाळें आळ घेतली । ती पुरवी प्रेमें माउली । अर्भकाजवळी बैसली । ग्रास घाली आवडीनें ॥९७॥

बाळकें काला चिवडिला । तो मातेनें नाहीं टाकिला । निर्विकल्पें कां स्वीकारिला । नाणी कंटाळा मनांत ॥९८॥

बाळाचा उच्छिष्ट ग्रास । पात्रीं पडिला निःशेष । माता न करी कुसमुस । न बाळकास ताडिते ॥९९॥

बाळ न बैसे भोजनीं । अथवा बैसलें राहे खुंटोनी । तया नाना रीती संबोखोनी । सांगोनी कहाणी जेववी ॥१००॥

जोंवरी भोजनीं बैसे । तोंवरी माते बैसणे तैसे । जेवण थोडें कीं फारसें । जाणतसे ती माउली ॥१॥

नित्याहोनी जेविला थोडें । किंवा अन्न न ने तोंडाकडे । तया दुःखें माता हडबडे । चिंता जोडे चित्ता बहु ॥२॥

चित्तीं होय कासावीस । म्हणे काय झालें बाळास । हात न लावी अन्नास । एकही ग्रास न घेची ॥३॥

बुझाबोनो बोले बाळका । म्हणे जेविला नाहीं आजी सखा । दुजा पदार्थ करितें निका । आवडे जो का तो सांगे ॥४॥

बाळा तूं न जेवितां पाही । मज अन्न गोड न लागे कांहीं । बाळें सांगतांचि लवलाही । तेंचि देई तयातें ॥५॥

माता बाळा निवेदी अन्न । आवडे तेच घाली त्यालागुन । करमुखशुद्धी करवून । करी भोजन पुढें ती ॥६॥

म्हणोनी पतिभोजनी विशेष । हें पद ग्राह्य पतिव्रतेस । आतां चतुर्थ गुणास । वर्णूं सुरस तुम्हापुढें ॥७॥

शयने च रंभा म्हणोनी । हें पद स्थापिलें कवींनीं । यास्तव आतां विवरोनी । श्रोतेजनीं निरोपूं ॥८॥

अहो रंभा म्हणजे स्वर्गवासी । ते कैची प्राप्त भूजनासी । या मिथ्या कल्पनेसी । काय मानसी आणावें ॥९॥

उत्तम गुण आणि चतुरता । कुशलें तोषवी भ्रतारचित्ता । तापा निरवोनी दे सुखता । प्रिय भाषणता दावोनी ॥१०॥

आतां याचा प्रकार । कवण रीती कैसा विचार । हा दावितो करोनी प्रखर । चित्ता स्थीर करावें ॥११॥

स्त्रियेचा संकल्प पतिचरणीं । तया न व्हावी कदा हानी । सेवा भाग लक्षोनि मनीं । घेत धनी पतिव्रता ॥१२॥

ईतें रंभेची असावी युक्ति । म्हणाल ती कोणती । हरे पुरुषाची चित्तवृत्ति । होय चित्ती आनंद त्या ॥१३॥

येतांचि द्यावें अभ्युत्थान । व्हावें सलज्ज अधोवदन । नम्रतेचें करावें भाषण । तेणें मन संतोषें ॥१४॥

आसन द्यावें बैसावया । द्यावें उदक आणोनिया । श्रमभागातें पुसोनिया । चुरुं पायां धाविजे ॥१५॥

दिवा प्रपंचाची गती । वर्तावें विभक्ताचे रीती । एकांतीं वाढवी जे प्रीती । तेहि स्थिति अवधारा ॥१६॥

भाग्यअभाग्य सुखदुःख । असेल तैसें गोड देख । करोनिया विवेक । मानोनि निःशंक धेईजे ॥१७॥

असेल तैसा विलास । करुनी दाविजे सुरस । लावोनिया दीपास । मग सेजेस रचावें ॥१८॥

करुनी ठेविजे हार तांबूल । पीकपात्रें अति सोज्ज्वळ । सुवासिक द्रव्य परिमळ । पुष्पफळ पंचारती ॥१९॥

स्वामी येतां अंतःसदनीं । सामोरें जावें साचोल ऐकोनी । त्वरें उष्णोदक आणोनी । जोडोनि पाणी विनवावें ॥२०॥

स्वकरें पाद प्रक्षाळावे । आसन बैसकेसी द्यावें । नित्य नेम होतां बरवे । पात्र वाढावें यथा रुची ॥२१॥

स्वतः प्राशनासी द्यावें उदक । उष्ण प्रक्षाळणीं आवश्यक । मग प्रसाद सारोनि देख । आवर नेटक साधावा ॥२२॥

करावा हास्य कांहीं विनोद । कामचेष्टा तैशा विविध । जेणें भ्रतार पावे आल्हाद । तोची शुद्ध विचार तेथें ॥२३॥
संतोषतां स्वामी दयाळ । तेथें हे हेतु पुरती सकळ । हें स्त्रीस्वधर्माचें मूळ । सेवन सोज्वळ या भावें ॥२४॥

पतीचे राखिता मनोदय । पतीसी वाटे रंभाचि काय । रंभा तों सोडोनि जाय । अंकित होय हे माझी ॥२५॥

तेथेंचि झाली मात । हा गुण येथेंचि मंडित । आतां पांचव्यासि देईजे चित्त । असे सर्वांत श्रेष्ठ हा ॥२६॥

धन्य त्याची प्रपंचता । सर्वतोपक्षीं साह्य कांता । ती जरी असे अनुचिता । त्याचा फजिता न वर्णवे ॥२७॥

कांता असावी सुशीळ । धर्मानुकुल वृत्ती सुढाळ । पोटीं नसेचि कदा मळ । अति निर्मळ गंगावत ती ॥२८॥

ऐशा उदारधीर युवती । धार्मिक निवडिल्या ग्रंथीं । ती सारकथा निगुती । यथामती लिहितों ॥२९॥

कांती-नगरीचा राव श्रियाळ । कांता चांगुणा वेल्हाळ । सकुमार सान चिल्लाळबाळ । भक्त प्रेमळ शिवाचे ॥३०॥

धर्मशील उदार पूर्ण । आल्या अतीथा देती भोजन । अपेक्षिता देती दान ।
करिती पूजन शिवाचें ॥३१॥

धर्मी न वागेचि कल्पना । करी नित्य असंख्य दाना । कीर्ति भेदित गेली
गगना । कोण्ही परतेना याचक ॥३२॥

शिवस्मरणीं अत्यंत रत । उभयतांही आनंदयुक्त । तंव तेथें अकस्मात ।
आला त्वरित नारदमुनी ॥३३॥

नृपें करोनी साष्टांग नमन । केलें नारदाचें पूजन । नृपआदरातें देखोन ।
धार्मिक पूर्ण ओळखिला ॥३४॥

मग पुसोनी नृपातें । नारद जाय स्वर्गपंथे । लोकालोक पाहोनि कैलासातें ।
जावोनि शिवातें भेटला ॥३५॥

शिवें देखोनि नारदासी । परस्पर हर्षती मानसीं । नारद स्तवित शंकरासी ।
अतिप्रेमेंसी आदरें ॥३६॥

देव भक्ता झाल्या भेटी । आनंदें उभयतां पडल्या मिठी । आनंद न समायें
पोटीं । जिवींच्या गोष्टी बोलती ॥३७॥

शिव म्हणे नारदऋषी । कोठोनि येणें झालें तुम्हासी । येरु म्हणे भूलोंकासी ।
पाहोनि वेगेसी आलोंसे ॥३८॥

मग वदे उमापती । तुज फिरण्याची बहुत गती । कांहीं अधिकोत्तर कथी ।
पाहिलें नेत्री असें जें ॥३९॥

मुनी म्हणे सर्व पाहिलें । अपार भक्त तुझे देखिले । मागेंहि बहुत झाले ।
महिमा न कळे तयांचा ॥४०॥

परि प्रस्तुत कांतीपुरीं । श्रियाळराव असे निर्धारी । कोण्ही भक्त तयाची सरी । पावे अंतरी न दिसे मज ॥४१॥

चांगुणा नांमें त्याची कांता । साध्वी माउली पतिव्रता । तव भक्तीसी उभयता । लीन धार्मिकता आगळी ॥४२॥

श्रीशंकर म्हणवून । आदरें करिती अतिथिपूजन । इच्छेऐसें देती दान । अति सन्मान करोनी ॥४३॥

उदास न होती मानसीं । कंटाळा न येची त्यांसीं । भक्तिप्रेमा अहंर्निशी । तयापासीं मूर्तिमंत ॥४४॥

तयालागीं एक बाळक । सकुमार चिल्लाळ नामें देख । पाहतां मना वाटलें सुख । अति हरिख धर्मीं तया ॥४५॥

अजी शंभो जाश्वनीळा । ह्या नृप असे सत्त्वागळा । ऐसा दुजा न देखें डोळां । या भूमंडळा शोधितां ॥४६॥

धन्य देवा पशुपति । असंख्य तुझे भक्त असती । परि या श्रियाळाची स्थिती । पाहोनी चित्तीं आनंद ॥४७॥

ऐकोनी नारदाचें कथन । परम हर्षला उमारमण । नारदा करविलें अमृतपान । तें फिकें गौण यापुढें ॥४८॥

आज्ञा मागोनि ते वेळां । अन्य लोकां नारद गेला । शिवगुज सांगे पार्वतीला । निजभक्त डोळां पाहीन ॥४९॥

लीलालाघवी उमाधव । रुप तैं धरीतसे अपूर्व । पहावया भक्तभाव । करी लाघव अनुपम ॥५०॥

कुश्चळ मलिन विकारभरित । सर्वांगीं चिंध्या वेष्टित । पूरक्त वाहतें बहुत । सुटली अद्‌भुत दुर्गंधी ॥५१॥

अक्राळविक्राळ त्राहाटका । हांकापाठीं मारी हांका । पाहतां भय जनलोका कोण्ही न ये का जवळी पैं ॥५२॥

न कळे कोणासही हा कोण । उगेच पाहती सर्व दुरुन । योगी पाहे निरखून । हे तों अज्ञान सर्वही ॥५३॥

रत्नाचे परीक्षक जोहारी । जेवी लक्ष न ठेविति कांचेवरी । हिराच शोधोंनी झडकरी । घेती करीं आदरें ॥५४॥

तेवी सकळ जनाची घेर सोडोन । योगी पावला नृपसदन । महाद्वारीं उभा राहोन । हांक दारुण मारिली ॥५५॥

अरे मी असे बहु क्षुधित । दे भोजन मज गा अपेक्षित । ऐशा वचने रायाचें चित्त । पिसा परीक्षित तेधवां ॥५६॥

अतीतशब्द पडतां श्रवणीं । श्रियाळ आला त्वरें धावूनी । तात्काळ प्रेमें लागला चरणीं । कर जोडोनी ठाकला ॥५७॥

म्हणे जी स्वामी कृपावंता । काय आज्ञा सांगा जी समर्था । योगी म्हणे होसी दाता । पुरवी अपेक्षिता माझिया ॥५८॥

नृप वदे योगिराया । परिपूर्ण आहे तुझी दया । तुझे हेतु पुरवावया । वेळ कासया पाहिजे ॥५९॥

तन मन आणि धन । राज्यसंपत्ती वैभव पूर्ण । कलत्रासहित शिवालागुन । लक्षोनी चरण असें कीं ॥६०॥

जी अपेक्षा स्वामीचित्तीं । तीच सांगणें दासाप्रती । योगी म्हणे या नृपती । राज्यसंपत्तिवैभव नको ॥६१॥

मी तरि असें क्षुधातुर । इच्छित भोजन घाली सत्वर । ऐकोनी तव किर्ति अपार । हेतुपुरःसर पावलों ॥६२॥

नाना अन्नें पक्वान्नें भक्षिलीं । परि इच्छा असे एक उरली । तीचि पाहिजे पुरविली । याचि वेळीं सत्वर ॥६३॥

राव म्हणे तो अर्थ कोण । सांगता पुरेल न लगतां क्षण । योगी वदे नरमांसभोजन करितां मन संतोषे ॥६४॥

अवश्य म्हणे तैं श्रियाळ । ऐकतां बोले पयःफेनधवळ । तूं सत्ताधारी धनपाळ । देवोनि मोल आणिसी ॥६५॥

चोर जार बंदी दीन । स्यांचें न करीच मी सेवन । किंवा देसी मोलें आणून । स्पर्श त्यालागुन न करीच ॥६६॥

राव होवोनिया विनीत । पुढतीं योगियासी बोलत । आपण आज्ञा कराल निश्चित । तेंचि त्वरित अर्पितों ॥६७॥

योगी वदे पवित्र सुशील । धार्मिक अंतरीं निर्मळ । दे शिवभक्तीसी जो प्रेमळ । नको चांडाळ खळ दुरात्मा ॥६८॥

श्रियाळ चरणीं ठेवी माथा म्हणे मज अंगीकारी समर्था । तंव उत्तर झाला शिव देता । मागत्याचा पिता तूं होसी ॥६९॥

उभय संवादा ऐकून । त्वरें चांगुणा आली धावून । पद योगियाचे वंदोन । उभी राहून विनवीत ॥७०॥

जी जी योगिया दीनदयाळा । पतित पावना तूं कृपाळा । आपण न अंगीकरितां भूपाळा । दासी कमळां विनटली ॥७१॥

हें शरीर स्वामीकाजीं । वेंचावें वाटे मज आजी । कृपा करोनी स्वीकारा जी । असें राजी आत्मसुखें ॥७२॥

न करा जी आतां अव्हेर । करा दासीचा अंगीकार । सद्गद हृदय नेत्रीं नीर । योगेश्वर पाहतसे ॥७३॥

तंव अतीत म्हणे तूं माता । आम्हा मागत्याची निश्चिता । आहारीं तुज सेवितां । दोष माथा पडे कीं ॥७४॥

तंव चांगुणा आणि श्रियाळ । उभय जोडोनिया करकमळ । प्रार्थिती होवोनि विव्हळ । चरणीं भाळ ठेवोनी ॥७५॥

जी स्वामिया दयाघना । परमपुरुषा दीनपावना । योगेश्वरा भाकितों करुणा । नये मना हे वपु ॥७६॥

कोण पदार्थ रुचला मानसी । ती आज्ञा कीजे सेवकासीं । सेवा घेउनी रक्षी सत्यासी । वाद त्यासी नाणिजे ॥७७॥

तंव योगी बोले वचन । तुझा एकुलतां एक नंदन । कोमल सकुमार चिल्लाळ पूर्ण । तो आणुन मज देई ॥७८॥

मज असे तयाची प्रीती । तो भोजनीं देई सत्वर गति । अनुमान करितां निश्चिती । करीन हंति सत्वाची ॥७९॥

उभय ऐकुनी झाले चकित । म्हणे होऊं पाहे सत्वघात । तैसियामाजीं अकस्मात । ये त्वरीत चिल्लाळ तो ॥८०॥

माता म्हणे ये बा चिल्लाळा । सगुणा राजसा कोमळा । तूं बहु आवडसी जाश्वनीळा । पयःफेनधवळ शंकरा ॥८१॥

अतीत तुझी वाट पाहे । धावोनी येगे त्वरें माये । वंदी योगियाचे पायें । तृप्त सदयें करी त्या ॥८२॥

तैं चिल्लाळ आला धावत । भावें मातापितयांसी नमित । दृष्टी देखोनिया अतीत । तया प्रणिपात करीतसे ॥८३॥

तंव मातापिता म्लानवदन । संकोचित देखिलें चिन्ह । योगियाचें चंचळ मन । चिलया विचक्षण ओळखी ॥८४॥

चिल्लाळ विनवी अतीतासी । कोण अर्थ सांगा मानसी । योगी म्हणे भोजनासी । नरमांसासी मागतों ॥८५॥

मग मातेसी म्हणे सकुमार । अतीता जेववी सत्वर । आज्ञे ऐसा विचार । करोनि योगींद्रा तोषवा ॥८६॥

चांगुणा म्हणे बाळका । ह्या तो न स्वीकारी आणिका । स्ववपु आम्ही अर्पिता देखा । तेथेंहि शंका स्थापितो ॥८७॥

तुझे ठाई त्याचें मन । चिल्लाळ बोले करा अर्पण । कांहीं न करावें अनमान । सत्व रक्षण करावें ॥८८॥

ऐकोनिया बाळबोला । योगी मनी आनंदला । हिरा घण ऐरणीला । सोनें कसाला पाहती ॥८९॥

तेवी परीक्षावया अंतर । अट्टहास्य करी योगेश्वर । क्षुधिता द्या रे इच्छिला आहार । मज तो धीर न धरवे ॥९०॥

श्रीयाळनृप चांगुणाराणी । विनविते झाले तैं प्रार्थुनी । हा चिल्लाळबाळ अर्पण चरणीं । कृपा करोनी घेइजे ॥९१॥

तंव बाळ बोले जी सर्वोत्तमा । शरणागतासि कीजे क्षमा । मज स्वीकारोनि तोषवा आम्हां । सुखविश्रामा योगिया ॥९२॥

मागुती होय क्रोधायमान । कठोरत्वें करी भाषण । मूर्खपणें देतां दान । मातें हीन देखोनी ॥९३॥

मी काय वृक व्याघ्र रीस । फाडोनी भक्षूं बाळास । कुशळ म्हणवितां आपणांस । वाटे उळगास वारितां ॥९४॥

तुम्ही सत्व धीर आणि उदार । जाणतां सकळ सारासार । हा मिथ्याचि बडिवार । कळलें साचार मज आतां ॥९५॥

करुनी सत्वा तुमच्या हानी । मी जातों स्वस्थानीं । येरु धावोनि लागती चरणीं । ऐसे मनी नाणिजे ॥९६॥

जैसी कराल आम्हां आज्ञा । तेवीच आचरुं सर्वसुज्ञा । अव्हेर करावया प्राज्ञा । नाहीं गुणज्ञा आम्हांसी ॥९७॥

योगी म्हणे सत्व रक्षणें । तरी बाळमांसातें छेदणें । परिपाकोनी स्वच्छ मनें । दिव्य भोजनें मज द्यावीं ॥९८॥

अवश्य म्हणे राजभाजा । कडे घेतले आत्मजा । नमोनी बोले योगीराजा । पाक ओजा सारितें ॥९९॥

त्वरें जावोनी पाकशाळे । चिलयासी मांडिये घेतलें । आवडीनें मुख चुंबिलें । वदन कुरवाळिलें तयाचें ॥२००॥

म्हणे बाळा तूं उदार । योगिया दान केलें शरीर । कांहीं न उगेचि अंतर । केला उद्धार कुळाचा ॥१॥

बाळा तुझें रे वय सान । परि प्रौढबुद्धी तुझें ज्ञान । तुज तोषोनि कैलासरमण । पदीं दे ठाण अक्षईं ॥२॥

तै बाळ बोले मातेसी । क्षुधानळें पीडिलें अतितासी । तूं न गुंते गे मोहासी । साधीं कार्यासि सत्वर ॥३॥

धन्य भाग्याचा हा सुदिन । मद्वपुचें योगिया भोजन । त्या प्रसादें शिवचरण । आतांचि पाहिन शीघ्रगती ॥४॥

ऐकोनि बाळाच्या उत्तरा । सद्गद माय झाली अंतरा । स्वकरें पुसोनी शस्त्रधारा । चिलया सामोरा धरी वेगीं ॥५॥

श्रीशंकर मनीं आठवोनी । कंठ छेदिला तत्क्षणी । षड्रस अन्नें रांधूनी । मांस पचवोनी सिद्ध केले ॥६॥

शिर बाळाचें मोहें ठेविलें । मांस धडाचें रांधिलें । नाना पक्वानें करोनि दाविले । पात्र विस्तारिलें योगिया ॥७॥

रायें मांडोनि आसन । केलें योगियाचें पूजन । चांगुणा पात्र आणून । दावी निरउनी प्रकार ॥८॥

तंव अंतःसाक्षी तो शिवयोगी । पाहोनि पात्र उठे वेगीं । अपवित्र अन्न संयोगीं । मजलागीं जेवविता ॥९॥

कळली तुमची उदारता । कपटें मसी विवंचिता । जातों करोनी सत्वघाता । बोलोनि उठता योगी होय ॥१०॥

राव दृढ धरी तयाचें चरण । म्हणे महाराज अपराध कोण । प्रकट न करितां उठोन । कारितां गमन स्वामिया ॥११॥

योगी म्हणे तुम्ही सुज्ञ । जाणते आणि विचक्षण । सर्वेषु गात्रेषु शिरःप्रधान । तेंचि चोरुन ठेविलें ॥१२॥

अपवित्रातें रांधिलें । तेंचि मातें विस्तारिलें । केवीं जाईल भक्षिलें । वायां गेलें करा ऐसें ॥१३॥

राव कांतेकडे पाहे । चांगुणा म्हणे सत्यचि आहे । आतां पचविते लवलाहे । उशीर काये स्वामिया ॥१४॥

तंव योगी बोले माते । मम आज्ञा मान्य तुम्हांतें । तरी मम सन्निधान शिरातें । घालोनि उखळातें कांडा वेगीं ॥१५॥

येरी सत्वर जाऊन । शिंक्याचें शिर आणिलें उतरोन । उखळीं तयातें घालून । करी कंडन स्वहस्तें ॥१६॥

मुखावरी पल्लव घेतला । हृदयीं सद्गद वेल्हाळा । तंव योगी बोले तये वेळां। मोहे डोळां अश्रू कां ॥१७॥

हें दुःखरुपी दान । मज कासया पाहिजे पूर्ण । आतां जातो मी उठोन । करा रुदन पुत्रमोहें ॥१८॥

उभयतां धावोनी मागें जाती । पदावरी भाळ ठेविती । मधुर शब्दें विनविती । कृपामुर्ती न करा ऐसें ॥१९॥

कृपें समर्थें पाळावें । चुकल्या आपणचि सांभाळावे । सेवादान आम्हां द्यावें । त्वरें फिराव योगिया ॥२०॥

तुमची आज्ञा आम्हां प्रमाण । कदा न करुंचि अवमान । न मळे चित्त देतां दान । ही तो खुण जाणतसां ॥२१॥

ऐकून बोलाची चातुरी । योगी बैसे आसनावरी । म्हणे चांगुणे अंतरी । गोष्टी धरीं सांगतों ॥२२॥

तळी उखळामध्यें कमळ । करकमळें ताडितां मुसळ । गीत गाई तूं मंजुळ । अतिनिर्मळ सप्रेम जें ॥२३॥

मंगळ गीतातें गावें । श्रीशंकर तोषवावें । परिपाकीं रांधावें । भोजन द्यावें आदरें ॥२४॥

अवश्य म्हणोनी ते अवसरीं । मुसळ घेतले सव्यकरीं । गीत आरंभिलें कुसरी । जेणें अंतरी निवे योगी ॥२५॥गीत॥

चिल्लाळा उदारा । कोमळा सकुमारा । धन्य कुळोद्धारा । जन्मलासी ॥२६॥

पूर्वीचें सुकृत । तुझें शुचिष्मंत । म्हणोनी उदीत । दीनकाजीं ॥२७॥

काया हें अर्पितां । न वाटे भय चिंता । वदनीं उमाकांता । आठवीसी ॥२८॥

स्वहित त्वां बा केलें । परलोक जिंकिले । कीर्तीनें भरलें त्रिभुवन ॥२९॥

कैलासीचा राजा । तुज संतोषला । तूंचि त्यासी जाला । आवडता ॥३०॥

जावोनी बैससी । शिवअंकावरी । बाळा तुझी थोरी । अनुपम ॥३१॥

आम्हीं पापराशी । म्हणोनी त्यागीसी । शिवलोका जासी । एकलाची ॥३२॥

आम्हासाठीं तेथें । विनवी शंकरा । आणि गा दातारा । मायबापा ॥३३॥

देई आठवण । वेळोवेळीं शिवा । मायामोहगोवा । सोडवी हा ॥३४॥

पोटीं जन्मोनियां । कुळ शुद्ध केलें । सकळ उद्धरिलें । पूर्वजांसी ॥३५॥

अगा तूं शंकरा । येई दीनोद्धारा । चरणापासीं थारा । देई आम्हां ॥३६॥

ओंवी॥ चांगुणा सप्रेमें गाय गीत । योगी आनंदे डोलत । म्हणे कार्य उरलें किंचित । कृपावंत व्हावया ॥३७॥

स्तब्ध योगी न करी भाषण । तव चांगुणा मांसातें सांवरोन । लवडसवडी पचवून । पात्र वाढून आणिलें ॥३८॥

योगी बैसे भोजनासी । संकल्पिता बोले रायासी । आम्हा यजमान तूचि होसी । ये पंक्तीसी झडकरी ॥३९॥

भोजना योगी पाचारीत । राव मनी जाला चकित । वाटे ओढवला अनर्थ । परम घात होऊं पाहे ॥४०॥

मग विनवी योगिया । की जे स्वामी आतां दया । आपुले भोजन जालिया । प्रसाद ठाया ठेविजे ॥४१॥

स्वस्थे मनें सारिजे भोजन । उरलें शेष घेऊं मागून । योगी वर्म लक्षोन । काय वचन बोलत ॥४२॥

आपण भोजनीं न बैसता । सत्य हरोनी होईन जाता । योगियाची देखोन तीव्रता । रायासि कांता विनवीत ॥४३॥

नवमास वाहिला ज्यां उदरीं । तो जड जाला काय तुम्हा क्षणभरी । मान रक्षणा ये अवसरी । बैसा सत्वरी सत्वकार्जी ॥४४॥

भोजन करोनि योगी जातां । आपणहि जाऊं बाळपंथा । कासया विकल्प वाढावतां । त्या शिवा समर्था आठवा ॥४५॥

असो योगियाच्या संतोष मना । राव ताटी बैसला भोजना । मागुतीं वदे योगिराणा । तूं ही चांगुणा ये वेगी ॥४६॥

अवश्य म्हणोनी ते अवसरीं । चांगुणा बैसली झडकरी । म्हणे स्वामी दया करी । अंगीकारी भोजना ॥४७॥

तंव एकाएकीं तये वेळां । योगी उठोनी उभा राहिला । म्हणे न सेवीं मी अन्नाला । दोष घडला तुम्हांतें ॥४८॥

बाळहत्यारे निपुत्रिक जाण । म्हणोनी न सेवावें तुमचें अन्न । आतां जातों मी परतोन । सत्त्व हिरोन येधवां ॥४९॥

तव येरें जोडोनि पाणी । करिते जाले विनवणी । आपण आज्ञा केली म्हणोनी । केली हानी बाळाची ॥५०॥

आपणची आम्हां आज्ञापितां । वर्तल्या दोष आरोपितां । अहो योगिया समर्था । काय आतां म्हणावें ॥५१॥

योगी वदे उभयतांसी । चिल्लाळा पाचारा वेगेसीं । तरी बैसेन भोजनासी । लाग वेगेसीं झडकरी ॥५२॥

येरु देती प्रतिवचन । एकुलता होता चिलयानंदन । दुसरा आणावा कोठून । सांग निपुण तूं होसी ॥५३॥

पिसा बोले तयांतें । तुम्ही भजतां शिवातें । काय उणें आणि ब्रीदातें । तया अतौतें प्रार्थावें ॥५४॥

तंव उभयतां अट्टाहास करिती । शिवस्तवना आरंभिती । सद्गद नेत्रीं अश्रु वाहती । झरे चालती नीराचे ॥५५॥

जयजयाजी शंकरा । जयजयाजी गंगाधरा । जय वृषभ वाहन पन्नगहारा । कृपा करा ये वेळीं ॥५६॥

जयजयाजी मोक्षदानी जयजय शिवशूळपाणी । आमुचिया करुणावचनीं । ये धावोनी विश्वेशा ॥५७॥

जयजयाजी कर्पूरगौरा । जयजयाजी दिगंबरा । जयजयाजी उमावरा । दीनोद्धारा पाव आतां ॥५८॥

जयजय पाशुपतधारणा । जय डमरुधर शंखवादना । जय भस्मोद्धूलितभूषणा । करुणाघना कपर्दिना ॥५९॥

जय स्मशानवासी कैलासनाथा । सर्वाधिशा हिमनगजामाता । चंद्रचूडा कृपावंता । पाव आता अतित्वरें ॥६०॥

जय विरुपाक्षपंचवदना । कामांतका त्रिपुरदहना । भक्तपते पतितपावना । संकटनाशना पाव त्वरें ॥६१॥

आम्ही अनाथ अपराधी । तुझे म्हणवितों कृपानिधी । पडिलों संकटाचे संधीं । कंठीं व्याधीं पीडिलों ॥६२॥

हे शिवसनातना । धाव न सोसे यातना । होऊं पाहे घातना । उभयतांना ये काळीं ॥६३॥

नेत्रीं वाहती प्रेमांबुधारा । अंगें कांपती थरथरा । हें जाणोनि सर्वेश्वरा । दया अंतरां उपजली ॥६४॥

तत्काळ प्रगटला तो शंकर । नंदीवहनी कर्पूरगौर । जटाजूट गंगाधर । पन्नगहार नीळकंठीं ॥६५॥

अर्धांगीं शोभली गौरी । पुढें चिलया नंदीवरी । शंख त्राहाटितां ते अवसरीं । पाहती वरी उभयतां ॥६६॥

श्रीयाळ चांगुणा धावोनी । सप्रेमें लागतां दृढ चरणीं । दंडप्राय पडतां मेदिनीं । शूळपाणी उठवीत ॥६७॥

शंकरें दिधलें आलिंगन । करी उभयतांचे समाधान । म्हणे झालों मी प्रसन्न । इच्छित पूर्ण मागा मज ॥६८॥

विनविती जोडुनी दोन्ही कर । अतीत असे क्षुधित फार । त्याचें तोषवावें अंतर । अट्टाहास्य थोर यासाठीं ॥६९॥

तंव तो बोले उमापती । अतीतरुपें मींच निश्चितीं । पहावया तुमची सत्त्ववृत्ती । नाना विपत्ती दीधल्या ॥७०॥

तुमची भक्ति अनिवार । भावनिष्ठा बळ थोर । परम धार्मिक उदार । न ढळे अंतर छळितांहि ॥७१॥

म्हणोनि स्तवनीं प्रगटलों । तुम्हांलागीं प्रसन्न झालों । प्रेमभावातें भुललों । कैलास आलों टाकोनी ॥७२॥

जी इच्छा वागेल मानसीं । तेंचि मागावें मजपाशीं । न्यून पडे निश्चयेसी । अनन्यांसी पुरवितां ॥७३॥

ऐकोनि विनविती उभयतां । तुझिया कृपें नसे निवंता । चरणीं ठाव आतां । उमाकांता अम्हां दीजे ॥७४॥

असो जैसे भक्त मागती । तैसेंचि मनोरथ गा पुरविती । अनन्यभावें प्रीती । जया चित्तीं तो धन्य ॥७५॥

हें श्रियाळ-चांगुणेचें आख्यान । एक्या गुणार्थ काढिलें शोधून । मागील कथेचें अनुसंधान श्रोते सूज्ञ जाणती ॥७६॥

या पांचव्या गुणाची गती । नोव्हेच कोण्हा बाळेसि प्राप्ति । परी ऐशा पतिव्रता युवती । धुंडिता निघति क्वचितची ॥७७॥

भुवनत्रयीं धुंडितां । सहस्त्रांत एक पतिव्रता । तयांमाजी शोधितां । लक्षणयुक्ता अल्पचि ॥७८॥

आतां सहावें लक्षण । तेंही करितों निरुपण । आदरें परिसावें आपण । क्षमागुण कैसा तो ॥७९॥

अहो या धरणी ऐसे । क्षमागुण कोठें नसे । कृषि नांगरी वखरी विशेषें । विदारितसे अन्य रीती ॥८०॥

कोण्ही पेवें बळदे खांदिती । विहीर बारवा उकरिती । कूप खणोनी खोरिती । ताळ तळाटी खासोर ॥८१॥

पाये खोदोनी इमारतां । होय साळी जाळोनि रोपितां । कोण्ही उकरोनी चिखल करितां । दुःख वार्ता न बोले ॥८२॥

कोण्ही नाना पात्रें मुशी करुन । अग्निमाजी जाळिती पूर्ण । शौचविधी लघवी जाण । करितां दूषण न मानी ॥८३॥

नाना मळमूत्र टाकिती वरी । मेलिया शवा अधि पुरी । कितेक जाळिती अंगावरी । तरी अंतरीं क्षोभेना ॥८४॥

कोण्ही निर्मिती उत्तम स्थळ । कोण्ही आचरती पापाचळ । कोण्ही सुशीळ वसती अमंगळ । समान निर्मळ दोपक्षीं ॥८५॥

सुखदुःखाचा हर्षखेद । मनीं नाणी न करी द्वंद्व । धरितीचें हें क्षमापद असे अतिशुद्ध आगळें ॥८६॥

हे षड्गुणऐश्वर्यता । बाणली ती लक्षणयुक्ता । सकळ पतिव्रतेची माता । भासे पाहतां अनसूया ॥८७॥

सकळ गुणें संपन्न । पतिव्रता ती पतीअधीन । पतीवांचोनी आन । दिसे वमन तिजलागीं ॥८८॥

ऐसी माता ते अनसूया । सदा सेवीतसे पतिपायां । सांडोनिया लोभ इतर माया । पर्वतठायां वसतसे ॥८९॥

ऐसी बहु काळ करी सेवा । परि दुःख न मानी कांहीं जीवा । सदा आनंदयुक्त काम बरवा । वाढवीत नवा नित्य प्रेमा ॥९०॥

तेवीच तो अत्रिमुनी । सदा सावध तपाचरणीं । क्रोध अणुमात्र नुपजे मनीं । स्वानंदभुवनीं क्रीडत ॥९१॥

त्रिकाळ स्नान संध्या जप होम । वेदचर्चा नित्यनेम । अतीतअभ्यागतादि क्रम । काळ उत्तम सारिती ॥९२॥

शांत दांत आणि वेदांत । भक्तिज्ञानवैराग्ययुक्त । सत्स्वरुपीं सदा रमत । साधोनि एकांत राहिले ॥९३॥

जेवी गौतमऋषि परम पावन । कांता अहिल्या लावण्यरत्न । पतिसेवे दक्ष पूर्ण । उभय आनंदघन सर्वदा ॥९४॥

प्रपंचीं परमार्था साधिती । दुकळीं साळी स्वयें पेरिती । मध्यान्हीं कणसिद्ध करिती । मग पचविती स्वकरें ते ॥९५॥

जीवमात्रासी अन्न द्यावें । मिष्ट भाषणें तोषवावें । परम प्रीतीं सेवन करावें । शीण वारावे अतितांचे ॥९६॥

अत्यंत सेवेची आवडी । अतीत-अभ्यगतीं विशेष गोडी । नित्य उत्पन्न करोनी तांतडी । भोजनें सुरवाडी प्रीति दे ॥९७॥

अहल्यापति आज्ञेसि वंदून । दहा सहस्त्र वर्षे करी सेवन । कष्ट न मानोनि आनंदे पूर्ण । लक्षी चरण पतीचे ॥९८॥

उभयतां युक्त आनंदवृत्ती । सुखसंतोषें वनीं वसती । तपबळें जीवां जीवविती । उबग न मानिती मनांत ॥९९॥

तेवीच अत्रि आणि अनसूया । आनंदे आचरती तपःक्रिया । भोजनें देति आलियां । सत्कारिती तयां प्रेमादरें ॥३००॥

धन्य धन्य हे पुण्यपरायण । कीर्तीनें भरलें त्रिभुवन । यांचे करितां नामस्मरण । पापें जळोन सर्व जाती ॥१॥

धन्य साधु हे सत्पुरुष । दिगंतरी कीर्ति विशेष । हें गाय तो पावे यश । टळे अपेश निर्धारें ॥२॥

अद्‌भुत संतांचें महिमान । श्रवणमात्रें करी पावन । ऐसियांचे सेविती चरण । होय कल्याण तयांचें ॥३॥

या संतांची पूर्ण होतां दया । दोष जाती सर्व लया । गुंतों न देती अपाया । करोनी छाया रक्षिती ॥४॥

संतचरणीं सुख अपार । त्याचा न कळे कोण्हा पार । संतकृपें सर्वेश्वर । भेटी सत्वर पैं दे तो ॥५॥

संतचरणीं जरि मन जडे । मोक्षसायुज्यता सहज जोड । यम न पाहे त्याचेकडे । वैकुंठ जोडे सत्य पैं ॥६॥

या संतचरणाची नवलाई । वर्णू किती म्हणोनी काई । सकळ तीर्थे पर्वकाळ पाही । मुक्त पाईं । होताती ॥७॥

म्हणोनिया अनंतसुत । लडिवाळें संतांसि विनवीत । चरणसेवा अखंडित । तुम्हां मागत द्या प्रेमें ॥८॥

अनन्यभावें जालों दास । माझी पुरविणें तुम्हीं आस । कृपायोगें ग्रंथरस । अतिसुरस चालवा ॥९॥

पुढील कथा अलोकिक । अत्रिनारदभेटी सम्यक । विचित्र कथा सुखदायक । श्रवणीं सुख श्रोतियां ॥१०॥

अनंतसुत विनवी श्रोतयां सज्जनां । नारदलीलेची अद्भुत रचना । सद्गुरु करविता निरुपणा । सावध श्रवणा होइजे ॥११॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । नारदपुराणातें संमत । भाविक परिसोत संतमंहत । द्वितीयाध्याय गोड हा ॥३१२॥

॥ इति द्वितीयोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय तिसरा

॥श्रीजगद्‌गुरुदत्तात्रेयाय नमः ॥ ॐ नमो श्रीदत्ता ।

अखिल अभंगा कृपावंता । तुझे चरणीं ठेविला माथा । वदवी कथा तुझा तूंची ॥१॥

मी मतिमंद अज्ञान । अणुमात्र नाहीं मजसी ज्ञान । तूं विज्ञानरुप सघन । वदवी गुण आपुले ॥२॥

उदंड कवि ग्रंथ बोलिले । आधारसंमतें चालिले । आणि श्रीप्रसादातें पावले । मान्य जाले तव कृपें ॥३॥

मज दीनाचा आधार । तूंचि होसी दिगंबर । सांगसी तैसा विस्तार । पत्रीं सादर लिहीतसें ॥४॥

मी कर्ता नोव्हें ग्रंथासी । आळ मात्र धरिली मानसीं । कळवळोनी पुरविसी । आपंगिसि लडिवाळा ॥५॥

अवधूता तूं माझी माउली । दीनवत्साची गाउली । करी कृपेची साउली । पान्हा घाली कृपेचा ॥६॥

तुझा बोधकथामृतरस । तो मज पाजी गा विशेष । आणि श्रोतयां सज्जनांस । सुख संतोष होय जेणें ॥७॥

श्रोते भाविक संतज्ञानी । योगी अनुभवी चतुर गुणी । या कथालाभातें इच्छुनी । करोनी दाटणी बैसले ॥८॥

कथारसाची नव्हाळी । सेवूं इच्छिती हे आगळी । श्रवण नेत्राची न्यहाळी । ग्रंथकमळीं भ्रमरत्वें ॥९॥

अहो या सकळांचे मनोरथ । पूर्णकर्ता तूंची दत्त । म्हणोनिया प्रणिपात । करी विनीत तव पदां ॥१०॥

श्रोतीं ऐकिलें सावधान। मागील कथेचें निरुपण । अत्रीअनसूयावर्णन । अतिपावन षड्गुणी ते ॥११॥

पुढे वदविता सद्गुरु अनंत । श्रोतीं आदरें द्यावें चित्त । सिंहाद्रीतळीं विराजित । आश्रम शोभत अत्रीचा ॥१२॥

वृक्षछाया अतिसघन । लता विराजती दैदीप्यमान । फळें पुष्पें दाटलीं पूर्ण । जलस्थान पर्वतीं ॥१३॥

तें शोभायमान निर्मळ । तपाचरणीं दिव्य स्थळ । योजुनी उभयतां सुशीळ । पुण्यकाळ साधिती ॥१४॥

तंव तो महाराज नारद मुनी । अकस्मात पावला तये स्थानी । नेत्रीं अत्री विलोकुनी । संतोष मनीं वाटला ॥१५॥

उभय आलिंगिनीं पडली मिठी । तो आनंद न समायेचि पोटीं । दृष्टांत पहातां निकटीं । विष्णु धूर्जटी तेवि हे ॥१६॥

नारदाचें अर्चन केलें । पहातां वैष्णवाचें मन निवालें । आचरण अनसूयेचें देखिलें । धन्य बोले हे माता ॥१७॥

पतिसेवनीं अतितत्पर । सेवेसि पडों नेदी अंतर । सुख देवोनि तोषवी अंतर । मानी भ्रतार देव जैसा ॥१८॥

सेवा पाहोनि नारदऋषि । संतोषयुक्त जाला मानसीं । मग पुसोनि उभयतांसी । परम वेगेसीं निघाला ॥१९॥

मुखें कीर्तन नामस्मरण । त्रिलोकीं करीतसे गमन । तंव अकस्मात ब्रह्मभुवन । चालिला देखोन सन्निध पैं ॥२०॥

तवं सावित्री आणि ब्रह्मदेव । दैवतें देखिलीं अपूर्व । अनन्य प्रीति धरोनि भाव । जन्मठाव म्हणोनि नमी ॥२१॥

आशीर्वाद देती उभयतां । क्षेम आवडी देती सुता । आदरें पुसे विधाता । सांगे वार्ता अनुपम ॥२२॥

त्रिलोकीं तुझें असें गमन । तुज घडतें सर्व अवलोकन । सांगे नवलकथा निवडोन । जेणें श्रवण तृप्त हो ती ॥२३॥

नारद विनवी पिताजी । तुमचें आधिपत्य सर्व काजीं । नवल पुसतसां मज आजी । काय न कळे जी तुम्हांतें ॥२४॥

तूं तवं सर्व सुज्ञ होसी । सकळ वृत्त श्रुत तुजसी । निमित्तमात्रें पुससी मजसी । तरी पायांसि निवेदितों ॥२५॥

मी फिरलों सप्तपाताळ । आणि पाहिलें स्वर्गमंडळ । परी या मृत्युलोकिंचा खेळ । अद्भुत विशाळ रचिला त्वां ॥२६॥

नाना धर्मातें स्थापिलें । नाना वर्ण याती निवडिले । साधनालागीं निवेदिले । क्रम दाविले वेगळेची ॥२७॥

लाविली स्वधर्माची रहाटी । बहु मर्यादेची हातवटी । तप अनुष्ठानाच्या कोटी । विवेक गोष्टी ज्ञान चर्चा ॥२८॥

कर्मधर्म श्रेष्ठाचार । वेदाज्ञा सर्वांसी थोर । धर्मांतरींचे धर्मविचार । सारासार योजिले ॥२९॥

तरावयासी नरनारी । युक्ति दाविल्यासि संसारीं । आचरतां पावती स्वर्गपुरी । इहीं परत्रीं होय कीर्ति ॥३०॥

विधाता म्हणे त्या कोण । तुज आल्याति आढळोन । त्याचि सांगे बा निवडोन । माझें मन वेधलें ॥३१॥

नारद म्हणे स्वामिया । सहज प्रपंचीं नेमिली क्रिया । तेचि निवेदितों पायां । जवळी माया ऐकती ॥३२॥

सेवकासी स्वामी देव । अनन्योक्ति धरोनि भाव । निष्कपटें सेवा अपूर्व । सदा गौरव स्वामीचा ॥३३॥

स्वामीचरणीं सदा मन । त्याहोनि थोर नसेची आन । स्वामिकाजी वेचिती प्राण । तोचि धन्य मी जाणें ॥३४॥

निस्सीमत्वें सेवा ज्याची । मग तुम्हांवरी सत्ता त्याची । मूर्ती जे का विश्वेशाची । तोही लालची त्या भेटी ॥३५॥

तैसेंच गृहस्थाश्रमीं लोकां । देव तो अतिथि देखा । त्याचीच सेवा आवश्यका । करोनि सुखा पाविजे ॥३६॥

जेथें अतिथीचा सत्कार । तो मज भासे ईश्वर । त्याचे दर्शनेचि निर्धार । अधम नर उद्धरती ॥३७॥

जे या संसारीं जन्मदाता । ते पुत्रासि दैवत मातापिता । त्यांची आदरें सेवा करितां । धन्य पुत्रता तयाची ॥३८॥

सेवेपुरते साधन । नावडे कदा त्यालागुन । मातापितयांचें करी पूजन । आणि भजन अहर्निशीं ॥३९॥

मातापितयांच्या शरीरा । किंचित् दुःखाचा उबारा । देखतांचि प्राण घाबरा । औषधी बारा धुंडोनि दे ॥४०॥

उभयां वृद्धपण होतां प्राप्त । म्हणे हीं जगावीं दिवस बहुत । सेवा करितां न विटे मनांत । प्रीति अत्यंत त्या पुत्रा ॥४१॥

हा सर्व धर्मांत धर्म उत्तम । यासीच मानावें पुरुषोत्तम । हाही देखिला भूमिक्रम । अति सुगम साधकां ॥४२॥

चहुं वर्णाचे ठाईं । उत्तम सेवा नेमिली पाही । तेंचि परिसा लवलाही । लाविल्या सोई वेदमुखें ॥४३॥

मुख्य विश्वंभरी पावावया । तुम्हींच निर्मिल्या सर्व क्रिया । जाणोनि तया अभिप्राया । जन वर्ताया लागले ॥४४॥

तेंचि आतां निरुपण । गोद्विज आणि हुताशन । यां मुखीं करिती अन्नदान । अनेक सेवन नानापरी ॥४५॥

तो सांगतां विस्तार । ग्रंथ वाढेल अपार । म्हणोनिया संकेतसार । ध्वनिपर बोलिलों ॥४६॥

कोण्ही करिती जपध्यान । कोण्ही करिती अनुष्ठान । कोण्ही आहारविहार करुन । आसन मुद्रा चाळिती ॥४७॥

कोण्ही पंचाग्नि धूमपान । कोण्ही शीत उष्ण पर्जन्य । कोण्ही फळमूळ पत्रांतें सेउन । मौनी टांगून राहिले ॥४८॥

कोण्ही दुग्धआहार सेविती । कोण्ही गलितपर्णें भक्षिती । वायुआहारें क्षुधासारिती । नाना गती योगाच्या ॥४९॥

कोण्ही हठातें प्रवर्तले । यमनियम करिते झाले । कोण्ही समाधि लावोनि बैसले । भगवे देखिले बहुतची ॥५०॥

नाना परीचीं विविध दानें । देतां पाहिलें सन्मानें । परि हें मनःसंकल्पाचे संधानें । घडे येणें कारण हें ॥५१॥

ऐसें बहुता परि देखिलें । सर्व मनःकामनेचें अंकिलें । निराश निर्विकारी नाहीं पाहिलें । नाहीं रुचलें मनातें ॥५२॥

नारद म्हणे ऐक ताता । सिंहाद्रि देखिला अवचिता । मग चढोनिया तया पर्वता । ऋषि समस्तां भेटलों ॥५३॥

तेथें ऋषिआश्रम पाहिले । कांहीं कमन विश्रामलें । चालता तीन श्रृंग देखिले । तरु वेष्टिलें सघन पैं ॥५४॥

तेथें वळंघोनि जातां । आश्रम देखिला अवचिता । भेटी झाली तुझिया सुता । झाला देखतां आनंद ॥५५॥

धन्यधन्य तो तपोधन । अत्रिनामें तुझा नंदन । निर्लोभ निर्विकार मन । स्वरुपीं निमग्न सर्वदा ॥५६॥

तेवीच त्याची कांता । अनसूया नामें पतिव्रता । ती तुमची स्नुषा समर्था । तिची साम्यता नये कोण्हा ॥५७॥

तिहीं लोकीं माझी गती । सर्वही पाहिल्या युवती । कोण्ही एक सरी न पावती । म्लान दिसती मजलागीं ॥५८॥

पतिसेवा तप निर्मळ । चित्त जिचे गंगाजळ । आतिथ्य आदरी कोमळ । धन्य सुशीळ अनूसया ॥५९॥

ऐकोनिया नारदवचन । विरंची झाला आनंदघन । तव सावित्री बोले वचन । तें सावधान परिसावें ॥६०॥

सावित्री पेटोनिया क्रोधा । म्हणे काय वर्णितो नारदा । एक वाढवोनिया प्रमदा । करिसी निंदा सकळांची ॥६१॥

कैसेनि अनूसया म्हणसी थोर । येर आम्ही काय झालोंति पामर । तिचे सामर्थ्याचा विचार । कळला साचार काय तुज ॥६२॥

तिच्या उपमेच्या योजनीं । नसती काय कोण्ही कामिनी । नारद बोले तये क्षणीं । माये मनीं न कोपावें ॥६३॥

माते जेथें शांती नाहीं । ते पतिव्रता नोव्हेचि कांहीं । उमा लक्ष्मी तूंही । दासी तीतें साजाल ॥६४॥

ऐकोनि नारदाचे उत्तरा । क्रोधें कांपतसे थरथरां । दांत खावोनि करकरां । शाप उच्चारा करुं पाहे ॥६५॥

नारद बोले तये वेळां । असत्य करिसी माझिया बोला । तईंच बाधेल शाप मजला । निष्फल बोला न बोलिजे ॥६६॥

मनीं म्हणे बरवें झालें । काळक्रमणेसी फावलें । आतां कैलासीं भलें । त्वरें गेलें पाहिजे ॥६७॥

करोनि मातापितयां नमन । नारद निघाला तेथून । त्वरें पावला कैलासभुवन । उमारमण देखिला ॥६८॥

आनंदमेळा शिवगौरी । उभयही खेळती सारी । नारदा पाहातांचि सत्वरी । शिव सत्कारी आदरें ॥६९॥

शिव बोले नारदासी । कोठोनि येणें झालें तुम्हांसी । विशेषाधिक आम्हांसी । करा कीर्तनासि निवेदा ॥७०॥

हिमनगजा देखोनि नयनीं । मनीं उल्हासला नारदमुनी । मागील कथा कथूं कथनीं । जे विरंचीलागोनि सांगितली ॥७१॥

नारद म्हणे जी शिवा । कैलासपते शंभवा । भवनाशका भवानीधवा । तूं विसावा सकळांचा ॥७२॥

हे पिनकपाणी अंबुधरा । पयःफेनधवला उदारा । तुज ठावें सर्व दातारा । सृष्टिव्यवहारा कर्ता तूं ॥७३॥

नारदा बोलसी तूं खरें । मीही जाणतों तें बरें । परि आपुल्याला विचारें । सकळ व्यवहारें वर्तती ॥७४॥

प्रदीप्त होतां जथराग्न । करेंचि घालावें अवदान । दांतें पिष्टवत् करोन । जिव्हें लोटून देइजे ॥७५॥

पाहतां अग्नीची सर्व शक्ति । तेवी मी चालक सर्वां भूतीं । परि ज्याचें कार्य त्या हातीं । नेमिल्या रीती घेइजे ॥७६॥

नारदा तूं मुनीश्वर । कीर्तनीं तुझाची अधिकार । तरी भुकेलेति श्रवणद्वार । आणि अंतर कथार्थी ॥७७॥

नारद म्हणे जी सर्वेश्वरा । पंचवदना गंगाधरा । दशभुजा पन्नगहारा । उमावरा परिसावे ॥७८॥

म्यां भुवनत्रय पाहिलें । धर्माधर्म विलोकिले । बहु पुण्य श्लोक देखिले । भूलोकीं भले नांदती ॥७९॥

योगी यागी जटिळ जोगी । संयोगी वियोगी बैरागी । भोगी त्यागी वितरागी । निःसंगी रंगी अनंत ॥८०॥

यमी दमी नेमी क्षमी । प्रेमी नामी स्वामी भ्रमी । कामी कर्मी आश्रमीं । कर्मी धर्मी आगळे ॥८१॥

सुशील सुंदर सारज्ञ । सुमति सुदाते प्राज्ञ । शूर सुखी सुरज्ञ । सुलक्षण राज्ञ विवेकी ॥८२॥

जितेंद्रिय आणि ज्ञानी । अर्थज्ञ जे वेदपुराणीं । शास्त्र श्रुती वाखाणी । वैद्य गुणी ज्योतिषि ॥८३॥

सेव्य सेवक सेवाधारी । हेही देखिले नानापरी । गृहस्थाश्रमी नरनारी । असता संसारी दक्ष जे ॥८४॥

परि आशालोभ विरहित । प्रपंचीं असोनी मायातीत । निर्विकार आणि शांत । ऐसा विरक्त अत्रिमुनी ॥८५॥

सिंहाद्रि पर्वतीं । वास करितसे निश्चिती । पत्नी अनसूया सति । तप आचरती उभयतां ॥८६॥

शांति वैराग्य औदार्य सदय । सदा सत्स्वरुपीं ज्याचें लय । अति सतेज उभय काय । धन्य होय ते जगीं ॥८७॥

अनसूया ती लावण्याखाणी । सदा तिष्ठे पतिसेवनीं । आन पदार्थ न रुचे मनीं । लक्ष चरणीं पतीच्या ॥८८॥

पतिवांचोनि नेणे देवता । वर्ते अनुसंघानें पतिव्रता । कंटाळा नाणी सेवाकरितां । अतिसौख्यता मानी जीवा ॥८९॥

खालीं पडों नेदीच वचन । अत्रीस राखी सदा सुप्रसन्न । करुं नेणेंचि भिन्नाभिन्न । जीवप्राण पतीपाई ॥९०॥

शिवा त्रिलोकीं माझी गती । बहुत धुंडिल्या युवती । क्वचित् पतिव्रताही असती । परी न पवति अनसूयेतें ॥९१॥

कोण्ही सेविती द्रव्यासाठीं । कोण्ही संतान इच्छिती पोटीं । कोण्ही लौकिकाचार रहाटीं । कोण्ही बाह्य दृष्टी पतिपुढें ॥९२॥

कोण्ही स्वरुपा भुलोन । कोण्ही चातुर्यकळा पाहोन । कोण्ही वृद्धाचार विलोकोन । सेवा सन्मान जाणविती ॥९३॥

कोण्ही धाकेंच राबती । कोण्ही आशालोभें वागती । कोण्ही परदेखणी आचरती । नाहीं प्रीती अंतरीं ॥९४॥

पतिधन माने अतिथोर । जिकडे तिकडे जयजयकार । तयापुढें जोडोनि कर । भाषण मधुर बोले लवे ॥९५॥

जो पति मूढहीन । जयापाशी नाहीं कांचन । नेणेची जो मानापमान । तयां धुडकोन टाकिती ॥९६॥

पति योगी वीतरागी । नावडे पति जाला जोगी । हीन क्षीण कुरुप अंगी । भंगी चंगी नावडे ॥९७॥

पति दरिद्री मलिन । पति न घडि जो भूषण । पति न करी मनोरथ पूर्ण । तेथें मन न घे तिचे ॥९८॥

असो ऐशा कामिनी पुष्कळ । देखतां मन झालें विकळ । परि अनसूया अतिनिर्मळ । साध्वी सुशीळ सर्वांहुनी ॥९९॥

देवा पाहिले स्वर्गलोक । पाताळ आणि भूलोक । धुंडिले सर्व लोकालोक । परी अनसूया एक निवडली ॥१००॥

सकळ युवतींमाजी उत्तम नारी । अति श्रेष्ठत्वें ज्या सुंदरी । त्या या अनसूयामंदिरी । दासीपरी साजती ॥१॥

ऐकोनी नारदाचें कीर्तन । शिव करी हास्य वदन । परी अपर्णा क्रोधायमान । होवोनि वचन बोलतसे ॥२॥

साधु आपणा म्हणविशी । आणि निंद्य भाषणें बोलसी । तुच्छ करुनी सकळांसी । बहु वानिसी अनसूयेतें ॥३॥

तीच काय जाली पतिव्रता । कोणें देखिली तिची योग्यता । वाढवोनि सांगसी मज पुढें कथा ।केवीं समता पावे आम्हां ॥४॥

नारद म्हणे आतांचि कळलें । खरें खोटें निवडोनि पडिलें । माते अज्ञानतमें वेष्टिलें । मज आढळलें भाषणीं ॥५॥

अंबा म्हणे बहु बोलसी । शापशस्त्रें ताडीन तुजसी । मुनी म्हणे असत्य करिसी । मम बोलासी तैं शाप ॥६॥

ऐसी परीक्षा करुन । नारद पावला अंतर्धान । मुखें करीत नामस्मरण । आनंदघन मानसीं ॥७॥

म्हणे ही काळक्रमणा आम्हांसी । बरवीच जाली निश्चयेसी । चमत्कार पडेल दृष्टीसी । हात शेंडीसी फिरवीत ॥८॥

आनंद न समायेची पोटीं । चालता पावला वैकुंठीं । रमारमण देखिला दृष्टीं । भद्रपीठीं साजिरा ॥९॥

श्याम चतुर्भुजमूर्ति । विशाळ नेत्र कमळाकृति । भ्रुकुटी सुनीळा विराजती । वक्रगती साजिऱ्या ॥१०॥

भाळीं मृगभद रेखिला । कबरीमार आकर्षिला । मस्तकीं मुगुट तेजागळा । दीप्ति कुंडलां अनुपम ॥११॥

कोटी सूर्यांचे उमाळे । त्याहोनि त्यांचें तेज आगळें । कर्णद्वयीं झल्लाळे । वरी कुंतलें नीलालक ॥१२॥

कटीं शोभती मुक्ताहार । पदक मणिमय सुंदर । एकावेळी अतिनागर । जडित प्रकार वैडूर्य ॥१३॥

कौस्तुभ आणि वैजयंती । आपादलंबिनी शोभती । हृदयावरी विराजती । वत्सलांछन भृगुलत्ता ॥१४॥

बाहु स्थानीं भूषणें । भुजबंद पेटया विलक्षणें । बिरुदें शोभती करकंकणें । मुद्रिका लेणें करांग्रीं ॥१५॥

करीं शंखचक्र आणि गदा । धरी अरिमर्दनाच्या भेदा । पद्मकमळ त्या मुकुंदा । दासपदा रक्षावया ॥१६॥

हृदय विशाळ घवघवीत । उदरतळीं नाभी शोभत । जया कमळीं जन्मत । विरंचीसुत हरीचा ॥१७॥

अतिशयेसी माजसान । तेथें वेष्टिलें पीतवसन । तें तडित्प्राय झळके पूर्ण । झांकती नयन पाहतां ॥१८॥

क्षुद्रघंटा कटिबंद । मंजुळ निघे तेथील शब्द । तो वर्णावया जपे वेद । न कळे भेद तयाचा ॥१९॥

जानुजंघा अति सरळ । घोटवे दिसती वर्तळ । सकुमार दोन्ही चरणकमल । वरी कल्लोळ ब्रीदाचा ॥२०॥

नुपुर आणि तोडर । सुघोष अंदुवाचा गजर । श्रुतिशब्दें झणत्कार । अति गंभीर होतसे ॥२१॥

चरणतळें दिसती आरक्त । ध्वज व्रजांकुशरेषा तळपत । झळके पद्मचिन्हांकित । पद्मा सेवित त्यां ठाया ॥२२॥

दशांगुलिया विराजमान । चंद्रांशें तें नखस्थान । पंच आरक्त स्थळें भिन्न । सुहास्य वदन देखिला ॥२३॥

नारदें केला नमस्कार । हें देखोनिया सर्वेश्वर । करी वैष्णवाचा सत्कार । माझे प्रियकर म्हणोनी ॥२४॥

सप्रेमें बोले नारायण । धन्य धन्य आजिचा सुदिन । नारदा तुझें जालें दर्शन । भाग शीण वारला ॥२५॥

तुम्ही माझे परम आप्त । जाणतां जीवीचें गुह्य गुप्त । तुमचे भक्तिभावें मी तृप्त । तुमचेनि प्राप्त सुख मज ॥२६॥

नारदा तुम्ही माझे प्राण । कायारुपें मी प्रावरण । येऱ्हवीं पहा मी निर्गुण । तुम्हीं सगुण केलें मज ॥२७॥

नारदा मी तंव अरुपी । तुम्हीं आणिलें मज स्वरुपीं । स्वरुपीं परि सदा झोंपीं । जागृत अर्पीं मज केलें ॥२८॥

तुम्हीं जैं मज देतां आठवण । तैंच करी मी कार्याकारण । सर्वांपरि तुम्हां आधीन । वचन मान्य तुमचें ॥२९॥

तुम्हाविण माझेंपण । काय कळे कवणा लागुन । मम ज्ञानाचेंही तुम्ही ज्ञान । करा पालन माझें तुम्ही ॥३०॥

नारद म्हणे जी देवाधिदेवा । या दासपदातें किती वाढवा । आम्हीं तों स्मरावें तुझिया नांवा । आमुचा ठेवा पाय तुझे ॥३१॥

तूं सच्चिदानंद विलासी । पूर्ण ब्रह्म गा अविनाशी । अवीट तूं निरंजनवासी हिरण्यगर्भासी परौता ॥३२॥

तूं आकारविकाररहित । आगम अगोचर मायातीत । सकळ भेदाभेदरहित । तूं अप्रांत अनिर्वाच्य ॥३३॥

अबाधित तुझा महिमा । ठाव न लगे आगमनिगमा । तो तूं साकार पुरुषोत्तमा । झालासि आम्हांकारणें ॥३४॥

माय बाळासि म्हणे माय । पिता बाळा बाबा म्हणत जाय । तरी ते पदवी शोभे काय । आवडी होय वडिलांची ॥३५॥

तैसें तुम्ही आम्हां भूषवितां । परि ते आम्हां नसे योग्यता । सत्ताधारी तूं अनंता । पायीं माथा ठेवूं दे ॥३६॥

यापरि नारद नारायण । येरयेरातें गौरवून । देते झाले प्रेमालिंगन । समाधान समरसीं ॥३७॥

आलिंगन सारोनि अनंतें । क्षेम दिधलें नारदातें । म्हणे बा रे येणें तूतें । कोठोनि निरुतें सांग मज ॥३८॥

कांहीं अधिकोत्तर वार्ता । पाहिली ऐकिली श्रवणपंथा । तेचि निवडोनी सांगे मज आतां । ब्रह्मसुता ये वेळे ॥३९॥

तंव ह्मां जी म्हणोनि पाणी । जोडोनि बोले मधुरवचनीं । लक्ष्मी देखोनि सन्निधानी । आनंद मनीं उदेला ॥४०॥

नारद म्हणे दीनदयाळा । मज तो हिंडावयाचा चाळा । देखिलें पाहिलें डोळां । तेंचि घननीळा सांगतों ॥४१॥

स्वर्ग मृत्यू पाताळ । स्वेच्छें फिरतों तिन्ही ताळ । परि धन्य हे भूमंडळ । जें कां सफल सर्व काजीं ॥४२॥

पाहतां भूलोकींची रचना । कोण्ही लोक न ये मना । तप अनुष्ठान योग नाना । करितां कामना पुरती ॥४३॥

नाना परिच्या अवतारमूर्ती । तेथें तुझ्या असती जगत्पती । अनेक तुझिया विभूती । सांगूं किती निवडोनी ॥४४॥

तपी तापसी दिगंबर । सिद्ध साधू योगेश्वर । ज्ञानी व्युत्पन्न विवेकसागर । अति सुंदर वेदवक्ते ॥४५॥

प्रपंचीं परमार्थी सघन । बोलके चतुर विचक्षण । बोलोन्मत्त पिशाचमौन । धारणा धरुनी असती ॥४६॥

तीर्थ देव आणि क्षेत्र । पुरें पट्टणें विचित्र । नरनारी जन पवित्र । पठति स्तोत्र मंत्रजप ॥४७॥

नाना भक्ति नाना देवता । नाना पुराणें नाना कथा । नाना धर्म देखिले आचरतां । नाना पंथा स्थापक जे ॥४८॥

नाना सेवेचे प्रकार । नाना साधनांचा विचार । नाना साधक अतितत्पर । नाना घोर घातकी ॥४९॥

नारद विनवी जगदुद्धारा । ऐसा भूलोकींचा पसारा । पाहोनिया मज दातारा । सुख अंतरा होतसे ॥५०॥

परि आशा लोभ मोहो । काम क्रोधें केला दाहो । मद मत्सराचा संमोहो । येणें कावो पुरविला ॥५१॥

येणें वेष्टिले प्राणी । जन्ममरणाची घेतली आवंतणी । स्वकरेंचि पडिले बंदीखानीं । नैराश्य करणी नसे कोठें ॥५२॥

यापरी सर्व धांडोळिलें । नैराश्य कोण्ही नाहीं देखिलें । मन कोठें न स्थिरावलें । परी शांतावलो एके ठाईं ॥५३॥

सिंहाद्रि पर्वतीं जातां । ऋषिदर्शन जालों घेता । तंव ब्रह्मसुत अवचिता । तप आचरतां देखिला ॥५४॥

अत्रि तयाचें नामाभिधान । शांतशील विरक्तपूर्ण । नैराश्यवृत्ति करोनि धारण । स्वानंदीं निमग्न देखिला ॥५५॥

त्याची कांता अनसूया । परम साध्वी गुणालया । सेवीतसे पतिपायां । झिजवी काया सत्कर्मीं ॥५६॥

निस्सीम पतिसेवनीं भाव । पतिच मानी जैसा देव । विषयीं विरक्त न करी लाघव । परम अपूर्व सेवा तिची ॥५७॥

पतिवांचोनि पदार्थ आन । तेथें न घालींच कदा मन । जैसी भ्रमरी कमळासि जाय लुब्धोन । जातां प्राण न सोडी ॥५८॥

तैसि पतिसेवनीं आवडी । मिठी जैसी मक्षिका गोडी । स्वप्नींही नोव्हे कदा कुडी । वृत्ति गाढी जडलीसे ॥५९॥

प्राणाहोनि पति आगळा । पतिचरणीं सतीचा डोळा । धन्य माऊली पुण्यशीळा । अंतरी जिव्हाळा सदयत्वें ॥६०॥

जैसा स्वशरीरीं झिजे चंदन। परि सकळां करवी भूषण । करी तापाचें हरण । आनंदघन मानसा ॥६१॥

तेवी अहोरात्रंदिवा । काया कष्टें करी सेवा । दुःख नेदीच पतिजीवा । संतोष बरवा वाढवी ॥६२॥

तैसीच अतिथीचे सन्मानीं । सुख देतसे आश्रमस्थानीं । अनुकूळ पदार्थांतें अर्पोनी । मृदुवचनी संतोषवी ॥६३॥

सप्रेम सदय कोमळ । परदुःखीं मन विव्हळ । परोपकारी निर्मळ । नये मळ द्वैताचा ॥६४॥

नारद म्हणे विश्वव्यापका । कोण्ही स्त्रिया न ये तितुका । या अनसूयेच्या साम्यका । कोण्ही देखा न दिसे मज ॥६५॥

रुपवती कुलवती नारी । देवा आहेति नाना परी । परी या अनसूयेची सरी । रजभरी नयेची ॥६६॥

अनसूया सद्गुणसंपन्न । न्यून नसे एकही गुण । सर्वांपरी सुलक्षण । धन्य धन्य हे सती ॥६७॥

परम पावन हे पतिव्रता । दुजी नसे उपमा देतां । सकळ पतिव्रतेची हे माता । की कुळदेवता सकळांची ॥६८॥

जया गांठीं महत् पुण्य । तोचि तिचें पावे दरुषण । तिचें वर्णावया महिमान । नसे अंगवण कवणातें ॥६९॥

अनंत ब्रह्मांडीच्या नितिंबिनी । यांनीं सेवा करावी तिचे सदनी । परिपात्र न होती मजलागुनी । चक्रपाणी दिसतसे ॥७०॥

ऐसी नारद वर्णितसे ख्याती । धन्य धन्य म्हणे तो श्रीपती । तंव क्रोध नावरे लक्ष्मीप्रती । जाली जल्पति नारदा ॥७१॥

म्हणे एकीसिच तुवां वाखाणिलें । इतर स्त्रियांसी निर्भत्र्सिलें । काय गुण तुज कैसे कळले । किंवा चावळल चित्त तुझे ॥७२॥

नारदा हें तुझें संतपण । आजि मज कळोन आलें पूर्ण । हे कोठोनि शिकलासि गुण । पापलक्षण निंदक ॥७३॥

सकल मेल्या काय पतिव्रता । एक ठरली अनसूयाचि आतां । तुज कळों दे ब्रह्मसुता । कसनी कसितां केविं तगे ॥७४॥

पानामागोनि आली । तेचि केवीं तिखट जाली । त्वांच मुखीं वाखाणिली । कालची कोल्ही मजपुढें ॥७५॥

शोधितां हे ब्रह्मांडभर । कोण आम्हां तिघींहून थोर । नारदा तुज न कळेचि विचार । सर्व कारभार आमुचा ॥७६॥

नारद म्हणे वो माय । वृथा बोलसी तरी काय । अनसूयेचे वंदिसी पाय । कल्याण होय तें तुझें ॥७७॥

नारदाचे शब्द बाण । हृदयीं खडतरले दारुण । मग शापशस्त्र करीं घेऊन । करुं ताडन उठली ॥७८॥

लक्ष्मी पुन्हा वदे नारदासी । तूं मुखें जीतें वर्णिसी । तिजसमवेत मी तुजसी । अतिवेगेंसी श्रापीन ॥७९॥

नारद म्हणे तुमची खोडी । अविचारें करावी बोटमोडी । काकशापें पशुपडी । केवी रोकडी होईल ॥८०॥

तैच शाप बाधी आम्हांसी । बोलिले बोल वाया करिसी । नमोनि विष्णुचरणांसी । नारद वेगेंसि पै गेला ॥८१॥

नारद गेलिया पाठीं । वर्म बाणाचें दुःख पोटीं । आपुलाल्या ठायीं होतीं कष्टी । तिघी गोरटी बहुसाल ॥८२॥

तंव कोण्ही एके अवसरी । सावित्री आणि गौरी । दर्शना पातल्या वैकुंठपुरी । क्षेम परस्परीं पुसती ॥८३॥

येरयेरी देवोनि सन्मान । आनंदे करिती भाषण । लक्ष्मी सावित्रीलागुन । सहज वचन बोलत ॥८४॥

बाई नारद तुझा बाळक । साधु म्हणवी परिचाळक । कळिलावा असें देख । न राहे नावेक एक ठाई ॥८५॥

एके दिनी आला येथें । लाघवें मोहिलें मम स्वामीतें । त्यांनीं सहज विचारिलें त्यांते । अद्भुत वृत्तांत निवेदा ॥८६॥

मज सन्निध देखोनि नारदे । वंदोनियां दोघांचीं पदें । कुशलत्वाचीं भाषणें मैंदे । मधुर विविधें निरोपिलीं ॥८७॥

नाना लापनिका लावून । मोहिला तेव्हां जगज्जीवन । तेही ऐकती सावधान । गोड कथन म्हणोनी ॥८८॥

तैशा कथेमाजी कथा । अत्रि अनसूयेची झाला निरुपिता । धन्य धन्य ते पतिव्रता । वारंवार वर्णिता पैं होय ॥८९॥

म्हणे तिजऐसी सुंदरी । धुंडिता नसे ब्रह्मांडोदरी । ज्या पतिव्रता असती नारी । दासी तिचे घरीं साजति ॥९०॥

ऐसे ऐकोनि त्याचे वचन । मी परम झाले क्रोधायमान । शापशस्त्रें करितां ताडन । आणिक सरसावून बोलिला ॥९१॥

असत्य कराल माझिया बोला । तरीच तुमचा शाप बाधील मजला । ऐकोनी मम मनाला । चिंताग्नि झोंबला अनिवार ॥९२॥

तंव सावित्री विनवीत । काय वदूं पुत्राची मात । आमुचे गृहीं हाचि वृत्तांत । पतीसी सांगत मजदेखतां ॥९३॥

अनुसूयेचा बडिवार । तेथें वर्णिला बहु फार । हीनत्व वदला साचार । मज समोर मज लागी ॥९४॥

तंव सरसावली हिमनगबाळा । म्हणे तुझा पुत्र कळकुटा भला । चूड लावोनी परसदनाला । आपण वगळा राहतो ॥९५॥

आम्हीं उभय असतां एकांती । आपण प्रगटतो अवचितीं । गोष्टी सांगतो नाना रीती । मोहित होती चंद्रचूड ॥९६॥

बाई एके दिवशीं आला । तेणें हाचि वृत्तांत सांगितला । सेखी उणीं उत्तरें बोलिला । जिव्हारी झोंबला बाण मज ॥९७॥

मग मी बोलिलें शाप देईन । तंव म्हणे करा असत्य भाषण । न होतां मजकारण । शाप संलग्न नोव्हेची ॥९८॥

येरयेराचा ऐकोनि वृत्तांत । तिघींनी केले एकचित्त । विचार रचिती अद्भुत । नारदा असत्य करावया ॥९९॥

असो बाई ऐसें करावें । उत्तम युक्तीते योजावें । जेणे अनुसयेचें सत्व हरावें । यश मिळावें आपणातें ॥२००॥

तंव उमा म्हणे ऐका वचन । आधीं स्वपति करा प्रसन्न । मग तया घ्यावें वचनाधीन । गुह्य कारण कळवावें ॥१॥

न ऐकतां रुसणें फुगणें । अन्य युक्ती कार्य साधणें । सत्वहरणा पाठविणें । दीनपणें लीनत्वें ॥२॥

ती मानली तिघींसी मात । मग आपुलाले स्वस्थानीं जात । पतिसेवनीं झाल्या रत । अतिप्रीत दाविती ॥३॥

जैसा मैंद साधु होउनी । मार्गी बैसे ध्यान धरोनी । शब्दें तोषवी आलियालागोनी । धनहरणीं सावधान ॥४॥

कीं गंगातटी बैसे बक । एकचरणी ध्यानी देख । मीनपदी मिळतां चुबक । मारी अचूक ग्रास करी ॥५॥

तैशा दांभिक विचारें । अर्थसाधनीं सेवा आदरें । तिघी आचरती परस्परें । अतिसत्कारें नेमयुक्त ॥६॥

सेवा करितां निशिदिनीं । भ्रतार तोषले श्रम देखोनी । म्हणती कोण इच्छा असेल मनीं । आम्हांलागुनी सांगिजे ॥७॥

येरी म्हणती द्यावे वचन । दिल्या नोव्हें अप्रमाण । अवश्य म्हणोनी आश्वासन । प्रेमें करुन दीधलें ॥८॥

म्हणती स्वामी कृपासागरा । चरणीं विनवितें प्राणेश्वरा । नारदनिरुपणाच्या उत्तरा । तुम्ही दातारा ऐकिलें कीं ॥९॥

हीनत्व देवोनि आम्हांसी । वाखाणिलें त्या अनसूयेसी । असत्य करावें नारदवचनासी । हेंचि मानसीं वाटतें ॥१०॥

अहो जी कांहीं करोनि युक्ती । हरावी अनसूयेची सत्त्वशक्ती । मग सहजची अपकीर्ती । होईल जगतीं तियेची ॥११॥

आम्हां हा करवा जी आनंद । मग तो पाहूं कैसा नारदा भलतेंचि बोलिला विरुद्ध । करुं त्या भेद शापशास्त्रें ॥१२॥

तैं ब्रह्मा विष्णु महेश्वर । तिघे तिघींसी देती उत्तर । हें तो कार्य अनिवार । नीट विचार नोव्हे हा ॥१३॥

अनसूयेनें येऊन । नाहीं केलें तुम्हां भाषण । नाहीं दाविले थोरपण । किमर्थ भूषण योजितां ॥१४॥

अत्रि अनसूयाबाळक । याचें मानावें की कौतुक । धन्य जन्मले कुलोद्धारक । याचें सुख असावें ॥१५॥

रायें दीनातें दंडिलें । कोण थोरपण तें वाढलें । सिंहें बाळका निर्मर्त्सिलें । पुरुषार्थ झाले कैसेनी ॥१६॥

तैसें तुम्ही तयां योजितां । यणें नोव्हे तुम्हां योग्यता । विविकें विचार पुरता । मग अनर्थां संचरावें ॥१७॥

असो नारद बोलिला कुशल । पाहिल्या ऐसें निवेदिलें सकळ । तुम्हां कांहीं न बोलतां बोल । तापला प्रबळ तुम्हीच कीं ॥१८॥

पाहतां शब्द कैंचा त्याकडे । तुम्हींच मानोनि घेतलें वाकडें । आतां वृथा कां उचलां लाकडें । आम्हां साकडें घालितां ॥१९॥

ऐशा ऐकतां पतिवचना । रुसोनि गेल्या त्या अंगना । कांहीं न करिती भाषणा । दुर्मुख वदना झाल्या त्या ॥२०॥

त्यागिती निद्रा आसन आहार । मधुरोक्ति प्रपंच विचार । सुखशय्या पुष्पहार । अतिदूर भिरकाविती ॥२१॥

ऐसें देखोनिया विपरीत । कांत कांतेसी संबोखीत । येरी झिडकारोनि बोलत । भले वचनार्थ तुमचे ॥२२॥

आमुची तुम्हां कायसी प्रीती । बोल नारदाचे गोड लागती । तेची स्वीकारोनी दिबारातीं । काळगती सारिजे ॥२३॥

नारद म्हणजे कळचेटा । बहुतांच्या करी बारा वाटा । तो तुम्हांसि झाला वरवंटा । आम्हींच थोंटा वाटलों ॥२४॥

तुम्हांसन्निध उण बोलावें । भ्रतार तुम्हीं ऐकोनि सहावें । आम्हा दूषिता उगें रहावें । हें काय बरवें तुम्हांसी ॥२५॥

तुम्हीं काय कींजे या प्रती । आमुचेच प्रारब्धाची हे गती । म्हणोनी पालटली मती । तुमची पती येधवां ॥२६॥

बोलतां सद्गद जालें हृदय । नेत्रांतुनी जळ वाहत जाय । उकसाबुकसी स्फुंदत जाय । परम होय दुःखित ॥२७॥

पंचानन चतुरानन चतुर्भुज । मनीं मानिती अत्यंत चोज । म्हणती ओढवलें विपरीत काज । लागली भाज भाजावया ॥२८॥

यांचे मनोदयें न वर्तता । तरी गांठ घालिती अनर्था । जरी रक्षणें लौकिकपंथा । तरी अर्था पुरवावें ॥२९॥

असो आपुलाली कामिनी । घेते झाले अंकासनीं । नाना विनोद कौतुक भाषणीं । हर्ष मनीं वाढविला ॥३०॥

तंव त्या जोडोनि पाणी । भाळ ठेविती पतिचरणी । म्हणती स्वामी कृपा करोनी । इच्छिलें मनीं पुरवावें ॥३१॥

स्त्रीहट्टाचा विचार । देखोनिया अति अनिवार । देते झाले प्रत्युत्तर । जेणें अंतर सुखावें ॥३२॥

अनसूयेचें सत्त्व हरावें । या लागींच उपाय करावे । हें इच्छिलें तुमच्या जीवें । फार बरवें असें कीं ॥३३॥

चिंता न करावी मानसीं ।करु वेगी प्रयाणासी । अंतर न घडे आतां यासी । अभय दानासी घेइजे ॥३४॥

येथोनि तिघांचा एकांत । करोनि लीला दावितील अद्‌भुत । ते पुढिले प्रसंगीं रसभरित । श्रोते संत अवधारा ॥३५॥

श्रीमत् दत्तप्रसादवाणी । याचे भोक्ते संतशिरोमणी । अनंतसुत तयांचे चरणीं । भ्रमर होवोनी रुंजी घाली ॥३६॥

संत साधु आणि श्रोते । हे अनंत सुताचे पाळीते । त्याचे नि कृपे या ग्रंथाते । केले वदविले मज मुढा ॥२३७॥

अनंत सुत संतांचा सेवक । आनन्यत्वे आज्ञा पालक । तंस आधांरे धरोनी तवक । बोलतो निःशंक लडीवाळे ॥२३८॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । नारदपुराणाचें संमत । श्रोते परिसोत भाविक भक्त । तृतीयाध्याय गोड हा ॥२३९॥

॥ इति तृतियोध्यायः समासः ॥

## अध्याय चवथा

॥श्रीगणेशसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुदत्तात्र्येनमः ॥

ॐनमोजी सद्‌गुरु दत्तात्रेया । तुझिया स्मरणें नाश तापत्रया । तूं वंद्य सकळ भुवनत्रया । गुणत्रया व्यापका ॥१॥

तुझा अनुपम्य गा महिमा । वर्णूं न शके चितोब्रह्मा । होसी सर्वश्रेष्ठ सर्वोत्तमा । सुखधामा नमो तुज ॥२॥

तूं अविनाश आनंदभरित । सदय आणि सदा शांत । सर्वज्ञ असोनि मायातीत । तव पदीं रत सुरमुनी ॥३॥

तूं महाशुद्धि योगेश्वर । निःसंग निरंजनी दिगंबर । धीर गंभीर उदार । तूं दातार अनाथाचा ॥४॥

तूं शरणागताचा तारु । तूं दीन पतिताचा माहेरु । तूं कृपेचा सागरु । होसी कृपाकरु प्रेमळाचा ॥५॥

तूं अपेक्षिताचा दाता । मनोरथातें पुरविता । जाणोनि चरणीं ठेविला माथा । पुरवी समर्था आळ माझी ॥६॥

मी हीन दीन मतिमंद । अर्भकपणें घेतला छंद । दत्ता तूं माउली प्रसिद्ध । कोण अगाध हे तुझे ॥७॥

आजवरी मातें पाळिलें । लळे पुरवोनि सांभाळिलें । तव चरणीं विश्वासलें । लाचावलें मन माझें ॥८॥

तरी आतां कृपाबळें करुन । तुझें त्वांची वदवावें गुण । मी मूढ केवळ अज्ञान । करितां लेखन तुझा तूंची ॥९॥

या श्रोतयाचें मानस । जाणोनी वर्षें कथामृतरस । हे या मानससरोवरीचे हंस । अर्थमुक्तास भुकेले ॥१०॥

त्यांचे मन हेंचि चकोर । श्रीदत्ता तूं अंबुधर । तव कथामृत सुंदर । श्रवोनि अंतर तोषवी ॥११॥

परिसोनिया विनीत वचन । बुद्धिप्रदाता झाला आपण । पत्रलेखणी करितां धारण । साहित्य पूर्ण सरसावी ॥१२॥

मागें तीन अध्याय बोलविले । ते श्रोतीं आदरें श्रवण केले । आतांही सावधान भले । श्रव्णीं बैसलें पाहिजे ॥१३॥

गतकथाध्यायअंतीं । सावित्री रमा पार्वती । वचनी गुंतवोनिया पती । अभय निगुती घेतलें ॥१४॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । वचनीं गुंतले साचार । म्हणती कोणता करावा विचार । चिंतातुर तिघेही ॥१५॥

म्हणती आतां काय करावें । कवणातें जावोनी विचारावें । केसे जावोनि सत्त्व हरावें । कार्य करावें कवण योगें ॥१६॥

शंकर म्हणे दुर्घट । स्त्रियांनीं घातलें आम्हां संकट । अनसूया पतिव्रता श्रेष्ठ । तेथें गोष्ट न घडे हे ॥१७॥

तंव बोले चतुरानन । मजहि कार्य दिसतें कठीण । स्नुषेठाईं विपरीत भान । कैंवी आंगवण करावी ॥१८॥

मग बोले तो रमेश । तेथें न पवेची कदा यश । स्त्रीबुद्धि करवी नाश । येईल आपेश वाटतें ॥१९॥

बुडोनि चिंतेच्या सागरीं । युक्ती रचिंती नाना परी । भांबावोनी स्तब्ध अंतरीं । काळकुसरी विसरले ॥२०॥

स्त्रीवचनाचे बंदिखानीं । गुंतोनि गेले ते क्षणीं । मुक्त व्हावया लागोनी । उपाय कोण्ही दिसेना ॥२१॥

म्हणती स्त्रीलोभें नाडलों । आपुल्या कर्मा विसरलों । बुद्धिज्ञान युक्ती नागवलों । फांसां पडिलों जावोनि ॥२२॥

कामचेष्टे धरुं भाव । तरी तो आप्तपणाचा ठाव । त्याविण हरावे कैसें सत्त्व । कोण उपाय रचावा ॥२३॥

ऐसेंचि जावें जरी तेथें । तरी उभय आचरतील सेवेतें । मग वरप्रदानचि द्यावें त्यांतें । हेंचि आपणातें घडेल ॥२४॥

जरी क्रूरवेषाते धरिलें । नाना रीतीं त्या छळिलें । उभय शांत दांत आगळे । कदा काळे तम नये ॥२५॥

आपण करुं जातां एक । त्यापाशीं निघेल आणिक । तरी सत्व हरावें आवश्यक । हे तो निःशंक दिसेना ॥२६॥

ते सत्त्व धीर उदार तापसी । निर्लोभ नैरास्य मानसी । अनसूया अनुसरली सेवेसी । सतेज राशी तपाच्या ॥२७॥

कर्मधर्म सांगोपांग । जाणती सर्व भागविभाग । ओळखोनि घेती मानसरंग । तैसाचि प्रसंग साधिती ॥२८॥

प्रपंच परमार्थ एक मूस । ओळखोनि चालती सावकाश । ज्याचे आचरण अति निर्दोष । तेथें दोष कोण लावी ॥२९॥

आकाशीं भानुमंडळ । स्वतपें सतेज निर्मळ । तयालागी लावीता मळ । अळुमाळ लागेना ॥३०॥

तथापि लाऊ जातां । तात्काळ होय दग्धता । तेंवी आपुलिया आतां । कर्म माथा ओढवलें ॥३१॥

तव वैकुंठीचा सकुमार । काय बोलता झाला उत्तर । होणार न चुके अनिवार । घडोनि सत्वर पैं येतें ॥३२॥

प्रारब्धें आलें ओढवोन । तें न सुटे भोगिल्यावीण । व्यर्थ कां संशयी पडोन । दिवसमान लोटिता ॥३३॥

घडणें तेंचि आतां घडेल । होणें तैसें होवोनि जाईल । परी या स्त्रियांचे न घ्यावे बोल । वचन फोल जाऊ द्या ॥३४॥

अंतरी जाणे तो मुकुंद । अनसूयातप आचरे शुद्ध । तिसी जेणें होय आल्हाद । परमानंद संसारी ॥३५॥

आणि अभिमानल्या आमुच्या कांता । भलतेचि दोष घेती माथा । अविचारें पेटती अनर्था । हेही भ्रांतता फेडावी ॥३६॥

तेचि करुं आतां कारण । म्हणोनि पुढती करुं निरुपण । म्हणे ऐका सावधान । युक्ती पूर्ण सुचली ॥३७॥

गुंतलो स्त्रीयांचे वचनीं । सुटावें आतां येथुनी । ऐसें जरी वागेल मनीं । तरी योजोनी सांगतों ॥३८॥

ऐकोनि चंद्रचूड विधाता । म्हणती युक्ति ते सांगा आतां । तेचि स्वीकारुं जी अनंता । कमलाकांता मधूसूदना ॥३९॥

हरी म्हणे ऐसें करा । द्विजवेषातें वेगें धरा । मी सांगेन तैसें करा । द्वैत विचारा नाणिजे ॥४०॥

भूमंडळीं सिंहाचळ । तो मद्रुप आहे केवळ । तेथें वसती पुण्यशीळ । ऋषिमंडळ योगी तें॥४१॥

महाविषाळ पर्वतोदरीं । तेथें नगर नामें मायापुरी । तया पर्वताचे शिखरीं । मुनी अत्रि वसतसे ॥४२॥

गुप्तरुपें तेथें जाऊन । तयाचें घ्यावें दर्शन । विलोकावें आचरण । तैसें कारण करावें ॥४३॥

कांहीं न्यून न येतां हातीं । नारद निवेदनीं आली प्रचिती । तयालागी हेंचि युक्ति । असतां एकांतीं प्रगटावें ॥४४॥

अत्रि नसतां मंदिरीं । द्विजरुपें प्रगटोनि द्वारीं । नग्न भिक्षेतें अवसरी । अति सत्वरीं मागावी ॥४५॥

अनसूया करितां अनुमान । शापशस्त्रें कराजी ताडन । सत्त्व तिचें सांडवून । करावें गमन तेथोनी ॥४६॥

ऐसें बोलतां तो अनंत । तें उभयासी मानली मात । आनंद घोषें टाळी पिटीत । म्हणती युक्ति बरवी हे ॥४७॥

मग न कळवितां कवणासी । निघते झाले एके दिवशीं । विप्रवेश धरोनि वेगेसी । भूलोकासी पावले ॥४८॥

नाना तीर्थे क्षेत्रें पहाती । पर्वत दरी आश्रम धुंडिती । शोधिता सिंहाचळ पर्वतीं । गुंफा विलोकितीं ऋषीच्या ॥४९॥

तंव तें मायापुरीचें शिखर । दाविता झाला सर्वेश्वर । परम रमणीय वृक्ष अपार । लावले भार फळपुष्पीं ॥५०॥

शाल तमाल नारळी । जांब जांबूळ खिरणिया । देवदार कृष्णागर मलिया । जाईजाई मोगरे ॥५२॥

हिरडे बाह्याळे रातांजन । आंवळी व्याह्याडे अंजन। फणस पांगारे कांचन । वंशसधन तोरणें ॥५३॥

सिरस हिंगण धावड । रुई मांदार केवडा । केतकी करंजी पेवडा । ताड माड खर्जुरा ॥५४॥

बाभळी बकान सेवरी । चिंच शमी आंबे बदरी । अश्वस्थ्य भेदले अंबरीं । वट सविस्तरी वाढले ॥५५॥

अगस्ती शेवगे सारफळ । बरु सूर्य देव नळ । अशोक औदुंबर टाकळ । आपटाये कळकठकि ॥५६॥

बेल तुळसी शेवती । पाच दौने घमकारती । मर्वे कोऱ्हाटे शोभती । कमळें विकासती जळठाईं ॥५७॥

कुड्रगुल छबुगुल्लतुर । गुल्लमेहदि गुल्लदावनी अनार । नारंगी नेवाळी तगर । तरटी खदिर ते दुबे ॥५८॥

लवंगा दोडे नागवेली । द्राक्षमंडप पवळवेली । तोंडले पडोळे गुळवेली । परवर कारली कढवंचे ॥५९॥

फणस मोहो पारिजातक । कौठ भोंकरे साग देख । दहिंवन रुदाक्ष अलोलिक । मिरी झुबक धायटी ॥६०॥

चार पिस्ते बदाम ऊंस । कर्पूर कर्दळी विशेष । वैजयंतीचा सुवास । आसपास धावत ॥६१॥

वृक्ष वर्णिले अल्पमता । परी अनेक असती वनस्पती । कंदमुळां नाहीं गणती । श्वापदें वसता त्यामाजीं ॥६२॥

जेथें मकरंद अपार । तेथें वसती उरग भ्रमर । जेथें लवले फळभार । तेथें संचार बहुतांचा ॥६३॥

ते यथामती करुन । वर्णिल्यातील किंचित निरुपण । परिसा श्रोते चित्त देवोन सुशोभित वन ज्यायोगें ॥६४॥

साळ्या शुक मयोरे । बकवे लाल तीतरे । भारद्वाज तास नकुळ फिरे । माकडें वानरें रीस पैं ॥६५॥

घारी कावळे कोळसा । गृध्र ससाना ढोकसा । कर्कोट पांडव सारसा । कोकिळा सुरसा बोलती ॥६६॥

बक बदकें हंस । कुकडि जळीं करी वास । चकवीचे डोल खबुतरें विशेष । पारवे सुरस घुमघुमती ॥६७॥

चिमण्या तिटवी नीलकंठ । शकुंत कुकडे परीट । चित्रुक पिंगळे कलकलाट । रजनीं धीट वाघुळा घुगु ॥६८॥

पतंग पाकोळ्या भ्रमर । शार्दूल कुकुट थोर । सायाळ बिल्लबिला अनिवार । मैना सुंदर बोलती ॥६९॥

अनेक पक्षियांचे पाळे । गुजबुजिती कर्कश रसाळे । तेंवी श्वापदांचीं कुळें । आनंदमेळें डुल्लती ॥७०॥

मृग चितळे सांबर । सिंह व्याघ्र कूंजर । रोही म्हैसे शूकर । अरण्यें अपार ते ठाईं ॥७१॥

जवादि मृग मांजरें । गौतमीचीं वनखिल्लारें । ससे टेभे वृक भयंकरें । तरस खोंकरें जंबुक ॥७२॥

ससे गेंडे आणि नीळ । उद भुमी वृक्षी नीळ । सर्प नाग माहूंडूळ । अजगर विशाळ पसरले ॥७३॥

पक्षी श्वापदांच्या नाना याती । त्या वनीं शब्दीं गर्जती । जळचरें जळीं फिरती । यथामती निवेदूं ॥७४॥

मीन मासोळी टोक । वाबटि असती लंबक । किडे कांसवें मंडूक । विरोळे देख सळसळती ॥७५॥

मगर सुसरी विषाळ । जळीं तंतूतें सबळ । खेंकडे गाई द्विगुल । मनुष्यें कोमळ सान जळीं ॥७६॥

जळचरें जळीं विचरती । वनचरें भूमी धावती । वृक्षीं विहंगम बोलती । भूगर्भी वसती श्वापदें ॥७७॥

ऐसिया वनगव्हारीं । जळस्थानें नाना परी । आश्रम गुहा कपारी । कुटिका नागरी ठाईं ठाईं ॥७८॥

तेथें अत्रिमुनीचा आश्रम । तपाचरणीं युग्म उत्तम । तो सकळांचा विश्राम । दे आराम पांथिका ॥७९॥

त्या वनाप्रति जातां । सुखसंतोष उपजे चित्ता । दूर पळे उद्विग्नता । अंगी व्यथा नुरेची ॥८०॥

तेथें ब्रह्मा विष्णु महेश्वर । स्थळ पाहतां आनंदले थोर । सव्य प्रदक्षिणा करोनी सत्वर । करिती नमस्कार गुप्तरुपें ॥८१॥

स्थळ देखताचि निवाले । उपमें स्वर्गा तुच्छ केलें। धन्य या भूलोकिचें दैव आगळे । वास केले ते धन्य ॥८२॥

अद्भुत आनंदें देखोन । विसरले कार्याची आठवण । मन झालेंसें उन्मन । नारद वचन आठविती ॥८३॥

आपी आपणा बोलति बोले । अहा स्त्रियांनीं हें काय रचिलें । येथें तो युक्ती कांहीं न चले । संकटीं घातलें अर्भकीं ॥८४॥

असो आतां संधी पाहून । घेऊं मातेसी प्रसाद मागोन । म्हणोनिया रात्रंदिन । रहाती जपोन तिघेही ॥८५॥

अत्रि नसता सदनाठायीं । प्रसाद मागावा लवलाही । पावताच आपुले गृहीं । निघोनी सोई जाईजे ॥८६॥

अत्रि असे अंतरज्ञानी । जरी भाव ओळखिला त्यांनीं । तात्काळ टाकितील श्रापोनी । सावध मनीं असावें ॥८७॥

असो इकडे अत्रिमुनी । स्वकांतेलागी पाचारोनी । गुज सांगे तियेचे कर्णीं । तपोवनीं जातों मी ॥८८॥

स्वस्थचित्तें मानसीं । सुखें राहे तूं आश्रमासी । तप झालिया वेगेसी । भेटूं तुम्हांसी सत्वर ॥८९॥

तव अनसूया होवोनि विनीत । मुनी अत्रितें प्रार्थित । आपण आरंभिला योगयुक्त । तपोवनांत जावया ॥९०॥

मज आज्ञापितां आपण । आश्रमीं असावें सावधान । परी कैंवी गमेल मजलागून । स्वामिचरण अंतरती ॥९१॥

आणि मंदिरीं येती अभ्यागत । त्यांचें कैसें होय स्वागत । तुम्ही समीप नसतां स्वामिनाथ । भय अद्भुत जीवीं कीं ॥९२॥

व्रत कैसें हें चालवावें । नून्य पूर्ण कोणें करावें । आलिया विघ्न निवारावें । हें काय घडावें स्त्रियांसी ॥९३॥

यदर्थींच माझी विज्ञापना । केली आदरें स्वामीचरणा । स्वस्थ करोनि माझी यामना । तपोवना जाइजे ॥९४॥

परिसोनि अनसूयेचें उत्तर । काय बोले तेव्हां मुनीश्वर । निर्भय करावी सेवा सत्कार । पूजा आदर अतिथीचा ॥९५॥

माझे चरणोदकें करुन । ठेवी कमंडलू भरुन । तुज संकट वोढवतां दारुण । करी सिंचन कार्य होय ॥९६॥

दृढवचन धरोनि मानसीं । अनसूया पूजी पतिपायांसी । सद्गद होवोनियां मानसीं । प्रेमें चरणांसी वंदिलें ॥९७॥

पतिव्रतेचें समाधान । करोनि जातसे ब्रह्मनंदन । इकडे विधिविष्णुईशान । अर्थार्थी पूर्ण जागती ॥९८॥

ऐसें संधान साधिता । तंव तो सुदिन उगवला अवचिता । ऋषि तपासी जाला जाता । घरीं माता एकली ॥९९॥

एकटी अनसूया मंदिरीं । हें देखोनि ते अवसरीं । द्विजवेषें प्रगटोनि द्वारीं । मधुरोत्तरीं बोलती ॥१००॥

माते आम्ही तिघे ब्राह्मण । अति क्षुधेनें पीडिलों जाण । नग्न भिक्षा घाली भोजन । उदार पूर्न तूं होसी ॥१॥

अनूसये धन्य तूं पतिव्रता । औदार्य सदय ऐकोनि वार्ता । टाकोनिया दूर पंथा । प्रसाद आर्थी पावलों ॥२॥

तूं साध्वी सुलक्षण माउली । कोमळ हृदयीं तूं वेल्हाळी । तरी इच्छित भिक्षेची पुरवी आली । ऊठ ये वेळीं जगदंबे ॥३॥

अति लाघवी ऐकोनि भाषण । अनसूया करी त्यां अवलोकन । मनीं म्हणे हे कैसे ब्राह्मण । विपरीत दान मागती ॥४॥

मग निरखी आपुले मानसीं । वाटतें आले छळावयासी । अव्हेरुनी जरी द्यावें यांसी । तरी सत्त्वासी हरितील ॥५॥

तैसियांत स्वामी नसता घरीं । द्विज पातले ये अवसरीं । आतिथ्य न करितां निर्धारी । शब्द मजवरी येईल ॥६॥

मग आठवोनि पतीचे चरण । पाचारिले ते ब्राह्मण । अर्घ्यपाद्यादि पूजोन । केलें वंदन सप्रेमें ॥७॥

येरु म्हणती आम्ही क्षुधातुर । न रुचती आम्हां उपचार । इच्छीत भिक्षा करी सादर । नसतां उत्तर दे त्वरें ॥८॥

ऐकोनि तयांचें भाषण । म्हणे जी स्वस्थ करावें आतां मन । आपण जैसें मागीतलें भिक्षादान । सिद्ध करुन आणितें ॥९॥

पतिसेवेचें तप प्रबळ । त्या कृपें ज्ञान विशाळ । ओळखोनिया त्यांचे बोल । कौतुक तात्काळ रचियलें ॥१०॥

जावोनियां मंदिरीं । पालखशय्या केली साजिरी । आपण येवोनि बाहेरी । काय करिती तेधवां ॥११॥

पतिचरण तीर्थें करुन । अक्षयीपात्र भरित पूर्ण । तें आदरें करीं घेऊन । करी सिंचन तिघांवरी ॥१२॥

उदक सिंचिताचि तात्काळ । तिन्ही मूर्ति झाल्या बाळ । सुहास्य वदन कोमळ । करिती कोल्हाळ क्षुधेनें ॥१३॥

विलोकितां अनसूयासती । झाली मोहाची उत्पत्ति । पान्हा फुटला सत्वर गती । दर्दरीति पयोधरें ॥१४॥

येणें नग्नभिक्षे मागितलें । तरी तेचि पाहिजे पुरविलें । म्हणोनि तात्काळ वसन टाकिलें । नाहीं ठेविलें कंचुकीसी ॥१५॥

अतृप्त ते तृप्तपर्यंत । आडवे घेवोनिया पाजित । क्षुधानळ करविला शांत । संतोषभरित तिघेहि ॥१६॥

बाळें वस्त्रावरी ठेवोनी । स्ववसन नेसली तेच क्षणीं । अंतरगृहीं प्रवेशोनी । जल तापवोनि आणिलें ॥१७॥

तिघे बाळक उचलिले । तैलाभ्यंग त्यातें केलें । पायांवरि न्हाणिलें । वेगळाले घेवोनि ॥१८॥

स्ववस्त्रें तेव्हां आंग पुसी । वेगीं फुंकिलें कर्णासी । स्नेहें भरोनि तालुकेसि । पालखीं तयांसी पहुडवी ॥१९॥

एक असे तो श्यामसुंदर । एक गौरवर्ण तो सुकुमार । एक दिसे कर्पूरगौर । नाटकी प्रियकर दीसती ॥२०॥

वस्त्रें घालोनि पोटावरी । अनसूया पालखदोरा धरी । जो जो म्हणोनि सुस्वरीं । सप्रेम कुसरी गीत गायें ॥२१॥

गौरांगा तूं चतुर्मुखा । सृष्टिकर्ता श्रमसी देखा । निजनिज बाळा घेई सुखा । हालवी पालखा जो जो म्हणे ॥२२॥

श्यामांगा तूं चतुर्भुजा । अवतार घेवोनी पाळिसी प्रजा । शिणलासी निज गा अधोक्षजा । भक्तकाजा जो जो रे ॥२३॥

स्मशानवासी दिगंबरा । भस्मधूलित कर्पूरगौरा । निज गा बापा भूतसंव्हारा । पंचवगत्रा जो जो घे ॥२४॥

पद्मोद्भवा चतुरानना । वेदस्थापका ब्राह्मना । सत्यलोकवासी सगुणा । कमलासना जो जो रे ॥२५॥

कमललोचन कमलावरा । नवमेघरंगा जगदांतरा । शेषशयना गदाधरा । निज गा उदारा घे जो जो ॥२६॥

गंगाधरा गौरिप्रिया । पन्नगभूषणा करुणालया । पशुपते तूं कंठनीलया । हर भवभया जो जो रे ॥२७॥

नीज रजोगुणा पाकशासना । झोप घे तामसा मदनदहना । डोळा लागो या सत्त्वगुणा । मधुसूदना जो जोरे ॥२८॥

यापरिस प्रेमें गीत । गावोनि पालख हालवीत । सती अनसूया आनंदभरित । वदनें विलोकित तिघांचीं ॥२९॥

नित्य उठोनीयां सती । बाळां खेळवी परमप्रीती । स्नानपूजा त्वरितगती । पाकनिष्पत्ती स्वकरेंची ॥३०॥

आल्या अतिता सत्कारोन । प्रेमें देतसे त्यां भोजन । बोलोनियां नम्र वचन । संतोषमान बोलवी ॥३१॥

एवं नित्यानंदें अनसूया । अतिथी पुजोनी सारी गृहक्रिया । रिक्तकाळीं हाल्लरतया । लागे गाया बाळका ॥३२॥

तंव अकस्मात ऋषिवर्य । सारोनि जपतपादि कार्य । उदयाचळीं उगवे सूर्य । तैसा विधितनय प्रगटला ॥३३॥

तंव ती मंगळ गीतध्वनी । प्रेम आल्हादें ऐके कानीं । म्हणे आजी आमुची राणी । कवणालागुनी हालवीती ॥३४॥

मग मंदिरामाजीं केला प्रवेश । येतां जाणवले अनसूयेस । उठोनि लागली चरणास । आसनीं स्वामीस बैसवी ॥३५॥

अर्घ्यपाद्यादि द्रव्य आणिलें । स्वामीचरणातें पूजिलें । प्रदक्षणोनिया नेमिलें । प्रीती स्तविलें नम्रत्वें ॥३६॥

तव तो अत्रि तपोधन । कांतेसी बोले काय वचन । आजी तुझें बहुत मन । आनंदघन दीसतें ॥३७॥

काय लाभ आला हाता । कीं सांग भेटलीस रमाकांता । कोण कारणें मंगलगाथा । गाइलासी स्वतः स्वमुखें ॥३८॥

तव निर्दोष गंगा लावण्यखाणी । पतिपुढें जोडोनि पाणी । जी महाराज एके दिनीं । नवलकरणी झालीसे ॥३९॥

आपण तपासी जातां । तिघे द्विज आले अवचितां । द्वारीं उभें राहोनि कृपावंता । ध्वनी गर्जतां ऐकिलें ॥४०॥

मग तयांतें पाचारिलें । आसनीं यथोक्त पूजिलें । तंव ते मज बोंलते झाले । सांग तें ऐकलें पाहिजे ॥४१॥

आम्ही मार्ग चालतां पावलों शीण । दूर पंथ आलोंत क्रमोन । क्षुधानळें पीडिलों जाण । पुरें पूजन तुमचें ॥४२॥

तुमची कीर्ति दिगंतरीं । सदय ऐंकिलें कर्णद्वारीं । जे हेतू याचक अंतरीं । पुरवितां निर्धारीं म्हणोनिया ॥४३॥

औदार्य कृपाळू तपोधन । शांत दांत विरक्त-पूर्ण । सद्भक्तीं करितां पूजन । याचक जन तोषवितां ॥४४॥

ऐसिया कीर्तीचे पवाडे । आम्ही एकोनि वाडें । इच्छा धरोनि द्वारापुढें । वाडेंकोडें पावलों ॥४५॥

तुम्हीं दयाळू कोमळ मानसीं । नग्नभिक्षा द्यावी आम्हांसी । ऐकोनि तया उत्तरासी । विचार मानसीं मांडिला ॥४६॥

स्वामीं तुमचे दयेंकरुन । विचारें जाणितलें त्यांचें चिन्ह । होती विप्रवेष करुन । सत्त्वहरण करुं आले ॥४७॥

कोण युक्ति करावी यासी । म्हणोनि योजीत जंव मानसीं । पुनरपि तिघे ते-जोराशी । बोलती मजसी तमोक्त ॥४८॥

माते झाला बहुत वेळ । आम्हांसि पीडी क्षुधानळ । शांतवी आतां न लावी वेळ । प्राण व्याकुळ पैं होती ॥४९॥

द्यावया आम्हां नग्नभिक्षेसी । अंगवण नसे जरी तुम्हांसी । तरी उत्तर द्या अतिवेगेंसी । जाऊं उपवासी स्वधामा ॥५०॥

हें ऐकोनि स्वामिराया । मागुती वंदिलें त्यांच्या पायां । गौरव केला विनवोनिया । कीं क्षण एक दया मज कीजे ॥५१॥

ओळखोनि सत्वाची हानी । तात्काळ प्रवेशलें सदनीं । वेगीं पालखा सज्ज करोनी । मंडित भूषणीं युक्त तो ॥५२॥

त्वरें येवोनि बाहेरी । आपुलें पदध्यान केलें अंतरीं । तीर्थोदक घेवोनिया करीं । तयांवरी सिंचिलें ॥५३॥

तंव ते तिघे झाले बाळक । क्षुधें टाहो करिती हांक । मग वस्त्र त्यागोनि आवश्यक । विलोकीं मुख तयांचें ॥५४॥

त्या तिघांसी अवलोकितां । मोहो पान्हा झाला देता । मग निर्भय होवोनि चित्ता । धालें उचलितां बाल एक ॥५५॥

आडवा घेऊन लाविला स्तनीं । शांतविला तेव्हां पयःपानीं । एवं तिघां तृप्त करोनी । वस्त्रासनीं ठेविलें ॥५६॥

वस्त्र केलें परिधान । मग तिघां अभ्यंग करुन । उष्णोदकें घालोनि स्नान । पालखीं शयन करविलें ॥५७॥

त्यांतें मंगल गीत गाइलें । जो जो म्हणोनि हालविलें । तों अकस्मात पाउलें । नेत्रीं देखिलीं स्वामीचीं ॥५८॥

दयाळें मातें प्रश्न केला । तो झाल्यापरी निवेदिला । आपण विलोकावें बाळां । आतां डोळा लागला त्यां ॥५९॥

आश्चर्य वाटलें अत्रीसी । म्हणे ही अद्भुतकरणी कैसी । मग उठोनिया वेगेंसी । पालखापाशीं पावला ॥६०॥

बाळकांचीं पहातां मुखें । ऋषि आनंदला परम सुखें । म्हणे धन्य ईश्वराचीं कौतुकें । अलोलिकें दावितो ॥६१॥

न्याहाळोनि पूर्ण बाळांसी । ज्ञानदृष्टीं शोधीत मानसीं । ध्यानीं आणोनि वेगेंसी । काय कांतेसी बोलत ॥६२॥

धन्य भाग्य तुझें सबळ । ईश्वरें पुरविली तुझी आळ । भक्ति पाहोनि हे कृपाळ । झाले बाळ तव सदनीं ॥६३॥

गौर तो हा कमळासन । कर्पूरगौर तो उमारमण । श्यामांगी तो नारायण । पृथक् त्रिगुण बाळ झाले ॥६४॥

तुझे हेतु पुरवावया । त्रिमूर्तीस आली दया । बाळरुप धरोनिया । केली छाया कृपेची ॥६५॥

परी पुढील भविष्यार्थ । तुज सांगतों मी यथार्थ । हे जातील येथोनि त्वरित । सावध कार्यार्थ साधावा ॥६६॥

यांचें करीं प्रीतीं पालन । दिनरात्रीं करी संरक्षण । विसरुं नको एकक्षण । जीवींची खूण सांगितली ॥६७॥

अनसूया वदे जी महाराजा । म्यांही ओळखिलें यांसि वोजा । तव कृपें साधिलें काजा । तुम्हीही गुजा निवेदिलें ॥६८॥

आपुलें वचन मज वंद्य शिरीं । रक्षी तयांतें बहुतपरी । ऐसें वदोनि ते अवसरीं । पाक करी अतिवेगें ॥६९॥

पंचमहायज्ञ करुन । उभयतां सारिलें भोजन । पुढतां स्वामीचें करी सेवन । स्वयें आपण अनसूया ॥७०॥

तंव तो महाराज योगेश्वर । परम साधु वैष्णववीर । स्कंदीं वीणा वाहोनि सुंदर । निरंतर भजनीं जो ॥७१॥

तो विधिसुत नारदमुनी । येता झाला आनंदें भुवनीं । प्रीति धरोनिया दर्शनीं । सन्मुख येवोनिया ठाकला ॥७२॥

तंव अत्रिमुनी असे पौढला । अनसूयेनें पालखदोर धरिला । जो जो म्हणोनि हालवी तये वेळां । ऐकोनि प्रगटला नारद ॥७३॥

प्रेमळ हाल्लर ऐकतां । अनसूयेसि म्हणे कोणा हालवितां । मंगल गीत वाखाणितां । आनंद चित्ता फार तो ॥७४॥

अनसूया उठोनी आसना । देवोनि गौरवी पद्मोद्भवनंदना । म्हणे महापुरुष दयाघना । बाळें पाळण्या निजविलीं ॥७५॥

परिसोनी उभयतांच्या बोला । मुनी अत्रि जागृत झाला । नारदासी देखोनिया डोळां । आनंद झाला बहु थोर ॥७६॥

एकमेकांतें आलिंगिती । सप्रेमें संवाद करिती । परस्परें धन्य म्हणती । अंतरी निवती दरुषणें ॥७७॥

उभय बंधु । एकासनीं । कुशल पुसती आवडी करोनी । तैसियांत बाळकें घेवोनी । मृगलोचनी पावली ॥७८॥

नारदासन्निध तिघे ठेविले । नारदें पूर्ण तयां अवलोकिलें । उभय मुखांकडे पाहिलें । भिन्न देखिलें तयांसी ॥७९॥

परम विस्मित झाला मानसीं । तंव तें जाणवलें अनसूयेसी । पतिसन्निध सांगे व्रतासी । अति सावकासी सुचित्तें ॥८०॥

घरीं नसतां मम स्वामी । तिघे द्विज पावले आश्रमीं । म्हणती माते क्षुधित आम्ही । झालों श्रमी चालतां ॥८१॥

मग ते म्यां पुजीले द्विजगण । ते नग्नभिक्षा मागती दान । तैं आठवोनि पतिचरण । तीर्थोदक सिंचन त्यां केलें ॥८२॥

तंव ते तिघेही झाले बाळ । क्षुधानळें केला कोल्हाळ । मग वसन टाकोनि तात्काळ । तिघे लडिवाळ पाजिले ॥८३॥

करविलें अभ्यंगस्नानासी । पालखीं निजविलें बाळकांसी । तें वृत्त निवेदिलें स्वामीसी । तैसें तुम्हांसी येधवां ॥८४॥

गद्गदा हसे तेव्हां नारद । म्हणे हा बरवाचि झाला विनोद । स्त्रीबुद्धीं पावले बाद । नसतां बंद भोगणें ॥८५॥

स्त्री अनर्थाचें घर । स्त्री हें पापाचें माहेर । स्त्री डंखिणी निर्धार । जीता नर खातसे ॥८६॥

जे स्त्रियेतें विश्वासलें । जे स्त्री वचनासि गुंतले । जे स्त्री बुद्धीनें वर्तले । जिता मेले ते नर ॥८७॥

धिक् धिक् जिणें त्या पुरुषाचें । बाइले आधीन वर्तती साचे । काय डिंगर वाटोनि सांबरीचें । कीं अजागळीचे स्तन जेवी ॥८८॥

धिक् धिक् संसारी ते कामिनी । जी पुरुषासि पाडी व्यसनी । अमर्याद कुष्ट नष्ट भाषणीं । पाडी पतनी उभय कुळां ॥८९॥

अहा हे सर्वोत्तम । स्त्रीबुद्धीं आचरलां कर्म । उचित नोव्हे तुम्हां धर्म । दुःख परम मज वाटे ॥९०॥

तंव अत्रि अनसूया बोलती । का गा श्रम पावतां चित्तीं । कोण वार्ता ते आम्हांप्रति । कृपामूर्ती निवेदा ॥९१॥

नारद म्हणे मागें येऊन । आपुलें घेतलें दर्शन । स्थिति रीती अवलोकून । समाधान वाटलें ॥९२॥

माते तूं करिसी पतिसेवा । तें पाहोनि आनंद जीवा । सुखसंतोष बरवा । माझा विसावा ये ठाईं ॥९३॥

येथे पावोनी समाधान । स्वर्गीं केलें म्यां गमन । प्रथम पाहिलें कैलासभुवन । झालें दर्शन शिवाचें ॥९४॥

शिवगौरी एक स्थळी । उभय असतां सुखमेळीं । मज देखोनी चंद्रमौळी । हृदयकमळीं आनंदे ॥९५॥

सन्मानें देवोनि अभ्युत्थान । म्हणे कांहीं अद्‌भुतनिरुपण । मीं तुमचें चरित्रवर्णन । अद्‌भुत महिमान कथियेलें ॥९६॥

ऐकोनिया गौरीसी । रोष आला बहु मानसी । म्हणे अनसूयाच काय अवनींसी । बहु वाणिसी पतिव्रता ॥९७॥

आम्हांहुनी काय थोर । तंव मी म्हणे हाच निर्धार । शापशस्त्र उचलिलें सत्वर । जवळी शंकर बैसला ॥९८॥

उमा म्हणेअ कसनी कसिता । सोनें कळे सुलाखितां । हिरा आहेरणी ठेवितां । घण मारितां कळतसें ॥९९॥

तोंवरीच तुमची गर्जना । जोंवरी नाणिलें अनुमाना । नुतरतांचि शापबंधना । पावसी मोचना न घडे मग ॥२००॥

अपर्णेचें ऐकोनि उत्तर । मीही बोलिलों तैं समोर । असत्य कथिलें कराल जर । बाधी निर्धार शाप मज ॥१॥

हें श्रुत असों तुज पार्वती । ज्या भुवनयत्रीं पतिव्रता असती । त्या दासी अनसूयेसि शोभती । सकळा निश्चिति माता ते ॥२॥

ऐसी गर्जोनी वाणी । मग गेलों सत्यलोकभुवनी । पिता आज्ञापितां मजलागोनी । हेंची निरुपणीं निरोपिलें ॥३॥

तेथें ही गति हेची झाली । माता मजवरी बहुत कोपली । श्राप देतां तये वेळीं । सम फळीं फोडिली ॥४॥

तेथेंही मना तें विटलों । वेगीं वैकुंठपुरी पावलों । रमारमणातें भेटलों । शरण झालों तयासी ॥५॥

तेणें देवोनि अलिंगन । म्हणे करी कांहीं अद्भुत कीर्तन । तंव लक्ष्मी देखोनि सन्निधान । केलें निरुपण हेंचि पै ॥६॥

तेथेंही रमा क्रोधावली । गति मागीलचि दिसोनि आली । माझीही चित्तवृत्ति क्षोभली । आज्ञा घेतली हरीची ॥७॥

त्या दिवसापासोन । तिन्ही स्थळें सोडिलीं पूर्ण । नित्य करितों दर्शन । दूरी राहोन त्या ठायां ॥८॥

तेव्हां मजसी गमतें । स्त्रियांनीं बोधिलें यांतें । हीनत्व देवोनि वचनातें । गुंतवोनि येथें धाडिलें ॥९॥

करावें सत्वाचें हरण । स्वकीर्तीनेंचि भरावें त्रिभुवन । हेंच मनीं इच्छा धरोन । दिले पाठवून छळावया ॥१०॥

हें माते तुवां ओळखिलें । कृपें करोनि केलीं बाळें । श्राप देवोनि नाहीं भस्मिलें । उपकार केले आम्हावरी ॥११॥

मातें तव कीर्तीच्या वर्णनें । उद्धरतील हीं त्रिभुवनें । ऐसें न घडतें दान पुण्यें । अघटित महिमानें तुझीं देवी ॥१२॥

आतां एक मागणें मागतों तुम्हा । हाची अभय कर द्यावा आम्हा । या तिघांवरी करोनी प्रेमा । देवोनि क्षेमा रक्षावें ॥१३॥

ऐकोनि नारदाचे बोल । दोघां नेत्रीं चालिलें जळ । अघटित झाला कैंवी खेळ । मशकें मंडळ धरियेलें ॥१४॥

आमुचें आम्हां आश्चर्य वाटलें । ग्रामसिंहे सिंहा कवळिलें । मासोळीनें आटिलें । पोटीं साठविलें सागरा ॥१५॥

कीं तृण पुतळे जाऊन । समूळ अग्नि टाकिला बांधोन । मक्षिकेच्या पक्षवाते करुन । मेरु उलथोन पाडिला ॥१६॥

वारा वागुरेंत सांपडला । तो हा प्रसंग आजि घडला । थोर अपराध झाला । कैसें याजला करावें ॥१७॥

नारद म्हणे न करा खेद । हा ज्यांचा त्यांनींच केला भेद । व्हावा अभिमानाचा छेद । म्हणोनि अगाध स्वीकारिलें ॥१८॥

येऱ्हवीं आपुलें हें उत्पत्तिस्थान । तेची असती कर्ते कारण । सत्ताधारी तिघे जण । मशक आपण त्यापुढें ॥१९॥

सन्मार्गातें रक्षावें । दुष्कृत पापी तें दंडावें । अहं कृती तें खंडावें । अवतार धरावे यासाठीं ॥२०॥

हें वर्म तेचि जाणिती । जाणोनि तैसे विचरती । अनन्य स्थळीं करोनि प्रीती

। लळे पुरविती तयांचे ॥२१॥

हा जगदात्मा जगदानी । पुरवीत अनन्याची आनी । तेंवी हा शिवशूळ पाणी । उदार मनीं सर्वस्वें ॥२२॥

याच परी हा विधाता । तुझा श्वशुर आमुचा पिता । परम सदय सृष्टिकर्ता । पुरवील हेता तुझ्या हा ॥२३॥

गर्व पत्नीचे हरावे । तुमचे मनोरथ पुरवावे । कीर्तीनें ब्रह्मांड भरावें । म्हणोनि लाघवे हीं केलीं ॥२४॥

अनसूया म्हणे मुनीश्वरा । कां वाढविला हा पसारा । वृथा खेद त्यांचिया अंतरा । कां पितरा शिणविलें ॥२५॥

काय करावें हें थोरपण । जें सकळासी देतसें शीण । नको घातक हा अभिमान । भोगवी पतन नरकवासा ॥२६॥

शहाणपण योग्य आम्हासी । पदीं लीन व्हावें सकळांसी । हेंची आवातें मानसीं । नारदऋषी सत्य पैं ॥२७॥

पहा थोरपणाची व्यथा । अंकुश पडती गजमाथा । ऊंच वृक्षातें झोडिता । आंसडोनि पाडिता वायु तो ॥२८॥

थोर पर्वतांचीं ऊंच शिखरें । वीज ढासळी एकसरें । थोरपणाचेनि प्रकारें । नासती घरें बहुतांचीं ॥२९॥

आणी पिपीलिकेसी विचारा । मिळे रवा तंदूल शर्करा । नरम लव्हाळे दातारा । नुखडती निरा अणुमात्र ॥३०॥

पैल मक्षिका ती असे सान । तया मधुचें पावे भोजन । सकळ रस करीत गृहण । करिती भक्षण ऊंट कांटे ॥३१॥

तुम्ही जाणते सुज्ञ साधू । लहानपणासी नाहीं बाधू । थोरपणाचा कां गा शब्द । लावूनी भेदू वाढविला ॥३२॥

नारद म्हणे ऐक माते । खेद न वाढवी मनातें । पूर्ववत् होईल जेथिचें तेथें । तुम्हां आम्हाते दोष नाहीं ॥३३॥

इतुकें मात्र तुम्ही करा । या बाळांसी हृदयीं धरा । स्वहीत मनीं विचारा । पालख खरा होय जेणें ॥३४॥

उभयतांचें करोनि समाधान । गुप्त दिधलें आशीर्वचन । संकेते सांगोनि खुण । बाळ निरखोन पाहिले ॥३५॥

प्रदक्षिणा करोनि बाळासी । प्रेमें वंदिलें चरणांसी । म्हणे तोषवा अनसूयेसी । कृपाराशी पूर्णत्वें ॥३६॥

मग अत्रिं आलिंगोनि । सव्य उभयतां घेवोनी । निघता झाला तेथोनी । पाताळभुवनीं जावया ॥३७॥

अत्रि अनसूया दोघेजण । नारदाचे आठविती गुण । बाळकांचे करिती पालन । आनंदघन नांदती ॥३८॥

येथोनि कथेचा नवलाव । पुढील प्रसंगीं अति अपूर्व । तो वदवील कृपें सद्गुरुराव । लीलालाघव अद्भुत ॥३९॥

श्रीमत्सदगुरु अनंत । तेणेंचि चालविला हा ग्रंथ । त्याचे कृपेनेंचि हा श्रीदत्त । प्रबोधीत कथा मज ॥४०॥

पतिताची अनन्यता पाहोनी । भावप्रीती वोळखोनी । दीनार्थ हा मोक्षदानी । संकटीं येवोनी सुचविलें ॥४१॥

बाळकालागीं आवडी पिता । जेवीं होंय शिकविता । तेवीं मजलागीं अनाथा । झाला प्रबोधिता गुरुदत्त ॥४२॥

शेंडयाकडोन इक्षु खाता । अधिकाधिक मिष्ट मधुरता । तेवीच हे दत्तकथा । श्रवणीं स्वीकारितां गोड पुढें ॥४३॥

हे संत श्रोते भाविकांचें धन । ज्यांचे त्यांनींच घ्यावें निरखोन । हें अभाग्यालागून । प्राप्त कोठोन संसारी ॥४४॥

तुम्हीं साधुसंत भाग्यवंत । तुम्हाविण थोर कोण समर्थ । नसेचिया भूमंडळांत । तुम्ही श्रीअनंत वश केला ॥४५॥

धन्य तुम्ही हो भाग्यनिधी । केवळ कृपारसाचे उदधी । जाणोनि अनंतसुत जडला पदीं । आधिव्याधि तोडावी ॥४६॥

करोनिया पूर्णदया । पावन कीजे पतिता या । पुढील कथार्थ वदावया । गुण गाया लाविजे ॥४७॥

इति श्रीदत्तप्रबोध ग्रंथ । श्रीनारदोक्तीचें संमत । श्रोते परिसोत संतमहंत । चतुर्थोध्याय गोड हा ॥२४८॥

॥ इति चतुर्थोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय पाचवा

॥श्रीगणेशसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुदत्तात्र्येनमः ॥

जयजयाजी सद्‌गुरु अनंता । कृपाघना षड्‌गुणभरिता । तुझिया चरणीं ठेविला माथा । तारी समर्था उदारा ॥१॥

तूं मज दीनाचें माहेर । सदय कोमळ तुझें अंतर । मी तुझें लडिवाळ पामर । करी अंगिकार आपंगी ॥२॥

तूं भाग्याचा गा उदधी । तोडि माझी आधिव्याधी । लागों नेदी कांहीं उपाधीं । नासी दुर्बुद्धी अंतरीची ॥३॥

तूं सर्वज्ञ आणि सर्वसाक्षी । कृपावलोकनें मातें लक्षी । भय वारोनि दीना रक्षी । कदा नुपेक्षी बाळका ॥४॥

सद्‌गुरु तूं परम कृपाळ । तूं माउली मी लडिवाळ । पुरवी जननी माझी आळ । कथा रसाळ वदवी पुढें ॥५॥

माझें सामर्थ्य नसे कांहीं । बोलवितां तुझा तूंचि पाहीं । नून्य तें पूर्ण ये ठाईं । करणें तेंही तुम्हा तें ॥६॥

तूंचि श्रोता आणि वक्ता । लखकी तूंचि शक्तिदाता । या बुद्धीते प्रेरिता । सद्‌गुरु समर्था तूंचि होसी ॥७॥

गत कथाध्यायींचें निरोपण । अत्रि-अनसूयेसी विचारुन । नारद जाता झाला तेथून । पाताळभुवन पाहावया ॥८॥

मागें अत्रि आनंदभरित । अनसूया बाळां तोषवीत । नाना कौतुकें खेळवीत । मुख चुंबीत वेळोवेळां ॥९॥

हें परिसोनि श्रोतेजनीं । आनंदभरित झाले मनीं । पुढलिया कथेचे अनुसंधानीं । वक्तया विलोकोनि पहाति ॥१०॥

जेवोनि जेवणाराची आवडी । ओळखोनि रसनेची गोडी । तोचि पदार्थ आणोनि वाढी । करोनि तातडी सुगरणी ॥११॥

तेवीं श्रोत्याचा अर्थ देखोन । वक्ता विनवी जी सावधान । सुग्रास कथा आवदान । वोपितो पूर्ण स्वीकारिजे ॥१२॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । स्वपदा त्यजोनि सत्वर । निघतां न जाणविती विचार । कांता कलत्र कवणासी ॥१३॥

अतित्वरें येवोन । अनसूये मागीतलें नग्नदान । तिनें बाळरुप ठेविलें करोन । हें वर्तमान न कळे तयां ॥१४॥

परी गेले कवणिया ठायां । कोणतें काज योजोनिया । काय म्हणावें स्वामीराया । कळवोनिया न गेले ॥१५॥

सचिंत झाल्या तेव्हां कामिनी । निद्रा न लगेचि दिनयामिनी । अहा कैसें केलें हें स्वामींनी । आम्हां त्यजोनि गेलेती ॥१६॥

त्यासी तो झाले बहु दिवस । अजोनी न येती परत ठायास । आतां पुसावें कवणास । कोण आम्हांस निवेदी ॥१७॥

ऐशा तिघीही परस्परी । उद्विग्न झाल्याति अंतरी । शोध आणविती नानापरी । सेवका करीं तेधवां ॥१८॥

स्वर्गलोक धांडोळिला । भूलोक सर्व पाहिला । पाताळही सर्व शोधिला । कोठें कवणाला न भेटती ॥१९॥

पाहिले गिरी आणि कंदर । कपारी गुव्हा सानथोर । आश्रम गुंफा अपार । सविस्तर शोधिल्या ॥२०॥

शोध न पडे कवणिया ठायीं । मग बुडाल्या चिंताडोहीं । सावित्री उठोनि लवलाही । उमेगृहीं पावली ॥२१॥

बाई कोठें गेल प्राणश्वर । येरी म्हणे न कळे विचार । कवण रोष धरोनी आपणावर । आलिप्त प्रियकर झालेती ॥२२॥

शोधिलें गे सर्व त्रिभुवन । ठायीं न पडती कोठे अजून । आपणालागीं सांगेल कवण । होती प्राण कासावीस ॥२३॥

सावित्री म्हणे अपर्णेसी । चाल जाऊं वैकुंठासी । कांहीं कळलें असेल लक्ष्मीसी । विचारुं तियेसी साक्षपै ॥२४॥

तात्काल विमानीं बैसोन । पाहिलें तेव्हां वैकुंठभुवन । तव तेथील पाहतां चिन्ह । उदास मान पाहिले ॥२५॥

विमान खालत्या उतरल्या । जावोनि रमेलागीं भेटल्या । येरयेरा पुसत्या झाल्या । नेत्रीं चालिल्या अश्रुधारा ॥२६॥

ठाव न कळेची कांहीं पतींचा । दुःखसागर लोटला शोकाचा । आक्रोश मांडला करुणेचा । शब्द वाचा न फुटे ॥२७॥

कांहीं गहिंवर सावरोन । उमा बोलती झाली वचन । बाई होवोनि सावधान । विवेकें मन आवरावें ॥२८॥

विवेकेंचि करावा विचार । काय निमित्तें पडलें अंतर । काय म्हणोनि प्राणेश्वर । होवोनि क्रूर गेलेती ॥२९॥

सावित्री म्हणे पदासी । कोण्ही दैत्य न आले हरावयासी । काय तरी गती कैसी । झाली स्वामीसी जावया ॥३०॥

कोण्ही करी अनुष्ठान । कोण्ही करिती जपध्यान । तैं करावया वरप्रदान । तयासी गमन घडतसे ॥३१॥

जैं ऐसिया कारणां लक्षिती । तैं वर देवोनि सत्वर येती । आतां लागली दिवसगती । म्हणोनि चित्तीं चिंता मज ॥३२॥

कीं न कळे करावया तपाचरण । गेले वाटती आपुले रमण । तैसाहि न लभेचि ठिकाण । जाऊं आपण त्या ठायां ॥३३॥

तंव बोलती झाली गौरी । तपा गेला म्हणूं हा त्रिपुरारी । तरी शोध घेतला म्यां माहेरीं । स्मशानांतरी धुंडिलें ॥३४॥

तपोवनही विलोकिलें । ऋषि तापसीही शोधिले । दरीं पर्वतीं पाहिले । गण श्रमले उमगिता ॥३५॥

यद्यपि जातां तीर्थाटणा । मज समागमें नेती जाणा । तथापि शोधिले क्षेत्र नाना । पंचवदनाकारणें ॥३६॥

भक्ता लावावया कस । गेला म्हणों जरी उदास । तंव हे दिवस लोटले बहुवस । अद्यापि तामस नयेची ॥३७॥

तंव लक्ष्मी म्हणे साजणी । मग स्वामीची अद्भुत करणी । ती न कळेची कोण्हालागोनी । वेदपुराणीं अतर्क्य ॥३८॥

लुब्ध होतो भोळ्या भाविका । कीर्तनीं लुब्धोनी जाय निका । पदींच बैसवी तो सेवका । दास देखा होय त्यांचा ॥३९॥

ह्या तो संताचा अंतरंग । वर्ततो त्याचा पाहोनि प्रसंग । रुपें धरोनि करी संग । शेखी निःसंग म्हणवितो ॥४०॥

याशीं थोरपणीं नाहीं चाड । नेणेचि प्रापंची सुरवाड । भावभक्तीच यासी गोड । येर अनावड सर्वथा ॥४१॥

शोध करावा जरी निश्चित । तरी नामा रुपा नाहीं गणित । म्हणोनिया ते म्हणती अनंत । आनुवादत श्रुती हे ॥४२॥

मजपासी नाहीं प्रीती । कौस्तुभ नावडे वैजयंती । पठशैया वैकुंठवस्ती । तया निश्चिती नावडे ॥४३॥

भ्रुगुलता वत्सलांछन । ब्रीद चरणींचें जें पावन । आणि आवडती अनन्यशरण । प्राणाहून अधिक हे ॥४४॥

बहु भागले शोध करितां । तो न चढे कवणाच्या हातां । माझा पाड तो केउता । तया अनंता धुंडावया ॥४५॥

परी चिंता मनीं रात्रंदिवस । विव्हळ होतें गे साजणी मानस । काय म्हणोनिया पुराणपुरुष । उपेक्षूनी आम्हांसी पै गेला ॥४६॥

तंव चातुर्य चंपकमराळी । लावण्यसरिता हिमनगबाळी । विचार करोनि हृदयकमळीं । म्हणे नव्हाळी परियसा ॥४७॥

एक आठवली कल्पना । परिसा करिते निवेदना । येईल जरी तुमच्या मना । तरि ध्याना आणिजे ॥४८॥

ऐसें ऐकतांचि बोल । ते रमा सावित्रीसी वाटले अमोल । म्हणे आतां न लावी वेळ धीर पळ असेना ॥४९॥

उमा म्हणे परिसा सादर । तुम्हासी आठव नोव्हेची निर्धार । योजिता योजना अपार । न लागे थार याची गुणें ॥५०॥

बहु दिवसाचें कथन । असें कराजी आठवण । तंव सावित्री म्हणे आपण । करोनी स्मरण निरोपिजे ॥५१॥

उमा म्हणे सावित्रीसी । नारदें कथिलें स्वामीपाशीं । वाणिलें तया अनसूयेसी । येर सकळांसी निंदिले ॥५२॥

तैं तयातें दटावोन । बोलते झालों शापवचन । शेवटीं बोलिला जो कठिण । ते आठवण आहे कीं ॥५३॥

मन खोंचलें तयाच्या बोलें । मग आपुले पति आपण आराधिले । प्रसन्नीं वचनातें मागितलें । शब्दीं गोंविलें आठवतें कीं ॥५४॥

तें करिताचि ज्ञानप्रबोध । आपण केला भेदवाद । शेखी माजविता आल्हाद । केले विनोद आठवतें कीं ॥५५॥

मग दृढ घेतलें भाकेसी । जाणेचि प्राप्त आलें तयांसी । हेचि गोष्टी आठवली मजशी । ते तुम्हांसी सांगितली ॥५६॥

तंव रमा सावित्री बोलत । बाई सत्यचि कीं हे मात । परी त्याचि कार्या नेमस्त । गेले सिद्धांत केवी कळे ॥५७॥

शोध बहुतापरि आणविले । शोधिता स्थळची नाहीं उरलें । तिघांतुन एकही न भेटले । आश्चर्य वाटलें मानसीं ॥५८॥

एक म्हणे हा नारदची कळकूटा । येणेंचि केल्या बारा वाटा । काय करावें याचिया ओंठा । करित चेष्टा फिरतो ॥५९॥

कमळा म्हणे लावोनि कळी । तो तरी गेला परस्थळीं । परत न ये अद्याप वेळीं । दुःखमेळीं घातलें ॥६०॥

तो जरि येता परतोन । त्यासीच पुसतों वर्तमान । स्वामीचा शोध त्याजविण । कदापि जाण लागेना ॥६१॥

तंव ती बोले अंबिका । मज उपजली आशंका । नारद न येचि सन्मुखा । श्रापधोका आपुला त्या ॥६२॥

मग तिघी बैसोनि येकांतीं । म्हणती कैसी तरी करावी गती । ज्या युक्तीनें स्वामी भेटती । तेचि रीती कोण सांगे ॥६३॥

अंबा म्हणे धरोनी निजध्यान । करुं कांहीं तपाचरण । जेणें पतीचे चरण । पाहूं आपण साजणी ॥६४॥

हें मानलें तिघिसीं । तपाचरणीं बैसल्या वेगेसी । जपध्यान अहर्निशीं । नाना व्रतांसी आचरती ॥६५॥

सिंहावलोकन करुन । श्रोते परिसावें मागील कथन । नारदें पाहिलें पाताळ भुवन । शोभायमान सुंदर तें ॥६६॥

आतळ वितळ सूतळ । तळातळ आणि रसातळ । सातवें निरखिलें पाताळ । जळ बंबाळ तळवटीं ॥६७॥

कूर्म वराह नाग । हाटकेश्वर देखिला सांग । भोगावती वंदोनी सवेग । मनीं स्वर्ग इच्छिला ॥६८॥

स्वर्गाप्रती नारद आला । सकळ स्वर्ग विलोकिला । कैलासभुवन देखता डोळां । उदास भासला नारदा ॥६९॥

कुडी जैसा प्राणावीण । वनिता जैसी कुंकुमहीन । भूपतिवांचोनि सिंहासन ।

कैलासभुवन तैंवि दिसे ॥७०॥

नारद पुसे नंदिकेश्वरासी । शिव अपर्णा कोठें सांग मजसी । येरु म्हणे मुनीसी । काय तुम्हांसी सांगू आतां ॥७१॥

शिव गेले बहु दिवस । न येती मागुती गृहास । शुद्धीही न लभे निःशेष । म्हणोनी तपास अंबा गेली ॥७२॥

उमा सावित्री आणि रमा । मार्ग पाहतां पावल्या श्रमा । न येती तिघेही आश्रमा । म्हणोनि उत्तमा तपाचरणी ॥७३॥

ऐकोनी नंदिकेश्वराच्या बोला । नारद गदगदां हासिन्नला । म्हणे ईश्वरी अद्भुतलीला । कदा कवणाला न कळेची ॥७४॥

विस्मये करितसे भाषण । केवढा पहा धरिला अभिमान । संकटीं घालोनि पडिल्या आपण । वृथा शीण जोडिला ॥७५॥

नारद पुसोनि नंदिकेश्वरासी । धुंडीत चालिला तपोवनासी । तंव तपाचरणीं देखोनि तिघींसी । अनन्येसी नमियेल्या ॥७६॥

नारद पहातांची नयनीं । जवळी पाचारिती त्यालागुनी । म्हणती बा आलासि कोठोनी । वडील नयनीं देखिलें का ॥७७॥

आमुचे स्वामी टाकोनी आम्हांसी । नेणो गेले कवणे देशीं । झाली दिवसगती बहु त्यांसी । म्हणोनी तुजसी विचारितों ॥७८॥

नारद म्हणे ओ माते । मी गेलों होतों पाताळातें । तेथील सिद्धयोगी तीर्थे । क्षेत्र दैवतें पाहिली ॥७९॥

तेथूनि माते आगमन । येतां पाहिले कैलासभुवन । तंव तें पाहोनिया शून्य । माझें मन गजबजिलें ॥८०॥

तेथें गण गणपती वीरभद्र । आणि षडानन नंदिकेश्वर । म्लान सकळांचे वगत्र । कोण्ही उत्तर न बोलती ॥८१॥

तंव पुसता झालों नंदीसी । न देखेची येथें शिवउमेसी । तेणें कथिलें मज वृत्तासी । अंबा तपासी पै गेली ॥८२॥

पति गेले कवणिया ठाया । बहुत दिवस झालति तया । त्यायोगें शुष्क काया । तिघी माया झाल्याती ॥८३॥

तिघी एकत्र मिळोन । दुःखें करिती तपाचरण । ब्रह्मा विष्णु यावा ईशान्न । म्हणोनि यत्न करिताती ॥८४॥

ऐसें नंदिकेश्वरें निवेदिता । खेद वाटला मम चित्ता । शीण पावलों तुम्हां शोधितां । आलों अवचितां या ठाया ॥८५॥

अंतरज्ञानी असे नारद । पिंडब्रह्मांडींचे जाणतो भेद । परी लीलालाघव प्रसिद्ध । दावी अगाध करोनिया ॥८६॥

सोंग ऐसी संपादनी । दावी ऐसा तोचि गुणी । तेवी नारदाची करणी । कर्म करोनी वेगळा ॥८७॥

खेळीयामाजी नारद बळी । वेगळा राहोनि लावी कळी । सहज विनोदाचे मेळीं । करी रळी अनुपम्य ॥८८॥

असों तो हा नारदमुनी । विनवोनि सांगे माते लागुनी । गेलों होतों पाताळभुवनीं । न देखें नयनीं तेथें त्या ॥८९॥

अहो माते तुम्हीं तरी । शोध केला सांगा कोठवरी । काय निमित्तें निर्धारी । कोणते परि गले ती ॥९०॥

सावित्री म्हणे निमित्त नसता । तिघेहि उठोनि अवचिता । गेले नेणो कवणीया पंथा । हे तो सर्वथा न कळेची ॥९१॥

नारद म्हणे निमित्त्या वांचून । जाईल तरी कोठें कोण । येऱ्हवी जातां परतोन । येती क्षण न लागता ॥९२॥

गेल्यासि सांगता बहुदिवस । म्हणोनी आश्चर्य वाटे आम्हांस । कारणावाचोनि निःशेष । जाणे तयांस न घडेचि ॥९३॥

तंव अंबा बोले नारदातें । ऐके बा तूं मम वचनातें । माझे मनीं जें कां गमतें । ते मी तूं ते सांगेन ॥९४॥

तुवां मागें येवोनी । निरोपिलें होतें स्वामी लागोनी । धन्य पतिव्रता शिरोमणि । अत्रिराणी अनसूया ॥९५॥

ज्या पतिव्रता युवती । त्या अनसूयेसी दासी शोभती । तैं जावोनी श्रापोक्ति । तुजप्रति आम्ही बोलों ॥९६॥

ते शब्द तुवां परिसोन । बोलिलासी असत्य करा मम भाषण । तैच होय शापबंधन । मज लागुन तूमचें ॥९७॥

ऐसें बोलोनि तुम्ही गेला । मागें आर्चिल आम्हीं पतिला । दिवानिशी राहोनि सेवेला । प्रसन्न त्यांजला पै केलें ॥९८॥

तपांसी सुप्रसन्न देखोनी । मग प्रार्थिलें नम्र वचनीं । ते म्हणती कोण मनीं । आम्हां लागुनी अर्थ सांगा ॥९९॥

प्रथम वचनी गुंतविलें । मग वृत्तातें कळविलें । नारदें अम्हातें दूषिलें । बहु वर्णिले अनसूयेतें ॥१००॥

तरी तेथें जाऊन । करा जी सत्त्वाचें हरण । ऐकोनि प्रबोधिता आम्हां लागुन । मग रुसोन बैसलों ॥१॥

देखोनि आमुच्या हट्टासी । दया उपजली पतीसी । म्हणती सत्य दिधलें वचनासी । सत्त्वहरणासी जाऊ आम्ही ॥२॥

कांहींक दिवस लोटतां । तिघे उठोनि गेले अवचिता । कोठें न लभति शोध करितां । जीवीं चिंता झोंबली ॥३॥

नाहीं विचारिलें आम्हांतें । कांहीं न कळविलें वृत्तातें । त्यजोनि कांता प्रजापदातें । गेले आता ते निघोनि ॥४॥

नारदा त्या दिवसापासून । आम्हीं त्यजिलें अन्नपान । न रुचे कांहीं सुखशयन । प्रपंचीं मन उदास ॥५॥

अहा पति गेले टाकोनिया । नारदा आतां काय ठेवोनि काया । जिणें यर्थची हे सखया । पतिपायां अंतरलों ॥६॥

एकोनि उमेचें उत्तर । नारद देतसे प्रत्युत्तर । तुम्हींच अभिमान धरोनि थोर । केला विचार अविवेकीं ।॥७॥

कासया वचनीं गुंतवावें । ऐसें कार्या तुम्हीं योजावें । हें काय माते तुम्हासी बरवें । अपाय घ्यावे करोनी ॥८॥

अनसूया पतिव्रता दारुण । हें प्रथमचि केलें म्या निवेदन । तुम्ही तयाचे मनोनि दूषण । केलें कारण भलतेची ॥९॥

अनसूयेचें अद्भुत तपतेंज । जें या भास्कराहूनि असें सतेज । तेंथें अप्रयोजक काज । योजिलें सहज तुम्हीं वाटे ॥१०॥

तेथें ब्रह्मा आणि ईश । काय करील सांग तो रमेश । गेलें असतां नाश । वरील आपेश वाढतें ॥११॥

मद्भाषणीं तुम्हा राग । वाटतांची वाढला हा रोग । आतां न चुके भोगल्याविण भोग । कैसा उद्योग हा केला ॥१२॥

हे तिघे जरी असतील तेथें गेले । तरी जाणा तुम्हीं सत्य गुंतलें । किंबा श्रापोनिया टाकिले । मज तो गमले येणेंची ॥१३॥

तुम्हीं करोनियां विवाद । हें कर्म करविलें जी अशुद्ध । मोठाचि घडविला अपराध । येणें निषध सर्वांसी ॥१४॥

ऐसी घडोनि येता गोष्टी । मग तुम्हां तया कैसेनि भेटी । प्रस्तुतची पडली तुटी । तुम्हां दृष्टीं पडतसे ॥१५॥

तुम्ही हे वासना धरोनि कुडीं । आपआपणा घडविली बेडी । कोण ऐसा बळी या तोडी । वारी सांकडी तुमची ॥१६॥

ते न जातील जरी त्या ठायां । कधीं न पडती अपाया । येतील सत्य फिरोनिया पहाल तया आनंदें ॥१७॥

ऐकोनिया नारद-उत्तरा । सुटला भय कंप दरारा । जीव प्याला बहुत वारा । जैशा गारा वीरती ॥१८॥

नारदवचनाचे बाण । तेणें हृदय केलें चूर्ण । नेत्रीं बाष्प कंपायमान । शरिरीं म्लान पै झाल्या ॥१९॥

मग विनविती तेव्हां नारदासी । कृपादान दे गा तूं आम्हांसी । जावोनिया सिंहाचळासी । अत्रिआश्रमासी शोधी त्या ॥२०॥

नारद म्हणे आज्ञा प्रमाण । मी अवश्य शोधासी जाईन । दैवभागें आलों परतोन । तरी करीन श्रुत मातें ॥२१॥

ऐसें कां जरी म्हणसी । तरी ऐक निवेदितों तुजसी । जरी गुंतविलें असेल तिघांसी पहातां मजसी तेचि परी ॥२२॥

ते करितां सत्त्वहरण । अनसूया क्षोभली असेल दारुण । मी शुद्धीस जातां निरखोन । करील ताडण वाटतें ॥२३॥

येऱ्हवी भीती मज न वाटे । परी तुमच्या करणीचे उद्धवती कांटे । कर्तृत्व करोनी अचाटे । कर्म खोटें भोगवीत ॥२४॥

तुमची अवज्ञा करावी । तैसी नाहींच आमुची पदवी । आपुलीं पदवचनें वंदावीं । हेचि बरवी श्लाघ्यता ॥२५॥

नमस्कारोनिया नारदमुनी । सव्य तिघींसी घेऊनी । ब्रह्मवीणा स्कंधीं वाहुनी । नामस्मरणीं चालिला ॥२६॥

सप्रेमें आनंदमेळी । गर्जत नामाचे कल्लोळी । नारद पावला सिंहाचळीं । आश्रमाजवळी अत्रीच्या ॥२७॥

ध्वनी ऐकोनि नामाची । मूर्ति उठली करुणेची । काया कवळी नारदाची । उपमा तयाची काय वाणूं ॥२८॥

जैसा कच आणि बृहस्पती । कीं भरत आणि रुघुपती । कीं शिव आणि विष्णु मूर्ती । तेवी प्रीती भेटले ॥२९॥

तव अनूसया आली धावोन । नारद पूजिला आदरें करुन । येरयेरा क्षेम पुसोन । आनंदघन मानसीं ॥३०॥

अनसूयेनें बाळ आणिलें । तें नारदापाशीं पहुडविलें । पहातांचि मन संतोषलें । बाळें विलोकिलें सप्रेमें ॥३१॥

बाळें करिती तेव्हां हास्य । तें नारदची जाणें रहस्य । चरित्र दावावयातें अवश्य । झालों वश्य मुनेंद्रा ॥३२॥

नारदें तुकवोनि मान । हास्याहास्य मेळवी पूर्ण । अत्रि अनसूयेतें लक्षून । म्हणे धन्य तुम्ही कीं ॥३३॥

हा वैकुंठपुरविलासी । पैल तो सत्य लोकवासी । एक वसणार जो कैलासी । तुम्ही ऐसियासी पावला ॥३४॥

तुम्हांऐसे भाग्यनिधी । म्यां तंव देखिले नाहींत कधीं । वाढावया वंशवृद्धी । बरवीं संधी तुम्हां हे ॥३५॥

हें सकळांचें अधिष्ठान । झालेति तुमचे स्वाधीन । अनंत जन्मीचें तपाचरण । हेंचि जाण फळ त्याचें ॥३६॥

याचिलागी बहु तपति । योगयागादि साधनें आचरती । दानें वृत्तें नाना करिती । परि न पावती या फळा ॥३७॥

तंव अनूसया म्हणे मुनिवर्यां । ही तव तुमची सर्व दया । हीं बाळकें प्राप्त व्हावया । रचिले उपाया तुम्हींच की ॥३८॥

असो नारदा हें भाषण । सांगा कोठोनि केलें आगमन । येरु म्हणे स्वर्गलोकींहून । येथें येऊन पावलों ॥३९॥

तंव अनूसया विनवीत । पुसतें सांगा तोचि वृत्तांत । तिन्ही बाळकें येथें स्वस्थ । कांता विचरत कैशा त्या ॥४०॥

परिसोनि सतीच्या प्रश्नासी । नारद निवेदिता झाला तियेसी । पाताळयात्रा करोनि वेगेसीं । गेलो स्वर्गासी त्वरेनें ॥४१॥

लोकालोक सर्व पाहिले । वैकुंठ सत्य कैलास देखिले । तंव शून्य दिसती सर्व स्थळें । चुकूर जालें मन माझें ॥४२॥

जेवी विगतविधवेचें वदन । कीं रजनी जैसी चंद्रावीण । कीं कुडी जैसी प्राणहीन । तेंवी भुवन तें दिसे ॥४३॥

लोक दिसती हीनकळा । जेवी आमची अंबकुळा । दिसती क्षीण अवकळा । जाल्या विकळा सकळांच्या ॥४४॥

तंव देखिला नंदिकेश्वर । तयाचाही उतरला नूर । त्यासी विचारीला प्रकार । तेणे सविस्तर सांगितला ॥४५॥

रमावर उमावर विधाता । नेणों गेले कवणिया पंथा । त्यांची कोठें न कळे वार्ता । म्हणोनि दुःखिता स्वामिणी ॥४६॥

तया दुःखभरें करोनी । सावित्री रमा उमा वनीं । बैसल्या जावोनि तपाचरणीं । सर्व त्यजोनी उपभोग ॥४७॥

वचन परिसोनि तयाचें । शोधोनि दर्शन घेतलें मातेचें । शुष्क शरीर झालें त्यांचें । नेत्रीं साचे पाहिलें ॥४८॥

तयांसी करोनी नमन । विचारितांचि वर्तमान । उमा करी सत्य निरुपण । तें म्यां श्रवण सर्व केलें ॥४९॥

मग जाणविलें म्यां बहुतापरी । अहो कोण बुद्धि केली तरी । स्वामीसी लावोनिया दुरी । दुःखांतरी पडिलों कीं ॥५०॥

तंव त्या येती काकुलती । कीं आम्हा शोध न लगे निश्चिती । तरी तुंवा जावोनि सत्वर गती । प्राणपती शोधावे ॥५१॥

अत्यंत देखोनि दीन अवस्था । पाहोनि तयांची ग्लानता । दया उपजली मम चित्ता । मग अवश्य तें बोलिलों ॥५२॥

नमस्कारोनि तयांसी । शोधानिमित्त आलों आश्रमासी । तयापरी सुचवीं तुम्हांसी । सावध मानसीं असावें ॥५३॥

रमा सावित्री उमा । आचरती दिव्य व्रतनेमा । पावावया ह्या उत्तमा । करिती सीमा जीवप्राणें ॥५४॥

आहार निद्रेचा केलां त्याग । न आंगिकारिती कांहीं भोग। त्यांसी चिंतेचा लागला रोग । कांहीं उद्योग न सुचें तयां ॥५५॥

अभिमान जालासे गलित । पतिदर्शनातें इच्छित । चातकाऐसी वाट पहात । शोकाकुलीत मानसीं ॥५६॥

तंती प्राण त्यांचे उरले । तें न जाय मज निरोपिलें । ऐसिया नारदाचे बोले । चित्त द्रवलें अनसूयेचें ॥५७॥

तयांची दुःखवार्ता ऐकोनी । सद्गद अश्रु वाहती नयनीं । अहा कर्म कसें ओढवोनी । दोही स्थानीं पावले ॥५८॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । सर्वाधिष्ठ असती थोर । ऐसें असोनी भ्रतार । तया अंतर पडलें कीं ॥५९॥

चरणसेवा रात्रंदिन । करी स्वयें रमा आपण । तयासी अंतराय कम करुन । आला वोढवून पहा कीं ॥६०॥

मम श्वसा सावित्री पतिव्रता । तत्भ्रतार विधिसृष्टिकर्ता । कर्म वोढविलें पाहतां पाहतां । जाला परता कुबुद्धीनें ॥६१॥

केवढी कर्माची विचित्र गती । जी शंकराअंकीं बैसणार पार्वती । ती पतिवियोगें भोगी ग्लांती । दुःख चित्तीं अनिवार ॥६२॥

सृष्टी रचिता हा चतुरानन । सत्यलोकवासी सर्व संपन्न । तो हा कर्मच पेटें जाण । बाळ होवोनि गुंतला ॥६३॥

तेवींच हा वैकुंठींचा राणा । जो अतर्क्य वेदपुराणा । तो कर्मयोगें मम भुवना । त्यजोनि आसना गुंतला ॥६४॥

यापरीच हा महेश । स्मशानवासी जो उदास । कर्मेंचि पावोनि बाळवेष । मग स्थळास गुंतला ॥६५॥

अनिवार कर्माची गती । जीवमात्र सर्व भोगिती । कर्म न सोडी कोणाप्रती । यातायाती कर्मबळे ॥६६॥

नारदा या कर्माचे विधान । पहा तूं नित्य करिसी भ्रमण । ग्रह शशी सूर्य तारांगण । कर्मे स्थिरपण नसे त्या ॥६७॥

कर्मे विष्णूसी अवतार । कर्मे स्मशानवास भोगी शंकर । कूर्म वराह वहाती भार । कर्मे फणीवर धरा वाहे ॥६८॥

कर्मे विधी जाला कुल्लाळ । सहस्त्रभगी जाला अखंडळ । कर्माऐसे फेरे सकळ । ब्रह्मांडगोळ व्यापिला ॥६९॥

मुनी कर्म जैसें करावें । तयापरी तैसेंची भोगावे । पेरिलें तेचि उगवावें । फळ पावे तैसेंची ॥७०॥

कर्मचि लागलें याचे पाठीं । तैसीच भोगिती हे रहाटी । कर्मलेख आमुचे अदृष्टीं । म्हणोनी गोष्टी जाली हे ॥७१॥

असो कर्म केलें तें बरवें । परी दुःख माते हें न ऐकवें । तरी एवढेंचि कृपादान मज द्यावें । पती भेटवावे ज्याचें त्या ॥७२॥

नारद म्हणे धन्य माते । सदयत्वें बोलसी कृपावंते । तंव आज्ञेकरोनि अतौंते । आणितों तिघीतें या ठाया ॥७३॥

तूंतेही होईल दर्शन । परस्परें होईल क्षेमालिंगन । परी कांहीं लीला दाऊन । छेदी अभिमान प्रयुक्तीं ॥७४॥

विनोदें अभिमान हरावा । सन्मानोनी संतोष करावा । कार्यार्थ युक्तीनें साधावा । उपाय योजावा कुशलत्वें ॥७५॥

तूं तंव सर्व कळा जाणसीं । देही अभिमानातें नुरवीसी । एक तत्त्वें सर्व निरखीसी । अद्वय मानसीं तूं माये ॥७६॥

जयातें करिसी कृपें अवलोकन । तो तात्काळची होय सधन । मूर्ख तोचि पंडित जाण । अज्ञाना ज्ञान होय प्राप्ति ॥७७॥

विनवोनिया नारदऋषी । म्हणे मी जातो स्वर्गासी । तेवीच नमोनि अत्रीसी । अतिवेगेंसी निघाला ॥७८॥

हे संवादरुपी प्रेमळ कथा । दत्तची स्वयें झाला मज निवेदिता । तेचि ग्रंथीं लिहूनि आतां । जालों अर्पिता आदरें ॥७९॥

इच्छा होती बहुमानसीं । प्रेमें पूजोनि सज्जनासी । भोजन घालावें संतमहंतांसी । दीनदुर्बळांसी प्रियकर ॥८०॥

हेतू उपजला अत्यंत गहन । परि मी पडलों दरिद्री अकिंचन । जीवीं तळमळ रात्रंदिन । हे दत्तदयाघन जाणतसे ॥८१॥

ती आळ पुरवावयासी । मज पावला तो अविनाशी । प्रेमे करोनि प्रबोधासी । दे साहित्यासी मेळवोनी ॥८२॥

म्हणे अक्षयी होय समाराधन । सकळ वर्णासी मिळे भोजन । तेंचि सुरुची निर्मी पक्वान्न । जेणें प्रसन्न सेवणारे ॥८३॥

या प्रयोजनींचे मुख्य प्रकार । ते द्वितीयांत दाविले प्रखर । वरप्रसादनी विचार । सारासार जाणविला ॥८४॥

येथें कासया पाहिजे अनुमान । सहजची होय संतर्पण । लेखक वाचकालागून । तृप्ती गहन श्रोतीयां ॥८५॥

स्वीकारितां क्षुधा वाढे । तुष्टी पुष्टी अधिक जोडे । अर्थज्ञाचे पुरें कोडें । सुख रोकडें लाभते ॥८६॥

दत्त तोची सद्गुरु अनंत । देखोनि सुताचा भावार्थ । पूर्ण करावया मनोरथ । ग्रंथी वदवीत स्वलीला ॥८७॥

येथें दशसान्निध्यसंवाद । संवादीच प्रगटला आनंद । पुढिले प्रसंगी विरोध । सर्व विषाद हारतील ॥८८॥

समदृष्टी होतील सकळांसी । आलिंगनीं वर्षतील आनंदराशी । सुर मानव देव ऋषी । महोत्सव सकळांसी होईल ॥८९॥

श्रोत्यांसी विनवी अनंतसुत । मज निमित्यासी पुढें करोनी सत्य । ज्याचा ग्रंथ तोचि बोलत । श्रवणीं रत असावें ॥९०॥

ग्रंथी स्थापिती कामना । लाभ दर्शविती नाना । बोलतों न करोनी योजना । जैसी भावना तैसें फळ ॥९१॥

फळ असें वृक्षासी । वृक्षरोपे त्या भूमीसी । भूमीतें संत तेजोराशी । सेविंजे त्यासी सप्रेम जीवनें ॥९२॥

काया वाचा आणि जीवें । संतासी सेवीजे निजभावे । ते कृपा करितांची आघवें । फळ तें पावे सहजची ॥९३॥

म्हणोनी संतचरणीं रत । जीवेंभावें अनंतसुत । अपराधी परी दास म्हणवीत । द्वारी तिष्ठत किंकरसा ॥९४॥

मग तया साधुसज्जना । आली दीनाची करुणा । जाणोनि अंतरींची वासना । करिती कामना पूर्ण माझी ॥९५॥

इति श्रीदत्तप्रबोध ग्रंथ । नारदभृगूचे संमत । श्रोते परिसोत भाविक भक्त । पंचमोध्यायार्थं गोड हा ॥१९६॥

॥ इति पंचमोध्यायः समाप्तः ॥

अध्याय सहावा

॥श्रीगणेशाय नमः ॥ ॐनमो सद्‍गुरुदत्ताय नमः ॥ सद्‍गुरुअनंताय नमः ॥

जयजय चित्घनविलासिया । अविनाशरुपा दत्तात्रया । गुणातीत गुणवर्या । तव पायां प्रणम्य ॥१॥

तूं निर्विकार निरंजन । तूं अखिल ब्रह्मसनातन । व्याप्त अव्याप्ता होवोनि भिन्न । चित्तचैतन्य चालक तूं ॥२॥

मायातीता सर्वव्यापका । त्रिगुणरुपा सुखदायका । भवभ्रांतिताप छेदका । अज्ञाननाशका दयाळा ॥३॥

तूं निर्गुण निराकार । सदय कृपाळू उदार । शरणांगतासाठीं साकार । होवोनि अवतार धरिता तूं ॥४॥

होसी या जीवाचें जीवन । देखोनि त्याची गति अनन्य । भावनेऐसा होऊन । धरिसी सगुण रुप तूं ॥५॥

अर्थाऐसा होसी । मनोरथाते पुरविसी । आवडीचे भातुके देसी । कृपें पाळिसी निजदासा ॥६॥

तुम्ही होवोनि कृपावंत । प्रीती बोधिला अनंतसुत । म्हणोनि हा दत्तप्रबोधग्रंथ । नाम विख्यात चालविसी ॥७॥

तुझिया कृपेचें महिमान । कोण तें करुं शके वर्णन । जीव मूढमति अज्ञान । कैचें ज्ञान तयासी ॥८॥

परि तूं जरी हृदयीं प्रगटसी । आभकरु माथा देसी । रसना बुद्धी चेतविसी । पाटव्य देसी सर्वांगा ॥९॥

तरीच सुरस होईल कीर्तन । श्रवण करतील सज्जन । श्रोतियांचें उल्हासेल मन । कृपा कारण मुख्य तुझी ॥१०॥

पांगुळ गिरी ओलंगति । आंधळे रत्न परीक्षिति । मुके गिरवाण बोलती । कृपें निश्चिती तूंझिया ॥११॥

प्रत्यक्ष सकळ मज जाणती । अज्ञान हीन मलीन मती । बोलता नयेची धड गती । कैचा ग्रंथीं विचार या ॥१२॥

सत्यच मी अनाथ असतां । जाणपणा कांहीं नसतां । सदयत्वें त्वां करीं धरोनि श्रीदत्ता । वर्णविसी कथा तुझा तूंचि ॥१३॥

गतकथाध्यायीं निरुपिलें अंतीं । वंदोनि अत्रि अनसूयासती । नारद पुसोनी स्वर्गा जाती । हे संत श्रोते अवधारिलें ॥१४॥

आतां होऊनि सावधान । ग्रंथश्रवणीं दीजे मन । वंदोनिया श्रोते सज्जन । ग्रंथ निरुपण करीतसे ॥१५॥

नारद स्वर्गाप्रती गेला । जावोनी मातेसी भेटला । वृत्तांत निवेदिता झाला । तोचि परिसिला पाहिजे ॥१६॥

रमा उमा सावित्री वेगेसी । सादर बैसल्या श्रवणासी । नारद करी निरुपणासी । उल्लास मानसीं तिघींच्या ॥१७॥

नारद म्हणे ऐका माते । तुम्हीं पाठविलें आम्हांतें । आज्ञा वंदोनि शिरसा चलातें । जावोनि त्यातें नमियेलें ॥१८॥

उभयतां देखोनि आनंदघन । मीं नम्रत्वें चि करी भाषण । जेणें न दुखवे तयांचें मन । तेंची कारण अवलंबिलें ॥१९॥

ते उभयतां पुण्यराशी । आदरें करिती मग अर्चनासी । विनय होऊनि अमृताऐसी । सप्रेम वचनासी बोलती ॥२०॥

म्हणती बहुत दिवसां मागुता आला । आजवरी कोठें काळ क्रमिला । काय नवलावो देखिला । निवेदी कुशल सकळही ॥२१॥

शांत देखोनि उभयतां । पाताळभुवनींची निवेदी वार्ता । मग म्हणे गेलों स्वर्गपंथा । पदें विलोकितां पै जालो ॥२२॥

तंव अनसूया म्हणे मुनी । स्वर्गवार्ता सांग मजलागुनी । कवण कैसे वर्तती कवणे स्थानीं । सांगे निवडुनी ऋषिवर्या ॥२३॥

तिचा देखोनि प्रश्नादर । मीं निरुपणी झालों सादर । निवडोनिया सारासार । कथितों साग्र ऐकाते ॥२४॥

इंद्रपद अमरावती । तेथें रत्नखचित मंदिरें असतीं । सकळ देवलोकींची वस्ती । पान करिती अमृत ॥२५॥

तेथें वसती देवांगना । तिलोत्तमादि अप्सरा नाना । स्वरुपें लावण्यचतुर सुजाणा । विमानें वाहनें सकळांसी ॥२६॥

मुख्य अधिपती सहस्त्रनयन । राणी इंद्रायणी शोभायमान । सेवे तिष्ठती बंदीजन । भाट गुण वाखाणिती ॥२७॥

मणीमय सभा विराजित । इंद्र सिंहासनीं मिरवत । छत्र चामरें लखलखीत पुढें नाचत अप्सरा ॥२८॥

सव्य सिंहासनावरुती । देवगुरु तो बृहस्पती । गणगंधर्व सभे असती । किन्नर गाती अप्सरा ॥२९॥

तेथे चौंदंती शुभ्र ऐरावत । वनें उपवनें विख्यात । नंदनवन अत्याद्भुत । सदा वसंत वास करी ॥३०॥

नळ कुबेर यक्ष । आपुलाले काजीं दक्ष । इंद्रपदीं ठेवूंनि लक्ष । आज्ञा दक्ष राहती ॥३१॥

मंगल तुरांचा गजर । रात्रंदिन होतो अपार । परमानंद मोहोत्सव थोर । अजरामर नांदती ॥३२॥

प्रांची हें इंद्राचें स्थान । अग्नि वास्तव्व अन्गिकोन । दक्षिण दिशेस यमस्थान । शोभायमान तेही असे ॥३३॥

महा विशाळ ती यमपुरी । ती पातकीं लोकांची दंडदरी । नर्ककूप बहुतापरी । जीव अघोरीं टाकिती ॥३४॥

कुंभीपाक असिपत्र । तप्त स्तंभ नग्नशस्त्र । सांडस घाणा काग विचित्र । दंड स्वतंत्र यमकरीं ॥३५॥

जे अविवेकी पातकी दुर्जन । असत्यवादी कुटिल मलीन । जारकर्मी हिंसक पूर्ण । तयासी पतन ते ठायीं ॥३६॥

मात्रागमनी सुरापानीं । भक्षाभक्ष भोजनीं । नाना हत्यारीं दूषणीं । पडे पतनीं ते ठायीं ॥३७॥

पीडक दाहक वाटपाडे । कुबुद्धी जे कुडे पावडे । निंदक कपटी विघडे । तोचि पडे ते ठायीं ॥३८॥

ऐसा तो यमधर्मराज । न्यायनीति करी नेमिलें काज । परि या जीवासी नाहीं लाज । आपुलें गुज नोळखती ॥३९॥

दोष नाहीं यमपदा । जीवची आचरती अपराधा । कर्मे करोनि पावती बाधा । होतो चेंदा दंडयोगें ॥४०॥

यम आपुले स्वस्थानीं । नांदतो माते आनंदभुवनीं । जे रहाणार नैऋत्यकोनीं । ते सुखें सदनीं नांदती ॥४१॥

प्रतीच्यदिशे तो वरुण । सभाग्य सुशील नांदे पूर्ण । वायव्यकोनीं वायू दारुण । प्रभंजन तो नांदे ॥४२॥

उत्तरे वसती सोम । तेही कल्याण क्षेम । ईशान्य सर्वांत उत्तम । उरला क्रम सांगतों ॥४३॥

सत्य वैकुंठ कैलास । हे तो सर्वांहून विशेष । येथील रचनुका सुरस । तेही तुम्हांस निवेदितों ॥४४॥

हिरे स्फटिक पुष्कर । रजत कोणी धवलागर । परम रमणीय शिखर । अति सुंदर पताका ॥४५॥

शुभ्र आंगण काचबंदी । ऐरावतातुल्य शुभ्र नंदी । तेथें आधी आणि व्याधी । कांहीं उपाधी नसेची ॥४६॥

शुभ्र सिंहासनीं कर्पूरगौर । शुभ्र अंगीं जडिले फणिवर । शुभ्र भस्म चर्चीत सुंदर । दिगांबर बैसला ॥४७॥

रुंडमाळा रुद्राक्ष धारण । शंख डमरुचें वादन । शृंगी पुंगी नादपूर्ण । व्याघ्रासन बैसावया ॥४८॥

त्रिशूल पाशुपत कपोल । करीं व्याळ कर्णीं देती डोल । जटाजुटीं गंगा निर्मळ । चंद्र शीतळ भाळीं तो ॥४९॥

दशभुज पंचवदन । गजांबराचें प्रावर्ण । हिमनगजा वामांकीं धारण । शोभायमान लावण्य तें ॥५०॥

धगधगींत तृतीय नेत्रीं ज्वाला । सभोंवतीं भुतांचा मेळा । साठीं सहस्त्र गणमेळा । कैलास ढवळा घवघवीत ॥५१॥

गणपति षडानन वीरभद्र । हे शिवाचे मुख्य कुमर । कात्यायनीच्या-मुंडाचे भार । जोडिती कर उमेसी ॥५२॥

अष्ट भैरंव पुढें नाचती । ध्वज त्रिशुळेसी मिरवती । ऐसे या संभारें उमापती । राज्य करती कैलासीं ॥५३॥

कैलासाभोंवतीं वनें । अमृतफळाचीं दाट सघणें । नाना वनस्पति बिल्वसुमनें । उदकस्थानें अनुपम्य ॥५४॥

देव अमर दानव । ऋषि तुंबरगण गंधर्व । यक्ष चारणादि सर्व । नित्य नेम दर्शना येती ॥५५॥

सकळ जयजयकारें गर्जती । कोणी स्तविती कोणी ध्याती । कोणी गायनें तोषविती । पुष्पें वर्षिती सुरवर ॥५६॥

दिव्य सुंदर हें कैलासभुवन । येथें शिवगौरी वसती आपण । आतां सत्यलोकीचें निरोपण । तेंही सावधान परिसावें ॥५७॥

काय म्हणोनि म्हणती सत्यलोक । असत्य क्रिया नाहींच देख । सत्य भाषण कर्म चोख । आचार पाक वर्तती ॥५८॥

म्हणोनि सत्यलोक त्यातें म्हणती । तेथें चतुरानन । अधिपति । वेदरुप ब्रह्म जाणति । सावित्री सती अंगना ॥५९॥

प्रजा उत्पत्तीस कारण । मुख्यत्वें हा चतुरानन । हे ब्रह्मांडरचना संपूर्ण । कर्ता जाण तो एक ॥६०॥

तया सत्यलोक परी । रचनाजडीत मणीमयपुरीं । रत्नकोंदणीं नाना परी । पाच धवलारी नीलबंद ॥६१॥

जडित मणिकाच्या चवऱ्या झळकती । कनक कळस झल्लाळती । चित्रें रेखिलीं नानाकृती । पताका तळपती अपार ॥६२॥

होती वाद्यांचे घोष । उद्यानें शोभलीं विशेष । घमघमीत उठती सुवास । आसपास कोंदाटे ॥६३॥

अमृतकुंडें भरलीं अपार । कामधेनु स्त्रवती निरंतर । दुःख आणि दारिद्रय । नसे अणुमात्र ते ठायीं ॥६४॥

रंभा उर्वशी येती । नृत्यकला नाना दाविती । भाट बंदीजन गाती । यश वर्णिती विधातियाचें ॥६५॥

आतां वैकुंठीचें वर्णन । जें अनुपम्य सर्वांहून । पाहतां तेथींचें तेज गहन । वर्णिता मौन वेद श्रुति ॥६६॥

परि कांहीं तये वेळे । पाहिजे तूंतें निवेदिलें । यदर्थीं त्वाही श्रवण दिले । पाहिजे भले श्रवणार्थी ॥६७॥

शुद्ध तगटवर्ण अंगण । माजी पांच हिरे नीलजडित कोंदण । पुष्करस्तंभ विराज गहन । उथाले पूर्ण हरियाची ॥६८॥

माणिकांचीं तुळवटें । पाच दांडे अत्यंत चोखटे । कीलचा जडल्या तेज गोमटे । रत्नीं बरवंटे झल्लाळ ॥६९॥

शुद्ध हिरियाच्या भिंती । वरी चित्रें जडित विराजती । पाच लताफळें डोलती । पक्षी बोलती चित्रींचे ॥७०॥

अति विशाल तीं दालनें । मदलसा शोभती विराजमाने । ऊंच गोपुरें सतेजपणें । सप्तावर्णें वेष्टित ॥७१॥

चिंतामणीचीं धवलारे । कामधेनूचीं खिल्लारें । वनें कल्पतरुचीं अपारें । शोभतीं साजिरें मनोरम ॥७२॥

कोटी विद्युल्लता झळकती । ऐसे ध्वज तेथें तळपती । कोटी सूर्याचे अंशुमाले लोपती । अधिक दीप्ती तेथींची ॥७३॥

मुख्य प्रभूचें वास्तव्यस्थान । तेथें हेममय सभासिंहासन । नाना रत्नीं जडीत सधन । विराजमान सहस्त्र दलें ॥७४॥

वरीं शोभें श्यामसुंदर मनोहर । रमा चरणसेवेसीं सादर । मस्तकीं शोभे फणीवर । छत्रें अपार विराजती ॥७५॥

जय विजय द्वारपाळ । उभें तिष्ठती जोडोनि कमळ । येती दर्शना लोकपाळ । दुरोनी सकळ तिष्ठती ॥७६॥

हरिवेष्टित वैष्णव वीर । गायन करिती विद्याधर । सनक सनंदन सनत्कुमार । नारद तुंबर यश गाती ॥७७॥

मूर्तिमंत वेदश्रुती । पवाडे हरीचे गर्जती । शास्त्रें कुंठित राहती । पुराणें करिती भाटीव ॥७८॥

तेथील चतुर्भुज अवघे नर । नारी पद्मिणी नागर । हरिभजनीं सदा तत्पर । जयजयकार करिताती ॥७९॥

सिद्धी रिद्धी बुद्धि कामारी । सेवें तिष्ठती महाद्वारीं । धनकोश अगणित भांडारीं । मुक्ती चारी वोळंगती ॥८०॥

दश वाद्यांचें गजर । दहस्थानीं होती निरंतर । एकादशाचा विचार । तो घोष थोर वेगळा ॥८१॥

तेची न पवेची इतरा स्थान । चतुर पविती सुजाण । भोळे भाविक अनन्य । तेची लीन ते ठाईं ॥८२॥

तेथें क्षुधा तृषा आणि आळस । अणुमात्र नाहीं तया वास । नाहींच तेथें द्वंद्व दोष । आशापाशरहित ते ॥८३॥

ज्ञान विज्ञान अज्ञान । तिहीं रहीत वेगळें लक्षण । रज तम सत्त्व जाण । त्याहूनि भिन्न तें स्थळ ॥८४॥

कैचे पांच कैचे पंचवीस । कैचे तीस कैचे पस्तीस । विरोनि गेले छत्तीस । ते तो अविनाश वेगळेची ॥८५॥

पांच पांच दहा । आणिकही पृथक दहा । इतुक्यांचाही समुदाहा । तो एक पहा एकत्वें ॥८६॥

एकापासोनि अनेक झाले । अनेक एकींच ते संपले । अनंत गुणे व्यापिले । पूर्ण दाटले पूर्णत्वें ॥८७॥

या अनंतब्रह्मांडीचें वैभव । तो हा वैकुंठीं रमाधव । नाना चरित्रें लाघव । अति अपूर्व तयाचीं ॥८८॥

स्वर्ग मृत्यु पाताळ । इत्यादिकांचें हाचि मूळ । नाना विचित्र कौतुक खेळ । दाविता प्रबळ हाचि पैं ॥८९॥

वैकुंठ सत्य कैलास । तिन्ही समसाम्य असती कळस । नित्य दर्शनीं उल्हास । होतो आम्हांस अनसूये ॥९०॥

परी प्रस्तुत गेलों दर्शना । तों उदास देखिलें तया स्थाना । कैलासीं केली विचारणा । शून्य स्थाना पाहोनी ॥९१॥

तव वदे नंदिकेश्वर । बहुत दिवस गेला ईश्वर । शोध न लागेच निर्धार । चिंतातुर जगदंबा ॥९२॥

ऐसिया परिकथोनि युक्ति । तोषविली अनसूयासतीं । तंव ती पुसे मागुती । आले कीं नसती ईश्वर ॥९३॥

ऐकोनि अनसूयेच्या प्रश्नासी । विचार केला निजमानसीं । जेणें कार्य साधे निश्चयेसी । दया सतीसी उपजे ॥९४॥

ऐशा युक्तीचें निरोपण । लाघवयुक्त केलें भाषण । जितकें कृत्य झालें पूर्ण । तें म्यां कथन पैं केलें ॥९५॥

म्यां तुम्हातें शासिलें । म्हणे जें का दुःख भोगिलें । शोध करावया मज धाडिलें । ग्लांति गाइलें सदयार्थ ॥९६॥

करुणावचन ऐकोनिया । कृपें द्रवली अनसूया । तात्काळ बाळे आणोनिया । ठेविली ठाया मजपुढें ॥९७॥

मग मी पाहें बाळकांसी । आश्चर्य करिता झालों मानसीं । परि न येति ओळखिसी । आणि अनसूयेसि जावळे ॥९८॥

म्हणे धन्य धन्य तुमची कुशी । हीं बाळें झालीं तेजोराशी । ऐकोनि हास्य आलें अनसूयेसी । म्हणे नारदा तुम्हांसि काय झालें ॥९९॥

माते म्यां तों चिन्ह ओळखिलें । परी तिजमुखीं पाहिजे वदविलें । यदर्थीं तंये वेळें । भाव बोले वेगळा ॥१००॥

मग अनसूया बोले वचन । ज्यांचें आपण केलें कथन । तेचि हे बाळ ठेविले करोन । ऐका कारण सांगतें ॥१॥

तिघेही विप्रवेषा धरिती । येऊनि नग्नदान मातें मागती । मंदिरीं आणोनि तयांप्रति । तयां निगुतीं पुसिलें ॥२॥

ते म्हणती कीर्ती ऐकोन । आलो माते धावत दुरोन । क्षुधानळें पीडलों जाण । करवीं भोजन इच्छित ॥३॥

आंगवण द्यावया नसतां । नकार वचनें तरी बोलेन आतां । करोनिया सत्वघाता । आणिका पंथा पैं जाऊं ॥४॥

जैं अत्री नसतां मंदिरीं । मज गांठिलें एकांत अवसरीं । विपरीत देखोनि झडकरी । पादोदक करीं घेतलें ॥५॥

अन्य मार्गातें नातळता । भोजनार्थ दया उपजली चित्ता । जीवीं आठवोनि प्राणनाथा । तीर्थ माथां सिंचिलें ॥६॥

तीं बाळकें झालीं तात्काळ । क्षुधेनें करिती हळकल्लोळ । मग नग्न भिक्षा उतावेळ । देवोनि शीतळ पैं केलें ॥७॥

न्हाणोनि घातलें पालखी । पहुडते झाले यथासुखीं । कुरळ सावरोनि विलोकीं । मुख मृगांकी वेळोवेळां ॥८॥

तंव स्वामी येतां आश्रमासी । निवेदिलें वृत्त पायांपासीं । मग ते जावोनि पालखापासीं । ओळखोनि मजसी सांगती ॥९॥

हे स्वर्गींचे मुख्याधिपती । दैवयोगें आले हातीं । रक्षी जागोनि दिनरातीं । परम प्रीतीं पाळावे ॥११०॥

नारदा हे तुम्हांसी । कैसे न आले ओळखीसी । असो त्यांचिया कांतेसी । सांगा वेगेंसी जाऊन ॥११॥

सामर्थ्य असेल तयां अंगीं । तरी दिव्य करोनि नेतील वेगीं । तुम्ही ग्लांति निवेदिली प्रसंगीं । कीं त्या कुरंगी विव्हळ ॥१२॥

तो ऐकोनि जिव्हाळा । मज अत्यंत उपजला कळवळा । तरी जावोनि याच वेळा । निवेदी सकळां वृत्त ऐसें ॥१३॥

ऐसें निघतांचि अभयदान । प्रेमें अनसूयेस केलें वंदन । निघता झालों आज्ञा घेऊन । मागुती वचन बोले सती ॥१४॥

तिघीजणींसी हें कळवावें । येत असतां धाडोनि द्यावें । आपुलाले ओळखून घ्यावे । हेंही स्वभावें निरोपी ॥१५॥

अवश्य म्हणोनि येथें आलों । तुम्हांलागीं निवेदिता झालों । अनसूये कवेंतूनि वांचलों । म्हणोनि भेटलों तयांसी ॥१६॥

तुमचे सत्य तेथें पती । ते बाळरुपें असती । आतां आपण त्वरितगती । सिंहाचळपर्वतीं जाईजे ॥१७॥

ऐकोनि नारदाचें वचन । तिघी झाल्या आनंदघन । परि जावयालागून । भयाभीत मन होतसे ॥१८॥

कवणियायोगें कैसें जावें । काय तियेतें म्हणावें । कोण कर्तृत्व दावावें । पति आणावे कवणे रीतीं ॥१९॥

नारद म्हणे काय पुसतां । म्यां तव आणिली शुद्धिवार्ता । वागेल तुमचिया चित्ता । तैसें आतां करावें ॥१२०॥

जैसी तुम्हां असेल अंगवण । तैसेंच करा पुढील कारण । अनसूयेचें महिमान । तुम्हां श्रवण झालें कीं ॥२१॥

तृप्त तुमचे श्रवण झाले । परि नेत्र असती भुकेले । यातें स्थळ पाहिजे दाविलें । आणि ती बोले अनसूया ॥२२॥

आतां न लावा जी उशीर । पति जावोनि आणावे सत्वर । त्यांसी झाले दिवस फार । मिथ्या विचार न करावा ॥२३॥

या परी नारदें सांगोन । वंदिले मातेचे चरण । आज्ञा द्या म्हणे मजलागोन । करी भ्रमण स्वइच्छें ॥२४॥

तिघी म्लानवदनें बोलती । नारदा हे कोण तुझी रीती । आम्हांसवें घेवोनि त्वरित गती । सिंहाचळाप्रती चलावें ॥२५॥

मध्यंतरीं सोडोनि देणें । हीं काय उत्तमाचीं लक्षणें । पैलतीरा नौका लावणें । तारुपणें तो धन्य ॥२६॥

नारदा तूं धन्वंतरी । दुरी केलीसे चिंतालहरी । रसायन घालोनि कर्णरंध्रीं । सजीव निर्धारीं । आम्हां केळें ॥२७॥

संकटकाळींचा सारथी । नारदा होसी आम्हां प्रती । नको टाकूं गा मध्यपंथीं । काकुलती आलों कीं ॥२८॥

ऐकोनिया मातेचिया बोला । नारद म्हणे बरें चला । सेवोनिया शेषाचला । तया आश्रमाला दावीन ॥२९॥

असो सवें घेऊनि तिघींसी । नारद चालिला वेगेंसी । दुरोनि दावी सिंहाचलासी । म्हणे आश्रमासी पाहा बरें ॥१३०॥

पैल दिसती शिखरें । अत्यंत वृक्षीं निबिड मनोहरें । त्यांत दक्षिणेचें विलाकोनि बरें । माते संचरे त्यामार्जी ॥३१॥

तंव त्या तिघी संवादती । नारदा आम्हांसी वाटती भीती । तुवां सवें येवोनि निश्चिती । करवी प्रीती तिज आम्हां ॥३२॥

नारद म्हणे मजलागून । यावया तेथें नाहीं कारण । आतां त्वरें जाइजे आपण । घेइजे दर्शन अनसूयेचें ॥३३॥

मी गुप्त राहोनि येथें । विलोकीन जावें तुम्हांतें । प्रसन्न करोनि अनसूयेतें । साधा कार्यातें आपुल्या ॥३४॥

ऐकोनि नारदाच्या उत्तरा । तिघी पडल्या तेव्हां विचारा । कोण युक्ति योजावी सुंदरा । प्राणेश्वरा आणावया ॥३५॥

सावित्री म्हणे ऐका बाई । आपण जावोनि तये ठाईं । वस्तु मागूं लवलाही । भय काय तियेचें ॥३६॥

आपुलें आपण मागूं घेतां । केवीं अनसूया करील सत्ता । धरोनी मनीं निर्भयता । चला आतां लवकरी ॥३७॥

तंव अंबा बोले वचन । बरवे निवेदिलें शहाणपण । उद्धटपणें मागतां पूर्ण । कोपायमान होईल कीं ॥३८॥

तिचे मनीं रोश येतां । पतिऐसी भोगवील व्यथा । मागुतीं जावया स्वपदपंथा । ठाव उरता दिसेना ॥३९॥

रमा म्हणे हें तो खरें । तरी काय जावें माघारें । कार्य न साधतां पाहावीं घरें । हें तो बरें दिसेना ॥१४०॥

कांहीं सबळ योजावी युक्ती । जेणें प्राप्त होतील पती । तरीच सार्थक निश्चिती । यश कीर्ति जोडितां ॥४१॥

सावित्री म्हणे वृथाची कल्पना । आपुले ठाईं करितां नाना । आपुला अधिकार आपणा । नये ध्यानां अद्यापी ॥४२॥

पैल अत्री आपुला कुमर । अनसूया प्रत्यक्ष स्नुषा सुंदर । आपणां श्वसेचा अधिकार । कासया विचार या कार्जीं ॥४३॥

आपुली आज्ञा प्रमाण त्यांसी । सत्ता करुं पाहिजे ऐसी । चला गे आणूं भ्रतारांसी । वृथाचि तिशीं काय भीतां ॥४४॥

ऐकोनि अपर्णा गद्गदा हासे । सावित्री तूतें लागलें पिसें । विचार काढोनि भलतेसे । बोल कैसे बोलसि ॥४५॥

जैं नारदें केलें वर्णन । विशेष स्थापिलें अनसूयेलागून । इतर लेखिल्या सर्व हीन । वाटला शीण कां तेव्हां ॥४६॥

तैं अनसूया स्नुषाच होती । हर्ष व्हावा ऐकोनि कीर्ती । तेथें आपणा उपजला क्रोध चित्तीं । सत्त्वघातीं प्रवर्तलों ॥४७॥

आपण केवढें विरुद्ध केलें । व्रतनाशना कपट रचिलें । पती बोधोनि धाडिलें । व्यसनीं पाडिले आपण कीं ॥४८॥

ते लडिवाळ मानतों आपण । तरी कां लागतें एवढे दूषण । अपराधावरी शिरजोरपण । कोण लक्षण म्हणावें हें ॥४९॥

श्रेष्ठपण येथें ठरलें नाहीं । करुं नका भलतेंचि कांहीं । पति ऐसे अपाईं । गुंताल बाई यायोगें ॥१५०॥

रमा म्हणे होसी कुशळ । उमे तुझे हे सत्यबोल । ही रजोगुणाची कोकिळ । काढी कळ अधिकची ॥५१॥

तुझी चातुर्यगति विशेष । बोलसी तरी अमृतरस । ऐकतां आनंदे मम मानस । अती उल्लास जीवातें ॥५२॥

तरी हिमनगकन्यके हरप्रिये । प्रौढ युक्ती काढी सये । जेंणें पतिप्राप्ती होय । अनसूया सदये देईल ॥५३॥

गुंती न पडे आपणासी । पावूं जेणें पतिचरणांसी । आनंदें जाऊं स्वपदासीं । चतुर गतीसी योजी ऐसें ॥५४॥

तंव शिवांका सनवासिनी । बोलती झाली ते भवानी । बाई विधी निर्माण झाला जेथूनी । त्या मूळस्थानीं पुसावें ॥५५॥

रमा म्हणे उत्तम । आपुला मुग्धची असों द्या भ्रम । जेथोनि प्रगटला उत्तम । त्या बुद्धीक्रम साधावा ॥५६॥

आतां अभिमानातें सांडावें । अनन्य नारदासी स्तवावें । तरीच कार्य साधेल बरवें । येऱ्हवीं नागवे आपणातें ॥५७॥

हें नारद ऐकोनि वचन । म्हणे होऊं पाहती मर्यादा उल्लंघन । मातेहातीं करवितां स्तनपान । पावे पतन पुत्र कीं ॥५८॥

मग आपणचि पुढतीं जाला । म्हणे कां हो अद्यापि वेळ लाविला । कोणता तुम्हां विचार पडिला । तोचि मजला निवेदा ॥५९॥

अपर्णा म्हणे सर्व जाणसी । खेळ खेळोनि वेगळा राहसी । पुरे लीला साधवी कार्यासी । युक्ति वेगेसीं सांगोनी ॥१६०॥

नारद म्हणे गेले पती । तुम्हीं जावें तेचि पंथीं । यावीण दुसरी युक्ती । येथें कल्पांती साधेना ॥६१॥

ठगेंच धरोनिया दीनपण । जावें तेथें मौंन धरोन । प्रथम न करा भाषण । करा अवलोकन अनसूया ॥६२॥

ती तुम्हाते पाहतां नयनीं । कैसी आचरेल पहा रहणी । जैं म्हणेल कोण इच्छा मनीं । ते मजलागूनी सांगिजे ॥६३॥

तैं बोलावें तुम्ही उतर । दे आमुचे आम्हांसी भ्रतार । सर्व पावले यांत सत्कार । होसी उदार तूं देवी ॥६४॥

पुढें चमत्कार काय होती । तेही तुमचे दृष्टीस येती । लाभ होईल बरवे रीतीं । प्रगटेन पुढतीं मी तेथें ॥६५॥

आतां आपण करोनि त्वरा । जावें अनसूयेचिया मंदिरा । अवश्य म्हणोनि त्या सुंदरा । वेष दुसरा धरियेला ॥६६॥

दीनवेष धरोनि ब्राह्मणी । गेल्या तेव्हां अत्रीसदनीं । अनसूया सनिद्ध लक्षूनी । उभ्या जावोनी ठाकल्या ॥६७॥

देखोनिया सुवासनींसी । अनसूया धावोनि लागे चरणांसी । येरी देती आशीर्वादासी । अखंड सौभाग्यासी भोगी तूं ॥६८॥

येरी पूजाद्रव्यातें आणून । परम आदरें केलें पूजन । प्रार्थोनि बोले मधुर वचन । येणें कोठोन तुमचें ॥६९॥

काय इच्छा धरोनि मानसीं । श्रमोंनि आलेंति या ठायासीं । कांहीं आज्ञा करा वेगेसी । सेवेसी दासी उभी असें ॥१७०॥

धन्य आमुचा भाग्योदय । तुमचे देखिले आम्हीं पाय । दर्शनेंचि निवटले अपाय । सेवे काय सादरुं ॥७१॥

कोण पुण्य फळासि आलें । तेणेंचि देखिलीं पाउलें । पाहिजे कांहीं आज्ञापिलें । कैंवी उगलें राहतां ॥७२॥

तुम्ही केवळ जगदंबा ईश्वरी । सुप्रसन्न कृपा केली आम्हांवरी । आमुच्या भाग्या झाली उजरी । दर्शनें अंतरीं निवविलें ॥७३॥

म्हणोनि विनविते कर जोडून । आम्हां अनाथा करा पावन । वेगीं सांडोनिया मौन । आज्ञापून सेवा घ्यावी ॥७४॥

ऐकोनि बोलाची मधुरता । परीक्षोनि शब्दाची चतुरता । सेवाभाव ओळखोनि पुरता । म्हणे हे पतिव्रता सत्य ॥७५॥

सत्यचि नारदें कथिलें । त्याहूनि येथें असे आगळें । व्यर्थचि अभिमान आम्हीं केले । शेवटा गेले नाहीं कीं ॥७६॥

नम्रता सर्वांहुनी थोर । सकळ शास्त्राहुनी अधिक मार । त्याची योग्यता सर्वांवर । मोही अंतर सकळांचें ॥७७॥

असो आतां येच वेळीं । मागोनि घ्यावें हतोफळी । तिघी वदती झाल्या तात्काळीं । धन्य वेल्हाळी अनसूया तूं ॥७८॥

तुझा सेवाआदर पाहोन । आनंदयुक्त झालें आमुचें मन । तूं मागसी सेवादान । तरी वचन ऐक आतां ॥७९॥

आमुचे जे प्राणपती । ते तुझे आश्रमीं असती । तेचि देवोनि सत्वरगती । स्वपदाप्रती लाविजे ॥१८०॥

हें ऐकतांचि मानसीं । कळलें तेव्हां अनसूयेसी । मी बोललें होतें नारदासी । त्वरें तिघींसी पाठवावें ॥८१॥

त्याची ह्या तिघीजणी । या तिघांच्या सत्य कामिनी । आपुल्या स्वसा श्रेष्ठ मानी । आल्या धांवोनि निजकार्या ॥८२॥

मग जोडोनि दोन्ही कर । भाळ ठेविला पायांवर । म्हणे स्वरुप प्रगटवावें सत्वर । लीला चमत्कार कासया ॥८३॥

ओळखिलें हें जाणोन । स्वरुप प्रगट करिती आपण । तंव अत्रीनें ध्यान विसर्जून । उघडोनि नयन पहातसे ॥८४॥

आसनातें परतें सांडिलें । सप्रेमें तिघींसी वंदिलें । आनंद आलिंगनीं मिसळे । गहींवर दाटले अनिवार ॥८५॥

ढळढळं अश्रू वाहती । बोलावया शब्द न फुटती । नारद देखोनि विव्हळ गती । त्वरें पावती येवोनी ॥८६॥

अत्रि आणि नारद । भेटतां झाला आनंद । निवारिले भेदाभेद । नारद खेद शांतवी ॥८७॥

मुनि म्हणे अनसूयेसी । आमुच्या माता आल्या तव आश्रमासी । तरी तोषवावें यांसी । इच्छा मानसीं ते पुरवा ॥८८॥

अत्री म्हणे जाय आतां । भेटवी आणोनि यांच्या कांता । वचन वदोनि पतिव्रता । क्षण न लगतां आणिले ॥८९॥

तिघेही स्वर्गींचे सकुमार । पुढें आणोनि ठेविले सत्वर । तो पाहावया चमत्कार । विमानीं सुरवर दाटले ॥१९०॥

विमानीं कुसुमें भरोनी । अमरेंद्र पाहे विलोकोनी । हे स्वर्गाधिपती मुक्त होवोनी । येतां सघन वृष्टी करुं ॥९१॥

यक्ष किन्नर गण गंधर्व । तेही पाहूं पातले अपूर्व । अप्सरा देवांगना सर्व । म्हणती पर्व धन्य आजी ॥९२॥

आपुलाले वहनीं सायुध सिद्ध । म्हणती गाऊं प्रसंगीं गीतप्रबंध । ऋषीमंडळी द्यावया आशीर्वाद । हृदयीं आल्हाद सकळांसी ॥९३॥

असो इकडे तिन्ही बाळक । पुढें ठेवुनी अनसूया पाहे कौतुक । उमा रमा सावित्री टकमक । पाहती मुख तयांचें ॥९४॥

पाहती बरवें निरखून । परी ओळखीस न ये कोणालागून । दिसतें ठकावयाचें चिन्ह । न करी स्पर्श कोण्ही तयां ॥९५॥

उमा म्हणे सावित्रीसी । तुझा तूं उचली वेगेसीं । येरी म्हणे एकसरसी । रुपें मजसी दिसती ॥९६॥

रमा वदे अहो पार्वती । तूं आपुलाचि रमण धरीं हातीं । तंव ती म्हणे मजप्रती । खूण निश्चिती बाणेना ॥९७॥

पार्वती आम्हा न कळे । तिघेही दिसती जावळे । तुझा तूं तरी घेई ये वेळें । उगेचि डोळे न मोडी ॥९८॥

सभोंवते पाहती ऋषिभार । गद्गदा हासति ऐकोनि उत्तर । अनसूया मुखा लावोनिया पदर । विलोकी दूर राहोनी ॥९९॥

कित्येक विस्मय करिती चित्तीं । कितीएक बोलोनियां दाविती । अहो ज्यांचे तयांप्रती । ओळखों न येती आश्चर्य ॥२००॥

एक म्हणती झाले बहु दिवस । म्हणोनि अंतर पडिलें ओळखीस । एक म्हणती बाळकांस । पाहोनि भ्रांतीस पडियेल्या ॥१॥

तंव बोलतसे नारद । पुरे आतां झाला विनोद । जी माते होऊनि सावध । पाहोनि भेद उचलावे ॥२॥

तंव उमा बोले धीट होऊन । यांनीं हा वेष धरिला पूर्ण । कैसे घ्यावे ओळखून । देईंल उचलून अनसूया ॥३॥

अत्री वदे कांतेतें । जाय ओळखोनि देई त्यातें । जगाऐसें विनोदातें । न करी नातें तें नाहीं ॥४॥

मग अनसूया येवोनि पुढें । म्हणे ओळखा निवाडे । काय आपुले आपणा न कळती जोडे । जगीं वेडे कां होतां ॥५॥

सावित्री बोले तूं सुजाण । देई आमुचे आम्हांस उचलोंन । न पाहे आमुचें शाहाणपण तोषवी मन आमुचे ॥६॥

अनसूयेनें तये वेळे । न्याहाळूनि उचललीं बाळें । ज्याचें त्यासी वोपिलें । अंकीं घेतलें तयांसी ॥७॥

तीं बहुवेळ होतीं क्षुधित । अंकीं देतां शोक करीत । पयोधरीं हस्त घालित । नेत्रीं वाहत जळधारा ॥८॥

तंव त्या चळचळा अंग चोरिती । म्हणती जनांत कां मांडिली फजीती । सकळ गद्‌गदा हासती । विपरीत गती देखोनी ॥९॥

जंव जंव तोडिती तीं मुलें । तंव तंव हांसती जन लोकपाळे । नारदातें हास्य दाटलें । उठोनि पळे वेगळा ॥२१०॥

जंव जंव लोक पाहोनी हासती । तंव त्या अधोवदन सलज्ज होती । मरणप्राय झाली गती । कदा पाहती कोणीकडे ॥११॥

तंव नारद मनीं करी विचार । होईल गती हे अनिवार । माता होतां क्रोधातुर । मग तो आवर न घडे कीं ॥१२॥

मग हास्य सांठवोनि पोटीं । आला सन्निध उठाउठीं । म्हणे शांतवा मराळे हाटीं । सांगोनि गोष्टी रसाळ ॥१३॥

उमा म्हणे देतां आम्हांसी । टाही कां भरले विशेषीं । नारद म्हणे बहुतां दिवशीं । भेटी तुम्हांसी म्हणोनिया ॥१४॥

मागुतीं विनवी जोडोनी कर । बाळे झालीं तीं क्षुधातुर । मग अनसूयेसि पाचारोनि सत्वर । तृप्त सकुमार पैं केलें ॥१५॥

मातेसि बोले नारदमुनी । तुमचे तुम्हा पावले धनी । त्वरें चला आतां पुसोनी । आपुले स्वस्थानीं जाऊं आतां ॥१६॥

उमा बोले प्रत्युत्तर । नारद हे सान सकुमार । यांचा तृप्तीचा विचार । वृद्धिप्रकार कैसा तो ॥१७॥

आमुचा अधिकार कैसा जाण । कैंवि तें करावें कैसें पालन । अलंकार पालखादी भूषण । करितां दूषण लागतें ॥१८॥

नारद विनवी तिघींसीं । श्रेष्ठत्व अधिकार विशेष तुम्हांसी । तुम्ही पतिव्रता तपोराशी । तुम्ही सकळांसी वंद्य कीं ॥१९॥

ही सृष्टी उभारिली तुमच्या कृपें । जीवजंतू तुम्हांपासोनि रुपें । दग्ध होती तुमच्या कोपें । सदयरो पें उगवती ॥२२०॥

अद्‌भुत तुमचें महिमान । वर्णूं शकेल तरी कोण । शेषकवी पावले शीण । अबाधित गुण तुमचे ॥२१॥

अधिकार पाहतां अवघे । उत्पति स्थिति प्रळय बरवे । हे तुमचेच सर्व वैभवें । कोण्हा न करवे तुमची सरी ॥२२॥

ऐसी असतां हतवटी । कासया पडावें संकटीं । पतिदिव्य करोनि उठाउठी । आपुले पटीं जाइजे ॥२३॥

एकोनि नारदाचें भाषण । उत्तर द्यावया नसे आंगवण । सलज्ज पाहती अधोवदन । मौन वचन बोलती ॥२४॥

तंव झाल्या घटीका चार । कोणी न देती उत्तर । नारदें ओळखिलें अंतर । नसे अधिकार या काजीं ॥२५॥

मग गुज सांगे तयांचे कानीं । तुम्हीं प्रार्था स्नुषेलागोनि । तिशी दया जरी उपजली मनीं । पूर्ववत्पणीं करील त्यां ॥२६॥

न मिळतां अमृत । केवी सावध होईल मृत । धन्वंतरीवांचोनि नेमस्त । कैंवि उतरत विखार ॥२७॥

जरी न वर्षे तरी घन । तरी केवी वाढती तरुतृण । प्राप्त नसतां वसंतमान । पुष्प वटवून न येती ॥२८॥

तेवीं प्रसन्न न होतां अनसूया । कदा न पालटे यांची काया । युक्ती निवेदिली उपाया । आळस प्रार्थाया न किजे ॥२९॥

अधिकारपरत्वें गढुले मन । यासी निवेदितां तों दृष्टांतवचन । निरोगी जरी व्हावें आपण । कटु सेवन करावें ॥२३०॥

न सेवावे ठेऊनि दोष । तरी पालट न पडे रोगास । सेवितां साहोनि कुसमुस । सतेज वपुस पाविजे ॥३१॥

अधिकाराचा अभिमान । ठेविजे माते गुंडाळोन । आपुले कारणें लक्ष देऊन । करा मान मम शब्दा ॥३२॥

येऱ्हवीं विचारें पाहतां । मिथ्याच वाढवाया द्वैता । आपुलीया बाळा शृंगारितां । कोण दूषिता ते ठाईं ॥३३॥

प्रत्यक्ष हे तुमचे स्नेहाळ । येथें दोष नाणिजे अनुमाळ । अंतरी होवोनिया प्रेमेळ । चोजवा रसाळ शब्द आतां ॥३४॥

नारदवचनाची देखोनि चातुरी । परम सुखावल्या अंतरी । लोंभें उकळ्या शरीरीं । फुटों बाहेरी पाहती ॥३५॥

गुह्यबीज होतां रोपणीं । मोहो कोंभ निघाले आंतुनि । ते विस्तारती कवणे गुणीं । श्रोतेजनीं परिसिजे ॥३६॥

ऋषि अत्री अनसूया नारद स्तंभ । चतुर्गुण हा मंडप सुप्रभ । रमा सावित्री वेली अंब । सदय सलंब प्रसरे वरी ॥३७॥

सद्बुद्धीपर्णें हरित । चातुर्य शब्दपुष्पें विराजित । दया लोभ गौरव डोलत । सुफळें लोंबत हेचि तया ॥३८॥

अंबा वेली सरसावली । नारदस्तंभे प्रथम वेधली । केऊं तेती वृद्धिपावली । श्रवण केली पाहिजे ॥३९॥

देवी म्हणे हो नारदमुनी । धन्य अनसूया हे मेदिनी । इची देखोनि अद्भुतकरणी । आनंद मनीं न समाय ॥२४०॥

इचें वय असोनि सान । दिव्य पाहतां दिसे आचरण । अत्री पाहतां तोही तपोधन । सदय सज्ञान उभयतां ॥४१॥

रमा म्हणे उभयतांसी । पाहतां सुख वाटे जीवासी । धन्य रत्नें जन्मलीं कुसीं । सकळ कुळासी तारक ॥४२॥

आम्हीं देव स्वर्गभुवनीं । काय केलें तेथें राहोनी । आम्हांहुनि अधिक करणी । राहिले साधुनी भूलोंकीं ॥४३॥

धन्य माउली हे अनसूया । जीवप्राणें उलटली पतिपाया । येर अवनीं कां नसती जाया । वृथा वायां जन्मोनी ॥४४॥

ही निर्दोष गंगा भावतारिणी । ही दारिद्रमोचक शुभाननी । ही अज्ञाननाशक ज्ञानखाणी । जगपावनी जगदंबा ॥४५॥

सावित्री म्हणे ऐका बाई । आमुचे संततीस पार नाहीं । परि या उभयतांची नवलाई । अद्भुत पाही त्रिभुवनीं ॥४६॥

आम्हांहूनि विशेषगुणें । दिव्य सुंदर हीं उभयरत्नें । त्रिभुवन भरलें कीर्तीनें । फिटलें पारणें डोळियांचें ॥४७॥

आतां या उभयांवरोनी । सांडावे प्राणसखे ओवाळोनी । आम्हां मिरविलें धन्यपाणीं । यांचे भूषणीं भूषण आम्हां ॥४८॥

नारद म्हणे काय म्हणावें । तुम्ही सत्यचि वर्णितां आघवें । पापी तरती यांचिया नांवें । आवडीं गावे गुण यांचे ॥४९॥

हे जयातें अवलोकिती । त्याचे मनोरथ सहज पुरती । धन्य अत्री अनसूयासती । वाचे किती अनुवादूं ॥२५०॥

ऋषी म्हणती सत्य माते । उपमा नसेचि या उभयतांतें । कोण तुकी या सामर्थ्यातें । हें तों आम्हांतें न दिसे ॥५१॥

सावित्री तुमचें तप थोर । म्हणोनि ऐशीं फलें पावला निर्धार । पवित्राचे हे पवित्र । उदार धीर सदाचरणीं ॥५२॥

ऐसा स्तुतिसंवाद जंव होत । तों अत्री अनसूया आलीं धावत । साष्टांग करोनि प्रणिपात । उभय विनवीत प्रेमभावें ॥५३॥

जी जी वडील तुम्ही आम्हां । आम्हीं स्तवावें तुमच्या पादपद्मां । तें न होतां वर्णितां अधमा । कां रिकामा श्रम वायां ॥५४॥

आम्ही अत्यंतसे चोर । धरोनि बैसलों गिरिकंदर । अपराधीया दंड थोर । तुम्ही निर्धार करावा ॥५५॥

प्रत्यक्ष आम्ही अपराध केले । हे तुम्हां सर्वांते कळले । दंड न करितां आपंगिले । गौरविलें बाळांतें ॥५६॥

धन्य धन्य तुमची सदयता । आपुली लोपवोनि योग्यता । आम्हां दीनांसि थोरवितां । कीर्ति वाढवितां आत्मजाची ॥५७॥

आम्ही दीन हीन अर्भक बाळ । करित बैसलों वनीं खेळ । शीणला भाग तों जाणे स्नेहाळ । पोटीं कळकळ म्हणोनि ॥५८॥

हृदयीं तान्हियाची चिंता । म्हणोनि आला येथें पिता । बाळ खेळ पाहोनि गुंततां । वेळ येतां लागला ॥५९॥

हें जाणवतां मायेसी । कळ न साहेची मानसीं । मोहें धावोनि वेगेसीं । वत्सापासीं पावली ॥२६०॥

वत्स पाहतां अनिवार । भलतैसे फिरे रानभर । परि गाउली घालीत हुंबर । कृपा पाखर घालावया ॥६१॥

असो मातापित्याहूनि परते । आम्हां गौण सकळ दैवतें । म्हणोनि वंदितों चरणातें । कृपादानातें मागतों ॥६२॥

सकळ अपराधांची क्षमा करोन । सेवेसी सांगा आज्ञा प्रमाण । कदानुलंघूं आपुलें वचन । अनन्य शरण तुम्हांसी ॥६३॥

तंव सावित्री उमा कमळा । आनंदोनी बोलती ते वेळां । पूर्ववत् दावी या सुशीळा । आम्हां सकळां पाहों दे ॥६४॥

मातृवचनातें वंदोनि शिरीं । अनसूयेकडे पाहे ते अवसरीं । खूण मुद्रा जाणोनि झडकरी । तीर्थ सत्वरीं आणिलें ॥६५॥

सव्य प्रदक्षिणा घालोन । वंदी प्रेमें स्वामीचरण । तैसेंचि सर्वांप्रती नमोन । करी सिंचन बाळकें ॥६६॥

उदक करोनि सिंचितां । पूर्ववत् प्रगटले अवचितां । हें देखोनि समस्तां । आनंद चित्ता न समाये ॥६७॥

विमानीं पाहती सुखर । तवं देखिले ब्रह्मा विष्णु हर । कुसुमे वर्षता झाला अमर । वाद्यें किन्नर वाजविती ॥६८॥

देवांगना आरत्या करिती । अप्सरा गंधर्व आनंदें गाती । वाद्यें नानाविध विमानीं वाजती । ऋषी गर्जती वेदवाणी ॥६९॥

सकळ करिती जयजयकार । ऋषी आशीर्वचनें बोलती उदार । तया आनंदासी नसे पार । विमानें सत्वर पातलीं ॥७०॥

आनंदे भरलें भूमंडळ । आनंदते झाले लोकपाळ । धन्य अनसूया वेल्हाळ । वर्णिती सकळ नारीनर ॥७१॥

जिकडे तिकडे अवघा आनंद । प्रगटला तेथें आनंदकंद । उडाला सकळ भेदाभेद । गेला खेद अत्रीचा ॥७२॥

पुढिले प्रसंगीं निरुपण । समस्तां घडेल आलिंगन । उभयतां तें प्रसाद देऊन । स्वपदस्थान पावतील ॥७३॥

श्रीसद्‌गुरु अनंत । तोचि या ग्रंथा वदवीत । शरणागताचे मनोरथ । तो पुरवीत गुरुराव ॥७४॥

तेणेंचि कृपा करोनि पाही । बुद्धि प्रेरली या हृदयीं । पूर्ण अध्याय वदविले साही । नेणवे नवलाई तयांची ॥७५॥

वंशयंत्र छिद्राकार । वाजवितां वाजे अतिसुंदर । परी तया जैसा वाजविणार । तेवींच प्रकार येथींचा ॥७६॥

येऱ्हवी पावा केउता वाजे । काय सुंदरपणा तया साजे । वाजविल्यापासोनि नाद निपजे । सुंदर गाजे नामें पोवा ॥७७॥

तेवी मी अत्यंत पामर । बोलाव गुरुकृपेचा आधार । मी कर्ता हा मिथ्या प्रकार । सूत्रधार वेगळाची ॥७८॥

निमित्तमात्रें अनंतसुत । प्रसिद्ध संतांचा अंकित । त्याचे द्वारीं भिक्षा मागत । करा पारंगत मज दीना ॥७९॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ ॥ श्रीनारदपुराणाचें संमत ॥ श्रोते परिसोत संतमहंत ॥ षष्ठाध्याय अद्भुत गोड हा ॥२८०॥

॥ श्रीदत्तदिगंबरार्पणमस्तु ॥

॥ इति षष्ठाध्यायः समाप्तः ॥

अध्याय सातवा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीमत्सद्‍गुरु अनंता । आनंदकंदा तूं समर्था । उदार धीरा कृपावंता । अनाथनाथा शरण तूतें ॥१॥

तूं संपन्न सर्वाधीश । सकळ ईशांचाहि ईश । परात्पराचाही परेश । तूं अविनाश सर्वदा ॥२॥

तूं शरणागताचा दाता । तूंचि भवभ्रांति फेडिता । तूं या जिवासी तारिता । तुजवीण त्राता कोण आम्हां ॥३॥

म्हणोनि तूतें आलों शरण । न पाहीं आतां दोषगुण । देवोनिया कृपादान । करी पोषण सुताचें ॥४॥

मी तुझें लाडके लडिवाळ । तूं गुरुमाय होसी स्नेहाळ । पुरवी बाळकाची आळ । कथा रसाळ चालवी ॥५॥

गत कथाध्यायीं निरोपिलें । अनसूये स्तवोनि प्रसन्न केलें । तिघे दिव्य पूर्वरुप झाले । पुष्पें वर्षले सुरवर ॥६॥

आतां पुढील कथानुसंधान । सद्‍गुरुकृपें होतसे निरुपण । श्रोतीं तेथें चित्त देवोन । कीजे श्रवण साक्षेपें ॥७॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर । पाहतांचि झाला जयजयकार । देव मानव नारीनर । आनंद थोर मानिती ॥८॥
अत्री अनसूया तये वेळीं । आसनें मांडिती उतावेळीं । युग्म पृथकत्वें निराळीं । रंगवल्ली अनुपम्य ॥९॥

अन्य पृथकचि बैसका । ऋषीलागीं घातल्या देखा । पूजासाहित्य मालिका । द्रव्य सुगंधिका सिद्ध केलें ॥१०॥

मग उभयतां जोडोनि कर । प्रार्थिते झाले तयांसमोर । म्हणती कृपा कीजे दीनावर । अंगीकार करावा ॥११॥

जयजयाजी पार्वतीरमणा । सावित्रीवरा पद्मासना । जय भक्तप्रिय नारायणा । दयाघना दीनबंधो ॥१२॥

जयजयाजी गौरीवल्लभा । जयजयाजी पद्मनाभा । रमारमणा तुझेनि शोभा । ये आरंभा पूजास्थानीं ॥१३॥

जयजयाजी पन्नगहारा । जय वेदमूर्ति करुणाकरा । जय सर्वातीता सर्वेश्वरा । पूजा अंगीकारा दीनाची ॥१४॥
जयजयाजी कैलासवासिया । सत्यपुराधीशा सत्य प्रिया । वैकुंठधामा गुणालया । करा दया विनयार्थी ॥१५॥

जय विधातिया सृष्टिकरा । सदय पालना सर्वेश्वरा । जयजयाजी भूतसंहारा । दयासागरा लक्षा मज ॥१६॥

जय पिनाकपाणी कपर्दिशा । नीलग्रीवा भस्मभूषा । गंगाधरा अपर्णेशा । शिव सर्वेशा मां पाहि ॥१७॥

जयजय स्वामी चतुर्वक्त्रा । हे कृपाघना द्विचतुर्नेत्रा । सदय उदारा सत्पात्रा । सतेज पवित्रा पाहि मां ॥१८॥

जयजयाजी कमळावरा । कमलदलाक्षा चारुकरा । कमलप्रिया करी उद्धारा । करुणाकरा मां पाहि ॥१९॥
ऐकोनिया करुणावचन । कृपें द्रवलें अंतःकरण । म्हणे बा रे संतोषमान । परिसोनि स्तवन झालों कीं ॥२०॥

उद्गार वचनें ऐकतां । साष्टांगें नमिती तैं उभयतां । पृथकची प्रार्थाव्या त्या माता । होईल चित्ता संतोष त्यां ॥२१॥

उभय जोडोनि बद्ध पाणी । करिते झाले तेव्हां विनवणी । आलों तुम्हां अनन्यपणीं । शरणचरणीं सद्भावें ॥२२॥

जय त्रिपुरांतकेश्वरी अंबे । मम जनिते विश्वकदंबे । विश्वपालके हरिवल्लभे । सतेज सुप्रभे शरण तुज ॥२३॥

जयजय शिवप्रिये मृडानी । जय विधिविलासके सौदामिनी । जयजय माधवमनमोहिनी । उभे प्रार्थनीं पाहि आम्हां ॥२४॥

जयजय अपर्णे सदये । जय वेदमूर्ति प्राणप्रिये । जयजय सरितावरतनये । वंदितों पाय अनाथ मी ॥२५॥

जय षडास्यमाते भवानी । जयजय वो दक्षमखविध्वंसिनी । कृपाकटाक्षे हिमनगनंदिनी । पतित पावनीं लक्षी मज ॥२६॥

जय ब्रह्मतेजसे त्रिपदगात्री । प्रथम पदें तूं गायत्री । द्विपदा तूं माते सावित्री । सरस्वती सुंदरी त्रिपदा तूं ॥२७॥

एवं माता तूं पदत्री । जन्मलों कुसीं म्हणोनि अत्री । तरी कृपा करोनि पवित्री । दया सुपुत्रीं कीजे आतां ॥२८॥

जयजय कमले कमलधारके । जय कमलभूषणे । त्रिभुवनपालके । कमलदलाक्षे त्रितापहारके । विश्वनायके पाहि दीना ॥२९॥

स्तुतिस्तवनातें ऐकोनी । तिघी आनंदत्या झाल्या मनीं । हें देखोनि उभयांनीं । लोटांगणीं पैं गेले ॥३०॥

अनसूयेसी वोसंगा घेवोन । प्रेमें देती आलिंगन । बाई तुम्हां क्षेम कल्याण । सदैव पूर्ण असो हें ॥३१॥

तेविं ब्रह्मा विष्णु महेश्वर । आलिंगोनि देती अभयकर । बा रे तुमचा महिमा थोर । अद्‌भुत अगोचर पाहिला ॥३२॥

अत्री अनसूयेसी अवग्रहण । वडिलीं आदरें करितां जाण । यश वर्णिती ऋषिगण । म्हणती धन्य दिवस आजी ॥३३॥

सद्भावें पितरांलागोनी । अत्री अनसूयेतें सन्मानोनी । आणोनि बैसविलें आसनीं । घोष द्विजगणीं मांडिले ॥३४॥

मंत्रघोष आरंभिती । उभय पादपूजा तेव्हां करिती । दिव्य वस्त्रभूषणें देती । चंदन चर्चिती सौभाग्य ॥३५॥

सतेज समर्पिती अलंकार । तुळसी पुष्पें गुंफीत हार । सुगंध धूप दीप परिकर । फलसंभार नैवेद्य ॥३६॥

फल आहार करितां सेवन । उदकें करविती मध्यपान । तृप्ति होतां अपोषण । करप्रक्षालन करविलें ॥३७॥

मुखशुद्धी देवोनि त्यांसी । दिव्यासन देत वेगेंसी । करोद्वर्तन चंदनासी । परिमळासी चर्चिलें ॥३८॥

सप्रेमें सुरंग तांबूल । चर्वणा दिधला रसाळ । दक्षणा अर्पोनि उतावेळ । प्रदक्षणा निर्मळ करिताती ॥३९॥

दंडप्राय नमस्कार घातले । तेवींच मुनी तोषविले । मानसीं ध्यानधारण केलें । चरण लक्षिले सकळांचे ॥४०॥

मागुतीं जोडोनिया कर । प्रीतीं उभे राहोनि समोर । स्तुति आरंभिली साचार । सद्गद अंतर तैं होय ॥४१॥

जय अजअजात सर्वोत्तमा । आनंदसागरा सुखधामा । अनाथनाथा तूं विश्रामा । मंगलधामा सर्वेशा ॥४२॥

जयजय विमलरुपा चैतन्यघना । जय गुणातीत गुणवर्धना । जय सर्वसाक्षी सनातना । सर्वकारणा सर्वात्मका ॥४३॥

जय मायातीत निरामया । अज्ञानछेदका ज्ञानोदया । तापहारका पूर्ण सदया । करी छाया कृपेची ॥४४॥

जय जय अद्वयरुपा निःसंगा । विज्ञानराशी तिमिरभंगा । अनंत वेषा अनंत रंगा । अद्वय अभंगा अभेदा ॥४५॥

ऐसिया स्तवनें आरती । प्रज्वाळोनिया ओवाळिती । काया कुरवंडी सप्रेमगती । करीं घेती पुष्पांजळी ॥४६॥

वेदोक्तमंत्रे करोन । सुस्वरे घोष सरसावून स्वस्ति साम्राज्य म्हणोन । करिती अर्पण मस्तकीं ॥४७॥

नमस्कारोनिया स्तविती दीन अपराधी म्हणोनि म्हणती । क्षमा करोनि कृपामूर्ती । करा प्रीती दासातें ॥४८॥

जयजय वैकुंठपति रमाधवा । मी बहु अपराधी केशवा । नेणें करुं कांहीं तुझी सेवा । अभिमानी काजवा जन्मलों ॥४९॥

जयजय शिवशूळपाणी । मी दुराचारी गा अवगुणी । अर्चन नेणें कुभाव मनीं । व्यर्थ जन्मोनी वायां कीं ॥५०॥

जयजय स्वामी विघातिया । नाहीं सेविलें म्या तुझिया पायां । व्यर्थ शीण दिधला जन्मोनिया । वृथा काया पुष्ट केली ॥५१॥

तुम्ही महामूर्ति सर्व संपन्न । धन्य स्वामी तुमचें महिमान । पतित अनाथ अनन्य शरण । करितां पावन तयातें ॥५२॥

म्हणोनिया पायांपाशीं । विनीत झालों जी कृपाराशी । नपाहतां दोषगुणांसी । चरणापाशीं ठाव द्या ॥५३॥

आम्हीं शुद्ध अत्यंत अज्ञान । नाहीं घडलें सेवाअर्चन । नाहीं घडलें जप ध्यान तपाचरण तेही नसे ॥५४॥

नाहीं साधिला योग । नाहीं घडले कांहीं याग । तीर्थ व्रत नेम चांग । नाहीं जोग साधिला ॥५५॥

शुद्ध जैसे वनीचें ढोर । तेवींच घडला सर्व विचार । इंद्रियपोषणीं सादर । स्वहित सार नेणेंची ॥५६॥

सेवा न जाणें सज्जनाची । कैंची मग सोय परोपकाराची । कैंचीं कोडें पुरतीं अर्थिल्याचीं । वार्ता सुखाची न वदे वाचा ॥५७॥

सर्व गुणें आम्हीं हीन । देवा पातकी आणि मलीन ऐसिया नष्टा दुष्टा कराल पावन । तरीच धन्य सर्वेश ॥५८॥

अत्री अनसूयेच्या स्तवना । सकळही तुकविती माना । म्हणती केवढा हा लीनपणा । धरोनिया करुणा गाइली ॥५९॥

धन्य धन्य यांचे आचरण । परी किंचित न धरी अभिमान । हेंचि योग्यतेचें लक्षण चतुर सुजाण जाणती ॥६०॥

पीका सरसावतां कां गोणी । भू लक्षीतसे अवलोकनीं । जंव जंव हाय कणभरणी । तंव तंव लवणीं विशेष ॥६१॥

जे का अभागी द्वाड । फळ ना पोकळ दीर्घ वाड । स्पर्शू जातां खडबडबड ।
कोण सुरवाढ तयांचा ॥६२॥

तैसा नोव्हे हा अत्रिमुनी । शांति वैराग्याची खाणी । पवित्र अनसूया सुशील गृहिणी । पुण्यपावनी पतिव्रता ॥६३॥

ऐसे करितां ऋषि अनुवाद । तंव त्रिमूर्तीस झाला आनंद । मग सप्रेमयोगें आशीर्वाद । देती प्रसिद्ध आवडीनें ॥६४॥

म्हणती बारे अत्रिमुनी । तुम्ही उभयतां धन्य मेदिनीं । तुम्हांऐसे नयनीं । न देखों कोण्ही दूसरे ॥६५॥

उदंड तपी तापसी पाहिले । योगी ध्यानी अवलोकिले । गृहस्थाश्रमी सभाग्य भले । परि मन न झालें शांत कोठें ॥६६॥

आचरण कर्में देखिलें अपूर्व । अभिमान ऊर्मीचे गौरव । दिसती परी दांभिक सर्व । अनन्य शुद्ध भाव नसेचि ॥६७॥

तो आम्हीं येथेंचि पाहिला । मूर्तिमंत तुम्हा पाठीच ठेला । निरभिमान योग साधिला । आनंद झाला पाहतां ॥६८॥

धन्य धन्य हें तुझें अर्चन । धन्य या विनयत्वाचें लक्षण । श्रद्धा भली परिपूर्ण । भाव सघन सदृढ तो ॥६९॥
धन्य तुमचा हा अधिकार । आवडी पूजनीं तुम्हां थोर । केला पाहोनि सत्कार । आमुचें अंतर निवालें ॥७०॥

तुम्ही उभय आनंदमूर्ती । हे आम्हां सकळांची विश्रांती । सदैव कल्याण तुम्हांप्रती । असो कीर्ति वाढो सदा ॥७१॥

निर्विघ्न चालो तुमचा योगक्षेम । सिद्धीं जावोत तुमचे नेम । अढळ हृदयीं राहो प्रेम । पुरोत काम सकळही ॥७२॥

निर्दोष घडो तपाचरण । सदैव सदयता वसो पूर्ण । आरोग्य काया शक्तिसंपन्न । असो धनधान्य विपुल तें ॥७३॥

प्रपंच घडो परमार्थरुप । सकळ देवता असोत सकृप । नुरो जीवीं कांहीं संताप । ज्ञानदीप प्रज्वळो ॥७४॥

सेवा घडो सर्वांभूतीं । द्वैत कल्पना न बाधो कल्पांतीं । नुरो देहीं कांहीं भ्रांती । आत्मप्राप्ती असो तुम्हां ॥७५॥
न बाधो कदा कोणताही शीण । असो औदार्य प्रपंचीं अनृण । नांदा कुशल रुप सुखी सधन । स्वरुपीं उन्मन वृत्ती असो ॥७६॥

ऐसा वरदपुष्पें गुंफोनि हार । अत्री अनसूये वोपितां सत्वर । त्रिगुणात्मकें अभयकर । मस्तकावर दीधला ॥७७॥

आनंदोनी तेव्हां ऋषिमंडळी । प्रेमें आल्हादें पिटिती टाळी । अत्री भाळ ठेवी चरणकमळीं । सप्रेम जळीं वर्षत ॥७८॥
तंव ते विमानें सिद्ध झालीं । निशाणभेरी खणाणिली । देवांसह तये वेळीं । ऋषीमंडळी उठे त्वरें ॥७९॥

तै उल्हासलें सकळांचें मन । दर्शनें जीवजंतू झाले पावन । आनंदलाटा उसळती सघन । हेलावे संपूर्ण वोलावती ॥८०॥
परी अनसूयेचे अंतरीं । किंचित उठली खेदलहरी । ते जाणे एक ब्रह्मचारी । जया करी ब्रह्मावीणा ॥८१॥

अनसूयेचे वर्म जाणोन । म्हणे तूं चतुर होसी सुजाण । धैर्य धरोनि धरीं चरण । करीं भाषण इच्छित जें ॥८२॥

विमानासन्निद्ध देव जाती ऋषिगण तयां बोळविती । तैसियामाजी अनसूयासती । नमोनि विनविती पैं झाली ॥८३॥

इकडे वाद्यांचे गजर । होतां नादें कोंदलें अंबर । न कळे शब्द अणुमात्र । गुजबुज थोर दुमदुमली ॥८४॥

तंव अनसूयेतें देखोनी । वाद्यें राहविलीं तत्क्षणीं । तुम्ही शब्द न बोला जी कोण्ही । निश्चळपणीं असावें ॥८५॥

नाद अवघे स्तब्ध होतां । विनविती झाली पतिव्रता । अहो जी स्वामीसमर्था आम्हा अनाथां तारिलें ॥८६॥

सुप्रसन्नें दिधलें वरदान । तें सिद्धची असे कृपेंकरुन । आपण करितां पालन । मग तें न्यून कैसेनी ॥८७॥

भानु मंदिरीं येवोनी प्रगटेल । तेथें अंधार कोठोनि राहील । हिमकर प्रीतीं भेटेल । ताप उरेल मग कैंचा ॥८८॥

कृपा करितां चिंतामणी । दरिद्रा गेली सहज पळोनी । कल्पतरु उगवतांच अंगणीं अर्थ मनीं केंवी राहे ॥८९॥

प्रसन्न होतांचि कामधेनू । मग सांगा तयासी काय वाणूं । रोगिया होतां अमृतपानू । तया मरणू कैसेनी ॥९०॥
तेवीं तुम्ही अपंगितां । कोठोनि बाधेल आम्हां चिंता । तुम्ही सर्वज्ञ सर्व जाणता । कासया वृथा शिणवावें ॥९१॥

ऐकोनि अनसूयेची उक्ती । देव चकित झाले चित्तीं । विचारें मानसीं शोधिती । परि कोणाप्रति नुमजे तें ॥९२॥

शब्दरोहोकेचितेरो होकले । थकित ठाईं उभे ठेले । निरसिल्यावीण पाउलें । पुढें नुचलेंचि तयांते ॥९३॥

तंव नारद म्हणे कां जी स्थीर । विमानीं आरुढावें सत्वर । कासया करितां उशीर । वाट सुरवर पाहती ॥९४॥

शंकर म्हणे जावयालागुनी । उशीर कैचा नारदमुनी । परि या अनसूयेच्या प्रार्थनीं । पडिलों गुंतोनि नुगवे हें ॥९५॥

नारद म्हणे त्रिपुरांतका । परम होसी तूं भक्तसखा । अनुसूयेचे मनींची शंका । विश्वव्यापका दूर कीजे ॥९६॥

आपण होवोनि सुप्रसन्न । बहुतेक दिधलें वरदान अनसूयेचा हेतू कोण । तोही जाणून घेईजे ॥९७॥

सर्वेंचि म्हणे अनसूयेसी । कोण प्रश्न तुझिये मानसीं । तो निवेदी पायापासी । संकोच यासी न धरावा ॥९८॥

तुमचे पुरवावया हेत । हे प्रगटले तिघे साक्षात । ऋषिगण गंधर्व पाहात । धन्य पुनीत दिवस आजी ॥९९॥
सकळांसी झाली समसाम्यता । हें महत्पर्व जाणोनि आतां । निवेदी आपुल्या अंतरआर्ता । साधी स्वार्थां प्रयुक्तीं ॥१००॥

परिसोनि ऐसिया वाक्यासी । अनसूया वदे नारदासी । श्रवणीं साठवा शब्दासी । देवऋषी तुम्हीं सर्व ॥१॥

अहो हे सकळांचे वडील । आम्हां दीनांवरी झाले दयाळ । स्वलीलें होवोनि बाळ । मज स्नेहाळ भाग दिला ॥२॥

नसतां उद्भवलें येणें । केलीं आवडीं पयःपानें । यालागीं मंदिरीं पाळणें । घालोनि म्हणे जोजो मी ॥३॥

तेणें लोभमोहा जाली वृद्धीं बाळरुपीं जडली बुद्धी । नसतां दाविली उपाधी । सोडिलें मधीं पाहा केसें ॥४॥

आतां स्वपदां हे आनंदे जाती । नारदा पालख रिते मज दिसती । याची गुणें जीवीं खंती । ऐसियाप्रती काय करुं ॥५॥

नारदा पूर्वीं होतों आनंदघन । नव्हती यांची आम्हां आठवण । यांनींच स्वतां येऊन । वधलें मज काय वदूं ॥६॥
जेधवां पाहीन पालख । मोहें अंतर करी लखलख । हरपोनि जाईल सर्व सुख । अनिवार दुःख वाढेल ॥७॥

तया दुःखभरें करोनी । नारदा निद्रा न यावी नयनीं । हें उचित कीं तुम्हांलागोनी । पाहा शोधोनी मानसीं ॥८॥

नारदा बोल प्रारब्धासी । काय रुसोनि सांगों तुम्हांसी । स्वस्थ जावें स्वपदासी । दया मानसीं असूं द्या ॥९॥

स्वपरिवारें सुखसंपन्न । चिरायु नांदा पदीं जाऊन । परी शरणागताची आठवण । नका विसरुन राहूं कीं ॥१००॥
अनंत ब्रह्मांडाची घडामोडी । तुम्हां अन्य कार्याची तांतडी । तेथें आम्ही केउतीं बापुडीं । होईल अनावडी स्मरणाची ॥११॥

ललना परिवारीं सुरवाड । भोग उपभोगीं उपजे आवंड । केवीं स्मरणाची चाड । तेचि गोड तुम्हां होती ॥१२॥

म्हणोन विनीत होवोन । तुम्हां देतसों आठवण । एवढेंचि द्यावें कृपादान । आमुचें स्मरण न विसरावें ॥१३॥

तंव नारद म्हणे जी करुणालया । या अनसूयेवरी करावी दया । तैं कृपा उपजली देवराया करिती छाया पूर्णत्वें ॥१४॥

सकळांचेनि सन्निधानीं । देव वदती प्रसादवाणी । अनसूये तुझें प्रेम पाहोनी । तुष्टलों मनीं सत्य पैं ॥१५॥

तुमचे भक्ति आदरीचें ऋण । कधींही न फिटे आम्हांलागून । परि किंचित् तोषवूं तुझें मन । सागरा अर्पण बिंदू जेवीं ॥१६॥

येचविषयीं माते । आवडीं निवेदितों तूंतें । तें परियेसी सावधान चित्तें । आपंगी आम्हांतें जीवेंभावें ॥१७॥

तुझें केलें पयःपान । तें अमृताहुनी गोंड गहन । तेथें गुंतलें आमुचें मन । पुढतीं सेवन करुं तें ॥१८॥

यासाठीं मी शंकर । तुझिये पोटी धरितों अवतार । दुर्वासनामें करी गजर । हा अभय वर घे माझा ॥१९॥

तंव विधाता बोले आपण । मीही तुझा पुत्र होईन । न करीं आतां संकोच मन । घेई वचन हें माझें ॥१२०॥

दोघांचा पाहोनि वरद । विष्णूसी झाला आल्हाद । म्हणे माते न करी खेद । धरिला छंद पुरवीन मी ॥२१॥

दोघांहोनि आगळें । माझें कृत्य असें वेगळें । हीनदीन जनांचे पाळें । पावन स्वलीलें करीन मी ॥२२॥

माते तुज सांगतो खूण । या दोघांचे वेंगळेचि दोन गुण । ते मजमाजी अंसंती पूर्ण । यांहोनि भिन्न भिन्न वेगळा मी ॥२३॥

त्रिगुणात्मकें मी दत्त । तुझा बाळ होईन सत्य । योग दावीन सिद्धांत । सर्वातीत राहोनी ॥२४॥

तुझिया मनोरथासी । पूर्ण करुं निश्चयेसी । मातें त्वां स्वस्थ मानसीं । आनंद सुखवासी असावें ॥२५॥

नारद म्हणे धरी पोटीं । बांधी आतां शकुनगांठी । अनसूया चरणीं घाली मिठी । स्फुंदे गोरटी सप्रेमे ॥२६॥

उठवोनिया लवलाही अनसूया देवें धरिली ह्रदयीं । मुख कुरवाळोनि तें समयीं म्हणे राही आम्ही येतो ॥२७॥

वर देवोनि संबोखिता । आनंद सुख जाह्ले समस्ता । सुमनसंभार अनसूयेवरुता । झाला वर्षता अमरेंद्र ॥२८॥

अत्रिऋषिवर्या भेटोनी । तात्काळ बैसले देव विमानीं । दुंदुभीनाद गर्जती गगनी । उठती ध्वनी अनुपम्य ॥२९॥

स्वर्गी चढतांचि विमानें गंधर्व विद्याधर गाती गायनें । अप्सरा नृत्य कला करिती तनानें । मृदंग वीणे वाजविती ॥१३०॥

झाली विमानांची दाटी । अमर करिती पुष्पवृष्टी । देव मिळोनी तेह्तीस कोटी । नेती पटी मिरवत ॥३१॥

देवललना धावोनि येती । आरत्या घेवोनि ओवाळिती । प्रथम कैलासभुवना जाती । शिव स्थापिती शिवपदी ॥३२॥

परस्परा सकळां सन्मान । करोनि तोषविती शिवगण । आनंदमय सर्व कैलासभुवन । भक्तजन डुल्लती ॥३३॥

अपर्णेसी कैलासीं ठेविलें । गणांसमवेत शिव निघाले । सत्य लोकाप्रती पावले । पदीं स्थापिलें विधातीया ॥३४॥

आनंदोनि सत्य लोकवासी । सन्मान देती सकळांसी । सत्कार करोनि वेगेसीं । समारंभासी गौरविलें ॥३५॥

तंव बोलतसे रमारमण । आम्हांसी निरोप द्यावा आपण । सवें यावयाचें कारण । कासया शीण करितसां ॥३६॥

तंव बोलतसे उमावर । बरवा शोधिला जी विचार । हा तो नोव्हे क्षीरसागर । वैकुंठपुर असें कीं ॥३७॥

देखोनि सकळांची आवडी । ओळखोनी शिवहृदयींची गोडी । भाषणें करतील कडोविकडी । ती सुरवाडी गोड पुढें ॥३८॥

हा अध्याय आनंदभरित । वाचितां आनंदचि होय प्राप्त । वरदे शोभला शोभिवंत । मनोरथ पुरवावया ॥३९॥

अत्रि अनसूयेची कामना । पूर्ण व्हावया दे वरदाना । श्रवणीं पठणीं जडतां भावना । त्या देवराणा करी दया ॥१४०॥

तोचि त्रिगुणात्मकें करुन । सर्वा ठायीं राहिला व्यापून । प्रीतिभावाते निरखोन । करी पावन जगद्गुरु ॥४१॥

सद्गुरु तोचि दत्त अविनाश । शरणागताचे तोडी पाश । ज्ञानबोधें बोधवी मानस । करवी नाश विकाराचा ॥४२॥

शुद्ध सत्त्व जो आपुला गुण । प्रेमें दे तेथील अधिष्ठान । करोनि द्वैताचे खंडन । अद्वय पूर्ण बाणवी ॥४३॥

एसा समर्थ हा गुरुदत्त । याची कृपा व्हावया प्राप्त सहाकारी तुम्ही साधुसंत । दयावंत जिवलग ॥४४॥

म्हणोनि धरिली तुमची कास । जीवेंभावें म्हणवी दास । न करा जी माझी निरास । पुरावा आस दयासिंधु ॥४५॥

तुमचिया प्रसादें करुन । हा ग्रंथ होतसे निरुपण । कर्ता म्हणतां लागे दूषण । तुमचें महिमान तुम्हां ठावें ॥४६॥

संतचरणकमळ जें सुंदर । अनंतसुत येथील भ्रमर । मकरंद सेवी निरंतर । धालि गुंजारव सप्रेमें ॥४८॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । यासी नारदपुराणीचें संमत । श्रोते परिसोत भाविक भक्त । सप्तमोऽध्याय गोड हा ॥१४८॥

॥ इति सप्तमोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय आठवा

श्रीसद्‌गुरुदत्तात्रेयाय नमः ॥

ॐ नमो अविनाश निर्गुणा । विमळरूपा सनातना । मायातीता निरंजना । शुद्ध चिद्घना नमो तुज ॥१॥

तू निखिल ब्रह्म निराकार । अहं ब्रह्मास्मि उद्गार । मायानियंता प्रभाकर । सगुणांकुर तेथे तू ॥२॥

सगुणस्वरूपत्व जे माया । ते तू होसी गा निरामया । कल्पनी आड प्रसवोनिया । गुणत्रया उभारिसी ॥३॥

सशक्तीक निर्मोन । ऐक्यभावा युक्त करून । पृथके कार्य आज्ञापून । द्विभागी आपण मिश्रित ॥४॥

तीन दोन मिश्री ते पाच । हे कौत्क दावावया साच । एक एकाचे पुनरा पाच । एवं संच पंचविसा ॥५॥

पुनरा पांचा करोनि मंथन । विषभाग काढिला निवडोन । भाग पांचा नामाभिधान । वेगळे लक्षण ठेविले ॥६॥

पंचवीस पा केले तीस । स्वभागे मिळवी एकास । एकूण केली छत्तीस । खेळ विशेष रचिला हा ॥७॥

एवं उभारिले ऐसे भूत । दहा संस्थापिले त्यांत । दशद्वारे जे नेमित । रुद्र वस्तीत वेगळे ॥८॥

दश नाद दश भेद । एकादशावे पृथक प्रसिद्ध । हे भेदातीत अभेद । साधु सिद्ध जाणती त्या ॥९॥

ते तू सकळंचे जीवन । व्यापक साक्षीरूपे पूर्ण । तुज जाणावया आंगवण । न बाणे खुण आगमनिगमा ॥१०॥

त्वांचि हे भूत उभारिले । भूत भूतातेचि प्रसवविले । अनेकत्वे विस्तारिले । एवं रचिले ब्रह्मांडे ॥११॥

अनंत ब्रह्माडांची माळा । याचा सुत्रधारी तू वेगळ । खेळ खेळवोनि निराळा । न कळे कळा कवणासी ॥१२॥

तू सकळांसी अगोचर । तुझा न कळे कोणा पार । शिणले श्रुतीचे जिव्हार । थकित फणीवर सहस्त्रमुखी ॥१३॥

तेथे अल्पमती मी हीन । केउते वर्णू मी तुझे गुण । म्हणोनिया विनय होऊन । करी नमन पायांसी ॥१४॥

वर्णनीय करावी सेवा । ह्रासी वसा लागला जीवा । तरि कृपा करोनि देवाधिदेवा । हेतु पुरावा दीनाचा ॥१५॥

एवढा उपक्रम करितां । आळस न करिसी सद्गुरुनाथा । सुताचा हेतु केउता । पूर्ण करितां तुम्हांस ॥१६॥

पूर्ण कृपेचे देता दान । मग ते न पडे कदा न्यून । यासाठी प्रीति करून । वंदी चरण विनयत्वे ॥१७॥

मागे तुजे त्वांच बोलविले । निरूपण रसाळ चालविले । पुढेहि पाहिजे सांभाळिले । कृपाबळे आपुल्या ॥१८॥

गतकथाध्यायी वरदान । देवोनि देव पावले स्वर्गभुवन । कैलासी करोनिया शिवार्चन । विधि स्थापन सत्यलोकी ॥१९॥

तेथे विष्णूने शिवासी । विचारिले जातो वैकुंठासी । आपण जावे स्वस्थळासी । लोभ मानसी असू द्या ॥२०॥

शिव म्हणे एकटे जावे । हे काय तुम्हासी बरवे । हरि म्हणे तुम्हां शीण द्यावे । काय करावे ऐसे पैं ॥२१॥

मागुती बोले उमावर । काय असे तो क्षीरसागर । म्हणोनि रहावे उगेचि दूर । हे तो वैकुंठपुर असे की ॥२२॥

हे मागिले अध्यायी संपले । ते श्रोतेजनी अवधारिले । पुढे सद्गुरुकृपे जे चाले । ते श्रवण केले पाहिजे ॥२३॥

शिवदेवाची आवडी देखोन । विनोदे बोले नारायण । ते चमत्कारिक वचन । करा श्रवण सकळही ॥२४॥

अहो या भूलोकाचे ठायी । नाना आचरणे करिती पाही । जैसी ज्याची कमाई । तैसेचि ठाई ते पावती ॥२५॥

अहो जी शिवा चंद्रमौळी । हे माझिया बोलाची नव्हाळी । तुम्ही साठविजे हृदयकमळी । इतर सकळ ऐकिजे ॥२६॥

कोण्ही भाविक भक्त जाण । प्रेमे करिती लिंगार्चन । कोणी राजोपचारे करोन । कोण्ही साधारण पंचोपचारी ॥२७॥

कोणी करिती प्रदोषव्रत । कोणी सोमवाराते आचरत । कोणी शिवरात्री नेमयुक्त । कोणी व्रतस्थ निराहारी ॥२८॥

कोणी उपासना अनुष्ठानी । कोणी बैसले जपध्यानी । कोणी आहारविहाराते करोनी । कोणी भजनी निवटले ॥२९॥

कोणी शिवा तुजसाठी । भोगिती नाना दुःख कचाटी । कोणी द्विज भोजनाच्या पाठी । कोणी हठी दिगंबर ॥३०॥

ऐसे बहुविधा करिती आचरण । हेही त्रिगुणात्मके पृथक पूर्ण । परि उभय भाग पडती निवडोन । सकाम लक्षण निष्काम ॥३१॥

सकामिका प्रसन्न होसी । गुणाऐसी फळे देसी । देता काही न विचारिसी । भोळा होसी शंकर ॥३२॥

जये निष्कामे दयाळा । तुज अर्चिले जाश्वनीळा । तयाचा करिसी बहुत सोहळा । अमृतफळा अर्पिसी ॥३३॥

कोणा करिसी कैलासवास । कोणासु दिसी कंठमाळिकेस । कोणा देसी स्वरूपतेस । इच्छित आस पुरविसी ॥३४॥

तेवीच ब्रह्मार्चनी जे जन । तया सत्यलोकीचे सन्मान । जे करिती यज्ञदान । संतर्पण बहुसाल ॥३५॥

षोडशोपचारे द्विजा अर्चिती । उत्तम उपभोगादि अर्पिती । घाट देवालये बांधिती । देव पुजिती सोपस्कार ॥३६॥

धर्मशाळा अन्नसत्रे । गोभूरत्ने दाने विचित्रे । नानारसादि तिलपात्रे । वह्ने छत्रे शिबिरे ॥३७॥

नाना अलंकार धातू । अग्र आहार द्विजा देतू । वस्त्रे भूषणे विख्यात । प्रीती अर्पितू ग्रामक्षेत्रे ॥३८॥

सदावर्ते ऋतुसेवने । आसने वसने शय्यासने । नाना धान्य आणि धनें । उपायने सुंदर ॥३९॥

कूप बारवा विहिरी । छाया शाळा नानापरी । विद्याग्रंथ कळा कुसरी । दाने करी विविध ते ॥४०॥

ऐसिया अनंतदाना । देवोनि तोषवी द्विजगणा । काही लौकिकसंबंधी अर्चना । तीर्थ क्षेत्रे उपासना यात्रा करी ॥४१॥

ऐसे पुण्य आचरता । मग येतसे तो स्वर्गपंथा । अमर होय सत्कारिता । सुख संतोषता दे तया ॥४२॥

भागाऐसे भोग देती । किर्ति तोवरीच राखिती । ते सरता लाटोनि देती । जन्म पावती भूलोकी ॥४३॥

त्रिगुणात्मके पुण्यराशी । फळेहि भोगविती तयाऐसी । राज्यवैभव संपत्तीसी दारा कलत्रासी कर्माऐसे ॥४४॥

तेवीच सूर्यउपासक । तयासी प्राप्त भानुलोक । पुण्य सरता आवश्यक जन्मा अचूक घालिती ॥४५॥

ऐसेची ते शाक्त जाणा । करिती शक्तीची उपासना । भक्ष-अभक्ष नाना । मदिरापाना करिताती ॥४६॥

पात्रापुढे ठेवोनि पात्र । रजनी पूजा करिती विचित्र । मांस मदिरा अपवित्र । प्रसाद पवित्र म्हणती त्या ॥४७॥

शक्तिमंत्रे करिती हवन । उत्तम वाममार्ग ऐसे म्हणोन । आवडीने करिती सेवन । म्हणती पावन आम्ही झालो ॥४८॥

प्रसंगी येऊ न देती कोणासी । आलिया बलात्कार करिती त्यासी । कुश्चळ कर्म करोनि वेगेसी । शेखी परासी पै भीती ॥४९॥

मांस मदिरे भरिती पोट । कदा कोठे न करिती बोभाट । म्हणती जगामाजी श्रेष्ठ । भाग्य वरिष्ठ आमुचे ॥५०॥

अनाचारी पाप समूळ । आचरती ऐसे ते चांडाळ । तयांचे पहाता मुखकमळ । करावे तत्काळ सचैलाते ॥५१॥

ऐसिया नरा जेथे वस्ती । तेथे पापाचे पर्वत निश्चिती । त्यासी नाही स्वर्गप्राप्ती । जन्मपंक्ती अघोर ॥५२॥

शाक्त नोव्हेत हे गधडे । अभिमानेंचि माजले रेडे । मांस भक्षणाच्या सुरवाडे । वाम निवाडे आचरती ॥५३॥

कोण वाम कैसा प्रकार । कोण फळ काय चमत्कार । ह्या तो नेणतीच विचार । जगी अनाचार भ्रष्टविती ॥५४॥

तया न चुके गर्भवास । अंती जाती अघोरास । सुटका नोव्हेचि तयांस । तुमचिया पदास यावया ॥५५॥

ज्या ज्या दैवता भजावे । त्या त्या लोकाप्रती जावे । पुण्य सरता फिरोनी यावे । जन्म भोगावे जीवांनी ॥५६॥

पुण्ये करोनि स्वर्गा येती । तुमचे पदी सुख भोगिती । पुण्य सरता जन्मा जाती । न सुटे पंक्ति त्यांच्या ॥५७॥

जे का अधर्मीपापीजन । तेही न राहती भूलोकी पुर्ण । तयालागी स्वर्गभूवन । प्राप्त मान होतसे ॥५८॥

स्वर्गाचे पैल हा यमलोक । येथे जीव येती आवश्यक । अंशावाचोनि तोही देख । न मिळे दुःख तेथीचे ॥५९॥

तया अंशाचा प्रकार । अल्पचि कथितो निर्धार । सांगू जाता विस्तार । होईल उशीर आपणाते ॥६०॥

स्वकर्माते निंदिती । परधर्माते आचरती । दुष्ट कर्मी पापमती । निंदा करिती परांचि ॥६१॥

गुरुद्रोह करी जार । पितृदोह करी पामर । कपटी घातक थोर । अनाचार दाहक ॥६२॥

वृत्ति भूमि उच्छेद । रिक्त वाढविणे उगेची द्वंद्व । भोजनी करणे प्रपंच भेद । रिक्त अपवाद असत्यता ॥६३॥

देवागार मंदिरभंग । कथापुराण विघडी रंग । नाच भोरपी होणे दंग । हृदयभाग दयाहीन ॥६४॥

जारण-मारण उच्चाटण । यंत्र मंत्र मोहनस्तंभन । घात पात विलक्षण । दिवा मैथुन आवश्यके ॥६६॥

कन्याविक्रय रसविक्रय । भाबड्यासी दाखवी भय । स्त्री बाळ गुरुहत्यारा होय । अभक्ष खाय चांडाळ जो ॥६७॥

अविश्वासी विश्वासघातक । प्रसाद लिंगभंग करी देख । मार्गघ्न विपटपाडक । पीडक धाडक मारक जो ॥६८॥

सत्कर्मी करी विक्षेप । साधुसंतांसी दे ताप । जीवजंतूंचे कोंडी आप । दे संताप वडिलवृद्धां ॥६९॥

ऐसे जया गाठी असे धन । तो जाय यमपुरीलागोन । तेथील संस्कार भोग भोगून । भूलोकी पतन तया घडे ॥७०॥

जैसे जया धन गाठी । तैसीच तया जन्मराहाटी । न सुटे कर्म लागले पाठी । घोटाघोटी घोटवी ॥७१॥

पुण्य करोनि सुख भोगावे । पापे करोनि दुःखी फिरावे । परी जीवन्मुक्त व्हावे । ऐसे ठावे न पडेची ॥७२॥

ऐशीच लोकलोकांची गती । पुण्यपापे सर्व भोगिती । परी चुकवावया पुनरावृत्ती । उभयप्रती न दिसे ॥७३॥

हे सर्व लोकांचे कारण । तुम्हा सर्वा केले निरूपण । आता आमुचे प्रकरण । तेही निवडून सांगतो ॥७४॥

जे माझिया उदेसी । चटक लागली जयांसी । तयांची आचरणे कैसी । सांगतो तुम्हांसी ऐकिजे ॥७५॥

निस्पृह निःसंग निर्द्वंद । नैराश्ययोगे माझे वृंद । वृत्तिशुद्ध भूती अभेद । करिती अनुवाद ज्ञानचर्चा ॥७६॥

कोणी भोळे भाविक असती । कोणी वीतरागयोगे फिरती । जे जे कर्म करिती । मज यजिती सर्व भावे ॥७७॥

करिती आवडी कथाकीर्तने । अर्चने वंदने पादसेवने । मत्कथामृतांची श्रवणे । आत्मनिवेदने साधिती ॥७८॥

कोणी राहिले करोनि भजन । कोणी सख्यत्वयोगे विनटले पूर्ण । कोणी दास्यत्व राहिले करून । मनन ध्यान वेगळेची ॥७९॥

दिंड्या पताका उभविती । ढोल दमामे लाविती । टाळ विणे मृदंग वाजविती । छंदे नाचती गाती गीत ॥८०॥

परम आल्हादे करून । टाळिया चुटक्याते वाजवून । मद्रूपी होवोनि तल्लीन । देहभान विसरती ॥८१॥

आत्मत्वाचा करिती विचार । जाणोनि घेती सारासार । काम क्रोध मद मत्सर । दंभ अहंकार दवडिती ॥८२॥

ज्ञानचर्चे भरविती गुजरी । कैची तेथे पापा उरी । दिवानिशी नामगजरी । उठती लहरी प्रेमाच्या ॥८३॥

कित्येक करिती जप अनुष्ठान । आवडी आरंभिती स्तोत्रपठण । मदर्थी उपावसघन । करिती आचरण सप्रेमे ॥८४॥

सर्वां भूती धरोनि भाव । पूजोनि म्हणती ह्या देव । निष्ठा भक्ती अनन्य द्रव । सतले वैष्णव परम प्रीती ॥८५॥

जागृती स्वप्न सुषुप्ती । मजची भावे ते भजती । सगुणमूर्ति उपासिती । निर्गुणी निरखिती कित्येक ॥८६॥

सर्वस्व माते अर्पिले । आपण लडिवाळपणे राहिले । मातेचि तेणे बोभाइले । तैसेचि आले होणे मज ॥८७॥

त्याचे सर्व मजचि जाणणे । नाना रूपे अवतार धरणे । संकट तयाचे निवारणे । छाया करणे स्वआंगे ॥८८॥

तेणे प्रेमसूत्रे बांधिले मजसी । नाचविल्या ऐसे नाचणे निश्चयेसी । भुललो तयाच्या भक्तिसी । न सांगता आम्हासी जाणाणे ॥८९॥

सकळांमाजी थोर । मम वैष्णवाचा अधिकार । तो मुखे वर्णी मी मुरार । तुम्हासमोर परिसा ते ॥९०॥

हे जगतीची तीर्थे सकळ । पातके भरित होती विपुल । ते वंदिती संतचरणकमळ । तै निर्मळ होती ते ॥९१॥

जीव आचरे अनंत दोषराशी । प्रायश्चित्ते नेमिली त्यासी । तो सहज भेटला वैष्णवासी । ठाव दोषासी नुरे मग ॥९२॥

कृपे तयाते अंगिकारिता । नतची होणे आले प्रायश्चिता । राहिली त्याची योग्यता । वैष्णव सत्ता आअळी ॥९३॥

यम तयाचा होवोनि किंकर । जोडोनि राहे सदा कर । म्हणे वैष्णव हे अनिवार । आमुचा व्यवहार खुंटविला ॥९४॥

देखोनि तयाची योग्यता । दूतासी होय आज्ञापिता । तुम्ही न कीजे यथे सत्ता । जेथे हरिकथा नामघोष ॥९५॥

वैष्णव राहती जये स्थळासी । नका जाऊ तये सीवेसी । मृत्यूसी म्हणे कीर्तनरसी । तुवा जीवासी नाणिजे ॥९६॥

आणिक एक नवलाव । तोही निवेदितो अपूर्व । श्रवण करा तुम्ही सर्व । अघटित वैभव संतांचे ॥९७॥

प्राणी आचरे पाप अपार । मर्यादेहूनि अतिथोर । न करवे प्रायश्चित्तासी अंगीकार । परम दुर्धर म्हणवोनी ॥९८॥

तीर्थी जो निवडोनी सांडिला । देवक्षेत्रांणी मोकलिल । महातपोधनी दवडिला । पहा तयाला दूरी हो ॥९९॥

ऐसा जो पाप्यांचा शिरोमणी । जया ठाव नेदीच मेदिनी । तो लागतांचि संतचरणी । होय धुनी पापाची ॥१००॥

संती करिता अंगीकार । तो मज मान्य होय निर्धार । हे वैष्णव मजहोनि थोर । प्राणप्रियकर मी मानी ॥१॥

हरि म्हणे उमापती । ऐसी मद्भक्ताची हे ख्याती । मी प्रसन्न तया होवोनी श्रीपती । देतो प्रीती बहुएक ॥२॥

संतति संपत्ति धन । भोग वैभव ऐश्वर्य पूर्ण । परी ते वैराग्यसंपन्न । देती लोटून परतेची ॥३॥

सिद्धी ऋद्धी देता त्यासी । आणि तया भुक्तिमुक्तीसी । ते अनिवार नेघे तयासी । हाणोनि लातेसी दवडिती ॥४॥

मेदिनिचे राज्य देता । ते नयेचि तयांच्या चित्ता । नामभजनी सप्रेमता । न इच्छिती परता लाभ दुजा ॥५॥

ऐसे तया देखोनि उदास । सदय मी तया जगन्निवास । विमाने पाठवोनि वैकुंठास । आणवि तयांस प्रीतीने ॥६॥

देवोनि तयांसी आलिंगन । सलोक समीप स्वरूप सायुज्यपण । हे तयाते करोनि अर्पण । वैकुंठभुवन वसविले ॥७॥

चारी मुक्ति नावडे ज्यासी । ह्रदयी साठवी मी तयास । परी मागुती जन्मासी । भूलोकांसी न धाडी ॥८॥

माझे चरण सुखे सुखावले । ते मजमाजीच समावले । न करी तया आपणावेगळे । जळी विराले सैंधव जैसे ॥९॥

चारी मुक्तीस झाले पावन । ते हीन जाती मज सांडोन । मी न दवडी तयालागून । पतितपावन यासाठी ॥११०॥

शिवा जे वैकुंठासी आले । कोणीच नाही परतले । मीच होवोनि जरी धाडिले । पुन्हा आणिले म्या स्वपदासी ॥११॥

पुण्यराशी आचरोन । पावती तुमच्या पदा येवोन । परी न चुके त्यांचे जन्ममरण । वैकुंठस्थान ऐसे नोव्हे ॥१२॥

आपण येऊ म्हणता वैकुंठासी । आणि आम्हीन्यावे तुम्हांसी । आश्चर्य वाटे मम चित्तासी । शिवा मानसी विचारिजे ॥१३॥

तेथे येवोनि परतता । दुःख वाटे माझिया चित्ता । तव शिव झाला हास्य करिता । बरवा अनंता तू होसी ॥१४॥

हे लोकालोक कासया वसविले । पदे का विभक्त स्थापिले । वैकुंठची का नाडी केले । आम्हा चांगले सर्वांशी ॥१५॥

ही सर्व तुझीच गा सत्ता । अनेक लीला तुझीच अनंता । आम्हा बोल कासया देता । कर्ता करविता तूचि पै ॥१६॥

केशवा तुवांचि आज्ञापून । हा औट हात पिंड केला निर्माण । तेथे इंद्रियांचे अधिष्ठान । केले निर्माण दशविधा ॥१७॥

तेथे तरी तूचि सूत्रधारी । कळसूत्रा ऐसी हालविसी दोरी । वर्तवितोसी पृथक परी । समत्व सरी का ते नसे ॥१८॥

तया विभक्तची अधिकार । स्थापिले असती साचार । येरयेरांचे काज कर । का गा निर्धार न होती ॥१९॥

नेत्र अवलोकनची करावे । ते नसता नाकेचि पहावे । मुखीचे काज श्रवणे सारावे । होईल बरवे वाईट तरी ॥१२०॥

श्रवणीचे काज सांगता करा । गुद न जेववी निर्धारा । शिस्नेच लवेचि धरा । नेत्रद्वारा मकरंदू ॥२१॥

येर येरांचे न येती काजा । नेमिल्या मार्गा न सोडिती वोजा । करुणाघना अधोक्षजा । गरुडध्वजा लीला तुझी ॥२२॥

नेत्रे करोनी पहावे । श्रवणे करोनि ऐकावे । मुखे करोनि बोलावे । नासिके घ्यावे मकरंद ॥२३॥

कर योजिले बहुप्रसंगी ॥ गुद नमिले मळत्यागी । शिस्न गुंतविले भोगी । गमनप्रसंगी चरणची ॥२४॥

ऐसे नेमोनि व्यापार । चालवी पृथकाकार । सेखी वेगळा तू सूत्रधार । पाहे विचार तुझा तू ॥२५॥

तेवीच हे लोकालोक आज्ञेऐसे वर्तती देख । अधिकारपरत्वे अलोलिक । तुझे कामुक वागती ॥२६॥

सकळ पदांहोनि श्रेष्ठ निवडिले येथे औटपीठ । सत्य कैलास वैकुंठ । अर्धपीठ वेगळे ॥२७॥

तीन पीठींचे विचार । वेगळेचि दाविले चमत्कार । लीलालाघवी तू सर्वेश्वर । सर्व अधिकार तुझेची ॥२८॥

अर्धपीठ सर्वांचे मूळ । तो तूचि होसी तामाळनीळ । येर हे रचिले माइक ढिसाळ । तुझे खेळ खेळी तू ॥२९॥

विराट हाचि तू ब्रह्मांड । ब्रह्मांडगर्भीच पिंड । ऐसेचि दाविले तेथे वाड । केला निवाड औटची ॥१३०॥

लोकलोका दिवसणे । आम्हा तुम्हाही तेथे असणे । पाहता एकही नसे उणे । समसमाने अर्ध पीठ ॥३१॥

जोवरी नेमिली मर्यादा । तोवरीच मान या पदा । ते सरतांचि गा परमानंदा । आनंदकंदा तुजमाजी ॥३२॥

ऐसे बोलता श्री शंकर । आनंदे निर्भरे रमावर । आलिंगनी मिसळले सुरवर । जयजयकार करिताती ॥३३॥

दुंदुभी वाद्ये नाना वाजती । आपुलाले वहनी आरूढती । परम महोत्सव सकळांप्रती । उंचावती विमाने ॥३४॥

पाहावया वैकुंठपुर । देवाप्रती आनंद थोर । मार्ग क्रमिती अतिसत्वर । हरिपद सुंदर लक्षिती ॥३५॥

देव निरखिती दुरोन । कळस देखिला दैदीप्यमान । पाहता झाकोळति नयन । वाद्ये सघन वाजती ॥३६॥

त्या वाद्यध्वनीसी ऐकता । तो नाद झाला सकलांसी वेधिता । गंधर्व विसरले गाता । अप्सरा नाचता राहिल्या ॥३७॥

जैसे नादध्वनी करून । कुरंग विसरले देहभान । की उरग डोलवोनि फण । अतितल्लीन होय जेवी ॥३८॥

तेचि गति झाली देवांसी । त्या नादे मोहीत झाले मानसी । देह गेह नाठवे कोणासी । मुख्य आपणासी विसरले ॥३९॥

देखोनि सकळांचे अवसान । गदगदा हासे जगज्जीवन । तो समीप देखिले वैकुंठभुवन । प्रकाश गहन रविकोटी ॥१४०॥

प्रकाश नेत्रे झाकोळले । वाद्यनादे मन मोहिले । शिवभूषणे डोलो लागले । ध्यानी गुंतले विलक्षण ॥४१॥

मनी विचारी सर्वोत्तम । पाहू आलेति वैकुंठधाम । प्रथम नादप्रभे पावले भ्रम । पुढील क्रम कैसा तो ॥४२॥

मग शिवाते सावध करोनी । वदता झाला चक्रपाणी । आवलोकाया देवांलागुनी । लक्ष भूषणी ठेवावे ॥४३॥

शिव सावधाने पाहत । तव सकळांच्या वृत्ती झाल्या गलित । नुघडे कोणाचे नेत्रपात । आश्चर्यवत पै झाला ॥४४॥

शिव जाणोनि त्या वर्मासी । काय बोले सर्वोत्तमासी । कृपा करोनि आता यांसी । दिव्यदृष्टीसी देइजे ॥४५॥

तू न करिसी या कृपादान । तरी केवी पाहतील वैकुंठभुवन । हे अनाथ असती दीन । कैची आंगवण पाहावया ॥४६॥

शिववचने हरि संतोषला । दिव्य चक्षू देता झाला । कृपाकटाक्षे सकळा । सतेज कळा दिधली ॥४७॥

सावधाने पाहती सुर । तव विमाने दाटली दिसती अपार । चतुर्भुज अवघे नर । श्यामसुंदर दिसती ॥४८॥

नाना रूपे दिव्य आकृती । मुगुट पीतांबर झळकती । शंख चक्र गदा मिरविती । पद्म हाती सतेज ॥४९॥

सतेज अलंकारमंडित । कर्णी कुंडलप्रभा फाकत । रत्नमुद्रिका करी मिरवत । विमाने झळकत तेजाकार ॥१५०॥

तव विंतत घन सुस्वर । वाद्ये वाजती अपार । घंटानाद रव होती मधुर । गायने तनदर होताती ॥५१॥

ध्वज पताका तळपती । गुढिया तोरणे डोलती । छत्रे चामरे मिरवती । भाटीव करिती बंदिजन ॥५२॥

ऐसे वैष्णववीर अनंत । श्रीअनंतासी सामोरे येत । ते देखोनी देव समस्त । आश्चर्यवत मानसी ॥५३॥

वैष्णवी आलिंगनी मिसळले । रमाधवाचे पायी लागले । मुंडपघसणी तये वेळे । रत्न विखुरले भूतळी ॥५४॥

वैष्णव भेटती सुरांसी । म्हणती माधवची भेटला आम्हांसी । ठक पडिले सकळांसी । मुख्य हरिसी नोळखती ॥५५॥

जिकडे तिकडे पाहती देव । तो अवघाची दिसे वासुदेव । रिता नसे कोठे ठाव । रमाधव व्यापला ॥५६॥

असो ऐशा सारोनी भेटी । पुढे चालिले उठाउठी । पाहता वने उपवने गोमटी । पडती दृष्टी कल्पतरूंची ॥५७॥

कामधेनू चरती वनी । गणती नसे पाहता नयनी । उत्तम पक्षियांचे ध्वनी । ऐकता कानी सुरवर ॥५८॥

पाहती ऐकती करिती गमन । पुरद्वार देखिले विशाल गहन । तेथे नारी उभ्या कलश घेवोन । आरत्या उजळोन सिद्ध पै ॥५९॥

घनःश्याम सुंदर ओवाळिला । पुढे देवसुरांचा भार चालिला । वैकुंठ विलोकिता डोळा । अनुपम्य लीला तेथीची ॥१६०॥

हाट चव्होटे सुदर । मणिमय रत्नखचित गोपुरे । चिंतामणीची विशाल धवलारे । सहज शृंगारे शृंगारली ॥६१॥

चतुर्भुज तेथे नरनारी । मंगल गीत गाती घरोघरी । दिव्य रूप कनकांबरी । सालंकारी शोभती ॥६२॥

मुख्य मंदिराजवळी येता । हरी उतरे विमानाखालता । करि धरोनी उमाकांता । सवे विधाता वामभागी ॥६३॥

गरुड सन्मुख जोडोनी पाणी । जय विजय गर्जती वाणी । देवभारासह चक्रपाणी । सभारंगणी पावले ॥६४॥

मुख्य सिंहासनावरी । माधवे बैसविला त्रिपुरारी । सकळा बैसका देवोनि सत्वरी । आदर स्तकारी सकळांते ॥६५॥

तव लक्ष्मी आली सदनांतून । दिव्य अलंकारमंडित पूर्ण । पंचारती करी घेऊन । करी अक्षवण शिवाते ॥६६॥

मग आणोनि पूजासंभार । भावे षोडशोपचारे पूजिला हर । देवा देवोनि आमोद माल्यहार । वांटी चीर अधोक्षज ॥६७॥

सकळा पाववोनी सन्मान । वंदी उमावराचे चरण । अत्यादरे करोनि स्तवन । तोषवी नारायण सकळांते ॥६८॥

छत्रे चामरे उभविली । शिवमस्तकी स्वकरे ढाळी । तव करी घेवोनि चंद्रमौळी । एकमेळी बैसले ॥६९॥

शिव म्हणे कमळावरा । तू माझा परात्पर सोयरा । येरू म्हणे जी दातारा । काय उत्तरा बोलता ॥१७०॥

तव बोलतसे शेषशयन । तुम्हा जो जीवीचे जीवन । म्या करावे चरणसेवन । हे उचित जाण आम्हांसी ॥७१॥

तूची माझा सद्गुरु । सकळ नियंता ईश्वरू । कोणा न कळे तुझा पारू । महिमा अपारू तुझा की ॥७२॥

शिव म्हणे देवाधिदेवा । ऐसे काय वदसी केशवा । मी जाणतो तुझिया अनुभवा । ह्रदयी माधवा जपे तुज ॥७३॥

ऐसे आनंदे करिता भाषण । दोघे समरस झाले पूर्ण । हरिहररूपे प्रगटोन । दिल्हे दर्शन सकळांसी ॥७४॥

सुर पाहती चमत्कार । सिंहासनी देखिले हरिहर । विधाता धावोनी सत्वर । पदी शिर वोपित ॥७५॥

पुनरा लक्ष्मी येऊन । करिती झाली तेव्हा पूजन । जयजयकारे सुरगण । पुष्पे सघन वर्षती ॥७६॥

नृत्यकळा देवांगना । नारद तुंबर करिती गायना । वैष्णव करिती कीर्तना । विद्याधर स्तवना आरंभिती ॥७७॥

सभेमाजी ब्रह्मानंद । देखोनि अमरसुरा आनंद । झाल्या वृत्ती अभेद । ह्रदयी सद्गद पाहता ॥७८॥

तेथील पाहता अद्भुतलीला । आला स्वपदाचा कंटाळा । म्हणती सर्वेशा सुंदरा घननीळा । ठाव चरणकमळापासी दे ॥७९॥

नको आम्हांसी तो पदभार । येथेचि ठेवी गा निरंतर । गोडी नित्य नवी अपार । वैष्णववीर असती येथे ॥१८०॥

आम्हांसी देवा त्वा ठकविले । सुख वैष्णवां दिसे आगळे । आम्हा सोडविले पाहिजे ॥८१॥

जावे आपुलिया स्वपदासी । ऐसे न वाटेची मानसी । कमळावरी ह्रषीकेशी । पावन आम्हासी करा वेगी ॥८२॥

ऐशा आनंदसंवादी । विराल्या वृत्ती जडली समाधी । जावे आपुल्या स्वपदी । हे तो बुद्धी न वाटे ॥८३॥

ऐसे देखोनी सर्वेश्वर । पृथक रूपे धरिली सत्वर । रमावर आणि उमावर । करिती विचार मानसी ॥८४॥

शिव म्हणे श्यामांगा । बरवे दाविले आजिच्या प्रसंगा । येणे खेळचि हा उगा । रमारंगा राहिला की ॥८५॥

सुर होवोनि आनंदघन । स्वरुपी जालेती निमग्न । देह गेहाचि आठवण । गेले विसरून तव कृपे ॥८६॥

याते सावधान करावे । स्वपदा वेगी पाठवावे । हे परिसोनी केशवे । लीलालाघवे काय करी ॥८७॥

मायातीत जाले सुरगण । त्यासी घाली माया आवरण । त्वरित करी सावधान । लावी व्यवधान पाठीसी ॥८८॥

हे देखोनी उमावर । म्हणे द्यावी आज्ञा जी सत्वर । अवश्य म्हणे तेव्हा शारंगधर । कृपा अपार असावी ॥८९॥

सकळ वंदोनी हरिचरणा । म्हणती दया करी मनमोहना । तात्काळ चढोनी विमाना । वैकुंठरचना पाहिली ॥१९०॥

शिवासहित सुरांसी । बोलाविता झाला ह्रषीकेशी । आपुलिया स्वस्थळासी । अति वेगेसी पावले ॥९१॥

सिंहावलोकने करून । श्रोते परिसिजे मागील कथन । तिन्ही देव देवोनी वरदान । आपुले स्वस्थान पावले ॥९२॥

यानंतरे अनसूयासती । जाली नित्य कर्मासी आचरती । पतिचरणी ठेवोनी प्रीती । सेवे निश्चती सादर ॥९३॥

ऐसे लोटता काहीएक दिन । तव अनसूया जाली गर्भीण । दिवस मास लोटता जाण । तेज गहन दिसो लागे ॥९४॥

अघटित लीला विश्वंभरी । मायामय गर्भ दावी झडकरी । कोण्हा न कळे ती परी । बाज्यागरी खेळ जेवी ॥॥९५॥॥

भरत आले सप्त मास । जाली संसारी उदास । करावा वाटे तापस । तम विशेष अंगी चढे ॥९६॥

जव जव अनसूयेचा गर्भ वाढत । तव तव अत्री आनंदभरित । मनी म्हणे कृपावंत । हरि समर्थ झाला की ॥९७॥

असो नवमास पूर्ण जाले । प्रसूतकळेने व्यापिले । ऋषिपत्न्या येवोनि ते वेळे । झांकिती डोळे तियेचे ॥९८॥

तव तो भाग्याचा सुदिन । प्रसव न कळे कवणालागून । अनसूयाही जाली उन्मन । प्रगटले सगुण बाळ पुढे ॥९९॥

पाहता सतेज शुद्ध देखिला राजस । वेगी न्हाणिले घेवोनी बाळास । स्नेहे माखोनी सुरस । सर्वेंचि अनसूयेस न्हाणिले ॥२००॥

वेगी आणोनी मधुबोळा । देती प्रौढा तया बाळा । वोसंगा देवोनी सोहळा । सेजे सुढाळा पहुडविती ॥१॥

जाणत्या चतुरा कामिनी । अनसूयेसी देती औषधपाणी । पथ्य घालती जपोनी । दिनरजनी सांभाळिती ॥२॥

ऐसे लोटता चार दिवस । करिती पूजन पांचवीस । ऋषि आरंभिती रात्रिवर्गासी । करिती विलास जागरणी ॥३॥

जननसुतक दश दिन । एकादशेसी शुद्ध स्नान । स्वधर्मादि आचरण । पंचमहायज्ञ देवपूजा ॥४॥

बाराव्यासी बारा बळी । पूजोनिया यथा काळी । सकळ पाचोरोनि ऋषिमंडळी । भोजने सारिली आनंदे ॥५॥

बारावीची बारसे । करोनिया अति उल्हासे । संतोषवूनी सकळांची मानसे । सुखसंतोषे बैसती ॥६॥

मग जन्मकुंडली काढोनी । ऋषी बैसले जातकवर्णनी । म्हणती हा बाळ तमोगुणी । तपाचरणी दक्ष पै ॥७॥

श्रेष्ठत्वे हा होईल थोर । सवे वागवील ऋषींचे भार । आपुले तपतेजे अनिवार । छळ दुर्धर करील हा ॥८॥

जिकडे तिकडे सन्मान । भूप होतील अनन्यशरण । हे ऐकोनी सुखसंपन्न । ब्रह्मनंदन होय पै ॥९॥

ऐशापरी निशी संपता । तो उदय पावला अवचिता । नित्यक्रम सारोनि अतौता । ऋषिकांता मिळाल्या ॥२१०॥

पाहोनिया सुवेळ । पालख लाविला तात्काळ । अळंकार वस्त्री सजविला बाळ । तेवीच वेल्हाळ श्रृंगारिली ॥११॥

चौक भरोनी वेगेसी । वरी बैसविले अनसूयेसी । आडवे देवोनिया बाळासी । अक्षवणासी आरंभिले ॥१२॥

अक्षवणाची परवडी । सारिली करोनिया तातडी । जीवी नामाभिधानाचि गोडी । मुहूर्तघडी साधिती ॥१३॥

चांदवे डोल्हारा खेळणी । पालखावरी दिव्य लावोनी । बाळ पालखा निजवोनी । गीत गावोनी हलविती ॥१४॥

काय नाम ठेवावे यासी । विचार पडिला सकळांसी । तव आठव झाला अनसूयेसी । शंकरे मजसी निवेदिले ॥१५॥

म्हणे बाया हो न करा चावटी । माझी ऐका तुम्ही गोष्टी । ह्या अवतरलासे धूर्जटी । महा ह्याटी तामस ॥१६॥

याचे नाव ठेवा दुर्वास । हेची इच्छी माझे मानस । गोष्ट मानली सकळांस । तेची तयास बोभाती ॥१७॥

अगा दुर्वासा सुकुमारा । जो जो म्हणुनी हालवी सुंदरा । गीत गावोनिया लेकुरा । हारकुरा करिताती ॥१८॥

गावोनि नाना परीचे गीत । नाम दुर्वास ठेविले विख्यात । मागुती उचलोनी त्वरित । वोसंगा घालित अनसूयेच्या ॥१९॥

आनंदे करिती जयजयकार । हळदीकुंकुमे वाटिती सुंदर । तांबूल शर्करा देवोनी सत्वर । खिरापती अपार देताती ॥२२०॥

ऐसा करोनि आनंदसोहळा । नरनारी बोळविल्या सकळा । अनसूयेशी मोह जिव्हाळा । पाजी बाळा प्रीतीने ॥२१॥

नित्यानित्य आनंद । अत्रि अनसूयेसी आल्हाद । पुढे अवतरेल परमानंद । आनंदकंद जगद्गुरु ॥२२॥

तोचि मम ह्रदयी राहोन । आपुले आपण वदवी गुण । सकळासी करावया पावन । चरित्र गहन दावितो ॥२३॥

मी कोण येथे करिता । दत्तची असे बोलविता । त्यावीण न चले काही सत्ता । मज निमित्ता केले पुढे ॥२४॥

सकळ दीनांहोनी मी दीन । अनंतसुत नामाभिधान । आश्रय करोनी संतांचे चरण । राहिलो धरोन प्रेमभावे ॥२५॥

तुम्ही संत कृपासागर । अनंतसुत तुमचा किंकर । करोनि याचा अंगीकार । कृपाकर देइजे ॥२६॥

अष्टाध्यायीचे कथन । तुम्ही करविले कृपा करोन । तेवीच पुढे अनुसंधान । गोड करून घेइजे ॥२७॥

तुम्हा संतावाचोन । मज परतटा नेईल कोण । सर्व भावे मी संता शरण । माझा अभिमान तुम्हांसी ॥२८॥

इति श्रीदत्तप्रबोध ग्रंथ । यासी नारदपुराणीचे संमत । श्रोते परिसोत संतमहंत । अष्टमोध्यायार्थ गोड हा ॥२२९॥

॥ इति अष्टमोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय नववा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ।

जयजय सद्गुरु अनंता । जय कृपाघना समर्था । तू अनन्याचा होसी त्राता । अनाथनाथा नमो तुज ॥१॥

जय सर्वाध्यक्षा गुणसागरा । धीरगंभीरा उदारा । मायातीता परात्परा । दीनोद्धारा नमो तुज ॥२॥

जयजयाजी आनंदघना । जय सद्गुरु ज्ञानसंपन्ना । त्रितापहारका भवमोचना । पतितपावना नमो तुज ॥३॥

तव पदसरोज तारू । आम्हा अनाथासी आधारू । भवार्णवाचा पैलपारू । पावविते निर्धारू सत्य हे ॥४॥

सद्गुरु तुझिये चरणारविंदी । अर्पिली तनमनप्राणेसी बुद्धी । अपंगी दीना कृपानिधी । जन्ममृत्युव्याधी निवटी हे ॥५॥

मी तरी तुझे अज्ञान लडिवाळ । तुज शरणागताची कळवळ । सद्गुरुमाये तू स्नेहाळ । पुरविसी आळ वत्साची ॥६॥

तुझिया कृपाप्रसादे करोन । या ग्रंथी होतसे निरूपण । ते तुजे तू घेसि सांभाळोन । न्यून ते पूर्ण करोनिया ॥७॥

आता पुढील कथारस । तोहि वदविता तूचि सुरस । श्रोते बसले श्रवणास । यांची आस पुरवावी ॥८॥

करिता चरणांचे चिंतन । निरूपणी देसी तूचि स्मरण । तव कृपायोगे करोन। उद्गार वचन निघती ॥९॥

गत कथाध्याय अंती । दुर्वासजन्माच्या निश्चिती । नामकर्मादि सोहोळे निगुती । परिसिले श्रोती सादर ॥१०॥

येथोनि श्रोता सावधान । पाहता कुमाराचे वदन । अत्री अनसूया आनंदघन । लालन पाळन करिताती ॥११॥

हेचि प्रपंचाचे सुख । मंदिरी असावे बाळक । उजळला कुळी कुळदीपक । पुण्य चोख उभयांचे ॥१२॥

योगी तापसी आश्रमा येती । बाळ देखोनी आनंद चित्ती । धन्य उभया वाखाणिती । मुख चुंबिती बाळाचे ॥१३॥

नित्य मंदिरा येती ऋषिललना । आडवा गेह्लोनि खेळविती तान्हा । आनंद अत्री-अनसूयेच्या मना । घेती अंगना इटिमिटी ॥१४॥

अनसूया नित्य अस्तासी । स्वकरे उतरी बालदृष्टीसी । चरणरज लावी भाळासी । खेळवी कौतुकेसी सप्रेमे ॥१५॥

करोनिया पतिसेवन । करी बाळाचे लालन । तेवी अभ्यागताचे अर्चन । समसमान सर्वा राखी ॥१६॥

धन्य माऊली ते पतिव्रता । कधी न करिती तीव्रता । सम राखी सर्व व्रता । निर्मळ चित्ता गंगावत ती ॥१७॥

दिवस मासे बाळ वाढविले । बाळक खेळी खेळते झाले । उभयता आनंदे सुखावले । पाहती उगवले कौतुके ॥१८॥

वेळोवेळा आठविती नारदा । म्हणती पावविले प्रयत्ने वरदा । पुरविले आमुचिया छंदा । पावविले आल्हादा तेणेंचि की ॥१९॥

ऐसिया सुखवार्ता कल्लोळी । उभय आनंदाचे मेळी । सुखे रमती सिंहाचळी । ऋषीमंडळी सभोवती ॥२०॥

ऐसे लोटता काही दिवस । आठव झाला अनसूयेस । त्रिदेवे दिधले वरांस । एका लाभांस पावले ॥२१॥

शेष उरले द्वय अर्थ । ते केधवा होतील प्राप्त । वाया नवजे ते वचनामृत । लाभ मनात व्हावा तो ॥२२॥

केधवा पावेल जगज्जीवन । श्यामसुंदर मनमोहन जाता अनुपम्य बोलिला वचन ॥ तेथे मन वेधले ॥२३॥

असती कुसुमसम ज्याची कांति । सुहास्यवदन जो श्रीपति । चतुर्भुज भव्य दिव्यमूर्ति । वदला वचनोक्ति प्रियकर ॥२४॥

मी त्रिगुणात्मक रूप प्रगटेन । अनसूये बाळ तुझा होईन । तो अजुनि न वळे कृपाघन । कोण कारण करू या ॥२५॥

यापरी अनसूया वेल्हाळी । संचित लाभार्थ ह्रदयकमळी । ध्यानी निरखी मूर्ति सावळी । म्हणे पुरवी आळी कमळाक्षा ॥२६॥

पूर्ण अनसूयेचे वेधले चित्त । ऐसे जाणोनि स्वामी अनंत । ओळखोनी प्रेमा अद्भुत । म्हणे धन्य भावार्थ सतीचा ॥२७॥

शुद्ध देखोनि अंतर कृपे द्रवला विश्वंभर । लीलालाघवी करुणाकर । भाव थोर प्रगटवी ॥२८॥

निस्सीम अनन्यता देखोन । त्याचे निवार स्वयेशीण । पुरवी लळे संपूर्ण । स्वये आपण प्रगटोनी ॥२९॥

दीनबंधु सर्वेश्वर । होय पूर्ण कृपेचा सागर । करावया जगदोद्धार । धरी अवतार स्वलीले ॥३०॥

तो अनुपम सुखसोहळा । होई येथोनि आगळा । पाहावया प्रार्थितो सकळा । उतावेळ चला सर्वही ॥३१॥

अनंतसुत विनवी सज्जना । दया त्या उपजली करुणाघना । अवतार धरितो जगत्कल्याणा । देवराणा सकृपे ॥३२॥

अवतार प्रगटत जगतावर । त्रिविध तापाचा करील परिहार । दुःख दारिद्र्य पीडा पापसंहार । निवटील निर्धार दैन्याते ॥३३॥

प्रगटतांचि ज्ञानदाता । निरसेल सहजे तिमीरता । वारील समस्तांची चिंता । कैची व्यथा उरेल मग ॥३४॥

त्याचे होता कृपादान । जीवाचे मिटले जन्ममरण । मागुती न पवेल बंधन । भवभयमोचन करील तो ॥३५॥

यास्तव प्रार्थना तुम्हांसी । चला त्वरा करा वेगेंसी । सोडा माईक व्यवधानासी । साधा लाभासी निजलोभे ॥३६॥

हे महापर्व उत्तम । साधिता पावेल सुखधाम । पूर्ण होतील सकळ काम । सर्वां विश्राम या पदी ॥३७॥

आदिअनादीचे बीज । तुम्हा साधुसिद्धांचे निज । पुरवावया सकळांचे चोज । साकार सतेज प्रगटे पाहा ॥३८॥

जे अगमानिगमाचे सार । जो श्रुतीगर्भीचा गुह्य विचार । जो का व्यापक सर्वांतर । तो परात्पर प्रगटे पाहा ॥३९॥

जे शिवहृदयीचे ध्येयध्यान । जे सनकादिकांचे आराध्य पूर्ण । जे प्रणवाचेही कारण । होवोनि सगुण प्रगटे पाहा ॥४०॥

आनंद सिंहाचळ पर्वती । स्वानंदे ऋषिसमुदाय वसती । अनुलक्षे तपाचरणी मिरवती । तपश्री संपत्तीसमवेत ॥४१॥

माजी भक्ती अनूसया विराजमान । नवविधायोगे मंडित भूषण । पतिव्रता धर्मसद्गुण । ती माहेरपूर्ण पांथिकांची ॥४२॥

ब्रह्मरूप अत्रिमहाराज । तपे भास्कर तेवी सतेज । सभोवता ब्रह्मसमाज । दुर्वास आत्मज शिशु शोभे ॥४३॥

केवळ ज्ञानाचा आगर । अंगी वैराग्याचा भर । शांति क्षमेचा सागर । दयाभूत अंतर जयाचे ॥४४॥

उभय सप्रेमाचे मेळी । सुखस्वानंदकल्लोळी । अद्भुत दाविली नव्हाळी । जठरकमळी अनसूयेच्या ॥४५॥

जगदात्मा जगदीश्वर । मायावी गर्भ दावी सुंदर । कळता झाला संभवविचार । आनंद थोर सतीते ॥४६॥

पूर्वीचे वाक्य हे फळले । संभवगुण उदरी दाविले । महद्भाग्य उदयासि आले । स्वलाभार्त भले जागावे ॥४७॥

चला प्रेमभावे घाला कास । निर्विकल्प करा मानस । एकाग्र निरखा धरा ध्यास । लाभ आपणास होईल ॥४८॥

भक्ति ज्ञान वैराग्य आनंद । तेथेंचि प्रगटेल परमानंद । दर्शनेचि हरपतील खेद । वृत्ति अभेद होतील ॥४९॥

मागा शिवरूपी दुर्वास । प्रथम बाळ ते तामस । ते गुण कळले उभयांस । आणि सर्वांस पाहता ॥५०॥

झाले जातकादि वर्णन । ते तेथेही हटी तामसकथन । डोहोळ्यांत आले आढळोन । शिवमुद्रा पूर्न ओळखिली ॥५१॥

बहु दिवसांशी मागोनिया । पुन्हा गर्भीण झाली अनसूया । सुखानंद वाटे देहा । उल्हास ठाया अपार ॥५२॥

उदरी दाविता गर्भधारण । दिशा दुमदुमिती आनंदेकरून । लाभ होती चहूंकडोन । अप्रयासे सन्मान जोडती ॥५३॥

धन्य त्या गर्भाचा प्रभाव । कौतुक वर्ते अतिअपूर्व । चौपासी शोभा अभिनव । सुरमानव पाहाती ॥५४॥

आंगणीचे वृक्ष असती । ते कल्पद्रुमाऐसे फळती । गोधने सर्वकाळ दुभती । रस देती अपूर्व ॥५५॥

जरा क्षीणता गेली पळोन । व्याधी गेल्या सर्व उठोन । दारिद्र्ये त्यागिले ते स्थान । सौभाग्य वर्षोन राहिले ॥५६॥

खडा ना गाई रस देती । सदा सफलित वृक्ष होती । खडकी जळप्रवाह सुटती । वांझ राहती गर्भिणी ॥५७॥

कुरूप ते स्वरूपराशी । निधाने फिरती प्रगट निशी । येऊ म्हणती गृहासी । आश्चर्य ऋषीसी वाटत ॥५८॥

सकळा मनींची कामना । ती सहजे पुरावी होता वासना । मुके बोबडे वेदपठणा । बधिर श्रवणा ऐकती ॥५९॥

पांगुळे पायी चालती । अज्ञानी ते ज्ञानी कथिती । ज्ञानी पावले विज्ञानस्थिती । ब्रह्मानंदी डुल्लती ते ईश्वर ॥६०॥

ही गर्भसंभवाची कळा । पूर्वीच फलद्रुप होतसे सकळा । कोणा न कळती काही लीला । भाग्यसोहळा अद्भुत ॥६१॥

विस्मय करिती चित्ती । म्हणती कोणत्यायोगे लाभ होती । नेणो कोण प्रगटे पुण्यमूर्ती । धन्य जगती वाटते ॥६२॥

असो अनसूयेचे उदरी । गर्भ संभवला निर्धारी । तेजप्रभा कांतीवरी । मुखश्री साजिरी टवटवीत ॥६३॥

उदयापासोनि भानू । जैसा भेदीत वाढे गगनू । तेवी चढे गर्भमानू । दिवस प्रमाणू गाठित ॥६४॥

की शुद्ध बीजेचा अंबुघर । दिवसेंदिवस कळा प्रसर । तेज दावितसे अपार । तेवी प्रकार गर्भवृद्धि ॥६५॥

प्रथमेपासोनि वाढे तिथी । की मासे मास जेवी वाढती । तेवींच जाणा गर्भगती । प्रभा फांकती पै होय ॥६६॥

प्रथम गर्भाहोनि अधिक । या गर्भाचा नवलाव देख । तेज पाहता वाटे कौतुक । देही सुख अनसूयेच्या ॥६७॥

सप्त मासांची होता भरती । मनी डोहाळे उद्गारती । तव शास्त्रीची जाणोनि रीती । अत्रि प्रीती पुसतसे ॥६८॥

अत्रि म्हणे चातुर्यखाणी । मम प्रिये कुरंगलोचनी । काय आवडे तुझिये मनी । ते मजलागुनी निरोपिजे ॥६९॥

सज्ञानसरिते मराळी । न धरी संकोच तू ये वेळी । आनंदे उकलोनि स्वात्मकळी । वदे नव्हाळी अंतरींची ॥७०॥

परिसोनी स्वामीचेः वचन । सती झाली आनंदघन । भावे वंदोनिया चरण । करी भाषण नम्रत्वे ॥७१॥

अहो जी स्वामी प्राणेश्वरा । दयानिधी जी कृपासागरा । माझी विनंती अवधारा । उदारधीरा सतेजा ॥७२॥

तुमचे करावे चरणसेवन । मज आवडते हे तपोवन । स्वइच्छे करावे भ्रमण । आणि तीर्थाटण करावे ॥७३॥

करावा वाटे योगाभ्यास । जप अनुष्ठानादि तापस । भिक्षाटाणी उल्हास । कृती विशेष दावावी ॥७४॥

विषयभोगी वासना । नरुचे काही माझिया मना । कुतर्क विपरीत भावना । न ये ध्याना काहींच ॥७५॥

आत्मचर्चा ज्ञानविवेक । वेदांतविषय ऐकता सुख । आत्मनिष्ठत्व अलोलिक । संवास साम्यक संयुक्त ॥७६॥

बोध आवडे अत्यंत मानसी । वाटते करू सिद्धि ऋद्धी दासी । जीवकलवळा उपजे मानसी । उदंड भाग्यासी वोपावे ॥७७॥

नाना सुरस करावे सेवन । करवावे ते आणिकालागोन । हेचि इच्छिते माझे मन । वैराग्य धारण करावे ॥७८॥

ऐकोनिया गर्भोद्गारा । आनंद झाला ब्रह्मकुमरा । म्हणे राजयोगी उद्भवेल हिरा । जगदुद्धारा निश्चये ॥७९॥

मग सुदिनाते पाहोनी । ऋषिपत्न्या पाचारिल्या सदनी । षड्रस अन्ने निर्मोनी । सुपुष्पवनी सिद्ध केले ॥८०॥

पाचारोनिया तेथे ऋषी । भोजने दिधली सर्वांसी । ऋषिपत्न्या अनसूयेसी । ग्रासोग्रासी प्रार्थिती ॥८१॥

जे रुचेल हो तुम्हांते । तेचि घेईजे मागोनि आम्हांते । निवांतपणे स्वस्थचित्ते । आपुले आवडीते सारावे ॥८२॥

यापरी सारिले भोजन । करशुद्धी मुखशुद्धी करोन । तांबूल वाटिले सकळांलागून । मग हेलन मांडिले ॥८३॥

द्राक्षमंडपा तळवटी । शय्या करविली गोमटी । लीलालाघवे सांगता गोष्टी । निद्रे दृष्टी झांकोळली ॥८४॥

किंचित सुषुप्ती सारून । प्राशित्या झाल्या सुवासिक जीवन । नाना वृक्षी हिंदोळे बांधोन । गीत गावोन झूलती ॥८५॥

झूले सरता मागुती । रमणीक छायेसी बैसती । मध्यपीठ अनसूयासती । सवे शोभती सुवासिनी ॥८६॥

केळी नारळे द्राक्षांचे घड । उतोतिया खिरणिया गोड । चारो बोरे जांब आक्रोड । पक्व निवाड आणिती ॥८७॥

नारिंगे अंजिरे सीताफळ । साखरनिंबे फणस रामफळ । मुखरसिक जे सुढाळ । मेवा सकळ आणिला ॥८८॥

ते अनसूयेपुढे ठेविती । स्वकरे ऋषिपत्न्यांसी वाटिती । जयावरी उपजे प्रीती । ते स्वीकारिती आवडीने ॥८९॥

हेही परवडी सारोन । हळदीकुंकुमे वाटिती पूर्ण । करोद्वर्तन कर्पूरचंदन । करविती लेपण सकळांसी ॥९०॥

सेवंती जाई मोगरा । जुई बकुली पुन्नागरा । ऐसिया पुष्पे गुंफोन हारा । घालिती सुंदरा अनसूये ॥९१॥

वस्त्रे आभरणे देवोनी । फळे ओटी भरिती कामिनी । याचि रीती सुवासिनी । अनसूया पूजोनि गौरवी ॥९२॥

यापरी सातव्यात गौरव । डोहाळे जेवणादि अपूर्व । देवोनी बोळविल्या कामिनी सर्व । आनंदमेव अनसूया ॥९३॥

परम आनंदाचे मेळी । सुखसंतोषे नांदती स्वस्थळी । आठव्यामाजी परस्थळी । जाय वेल्हाळी भोजना ॥९४॥

तव तो वैष्णवमहामुनी । तात्काळ प्रगटला येवोनी । अत्रिअनसूया देखता नयनी । संतोष मनी वाढला ॥९५॥

दोघांसी झाले आलिंगन । परस्परा पुसती क्षेमकल्याण । तव अनसूयेने आणून । पायी नंदन घातला ॥९६॥

म्हणे हा कोणाचा किशोर । अनसूया म्हणे आपुलाचि कृपाकर । दुर्वासनामे हा प्रथम कुमर । उमावरप्रसाद हा ॥९७॥

नारदे करोनि हास्यवदन । म्हणे असो या क्षेमकल्याण । अनसूयेसी पाहता आनंदघन । गर्भचिन्ह वोळखिले ॥९८॥

मनी म्हणे हा त्रिगुणात्मक । स्वये अवतरेल वैकुंठनायक । जगी दावील कौतुक । तिन्ही लोक भजती या ॥९९॥

धन्य अनसूये भाग्य विशेष । जठरी साठविले त्रिभुवनमांदुस । जे तारक सकळ जीवास । त्या प्रसवास पावसी ॥१००॥

जे महासिद्ध योगेंद्र म्हणविती । तेही शरण याते येती । याचेनि हे धन्य जगती । वाचे किती अनुवादू ॥१॥

पाहोनि उल्हास नारदमना । अनसूयेसी करी प्रदक्षणा । दत्तनामाचा करोनि सूचना । स्वर्गभुवना जातसे ॥२॥

ज्या ज्या पदा नारद जात । पुसता हाचि कथी वृत्तांत । अनस्ये उदरी साक्षात । कमलाकांत त्रिगुणात्मके ॥३॥

प्रथम झालासे एक कुमर । तो केवळ भव्य शिवअवतार । नाम तयाचे प्रियकर । मुनीश्वर दुर्वास ॥४॥

त्यासी दृष्टी म्या पाहिले । अनसूयागर्भाते ओळखिले । त्रिगुणात्मके संचले । मन निवाले पाहता ॥५॥

बहु अवतार झाले आणि होती । परि ये अवताराची अनुपम स्थिती । उद्धरील हे सकळ जगती । लीला कीर्ती न वर्णवे ॥६॥

सरला अनसूयेचा अष्टमास । नववा लागला अति विशेष । आतांचि येईल उदयास । ऐकता सकळांस आनंद ॥७॥

तैसाच नारद वेगी निघाला । उमा सावित्री रमेसी भेटला । सकळ वृत्तांत निवेदिळा । पावती सुखाला ऐकोनि ॥८॥

धन्य धन्य ते अनसूया । धन्य तिची तपक्रिया । प्रसन्न करोनि देवत्रया । वरदे सुखा या पावली ॥९॥

ह्या सुरवरे ऐकोनिया वृत्तांत । लक्षिते झाले सावचित्त । येरीकडे गर्भ वाढत । मास भरत पै आले ॥११०॥

नवमासाचे अवसरी अद्भुत तेज अनसूयेवरी । जेवी भानुप्रभा अंबरी । तेचि परी दिसतसे ॥११॥

ठरकू न शकेचि पंथ । आळस सुषुप्ति देही दाटत । ठमासा क्षणक्षणा येत । नुठवे त्वरित बैसलिया ॥१२॥

विगलित देखोनी अवस्था । अत्रि पाचारी ऋषिकांता । स्थळ नेम करोनि आतौता । केली सिद्धता प्रसंगापरी ॥१३॥

नव मास पूर्ण गेले । शेष नव दिवस ठरले । कामिनी जपती ते वेळे । लागले डोळे सुरवरांचे ॥१४॥

गात्रोगात्री फाकती कळा । पूर्वत्वे दावी गर्भलीला । व्यथा वाटे अनसूयेला । नववा लागला दिवस तो ॥१५॥

नवविधा तेचि जाण । नवमास भरले नव दिन । स्वर्गी दाटले सुरगण । विमानी विमान थाटले ॥१६॥

अमरआज्ञे वृंदारक । पुष्पजाती मिळवी अनेक । भरोनी विमानी सम्यक । सुगंधिक आणिले ॥१७॥

शचीसहित शचीरमण । सवे बृहस्पतिगुरु देवगण । यक्ष किन्नर गंधर्व जाण । अप्सरा लावण्य देवांगना ॥१८॥

शुभ्र सतेज ऐरावत । युक्त मंडित विराजित । वरी बैसोनी अमरनाथ । परिवारे साधित वेळ ठभा ॥१९॥

सिद्ध करौनि नंदिकेश्वर । उमेसहित पावला शंकर । साठीसहस्त्र गणभार । वीरभद्र षडानन ॥१२०॥

अष्टमसिद्धी समवेत । मूषकवहनी गणनाथ । फरशांकुश करी शोभत । विघ्ने नाशीत मंगल करी ॥२१॥

गायत्री सावित्री सरस्वती । विमानी बैसोनि पाहू येती । मंगल अक्षवणे प्रदीप ज्योती । मंगल गाती देवकांता ॥२२॥

स्वये पावला चतुरानन । त्याचे पृथकची विमान । सत्यवासी अवघे जन सवे वेष्टून राहिले ॥२३॥

यम वरुण नळ कुबेर । सनकसनंदन सनत्कुमार । नारद आणि तुंबर । विद्याधर विमानी ॥२४॥

वंदोनिया मेघःश्यामा । कामारीसहित आली रमा । त्रिगुणात्मकाचा महिमा । पाहू उत्तमा पातल्या ॥२५॥

ग्रह शशी सूर्य तारांगणे । पृथकची शोभली ती विमाने । लोकलोकाधिपतीचे येणे । झाले पाहणे पाहावया ॥२६॥

ऋतु नसता वसंत आला । तया वना शोभविता झाला । पक्षी श्वापदांचा पाळा । आनंद वाटला तयांसी ॥२७॥

वृक्ष पत्रे विस्तारले । फळपुष्पे करोनि लवले । वायुसंगे सुटले । परिमळ आगळे घमघमीत ॥२८॥

मयूर साळ्या कोकिळ । मंजुळ बोलती शब्द रसाळ । भ्रमर सेवावया परिमळ । गुंजार प्रबळ ध्वनी करी ॥२९॥

नाना सुपक्षियांचे पाळै । अत्रिसदना घालिती मंडळे । तैशीच श्वापदे आनंदकल्लोळे । करोनि किलोले प्रदक्षणीती ॥१३०॥

पर्वती पावले ऋषिभार । सिद्धयोगी दिगंबर । साधक साधु यतीश्वर । पाहु चमत्कार पावले ॥३१॥

अत्यंत शोभा शोभायमान । भूलोकापासोनि भरले गगन । केधवा अवतार प्रगटे त्रिगुण । वेधले लोचन पाहावया ॥३२॥

सकळांचे वेधले मानस । काही नाठवेचि दुजे यांस । हे जाणोनि सर्वेश । म्हणे अवकाश न करावा ॥३३॥

घ्यावया अवतारदर्शन । उदित ठेले अवघे जन । तयांसी करावया पावन । साधीत सुदिन परिसा तो ॥३४॥

हेमंतऋतु मार्गेश्वर । शुक्ल पक्ष इंदुवासर । साध्य योग रोहिणीनक्षत्र । चतुर्दशीपर पौर्णिमा ॥३५॥

अमृतवेळा साधून । उभय आडवेळा ती लक्षून । न जाणता कवणालागून । अविनाश पूर्ण प्रगटले ॥३६॥

तेज असंभाव्य दाटले । नेत्र सकळांचे झांकोळले । दिसी समावोनि पाहिले । त्रिगुणात्मक देखिले रूपासी ॥३७॥

रूप पाहताचि आनंदघन । जयवाद्ये वाजविती सुरगण । पुष्पवृष्टि स्वकरे करोन । गजानन करीतसे ॥३८॥

गंधर्व गायन सुस्वर गाती । अप्सरा विमानी नृत्य करिती । मंगलघोषे वाद्ये वाजती । घंटारव होती अपार ॥३९॥

येरीकडे ऋषिकांता । आनंदल्या तेव्हा बाळ पाहता । प्रीती तया उचलता । अनसूयामाता विलोकी ॥१४०॥

उभया उष्णोदके न्हाणोन । स्नेहद्वारा केले मर्दन । अनसूये देवोन वसन । मधुसेवन बाळाते ॥४१॥

त्रिगुणात्मके सतेज बाळ । षड्भुजा जयाते कोमळ । सुहास्य त्रिमुख कोमळ । वोसंगा तात्काळ दिधला ॥४२॥

तव देवललना धावोनि येती । मंगल आरत्या करी घेती । आक्षवणे करोनी ओवाळिती । मुख पाहती बाळाचे ॥४३॥

उतरल्या सुरवरांच्या कोटी । ऋषि देवा झाल्या भेटी । सिंहाचळा पुष्पवृष्टी । सघन दाटी अनिवार ॥४४॥

गुढीया तोरणे उभवोनि द्वारी । हरिद्रा कुंकुमे वाटिती नारी । रमा उमा सावित्री । सरस्वती गायत्री पावल्या ॥४५॥

इंदिरा आदिकरून । पाहती बाळाचे वदन । देखोनि होती संतोषमान । म्हणती धन्य अनसूया ॥४६॥

ब्रह्मसुत अत्रिमुनी । देव पातले तया दर्शनी । तव नारद पावला तत्क्षणी । सकळालागुनी भेटवी ॥४७॥

अत्रीसी म्हणे भाग्य थोर । तुझे भेटी पावले सुरवर । ते पाहोनि आनंद थोर । करी सत्कार सकळांचा ॥४८॥

देव वर्णिती अत्रीसी । धन्य धन्य गा तू होसी । त्रिगुणात्मक फळ पावलासी । सकळ कुळांसी तारक जे ॥४९॥

धन्य धन्य तू ऋषिवर्या । धन्य अनसूया तव भार्या । जे प्रसवली या गुणत्रया । आदिमाया केवळ हे ॥१५०॥

ऐसे करोनि वर्णन । निघती अत्रीसी पुसोन । पर्वता प्रदक्षणा करोनि तीन । आरंभिती स्तवन सप्रेमे ॥५१॥

जय जय अविनाश परात्परा । अज अजिता विश्वंभरा । जय गुणातीता निर्विकारा । करुणा करा जगद्गुरू ॥५२॥

जय मायातीता निरंजना । त्रिगुणरूपा चैतन्यघना । जय पूर्ण ब्रह्म सनातना । सच्चिद्घना व्यापका ॥५३॥

जय जय तू अखिल अभंगा । जय सर्वातीता निःसंगा । कर्मविमोचका भवभंगा । अनंतरंगा अनंता ॥५४॥

जय पन्नगहारा पन्नगभूषणा । जय अष्टदलाक्षा कमलासना । श्यामसुंदरा अनंतशयना ॥ दीनपावना जगत्पते ॥५५॥

जयजय तमोद्भवतामसा । जय रजोद्भवा सृष्टिविलासा । जय सत्त्व रूपा सर्वेशा । जय आदिपुरुषा सर्वज्ञा ॥५६॥

तू या जगदुद्धारासाठी । त्रिगुणात्मक अवतार धरिला सृष्टी । तुज पाहता आनंद पोटी । कृपादृष्टी पाहे का ॥५७॥

तू सकळांचा तारू । शरणागताचे माहेरू । या त्रिभुवनींचा दातारू । जगद्गुरु जगदात्मा ॥५८॥

तू होसी कृपाघन । आम्ही तूते अनन्यशरण । नित्य द्यावे जी दर्शन । आपुले चरण दावावे ॥५९॥

तव चरणांची होता भेटी । जन्ममरणा होय तुटी । दग्ध होती विघ्नकोटी । कृपादृष्टी भाग्य पावे ॥१६०॥

ऐसी पृथक आपुले ठायी । स्तवने करिती अपार पाही । पुष्पसंभारे वाद्य घाई । संतोष देही सकळांच्या ॥६१॥

बाळ विलोकुनी देवललना । वंदोनि भावे ऋषिअंगना । निरखोनी अत्रीचिया चरणा । वेगी विमानारूढ झाल्या ॥६२॥

देवही विमानी बैसती । जयजयकारे आनंदे गर्जती । वेळोवेळा भावे नमिती । उंचावती विमाने ॥६३॥

मुखे वदती हा धन्य अवतार । करील आता जगदुद्धार । लीला दाखवील अपार । कृपाकर सर्वेश ॥६४॥

वर्णीत जगद्गुरूचे गुण । देव पावले स्वस्थान । येरीकडे अनसूया आनंदघन । बाळा स्तनपान करवीतसे ॥६५॥

यापरी आनंदसुखसोहळा पाहता सुख नरनारी बाळा । सिद्ध साधक ऋषींचा पाळा । अक्षयी मेळा घनदाट ॥६६॥

संत साधु भाविक । तेही मानिता अत्यंत सुख । म्हणती हा आम्हा तारक । सुखदायक जन्मला ॥६७॥

या अवताराचेनि आगमने । जन्मपंक्तीचे फिटले पारणे । पापकाळाचे धरणे । उठविले येणे वाटते ॥६८॥

करावया सकळांचा उद्धार । येणे धरिला त्रिगुणात्मक अवतार । याचे चिंतनेचि भवपारा । होय दातार शरणागताचा ॥६९॥

हा दीनबंधु दीनानाथ । कृपाळू उदार होय समर्थ । पुरवी अंतरीचे अर्थ । प्रेमभावार्थ पाहोनी ॥१७०॥

पुरवावया दीनाची आळ । सिद्धची उभा असे दयाळ । तो तुम्ही संत जाणता सकळ । येरा आकळ निश्चये ॥७१॥

म्हणोनि या संतचरणी । राहावे उगेची वास करोनी । संत द्रवता अंतःकरणी । कृपादानी तोषविती ॥७२॥

हे श्रेष्ठाचे ऐकोनि उत्तर । केला तयाचा अंगिकार । मनी धरोनिया निर्धार । झालो सादर सेवेसी ॥७३॥

तनमनधनेसी शरण । होवोनि धरिले संतचरण । स्तवावे तया स्वमुखे करून । तरी मी अज्ञान मूढमती ॥७४॥

मी हीन दीन पामर अत्यंत । पाहाता द्रवले संताचे चित्त । संत अनाथांचे नाथ । कृपावंत सदयत्वे ॥७५॥

तेणे देवोनि कृपाकर । चालविला हा ग्रंथ सुंदर । अनंतसुत हा किंकर । पादधर संताचा ॥७६॥

गोड दत्तकथेचे अनुसंधान । तेणेंचि वदवोनि केले श्रवण । पुढेही रसभरितपूर्ण । आवडी निरूपण करवीती ॥७७॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । यासी नारदपुराणीचे संमत । सदा परिसोत भाविक संत । नवमोध्यायार्थ गोड हा ॥१७८॥

॥ इति नवमोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय दहावा

श्रीसद्गुरुदत्तात्रेयाय नमः

आजि आनंदसुखाची लहरी । या भाग्योदया आली उजरी । दारिद्र्यदुःखा झाली बोहोरी । चिंता उरी नसे आता ॥१॥

उगवता सतेज भास्करू । कोठोनि उरे अंधःकारू । की उगवता अंबुधरू । न वसती तस्करू पुरात ॥२॥

दिव्य पावता रसायन । तात्काळ रोग जाय शरिरातून । की पंचाक्षरी प्रगटता पूर्ण । पिशाच्च पळून जातसे ॥३॥

तेवी त्रिगुणात्मक मूर्ती प्रगटता । नुरेचि दुःखशोकाची वार्ता । आनंद संतोष झाला भर्ता । ठाव दुरिता कोठोनी ॥४॥

पाप ताप दैन्य गेले । दारिद्र्यभय अवघे उडाले । कामक्रोध तस्कर पळाले । सद्भाग्य आले उदयाते ॥५॥

आता होवोनि सावधान । स्वहिती जागा अवघे जण । सकळांचे करिता कल्याण । अविनाश पूर्ण हा विभो ॥६॥

सकळ आनंदाचा कंद । सिंहाचळी प्रगटला परमानंद । याचिया कृपे ब्रह्मानंद । येईल पद हातासी ॥७॥

गत कथाध्यायी जन्मकथन । श्रोती परिसिले सावधान । सुरवर पावले स्वस्थान । पुढील निरूपण अवधारा ॥८॥

अत्रीअनसूयेचे मंदिरी । तिष्ठति येवोनिया कामारी । हेल वाहती अनेक नारी । आनंदभरी सप्रेमे ॥९॥

अवघे मिळोनिया ऋषिगण । शोधिती तेव्हा जन्मलग्न । उत्तम ग्रहाते पाहून । शुद्ध विचारून ठेविती ॥१०॥

रजनीमाजी ऋषि येती । नित्य पाठ आदरे करिती । ऐस चार दिवस लोटती । पाचवी पुजिती कामिनी ॥११॥

यथाक्रमे करोनि सत्कार । रात्रौ कामिनी करिती जागर । उदय होतांची सत्वर । आनंद थोर सकळांते ॥१२॥

अनसूयेसहित बाळासी । न्हाणोनि निजविती सेजेसी । पथ्याचे प्रकार वेगसी । करोनि भोजनासी देताती ॥१३॥

जन्मसुतक दहा दिवस । आनंदेचि क्रमिले विशेष । शुद्ध स्नाने अकराव्यास । करोनि कर्मास आचरती ॥१४॥

सकळ ऋषिवर्याते मेळवून । अत्रि पाहे पुत्रवदन । स्वकरे करोनिया मधुपान । आनंदघन मानसी ॥१५॥

बारावे दिवशी बारा वळी । पूजोनिया उतावेळी । सकळ पाचारोनि ऋषिमंडळी । आनंदमेळी मेळविली ॥१६॥

षड्रस रांधिले पक्वान्न । रंगवल्ली सुंदर घालोन । गंध अक्षती पूजिले ब्राह्मण । सर्वांसि आसन दीधले ॥१७॥

सर्वांसि घालोनि सुमनहार । धूप दीप अर्पिले समग्र । संकल्प सोडोनि सत्वर । भोजनी द्विजवर बैसविले ॥१८॥

भोजन देता यथा रुची । प्रार्थना आरंभिली द्विजांची । तृप्ती होता सर्वांची । उच्छिष्टे त्यांची काढिली ॥१९॥

कर प्रक्षालोनी द्विज येता । अत्री होय तांबूल अर्पिता । दक्षणा देवोनी अतौता । नमस्कारिता पै होय ॥२०॥

द्विज देती आशीर्वचन । सदैव असो तुमचे कल्याण । संतति संपत्ति ऐश्वर्य धन । कीर्तीवधन यशायु ॥२१॥

द्विज जाती स्वस्थळासी । पुनः पात्रे मांडिली वेगेसी । पाचारोनि ऋषिपत्न्यांसी । त्वरे भोजनासी बैसविल्या ॥२२॥

अनसूया करी प्रार्थना । स्वस्थ मने कीजे भोजना । आवडे तोचि पदार्थ घ्या ना । काही अनुमाना न करिता ॥२३॥

परमानंदे भोजने सारिती । तृप्त झालिया कर प्रक्षालिती । तांबूल देवोनि सकळांप्रती । आसनी बैसविती स्थिरपणे ॥२४॥

सकळांचि आज्ञा घेवोन । अनसूयेने सारिले भोजन । हळदी कुंकुम वेगी आणून । लेववी पूर्ण सकळांते ॥२५॥

मग ऋषिपत्न्या उठोनि प्रौढा बाळा । अनसूयेसी चर्चिती तये वेळा । नूतन वस्त्रे देवोनि परिमळा । वरी तांबूल अर्पिती ॥२६॥

बैसोनिया चौकासनी । ओसंगा बाळाते देवोनी । नारी करिताती अक्षवणी । बाळा निरखोनी पाहाती ॥२७॥

समस्तांसि सन्माने गौरविले । परमानंदे बारसे केले । पुढिले कार्याते योजिले । स्मरता झाले सिद्धची ॥२८॥

रजनी गेली सुखशयनी । नित्यकर्म प्रभाते सारोनी । ऋषिपत्न्या पाचारोनि । बैसकासनी बैसल्या ॥२९॥

छते आणि झालरी । देवोनि पालख बांधिला कुसरी । डोल्हारे खेळणे वरी । नानापरी बांधले ॥३०॥

वस्त्रालंकार लेणी । बाळका लेववी अनसूयाराणी । हरिद्रा कुंकुमे करोनि । ताटे भरोनि सिद्ध पुढे ॥३१॥

शर्करे भरिल्या पराता । केली तांबुलाची सिद्धता । सुंठवडे आणि क्षिरापता । घुगऱ्या अवश्यता करविती ॥३२॥

तेरावे दिवसाते लक्षून । विमानी बैसोनि आले सुरगण । देवललना बाणे घेऊन । आनंदे करून पावल्या ॥३३॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । अष्टदिग्पाळा सहित अमरेंद्र । वाद्यनादे कोंदले अम्बर । गंधर्व सुंदर गाताती ॥३४॥

रमा उमा सावित्री । सरस्वती आणि गायत्री । सवे सख्या कुरंगनेत्री । हास्य वक्त्री सतेजा ॥३५॥

पेहेरणी कुंचडी नग । कुंच्चा तडित्प्राय सुरंग । अनसूयेलागी उपभोग । दिव्य चांग आणिले ॥३६॥

ऐसिया समारंभेसी । आनंदे ललना स्वर्गवासी । अनसूयेच्या आश्रमासी । अतिवेगेसी पावल्या ॥३७॥

गजबजिला अवघा पर्वत । अत्रिअनसूया आनंदभरित । ऋषिभार मिळाले बहुत । नामसंकेत ऐकावया ॥३८॥

महावैष्णव नारदमुनी । तेही तात्काळ पावले येवोनी । अत्रिअनसूयेसी भेटोनी । स्थिरासनी राहिले ॥३९॥

तव देवललना पुढे येती । अनसूया वंदी तयांप्रती । येरी सकळा क्षेम देती । मग गौरविती सतीते ॥४०॥

हरिद्रा कुंकुम देवोन । नेत्री सूदविती अंजन । दंती लेवविती दांतवण । अलंकारेण शोभविती ॥४१॥

अंगडी आणि टोपडी । बाळका लेवविती तेचि घडी । माठलें बिम्दले लवडसवडी । चरणकडी पैंजणे ॥४२॥

जडित गाटले कंठी सुंदर । बिजवरे लाविले भाळावर । क्षुद्र घंटेचे कटिसूत्र । मनगट्या विचित्र अमोल्य ॥४३॥

पदकरिठे दृष्ठमणी । वाघनखे ताईत सतेज पणी । नाना परिची बाळलेणी । लेववी वरोनी कुंचीते ॥४४॥

स्वर्ग उपभोग जे आणिले । अनसूयेलागी समर्पिले । सकळ नितिंबिनींनी आपुले । वाणे पुढे ठेविली ॥४५॥

ऋषि म्हणती तये वेळा । सुमुहूर्त उत्तम पावला । पालखी घाला वेगी बाळा । उरला सोहळा पुढे करा ॥४६॥

ऐसे ऐकोने वचनासी । सावित्री होय तेव्हा सरसी । वेगी उचलोनी बाळासी । घाली पालखासी नेवोनी ॥४७॥

रमा येवोनी पुढती । पालखदोर धरी हाती । उमा म्हणे गावोनि गीती । बाळाप्रती हालवावे ॥४८॥

तव गायत्री सरस्वती येऊन । सुरललना सांगाते घेऊन । म्हणती सांगा याचे नाम कोण । गाऊ गुण तैसेची ॥४९॥

तव सकळांत चातुर्यमराळी । शिवलतिका हिमनगबाळी । काय बोलतसे तये वेळी । सर्वा आगळी होवोनी ॥५०॥

पिता याचा मुनी अत्रय । आणि हेही जन्मले गणत्रय । तरी नाम ठेविजे दत्तात्रेय । सुहास्यत्रेय वदनी हा ॥५१॥

अनसूया म्हणे होते मनी । तेचि तुम्ही काढिले शोधोनी । आता याची नामेकरूनी । गीत गावोनी हालवावे ॥५२॥

सावित्री म्हणे नेटके ॥ धुंडोनी नाम काढिले अंबिके । येचि नामे कौतुके । गीत अलोलिके गाईजे ॥५३॥

सकळ म्हणती आम्हा मानले । नाम युक्तचि शोधिले । पालख गाता आळविले । पाहिजे भले सकळांनी ॥५४॥

रमा म्हणे सकळा चित्ती । वागले तरी गावे गीती । आता भाषणे सारा परती । गीत चित्ती आठवा ॥५५॥

पाळणा । तामस तापसा । तपराशी । करिता श्रमी गा होसी । तारक उपदेशा । अविनाशी प्रगट तू झालासी ॥१॥

जोजोजोजो रे । अवधूता । अत्रिअनसूयासुता । निद्रा करि सखया । श्रीदत्ता । त्रिगुणरूपा आता । जो० ।धृ०।

राजस तू बाळा सकुमारा । होसी सुज्ञ चतुरा । सृष्टि उद्भविता । श्रम घोरा । पावसि निज घे ब्रा ॥ जो० २ ॥

सत्त्वधीरा तू । सात्त्वीका । त्रिभुवन जीवपालका । मायातीता गा । चालका । निजजन सुखदायका ॥जो०३॥

रजोगुणा तू । उद्भविता । कर्मासी स्थापिता । पालक सत्वा तू । जीवदाता । तमरूपे करिसी शांता ॥जो० ४॥

रज तम सत्त्व हे । त्रिगुण । मुसी मुसाबोन । षड्भुज प्रगटला । पावन । त्रिमुख षण्नयन ॥जो०५॥

पालख लांबविला । नगशिखरी । बाळा निज भीतरी । खेळणे अनंत । सुतदोरी । हिंदोळा घे बरी ॥जो० ६॥

जो जो तामसा तपःप्रिया । गिरिनिवासा करुणालया । कर्पूरगौरा दत्तात्रेया । निज गा सखया हालविते ॥५६॥

चतुर सुजाणा सृष्टिकारका । वेदरूपा कर्मस्थापका । श्रमलासी तू बालका । देते झोका निज जो जो ॥५७॥

सत्त्वगुणा तू सुंदरा । नवमेघरंगा सकुमारा । ब्रह्मांडपालका उदारा । दिगंबरा निज जो जो ॥५८॥

अगा रजो गुणा तू सृष्टिकर्ता । सत्त्वगुणे तूची पालिता । तमोगुणे संहारिता । बहुश्रम चित्ता निज जो जो ॥५९॥

त्रिगुणे युक्त समरस । मुसावलासी मुसी सुरस । बालका दृष्टि लागेल रूपास । निज पालखास उगला ॥६०॥

त्रिगुणात्मका त्रिवक्त्रा । हे षड्भुजा तत्समनेत्रा । सतेज भव्य पवित्रा । लावण्यविचित्रा निज बाळा ॥६१॥

हे अत्रिसुता कुलभूषणा । अनसूयागर्भमांदुसरत्ना । हे दुर्वासबांधवा सुलक्षणा । तपोधना प्रिय जो जो ॥६२॥

सर्वमान्य तू देववृंदा । सर्वात्मक परमानंदा । सिद्धयोगिया आनंदकंदा । अद्वय अभेदा निज जो जो ॥६३॥

मनमोहना मानसरंगा । सर्वातीता तू अभंगा । अगा जीवींच्या जिवलगा । उगाच निज गा हालविते ॥६४॥

यापरी सर्व नितंबिनी । पालख नाना युक्ती गावोनी । दत्तात्रेयनाम प्रगट जनी । सकळालागोनी झाले पै ॥६५॥

ऐकतांची नामगजर । देव वाद्ये वाजविती अपार । पुष्पवृष्टी वज्रधर । अनिवार करितसे ॥६६॥

अद्भुत वाद्ये वाजती । जयजयकारे शब्द होती । साखरपाने सकळा वाटिती । सुंठवडे देती घुगरिया ॥६७॥

हरिद्रा कुंकुम चंदन । वस्त्रे वाटिती सकळालागुन । तृप्त केले याचकजन । करिती सन्मान योग्यायोग्य ॥६८॥

श्रोते कल्पितील मानसी । वनी राहणार जे तापसी । इतुके भाग्य कोठोनि तयांसी । वृथा यांसी श्रृंगारिता ॥६९॥

येचिविषयी विज्ञापना । करितो आदरे श्रोतेजना । सादर होवोनिया श्रवणा । अवधारणा देइजे ॥७०॥

अत्रि विधातियाचा नंदन । त्याहीवरी ब्रह्मनिष्ठ तपोधन । अनसूया सती पतिव्रता जाण । साध्वी पूर्ण लक्ष्मी ॥७१॥

त्या अनुष्ठानाचेनि बळे । देव तिघेही जिंकिले । तेणे प्रसन होवोनि दिले । वरदान आगळे अलोट ॥७२॥

त्या वरदानाचे फळ । पृथक त्रिगुणात्मक झाले बाळ । त्यामाजी त्रिगुणात्मक मेळ । दत्त सुशील जन्मला ॥७३॥

जेथे वसे दत्तराणा । तेथे सिद्धी वोळंगती जाणा । पदार्थ केवी पडे उणा । सकळ कामना पूर्ण होती ॥७४॥

कल्पतरू अंगणी उगवता । केवी न पुरे चिंतिल्या अर्था । चिंतामणी हातासी येता । कैची चिंता उरेल ती ॥७५॥

गृहा पावली कामधेनू । इच्छितप्राप्ती कवण अनुमान । परिस मिळता कांचनू । घेईल कवणू मोले पै ॥७६॥

तेवी हा प्रगट होतांची दत्त । फलद्रूप कामना समस्त । न्यून न पडेचि किंचित । सर्व साहित्य सिद्धची ॥७७॥

जे पाहिजे ज्या प्रसंगासी । पुढे ठेविलीच असे वस्तू तैसी । करावया कल्पनेसी । योग मानसी न लगे तो ॥७८॥

इच्छिल्याविण केवी प्राप्त । हेही कल्पना वागेल मनात । येचविषयी दृष्टांत । पुनरा योजीत परसा तो ॥७९॥

भ्रमण करीतसे भानुमंडळ । त्याची किरणे सवे सकळ । परस्थळा जाता भूपाळ । सर्वमेळ सांगाती ॥८०॥

तेवीच जाणावा प्रकार । दत्त योगेंद्र हा सर्वेश्वर । तयासवे अनंत भांडार । न्यून अणुमात्र नसेचि ॥८१॥

सकळांचे पुरवावया हेत । धरी अवतार हा स्वामी दत्त । इच्छामात्रे अघटित । दावील कृत्य करोनिया ॥८२॥

असो तृप्त करिता सकळांसी । कितीक गेली न कळे निसी । तहान भूक नाठवे कवणासी ॥ आनंदे मानसी निर्भर ॥८३॥

देणे घेणे मानसन्मान । स्वतः सावित्रीच पाहे आपण । उमा रमा करोनि आठवण ॥ परत वाण करवीती ॥८४॥

देता घेता सरली राती । आनंद झाला सकळांप्रती । वोसंगा बाळकालागी घेती । आवडी चुंबिती मुखकमळ ॥८५॥

बाळ त्वरे तो उचलिला । देवऋषीमाजी नेला । अत्रीचे वोसंग घातला । सकळी पाहिला डोळेभरी ॥८६॥

मूर्ति पाहता आनंदघन । कदापि तृप्त न होती लोचन । निरखिता मन झाले उन्मत्त । नोव्हे आठवण द्यावया ॥८७॥

असो नारदे घेवोनि बाळासी । चुंबोनि दे अनसूयेपासी । देव पुसती अत्रीसी येतो सुखवासी असावे ॥८८॥

येरे मस्तक ठेविला चरणी । लोभ असावा अनुदिनी । तुमचिया कृपेकरोनी पावलो धणी धरणीवरी ॥८९॥

देव सुर बोलती वचन । या दत्तात्रेयाचे घ्यावया दर्शना । सन्निध येता अस्तमान । नित्य येणे आम्हाते ॥९०॥

श्रोते परिसिजे सादर । अद्यापि येती सुरवर । ज्यासी पाहणे चमत्कार । तेणे निर्धार जाइजे ॥९१॥

मागील चार घटि उरता दिन । पर्वती शोभा शोभायमान । वृक्ष पाषाण तरु तृण । आनंदघन दिसती ॥९२॥

गजबजिला दिसे पर्वत । दिशा आनंदे दिसती भरित । पुण्यश्लोक गजराते ऐकत । हे नेमस्त नित्य पै ॥९३॥

इतर वेळे जावोनि पाहता । भय वाटे बहुचित्ता । क्षणही न गमे उदासता । तेथे राहता राहवेना ॥९४॥

असो देवललना अनसूयेसी । पुसोनी निघता वेगेसी । सती वंदित चरणांसी । प्रेमभावेंसी आदरे ॥९५॥

म्हणे लोभ असो द्या निरंतर । न पडावा आमुचा विसर । येरी म्हणती वारंवार । येणे निर्धार दर्शना ॥९६॥

मग देव विमानी बैसले । जयघोष करिते झाले । प्रदक्षिणा करोनी वेघले । आपुल्या पावले स्वस्थाना ॥९७॥

तेवीच ऋषिसहित अंगना । जाती पुसोनी स्वस्थाना । येरीकडे अत्रिराणा । प्रभातस्नाना पै गेला ॥९८॥

दोघे कुमर आणि कांता । सहित अत्री होय संतोषता । परमानंदे सुखवार्ता । प्रपंच परमार्था साधित ॥९९॥

ऐसे रमता आनंदघन । कित्येक संवत्सर लोटले जाण । विशेष भाग्याचा उदय पूर्ण । अनसूया गर्भित तिसऱ्याने ॥१००॥

दिवसमासे गर्भ वाढला । सतेज प्रकाश पडता झाला । सप्तम मासी अनसूयेला । पुसे स्वलीला अत्री तो ॥१॥

काय आवडे उपजे मनी । तेचो सांगे वो निवडोनी । पुरवावया आपुले सदनी । पदार्थ कोणी न्यून नसे ॥२॥

परिसोनि स्वामीचिया बोला । सद्दढ चरणी माथा ठेविला । पाणी जोडोनी तये वेळा । इच्छा स्वलीला निवेदी ॥३॥

अहो जी स्वामी दयाघना । हेचि आवड माझिया मना । नेटका प्रपंचाची रचना । करवी भ्रमणा वाटती ॥४॥

स्वआचारी उपजे उल्हास । अंधःकारी उपजे त्रास । दुष्टाचरणी नावडे संगास । ताप कवणास न द्यावे ॥५॥

सकळांलागी सुख द्यावे । स्वगुने तया तोषवावे । उल्हासयुक्त असावे । तप साधावे दिव्य पै ॥६॥

बहुतां करावे उपकार । नाना उपभोग आवडे मधुर । विस्तार भाग्यवृद्धी कलत्र । पूजा सत्कार दानधर्म ॥७॥

रस सेवून सेववावे । भोग भोगोनी भोगवावे । सुखी राहोनी सुख द्यावे । जीउनी जीववावे येरांते ॥८॥

याहुनी परती आवडी । स्वामी नुपजे मज कुडी । सद्वासनी उपजे गोडी । मुख्य जोडी चरण तुझे ॥९॥

ऐकोनी मधुर मिष्ट भाषण । अत्री झाला संतोषमान । पुनरा वदे उल्हासे करून । होतील पूर्ण हेतु तुझे ॥११०॥

मग अत्रीने मागिल्या ऐसी । सिद्धता करोनी वेगेसी । ऋषिपत्न्या पाचारोनि प्रेमेसी । डोहोळियांसी पुरवीत ॥११॥

परम आनंदे करून । सत्कारविले अनसूयेलागून । नवमास भरता पूर्ण । प्रसूतिचिन्ह पावले ॥१२॥

नित्य ऋषिपत्न्या येती । अनसूयेलागी बहु जपती । नव दिवसांची होता भरती । पूर्वस्थिति प्रगटले ते ॥१३॥

अतिलावण्य सतेज कुमार । दुजा पाहतांची भास्कर । परि तो तीव्र अपार । आणि हा शीतकर शांत पै ॥१४॥

यापरि तो जन्म होता । स्नेहेभरित केला माथा । ऋषिपत्न्या न्हाणिती उभयता । क्षुधित व्यथा ओळखिली ॥१५॥

मधु मुखाते लाविले । माते वोसंगी बाळ घातले । स्तनी लावोनि तृप्त केले । सकळी पाहिले स्त्रियांनी ॥१६॥

पांचवे दिवशी पांचवी पूजोन । केली देवता संतोषमान । स्त्रिया नित्य उपभोग करवून । पथ्य जपोन घालिती ॥१७॥

ऐसे सरता दिवस दहा । अत्रीसी म्हणता मुख पाहा । आनंदे उचंबळोनी मोहा । ऋषिसंमोहा मेळविले ॥१८॥

शुद्ध स्नानाते सारोन । वेगी केले पुण्याहवाचन । बाळक वोसंगा घेवोन । मधुसेवन पुनराते ॥१९॥

मुख अवलोकिता बाळाचे । आनंदले भार ऋषींचे । जातक वर्णिती तयाचे । रजोगुणाचे बाळ हे ॥१२०॥

प्रथम झाला तो तमोगुण । त्याचे वेगळेची असे मान । हा पाहता शांत पूर्ण । रजोगुण विस्तारक ॥२१॥

मध्यस्थ सत्त्वगुणी सर्वांगळा । तयामाजी या दोघांच्या कळा । मिश्र असोनी निराळा । दिसे सकला पाहा नेत्री ॥२२॥

हे तेज आपुलेची दाविती । परि तयाऐसी नोव्हे शक्ती । तयांची अद्भुत लीला कीर्ती । सर्वांगत स्थिती अतर्क्य ॥२३॥

अत्रिबाळाते अवलोकिता । संतोष वाटला तयांच्या चित्ता । मग तोषवोनिया समस्ता । दाने देता पै होय ॥२४॥

ऐसा विधी तो संपादोन । द्वादशदिनी बारसे करून । सकळा देवोनि सन्मान । पुढील कारण योजिती ॥२५॥

विशेष शृंगारिले मंदिर । पालख लांबविला अतिसुंदर । खेळणी डोल्हारे बांधोनि वर । तोरणे नागर बहु ठायी ॥२६॥

ऋषिपत्न्यांचे भार आले । तेणे मंदिर अत्यंत शोभले । वाद्यनादे दुमदुमिले । गजबजिले पर्वत ॥२७॥

मानव देवांच्या ललना । पाहू येती अत्रिनंदना । पालखी घालोनिया तान्हा । गीत सगुणा गाताती ॥२८॥

बहुनामे करिताती विचार । परि सिद्धांत नव्हेची निर्धार । अनसूया नेमोनि वदे चंद्र । जयजयकार ऐकता ॥२९॥

त्याची नामे करून । वाटिती तेव्हा शर्करापान । हरिद्रा कुंकुमे देवोन । लाविती तोषवोन नारीनरा ॥१३०॥

सूख संतोष आनंद । मानिती तेव्हा ब्रह्मवृंद । कुलोद्धारक प्रसिद्ध । आनंदकंद जन्मले ॥३१॥

अत्रिअनसूयेचे भाग्य गहन । सुखे खेळविती तिघे नंदन । सिद्धी उभ्या कर जोडोन । जाणोनि कारण वर्तती ॥३२॥

त्रिगुणात्मक जेथे दत्तात्रेय । तेथे कैचे तापत्रय । ऋषि नांदती निर्भय । सभाग्य सदय त्यायोगे ॥३३॥

अविनाश ही दत्तमूर्ति । पाहता आनंद उपजे चित्ती । दिवसेंदिवस वाढती । अद्भुत खेळती लाघवे ॥३४॥

लीलालाघवी विश्वंभर । अवतार धरोनी दावी चरित्र । एकाहुनी एक नागर । अंत पार न कळे त्याचा ॥३५॥

अनंत अवतार अनंत गुण । अनंत कीर्ती पवाडे पूर्ण । अनंत ब्रह्मांडे जयापासून । तोचि सद्गुण दत्तात्रेय ॥३६॥

दत्तात्रेय अक्षरे चार । हे तुम्हा संतांचे माहेर । या नामाचा विचार । तुम्हीच प्रकार जाणते ॥३७॥

तुम्ही संत सद्गुरु कृपाघन । ज्ञानसिंधु परम पावन । सदय उदार संपन्न । कोणा महिमा न वर्णवे ॥३८॥

तुमचे सरोजचरण कोमळ । ते अत्यंत सर्वावरिष्ठ निर्मळ । पुनीत करावया तीर्थे सकळ । हे पदकमळ असती ॥३९॥

त्या कमळीचे जे वहन । ते आमुचे कुळभूषण । त्या तळीचा हरि ज कण । बोलता दूषण वाटते ॥१४०॥

सर्व अनाथाहोनी अनाथ । दीन रंक अनंतसुत । संतचरणांचा अंकित । पोसणा म्हणवीत तयांचा ॥४१॥

धन्य धन्य ती संतमाऊली । करोनी कृपेची साऊली । कथा रसाळ चालविली । मनी आवडली तेचि पै ॥४२॥

मागील संपादिली चांग । पुढेही वदवतील बरवा प्रसंग । तो श्रवणद्वारी साठवा भाग । कथारंग दत्ताचा ॥४३॥

दत्तात्रेय दाता उदार । शरणागता देतो अभयकर । नाम स्मरतांची सत्वर । उभा समोर दासाच्या ॥४४॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । यासी नारदपुराणींचे संमत । परिसोत भाविक संतमहंत । दशमोध्याय गोड हा ॥१४५॥

॥ इति दशमोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय अकरावा

॥ श्रीगणेशाय नमः श्रीसरस्वत्यै नमः ॥

जयजयाजी सद्‌गुरुद्‌त्ता । ब्रह्मानंदा अविनाश समर्था । तुझिया चरणी ठेविला माथा । सनाथ अनाथा करी वेगी ॥१॥

तुझी लीला अपरंपार । ते मी काय वदू पामर । तू जरी देशी कृपाकर । तरीच उद्गार निघती ॥२॥

पांगुळा फुटती पाय । मुका बृहस्पतीच होय । अंधपरि अक्षा लाहे जरी होय कृपा तुझी ॥३॥

बधिरा होईल श्रवण । अज्ञानांगी वसे ज्ञान । कुरुप होय लावण्य । तव कृपा पूर्ण झालिया ॥४॥

जरी तुझी होईल कृपा । मग अवघड मार्ग तोचि सोपा । पावेल जावोनि अरुपा । माइक रूपा न मानी ॥५॥

सक्त तोचि विरक्त । विरक्त होईल अनुरक्त । तव ऐक्यासि युक्त । होती मुक्त तव कृपे ॥६॥

तुझी कृपा होता रोकडी । बुद्धि होय सतेज चोखडी । सत् चित् आनंदी गोडी । उपजे आवडी विचारणी ॥७॥

तू जै झालासि कृपाघन । तैच चालिले हे निरूपण । अद्‌भुत तुझे महिमान । करी पावन दीनरंका ॥८॥

गत कथाध्यायी निरोपिले । जन्मकथेसी संपादिले । पुढील कथेसी भले । श्रवण केले पाहिजे ॥९॥

तुम्हा श्रोतियांचेनी श्रवणे । गोड चालिली निरूपणे । पुढेही अवधान देणे । पान करणे कथामृत ॥१०॥

दत्तकथा परम पावन । भवरोगासी रसायन । आवडीने करितील ग्रहण । तयांसी भवबंधन न बाधी ॥११॥

दत्तकथा हा कल्पतरू । स्वयमेव उभा दातारू । हेतु पूर्ण करावया सविस्तरू । सफलित उदारू ठेलासे ॥१२॥

सकलांचे मनोरथ पुरवावया । अविनाशा उपजली दया । दत्तरूपे प्रगट होवोनिया । करी छाया कृपेची ॥१३॥

रूप धरोनिया सगुण । सिंहाचळी खेळे आपण । बाळलीले कौतुक पूर्ण । स्वये आचरून दाविती ॥१४॥

अनसूया आणि अत्रीसी । पाहता सुख उपजे मानसी । सवे खेळवी ऋषिबाळांसी । सकल तापसी पाहती ॥१५॥

नानापरिचे खेळ खेळती । श्रमता वृक्षतली बैसती । बहु चमत्कारे अनुवादती । जेणे उपरती होय जीवा ॥१६॥

माईक प्रवृत्ती खेळ । ते निवृत्ती करोनि घालिती मेळ । ब्रह्मी ऐक्य सकळ । ऐसे तात्काळ दाविती ॥१७॥

गली खाणोनी गोट्या खेळती । दोहींकडे दोघे असती । एक कच्यावरी गोटी मांडिती । एक भेदिती चमत्कारे ॥१८॥

निःशक्त युक्तिने खेळती खेळ । गली गली भेदिती सकळ । विसावे घेत घालविती मेळ । कचा तात्काळ उडविती ॥१९॥

गल्ली कचा चुकता । पुनरा फिरे तो मागुता । डाव बैसला तया माथा । भोगिती व्यथा बहु फार ॥२०॥

खेळियामाजी दत्त थोर । कची कचा भेदिती पार । टिचोनी गोटी होय वर । येरा आवर न घडे तो ॥२१॥

अभ्यासी बोटे करोनि लवते । संधान द्विदळी साधी पुरते । चुकवोनिया गलीते । लक्षी अलक्षाते टिचीतु ॥२२॥

कोणी रंगणगोटी खेळती । पायता राहोनी नेमिती । आल्लाद टिचणी चुकती । रंगनी पडती गुंतोनी ॥२३॥

गुंतता धरविती काना । चुकता लवविती माना । आपुली काढिता आपणा । दुःख नाना भोगविती ॥२४॥

तोच खेळिया धुरंधर । पायता राहोनी लक्षी सुंदर । गोटीने गोटी सत्वर । भेदोनि पार निराळा ॥२५॥

तेवीच आट्यापाट्या खेळती । घरात जावोनी नातळती । मारा चुकवोनि घरे घेती । लोण शिवती अचूक ॥२६॥

कोणी गल्ली सापडले । अज्ञानभ्रमे भ्रमित झाले । पाटिरक्षके ताडिले । डाव बैसले मस्तकी ॥२७॥

कोणी युक्तिने रिघती । हूल दाखवोनी घरे घेती । नाना हावभावाते दाखविती । परी लक्षिती लोण जीवे ॥२८॥

कोणीएक दोन तीन घरे पावले । रक्षक सर्वां घरी असती ठेले । तेणे आतळतांची फेरी पडले । डाव आले अंगावरी ॥२९॥

तोचि शहाणा चतुर पुरता । खेळी हावभाव दावी फिरता अचूक न लागे कवणाचिया हाता । लोण शिवता मुक्त तो ॥३०॥

आता तिसरा खेळ मांडू । म्हणाल कोणती विटीदांडू । खेळता येरयेरावी भांडू । कवडी ब्रह्मांड फिरवू या ॥३१॥

गडी सम सारिखे एक । द्विविधा दावावया कौतुक। एक कोलक आणि झेलक । उभे साम्यक ठाकले ॥३२॥

विटीदांडू जीवशिव । माया गल्ली हे अनेक ठाव । करविता जो खेळलाघव । व्यापक स्वयमेव वेगळा ॥३३॥

दांडू राहे ठाईंचा ठाई । विटी माथा टोले खाई । येतांची झेली जो लवलाही । तोचि भाई समतुल्य ॥३४॥

विटी न गवे झेलिता । दांडू तरी भेदावा पुरता । तोहि जरी चुकोनी जाता । डाव माथा चढू लागे ॥३५॥

उभयासी समसंधान । डाव खेळता असती जाण । एकमेकांची चुकी लक्षोन । वराधिक्य पण करावे ॥३६॥

न येता हाती चुका । खिलाडी खेळे जरी नेटका । मग करावा लागे लेखा कारण तुका न तुकवे ॥३७॥

मग साताचे आवर्ण । तेही जाणा वगळीच खूण । वकटाचे चरणस्थान । चकता पतन सहज त्या ॥३८॥

लेंड करवी भ्रमणा । चुके जरी वर्मस्थाना । मग खेळी होय स्वस्थापना । नुकपणा डाव आला ॥३९॥

दंडस्थापना बैसे मुंड । चुकता झेलिता मोडे बंड । न चुकत कुभांड । आणिक वितंड वाढवी ॥४०॥

खेळ खिलाडी खेळे नाल । ताडणी तया झेलाल । तईंच सोडोनिया हाल । पुढे कराल उभे तया ॥४१॥

नाल न लागेची हाती । तरी आर झोंबे पुढती । नेत्रासनी उर्ध्वगती । जाणा स्थिती तयाची ॥४२॥

तेथे जरी चुकोनि जाये । मग तो डाव हातासी ये । तोचि ताडिता जरी होये । झेलिता अपाये हार ती ॥४३॥

झेलणी न ये झेलिता । मग बैद धावे पुढता । तो कर्णीच सांगे वार्ता । तया स्वीकारिता उत्तम ॥४४॥

तोही हातींचा जरी गेला । मग झकू उरावरी बैसला । दहा झकूंचा होता मेळा । जुंपी कावडीला सकळांते ॥४५॥

दैवे खेळ येता हातासी । तरी समपाडे करावे फेडीसी । अधीक होता खेळासी । ठाव निश्चयेसी ठाईच ॥४६॥

न फिटे अधिक झाले । तरी भोगणे कावड प्राप्त आले । विटी झेलिता दम पुरले । गडी भागले कितीक पै ॥४७॥

सरता खेळ पडे विटी । मग खिलाडी डावकऱ्यासी पिटी । कवडी कवडी वेचवी होटी । दमसुटी व्यर्थ गेला ॥४८॥

तेथे दमे जरि धरिल धीर । नाद उठवी एकसूर मुळ स्थानी जावोनी सत्वर । साही प्रखर रेशा करी ॥४९॥

मुळासी गेल्यावाचून । भागा नये मुक्तपण । यासाठी खेळावे जपोन । झकू लावून न घ्यावा ॥५०॥

पुढती खेळ आरंभिती सप्त पर्व लिगुरीसी रचिती । तयावरी ती मोने मांडिती । सम भाग होती गडी तेव्हा ॥५१॥

चेंडू करी बोलती बोल । सावध गड्या चेंडू झेल । लिगोरी उडवोनी सकळ । घेईन दुमाल गड्याचा ॥५२॥

गडिये व्हारे सावधान । डाव घेऊ चेंडू झेलुन । मांडिले चक्रे ही भेदून । डाव आपण जिंकू पै ॥५३॥

संधान साधोनि उडविली गोरी । त्याची पाठलाग वेगी करी । खिलाडे चुकवोनी पहिल्या परी । रची निर्धारी तो धन्य ॥५४॥

भेदोनिया उभा रणे । चेंडू झेलोनि सरसे होणे । टोला पाठीचा चुकविणे । युक्त लक्षणे खेळ हा ॥५५॥

सद्गुरु दत्त खेळे खेळा । वचनचेंडू भलतैसा फेंकिला । तो वरचेवरी जेणे झेलिला । तोचि पावला स्वात्मसुखा ॥५६॥

अहंकार लोभ चेंडू उसळता । तयासि पिटावोनि हाणिजे लाता । कदा राहू नये लाताळिता बसे चुकता पाठीत ॥५७॥

तेणे पाठलाग केला जरी । तो फिरवील गा बहुत फेरी । उसंत नेदीच क्षणभरी । न मिळे निर्धारी विश्रांत ॥५८॥

यासाठी लोभ अहंकार । यांसी लाताळावे वारंवार । विवेके करावा जर्जर । त्याचा भर मोडवा ॥५९॥

दत्त म्हणे ते समयी । आपण खेळू लपंडाई । दुर्वास म्हणे भले भई । लपतो पाही धरी आम्हा ॥६०॥

तव त्या पर्वताचे दरी । लपू ठाव साधिला पोरी । अवधूत व्यापक सर्वांतरी । आणिली सारी धरोनी ॥६१॥

भोग्यासी जव नाही शिवले । तैसियामाजी अवतरिले । डाव सकळांवरी आणिले । काय बोले तयांसी ॥६२॥

आता आली तुमची पाळी । डोळे झांकिजे त्वरे सकळी । मी लपतो कवणिया स्थळी । काढा ये वेळी धुंडोन ॥६३॥

अवश्य म्हणोनी डोळे झांकिती । गुप्त झाली दत्तमूर्ती । सकळ पोरे धुंडो जाती । बहु शोधिती पर्वता ॥६४॥

वृक्ष पाषाण दरी खोरा । गुहा गुहे शोधिले मंदिरा । स्थूल सूक्ष्म स्वापद थारा । शोधिती धरा बहुतची ॥६५॥

ठाव न लगेची तयासी । श्रम पावले मानसी । विचारिते झाले एकमेकांसी । गती कैसी करावी ॥६६॥

अर्भके सकळही अज्ञान । करिते झाले तेव्हा रुदन । अहो गती झाली तरि कवण । आले दूषण सर्वांवरी ॥६७॥

कळता मारील मायबाप । ऐसियासी करावे काय । पडिले संकटी न सुचे उपाय । मोकलिती धाय तेधवा ॥६८॥

जवळीच असता रत्न । न दिसे ते अंधालागून । बधिरालागी कीर्तन । नव्हेची श्रवण कदापि ॥६९॥

तैसा या अज्ञानांसी । केवी सापडे तो अविनाशी । व्यापक असोनी न कळे कोणासी । काय अंधासी म्हणावे ॥७०॥

असो ज्याचा जैसा भक्तिभाव । तैसा त्यापाशी वसे देव । मुलांचा आक्रोश देखोनि धांव । दत्तराव घालीतसे ॥७१॥

एकाएकी प्रगट झाला । मुले म्हणती कोठोनि आला । तू कोठे तरी लपाला । सांग ये वेळा आम्हांसी ॥७२॥

म्हणे मी होतो तुमचेचपाशी । परी तुम्ही नचि पाहा की मजसी । ठगेचि पावला श्रमासी । दुःख मानसी भोगिले ॥७३॥

दत्त म्हणे तुम्ही लपावे । आम्ही शोधितो तुम्हा बरवे । तव दुर्वास बोले अवघे । कोणे पावावे तुझिया सरी ॥७४॥

आम्ही जेथे जेथे लपू जाता । तेथे तू अससी दत्ता । तुजवीण ठाव रिता । कोठे पाहता न राहे ॥७५॥

जळी स्थळी काष्ठी पाषाणी । सजीव निर्जीव राहिलासि व्यापोनी । आम्हा लपावयालागोनी । ठाव तुजवाचोनी दिसेना ॥७६॥

ऐसे ऐकता गुज । संतोषला महाराज । नाना खळाचे चोज । दत्तराज दावी मुला ॥७७॥

म्हणे बापहो ऐसे खेळावे । खेळोनि डावी न गुंतावे । हाती कोणाचेही न यावे । असक्त असावे खेळता ॥७८॥

दुर्वास म्हणे दत्तासी । हे अंगवण नोव्हेची जीवासी । तू जरी कृपा करिसी । तरीच युक्तीसी लाहे तो ॥७९॥

तुझी कृपा न होता । केवी चुकऊ शकेल गुंता । शीण पावती खेळता । परि सुटता नयेची ॥८०॥

येरयेरा बाणली खूण । ऐसे खेळ खेळती नूतन । दत्तासवे रंगले पूर्ण । गडी संपूर्ण आनंदले ॥८१॥

अत्री अनसूया पाहती । खेळ देखोनी आनंदती । दिवसेंदिवस वाढती । कौमारवृत्ती प्राप्त दिसे ॥८२॥

मग पाचारोनि ऋषिजन । विचारिते झाले बैसोन । मुलांचे करावे मौजीबंधन । काढा सुदिन लाभक ॥८३॥

शोधोनी तिथीते नेमिले । साहित्य संपूर्ण सिद्ध केले । व्रतबंधाते आरंभिले । दुर्वासा दिधले ब्रह्मचर्य ॥८४॥

गायत्री उपदेश देवोन । वेदारंभ केला पूर्ण । करविते झाले भिक्षाटण । मौनधारण आज्ञापिती ॥८५॥

सवेंचि दिवस लोटता । मौजीलाभ काल समीप दत्ता । हे जाणोनि मातापिता । केली सिद्धता त्वरेने ॥८६॥

पाचारोनिया द्विजगण । तिथी नेमिली शोधून । ठरले संस्कार करवोन । विधी शोधून चालविती ॥८७॥

आप्तवर्गादि पाचारिले । देव ऋषी समस्त आले । मंगल तुरे वाजो लागले । चौल सारिले यथाविधी ॥८८॥

बोहोले मंडप सुंदर । शोभायमान तोरणे अपार । सभ्य बैसले द्विजवर । आल्या सत्वर देवकांता ॥८९॥

पुण्याहवाचन देवप्रतिष्ठा । अतिसत्कारे पाचारिले इष्टा । सन्मानोनी सकळ श्रेष्ठा । आणि वरिष्ठ नमियेले ॥९०॥

करवोनी तेव्हा उपनयन । वाद्यघोषे मंगल स्नान । बटुवस्त्र करवोनी परिधान । सुचंदन लेवविला ॥९१॥

पितापुत्र बोहोल्यावरी । पट धरोनि उभयांतरी । कर्मदीक्षा अंगीकारी । सावधोत्तरी सुचविती ॥९२॥

बटुअष्टके अतिरसाळ । द्विज गर्जती सुमंगल । सावधान शब्दकल्लोळ । अक्षता सकळ टाकिती ॥९३॥

सकळ दैवतांचे करोनी स्मरण । प्रार्थिते झाले त्यालागून । बाळा करविले दीक्षाधारण । यासी निर्विघ्न प्रतिपाळा ॥९४॥

हाचि करिती शब्दबोध । व्रतरक्षणी तू सावध । विद्याभ्यसनी जोडो वेध । आचरणी शुद्ध सावधान ॥९५॥

असो यापरी सावध करोनी । यज्ञोपवीत दिधले त्यालागोनी । दंड कौपीन देवोनी । मंत्र कर्णी सांगीतला ॥९६॥

पिता अत्री उपदेशित । मंत्र गायत्री निवेदित । हृदययंत्री आकर्षित । गोत्री स्थापित प्रवराते ॥९७॥

करवोनिया दीक्षाधारण । आरंभोनी संपविले हवन । अनसूयेलागी पाचारून । भिक्षादान दीधले ॥९८॥

उपोषण दत्ता करविती । अस्तमानी हवन आहुती । द्विज बैसवोनी पंक्ती । भोजन करविती भिक्षान्ने ॥९९॥

दिवा भोजने सकळांसी । रात्रौ मिरविती भिकाळीसी । बोह्येली बैसवोनी दत्तासी । वस्त्रअलंकारांसी अर्पिले ॥१००॥

सकळ ललनामिळोन । भिक्षा वोपिती आणोन । भवति भिक्षां देहि म्हणोन । स्वीकारी पूर्ण आदरे ॥१॥

रमा उमा सावित्री । सरस्वती आणि गायत्री । सतेज भिक्षा घेवोनी पात्री । देती सत्पात्री दान ते ॥२॥

पूर्व संपादिले आन्हिक । रजनी सारोनि उठले लोक । स्नानसंध्यादि कर्मे सकळिक । आले आवश्यक मंडपा ॥३॥

मंगल तुरे घोष होती । बटूसी स्नानसंध्या करविती । अग्नीमुखी देवोनि आहुती । आसनी प्रीती बैसविला ॥४॥

समीप येवोनी नरनारी । चरणतीर्थ घेती सत्वरी । दक्षणा देती तया करी । भिक्षा वरी मुक्तरत्ने ॥५॥

एवं दिवस संपादिला । आहेर सर्वत्री अर्पिला । पुढे आरंभोनी पळसोला । समाप्त केला तो यज्ञ ॥६॥

महा आरंभोनि समाधान । सकळा दिधले दिव्य भोजन । दक्षणा अर्पूनी द्विजगण । संतोषमान पै केला ॥७॥

परतवणी आहेर । यथायोग्य पाहोनि विचार । ज्याचा त्या ऐसा करोनि सत्कार । स्वस्थळा समग्र बोळविले ॥८॥

दुर्वास आणिद दत्तासी । नित्य लाविले वेदाभ्यासी । अतितीव्र बुद्धि उभयांसी । न देती श्रमासी पठतांते ॥९॥

अतिसुख वाटे जनका । तैशीच तोषे जननी अंबिका । म्हणती विद्याभ्यास निका । करिती अचुका दक्ष हे ॥१०॥

हे जव करिती अभ्यास । तो चंद्रहि आला मौजीस । साहित्य करोनी विशेष । वेगी तिथिस नेमीले ॥११॥

सकळ समुदाय मेळवून । मंडप उभारिले त्वरे करून । यथासांग मौजीबंधन । विधिविधान क्रमोक्त ॥१२॥

ब्राह्मणभोजन सांगोपांग । करोनि साधिला उत्तम प्रसंग । आहेर देवोनी सवेग । तोषविले सांग सर्वांसी ॥१३॥

देवोनिया लुगडी लेणी । माने सोयरे बोळवोनी । इतर कामिका पेटवणी । लाविले देवोनी संतोषे ॥१४॥

आपुलालिया स्वस्थाना । ऋषीसहित गेल्या अंगना । वर्णीत अत्रीच्या भाग्यगुणा । सुखसमाधाना पावती ॥१५॥

इकडे अत्रि आपुले कुमरांसी । वेदाभ्यास करवी नेमेसी । पार नाही तया मतीसी । अतिवेगेसी स्वीकारीत ॥१६॥

चंबुकासन्मुख लोहो येता । तो उचली जेवी क्षण लागता । तेवी चपळत्व अत्रिसुता । वेद स्वीकारिता पै होय ॥१७॥

अर्थसहित चारी वेद । नाना उपग्रंथ प्रसिद्ध । जाणते झाले शास्त्रभेद । वादसंवाद सर्वही ॥१८॥

श्रुतीचे गर्भ जाणीतले । उपनिषदे सर्व पाहिले । वेदांतज्ञानी निमग्न झाले । काव्यही पढले अनेक ॥१९॥

कर्मकांड उपासना । सर्व सिद्धांत आणिले मना । परीक्षा देवोनी विज्ञापना । अत्रिचरणा करिताती ॥२०॥

जी स्वामी कृपासागरा । विनंती दासाची अवधारा । आज्ञा द्यावी जी दातारा । पाहू धारातीर्थक्षेत्रे ॥२१॥

वेदाआज्ञा ही आहे ऐसी । ब्रह्मचर्ये जावे तीर्थाटणासी । नित्य भिक्षा शुद्ध भोजनासी । एक ठायासी नसावे ॥२२॥

नित्य असावे व्रतस्थ । वेदाचरणी असावे रत । दंडकमंडलुसंयुक्त । सदा एकांत निरामय ॥२३॥

चित्ती असावे उदास । न धरावी विषयलोभी आस । सत्संगी रंगावे मानस । भोग विलास त्यजावे ॥२४॥

न करावे कदा दुर्भाषण । न द्यावा कवणाशी शीण । समदृष्टी समसमान । भूते संपूर्ण पाहावी ॥२५॥

पादरक्षा तांबूल शय्या । अभ्यंग वर्ज ब्रह्मचर्या । मातृवत लेखाव्या स्त्रिया । तपसी काया झिजवावी ॥२६॥

नीचाची छाया पतन । रजस्वलाशब्द दर्शन । सत्कार सेवा मिष्टान्न । अग्राह्य जाण ये ठायी ॥२७॥

त्रिकाळ स्नानसंध्या करावी । शांती दृढ ह्रदयी असावी । इंद्रिये अवकर्मी रोधावी । वृत्ति शिरवावी ज्ञानगर्भी ॥२८॥

स्वल्प निवडोनि काढिले । स्वामीचरणी निवेदिले । आता पाहिजे आज्ञापिले । आनंदमेळे सेवू ऐसे ॥२९॥

ऐकोनि पुत्रांचे भाषण । मोहे सजळ झाले लोचन । सद्गद ह्रदयी होऊन । काय वचन बोलती ॥३०॥

बोल बोलता तुम्ही साचे । प्रमाण जाणोनि वेदांचे । विहितकर्म ब्रह्मचर्याचे । आम्ही असाचे न म्हणू की ॥३१॥

परी तुम्ही सकुमार राजस । कोमल वय सान बाळस । केवी आज्ञा द्यावी तुम्हास । दुःख आम्हास वाटते ॥३२॥

तुम्हालागी आज्ञा देता । उदासत्व येईल चित्ता । आणि तुम्हांसही दुःखदाता । आम्हीच आता झालो की ॥३३॥

दृष्टीहुनी जावे परते । हे तो न वाटेचि आमुते । केवी आज्ञा द्यावी तुम्हाते । तीर्थपंथे जावया ॥३४॥

केवळ तुम्ही आमुचे प्राण । सोडोनि जाता आलेचि मरण । आम्हा तोषविता कोण । तुम्हांवाचून बाळका ॥३५॥

तंव दुर्वास वदे जी ताता । तुम्ही सर्व शास्त्र जाणता । जाणोनि मोही का गुंतता । आज्ञा आता देईजे ॥३६॥

जे वेदशास्त्रीचे भाषण । त्यासी समर्थे नाणिजे दूषण । करोनी दावावे आचरण । तरिच प्रमाण सर्वांसी ॥३७॥

आपण जरी नाचरावे । तरी इतरा केवी निरोपावे । जे ज्या आश्रमासी बरवे । तेचि आचरावे स्वामिया ॥३८॥

प्रथम ब्रह्मचर्य उत्तम । वेदाज्ञे ऐसे आचरावे कर्म । तेथे करू नये अधर्म । हे तो वर्म जाणता की ॥३९॥

तयास ही मर्यादा नेमिली । ती पाहिजे पूर्ण झाली । तरीच सार्थकता भली । फळा आली पुढलिया ॥१४०॥

पुढे सर्वेची गृहस्थाश्रम । सकळ आश्रमामाजी उत्तम । तो तुम्ही आचरता धरोनि नेम । जाणोनि क्रम सकळही ॥४१॥

तुम्हा जैसी कर्मे घडती । ते अन्य आश्रमी न होते । अधिकाधिक त्यागवृत्ति । पुढिल्या असती दयाळ ॥४२॥

तिहीं आश्रमींची सेवा । अनेक फळसमुदावा । तुम्ही आचरता हा योग बरवा । करुणार्णवा उत्तम ॥४३॥

येथेंचि सर्व कर्मे घडती । अलभ्यलाभ हातासी येती । परि या आश्रमाची युक्ती गती । जाणोनि वर्तति ते धन्य ॥४४॥

गृहस्थाश्रमी पक्व होता । येथील त्यजोनि लाभस्वार्था । विषय भोगी वैराग्यता । असक्तता सर्वार्थी ॥४५॥

अन्नी वासना सांडावी । फली मुळी गोडी धरावी । मुदु आसने त्यजावी । आणि स्वीकारावी तृणासने ॥४६॥

देही होवोनि उदास । करावी सर्वस्वाची निरास । आप्त पुत्र गणगोतास । तिळमात्र मोहास न गुंतावे ॥४७॥

अंतर्बाह्य त्याग करून । उभयता निघावे उदास होवोन । सेविजे प्रीती वनोपवन । दंड धारण असावे ॥४८॥

नित्य पंचमहायज्ञ करावे । आलिया अभ्यागता पूजावे । वनफळेची अर्पावे । त्यावीण नसावे यज्ञादिक ॥४९॥

वेदचर्चा जपध्यान । उर्वरित काळ नामस्मरण । सक्त असावे इंद्रियदमन । हेचि अनुष्ठान तेथींचे ॥१५०॥

काही करावा योगाभ्यास । आसने चाळावी विशेष । आहारी आणावे वायूस । काही समाधीस शोधावे ॥५१॥

रजनी घालिता शय्यासन । मध्यस्थ दंडाते ठेवोन । दंड न करिता उल्लंघन । परम सावधान निजावे ॥५२॥

येरयेरा स्पर्श न व्हावा । विषय उद्गार उठो न द्यावा । विवेके करोनी काळ सारावा । हाचि बरवा वानप्रस्थ ॥५३॥

यासी जे नेमिले प्रमाण । तितुके न्यावे शेवटालागून । शेवटी कांतेसी करोनि नमन । आज्ञा मागून घेइजे ॥५४॥

आज्ञा होतांचि वेगेसी । ग्राह्य कीजे चतुर्थाश्रमासी । वेदआज्ञे विधिविधानेसी । उरकोनि संन्यासी होईजे ॥५५॥

सहांचा करावा नाश । तरीच नाव तो संन्यास । आत्मज्ञान म्हणती ज्यास । तोच अभ्यास करावा ॥५६॥

वेषे झाला नारायण । मुखी ही वदतो नारायण । तैसा अंतरी शोधी नारायण । ब्रह्मपरायण तो खरा ॥५७॥

जरी संन्यासा घेतले । वेदआज्ञे पाहिजे कर्म केले । न आचरता व्यर्थ गेले । भगवे नासिले लेवोनी ॥५८॥

तेथे असावे शुद्ध आचरण । प्रणवरूपी परायण । आत्मतत्त्वाचे विवरण । क्रम पूर्ण साधावा ॥५९॥

न करावे धातुस्पर्शन । अनिर्वाच्य न वदावे भाषण । स्त्रियादिकांपासून । कदा सेवन न घ्यावे ॥१६०॥

दुर्व्यसनासी नातळावे । रजस्वले गृही न जावे । अशौच सदन त्यजावे । आसक्त वागावे सर्वांत ॥६१॥

नीच यातीपासूनि दूर । असावे त्यजावा कारभार । राहू नये दिवस फार । व्यवहार अविचार नसावा ॥६२॥

वासना सांडावी कुडी । द्विजाश्रमी घ्यावी पुडी । पदार्थी नसावी गोडी । जगी प्रोढी न दाविजे ॥६३॥

कदा कवणा न स्पर्शावे । तीर्थाटणी सदा फिरावे । तीन रात्री न राह्यवे । मन करावे एकाग्र ॥६४॥

ऐसिया साधनी जो राहे । तोचि जाणा संन्यस्त होय । त्याचेची वंदावे पाय । नारायण होय या रीती ॥६५॥

हे चौथे आश्रमाचे योग । तुम्ही सर्वज्ञ जाणता चांग । यात उणे पडतां अंग । प्रायश्चित्त प्रसंग तोहि जाणा ॥६६॥

आम्ही तरी लडिवाळ अज्ञान । अधिकार नसे करावया भाषण । परि तुमच्या कृपेची शिकवण । तेचि निवेदून अर्पिली ॥६७॥

वैद्यराजे औषध दिधले । पथ्य न करिता वाया गेले । तेवी ब्रह्मचर्य आम्हां दिधले । कृती का पडले मनलोभा ॥६८॥

लोभ हेचि पापाचे मूळ । तुम्ही जाणता की सकळ । तरी होवोनिया दयाळ । आज्ञा निर्मळ देईजे ॥६९॥

अनसूया वदे लडिवाळा । आम्हां सांडोनि नवजे बाळा । तप आचरा येचि अचळा । पाहीन डोळा क्षणक्षणी ॥१७०॥

मातापित्यांहोवोनि परते । आगळी नसती क्षेत्रदैवते । आम्हांसन्निध राहोनि तपाते । सुखी आचरते होईजे ॥७१॥

आमुची आज्ञा तुम्हा प्रमाण । याहोनि थोर कोण आचरण । जाता दुःख आम्हांलागून । तेचि दूषण तुम्हांसी ॥७२॥

माता सद्गदित होऊन । मोहे पुत्र ह्रदयी धरोन । म्हणे बा रे नवजावे टाकोन । करी रुदन आक्रोशे ॥७३॥

हे देखोनि दत्तराये । दृढ धरिले मातेचे पाय । म्हणे बोलसी ते सत्य होय । विनवणी माय ऐक माझी ॥७४॥

तुम्ही सुज्ञ संपन्न जाणते । कर्मधर्माचे स्थापिते । मार्ग अज्ञाना दाविते । स्वये आचरते योग्य की ॥७५॥

तुम्ही वेदमार्गाचे रक्षक । तुम्ही शास्त्रवचनांचे पालक । नीतीकर्म प्रतिबोधक । तुम्ही साधक साधविते ॥७६॥

सारासार विचारा । जाणा तुम्ही जन्मदातारा । केवी ज्ञान आम्हा पामरा । विनंती अवधारा म्हणोनी ॥७७॥

तुम्हीच अज्ञानाचे चेतविले । वेदशास्त्रदीप प्रज्वालिले । के अंधःकार तेथे उरले । सांगा वहिले मायबापा ॥७८॥

आम्ही शुद्धबुद्ध होतो अजाती । तुम्हीच लाविली कर्मगती । त्याहीवरी बोध स्थिती । बाणविली चित्ती आमुच्या ॥७९॥

जै दीक्षा दीधली आम्हांसी । तैच आज्ञा केली निश्चयेसी । पुसता खिन्न होता मानसी । केवी तुम्हास प्रार्थावे ॥१८०॥

तुम्हांसी मान्य वेदशास्त्रवचन । आम्हांसी आपुली आज्ञा प्रमाण । देव आणि आपण । आम्हांसि भिन्न नसती की ॥८१॥

सर्वासन्निध आज्ञा केली । अवश्य आम्हांपासोनि वदविली । तै आनंदवृत्ति तुमची झाली । भिक्षा घातली माये त्वा ॥८२॥

साक्षत्वे वचन उभया झाले । वेदाभ्यासास्तव तै राहिले । आता आज्ञा मागता ये वेळे । मोही गुंतले मन तुझे ॥८३॥

श्लोक ॥ क्षणं वित्तं क्षणं चित्तं क्षणं मानवजीवितं । यमस्य करुणा नास्ति धर्मस्य त्वरिता गतिः ॥

ओवी ॥ येच विषयी विज्ञापना ॥। करितो द्यावी अवधारणा । प्रारब्धे पावलिया भाग्यधना । अचल सदना न राहे ॥८४॥

आहे जोवरी भर । तोवरीच भोगउपभोग सत्कार । दानधर्मी कीर्तीपर । लावित विचार बरा की ॥८५॥

तेवी वंचोनि संचिले । प्रारब्धयोगे नष्ट झाले । अहा म्हणे काहि न केले । व्यर्थ गेले हातीचे ॥८६॥

तेवीच हे चित्त जाणा । क्षणभरी न राहे एक भावना । किंचित होता सद्वासना । अवधी गुणा पालटे ॥८७॥

या दोही अंग चंचलपण । कधी न राहती दृढत्वे करून । संकल्पी विकल्प आणवून । दोषी गहन घालिती ॥८८॥

करुणाहीन असे यम । सदा जीवाचे लक्षी दोषवर्म । अघोर भोग भोगवी परम । नेदी विश्राम घेऊ तो ॥८९॥

यासाठी ये जीवे । सत्यमार्गेची आचरावे । उद्धारतांचि साधावे । संकल्प न्यावे शेवटा ॥१९०॥

अवधी करिता नाही प्रमाण । हानी मृत्यु विघ्न त्रय दारुण । यासाठी त्वरा करून । कार्य साधून घेइजे ॥९१॥

यातही असे विचार । सद्वासनेसी त्वरा फार । दुष्ट वासनेसी धरावा धीर । अवधी फार चुकवावे ॥९२॥

म्हणे माते परियेसी । सद्वासना झाली आम्हासी । वडिली साह्य होवोनि यासी । सिद्ध संकल्पासी नेइजे ॥९३॥

अनसूया म्हणे सुजाणा । युक्तीने ठकेच बोलसी वचना । ऐकोनि आनंद होतो मना । परी मोहबंधना काय करू ॥९४॥

हा मोहचि बाधी अनिवार । काय करू यासी मी विचार । शब्देचि न धरवे धीर । जाता प्रकार न बोलवे ॥९५॥

कधीच न गेला मजपासून । आता करू पाहता तीर्थाटण । द्वादश वर्षे भरल्यावीण । कैसे आगमन तुम्हांसी ॥९६॥

पळ युगापरी जाईल । तोवरी कैचे कंठवेल । चिंताग्नि झोंबेल प्रबल । कैचे उतरतील प्राण माझे ॥९७॥

बाळके हृदयी धरोन । अनसूया विव्हळ खेदे करून । अत्रीचे डळमळिले नयन । कंठ दाटोन पै आला ॥९८॥

तिघे विचारिती मनांत । हे मोहे झाले अतिग्रस्त । आपणांसी तो जाणे नेमस्त । कोण अर्थ करावा ॥९९॥

अविनाश बोले बंधूंसी । कोण युक्ति योजावी यासी । विरहसागरी बुडवोनि दोघांसी । जाता आपणांसी बरवे हो ॥२००॥

दुर्वास म्हणे न जावे । तरी वेदाज्ञे दूषण आणावे । पितृआज्ञे मिथ्या करावे । पाप भोगावे लागे की ॥१॥

यालागी तू दत्तमुर्ति । ऐसी काढी काही युक्ती । जेणे पिता माय संतोषति । आपुले होती योग पूर्ण ॥२॥

हे तूची जरी करिसी । तरीच हा योग जाईल सिद्धीसी । हे कळा इतरांपाशी । नाही मानसी पाहे तू ॥३॥

करोनि उभयांचे समाधान । आज्ञा घ्यावी आता मागेन । ऐकोनि दुर्वासाचे वचन । दत्तास मान्य झाले ते ॥४॥

मग अविनाश जोडोनि कर । दोघांसी विनवी प्रीतीकर । सदये आज्ञा द्यावी सत्वर । चिंता दूर दवडोनि ॥५॥

तुम्ही केवळ विवेकसागर । तापसवृत्तीचे सौदागर । ज्ञानकर्मांचे आगर । उदार धीर पावन ॥६॥

तुम्ही अज्ञानतिमराचे छेदक । केवळ अनन्याचे तारक । हे जाणोनि आवश्यक । चरणी मस्तक ठेविले ॥७॥

बाळा होवोनी सुप्रसन्न । आनंदे अभयाचे द्यावे दान । आवडीचे भातुके देऊन । हेतु पूर्ण करावे ॥८॥

अनसूया म्हणे तुमचे हेत । पुर्ण होतील गा सुफलित । परी माझे जेणे आनंदे चित्त । तैसा अर्थ साधावा ॥९॥

आम्हा न ठेवावे उदासीन । दुःखी न पाडावे आमुचे मन । न वाटावे गेले आपणापासून । सुखे कारण साधा मग ॥१०॥

अत्रि म्हणे हे उत्तम । याचियोगे साधा क्रम । आम्हा न दाविता विषम । मग सुफलित काम तुमचे ॥११॥

दत्त म्हणे जी करुणाकरा । जी आज्ञा केली तुम्ही दातारा । ती स्वीकारली जी योगेश्वरा । जन्मोद्धारा गुरुराया ॥१२॥

आज्ञा घ्यावी आम्हांसी । मज न विसरावे मानसी । मी नित्य येईन सेवेसी । दर्शनासी आपुलिया ॥१३॥

तयाचे परिसा प्रमाण । जन्मवेळे पावेन येवोन । आवडी घेईन दर्शन । वंदीन चरण नित्यनेमे ॥१४॥

तुम्हां उभयतांचे चरण । हेचि माझे दैवत पूर्ण । तप तीर्थ व्रत दान । सकळ येथून जाणिजे ॥१५॥

भाग्य अभाग्य चमत्कार । नाना वस्तूंचे प्रकार । विद्या गुण चातुर्य व्यवहार । तुम्हीच दातार या काजी ॥१६॥

अज्ञान ज्ञान विज्ञान भक्ति । वैराग्य आणी स्वरूपस्थिती । वैभव औदार्य चारी मुक्ती । कदा न पावती तुम्हांवीण ॥१७॥

तुम्ही जन्माचे अधिष्ठान । तुम्ही कर्ते लालनपालन । नाना वस्तु हे अलंकार भूषण । तुम्हांपासून प्राप्त की ॥१८॥

तुम्हांवाचोनि कोण थोर । मज तो न दिसेची निर्धार । तुम्हांपासोनि सर्व विस्तार । आकार विकार मात्रादि ॥१९॥

असो मातापित्यांहोनि आगळे । दैवत म्हणती ते आंधळे । जयापासोनि ब्रह्मांड झाले । तया विसरले मुर्ख ते ॥२०॥

मातापितयांची सेवा । न करितां पूजिती देवा । काय म्हणावे त्या गाढवा । प्रत्यक्ष देवा विसरले ॥२१॥

सकळ दैवतांमाजी श्रेष्ठ । मातापिता असती वरिष्ठ । त्यांचे सेवेचे मानी कष्ट । अति पापिष्ट अघोरी ते ॥२२॥

मातापितयांच्यावचना । अव्हेरोनी करि तीर्थाटना । अथवा करी जपअनुष्ठाना । व्यर्थ जाणा ते होय ॥२३॥

मातापितयांचा राखी संतोष । तेथेचि किर्ती आणि यश । सर्व फळे फळती त्यास । मान्य सकळांस होय तो ॥२४॥

येचिविषयी जननिये । आम्हांसी तारक तुमचे पाय । हेचि नासितील अपाय । करितील उपाय निष्ठाबळे ॥२५॥

तुमचिया दर्शनावांचून । कधीही मी न राहे जाण । यासाठी वेळ नेमून । तुम्हांलागुन निवेदिली ॥२६॥

आता करावे स्वस्थ चित्त । माझे वचन हे पादांकित । कदा न होयची असत्य । भेटी नित्य घेऊ आम्ही ॥२७॥

श्रोती ऐकिजे सावधान । ते अद्यापि चालविती नेमिले वचन । यात्रा करोनि घ्यावया दर्शन । नित्य आगमन असे तया ॥२८॥

ऐकोनि बाळकाचे वचन । अत्रिअनसूया आनंदघन । तिघांसी देती आलिंगन । ह्रदयी धरून चुंबितो ॥२९॥

वारे तुम्ही कुलोद्धारक । जन्मलांती तिमिरछेदक । पापदग्धा पावक । सुखदायक आम्हांसी ॥३०॥

तुम्ही अंशधारी ईश्वर । तिघा देवांचे अवतार । भावभक्ती योगेश्वर । झाला निर्धार आमुचे ॥३१॥

तुमचेनि योग्यता आम्हांसी । धन्य जन्मोनि केले जगतीसी । लीला दावोनि सकळांसी । देवमानवांसी तोषविले ॥३२॥

तरी आता तीर्थमिषे करून । करा अनन्यासी पावन । जगतीचे करावया उद्धरण अवतार पूर्ण तुमचे ॥३३॥

तव अत्रि म्हणे गा सुकुमारा । तुमचेनी होय धन्य धरा । आनंदयुक्ते विचरा । ध्वज उभारा कीर्तीचा ॥३४॥

परिसोनि वडिलांचे वचन । तात्काळ वंदिले उभयांचे चरण । येरु देती आशीर्वचन । चिरंजीव कल्याण म्हणोनि ॥३५॥

ही कल्याणात्मक किर्ती । ज्याचा तोचि वदवी निश्चित्ती । आवडी अवधारिले संती । परम प्रीती करोनिया ॥३६॥

पुढील कथा अत्यंत पावन । तिघे जातील यात्रेलागून । ते आदरे श्रोते कीजे श्रवण । पापमोचन होय पै ॥३७॥

दत्तकथा हे विशाल तारू । करावया सिद्ध भव पारू । चला बैसा न करा अवसरू । अति सत्वरू लाग वेगे ॥३८॥

भवसागरीचा नावाडा । दत्तदिगंबर चोखडा । नेल उतरोनी पैलथडा । आवडी जोडा पाय त्याच ॥३९॥

दत्त सदय उदार । उद्धरणार्थ धरिला अवतार । भाविक मुमुक्षू जे नर । कृपाकर त्या देतो ॥२४०॥

दत्त व्यापक सवा ठायीं । संतसमाजी वसतो पाही । संतची जाणती लवलाही । दत्तपायी वास त्याचा ॥४१॥

म्हणोनिया संतसेवनी । अनंतसुत राते अनुदिनी । संतपादुका मस्तकी वाहोनी । रुळे चरणी रज सेवी ॥४२॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । श्रीनारदपुराणींचे संमत । परिसोत भाविक संतमहंत । एकादशोऽध्यायार्थ गोड हा ॥२४३॥

॥इति एकादशोध्यायः समाप्त ॥

## अध्याय बारावा

॥ श्रीगणेशायनमः ॥

नमो सद्‌गुरु अविनाश निर्मळा । सच्चिदानंद परम सुशीळा । विज्ञानरूपा दयाळा । त्रैलोक्यपाळा सनातना ॥१॥

अजी श्रीदत्तदयाघना । परिसाजी दीनाची विज्ञापना । तुझिया लीलेची रचना । प्रीती निरोपणा चालविजे ॥२॥

मी नसे येथे बोलता । तुझा तूचि होसी बोलविता । काय आम्हां पामरांसी सत्ता । आळ पुरविता तूचि की ॥३॥

सिद्ध करोनी वावडीदोर । मनी वाटे भेदावे अंबर । परी न सुटता समीर । वेघे वर कैसी ते ॥४॥

तैसा तव कृपेचा नसता प्रभंजन । केवी रसना वदेल सुरस गहन । जैसा वायूविण पतंग हीन । तैसाचि जाण मी रंक ॥५॥

यासाठी सद्‌गुरु दत्तात्रेया । विनीत झालो तुझिया पाया । तरी कृपादान करोनि दया । द्या वरा या जगद्‌गुरु ॥६॥

मी म्हणवितो तुमचा दास । समर्था धरिली तुमची कास । माझी न कीजे जी निरास । पुरवा आस सदयत्वे ॥७॥

आजवरी माते पाळिले । लळे आवडीचे पुरविले । त्याहूनि अधिक आगळे । मनोरथ अयाळे पूर्ण कीजे ॥८॥

तुमचेचि आधारे करून । मग झाले निरोपण । पुढेही करविजे श्रवण । अमृताहून गोड कथा ॥९॥

नत होवोनी प्रेमेसी । आता विनवी श्रोतियांसी । दत्ते आज्ञा तीर्ता जावयासी । मातापित्यांसी मागितली ॥१०॥

उभयतांचे समाधान । करोनि बोलिले अभयवचन । नित्य अस्ती तुमचे दर्शन । घेऊ प्रमाण बोलिले ॥११॥

वचनी उभय आनंदता । येरी ठेविला चरणी माथा । आशीर्वचने उभयतां । देती सुता सप्रेमे ॥१२॥

हे गत कथाध्यायी परिसिले । श्रोतेजनी अवधान दिले । आता या प्रसंगी जे निवेदिले । आवडी ऐकिले पाहिजे ॥१३॥

दुर्वास दत्त अंबुधर । जोडोनिया प्रेम कर । अत्रिअनसूयेचे समोर । राहोनि प्रियकर बोलती ॥१४॥

वडिली आता दया कीजे । यात्रागमनी आज्ञा दीजे ।सिद्धी संकल्पाते नेइजे । कृपे पाळिजे वत्साते ॥१५॥

ऐकोनिया बाळबोला । मोहे अश्रू लोटले डोळा । तिगे सद्गद तये वेळा । चरण कमळा लागती ॥१६॥

स्फुंदता नेत्री वाहे जीवन । तेणे पुजिले उभयांचे चरण । येरे हृदयी बाळा धरोन । देती आलिंगन प्रेमभरे ॥१७॥

अलिंगनी पडली मिठी । जीवे करवे न कदा सुटी । अनसूया म्हणे गोमटी । केव्हा दृष्टी पडती पुढे ॥१८॥

बाळ हो तुम्ही टाकोनि जाता । जीवी झोंबली फार चिंता । केधवा परतोनि याल आता । हृदयी व्यथा हे थोर ॥१९॥

अवधूत म्हणे वो माते । गुह्य विनवोनि निवेदिले तूते । ते विसरसी भूलोनी मोहाते । सांडी भ्रमाते सावध हो ॥२०॥

तूते म्या दिधले वचन । वाटते गेलीस विसरोन । त्याचे करी तू स्मरण । नोव्हे अप्रमाण सत्य माते ॥२१॥

मी तूते विसरोन न राहे । तूते भेटेन मज तू पाहे । माझे वचन दृढ आहे । स्वस्थ होय मानसी ॥२२॥

तुझीच शपथ आहे मजसी । नेमा न ढळे निश्चयेसी । अस्तसंधी दर्शनासी । येईन तुजपासी निर्धारे ॥२३॥

तू होवोनिया सुप्रसन्न । मज मार्गस्थ करी आनंदघन । मोह खेद परता सारोन । जीवींची खूण जीवी धरी ॥२४॥

अनसूया म्हणे रे सखया । धीराविसी अश्वासूनिया । परि दुर्धर हो मोहमाया । शिवणी काया काय करू ॥२५॥

अत्रि म्हणे न करी शोका । व्यत्यय येतसे गमनी बाळका । संतोषे वाटे तया लावि का । पावतील सुखा ऐसे करी ॥२६॥

जव जव तू शोक करिसी । तव तव बाधक होय बाळासी । हे जाणोनिया मानसी । शोकसागरासी आटोपी ॥२७॥

ऐकोनी पतीचे वचन । विवेके बाणवी समाधान । बाळकांचे चुंबोनि वदन । देत आलिंगन बहुप्रीती ॥२८॥

असो आज्ञा घेवोनि त्वरित । तिघेही करिती प्रणिपात । तेवींच अत्रीलागी दंडवत । साष्टांगी नमीत प्रेमभावे ॥२९॥

सव्य घालोनि तयांसी । मागुती प्रणम्य उभयांसी । करोनि लक्षिती चरणांसी । सपेम मानसी त्रिवर्ग ॥३०॥

तो ऋषिपत्न्यांसहित । भेटीस भार पावले समस्त । त्रिवर्गसकळांते नमीत । मिसळनी होत आलिंगनी ॥३१॥

आलिंगन होता सकळांचे । वर्षाव झाले प्रेमाचे । ते न वर्णवेची मज वाचे । पूर मोहाचे लोटले ॥३२॥

अविनाश म्हणे सकळांसी । लोभवृद्धि असावी मानसी । आमुचे रंजवावे मायपित्यांसी । विनंती तुम्हांसी हे माझी ॥३३॥

तंव बोलती अवघे जन । तुजवांचोनि उदास तपोवन । तेवींच जाण सकळांचे मन । आतांचि शून्य दिसतसे ॥३४॥

उद्भवतां तुझा विरह पोटीं । दिशा लागती आमुचे पाठीं । ओस दिसती आम्हां खोपटीं । दशा ओखटी जीवीं वाटे ॥३५॥

तुझिया गमनें तळमळ । तुज न देखतां जीव व्याकुळ । पाहावयासी चंचळ । न धरवे कळ दिन एक ॥३६॥

तंव अविनाश बोले वाणी । म्हणे ऐकिजे सकळ श्रवणीं । मज सांभाळितां लोभें करुनी । स्वपुत्राहूनी आगळें ॥३७॥

यास्तव हेचि विनंती । माझा विसर न पडो तुम्हांप्रती । मज आठवावें दिनराती । यावीण खंती नसो दुजी ॥३८॥

दृध धरिजे माझा ध्यास । तुम्हांविण कोण हो आम्हांस । संसारीं राहोनि उदास । गमवा जीवास ममछंदें ॥३९॥

जंव जंव ध्यास तुम्ही करा । तंव तंव तेंचि माझिया अंतरा । सुखरुप भेटेन पुनरा । तुमचेनि वरा योग माझा ॥४०॥

सप्रेमें कराल तुम्ही आठवण । मग तुम्हां आम्हां दुःख तें कवण । तुमच्या कृपेचीच हे आंगवण । जाणा श्रवण गुह्य केलें ॥४१॥

आणिक एक सांगतों तुज । जें कां स्मरण करितील सहज । तया भेटोनि जाणें मज । पुरविणें चोज स्मरत्यांचें ॥४२॥

हेंही स्मरण तुम्ही धरा । मज जीवेंभावें अंगीकारा । येणेंचि आलों मी आकारा । तुम्हांविण थारा मज कोठें ॥४३॥

तुमचा प्रेमा माझे ठायीं । मज आठवितां तुम्ही हृदयीं । तुम्हांपासूनी मी दूर नाहीं । किती कांहीं सांगावें ॥४४॥

मातेसि दर्शन द्यावया नित्य । अस्तमानीं येईन ठाया । ते संधी करोनी दया । दाविजे पायां तुमच्या ॥४५॥

ऐसें ऐकोनि अभयोत्तर । सकळीं केला जयजयकार । मुखें बोलती अमृतोत्तर । यात्रा समग्र सुफळ हो ॥४६॥

परिसोनि आनंदाची वाणी । प्रणिपात करोनि सर्वांचरणीं । तया त्रिकुटाचळालागोनी । करिती नमोनी प्रदक्षिणा ॥४७॥

ते अवघे तपोवन । गुंफा कुटिका भुवन । सकळां सव्य प्रदक्षिणा करोन । घालिती लोटांगण जन्मभूमी ॥४८॥

आदरें मागुती सर्वा नमिलें । प्रेमें मातापित्यांसी वंदिलें । शब्दगौरवें निवविलें । अश्रूनें कमळें हेलावती ॥४९॥

अनसूया म्हणे दुर्वासा । ज्येष्ठ तूं सांभाळी राजसा । अतिक्रमणीं मनसा । दुःख सहसा न द्यावें ॥५०॥

तेवींच माय वदे दत्तासी । त्रिगुणातीता सुज्ञ होसी । सांभाळी श्रेष्ठा ज्येष्ठपदासी । सुख दे चंद्रासी बाळका ॥५१॥

सवेंची वदे त्या इंदूतें । सकुमारा ऐके वचनातें । भावें सेवुनी राहे उभयातें । शिरीं या आज्ञेतें वंदिजे ॥५२॥

ऐसियापरी निरोपितां । त्रिवर्ग वंदिती आज्ञा माथा । न करी माउली कांहीं चिंता । आज्ञा आतां देइजे ॥५३॥

अवश्य म्हणतां मार्गीं लागले । अवघे बोळवोनी ऋषी परतले । आपुलाले आश्रमीं पावले । मोहीं गुंतले प्रपंचीं ॥५४॥

असो इकडे अवधूत । आनंदे करोनी पंथ क्रमीत । देव क्षेत्रें तीर्थें पहात । पूर्वपंथ लक्षिला ॥५५॥

वाराणसीक्षेत्रीं जातां । मध्यें माधव देखिला अवचिता । स्वस्थान देखोनि झाला रमत । अनंद चित्ता ते ठायीं ॥५६॥

तंव गंगा यमुना सरस्वती । देखोनि प्रगटल्या महामूर्ती । भेटोनि दत्तातें प्रार्थिती । बहु स्तविती आदरें ॥५७॥

जयजय अविनाश निर्मळा । जय सच्चिदानंदा पूर्ण दयाळा । त्रिगुणात्मका त्रिभुवनपाळा । सदय कृपाळा तुज नमो ॥५८॥

जय निर्विकारा निरंजना । जयजय पूर्ण ब्रह्म सनातना । सर्वसाक्षी चैतन्यघना । पतितपावना नमो तुज ॥५९॥

जय अपरिमित आनंदा । जय षड्गुणसंपन्ना परमानंदा । जय भेदातीत तूं अभेदा । प्रीतीं तव पदा नमितों जी ॥६०॥

स्तुतिसंवाद ऐकतां । आनंद वाटला श्रीदत्ता । म्हणे तुम्ही सकळ तीर्थांची दैवता । स्तविता अर्था कोणत्या ॥६१॥

तंव त्या वदती कर जोडोनी । जन पावती आम्हां पाप आचरोनी । ते भार होती आम्हांलागुनी । म्हणोनि विनवणी करीतसों ॥६२॥

सिद्ध साधु संत तापसी । अकस्मात येती जैं स्नानासी । त्यायोगें नाश दुरितासी । होय आम्हांसी पवित्रता ॥६३॥

यदर्थीं कृपा करोनिया । नित्या आम्हांवरी कीजे दया । स्नानें करोनी दत्तराया । पाप विलया लाविजे ॥६४॥

आनंदें करिती भाषण । नित्य येथेंचि चांग करुं स्नान । पुढतीं स्व इच्छें करुं गमन । शुचित पूर्ण असावें ॥६५॥

म्हणोनिया अद्यापवरी । आनंदें टाकिती लहरीवरी लहरी । सदा सुशीळ निर्मळ अंतरीं । पाप हारी जगताचें ॥६६॥

तेथें सिद्ध साधु योगेश्वर । स्नानासी येताति अपार । प्रयागमाहात्म्य अत्यंत थोर । होय उद्धार स्नानेंची ॥६७॥

अवधूतें करोनिया स्नान । सकळ तीर्थां केलें पावन । काशी गया जगन्नाथ पाहून । सव्य गमन रामेश्वरीं ॥६८॥

पाहोनि गोकर्णमहाबळेश्वर । शिवकांची विष्णुकांची सुंदर । शेषाचलीं दैवते अपार । उमाकुमर पाहिला ॥६९॥

श्रीपंढरीक्षेत्र पुरातन । गुप्त अविनाश वस्तूचें स्थान । तेथें सकळ ऋषी देवगण । सदा प्रार्थून तिष्ठती ॥७०॥

द्वीपद्वीपांतरींची तीर्थे । सकळ लोकीचीं दैवतें । मूळ पीठासभोंवतें । वास करिते पैं होती ॥७१॥

तें दंडकारण्य अतिपावन । सकळ बीजांचें बीज स्थान । अनुपम्य जेथींचें महिमान । परब्रह्म पूर्ण सएव ॥७२॥

जें अनंत ब्रह्मांडींचें बीज । जें या वेदशास्त्रांचें गुज । जें साधुसंतसिद्धांचें निज । तें अविनाश सतेज तें ठायीं ॥७३॥

तया स्थळासी पाहतां । दत्त अविनाशी झाली ऐक्यता । समरुपीं समरसता । आनंद चित्ता न समाये ॥७४॥

चित्त चैतन्य मुसावलें । द्वैतपणातें हारपलें । अद्वयेंचि संचलें । सागरीं मिळालें सैंधव ॥७५॥

अवतारचरित्र दावावया । प्रगट केल्या बिभक्त काया । शरणागताची दया । देवराया म्हणोनी ॥७६॥

करावया जगदुद्धार । जगद्गुरु हा दत्त अवतार । तोचि उभा विटेवर । दिगंबर स्वमी हा ॥७७॥

बिंदुतीर्थीं आपण । शेषातळीं घालोनि आसन । दावीतसे योगध्यान । उन्मिलीत नयन करोनिया ॥७८॥

तंव शंकरविभूति दुर्वास । काय बोले तेव्हां अवधूतास । विनटलां या बिंदुतीर्थास । कोण विशेष सांगा तें ॥७९॥

प्रश्न देखोनि सुलक्षण । दत्त विनविते झाले आपण । जी स्वामी सावधान । परिसा निरोपण आघवे ॥८०॥

हें आठाविसाचें मूळ । वर्णितां आठाविसां आकळ । आठींच आठाविसांचा खेळ । मात्रामेळ पन्नास ॥८१॥

ह्या प्रसर मात्र पन्नास । विचारींच ह्या विलास । याहीवरी पाह्या विशेष । विरळ तयास जाणता ॥८२॥

ठरल्या भार्गी दोन । ते हे सहस्त्रदळीं आसन । योगी साधकसिद्धांचें धन । गुज खूण संताची ॥८३॥

सर्वां अलिप्त ह्या बिंदु । मीच गातों परमानंदु । भेदीं असोनी अभेदू । येथें अनुवादू खुंटला ॥८४॥

येणेंचि बीजें विस्तारलें । अब्रह्म स्तंभ व्यापलें । मागुती समावोनि राहिलें । विटीं मिरविलें अवीट हें ॥८५॥

हे ऐकोनि गुजवार्ता । दुर्वास झाला संतोषता । अविनाश आणि दत्ता । समसाम्यता देखिली ॥८६॥

दत्त अविनाशीं झाली भेटी । तेथें उद्धरिल्या तीर्थकोटी । पावन करावया सृष्टी । चरणांगुष्टी नत गंगा ॥८७॥

अविनाश अवीट अभंग । तो ह्या बिंदुतीर्थीं पांडुरंग । करावया जगदुद्धार । भवभंग । निर्विकार निःसंग ठेलासे ॥८८॥

पुरवावया दासांची आयनी । अभयवर देसी कर सघनीं । सधीटपणीं आलिंगनीं । पाहे निरखोनी कृपादृष्टीं ॥८९॥

नोव्हे अकिंचन आदत्त । स्वात्मत्व करावया दत्त । सदयपणें अवतार दत्त । प्रगट साक्षात जगद्गुरु ॥९०॥

तेथें श्रीरमारमण । आयुधें करवीं स्वयें धारण । अद्वय आनंदें समरसोन । उभा चिद्घन विलासे ॥९१॥

तोचि स्वस्थळातें निरखोन । मनीं झाला आनंदघन । जड जीव करावया पावन । तिलक धारण नेमिले ॥९२॥

अद्यापि तो देव दत्त । बिंदुस्थळा नित्य येत । क्षेत्र पंढरीसी विख्यात । तिलक रेखीत आनंदें ॥९३॥

हें संत वैष्णवाचें माहेर । तारक अवीट दिगंबर । दावी तिलकाचे प्रकार । द्वादशसार भागवतीं ॥९४॥

ऐशा दावोनी खुणा । दावोनि पुढें चालिला योगिराणा । तीर्थ क्षेत्र दैवत नाना । ऋषिस्थाना विलोकी ॥९५॥

तुळजापुरातें जावोन । कल्लोळ भागीरथीचें केले स्नान । आदिमायेसी स्तवोन । वंदिले चरण तुळजेचे ॥९६॥

शिवप्रिया हे हिमनगनंदिनी । श्रीरामछलना जी पावली येवोनि । जानकीऐसी उठवोनि ध्वनी । प्रगट वनीं रामदृष्टी ॥९७॥

राम परब्रह्म सांवळा । ओळखोनि म्हणे ही शिवकोकिळा । तूं कां आई दाविसी लीला । राहे स्थळा स्वस्थ येथें ॥९८॥

तैंपासोनि हे जगदीश्वरी । शेषाद्रीवरी वास करी । तियेसी अवधूत सत्वरी । लक्षोनि करी नमनातें ॥९९॥

नाना परी केलें स्तवन । हृदयीं रेखिलें जगदंबेचें ध्यान। प्रदक्षिणा करोनिया तीन । लोटांगण घालिती ॥१००॥

तंव तात्काळ ती जगदंबिका । प्रगट झाली शिवअंबिका । तें ध्यान वर्णावया आवाका । शेषादिका असेना ॥१॥

आनंदी आनंद करोनिया । क्षेम देती झाली तयां । म्हणे बा धन्य दत्तात्रेया । अनसूयामाया धन्य ती ॥२॥

त्रिगुणात्मकें पावली निधान । जें सनकादिकांचें ध्येयध्यान । तो तूं सगुणरुप प्रगटोन । अवतारमहिमा न दाविसी ॥३॥

करावया जगदुद्धार । होवोनि विचरसी दिगंबर । तूतें पाहतां आनंद थोर । माझें अंतर सुखावलें ॥४॥

जयाचे गांठीं सबळ पुण्य । तोची पावे तुझें दर्शन । तूं कृपें ज्या करिसी पावन । त्रिलोकीं धन्य तो नर ॥५॥

तुझिया कृपेच्या ज्या विभूती । अद्‌भुत तयांची ख्याती । शरणागतांतें उद्धरिती । मुक्त करिती जीवातें ॥६॥

तुळजा वदे दत्तासी । अलभ्य लाभ झाला मजसी । नित्य ऐसेंचि दे दर्शनासी । तोषवी मानसीं मज येथें ॥७॥

देखोनि तुळजेचा अर्थ । अवश्य म्हणे अवधूत । येथें भोजनासी यथार्थ । येईन येथें जगन्माते ॥८॥

ऐकोनिया दत्तवचन । अंबा झाली सुप्रसन्न । रत्नखचित मुगुट आणोन । करवी धारण मस्तकीं ॥९॥

कुरवाळोनी वदनासी । म्हणे बापा सांभाळी वचनासी । येरु अवश्य म्हणोन तियेसी । वंदोनि चरणांसी निघती ॥११०॥

पाहोनि अंबेचें नगर । पश्चिममार्गें चाले सत्वर । पावेल येवोनि नीरातीर । नरसीपुर पाहिलें ॥११॥

तीर्थी करोनि वंदन । घेतलें नरहरीचें दर्शन । करोनिया स्तुतिस्तवन । आज्ञा मागुन चालिले ॥१२॥

औटपीठांतील पीठ । क्षेत्र कोल्हापूर श्रेष्ठ । महालक्ष्मी सर्वावरिष्ट । सर्वारिष्ट निवरिणी ॥१३॥

तया स्थळातें पावले । तीर्थ रंकाळें वंदिले । मंदिरी ध्यान विलोकिलें । स्तवन आरंभिलें प्रीतीनें ॥१४॥

जय जय आदिमाते जननी । मूळप्रकृति भवानी । जय त्रिभुवनपाळके स्वामिनी । जगन्मोहनी जगदंबे ॥१५॥

जय विष्णुप्रिये सुंदरी । जय प्रलंबे सिंधुकुमरी । जय दारिद्र्यनाशके गौरी । जय जगदीश्वरी तुज नमो ॥१६॥

जयजय कमलासने कमलभूषणे । कमलप्रिये कमललोचने । कमलोद्भवमाते कमलधारिणे कमलवासिने कमले नमो ॥१७॥

जय लक्ष्मी लक्षणयुक्ते । लक्षोनि कृपें रक्षीं मातें । आक्षेपें नच तरी पक्षपातें । देई भिक्षे दक्ष मी ॥१८॥

तूं सदय शांत निर्मळ । सौभाग्यदायिनी कोमळ । उदारत्वें पुसविसी आळ । होसी स्नेहाळ सर्वज्ञे ॥१९॥

ऐसें स्तवितां श्रीदत्त । अंबा प्रगटली साक्षात । क्षेमालिंगन देवोनि त्वरित । म्हणे संतोषित मज केलें ॥१२०॥

आदिमाया वदे दत्ता । तूं त्रिगुणात्मकें नटलासि आतां । पावन करी या जगता । अपेक्षिता पुरवी धणी ॥२१॥

धन्य धन्य तुमचे अवतार । धरोनि हरतां भूमिभार । लीला दावितां अगोचर । न कळे पार कवणासी ॥२२॥

तुमचेनि थोरीव आम्हांसी । मान्य झालों कीं सकळांसी । धन्य धन्य तूं अविनाशी । उदारमानसी सदयत्वें ॥२३॥

तरी नित्य मातें द्यावे दर्शन । माझें घ्यावें भिक्षादान । तुमचेयोगेंकरुन । होतील पावन सकळही ॥२४॥

दत्त बोले तैं मातेसी । अंगिकारिलें म्यां तव वचनासी । नेम न टळे निश्चयेंसी । नित्य भिक्षेसी येईन ॥२५॥

ऐसें होतांचि भाषण । अंबा झाली संतोषमान । कर्णी कुंडलें भूषण । दैदीप्यमान शोभविलें ॥२६॥

देखोनि अवधूत सत्पात्र । भिक्षेलागीं दे सुवर्णपात्र । माजी भिक्षा आणून पवित्र । वोपी विचित्र दिव्य अन्न ॥२७॥

तें करोनि धारण । केले मातेसि तेव्हां नमन । जननीचें निरखोन वदन । आज्ञा मागून चालिले ॥२८॥

अवधूत भिक्षा अद्यापवरी । नित्य होतसे कोल्हापुरीं । भेटीसाठीं नानापरी । युक्ति करी जन तेथें ॥२९॥

निग्रह निजध्यास पाहून । शुद्ध भावातें ओळखोन । स्वामी अद्यापि देती दर्शन । आळ पूर्ण करिताती ॥१३०॥

असो अवधूत मार्गीं चालले । महाबळेश्वराप्रति पावले । तंव तेथें नवल वर्तले । तेंचि परिसिलें पाहिजे ॥३१॥

कृष्णा आणि भागीरथी । गायत्री सावित्री सरस्वती । सतेज दिव्य रुपें प्रगटती । अवधूत भेटती येवोनी ॥३२॥

अवधूताचें करोनि स्तवन । सांगती आपुलें नामाभिधान । म्हणती संगम करा जी पावन । चालोनि आपण ते ठायीं ॥३३॥

अवश्य म्हणोनिया योगीराणा । विलोकिता झाला संगमस्थाना । संकीर्ण देखोनि नयना । आनंद मना न वाटे ॥३४॥

ओळखोनि दिगंबराचें चित्त । पांची गंगा विनवीत । पुढे प्रवाह प्रशस्त । झालों विभक्त निवेदितों ॥३५॥

येथे मूळ कृष्णेचा उगम । भेटीसाठीं चौघींचा संगम । येथोनि वेगळाचि क्रम । तोही उत्तम सांगतों ॥३६॥

महापर्व कन्यागतीं । प्रगट वाहे येथें भागीरथी । गायत्री सावित्री सरस्वती । गुप्त असती मिश्रित ॥३७॥

ह्या पश्चिममार्गे करुन । प्रवाहरुप वाहतीपूर्ण । दक्षिणपंथातें लक्षून । दोघी चालिलों ॥३८॥

माहुली क्षेत्र अत्यंत सुंदर । तेथें मज कृष्णेचा विस्तार । वेण्या मिळाली प्रियकर । संगम थोर ते ठायीं ॥३९॥

तरी विज्ञापना परिसावी । नित्य विश्रांती तेथें व्हावी । सकळ तीर्थें पावन करावीं । दुरितें वारावीं सकृपें ॥१४०॥

विनीत उत्तरें परिसोन । अवधूत देती प्रतिवचन । नित्यनेम करुन । संध्यावंदन करुं येथें ॥४१॥

परिसोनि अभय वचनासी । आनंदभरित झाल्या मानसीं । अवधूतें पाहूनि महाबळेश्वरासी । माहुली क्षेत्रासी विलोकिलें ॥४२॥

क्षेत्र अत्यंत सुंदर । रमणीय देखिलें कृष्णातीर । संगमीं वंदोनि सत्वर । पैलपार उतरले ॥४३॥

तीर्थदेवतीं आवडी । सिद्धसाधुदर्शनीं गोडी । शोधीत चालती तांतडी । कडोविकडी गुहा वनें ॥४४॥

स्वच्छंदें करोनि विचरती । मार्गी जीवजंतु उद्धरिती । ज्योतिर्लिंगें अवलोकिती । प्रेमें पूजिती आदरें ॥४५॥

पर्वतदरी पंथ क्रमोनी । सप्तश्रृंगीस पावले येवोनी । ते विशाळ दैदीप्य भवानी । शिखरस्थानीं पाहिली ॥४६॥

ते जगदीश्वरी साक्षात । तिची कृपा व्हावया प्राप्त । तापसी तपातें आचरत । फळ पावत कामनेचें ॥४७॥

ते माता पाहूनि नेत्रकमळीं । स्तवोनिया पादें वदिलीं । अंबा प्रगटोनि तये वेळीं । मुख कुरवाळी तयांचें ॥४८॥

म्हणे चिरकाळ क्षेमकल्याण । तुम्हां असो गा परिपूर्ण । सिद्धि ऋद्धि योगज्ञान । येणें संपन्न सुखी असा ॥४९॥

त्रिगुणात्मकें साचार । तुम्ही धरिलासे अवतार । उतरावया भूमिभार । जगदुद्धार करावया ॥१५०॥

दत्त म्हणे वो जननी । तूं अर्धपीठ निवासिनी । तुझिया कृपायोगें करोनी । अद्‌भुत करणी होतसे ॥५१॥

स्वइच्छें घडमोडिसी । अनंत ब्रह्मांडें खेळविसी । कोण विधानें तुझी कैसीं । आगमनिगमासी न कळती ॥५२॥

त्रिगुणात्मकें बीजासनीं । षड्‌भुजे तूं प्रणवरुपिणी । विश्वात्मके सर्व साक्षिणी । गुणवर्धनी गुणातीते ॥५३॥

स्तवनीं होवोनि तोषमान । लेववी चरणीं ब्रीदभूषण । अभयहस्त मस्तकीं ठेवून । कृपें करुन बोळवी ॥५४॥

मातेसी करोनि प्रणिपात । त्र्यंबकेश्वरीं पावले त्वरित । तेथें त्रिगुणात्मक दैवत । पाहिले साक्षात अनुपम्य ॥५५॥

त्रिगुणात्मकाशीं त्रिगुणात्मक । भेटते झाले आवश्यक । कुशावर्ती बैसोनि नावेक । गिरीं आवश्यक वेधलें ॥५६॥

हें मूळ गौतमाचें स्थान । प्रसंगीं आलें निरोपण । श्रोते होवोनि सावधान । कीजे श्रवण साक्षेपें ॥५७॥

पूर्वीं गौंतम आचरे तपासी । शांतिशील सदय कुटुंबेंसी । सवें अहिल्या गुणराशी । पतिआज्ञेसी तत्पर ॥५८॥

उभयतां ही आनंदघन । नित्यानित्य साळी पिकवोन । दुकळीं घालोनि भोजन । करी पालन बहुतांचें ॥५९॥

तेथें हिमनगबाळी । गौतमीवेषें खाय साळी । तेथें गौतमें देखोनि नेत्रकमळीं । धांवोनि जवळी पावला ॥१६०॥

श्रोते म्हणती कासयासाठीं । हे गौतमीरुप धरी गोरटी । वक्ता म्हणे पडिली हाटीं । तेही गोष्टी परिसावी ॥६१॥

कवणें एके काळीं । शंकर आणि हिमनगबाळी । परमानंदाचे मेळीं । द्यूत खेळीं बैसले ॥६२॥

उभय सारीपाट खेळती । तंव जटेकडे पाहे पार्वती । तेथें ललनेची आकृती । देखोनि चित्तीं विस्मित ॥६३॥

म्हणे जी शंकरा करुणाकरा । जाश्वनीळा दिगंबरा । अहो स्वामी कर्पूरगौरा । विनंती अवधारा एक माझी ॥६४॥

जटाजूटीं निगुती । दिसती ललनेची आकृती । ते सांगा कृपामूर्ती । मजप्रती येधवां ॥६५॥

तंव शंकर बोले गिरिजेसी । तें सलील ठेविलें शीततेसी । दृष्टि तरळोनी निश्चयेंसी । ललना म्हणसी तियेतें ॥६६॥

उमा म्हणे कुचाग्र । ते दिसताती अति सुंदर । शिव म्हणे मनोहर । हंस नागर द्वयभार्गीं ॥६७॥

मागुती बोले भवानी । दिसती नेत्रभरित अंजनीं । हर बोले जळस्थानीं । मच्छ तळपोनी राहिले ॥६८॥

हिमनगजा म्हणे भ्रकुटी । सुनीळ दिसती धूर्जटी । नीलकंठ म्हणे कच्छपृष्टीं । दिसे दृष्टी कृष्ण तें ॥६९॥

जी तें ललाट दिसतें विशाळ । कुंकुमचिरी वरी गुंजाळ । हर म्हणे मगर प्रबळ । कमळनाळ आरक्त दिसे ॥१७०॥

तंव ते बोले मृडानी । कुरळ दिसती बरवेपणीं । त्रिपुरारी म्हणे कुरंगनयनी । लहरा जीवनीं एकसरा ॥७१॥

इभजननी म्हणे पंचवदना । मुक्तमंडित तेजभूषणा । निरखितां भास माझिया मना । कृपाघना दिसती ॥७२॥

तंव बोले चंद्रमौळी । नग नव्हेत वेल्हाळी । कमळपुष्पें विकासलीं । वर्ण पिंवळीं सतेज ॥७३॥

जळीं तरंगांचे आकार । ते तुज दिसती मुक्ताकार । किंवा कमळी गुंजार । घालिती भ्रमर जाण तूं ॥७४॥

अपर्णा म्हणे कुसरी । दाविली वदोनी नाना परी । अद्‌भुत लीला सर्वेश्वरी । सवत वरी पाळिली ॥७५॥

उमा न दावितां वदोनी । सवतमत्सर धरिला मनीं । ही विशेष आगळी मजहूनी । मौलस्थानी प्रिय झाली ॥७६॥

असो अंबा सखेद मानसीं । श्रुत करी एकदंतासी । कोण विचार करुं यासी । गंगा शिवासी आवडली ॥७७॥

मजहूनि ते अधिक झाली । मस्तकीं जावोनि सवत बैसली । हे मज तो नव जाय साहेली । त्वरें सांडविली पाहिजे ॥७८॥

कवण करुं यासी उपाय । ज्या गुणें येथोनि जाय । हे असतां घडविल अपाय । तया ठाय सांडवावा ॥७९॥

मातेसी बोले गजवदन । माझेनि न बोलवे वडिलां वचन । तुमचें तुम्ही साधा कारण । साह्यपण माझें तुज ॥१८०॥

ऐसा करोनि संकेत । अंबा कारणातें योजित । भूलोकीं धांडोळित । कार्य विपरीत करावया ॥८१॥

तों अकस्मात तपोराशी । दाता शांत सदय मानसीं । आनंदें पाळी काळीं जिवासी । नित्य साळीसी पिकवोनी ॥८२॥

ऐसा तो गौतम महामुनी । अहिल्येसहित देखिला आचरणीं । त्याचें चरित्र दृष्टीं देखोनी । आनंद मनीं वाटला ॥८३॥

अंबा म्हणे गा लंबोदरा । येथेंचि रचूं कर्तृत्वविचारा । तूं गोरक्षक होवोनि सुंदरा । गाई बरा राखी येथें ॥८४॥

मीही गौतमी दुबळी होईन । साळीमाजी प्रवेश करीन । थैक म्हणतां सोडीन प्राण । पाहे दुरुन तूं धुंडी ॥८५॥

तोषवितां मुनिवर । प्रगट करी तूं सत्वर । दूषणावांचोनि हा प्रकार । सिद्धी पर नवजे कीं ॥८६॥

ऐशापरी आज्ञापितां । तैसेंचि होणे आलें गणनाथा । गौभारातें होय चारिता । झाली माता गौतमी ॥८७॥

ते साळींत करितां प्रवेशन । गौतम त्वरें आला धांवून । कृश गौतमी अत्यंत देखोन । न करी ताडन कळवळें ॥८८॥

सहज मोहोरीप्राय कंकर । उचलोनि पाणी केला वर । थैक म्हणतां सत्वर । टाकी शरीर गौतमी ॥८९॥

क्षण न लागता सोडिला प्राण । दचकलें गौतमाचें मन । विघ्नेश पाहे दुरोन

। पुढील कारण लक्षीत ॥१९०॥

गौतम म्हणे ही कर्मगती । कैसी ओढवली मजप्रती । थैक म्हणतां सहज स्थिती । हत्या मजप्रती लागली ॥९१॥

न करिता कांहीं ताडन । व्यर्थ आलें हें वेहेरण । असो क्षुधित येतील ब्राह्मण । तयांसि भोजन देणें कीं ॥९२॥

प्रगट न करितांची मात । सदनीं जावोनिया त्वरित । वेगीं पाका सिद्ध करवीत । शुचिष्मंत आदरें ॥९३॥

चहूंकडोनि पातले द्विजवर । पात्रेंहि विस्तारिलीं अपार । षड्रस अन्नें परिकर । वाढोनि सत्वर सिद्ध केलीं ॥९४॥

ब्राह्मण पात्रीं बैसले । गौतमें उदक करी घेतलें । मंत्रोक्त संकल्प सोडिले । ते जाणवले परशुधरा ॥९५॥

ब्राह्मण बैसतां भोजनीं । तों विघ्नेश आला धावोनी । गोरक्षवेषातें दावोनी । काय वचनी बोलत ॥९६॥

हे गौतमा तपोधना । सदय म्हणविसी तूं आपणा । कां गा धरोनी निदर्यपणा । गौतमी हनना केलें त्वां ॥९७॥

माझी गाय मारोनि टाकिली । हत्या तुजवरी थोर आली । वार्ता ऐकोनी द्विजमंडळी । जेवितां राहिली स्तब्ध उगी ॥९८॥

पुसते झाले धरामर । केउता घडला हा विचार । गोरक्षक सांगे सत्वर । दावी कलेवर गौतमीचें ॥९९॥

भोजन सांडोनी द्विज उठले । गौतमा गोहत्येतें स्थापिलें । स्वस्थळालागीं विप्र गेले । गुप्त झाले गजानन ॥२००॥

गौतम झाला चिंताक्रांत । कळाहीन झाला निश्चित । बुद्धि न सुचे किंचित । झाला भ्रमित मानसीं ॥१॥

यासी उपाय कोण करावा । विचार कवणासी पुसावा । कैसेनि दोष हरावा । घोर जीवा दिनरजनी ॥२॥

इकडे पार्वती सांगे गजानना । तूं जाय वेगीं गौतमवना । विप्रवेंष धरोनी सगुणा । सांगे निवारणा उपाय त्या ॥३॥

शिवमौलीं गंगा आहे । ते जरी स्नाना मिळेल पाहे । दोष तात्काळ तो जाये । पवित्र काय होईल तुझा ॥४॥

अवश्य म्हणोनी सिद्धिदाता । झाला गौतमासी भेटता । सांगोनि गुह्य गुजवार्ता । झाला जाता मागुती ॥५॥

गौतमासी कैसें वाटलें । जेवीं बुडतिया तारिलें । कीं वणव्यांतुनि काढिलें । कीं सोडविलें व्याघ्रमुखी ॥६॥

कीं तस्करापासुनी सोडविलें । कीं चुकतां मार्गी लाविलें । धन्य उपाय निवेदिले । ऐसें वाटलें तयांसी ॥७॥

सांगितलें जें हित । तेचि करावें गा निश्चित । म्हणोनि गौतम आरंभित । तप आचरत अनिवार ॥८॥

शिवदीक्षा करोनि धारण । कामक्रोधादिक वर्जोन । वादसंवादाते त्यजून । घोर तपाचरण मांडिलें ॥९॥

बहुत काळपर्यंत । आहरनिद्रारहित । तप आचरतां शुचिष्मंत । उमाकांत तोषला ॥२१०॥

तात्काळ प्रगटला कैलासरमण । वरं ब्रूहि बोलिला वचन । येरु पाहे जंव सावधान । तंव पंचवदन देखिला ॥११॥

मग जोडोनि बद्धपाणी । करिता झाला विनवणी । जय करुणाकरा मोक्षदानी । शूळपाणी नमो तुज ॥१२॥

जयजय शंकरा गिरीजावरा । जय पशुपते त्रिपुरसंहारा । जयजयाजी पन्नगहारा । कर्पूरगौरा कपर्दिशा ॥१३॥

पिनाकपाणी शांभवा । करुनानिधे उमाधवा । नीलग्रीवा सदाशीवा । हेतु पुरवा दीनाचा ॥१४॥

भोळा उदार सर्वेश्वर । गौतमा देतसे अभयकर । कोण हेतु सांग सत्वर । तो मी निर्धार पुरवीन ॥१५॥

गौतम जोडोनि करकमला । विनविता झाला जाश्वनीला । गोहत्तेचा दोष घडला । तो निवारिला पाहिजे ॥१६॥

यालागीं स्वामी धूर्जटी । गंगा असे तव जटाजूटीं । तेचि या पातकानें निवटी । स्नानासाठीं देइजे ॥१७॥

अवश्य म्हणोनि मदनारी । तैं गंगेलागीं पाचारी । ती न निघेची बाहेरी । जटेअंतरी स्तब्ध पैं ॥१८॥

नानापरि तिज आळविलें । परि ती न निघे कदा काळें । शिवें कोपोनि तये वेळें । क्रोधें घातले विरासन ॥१९॥

जटा भवंडोनि शिळेवरी । आपटोनि काढिलें बाहेरी । गौतमासी म्हणे ईतें धरीं । पापहारी तात्काळ ॥२२०॥

शिव देखोनि कोपायमान । प्रगटोनि अदृश्य झाली आपण । तैं गौतमें पाटलाग करुन । करी स्तवन करुणोत्तरीं ॥२१॥

मग औदुंबरीं प्रगटली । मागुती तेथोनि गुप्त झाली । प्रीतीं गौतमें आळविली । किंचित उदेली मध्यते ॥२२॥

गौतमें घेवोनि कुशजुडी । करुणास्वरें प्रार्थी आवडीं । म्हणे माये दडादडी । करोनि परवडी मांडिली ॥२३॥

माझें अघ अत्यंत थोर । तुज दिसतें गंगे अनिवार । म्हणोनि तूंतें न धरवे धीर । भीति दुर्धर वाटे तुज ॥२४॥

माझिया अघासाठीं । पळसी देवोनि त्वरें पाठी । येणें योग्यतेसी मोठी । हानी खोटी तुज गंगे ॥२५॥

पंचमहापातकी अघोर । ते त्वां उद्धरिले साचर । माझें पाप तुज अनावर । म्हणोनि समोर न राहसी ॥२६॥

तुझिया कीर्तीचें महिमान । कळों आलें मजलागून । हें मिरवीन जगीं भूषण । भोगूं प्राक्तन आपुलें ॥२७॥

उण्या शब्दाचा अभिमान धरीं । तात्काळ प्रगटली ते अवसरीं । गौतम धांवोनि आवर्त करी । स्नान सारी लगबगें ॥२८॥

तेथें गोहत्येचा दोष गेला । गौतमऋषी पावन झाला । कुशावर्त नाम तयाला । अद्यापि लीला अनुपम्य ॥२९॥

श्रोतियांच्या प्रश्नासी । कथनेचि आलें कथेसी । गतनिरोपणीं अविनाशी । वंदोनि तीर्थासी गिरि वेघें ॥२३०॥

औदुंबरी गंगा वंदिली । पुढें शिवें जटा आपटिली । तेही शिला दृष्टीं पाहिली । खूण ओळखिली वीरासन ॥३१॥

पुढें मुख्य अधिष्ठान । पाहूं जाती त्वरें करुन । तों प्रत्यक्ष त्र्यंबकराजदर्शन । देखिलें पूर्ण सतेज ॥३२॥

अवधूत देखोनि मूर्ती । आनंद न समाये चित्तीं । पाणी जोडोनि पुढतीं । स्तवन आरंभिती प्रीतीनें ॥३३॥

जयजय करुणाकरा विश्वपालका । कृपासमुद्रा कर्ममोचका । भवानीधवा भवनाशका । भाळपावका नमो तुज ॥३४॥

जय अजअजीता अव्यया । गुणातीता गुणमया । सर्वातीता करुणालया । शिवसदया नमो तुज ॥३५॥

जय त्रिगुणात्मका त्रिनयना । त्रिदशपालका त्रिदलभूषणा । त्रिपुरांतका त्रिशूलधारणा । त्रितापहरणा त्र्यंबका ॥३६॥

स्तवनीं तोषोनि उमापति । तिघां आलिंगी परमप्रीतीं । दत्तासि बोले कृपामूर्ती । अद्वय निश्चितीं उभय कीं ॥३७॥

त्रिगुणात्मकें तुझा अवतार । तोचि त्र्यंबकराज निर्धार । कैचा येथें द्वैतविचार । दावोनि प्रकार जग तारा ॥३८॥

स्वयें अपर्णा वेंगीं आली । उभय त्रिगुणात्मक मूर्ति देखिली । आनंदें करोनी अर्चिली । ध्यानीं गुंतलीं नेत्रपातीं ॥३९॥

एक रुप पाहोनि डोळां । परमानंदें केला सोहळा । शिव कर्पूरगौर भोळा । देत मेखळा दत्तातें ॥२४०॥

त्रिशूळ डमरु दिधला करीं । म्हणे तुज शोभती हे साजिरी । अक्षय मिरवोत भूषणें बरीं । येणें अंतरीं सुखावें मी ॥४१॥

ऐकोनिया अमृतवाणी । अविनाश तात्काळ लागे चरनीं । सांब म्हणे तरणी । तोवरी मेदनी राहे तूं ॥४२॥

योगमार्ग परिकर । अवलंबोनि दावी ज्ञान प्रखर । या जगतीचा करी उद्धार । मायाविकार हारपवी ॥४३॥

तूं सकळां श्रेष्ठ मुगुटमणी । सरी न पावे तुझी कोणी । स्वच्छंदें तूं वर्ते जनीं । अद्भुतकरणी दावोनिया ॥४४॥

सकळ सिद्धींचा दाता । तूंचि होसि गा दत्ता । बालोन्मत्त पिशाचता । ह्या अवस्था तुज वसो ॥४५॥

तूं कृपें करिसी अवलोकन । तो तात्काळची तुजसमान । तुज अनन्य जे शरण । तेचि पावन जाणावे ॥४६॥

सकळ लोक लोकाधिपति । तुझिया दर्शनातें इच्छिती । आदरें करोनि माया पार्वती । येतील प्रीतीं नित्यत्वें ॥४७॥

तूं अविनाश गा निर्गुण । सत्य शाश्वत निरंजन । अद्वय निःसंग चैतन्यघन । ब्रह्मानंदपूर्ण तूं दत्त ॥४८॥

क्षराक्षररहित । तो तूं होसी सर्वातीत । तुज जाणावया सत्य । तूंचि समर्थ होसी कीं ॥४९॥

ऐसा करितां वाग्वाद । तल्लीनपणें झाला आनंद । तो आनंदाचा कंद । ब्रह्मानंद हेलावे ॥२५०॥

उभय संवादीं गुज एक । एकापासून झाले अनेक । अनेकींच ते एक । संत आवश्यक जाणती ॥५१॥

संत तेथेंचि शांति । शांति तेचि विरक्ति । विरक्ति तेथेंचि उपरति उपरतीं अनुरक्ति जडलीसे ॥५२॥

जडतांचि झालें उन्मन । हरपलें तेथें मीतूंपण । खुंटले व्यवहार सरले गुन । वृत्ति तल्लीन संतांच्या ॥५३॥

त्या संतांच्या वाहणा । रुचल्या अनंतसुताच्या मना । लक्षीतसे प्रेमें सेवना । जैसें माखणा मांजर ॥५४॥

म्हणोनि विनवी संतांसी । मज ठेवा चरणसेवेसी । आणीक न मागें तुम्हांसी । द्यावी मजसी दान सेवा ॥५५॥

किंचित उद्भवला सेवाभाव । तितुक्याचियोगें हा अपूर्व । प्रसादरुपें लाघव । ग्रंथ अभिनव बोलविता ॥५६॥

हे दत्तकथा अलोकिक । श्रोत्या वक्तया सुखदायक । भोळ्या भाविका तारक । क्षेमकारक सकळांसी ॥५७॥

पुढले प्रसंगीं शिवासी । आज्ञा मागेल अविनाशी । पश्चिममार्गे तीर्थासी । गमन वेगेंसी करितील ॥५८॥

संत श्रोते सज्जन । येथील विभागी असती पूर्ण । लाभ न जोडे भाविकावीण । जीवीं हे खूण राखावी ॥५९॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । श्रीनारदपुराणीचें संमत । श्रोते परिसोत भाविकभक्त । द्वादशोध्यायार्थ गोड हा ॥२६०॥

॥ इति द्वादशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय तेरावा

॥श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥

नमो सद्‌गुरु शिव सनातना । प्रणवरुपा सच्चिद्धना । मायातीता निरंजना । आनंदघना अविनाशा ॥१॥

नमो आदि अनादि विश्वंभरा । नमो निर्विकारा परात्परा । सर्वसाक्षी जगदुद्धारा । ज्ञानसागरा अद्वया ॥२॥

नमो पंचवदना सर्वोत्तमा । अनन्यावरी करी क्षमा । वर्णावया दत्तमहिमा । बुद्धि प्रेमा देईजे ॥३॥

गत कथाध्यायीं निरोपिलें । त्र्यंबक अविनाश भेटले । नानापरी गौरविलें । आनंदकल्लोळें तन्मय ॥४॥

दत्त त्र्यंबकासी प्रार्थिती । आज्ञा द्यावी आम्हांप्रती । अवश्य म्हणे उमापती । भेटी प्रीतीं देत जा ॥५॥

वंदोनिया चरणकमळ । निघते झाले तात्काळ । गिरिप्रदक्षिणा उतावेळ । करोनि सुशीळ नमी पुन्हा ॥६॥

गंगाद्वाराप्रति आले । गंगातीर्थ वंदन केलें । चक्रतीर्थही पाहिलें । नावेकीं देखिलें गंगातट ॥७॥

पाहतां गंगेची तटरचना । आनंद वाटला बहु मना । गंगा साक्षात् लागोनि चरणा । कृपाघना स्तवियेलें ॥८॥

प्रार्थोनि वदे अविनाशा । मत्पापा छेदी सर्वेशा । तुजवांचोनि सर्वाधीशा । पावन परेशा करील कोण ॥९॥

नित्य मातें स्पर्शोन । कृपायोगें करावें पावन । तंव अविनाशें दिधलें अभयदान । न करीं मन उदास ॥१०॥

द्वितीय अन्हीं येथें । अवश्य पावेन माते । मनोरथ होतील पुरते । पापहर्ते श्रीगंगे ॥११॥

क्षेत्रें करोनि अवलोकन । पंचवटीसी केलें गमन । श्रीदत्त ऋषींचें दर्शन । घेतां समाधान पावले ॥१२॥

तेथोनिया पश्चिमेसी । जाता झाला अविनाशी । तीर्थक्षेत्र दैवतांसी । निरखोनी प्रेमेसी वंदिती ॥१३॥

मार्ग चालतां तांतडी । पावले नर्मदेची थडी । तेथील दैवते आवडीं । निरखोनि निवाडी चालिले ॥१४॥

भीमनाथाप्रति । जावोन । आनंदे पावले दर्शन । तुळशीश्याम विलोकून । आनंदघन मानसीं ॥१५॥

रुदगया ब्रह्मगया । आवडीं विलोकिलें तया । प्रभासातें पाहोनिया । विसाविया बैसले ॥१६॥

पुढें चालतां अपूर्व । दृष्टीं देखिला मूळमाधव । पिंड तारकाचें लाघव । कौतुकभाव पाहिला ॥१७॥

रैवतपर्वत विशाळ । तोही पाहिला सकळ । तयामाजी शृंगें सरळ । तीन प्रबळ असती ॥१८॥

एक शृंगावरी गोरक्षनाथ । दुसरे शृंगीं हिंगळाजदेवी वसत । तिसरे शृंगीं स्वयें अवधूत । पावले विश्रांत हिंडता ॥१९॥

तें महासिद्धांचें स्थान । बैसलए तापसी योगीजन । द्रुम लागले अतिगहन । फळपुष्पीं सघन डोलती ॥२०॥

नाना सतेज वनस्पती । पर्वत वेष्टित डोलती । उदकस्थळें बहु असती । आनंद चित्तीं पाहतां ॥२१॥

अवधूत पावतां तये स्थळा । प्रगट झाला सिद्धमेळा । आलिंगनीं आनंद सकळां । त्रिगुणात्मकलीला देखोनी ॥२२॥

श्रीअविनाशरुप पाहोन । सकळ सिद्ध वंदिती चरण । म्हणती दीजे कृपादान । संग पूर्ण आपुला ॥२३॥

देखोनि सिद्धांचें मनोगत । आणि आवडीचे ओळखिले अर्थ । वदता झाला स्वामी दत्त । तुमचे संकेत पूर्ण होती ॥२४॥

आम्हां नित्य असे भ्रमण । स्वइच्छें रमतों जाण । तरी विश्रांतीसि हें स्थान । अनादि पूर्ण आम्हां हें ॥२५॥

नित्य येथें तुम्हांसी । भेटूं आम्ही निश्चयेंसी । सुख होईल जीवासी । येतील दर्शनासी तयांच्या ॥२६॥

तुम्ही योगी आमुचे प्राण । माझा विसावा तुम्हीच पूर्ण । तुम्हांविण जाणें कोण । गुजखूण आमुची ॥२७॥

ऐकोनि अभयाचें उत्तर । सिद्ध करिती जयजयकार । आम्हां योगियांचे माहेर । दत्त सत्पात्र पावला ॥२८॥

करिती दत्तासी विनंती । सप्त योजनें सिद्धव्याप्ती । सप्त कोष शिखरावरुती । येथें विश्रांती दत्ता तुझी ॥२९॥

तुझे कृपेची छाया सघन । त्या तळीं आमुचें सिद्धांचें स्थान । येथोनि तुझें अवलोकन । तेणें पावन सर्व आम्ही ॥३०॥

नवनाथ चौऱ्यांशीं सिद्ध । येथें बसतो गा प्रसिद्ध । दत्त अविनाश तूं स्वतः सिद्ध । अद्वय अभेद्य सर्वातीत ॥३१॥

जैसा प्रजेसी भूपती । तारामंडळीं इंदुगती । कीं रवि जेवीं दिशापती । तेवीं आम्हांप्रती तूं सत्य ॥३२॥

तीर्थीं श्रेष्ठ प्रयागराज । दैवतांमाजी त्र्यंबकभुज । तेवीं तूं गा महाराज । आम्हां सतेज श्रेष्ठत्वें ॥३३॥

असो ऐशा गौरववचनीं । तोषविला दत्त सिद्धांनीं । अवधूतें सकळां सन्मानोनी । निघाले तेथोनी पुढती ॥३४॥

गुप्त प्रगट असती स्थानें । दाविलीं सकळीक सिद्धानें । अविनाशें निरखोनि सावधानें । संतोष मनें चालिले ॥३५॥

पश्चिम समुद्रा अवलोकिलें । गोमती तीर्थातें वंदिलें । नारायणसरोवर आगळें । मन रंगलें ते ठायीं ॥३६॥

अनादि क्षेत्र हें द्वारका । जेथें वास वैकुंठनायका । स्वस्थळा देखोनिंया सुखा । पावला हरिखा अविनाश ॥३७॥

सकळ पाहोनी स्थान । कच्छभुज देशा केलें गमन । तयापुढें मच्छिंद्र पावन । केलें दर्शन तयासी ॥३८॥

उत्तरपंथातें क्रमितां । नाना क्षेत्र पाहती देवता । तंव हिमाचली अवचिता । झाला पावता अवधूत ॥३९॥

बद्रीकेदार नारायण । घेवोनी तयाचें दर्शन । स्वर्गद्वारातें पाहून । पावले येवोन हरिद्वारा ॥४०॥

रम्य स्थानें तापसांचीं । घेतलीं दर्शनें तयांचीं । स्नानें करोनि तीर्थांची । महिमा सकळांची पाहिली ॥४१॥

तेथोनि ज्वालामुखीसि आले । ज्योतीलागी अवलोकिले । रेवाळेश्वरा पावले । पर्वत देखिले उदकावरी ॥४२॥

पुष्करतीर्थ अत्यंत पावन । तेथें सकळ तीर्थां वास्तव्य पूर्ण । तंव श्रोते म्हणती महिमान । आम्हा निवेदन करावें ॥४३॥

देखोनि श्रोतियांच्या प्रश्नासी । वक्ता म्हणे सावध मानसीं । तुमचेनियोगें ग्रंथासी । पावणें वृद्धीसी रसाळ ॥४४॥

पूर्वी कुंभोद्भवनंदन । अगस्ती ज्याचें नामाभिधान । वेदवक्ता तपोधन । ज्ञानसंपन्न धनुर्धर ॥४५॥

महातापसी योगेश्वर । शांत औदार्य दयासागर । प्रतिमे वाटे उणा भास्कर । महाधुरंधर प्रतापी ॥४६॥

तो महाराज अगस्ती । तपोधनांमाजी गभस्ती । तेणें इच्छा धरिली चित्तीं । यात्रापंथी निघावें ॥४७॥

सप्तद्वीप नव खंड । येथें तीर्थें असती उदंड । ते पाहूं आतां निवाड । पुरवूं कोड अंतरीचे ॥४८॥

म्हणोनिया अगस्तिमुनी । निघता झाला तत्क्षणीं । पंचाऐशीं शतकोट मेदिनीं । तीर्थें शोधुनी पाहातसे ॥४९॥

लोकालोक पर्वत । उदय अस्ताचळासहित । शोधोनि तीर्थीं स्नान करीत । महिमा आकर्षित आदरें ॥५०॥

जेथें जेथें तीर्थासी जावें । तें तीर्थ कमंडलूंत घ्यावें । जीवेंभावें त्या रक्षावें । तया जपावें बहुफार ॥५१॥

पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर । मध्य गर्भादि सविस्तर । चुकों न देतां अणुमात्र । स्वीकारी सार सकळाचें ॥५२॥

सकळ तीर्थांचें अंश आणिले । ते स्वकमंडलूंत रक्षिलें । शेवटीं पुष्कराप्रती आले । आश्चर्य वाटलें देवसुरवरां ॥५३॥

देव झाले चिंतातुर । येणें तीर्यमाहात्म्य आणिलें समग्र । ऐसा कोणी न देखिला साचार । पराक्रमी थोर आगळा हा ॥५४॥

दीन पापी दुराचारी । यांसी कोण आतां उद्धरी । कोण होईल तयाची परी । म्हणोनि विचारी पडियेलें ॥५५॥

कोण करावा यासी उपाव । होऊं पाहे हा तीर्थराव । कैसेनी तरतील हे जीव । करणी अभिनव केली येणें ॥५६॥

सुरपति रमापति उमापति । सकळ देव प्रजापति । गणगंधर्व गणपति । इंदु दिनपति ऋषि तारा ॥५७॥

सकळही तेव्हां मिळोन । विचारी पाहती शोधून । पुष्करअंश जातां घेऊन । मग तो यत्न चालेना ॥५८॥

मगं अवघे मिळोनि देवांसहित । पुष्करासी झालें वेगीं प्राप्त । अंतरिक्ष राहोनि गुप्त । आरंभिली युक्त कैसी पहा ॥५९॥

अगस्ती स्नानासी प्रवेशतां । कमंडलु झाले लवंडिता । तो पुष्करि संचरतां । आनंद चित्ता सकळांच्या ॥६०॥

तंव अगस्ती स्नान करोनी । तीरा आला जंव परतोनी । पालथा कमंडलु देखोनी । क्षोभला मनीं नावरे ॥६१॥

जसा पटला प्रळयानळ । नेत्र आरक्त झाले इंगळ । तंव तिन्ही देवतां तात्काळ । करकमळ जोडिती ॥६२॥

स्तुतिस्तवनातें आरंभिती । दीनपणें करिती ग्लांती । दया कीजे कृपामूर्ती । क्षमा प्रीतीं करावीं ॥६३॥

तूं होसी दयासागर । सकळांमाजीं तूंचि थोर । करावया जीवमात्रांचा उद्धार । केला उपकार समर्था ॥६४॥

तुजऐसा परोपकारी । न देखो या त्रिभुवनांतरी । तुझी कीर्ती चराचरीं । ब्रह्मांडभरी हे झाली ॥६५॥

या जीवउद्धरणासाठीं । जीवीं सोसोनि आटाटी । तीर्थे आणोनि दिधली भेटी । होसी पोटीं दयाळू ॥६६॥

अगा अगस्तीमुनी समर्था । तुवां तारिलें जीवजंतु अनाथा । तुझी कृपा हे पूर्ण होतां । मोक्षपंथा पावती ॥६७॥

होईल जीवाचा उद्धार । हा मुनी तुझाचि कीं उपकार । सावरी कोप होई उदार । न करी अव्हेर शब्दाचा ॥६८॥

एसे ऐकोनिया स्तवन । अगस्ती करी हास्यवदन । म्हणे बरवें साधिलें कारण । ठेविलें महिमान येथेंची ॥६९॥

तरी सकळीं द्यावें वरप्रदान । जो या तीर्थी करील स्नान । न घडो तया

जन्ममरण भवबंधन न बाधो ॥७०॥

मुनिवचन ऐकोनि देव । आनंदते झाले तेव्हां सर्व । जयजयकारें वरद अपूर्व । देती गौरव तीर्थातें ॥७१॥

पुष्कराद्यानि तीर्थानि । संकल्पीं नेमिलें तपासोनी । तै सकळ सुस्नात होवोनी । भावें मुनी वंदिला ॥७२॥

अगस्तीं लिंग तेथें स्थापिलें । विष्णु रुद्र पुष्कर नेमिलें । तिसरें ब्रह्म पुष्कर योजिल । निवास केलें ते ठायीं ॥७३॥

गायत्री सावित्री सरस्वती जाण । त्यांसहित ब्रह्मदेव आपण । तेथेंचि त्या पूज्यमान । करिती जन अद्यापी ॥७४॥

प्रसन्न करोनि अगस्तीसी । तीर्थे स्थापोनि पुष्करासी । स्वस्थाना पावले देवऋषी । परिसोनि श्रोतियांसी आनंद ॥७५॥

मागील कथेचे अनुसंधान । पुष्करीं पावला दत्त येवोन । त्रिपुष्करीं करोनि स्नान । घेत दर्शन अगस्तीचें ॥७६॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । त्रिगुणात्मका भटले सत्वर । मस्तकीं ठेवोनि अभयकर । देती वर सदयत्वें ॥७७॥

ते दत्तमूर्ति करिती अवलोकन । त्रिगुणात्मक दिसे घवघवित पूर्ण । शंख चक्र त्रिशूल धारण । डमरु वादन दिव्य पैं ॥७८॥

झोळीपात्र मेखळा । मस्तकीं मुगुट तेजागळां । कुंडलांची फांकते कळा । मुखमृगांकीं कळा अनुपम्य ॥७९॥

हा जगदुद्धारार्थ अवतार । स्वयें त्रिगुणात्मक नटला सर्वेश्वर । आसनीं बैसवोनि प्रियकर । पूजासत्कार समर्पिती ॥८०॥

रमेसहित आपण । करिती दत्ताचें अर्चन । पीतांबर करवोनि परिधान । वनमाला भूषण अर्पिलें ॥८१॥

उमा आणि शिव । तेही करिती गौरव । शार्दूलचर्म मुद्रा अपूर्व । दे स्वयमेव जाणोनी ॥८२॥

गायत्री सावित्री सरस्वती । सहित सरसावे प्रजापती । पूजाविधि सारोनि निगुती । आणिक अर्पिती प्रियकर ॥८३॥

दंडकमडलु माला । आवडी दे त्या कामधेनूला । ऐशा गौरवें दत्ताला । देता झाला संतोषें ॥८४॥

नाना भूषणीं मंडित । संतोषिला अविनाश दत्त । नाना गौरवें कैसें भूषवित । ते श्रोते संत अवधारा ॥८५॥

महामुनी वीतरागी । दिगंबर तूं निःसंगी । सर्वाध्यक्ष उदारत्व भोगी । म्हणोनी योगी तुज नाम ॥८६॥

मुख्य योगियाचें लक्षण । तें तूं जाणसी संपूर्ण । करुं जाणसी योगयज्ञ । योगी सुज्ञ तूंचि पै ॥८७॥

जे योगाची हातवटी । ते तूं जाणसी गा कसवटीं । योगयुक्त तुझी दृष्टी । मुरडली पृष्ठीं योगी तू ॥८८॥

अंतर्बाह्य तुझा योग । हा प्रगटोनि उद्धरिसी जग । सर्व योगांचे प्रसंग । जाणसी सांग योगी तूं ॥८९॥

सर्वात्मक तूं व्यापक । तुजपासोनि हे अनेक । भूतमात्रा पालक । सुखदायक तूं प्रभु ॥९०॥

सत्ताधारी तूं होसी । सूत्रें पुतळ्या नाचविसी । कर्तृत्वकारणें करविसी । कृपें पाळिसी म्हणोनि प्रभु ॥९१॥

तव आज्ञा सकळां प्रमाण । आज्ञेबाहेर वर्तेल कोण । तूं सकळांचें अधिष्ठान । तुज हे अभिधान साजे प्रभु ॥९२॥

सत्त्वगुणाचा उद्भव । हा तुजपासोनि असे सर्व । अनंत ब्रह्मांडांचा प्रसव । एवं जीवन जीव तूं प्रभु ॥९३॥

रज तम विभक्त दाविलें । मूळ सत्त्व असे वेगळें । त्या सत्वाचेहीमुळें । करितां गाळे दिसे जें ॥९४॥

शुद्ध सत्त्व जया म्हणती । तोचि तूं गा दत्तमूर्ति । त्रिगुणात्मक धरोनि स्थिती । दाविसी गति त्रिगुणत्वें ॥९५॥

त्रिगुणात्मकेंचि अवतार । त्रिकांडीं वेद वर्णी विचार । त्रिभुवनें दाविला प्रकार । अवघा विस्तार त्रिभाग ॥९६॥

सएव जो त्रिभाग । तो तूं त्रिगुणात्म्क सांग । पृथक दाविलेंसि त्रिअंग । प्रत्यक्ष अभंग एकत्वें ॥९७॥

जे जे निर्मिलेसि गुण । चातुर्य कलायुक्तीपूर्ण । नाना रसकस विविध कारण । वर्णावर्ण जाणसी ॥९८॥

नाद भेदादि गति । शब्दाशब्द प्रवृत्तीनिवृत्ति । कालअकालाची व्याप्ति । ह्याही युक्ति जाणसी ॥९९॥

विद्या अविद्या खेळ । गुप्त प्रगटादि सकळ । यंत्र मंत्र तंत्रें प्रबळ । अनेक करस्थळ गुह्यार्थ ॥१००॥

एवं सर्व जाणता । तूंचि होंसी सत्य दत्ता । म्हणोनि साजे ही नामता । ज्ञानसागरता योग्य हे ॥१॥

सर्व प्रकारातें जाणसी । रसज्ञ पणें रस घेसी । सेवोनि असक्त राहसी । एवं होसी विज्ञान ॥२॥

आब्रह्मस्तंबपर्यंत । पिंडब्रह्मांडतत्त्वयुक्त । असोनि माजी अलिप्त । एवं सिद्ध स्वतः विज्ञान तूं ॥३॥

गुणाअवगुणातें जाणणें । अज्ञानज्ञाना गवसणें । सकळ जाणोनि हारपणें । सएव विज्ञानें पूर्ण तू ॥४॥

क्षरा अक्षराचे भेद । वेदांतज्ञान जें प्रसिद्ध । जाणोनि होसि तूं अभेद । विज्ञानपद तंव साजे ॥५॥

जीव जे अनन्येसी । शरण येती गा तुम्हांसी । कृपाळूपणें तयां पावसी । हेतु पुरविसी मंगल ॥६॥

याति कुळ तयांचे । न निरखिसी पर्वत दोषांचे । मूळ न शोधितां अधिकाराचें । दान कृपेचे सुमंगल दे ॥७॥

ऊंचनीचाचें न धरी कारण । भाव अनन्यता शुद्ध देखोन । तया अंगीकारोनि आपण । मंगल दान त्या करा ॥८॥

दर्शनें हरितां अमंगल । अणुमात्र नुरवा तेथें मळ । अर्थ पुरवितां मनींचे सकळ । म्हणोनि सुमंगल नाम तुम्हां ॥९॥

आकर्ण पद्माकार । सतेज निर्मळ निर्विकार । ढळढळीत मनोहर । ऐसे सुंदर नेत्र ज्यातें ॥११०॥

ते षट् शोभायमान । विशाळ आकृति प्रभा गहन । पुंडरीकाक्ष नामाभिधान । ठेविलें पाहून या योगें ॥११॥

ब्रह्मा विष्णू महेश्वर । इंद्र वरुण इंदु भास्कर । यक्ष गंधर्व नळ कुबेर । यांतें अवतार आवडता हा ॥१२॥

देवं बृहस्पति आदि करुन । सनत्कुमार सनकसनंदन । नारदादि वैष्णव जन । यातें पूर्ण प्रियकर ॥१३॥

देव मानव सकळांसी । देवी देवतां सिद्धांसी । प्रियकर वाटे अविनाशी । वल्लभ नामासी म्हणोनी ॥१४॥

सुरा मानवा ऋषीतें । ज्ञानी अज्ञानी मूढातें । चार्वाक सुज्ञ प्रौढातें । आनंददातें हें रुप ॥१५॥

ब्राह्मण क्षत्रिय शूद्रवाणी गर्भविस्तारें अनेक खाणीं । आनंद दाता सर्वालागुनी । नंद अभिधानी या नांवें ॥१६॥

मुमुक्षु शरणागत येती जीव । अनन्यपणें धरोनि भाव । तया आनंदाचें वैभव । योगीराव देतसे ॥१७॥

असती अनेक आनंद । परी त्यांत मुख्य पंचानंद । त्या आनंदाचा जो कंद तें दे पद आत्मत्त्वें ॥१८॥

तन धन संपत्ति पुत्र । देतील स्त्री आणि कलत्र । यश कीर्ति आयुरा पवित्र । यंत्र तंत्र मंत्र देती ॥१९॥

अनेक प्रकारची संपत्ती । मोहमायिक सर्व देती । परि जेणें फिटे भवभ्रांती । ऐंसे न अर्पिती कोण्हीच ॥१२०॥

त्रिविध तापातें हरावें । जन्ममरणा चुकवावें । अजरामरपद द्यावें । हें न घडावें आणिकातें ॥२१॥

तो एक दाता हा अवधूत । या भवबंधा निवारित । वृत्ति करी कामनातीत । तापा वारीत क्षणमात्रें ॥२२॥

धन्यधन्य हा अविनाशी । स्वात्मसुख दे शरणागतासी । ब्रह्मानंद सुखवासी । जीवीं जीवासी स्थापित ॥२३॥

म्हणवोनी आनंददायिनी । नामें पाचारिलि महानी । ते योग्य युक्त पाहोनी । आनंद मनीं ऐकतां ॥२४॥

अनेक रुद्रअवतार । वर्णन केले ग्रंथीं अपार । परि त्रिअंशीं सर्वसंपन्न धीर । महारुद्र दत्त हा ॥२५॥

एक एक ऐसे करोन । अवतार झाले भिन्नभिन्न । शक्ति पराक्रम ज्ञानधन । सबळ पूर्ण पराक्रमी ॥२६॥

सर्वज्ञ सर्वातीत सर्वागत । सर्वाधीश सर्वोत्तम सर्वश्रुत । सर्वोपम आणि सर्वभूत । महारुद्र विख्यात या नांवें ॥२७॥

मागें तैसेंचि त्या द्यावें । अधिकारातें कांहीं न शोधावें । पर्जन्या ऐसें सदयें । उगें वर्षावें भलस्थळीं ॥२८॥

कोमळता बहु अंतरीं । कृपालुत्वें जीवा तारी । परा दुःख नेदी तिळभरी । दुखवितां परी तळमळे ॥२९॥

सुख द्यावें सकळांसी । दुःख जीवाचें नुरवावें । मागतां आवडीचें पुरवावें । सकळ उद्धरावेअ जीवमात्र ॥३१॥

ऐसीं वृत्ती दत्तासी । द्वैतभेद नसे मानसीं । म्हणवोनि योग्य अविनाशी । नामानिश्चयेंसी करुणानिधे ॥३२॥

ब्रह्मा विष्णु हरें । दश नामाचेनि गजरें । शृंगारोनि प्रिति आदरें । पुरस्करें वर्णिलें ॥३३॥

याची नामें करवून । परमहंस आचार्यस्तवन । तोची श्लोकार्थ विस्तारानें । केलें लेखन संयुक्त ॥३४॥

संशय येईल जीवा । तेणें परमहंसस्तव शोधावा । दत्तचि वर्णविता बरवा । माझा केवा काय येथें ॥३५॥

असो पुष्करतीर्थीं दत्तासी । अर्चनी गौरविलें प्रेमेंसी । तिघे आज्ञा घेवोनि वेगेसि । मथुराप्रदेशी पावलें ॥३६॥

निरखोनिया मथुरापट्टण । यमुनातीर्थीं केलें स्नान । कांहींक दिवस बसोन । जपअनुष्ठान सारिलें ॥३७॥

अगस्ती ध्रुव नारद । तेथे तप ऋषिवृंद । योगी साधु महासिद्ध । आणिक प्रसिद्ध विधिहर ॥३८॥

हें वर्म जाणोनि मानसीं । दुर्वास चंद्र अविनाशी । तपोनि निघाले वेगेसी । धवळपुरासी पावल ॥३९॥

तेथें गुहा अत्यंत गहन । मुचकुंदाचें वास्तव्यस्थान । मुचकुंदसरोवर पाहून । गालव स्थान देखिलें ॥१४०॥

तेथें गुहा पर्वतोदरीं । गालव वसे ऋषि भारी । तेणें अविनाश देखोनि सत्वरीं । आदरें सत्कारी प्रेमभावें ॥४१॥

होतां दत्ताचें दर्शन । आनंद पावले ऋषिगण । परम महोत्सव करुन । देवोनि सन्मान बोळविले ॥४२॥

पुनरा पूर्वे चालिलें । यमुनातीरा ओलांडलें । क्षेत्र ब्रह्मावर्त देखिलें । तीरीं शोभलें गंगेच्या ॥४३॥

यज्ञ केले विधीनें । तप साधिलें वाल्मीकानें । भागीरथीओघ भगीरथानें । सत्वगुणें आणिला ॥४४॥

तया ब्रह्मघाटीं केलें स्नान पाहिलें वाल्मिकऋषीचें स्थान । सकळ ऋषींचें दर्शन । परम पावन घेतलें ॥४५॥

उल्लंघोनिया भागीरथी । पुढें नैमिषारण्य अवलोकिती । नंद्रिग्रामीं जावोनि शीघ्रगती । अयोध्या पुढती शरयूतें ॥४६॥

शरयूतीर्थीं केलें मार्जन । निरखिलें आयोध्यापूरपट्टण । रघुगणांचे दर्शन । होतां मन उल्हासलें ॥४७॥

नेपाळमार्गातें लागले । बिकट स्थळ उल्लंघिलें । गंडिकेश्वरीं पावले । चित्तीं उल्हासले बहुफार ॥४८॥

तीर्थीं विष्णूच्या मूर्तीं । विलोकिते झाले नाना आकृती । सचिन्ह सुलक्षण असती । यथामती निवेदूं त्या ॥४९॥

मत्स्य कच्छ तरती वर । नारसिंह उग्र फार । वामनमूर्ती तीन चक्र । दामोदर तो द्विचक्री ॥१५०॥

वराह मुखलंबित । फरश त्रिकोण सत्य । राम तो षड्चक्री विख्यात । चौदा अनंत जाणिज ॥५१॥

नाभीतुल्य पद्मनाभ । संकर्षण तो स्वयंभ । हिरण्यगर्भ सुप्रभ । लक्ष्मीवल्लभ दैवागळा ॥५२॥

हरिहरमूर्त द्विवर्ण । नानाविध संकर्षण । शिलामूर्ति विराजमान । सप्तांकी प्रमाण नवांकी ॥५३॥

ऐसिया अनेक प्रकारें । मूर्ती असती बहुविस्तारें । एवं विष्णुचि निर्धारें । प्रेमादर पूजावें ॥५४॥

तया तीर्थामाजी तुळसी अर्पितां बुडती निश्चयेंसी । हे साक्ष सर्वांसी । यात्रेकऱ्यांसी विदित ॥५५॥

हिरण्यगर्भ तो पर्वत । हेम वेंचिती भाग्यवंत । शालिग्राममूर्ती नित्य प्रसवत । भाविका प्राप्त प्रसाद ता ॥५६॥

असो अविनाश वंदोनि तीर्थासी । पुढें पावले गौडदेशीं । विलोकोनि कामाक्षादेवीसी । अनेक सिद्धांसी भेटले ॥५७॥

पुढें नाना परीचे देश । पाहे सहस्त्र मुखसंगमास । झाड खंडी वैजनाथास । पाहोनि गयेस पावले ॥५८॥

वंदोनिया विष्णुपदासी । भेटले तया गदाधरासी । गायत्री सावित्री सरस्वतीसी । संध्यावंदनासी पै केलें ॥५९॥

करोनिया फल्गुवंदन । पथ क्रमिते झाले तेथून । पावले विंध्याचल येवोन । घेतलें दर्शन देवीचें ॥१६०॥

दैवतें प्रत्यक्ष भेटती । अवधूतातें तोषविती । आनंदे करोनि बोलविती । महामूर्ती म्हणोनिया ॥६१॥

चित्रकूटपर्वता । येणें झालें स्वामी दत्ता । माय तपस्थाना होय पाहता । आनंद चित्ता न समाये ॥६२॥

तेथोनि नैॠत्यपंथे चालिले । नर्मदेलागीं वोलांडिलें । क्षेव रामटेक पाहिलें । मन आनंदलें सरोवरी ॥६३॥

श्रीगंगातीर्थ आंबाळे । भोंवते पर्वताचे पाळे । बिल्ववृक्ष सधन लागल । गगनीं गेलें चुंबीत ॥६४॥

गुप्त प्रगट ॠषींचे आश्रम । तेथे अद्यापि असती उत्तम । ते ज्याचे त्यासीच सुगम । येरा दुर्गम असती ॥६५॥

बिल्व तुळसी आणि फुलें । यावीण वृक्षची नाढळे । पर्वती नरहरीचीं स्यळें । तीथ चांगलें वराहाचें ॥६६॥

प्रातःकाळीं सर्व ॠषी । स्नान करिती आंबाळ्यासी । सायान्ही वराहतीर्थासी । रामदर्शनासी जाती सर्व ॥६७॥

राम सीता लक्ष्मण । विशाळ मारुती दैदीप्यमान । रमणीक स्थळ अतिपावन । मार्गी पटांगण सुंदर पैं ॥६८॥

ते स्थळीं पावताचि त्रिमूर्ती । परमानंदे स्नानें करिती । ॠषिभार देखोनी धांवती । चरण वंदिती सप्रेम ॥६९॥

धन्य म्हणती आजी सुदिन । झालें अवधूताचें दर्शन । दीन जनां करावया पावन । पावले येऊन या ठाया ॥१७०॥

हा त्रिगुणांत्मक अवतार । प्रगट करावया जगदुद्धार । गंगा वोळली आळशावर । आम्हां माहेर भेटलें ॥७१॥

जन्मोजन्मींच तपाचरण । तें फळ आजी आलें संपूर्ण । झालें स्वामिपदाचें दर्शन । पुनरागमन चुकलें ॥७२॥

आधिव्याधी गेला ताप । जळाल दर्शनें सर्व पाप । तुटलें बंधन सुटला व्याप । दत्त सकृप भेटतां ॥७३॥

एसिया आनंदाचे मेळी । अविनाशा स्तविते मंडळी । दिगंबरकृपें न्याहाळी । हृदयकमळीं तोषोनी ॥७४॥

ऐसा बहुधा तये स्थानीं । येतां दत्ता पाहिला ऋषींनीं । तंव चमत्कार अधिकोत्तर देखोनी । एके दिनीं काय करी ॥७५॥

सवें घेवोनि ऋषिभार । रामभेटीं चालिले सत्वर । स्थळ पाहतां आनंद थोर । श्रीरघुवीर पाहिला ॥७६॥

साष्टांग करोनी नमन । रामासि दिधलें आलिंगन । जानकी आणि लक्ष्मण । चौथा हनुमान वंदिला ॥७७॥

रुद्रमहारुद्रा झाली भेटी । प्रेमांबुधा राहो वृष्टी । आनंद न समायेची पोटीं । गुह्य गोष्टी बोलती ॥७८॥

अविनाश म्हणे रामेश्वरीं । भेटी दिधली दक्षिणसागरीं । येथें झाली असे दुसरी । केधवां तरी आलां येथें ॥७९॥

बोलतां झाला रुद्र अवतार । जे जे स्थळीं स्वामी रघुवीर । ते ते स्थळीं उभा समोर । जोडोनि कर सेवेसीं ॥१८०॥

हें आपण सर्वही जाणतां । दोहीं ठायीं तुमचीच सत्ता । तुम्हांवांचोनि ठाव आतां । मज तो रिता दिसेना ॥८१॥

स्वामी आणि सेवक । दिसे द्वैत परी एक । प्रीति वाढावया अलोकिक । तुम्ही कौतुक दावितां ॥८२॥

स्वयं ब्रह्म तूं संत्तांधारी । भूतें नाचविसी धरोनि । अनंतब्रह्मांडीं नानापरी । कौतुक हरी तुझें कीं ॥८३॥

चोवीस नेम दाविला अवतार । तरी तूंचि होसि गा सर्वेश्वर । सर्वेश्वराचा पाहतां विचार । सर्वांतर तूं होसी ॥८४॥

दृश्य अदृश्य पदार्थ जाण । सर्वात्मक तुजवीण कोण । ओतप्रोत भरलासि पूर्ण । न कळे महिमान कवणातें ॥८५॥

वेदा न कळेची अंत । वर्णितां शिणलीं शास्त्रें बहुत । श्रुती नेति नेति बोलत । म्हणोनि अनंत नाम साजे ॥८६॥

जया म्हणती श्रीअनंत । तोचि स्वामी हा रघुनाथ । रघुनाथ तोचि तूं दत्त । त्रिगुण मंडित अविनाश ॥८७॥

ऐकोनि मारुतीचें भाषण । अविनाशी झाला आनंदपूर्ण । म्हणे केउता उरलासि भिन्न । गार जीवन ओळखे ॥८८॥

कनक आणि अलंकार । लवण आणि सागर । सूत कार्पासपर । भिन्न विचार असेना ॥८९॥

तेवींच देवभक्तपण । समरसता एकची जाण । परी आनंद नुपजे द्वैतावांचोन । प्रेम गहन ये ठायीं ॥१९०॥

एकत्व ऐक्यासि आणावें अवलोकनीं एकत्व जाणावें । प्रेम वृद्धयर्थ सेवावें । विनयभावें करोनी ॥९१॥

ऐसें अविनाश बोलतां । प्रेम नावरे हनुमंता । चरणीं ठेविला दृढ माथा । दत्त आलंगिता पैं होय ॥९२॥

ऋषी सर्व विलोकिती । आनंद करोनि डोलती । दिगंबराचे चरणीं लागतीं । तेवींच नमिती हनुमंता ॥९३॥

तोषवुनी सकळांतें । आज्ञा मागितली देवदत्तें । पुनरा वंदोनि रामातें । चालिले पंथ त्रिवर्ग ॥९४॥

तया स्थानापासून । वायव्यदिसे केलें गमन । नर्मदातट ओलांडोन । महांकालस्थान पाहिलें ॥९५॥

क्षेत्र अवंतिका देखिली । क्षिंप्रांतीर्थी स्नानें सारिलीं । महांकालेश्वरा तये वेळीं । अर्चा केली आदरें ॥९६॥

क्षेत्रें दैवतें सर्व पाहून । आनंदयुक्त झालें मन । क्षिप्रापैलतिरीं वास करुन । योगासन साधिलें ॥९७॥

चौऱ्याशीं आसनांच्या गति । प्रणवभेदाच्या योगयुक्ति । मुद्रामार्ग अनुभूति । स्वयें अभ्यासिती एकाग्र ॥९८॥

असो क्रमोनि कांहीं दिवस । तारिते झाले अनन्यास । योगभक्तीं लाविले मार्गास । गुप्त अविनाश निघाले ॥९९॥

श्रीॐकारमहाबळेश्वरीं । येतां भेटली कावेरी । संगमीं स्नान करोनि सत्वरीं । जाती झडकरी दर्शना ॥२००॥

ॐकाररुपें तो पर्वत । ममलेश्वर अधिष्ठान लिंग सत्य । नर्मदा कावेरी तीर्थ विख्यात । नवल अद्भुत ते ठायीं ॥१॥

नर्मदेमाजी कंकर । ते अवघेचि जाणा शंकर । आणिक तेथें चमत्कार । तोही सादर परिसावा ॥२॥

हस्तीं आणी पाषाण । तेथें सचिन्ह होती बाण । ते सहस्त्र धारेमाजी जाण । घ्यावे निवडून अपेक्षित ॥३॥

तेवींच कावेरीतीर्थी । निर्माण होती गणपती । त आरक्तवर्ण असती । सकळ अवलोकिती अद्यापि ॥४॥

अद्‌भुत विश्वेश्वराचें लाघव । ठायीं ठायीं महिमा अपूर्व । पंचायतनीं जे देव । विभक्त ठाव नेमिले त्यां ॥५॥

विष्णुमूर्ति गंडिकेश्वरीं । शिवमूर्ति सहस्त्रधारीं । गणपतिस्थान कावेरी । धातुमिश्रित शक्तिरुप ॥६॥

सूर्यकांत आणि सोमकांत । यांचे तों विभक्तचि पर्वत । गोमतीतीर्थी चक्रांकित शंख निर्मीत सागरीं ॥७॥

एवं सर्वगत आपण । रुपें धरिली भिन्न भिन्न । जीव करावया पावन । पंचायतन प्रगट हें ॥८॥

असो अविनाशें तये वेळें । औंकारममलेश्वर पाहिलें । अर्चोनिया निघते झाले । आनंदमेळें चालती ॥९॥

क्षेत्र वेरुळासी पावती । ग्रीष्मेश्वरासी पूजिती । तीर्थ वंदोनि पुढें चालती । प्रतिष्ठानाप्रती देखिलें ॥२१०॥

गोदातटीचें समस्त । अवलोकिती क्षेत्रदैवत । भीमाशंकर सोमनाथ । वैजनाथ परळीसी ॥११॥

आवंढिया नागनाथ महादेव अनेक पुण्यक्षेत्रें महा ठाव । तीर्थक्षेत्रें दैवतें अपूर्व । पाहिलीं सर्व अविनाशें ॥१२॥

सप्तपुऱ्या अतिपावन । द्वादश लिंगांचें दर्शन । सरितासागरीं केलें स्नान । पर्वणी पाहोन क्षेत्रवास ॥१३॥

शिवविष्णुस्थानें सुंदर । शक्तिदैवते अपार । सिद्ध साधु ऋषीश्वर । गिरिगव्हार नानापरी ॥१४॥

सानथोर सकळ दैवता । वांपी कूप कुंडे सागर सरिता । प्रगट गुप्त देवतीर्था । सिद्ध मुनी समस्तां पाहिलें ॥१५॥

हिंडता कल्पयुगे लोटलीं अपार । यात्रा करोनि परतले समग्र । स्वआश्रमालागीं जाती सत्वर । उल्हास थोर अंतरी ॥१६॥

अविनाश नित्य यात्रा करी । केल्या संकल्पा न चुके अणुभरी । हा सर्वव्यापक सर्वांतरी । पूर्ण करी संकल्पा ॥१७॥

स्मरगामी देवदत्त । भावार्थ देखोनी प्रगटत । भरला असे ओतप्रोत । लीला समर्थ जयाची ॥१८॥

तो कोठे गेला न आला । अवघा परिपूर्ण असे भरला । आब्रह्मस्तंब व्यापोनि उरला । तोचि पाहिला पाहिजे ॥१९॥

तया वेदशास्त्रें धुंडिती । साचोले श्रुती वाखाणिती । सिद्धांत उपनिषदे करिती । थोरीव गाती पुराणें ॥२२०॥

महावाक्यादि सिद्धांत । बोलिलें वर्म परी गुप्त । शोधिती विचक्षण शास्त्री पंडित । परि तो गुह्यार्थ न कळे त्यां ॥२१॥

तें जें का गुह्य गुज । असे संत साधुसिद्धांचे निज । ते कृपा करितील जरी सहज । तरीच काज कांहीं साधे ॥२२॥

अहा हे संत साधु दयाघन । करोनि राहावें यांचे सेवन । ते सकृपे अंगीकारितां कारण । देतील साधून निजगुज ॥२३॥

संत सद्‌गुरु मायबाप । शरणागताचे वारिती संताप । दूर करोनि त्रिविधताप होती सकृप अनन्याते ॥२४॥

तोषविती कृपादानीं । अज्ञान निवटिती ज्ञानांजनीं । विवेक शांति बाणवोनी । आनंद लेणी लेवविती ॥२५॥

स्वात्मबोधे बोधविंती । ज्ञानदृष्टि प्रज्वालिती । अविनाश वस्तू भेटविती । अद्‌भुत कीर्ती संतांची ॥२६॥

संत शांतीचे सागर । संत ज्ञानाचें आगर । शरणागताचे माहेर । दाते उदार सदयत्वें ॥२७॥

ऐसिया संतांचे अंगणी । अनंतसूत लोटांगणी । इच्छा चरणरजकणीं । राहिलों धरोनी आस पोटीं ॥२८॥

हाचि ध्यास रात्रंदिवस । संत पुरवि माझी आस । म्हणोनिया धरिली कास । न करा निरास दीनाची ॥२९॥

दिवसें दिवस अधिक । लळे पुरवितील अलोलिक । दत्तकथा ही सुखदायक । कृपेनें ठक बोलवितां ॥२३०॥

पुढील प्रंसंगीं निरोपण । स्वआश्रमी पावतील तिघेजण । ते कथा रसाळ पूर्ण । वर्षतील घन आनंदाचे ॥३१॥

तो अवधूतची बोलविता । त्यावीण मज कैंची सत्ता । मूर्ख उभें केलें निमित्ता । करणें सांगता ज्याचीं त्या ॥३२॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । यासी नारदपुराणीचें संमत । सदा परिसोत संतमहंत । त्रयोदशोध्यायार्थ गोड हा ॥२३३॥

॥ इति त्रयोदशोध्यायः समाप्त ॥

## अध्याय चौदावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीसद्‌गुरु दत्तदिगंबराय नमः

श्रीमत्सद्‌गुरु अविनाशा । ब्रह्मानंदा तूं परेशा । जगद्वयापका पुराणपुरुषा । नमो सर्वेशा सनातना ॥१॥

अनंतवेषा अनंता । आनंदरुपा अपरिमिता । अगोचरा अपराजिता । अनाथनाथा नमो तुज ॥२॥

सर्वातीता सर्वज्ञा । सर्व साक्षी सर्व सुज्ञा । सत्तात्मका सत्प्रज्ञा । सर्व गुणज्ञा नमो तुज ॥३॥

निर्विकारा निरंजना । निराभारा तूं निर्गुण । निगमागम वंद्या तूं निपुणा । निजानंदसघना नमो तुज ॥४॥

विमलरुपा विश्वोद्धारा । विज्ञानसिद्धा विश्वंभरा । विराजिता विवेकसागरा । विनत दातारा तव पदीं ॥५॥

अनुपम्य अवीट तुझी लीला । वर्णितां वाढवी रस आगळा । जेणें सुख उपजे प्रेमळा । आणिक जिव्हाळा भक्तीचा ॥६॥

तुझी कीर्ती वाखाणितां । आनंद वाटे माझिया चित्ता । तरी दया करोनि कृपावंता । पुरवी हेता अंतरींच्या ॥७॥

तव कीर्तिकथामृतरस । प्राशवोनि तारी जीवास । तोडी तोडी भवपाश । न करीं उदास निजदासा ॥८॥

पूर्ण कृपेचें देवोनि दान । तुझा तूं चालवी निरोपण । मी नोव्हे रचिता पूर्ण । तुझें महिमान तूंचि बोले ॥९॥

गत कथाध्यायीं अवधूत । उरकोनि यात्रा आश्रमपंथ । धरोनि त्रिवर्गें त्वरें येत । आनंद भरीत अंतरीं ॥१०॥

आतां श्रोते सावधान । पुढील कथा किजे श्रवण । मायापुरीचें सन्निधान । तपोधन पावले ॥११॥

जवळी येतां अविनाश दत्त प्रगट झाली तेव्हां मात । अत्रि धांवे ऋषिसमवेत सप्रेमभरित अंतरीं ॥१२॥

जेथें अविनाश प्रगटला । तोचि पुण्यकाळ अमृतवेळा । मुहूर्त अभिजित साधिला । सकळ कळा प्रकाशित ॥१३॥

ऋषिसहित अत्रिमुनी । सामोरा येतां देखोनी । त्रिवर्ग जाती लोटांगणीं । बाष्प नयनीं दाटलें ॥१४॥

अविनाशीं होतांचि भेटी । जन्ममरणा झाली तुटी । दुःख पीडा दरिद्र कचाटी । जाती उठाउठी पळोनी ॥१५॥

पाप ताप दैन्य गेलें । आनंदसुख भाग्य पावलें । सतेज पाटव्य देह झाले सफळित फळले वृक्ष तेव्हां ॥१६॥

दुर्वास आणि चंद्रासी । आलिंगन झालें सर्वांसी । तिघे पाहतां तेजोराशी । आनंद मानसीं न समाये ॥१७॥

पुत्र पाहोनि अत्रिमुनी । हृदयीं दाटला उचंबळोनी । तंव तिघेहि आले लोटांगणीं । दृढ चरणी विनटले ॥१८॥

अंकावरी तिघेजण । घेता झाला ब्रह्मनंदन । माथा करोनि अवघ्राण । कुरवाळी वदन प्रीतीनें ॥१९॥

नित्य प्रगटतां स्वामिदत्त । परि तो आठव न ये मनांत । वाटे आजचि आला अकस्मात । हेंचि भासत सकळांतें ॥२०॥

भेटी सारोनि पर्वतशिखरीं । वंदिते झाले ते अवसरीं । अनसूयेचे मंदिरी । मिळती सुंदरी ऋषिपत्न्या ॥२१॥

पर्वतीं चढतां अविनाशी । शोभा पावली त्या वनासी । वक्ष टवटवले फलघोसीं । पुष्पें चौपासी दाटलीं ॥२२॥

पक्षी वनचरांचे पाळे । आनंदें किलकिलाट करुं लागले । दिसूं लागलीं रम्य स्थळें कौतुक वाटलें सकळांसी ॥२३॥

जेवीं जयश्री जिंकोन । स्वपुरा पावले रघुनंदन । अयोध्यावासी अवघे जन । आनंदघन तेविं हे ॥२४॥

आदरें जेवीं कौसल्येसी । तिघे नमिती सद्भावेंसी । तेवीं तिघे अनसूयेसी । नमिती पायांसी सप्रेमें ॥२५॥

माता हृदयीं धरी बाळां । दाटला प्रेंमाचा जिव्हाळा । सद्गद कंठ अश्रू डोळां वर्षाव कळा पावली ॥२६॥

मेघ मंद गडगडती । तेवीं कंठनाद उमटती । जैशा विद्युल्लता झमकती । तेवीं उठती लहरा देहीं ॥२७॥

मातापुत्रांचे आलिंगनीं । प्रेमाश्रु सकळांचे नयनीं । स्फुंदताती कवटाळोनि । रोम थर्थरोनी उठती ॥२८॥

अनसूया म्हणें बाळसुकुमार । चालतां शिणलां तुम्हीं नागर । उल्लंघिली हे भूमि अपार । दुःख थोर सोशिलें ॥२९॥

शीत उष्ण पर्जन्यधारा । धुधाट सोशिला तुम्हीं वांरां । क्लेश बाळकांच्या शरिरां । विश्रांत थारा कोठोनी ॥३०॥

क्षुधा तृषें असेल पीडीलें । नग्नपदीं कंटक रुतले । माझ्या तान्हुल्यांनीं सोशिलें । सुख पाहिलें नाहीं कीं ॥३१॥

ऐसें वेळोवेळां आठवून । बाळें हृदयीं धरी कवटाळोन । करें कुरवाळी वदन । मोहें स्फुंदन नावरे ॥३२॥

त्रिगुणात्मक विनवी मातेसी । किती हा मोह माते वाहसी । तुझिया कृपायोगें आम्हांसी । दुःख निश्च्येसी न बाधी ॥३३॥

तुम्हां उभयांचे दयें करुन । यात्रा झाली आनंदघन । दुःखलेशाचें भान । अणुमात्र जाण न देखों ॥३४॥

तुझी असतां पूर्ण दृष्टी । न पडूं माते कधीं संकटीं । दग्ध होतील दुःखाच्या कोटी । मग आटाटी कैची आम्हां ॥३५॥

पुरे मोह खेद न करीं । आम्हां बाळां पाहे बरी । सुखसंतोषें अंतरीं । विवेक विवरी तूं माये ॥३६॥

अविनाश झाला शांतवितां । आनंदें निर्भर झाली माता । तेवींच सुखावला तो पिता । सुख समस्तां वाटलें ॥३७॥

ऐसी होतां अस्तवेळ । तंव स्वर्गवासी पावले सकळ । विमानें दाटलीं तुंबळ । वाद्यकल्लोळ नानाविध ॥३८॥

तेहतीस कोटीं सुरवर । ऐरावतारुढ मुख्य अमर । यम वरुण नळ कुबेर । यक्ष किन्नर गंधर्व ॥३९॥

सनकसनंदन बृहस्पती । सनत्कुमार नारदमूर्ती । तुंबर विद्याधर सत्वर गती । दर्शनाप्रती पावले ॥४०॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । सिद्धिदाता विघ्नहर । लोकाधिपती गणभार । दर्शना समग्र दाटले ॥४१॥

रमा उमा सावित्री । सरस्वती आणि गायत्री । देवललना सुहास्य वक्त्री । दीपपात्रीं उज्वळिले ॥४२॥

आपुलाले बैसोनि वहनीं । चामुंडा पावल्या कात्यायनी । अंतराळ भरलें दुमदुमोनी । वाद्यध्वनी अपार ॥४३॥

ग्रह तारा ऋषिभार । सिद्ध साधु थोर थोर । योगी संन्यासी दिगंबर । भाविक नारीनर सर्व येती ॥४४॥

भू आणि अंबरा । दाटणी झाली एकसरा । पाहावया अविनाशदातारा । हर्ष अंतरा सकळांच्या ॥४५॥

सकळीं देखोनि तयासि । आरंभिते झाले स्तवनासी । देवांमाजी नारदऋषी । बहु प्रेमेंसी स्तवियलें ॥४६॥

ऋषिभारीं भ्रुगुमुनी । तोहि सरसावे दत्तस्तवनीं । बृहस्पति आदि करोनी । सप्रेम ध्यानीं स्तव करिती ॥४७॥

एकाग्र करोनी मानस । विलोकितें झाले त्या ध्यानास । पाहातां न परतवे नयनास । गुंतले सावकाश तद्रूपिं ॥४८॥

तें नारदें अवलोकिलें । म्हणे याचें तों रुपीं चित्त गुंतलें । कैंवीं यातें जाय वर्णिलें । वृथा गेलें न हो ऐसें ॥४९॥

जगदुद्धारासाठीं । अवतार धरिला येणें सृष्टीं । आतां हें ध्यान सकळां दृष्टी । अतर्क्य गोष्टी पुढिलिया ॥५०॥

म्हणोनिया परोपकारी । वर्णूं ध्यान ये अवसरीं । तया ध्यानें नरनारी । हृदयांतरीं ध्यातील ॥५१॥

हें गुज जाणोनि मानसीं ध्यान वर्णिती नारदऋषी । म्हणोनि विनवितों श्रोत्यांसी । सावध श्रवणासी असावें ॥५२॥

बाळार्कमूर्ति प्रभायमान । गौर श्याम कर्पूरवर्ण । जटाभार भस्मोद्धारण । भीमासुरवदनत्रय कमळ ॥५३॥

कमलदलाक्ष आकर्ण विराजित । श्याम कुरळपत्रें भ्रुकुटी विराजित । सोज्वळ षड्रसतेज लखलखित । लाल श्वेत सुनीळ चक्रें ॥५४॥

भाळ विशाळ सुंदर । त्यावरी तिलक रेखिले नागर । सुनीळ वरीं कुरळभार । तेजाकार मुगुटशोभा ॥५५॥

जडित कादण मुगुटासी । मणीफणीवरी तेजोराशी । मकरकेयूर कुंडलांसी । श्रवणीं मुद्रेसी शोभविलें ॥५६॥

आजानबाहू दंड सरळ । रक्तपाणी सुकोमळ । अतिदिव्य हृदयस्थळ । कंठनाळ तयावरी ॥५७॥

त्रिवळी शोभे उदरावरी । नाभी वर्तुळ साजिरी । जानुजंघा कर्दळीपरी । गुल्फेवरी पदांच्या ॥५८॥

पाउलें द्वय सकुमार । जें शरणागताचें तारुं थोर । तयावरी शोभे तोडर । नाद गंभीर पावनाचा ॥५९॥

सुंदर शोभती मेखळा । वनमाळा शोभते गळा । कासे पितांबर पिंवळा।
सोनसळा लखलखित ॥६०॥

यज्ञोपवीत शोभायमान । दंडी ब्रीद्राचें भूषण । मणिमय करी दिव्य कंकण ।
उत्तरीवसन मुद्रांगुली ॥६१॥

शंक चक्र गदां पाणी । त्रिशूल डमरु वाद्यरंजनी । दंडकमंडलू कौपिनी ।
मालास्मरणी कमळ तें ॥६२॥

शार्दूलचर्म सुंदर । तया आसनीं तो दिगंबर । कामधेनु सवें निरंतर ।
झोळीपात्र कनकाचें ॥६३॥

पादुका चरणीं मिरवीत । आनंददृष्टीं अवलोकित । विदेहवृत्ति सदा शांत ।
स्वानंदीं रमत सर्वदा ॥६४॥

एवं वर्णितां नारद । ध्यानधारणीं परमानंद । म्हणे हा असे कीं स्वतःसिद्ध ।
अवतरोनि अभेद वर्ते जगीं ॥६५॥

ऐसें हृदयीं धरोनि ध्यान । मानसीं करावें नित्य पूजन । षोडशोपचार करोनि
अर्पण । पुढतीं स्तवन आरंभावें ॥६६॥

तंव प्रश्न करिती श्रोते । त्रिमुख निवेदिलें आम्हांतें । कवण स्थळीं असे
कोणतें । सांगा निगुतें निवडोनी ॥६७॥

आणिक बोलतां षड्पाणी । आयुधें आणिलीं वर्णनीं । तरी तीं कैसीं कवणे
स्थानीं । सांगा निवडोनी पृथकत्वें ॥६८॥

ऐकोनि श्रोतियांचा प्रश्न । वक्ता बोले तैं वचन । श्रीसद्गुरुप्रसादें करुन ।
सांगतो निवडोन परिसा जी ॥६९॥

नारदपुराणींचें संमत । मुनी स्वमुखें असे वर्णित । तें तुम्हीं ऐका सावचित्त ।

आठवलें किंचित निवेदूं ॥७०॥

जो सृष्टिकर्ता चतुरानन । विधि म्हणती जयालागून । तोचि गौरवर्ण करुन । शोभे वदन प्रथम तें ॥७१॥

जो सकळांचा नियंता । जो कर्म करोनि अकर्ता । जो अनंत ब्रह्मांडें पाळिता । कमलोद्भवपिता म्हणती ज्या ॥७२॥

जो निर्विकार निर्गुण जो मायातीत सर्वज्ञ । जो ब्रह्मानंद चैतन्यघन । अवतार सगुण घेता जो ॥७३॥

जो शेषशयन क्षिराब्धिजामात । जो कमललोचन कमलाकांत । तो श्यामसुंदर मध्यस्थ । रुप विराजित मनोहर ॥७४॥

जो व्यालभूषण पंचवदन । जो कैलासपति उमारमण । जो हिमनगजामात पतितपावन । जो नंदीवहन दिगंबर ॥७५॥

जो जटाजूट गंगाधर । पिनाकपाणी सर्वेश्वर । जो त्रिनयन विषधर । व्याघ्रांबर शोभे ज्या ॥७६॥

जो त्रिपुरांतक मोक्षदानी । जो भोळा उदार शूळपाणी । तो कर्पूरगौर अंतस्थानीं । भस्मोद्धारणी मंडित ॥७७॥

ऐंसें त्रिगुणात्मकाचें मुखस्थान । तुम्हां केलें निवेदन । कैसें केलें आयुधधारण । तेही निवडून सांगतों ॥७८॥

तुम्हां श्रवणाची आवडी । अर्थ परमार्थी विशेष गोडी । हें ओळखोनि चोखडी । करोनि निवडी दावितों ॥७९॥

तळवटीचे उभय कर । तेथील परिसा जी प्रकार । माळाकमंडलुदंडधर । अति सुंदर शोभती ॥८०॥

मध्यस्थ जे का द्वय कमल । तेथें डमरु आणि त्रिशूळ ।
खडगतेजायमानतेजाळ । अति झल्लाळ तयाचा ॥८१॥

ऊर्ध्वबाहु अभय पाहीं । शंख चक्र हे तये ठायीं । क्वचित्गदा पद्म तेही । एवं साही शोभती ॥८२॥

ऐसा हा दत्त सत्पात्र । कक्षे झोळी हेमपात्र । रुप धरी नाना विचित्र । सवें पवित्र कामधेनु ॥८३॥

ऐसें परिसोनि विवरण । संतोषलें श्रोतयांचें मन । म्हणती पुढील निरोपण । करवी पान रस आम्हां ॥८४॥

अवश्य म्हणे तैं वक्ता । श्रवणीं सादर व्हावें आतां । ध्नानीं लक्षोनि या दत्ता । झाला स्तविता नारद ॥८५॥

जयजयाजी अविनाशा । निर्गुण निरामया परेशा । मायातीता तूं सर्वेशा । अनंतवेषा नमो तुज ॥८६॥

जयजय निखिल ब्रह्म सनातना । सर्वात्मका सर्वभूषणा । षड्गुण ऐश्वर्यसंपन्ना । दयाघना नमो तुज ॥८७॥

जय सर्वसाक्षी सर्वज्ञा । जयजयाजी गुणप्रज्ञा । सकळातीता सर्व सुज्ञा । भक्तवरज्ञा नमो तुज ॥८८॥

जयजय सगुणवेषा सुंदरा । जय रजोगुणा सृष्टिविस्तारा । जय सृष्टिपालना सत्त्वधीरा । सृष्टिसहारा तामसा नमो ॥८९॥

जयजयाजी अत्रिनंदना । जय अनसूयात्मजा कुलभूषणा । त्रिगुणात्मका त्रितापहरणा । भवभंजना नमो तुज ॥९०॥

जयजय सिंहाचलनिवासिया । मायापुरवासी करुणालया । जयजय भक्तवत्सला दत्त सदया । प्रेमें तव पायां प्रणम्य ॥९१॥

जयजय सिद्धा योगेश्वरा । पापमोचका कृपासागरा । जीवपालका जगदुद्धारा । अचल अगोचरा नमो तुजा ॥९२॥

जय त्रिगुणात्मक त्रिवदना । जय षट्कमलराजीवनयना । जय शंकरमंडित भस्मविलेपना । भूषित भूषणा नमो तुज ॥९३॥

जय शंखचक्रगदाधरा । सर्वोत्तमा दुष्टसंहारा । अज्ञानछेदका दिगंबरा । अपरंपारा नमो तुज ॥९४॥

जय त्रिशूल डमरुं खड्ग धारणा । अनन्यप्रिया भयवारणा । जय सकलनियंता कार्यकारणा । अगा सच्चिद्धना नमो तुज ॥९५॥

जय ब्रम्हचर्यव्रत संपादका । दंडकंमडलुकौपीनधारका । जय शार्दूलचर्मविराजका । सुखदायका नमो तुज ॥९६॥

जयतटि प्रियवासा । आनंदरुपालक्ष्मी निवासा । चतुर्थाश्रम पर विलासा । पंचमभूषा नमो तुज ॥९७॥

जयजय पावना परमानंदा । जय ब्रह्ममूर्ते आनंदकंदा । जय भेदातीता तूं अभेदा । अद्वयबोधा नमो तुज ॥९८॥

जय जगद्गुरु अविनाशा । निश्चळ निर्मळा वंद्य सुरेशा । अनंता अभंगा सकळाधीशा । परात्परपरेशा नमो तुज ॥९९॥

अगा दीनोद्धारणा दीनबंधू । तूतें ध्याती सुरवृंदू । स्तुतिस्तवनाचा संवादू । सिद्धमुनिसाधू करिताती ॥१००॥

तुज ध्याती सकल लोक । देव अमर ब्रह्मादिक । मूर्ति पाहोनि हरिहरात्मक । पूजिती आवश्यक ध्याति मुनी ॥१०१॥

श्यामसुंदर सुहास्य रुप देखोन । अनन्ययोगें सर्व शरण । म्हणती दाता तूं जगत्पावन । कृपादान दे आम्हां ॥२॥

तूं सदय आणि उदार । अनंत सिद्धिॠद्धींचें भांडार । द्वय कामधेनु निरंतर । सकळ सार तुजपाशीं ॥३॥

तूं भुक्तिमुक्तीचा दाता । तूं सदयपणें जीव रक्षिता । तूं चुकविसी सकळ आघाता । इच्छित पदार्था देसी तूं ॥४॥

तूं सदा शांत सुप्रसन्न । अनन्या पाळिसी कृपें करुन । आवडीचें भातुकें देसी पूर्ण । भवबंधन तोडिसी ॥५॥

तूं सकळ देवांचाहि देव । तूं सकळ सिद्ध योगियांचा राव । अनंतब्रह्मांडींची ठेव । तूंचि जीव जीवाचा ॥६॥

तूं आम्हां सकळांचा अधिपती । ज्ञेय ज्ञान ज्ञाता निश्चिती । तुझ्या कृपेविण कैचि गती । मूढमती जीव सर्व ॥७॥

तरि आतां होवोनि सुप्रसन्न । दत्ता दीजे स्तवनीं मान । तुझें नाम पतितपावन । करी कल्याण सकळांचें ॥८॥

अमंगळ सकळ हरावें । सुमंगल दान वरदीं द्यावें । अनन्यातें तोषवावें । अंगीकारावे सकळही ॥९॥

यापरी ऋषि मुनि सुरवर । यक्षगण गंधर्व किन्नर । मानव आणि विद्याधर । स्तवन अपार करिताती ॥११०॥

मुख्य नारद भृगुविरचित । स्तवन करिती अत्यद्भुत । हें परिसोनी देवदत्त । कृपावंत अभय दे ॥१११॥

ते अभ्यवरदवाणी । स्तोत्रीं स्थापिली मुनींनीं । तेचि या ग्रंथीं विवरोनी । तुम्हां निरोपणी निवेदितों ॥१२॥

मुख्य येथें धरोनि भाव । ध्यान प्रथम करावें अपूर्व । मानसपूजा विधि सर्व । सारोनि स्तव करावा ॥१३॥

या स्तोत्राचें पठण । करावें वीस आवर्तन । एवं सहस्त्र संख्येचें आवर्तन पूर्ण । करितां प्रसन्न दत्त होय ॥१४॥

भूत पिशाच समंधभय । जे नाना परींचे अपाय । ते निवटोनि करी उपाय । रक्षी काय सकृपें ॥१५॥

यशदायक कीर्तिवर्धन । पुत्र पौत्रं दे धनधान्य । क्षेम आयुरारोग्य कल्याण । जयश्री पूर्ण प्राप्त होय ॥१६॥

राजप्रजादि सकळिक । वश्य होती आवश्यक । श्रेष्ठपणीं सकळ लोक । वंदिती अनेक सेविती ॥१७॥

क्षय अपस्मारादि रोग जाती । कूष्मांड डांकिणी यक्ष पळती । यंत्र मंत्र तंत्र न बाधती । संरक्षिती अवधूत ॥१८॥

ग्रहपीडा नाना उपाधी । तुटती अवघ्या आधिव्याधी । वन जळ अग्निसंधीं । कुपानिधी तारील ॥१९॥

वितळोनि जाय अज्ञान । प्राप्त होय इच्छित ज्ञान विद्या होय आयुष्यवर्धन । भुक्ति मुक्ति पूर्ण लाभावी ॥१२०॥

प्रतिकार्या नेमिल्या नेमा । आचरण कीजे सोसोनि श्रमा । फळ पावे पूर्ण कामा । तया उत्तमा दया उपजे ॥२१॥

मनीं नाणावें विपरीत । अनुष्ठानीं बैसावें निवांत । परान्न प्रतिग्रह शय्यारत । विवर्जित असावें ॥२२॥

एवं साधितां निश्चयेंसी । त्वंरित पावे अविनाशी । नाचरतां जो यातें दूषी । तो रवरवासी पावेल ॥२३॥

जो व्रतस्थें करील पठण । तया शत्रु होतील शरण । इच्छित कामना होतील पूर्ण । दत्तदर्शन लाभेल ॥२४॥

हे मुनीचे भाष्यार्थी । वरप्रदानें दिधलीं असती । तेचि निवेदिले प्राकृती । मिळवोनि संमत्ति श्रोतिया ॥२५॥

तंव श्रोते म्हणती पावन । कथा करविली आम्हां श्रवण । धन्य या स्तोत्राचें महिमान । कल्पद्रुम पूर्ण उभारिला ॥२६॥

पुरवावया सकळांचें मानस । ह्रा अवतरला सद्‌गुरु अविनाश । परि याची स्थिति गति आम्हांस । निरोपा सुरस आवडीं ॥२७॥

वक्ता म्हणे येचविषयीं । मुनीनें निश्चय केला पाहीं । ते निरोपितों नवलाही । सांठवा हृदयीं आवश्यक ॥२८॥

न कळे अवघूताचि स्थिती । बालोन्मत्त पिशाच अवस्थि । कधीं नग्नदिगंबर फिरती । फकीर होती तुर्कादि ॥२९॥

कधीं जोगी कधी भोगी । कधीं संगी कधीं निःसंगी । नानारुपें धरोनि जगीं । प्रगट योगी फिरतसे ॥१३०॥

इच्छामात्रें जया गमन । इच्छिला ठाव पावती जाण । जो करी सहज स्मरण । तेथें येऊन पावती ॥३१॥

राज हट दोन्ही मार्ग । हें जाणोनि वेगळेचि अंग । नाना मुद्रा योग प्रसंग । कळा सांग जाणती ॥३२॥

जाणोनि अजाणता असे । व्यापोनि अव्याप्ति वसे । भासोनि अभासत्व विलसे । करोनि नसे कर्तृत्वीं ॥३३॥

ऐसा हा अविनाश दत्तराणा । असे अतर्क्य वेदपुराणा । नये कवणाच्या अनुमाना । गुणातीत निर्गुणा कोण जाणे ॥३४॥

परी तोचि होय जरी कृप । अंतरीं उजळी ज्ञानदीप । तरी ध्याना येईल तें रुप । एऱ्हवीं अरुप सर्वदा ॥३५॥

त्या कृपेच्या प्राप्तीसाठीं । योगी सोशिती कचाटी । जीवप्राणें आटाटी । भोगिती कपाटी बैसोनी ॥३६॥

तैसी अबला वृद्ध जना । न घडेचि या अवघड कारणा । म्हणोनि स्वल्प हे धारणा । निवडोनि प्रेरणा केला ग्रंथीं ॥३७॥

परि यासि पाहिजे भक्ति दृढभाव । इंद्रियनेमें करी उपाव । ध्यान स्तोत्र जें अपूव । क्रम सर्व जाणावा ॥३८॥

निवेदिल्या ऐसें । पठण कीजे अनन्य तैसें । मग तो पावेल करुणारसें । दृढ भरवसें साधकां ॥३९॥

हें नोहे अप्रमाण । नारदभृगूचें सत्य वचन । पंरी एकाग्रे करोनि मन । करा पठण ऐसें ॥१४०॥

लोकोपकारासाठीं । निवेदिली ग्रंथीं हातवटी । प्रेमभावें धरोनि पोटीं । साधा गोष्टी आवडीची ॥४१॥

या धारणेच्या साधनीं । अनुभव आला मजलागुनी । म्हणोनि ग्रंथीं ठेविलें लिहोनी । अर्थिक जनीं स्वीकारिजे ॥४२॥

असो सुरवरसमुदाय ऋषिभार । येणें स्तवनें करोनि अपार । तोषविला दत्तदिगंबर । जो का उदार जगद्‌गुरु ॥४३॥

अविनाश झाला संतोषित । नाभीकरे अभय देत । तुम्हां सकळांचे मनोरथ । पूर्ण असोत सर्वदा ॥४४॥

अभयवाणी ऐकतां कानीं । दुंदुभीनाद झाले गगनीं । देवललना गाती गाणीं । आनंद मनीं सकळांच्या ॥४५॥

कळा पात्रें नाचती । गंधर्व रागउपराग गाती । ओवाळोनि पंचारती । कुरवंडी करिती जीवप्राणें ॥४६॥

विमानीं दाटले सुरवर । करिती पुष्पवष्टिसंभार । दत्तनामाचा करिती गजर । जयजयकार सप्रेमें ॥४७॥

काया वाचा आणि मन । दत्तचरणीं केलें अर्पण । ऋषि वेदघोषें करुन । भावे सुमन अर्पिती ॥४८॥

परमानंद दाटला मानसीं । सप्रेमें वंदिला अविनाशी । आज्ञा घेवोनि देवऋषि । स्वस्थळासी चालिले ॥४९॥

देवऋषि नारी नर बाळा । योगी सिद्ध साधूंचा पाळा । प्रदक्षणा घाली तये वेळां । सिंहाचळाभोंवतीं ॥५०॥

पुनरा घालिती लोटांगण । जयशब्दें मागुती गर्जून । द्त्तमूर्ति करोनि अवलोकन । पावले स्वस्थान सर्वही ॥५१॥

धन्य या अधूवताची लीला । वर्णित जाती आपुलिया स्थळा । हे मूर्ति पाहतांची डोळां । आनंद सकळा जीवासी ॥५२॥

श्रीसद्‌गुरुदत्त दयाघन । शरणागतासि करितो पावन । आवडीचें देतसे दान । कामना पूर्ण करीतसे ॥५३॥

अविनाश सदय दिगंबर । हें साधुसज्जनाचें माहेर । तया समाजीं हा निरंतर । उदार धीर वसतो कीं ॥५४॥

तयांचें व्हावें जरी दर्शन । तरी संतांसि रिघावें शरण ।पदीं अर्पावा जीवप्राण । करावें सेवन आवडीं ॥५५॥

संत सदयपणें वोळतां । भेटी करवितील अविनाशदत्ता । दुरीं करितील अवघी चिंता । निर्विकल्पता देतील ॥५६॥

म्हणवोनिया अनंतसुत । झाला संतचणांचा अंकित । सत्कृपाळ सदय शांत । पुरवितील अर्थ दीनांचे ॥५७॥

त्याचेचि हे दयेकरुन । रसाळ चालिलें निरोपण । पुढील कथा गोड गहन । अमृताहून आगळी ॥५८॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । यासी नारदपुराणींचें संमत । परिसोत प्रेमळ भाविक भक्त । चतुर्दशोध्यायार्थ गोड हा ॥५९॥

॥ इति चतुर्दशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय पंधरावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्‌गुरुदत्तात्रेयाय नमः ॥

जयजय सद्‌गुरु अविनाश उदारा । कृपाघना तूं सर्वेश्वरा । चिद्विलासा जगदुद्धारा । त्रिगुणसुंदरा नमो तुज ॥१॥

जय त्रिगुणात्मका श्यामांगा । जय संगातीता तूं निःसंगा । त्रितापहारका भवभंगा । अभेद अभंगा नमो तुज ॥२॥

जयजय जगपाळका जगन्निवासा । अनंत नामा अनंत वेषा । अज्ञानछेदका परमपुरुषा । सह्याद्रिवासा नमो तुज ॥३॥

तूं केवळ आनंदाचा कंदु । कृपासागर परमानंदु । शरणागताचे तारिसी वृंदु । पुरविसी छंदु अंतरीचा ॥४॥

तुझिया कृपाबळें करुन । चौदा अध्यायें झालें निरुपण । तें श्रोतीं केलें श्रवण । सतसज्जन तोषले ॥५॥

याहुनि विशेष आगळी । पुढील कथेची वदवा नव्हाळी । ऐसी पुरविणें माझी आळी । हृदयकमळी वसोनी ॥६॥

गतकथाध्यायीं सुरऋषी । पुसोन गेले स्वस्थळांसी । मागें अत्रिअनसूयेसी । वृत्त अविनाशी निवेदी ॥७॥

जें जें केलें तीर्थाटण । देवक्षेत्रें केलीं अवलोकन । सिद्ध योगी भेटले पूर्ण । तें महिमान श्रुत करी ॥८॥

गिरीगुव्हा महास्थळें । सानथोर अतिविशाळें । अवलोकिलीं तीं सकळें । तें निरोपिलें उभयांतें ॥९॥

जेथें जैसीं झालीं दर्शनें । भक्तिप्रेमाचीं भाषणें । लाभले प्रसाद अनुक्रमानें । तेंही आवडीनें श्रुत केलें ॥१०॥

जेथें जैसा नेमिला नेम । तोहि निवेदिला सर्व क्रम । जेथें जेथें घेतलें विश्राम । तेहि सप्रेम विवरिले ॥११॥

जंवजंव ऐकती निरोपण । तंवतंव उभय आनंदघन । चित्तीं वाटलें समाधान । सुखसंपन्न अंतरीं ॥१२॥

नित्य सोहोळा मंदिरीं । सिद्ध ऋषि येती घरीं । पाहोनि सुखावती अंतरीं । प्रेमलहरी भेटतां ॥१३॥

अत्रि अनसूया प्रेमें करुन । आदरें पूजिती द्विजगण । अतिथिसत्कारीं परम निपुण । देती भोजन इच्छित ॥१४॥

जे जे इच्छा जया मानसीं । ते पुरविता होय अविनाशी । विन्मुख जाऊं नेदी कवणासी । सुख समस्तांसी देतसें ॥१५॥

जेथें वसे दत्तदिगंबर । तेथें आधिव्याधि नसे अणुमात्र । भय पीडा गेली दूर । रिपु तस्कर कैंचे मग ॥१६॥

जेथ अवधूत सत्पात्र । तो देशचि जाणा पवित्र । दारिद्रय नसे अणुमात्र । पावती सर्वत्र सुख तेथें ॥१७॥

असो सह्याद्रि पर्वतीं । नित्य आनंदचि वर्षती । अत्रिअनसूया सुख पावती । भाग्य भोगिती अनुपम्य ॥१८॥

चंद्र अविनाश आणि दुर्वास । आचरती नित्य उभय सेवेस । पूर्ण करिती इच्छित मानस । किमपि उदास होऊं नेदी ॥१९॥

आपुले पुत्रधर्मातें जाणून । आवडीं पितरांचें करिती सेवन । काया वाचा आणि प्राण । झिजविती पूर्ण स्वहितार्थ ॥२०॥

तीर्थ व्रत तप दान । क्षेत्र देव आणि यज्ञ । अनेक पूजा अनुष्ठान । आगळी याहून पितृसेवा ॥२१॥

पृथ्वीदानादि जरी केलें । अश्वमेधादि यज्ञ भले । पितृसेवेच्या तुलने न आले । गौणचि झाले यापुढें ॥२२॥

महायात्रा केल्या तीन । सुवर्णरत्नीं तुळा दान । याहुनी अधिक असे पुण्य । करितां नमन एक माते ॥२३॥

महाक्षेत्रीं पुण्यकाळीं । सहस्त्र गोप्रदानें युक्त केलीं । परि तुलनेसी नाहीं आलीं । उणीं नेमिलीं नमनापुढें ॥२४॥

सर्वां वरिष्ठ पितृसेवा । तेथें इतर पुण्या कोण केवा । हा विचार जाणोनि बरवा । त्रिगुणात्म देवा मानवलें ॥२५॥

तारावया साळेभोळे जन । हें वर्म काढिलें निवडून । रहाणी दावावया लागून । दाविती आचरुन सेवाधर्म ॥२६॥

अनन्य प्रीति धरोनि भाव । मातापिता मानिले देव । सेवा मांडिली अपूर्व । विशेष गौरव नित्य नवा ॥२७॥

सेवितां न मानिती कधीं त्रास । दिवसेंदिवस आवडी उल्हास । वडिलां होऊं न देती उदास । अनन्य दास होवोनि ॥२८॥

जेवीं त्रेतायुगीं श्रावण । करी पितरांचें सेवन । कावडी उभय स्कंधीं वाहून । केलें अर्चन शुद्ध मनें ॥२९॥

यापरी त्रिवर्ग प्रीतीं । दिवा निशीं उभयां सेविती । मुखें वेदचर्चा करिती । प्रेम वाढविती अपार ॥३०॥

पितृआज्ञा वंदोनि शिरीं । काजें करिती नाना परी । कधीं टाकोनि न जाती दूरी । जोडल्या करी तिष्ठती ॥३१॥

यांसीच म्हणावें कुमर । जे पितृसेवेसी सादर । स्वप्नींही नेणंती अनादर । मानिती प्रियकर सेवाधन ॥३२॥

नाहीं तरी ये लोकीं । धनाढय पुत्र असती सुखी । पितरां देखोनीं होय दुःखी । तया लेखी तृणवत ॥३३॥

सुख न वाटे देखतां । तो कैंचा नमी मातापिता । मनीं चिंती त्याचिया घाता । म्हणे वृद्धतां किती हे ॥३४॥

ते बहु ममतेनें बोलती । ऐकोनि कांटाळे बहु चित्तीं । क्वचित कांहीं आज्ञापिती । क्रोध चित्तीं उपजे त्या ॥३५॥

वस्त्र अन्न नेदी पुरतें । मागतां कठोर बोले वचनातें । अणुमात्र नेदी सुखातें । मरण त्यांतें वांछीत ॥३६॥

भार्या आणि धन । पुत्र कलत्र आवडे प्राणाहून । वडिलांचें न करी अर्चन । पापी मलीन दुष्ट मती ॥३७॥

मातेची काया उघडी । वसन मागतां म्हणे रांड वेडी । कांते पाटाऊ दे साडी । अनेक आवडी पुरवीत ॥३८॥

चिंध्या गांठी मातेला । लागतां लज्जा न वाटे त्याला । कौपीन जरीप्राप्त पित्याला । संकोच मनाला नुपजेची ॥३९॥

आपण नेसे रेशीमकांठीं । पित्यांची न सोडवी लंगोटी । केव्हढा सुपुत्र जन्मला पोटीं । दुःख दे कोटी पितरांतें ॥४०॥

कधीं न बोलेची रसाळ । फेकी दुष्ट शब्दांचें इंगळ । दर्प दावोनी चळचळ । कांपवी कळकळ भोगवी ॥४१॥

आपण कांता सुखासनीं । पितरां फाटकें अथवां अवनी । कदापि दया नुपजे मनीं । टाकी दुरखोनी बोलतां ॥४२॥

मोहें जवळी ये जरी माता । तंव आपण सरोनी जाय परता । म्हणे थुंका उडे बोलतां । पुरे चावटता न करा हे ॥४३॥

म्हणे किती हें तुमचें वृद्धपण । मळमूत्रें सुटली घाण । लाळ बेडके करोन । घर थुंकोन नासलें ॥४४॥

कोठोनि आयुष्या आली वृद्धी । किती सोसावी उपाधी । मृत्यु लपला कवणे सादीं । येईल कधीं न कळे तो ॥४५॥

तुम्हीं उभयते आम्हांसी । आणिलें जगीं हीनत्वासी । मरतां सुख निश्चयेंसी । वाटेल जिवासी संतोष ॥४६॥

मेल्याही तुम्ही घालवाल । शेंपन्नासातें नाडाल । तुमचें कर्ज लागतों सबळ । फेडणें जंजाळ मजभोंवतां ॥४७॥

ऐसिया परि नित्य गांजितां । दुःख उपजे त्यांच्या चित्ता । म्हणती देवा मरण आतां । दे अतौता आम्हांतें ॥४८॥

कालें करोनि प्रसंग आला । देह रोगें जर्जर झाला । प्राण कासावीस होऊं लागला । दया पुत्राला नुपजे ॥४९॥

अंतींही न करी सेवन । जवळी न बैसेचि कांता आपण । न देची तया उदक अन्न । लौकिक भिन्न बाह्य दावी ॥५०॥

उगाचि बैसोनि बाहेर । जगीं नेत्रां लावी पदर । म्हणे सोडोनि जाती पितर । दुःख फार जीवासी ॥५१॥

असो दुःखातें भोगोन । मातापिता पावलीं मरण । लौकिक भाव जाणोन । करी रुदन पुत्र तेव्हां ॥५२॥

लटिकाची आक्रोश केला । जग शांतविती तयाला । मेलिया विधी आरंभिला । बहु आनंदला अंतरी ॥५३॥

खर्च लागतां द्रव्यास । जीवीं होत कासावीस । बोलोनिया दावी जगास । म्हणे अडचणीस वडिल गेले ॥५४॥

मातापितयांच्या कारणा । वेंचावें वाटे बहुत धना । काय करावें दिवसमाना । हौस मना ऊदंडची ॥५५॥

वडिलांची पुण्याई हीन । म्हणोनि प्रसंगीं अडचण । विप्र तुम्ही सर्व सुज्ञ । गोड करुन घेईजे ॥५६॥

ऐसें वदोनि लागे कर्मासी । आनंदें करी पिंडदानासी । दान दक्षिणा उधार द्विजासी सोडी । जीवनासी आदरें ॥५७॥

सर्व प्रसंग संपादोन । सदनीं बैसला आनंदघन । केल्या संकल्पा द्विजगण । घरीं येऊन मागती ॥५८॥

त्यांसी करी चाळाचाळी । म्हणे आज उद्यां सकाळी । ते बापुडे लागती गळीं । आशामेळीं पडियेले ॥५९॥

निग्रह करुनि मागतां । कोप उपजे बहु चित्ता । द्विज म्हणती पुत्रधर्मता । कैसी आचरतां हे तुम्हीं ॥६०॥

त्यांचे उदरीं जन्म घेवोन । कांहीं व्हावें कीं उत्तीर्ण । चाळवितां आम्हांलागून । पितृऋण कैंवी फिटे ॥६१॥

शब्द ऐकोनी क्रोधावत । म्हणे काय मी त्यांचे कर्ज लागत । जन्म उदंडासी उदंड देत । यांत काय अघटित कोणतें ॥६२॥

आपुले आपण मरोन गेले । शेवटीं ऋण करोनि ठेविलें । त्यांचे बापाचें काय घेतलें । देणें आलें मज वृथा ॥६३॥

ऐकोनि यजमानाची वाणी । द्विज आश्चर्य करिती मनीं । न करा ऐसियाचे धनीं । धर्मपरायणीं मोजा हे ॥६४॥

हा परम नष्ट दुराचारी । पुनरा न येऊं याचे घरीं । ऐसें बोलोनि ते अवसरीं । उठोनि सत्वरीं जाती ते ॥६५॥

धिक् धिक् जिणें ऐसियांचें । कदा तोंड न पाहावें त्यांचें । हे पाहुणे भानुसुताचे । अघोर नरकाचे सत्कार यां ॥६६॥

यांचें पाहतांचि वदन । तात्काळ करावें सचैलस्नान । होऊं न द्यावें छायापतन । मग भाषण कोठोनी ॥६७॥

पितृद्रोही मातृद्रोही । स्वामिद्रोही गुरुद्रोही । ब्रह्मद्रोही साधुद्रोही । रवरव पाहीं भोग त्यां ॥६८॥

ब्रह्महत्या सुरापान । भक्षाभक्ष गमनागमन । आन दोष थोर सान । घडले संपूर्ण त्या नरा ॥६९॥

शास्त्रपुराणवेदादिकीं । जे दोष प्रतिपादिले अनेकीं । पितृगुरुद्रोही यांचे मस्तकीं । स्थापिले निःशंकीं निवाडे ॥७०॥

या चांडाळाचें अन्न । कदापि न करावें सेवन । करितां सुतकीं न्याय जाण । कळतां वमन यदर्थ कीजे ॥७१॥

ह्या जरी षड्शास्त्री निपुण झाला । वेदवक्ता जगीं म्हणविला । उदंड मान्यतेसी आला । वांया गेला पितृद्रोहें ॥७२॥

येणें तप जरी बहु साधिले । नाना योग आसनें चाळिले । लिंगार्चनें दैवत पूजिले । वायां गेलें पितृद्रोहें ॥७३॥

पितृचरणीं नाही मन । यात्रा केल्या पायीं नग्न । उदंड केलें धर्मदान । वृथा शीण निष्फल तो ॥७४॥

न सेवी जो असोनि पितर । काय जाळावा त्याचा विवेकविचार । दुष्ट कर्मी तो पापी घोर । तया नमस्कार न करावा ॥७५॥

लोकां दावी दांभिकपण । अंतरीं पितरां करी छळन । जळों त्याचें कर्मठपण । भोगील पतन नरककोटी ॥७६॥

अहो हे प्रत्यक्ष मूर्तिमंत । मातापिता गुरु दैवत । यालागी जो त्रासें दुखवित । तो पावे घात पदोपदीं ॥७७॥

त्यासी दारिद्रय संकट अपमान । नाना परी ओढवे विघ्न । अनेक दोषांचें आरोपण । मूर्खत्व गहन वृद्धि पावे ॥७८॥

कार्य करितां पावे अपयश । दग्ध होय समूळ यश । नसतां जगीं वाढे द्वेष । होय नाश सर्वथा ॥७९॥

जे का पितृसेवेसी रत । दासपणें आज्ञा पाळित । शब्द अणुमात्र नुल्लंघित ।

प्रीतीं वाहात मस्तकीं ॥८०॥

पितृभक्तीची विशेष आवडी । चरणसेवेची सत्य गोडी । उदंड करितां भावी थोडी । वाढवी प्रौढी वडिलांची ॥८१॥

म्हणे हे माझें दैवत । उभय बहुकाळ वांचोत । सेवा करितां माझा अंत । होवो निश्चित पदीं यांच्या ॥८२॥

यांनीं बहु माते छळावें । म्यां वचनची यांचें पाळावें । चित्त कधीं न विटाळावें । सेवेंत मळावें दिनरजनी ॥८३॥

पूजितां या सत्पात्रांस । मज न उपजावा कधीं त्रास । नित्य विनत होवोनि पवित्रास । नाममंत्रास जपावे ॥८४॥

नित्य विनवी देवासी । वृद्धां ठेवीं तूं सुखवासी । दुःख न दावी या जीवांसी । चरण निवासी मज ठेवी ॥८५॥

ऐसी ज्या पुत्रातें वासना । उभयांची प्रीतीं करीं अर्चना । अन्य पदार्थ नावडे मना । याची साधनामाजी रमे ॥८६॥

तों धन्य पुत्र या संसारीं । ऋद्धि सिद्धि तयाचें द्वारीं । तिष्ठताति होवोनि कामारी । होय हरी सखा त्याचा ॥८७॥

यश कीर्ति पावे मान । त्याचें दर्शनें जग पावन । पाप जातसे दग्ध होवोन । जोडे पुण्य आगळे ॥८८॥

दुःख दरिद्र आणि संकट । पळे देखोनि मानी वीट । तया स्तविती सर्व वरिष्ठ । नुपजे अरिष्ट कदा तेथें ॥८९॥

सकळ देव जोडोनि कर । नित्य स्तविती त्या अपार । ऐसा तो अविनाश दिगंबर । दुर्वास चंद्र पितृसेवें ॥९०॥

नित्य नित्य अतिप्रीतीं । अत्रिअनसूयेची सेवा करिती । अर्चनीं बहु आनंद मानिती । हेतु पुरविती वडिलांचे ॥९१॥

ऐसे बहुत काळपर्यंत । सेवेमाजी तिघे रत । अत्रिअनसूया आनंदभरित । आनंदे बोलत परिसा तें ॥९२॥

बा रे तुम्ही करोनि सेवा । सुख दिधलें आमुच्या जीवा । हें सेवा पावो माधवा । तुमचिया भावा पूर्ण करो ॥९३॥

तुमचे मनींची कामना । सफलित फळतील वासना । त्रैलोक्य मानवेल गुणा । जगदुद्धारणा योग्य तुम्ही ॥९४॥

तुमचे प्रताप होतील गहन । कीर्तिप्रभें उजळेल त्रिंभुवन । सकळांमाजी श्रेष्ठ पावन । वंद्य जाण तुम्हीं सर्वां ॥९५॥

सिद्धी ऋद्धि मांडारें । त्रिभुवन संपत्ती असो बा रे । सर्व सत्तायोग बरे । प्राप्त खरे तुम्हां होती ॥९६॥

शांति क्षमा दया विरक्ति । हीं सदैव वसो तुम्हांप्रति । विद्याधन शरीरसंपत्ति । विवेकवृत्तीं ज्ञान बहु ॥९७॥

विद्याकळा सुप्रसन्न । असोत सकळ गुण वर्धमान । त्रिविधताप अज्ञान । जावो निवटोन दर्शनेंची ॥९८॥

बळ पराक्रम असे थोर । इच्छा पूर्णतेचे दातार । वाणी फळो सिद्ध साचार । अनन्योद्धार घडो सदा ॥९९॥

दुःख पीडा दुष्टमति । द्वैतभेद अवगति । पापवासना कल्पांतीं । कदा तुम्हांप्रति न वागो ॥१००॥

आणि जोवरी हे धरणी । ग्रह तारा नक्षत्र तरणी । तोंवरी क्षेम तुम्हांलागोनी । असो वरवाणी फळो हे ॥१॥

उभयतांच्या ऐकोनि वरदा । भावें वंदिती तिघे पदा । म्हणती सरली येथोनि आपदा । सर्व संपदा जोडली ॥२॥

मग उभें राहोनि समोर । त्रिवर्गें जोडोनिया कर । स्तविते झाले प्रियकर । विनय उत्तर लाघवें ॥३॥

अहो जी दीनदयाळा । मायबापा हृदयकोमळा । औदार्यधीरा सुशीला । आप्तपाळा करुणाब्धे ॥४॥

तुम्ही आमुचे जन्मदाते । दीनवत्साचे पाळिते । आम्हां कोण जी तुम्हांपरतें । करील आस्थे दिसेना ॥५॥

तुमचे प्रसादें करुन । झालें या सृष्टीचें दर्शन । तुम्हांपासोनि झालें ज्ञान । वदपठण सर्वही ॥६॥

तुम्हांपासून सर्व प्रकार । कळोनि आला सविस्तर । ब्रह्मत्व दिधलें साचार । कृपा थोर तुमची ॥७॥

तुम्हींच आम्हां वाढविलें । विद्यादान आम्हां दिधलें । सकळांमाजी मान्य केलें । वृत्त करविलें पूर्ण तुम्हीं ॥८॥

तुम्हांविण दाता थोर कोण । संकटें भोगिलीं आम्हांलागुन । जनन होतांची अमृतपान । सागरचि पूर्ण लोटिला ॥९॥

बहु सायासें वाढविलें । नरकमूत्रातें तुम्हीं साहिलें । लळे आवडिचे पुरविले । दुःख निवारिलें सोसोनी ॥११०॥

रागवितां वेंधवितां सुरस । रसनेसी चाटविला अन्नरस । कधीं होऊं न दिलें विरस । वाढविलें सरस चालणीं ॥११॥

बालाकाचे करुन कुमर । घडविले तेथील संस्कार । सुमुहूर्तें करुन द्विजवर । विद्या समग्र पढविली ॥१२॥

विद्येमाजी निपुण केल । ब्रह्मचय मान आज्ञापिलें । तीर्थयात्रे पाठविलें । स्वस्थळा आणिलें आम्हां सुखी ॥१३॥

ऐसे तुम्ही परम सकृप । घटीं उजळिला ज्ञानदीप । सकळ निवारिले तुम्ही ताप । मायबाप धन्य तुम्ही ॥१४॥

तुम्हांऐसा उपकार । कोण करील दुजा पामर । नये सरी बरोबर । त्रिभुवनांतर धुंडितां ॥१५॥

हे उपकार फेडावयासी । युक्ति न दिसे कवणापाशीं । धुंडोनि पाहतां शास्त्रपुराणांसी । आणि वेदासी सुचेना ॥१६॥

फेडावया तुमचें ऋण । कैंची आम्हां अंगवण । आम्ही लडिवाळ तुमचे अज्ञान । मौन चरण धरियेले ॥१७॥

शास्त्रार्थातें धुंडितां । सांपडला एक विचार पाहातां । निर्णय केला ऋणार्था । तोही आतां निवेदूं ॥१८॥

द्रव्यऋण अन्नऋण । वस्त्रऋण धातुऋण । चोरमारजारऋण । उपकारऋण वेगळें ॥१९॥

जळऋण स्थळऋण । काष्ठऋण आणि पाषाणऋण । विद्यावाद भयऋण । तरुऋण काच पाच ॥१२०॥

द्विपद चतुष्पदऋण । दानऋण घर्मऋण । देव आणि सेवाऋण । व्यापारऋण वेगळें ॥२१॥

आप तेज वायुऋण । पृथ्वी आकाशाचें असे ऋण । अग्निद्विजाआप्त ऋण । घातऋण अनेक ॥२२॥

स्त्री ऋ पुत्रऋण । कुळिकऋण गोत्रजऋण । पितृऋण मातृऋण । गुरुऋण जाणिजे ॥२३॥

अनेक ऋणाच्या परी । बहुतची असती निर्धारी । परी निवडिलें सार विचारीं । ग्रंथविस्तारी न वाढवी ॥२४॥

ऋण वैरहत्या त्रिगुण । आणिक पापपुण्य निवडिले दोन । एवं पांच कर्दमी विचार पाहून । कर्म स्थापन पैं केलें ॥२५॥

सकळ सृष्टीचा उभारा । जन्मकर्मराहटी फेरा । येचि आधारें परस्परा । कळसूत्रा नाचविलें ॥२६॥

मूळ इच्छा वासनेचा खेळ । येथोनि कर्तृत्व असे सकळ । त्यागुणें रचिलें हें ढिसाळ । ब्रह्मांडगोळ जीवमात्र ॥२७॥

जीवापासुनी जो घडे धर्म । तेंचि तयाचें जाणा कर्म । मुक्त बद्धाचें वर्म । वासनाक्रम ज्या रीतीं ॥२८॥

जैसी जैसी वासना धावें । फळ तैसें तैसें तया पावे । लय वासने होतां बरवें । मुक्त स्वभावें होय तो ॥२९॥

असो मागे झालें ऋणस्थापन । तें शास्त्रन्यायें करुं मोचन । सावध कीजे आतां श्रवण । स्वस्थ मन करोनी ॥१३०॥

द्रव्यऋण द्रव्य फेडावें । शेष राहतां जन्म घ्यावें । पशुश्वानादि व्हावें । फेडित फेडावे बहुदिवसां ॥३१॥

अन्नऋण त्याचपरी । असल्या फेडावें झडकरी । राहतां तयाचे घरीं । पोटभरी जन्म घ्यावा ॥३२॥

वस्त्रऋण देतां राहिलें । वस्त्रें वाहाणें घरीं त्या आलें । बैल घोडे झाले हेले । वाहतां मेले ओझेंची ॥३३॥

धातुऋण राहिलें देतां । तेथेंही श्रमावें ओझें वाहतां । किंवा तस्करविदेहारिता । धातुक्षीणता जाणिजे ॥३४॥

जारऋणें ग्रंथी असती । पुढें कुंटणे होवोनि फेडिती । अपवाद नाना भोगिती । शिक्षा घेती फुका ते ॥३५॥

उपकारीं उपकार करावा । न फिटतां पोटीं जन्म घ्यावा । सुख देवोनि श्रम सोसावा । आपुलिया जीवा ते ठायीं ॥३६॥

जळऋण जीववावें । तेणेंची तें सत्य फिटावें । स्थळऋणें सर्प व्हावें गुप्त द्यावें धन तया ॥३७॥

काष्टऋणें द्यावें घर । पाषाणऋणें देवागार । विद्याऋणें सेवा थोर । द्रव्यसत्कार बरवा तो ॥३८॥

वादा अर्पावी शांति । ऋण वारोनि अधिक होती । भय कीजे इच्छा पुरती । जीवनें हरती तरुऋणें ॥३९॥

काचपाचाचें ऋण । घेतां चोरितां होय पूर्ण । पालटे देतां जाय फिटोन । न देतां नयन ते जाती ॥१४०॥

द्विपद चतुष्पद होय । उदरपूर्तीनें तें जाय । जीवन जाणतां मुक्त होय । कदा न राहे तें ऋण ॥४१॥

दान धर्म जें घ्यावें । जन्मोनि त्याचें कल्याण करावें । अनेक युक्तीनें फेडावें । नेम बरवे नमिले ॥४२॥

देवऋणें कुळधर्में । करोनि फेडावीं संभ्रमें । सेवाऋण सेवाक्रमें । सत्य धर्में तें फिटे ॥४३॥

व्यापारऋण तें तात्काल देतां । ठरलें फिटे जन्म घेतां । ऋणमोचन तीर्थी स्नान करितां । तैं मुक्तता जीवासिया ॥४४॥

आप तेज वायु पृथ्वी आकाश । जन्मार्थ घेणें त्यांचा अंश । शेखीं मरतां ज्याचा त्यास । द्यावा अवश्य लागतो ॥४५॥

अग्नि हवनें तोषवावा । कीं द्विज भोजनीं तोषवावा । तो भाग येणें फिटावा । द्विज फेडावा द्विजार्चनें ॥४६॥

आप्तवर्ग प्रतिपालनें । ऋण हरावें सदयपणें । पाळितां न कांटाळणें । ज्याचें घेणें तो घेतो ॥४७॥

घातऋणें समंध होय । सेवा दानीं तोहि जाय । स्त्रीऋण उपाय । पुत्र होय तरी फिटे ॥४८॥

विवाहें फिटे पुत्रऋण । कुळीं गोत्रजा पिंडदान। क्रियाकर्में उद्धारण । ऐसें प्रमाण या काजीं ॥४९॥

ऐसीं अनेक ऋणें असतीं । वर्म जाणोनि फेडितां फिटती । सर्वांहुनी विशेष असती । त्यांची ख्याती वेगळी ॥१५०॥

मातापिता आणि गुरु । या ऋणासी नाहीं आधारु । नाहीं शास्त्रयुक्ति विचारु । कैसेनि पारु तैं होय ॥५१॥

तथापि शास्त्रीं निर्णय । पितृऋणासी केला उपाय । तदनुसारें केलिया होय । ऋण जाय फिटोनी ॥५२॥

तयाचें ऐका निरोपण । वेदशास्त्री सत्यप्रमाण । कोण कैसें तया आचरण । तेंहि विवरोन दावितो ॥५३॥

उदरीं सतपुत्र जन्मला । आचरण शुद्ध वागों लागला । कीर्ति संपादिता झाला । आनंद पित्याला त्याचि गुणे ॥५४॥

करुं नये आज्ञा उल्लंघन । वर्ते पित्याचा हेतू पाहून । जें जें इच्छी त्याचे मन । तेंचि पूर्ण करावे ॥५५॥

पित्याहुनी आगळें । नाम रुप जेणें वाढविलें । आधिपत्य पित्यासीच दिधलें । मर्यादें रक्षिलें बहुफार ॥५६॥

केल्या वृत्ताचें निवेदन । करणें तेंहि करी श्रुत करुन । नम्रतेचें करोनि भाषण । संतोषवी मन दिवानिशीं ॥५७॥

सेवेमाजी तत्पर होय । त्रिकाळ वंदित प्रेमें पाय । सुरक्षित ठेवी पितृकाय । तेवींच मायसेवित ॥५८॥

ऐसा योगक्षेम करितां । दैवें शांत झाला पिता । त्याचिया कर्माची करी सांगता । आचरे वृत्ता नेम जैसे ॥५९॥

यात्रा क्रमें गयावर्जन । किंवा दे कपारी पिंडदान । शेवटीं घेतां सन्यासग्रहण । तैं तें ऋण मुक्त होय ॥१६०॥

शुद्ध भक्तिभावें साचें । ऐसेंचि सेवन केलें मातेचें । स्वचर्मवहन करितां पदाचें । न फिटे साचें तें ऋण ॥६१॥

जग वाचेनें बोलती । मातृऋणा सन्यस्त घेती । पार हें मिथ्याची जल्पती । आंधळे होती देखोन ॥६२॥

अहो जरी ऐसें असतें । तरी मातेसि संन्यासी कां नमिते । ज्याचें ऋण होय फिटते । कोणत्या सत्ते मानी मग ॥६३॥

जोंवरी असे देणें । तोंवरी म्हणेल तें एकणें । भोगवील तें लागे भोगणें । नम्र वचनें नमोनी ॥६४॥

सत्तेवांचोनि अधिकार । केवीं चालेल कोणावर । हा सकळांसि कळतो विचार । कळोनी अंधःकार कासया ॥६५॥

मातेचा उपकार न फिटे कांहीं । म्हणोनि संन्यासीं वंदिती पाहीं । तेवींच न फिटे गुरुठायीं । अद्‌भुत नवलाई उभयांची ॥६६॥

ऐसें अत्रिअनसूयेप्रती । तिघे विनवोनिया बोलती । तुमचे उपकार न फिटती । आम्हां कल्पांती कदाही ॥६७॥

पित्याचें फेडावें जरी ऋण । तरी तो सद्‌गुरु आम्हांलागोन । तारक उपदेश त्यापासून । आणि आत्मत्वपूर्ण लाधलों ॥६८॥

तो जगद्‌गुरु पूर्ण दातार । छेदितां अज्ञान अंधकार । ज्ञान प्रकाशोनि केला उद्धार । काय उपकार आठवूं ॥६९॥

त्याचिया कृपावलोकनें । लाधलों आम्ही गुह्य गुप्त धनें । जयासि वेद बोले अनुमानें । तें चिद्रूप देखणें दाविलें ॥१७०॥

जेणें मोहमाया सर्व नाशिली । भवभ्रांति समूळ छेदिली । कल्पनातीत वृत्ती केली अवस्था मुरवली स्वरुपांत ॥७१॥

निरिच्छ केलें आमुचें मन । सहजची झालें उन्मन । तेणें केलें आपणासमान । द्वैतपण नाथिलें ॥७२॥

देखणें तें मिथ्या केलें । अदेखणें तेंचि दाविलें । मींतूंपणा नाहीं उरविलें । अभेद दिलें दान मज ॥७३॥

दावोनिया गुह्य गुज । क्षराक्षरातीत केलें मज । ऐसा हा पिता सद्‌गुरुराज । पूर्ण काज केलें यानें ॥७४॥

तेवींच अनसूया तूं माता । सकृप आम्हां उभयदाता । काय आठवूं उदारता । न ये फेडितां निश्चयें ॥७५॥

कैसेनि व्हावें उतराई । हें सर्वस्व तुमचेनि पाही । दीन म्हणोनि वाचे ठायीं । मौन पायीं अर्पी माथा ॥७६॥

मी होय सेवा करिता । दोष लागे बोलूं जातां । यालागीं स्तब्ध आतां । पायीं माथा ओपिला ॥७७॥

काया वाचा जीव प्राणें । करुं सेवा गौरवपणें । तरी विस्तारले तुमचे गुणें । सर्व धनें तुमची हीं ॥७८॥

तुमचेंचि असे सर्व कांहीं । आमुचें म्हणावया ठाव नाहीं । शून्य होवोनिया देहीं । प्रणम्य पायीं सद्दढ ॥७९॥

ऐकोनि लडिवाळांचें उत्तर । सप्रेमें उभय कवळिती सत्वर । जीवीं झाला आनंद थोर । अभयकर दे माथा ॥१८०॥

बा रे तुमच्या निरोपणीं । संतोष झाला अंतःकरणीं । तुम्हां ऐसे लाधले गुणी । पुरली धणी अंतरींची ॥८१॥

ब्रह्मचर्यातें आचरुन । आलां सकळ यात्रा करोन । त्यावरी आमुची सेवा करुन । नाहीं अभिमान वाहिला ॥८२॥

निरभिमानी निरहंकार । सर्वातीतपणें अंगीं विचार । हें पाहोनि रहणीसार । आमुचें अंतर सुखावलें ॥८३॥

पाहोनि तुमच्या गुणांसी । सुखानंद उपजे जीवासी । आतां करुं तुमच्या विवाहासी । मंगलकार्यासी आरंभू ॥८४॥

ब्रह्मचर्यापाठीं उत्तम । अंगीकारावा गृहस्थाश्रम । पूर्ण होतील सकळ धर्म । धर्मार्थकाममोक्ष तेथें ॥८५॥

सकळ आश्रमांचें सार । गृहस्थाश्रम हा अतिसुंदर । याचा कीजे अंगीकार । स्नुषा सुंदर आम्हां येती ॥८६॥

ऐकोन वडिलांचें वचन । स्तब्ध न बोलती तिघेजण । हे पुढील प्रसंगीं निरोपण । रसाळपूर्ण संवाद ॥८७॥

दत्त अविनाश निर्विकार । दुर्वास तपोधन योगेश्वर । चंद्र तेजस्वी पवित्र । करिती विचार मानसीं ॥८८॥

सर्वांत श्रेष्ठ सर्वज्ञता । शोभे स्वामी सद्‌गुरुदत्ता । तोचि सारासार असे जाणता । पूर्ण मनोरथा पुरवील ॥८९॥

शरणागताची जैसी प्रीती । जाणोनि पुरवी तेचि रीती । मनीं उपजो नेदी क्षिती । करवी उपरती निजबोधें ॥१९०॥

बोधवैभवातें देवोन । विवेक शांति लेववून । संत केले आनंदघन । वसे

आपण संतमेळीं ॥९१॥

जैसा आपण बाग लाविला । जीवन देवोनी वाढविला । फळीं पुष्पीं जैं शोभला । तैं सुखावला जीव जैसा ॥९२॥

बाग दिसे शोभायमान । पुष्पें दरवळिलीं चहूंकडोन । मग मध्यें बैसोनि आपण । उपभोग पूर्ण घेतसे ॥९३॥

तेविं संतसाधूंचे मेळीं । ज्ञानबोधाचे कल्लोळीं । आत्मस्थितीची नव्हाळी । घेत स्थळीं अविनाश ॥९४॥

संत सेविती ब्रह्मानंद । त्या आनंदाचा दत्तकंद । तो प्राप्त व्हावया स्वानंद । संतपदची सेविजे ॥९५॥

संतपदीं करितां निवास । तेणें तुटती भवपाश । करोनि अज्ञानतिमिरनाश । वस्तु अविनाश भेटविती ॥९६॥

म्हणोनिया अनंतसुत । संतचरणीं झाला रत । दीनपणें दारीं तिष्ठत । दान मागत कृपेचें ॥९७॥

संत साधु सदय उदार । शरणागताचे दातार । मज देवोनि अभयकर । ग्रंथविस्तार वाढविती ॥९८॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ यासी नारदपुराणींचें संमत । सदा परिसोत भाविकभक्त । पंचदशोध्यायार्थ गोड हा ॥१९९॥

अध्याय सोळावा

येथें न चले अन्योक्ती । हें आपुलें स्वछंदेंचि वागती । मायिक पदार्था नातळती । अवलोका प्रीतीं याची लीला ॥७१॥

जगासी करावया पावन । आणि तुमचें करावया सेवन । प्रगटले अवतार घेऊन । यांचें महिमान न कळे वेदा ॥७२॥

तुमचे हेतू पूर्णतेला । अधिकार पाहोनि चंद्र सोंपिला । वृद्धिकार्यार्थ येणें झाला । न छळी उभयांला कल्पांती ॥७३॥

ऐकोनि अत्रीचें उत्तर । अनसूयेचें सुखावें अंतर । चिंता दवडोनिया दूर । आनंद थोर मानिला ॥७४॥

आनंदयुक्त देखोनि माता । उभय चरणीं ठेविती माथा । येरी अंकीं घेवोनि उभयतां । आवडीं सुतां चुंबित ॥७५॥

म्हणे आतां सुखें करुन । स्वइच्छें रमावें आनंदघन । आवडीचे हेतु होतील पूर्ण । नित्य दर्शन आम्हां दीजे ॥७६॥

क्षेम कल्याण असो तुम्हांसी । म्हणोनि माथा ठेवी कृपा करासी । तंव नमी पुन्हा तो अविनाशी । वचन मातेसी बोलत ॥७७॥

तुम्हां उभयतांवांचून । आम्हांलागीं दैवत कोण । नित्य प्रेमें वंदूं चरण । हेचिं ध्यान पूजन आमुचें ॥७८॥

मातापितयांतें न भजती । जे अन्य दैवतें आराधिती । ते कैसेनि मुक्त होती । फेरीं पडती बहुसाल ॥७९॥

पुत्रासी मातापिता दैवत । गृहिणीसी पति निश्चित । शिष्यासी सद्गुरुनाथ । मूर्तिमंत सत्य हें ॥१८०॥

सेवकनिष्ठा स्वामीठायीं । गृहस्थासी दैवत अतिथि पाहीं । ब्राह्मणावांचोनि दैवत नाहीं । अन्य कांहीं वर्णांतें ॥८१॥

ब्राह्मणाची उपासना । सूर्य अग्नी गौतमी जाणा । याव्यतिरिक्त इतर जना । भावनिष्ठपणा दैवता ॥८२॥

यायोगें हा शास्त्रार्थ । वेदीं निवडोनि ठेविला परमार्थ । या स्वधर्मे पुरती अर्थ । अधर्म अनर्थ नाचरतां ॥८३॥

हा धर्म जाणोनि जननी । आम्ही विनय तुमचे चरणीं । येथोनि कल्पना नाणिजे मनीं । स्वानंदे भुवनीं असावें ॥८४॥

नित्य भ्रमण असे तिघांसी । कारण सुख द्यावया लोकांसी । परी नित्य रजनीं तुजपाशीं । येऊं निश्चयेंसी जननिये ॥८५॥

तुझिया दर्शनावांचून । आम्हां न गमे एकही दिन । माते सत्य सत्य हें वचन । अन्यथा भाषण नोव्हे हें ॥८६॥

मी सर्वा ठायीं व्यापलों । नाना रुपें विस्तारलों । निष्ठाभावें जगीं प्रगटलों । भरोनि उरलों तुजपाशीं ॥८७॥

तें कैसें म्हणसी माते । अविनाश वदे निवेदितों तूतें । किंचित् आत्मैव शब्दातें । लावोनियातें बोलतों ॥८८॥

सिंहाद्री ढिसाळ हा कायापर्वत । शिखरीं मंदिर शोभिवंत । प्रणवरुप अत्रि विराजित । तपें तपत तेजःपुंज ॥८९॥

अर्ध जेथें शशांककोरी । ते तूं अनसूया सुंदरी । पाहे मी तयाचे वरी । व्यंजनापरी गुणातीत ॥१९०॥

जें वेदाचें होय निज । तेंचि या सकळांचें बीज । तया जाणती योगिराज । सकळ काज त्याचेनी ॥९१॥

तो मी साकार प्रगटलों जनीं । सर्वस्व दत्त करावयालागुनी । घेईल त्याची पुरेल धन । आद्यंतपारणीं फिटतील ॥९२॥

अत्रि सद्गुरु हा दयाघन । येणें मातें भेटविलें मजलागोन । तैं एकत्व पावलों सदयपण । करावें पावन हेंचि वाटे ॥९३॥

यालागीं माये परियेसी । तूं शरण जाय अत्रीसी । देहींच भेंटसी विदेहासी । दृष्टी अविनाशीं जडेल ॥९४॥

मूळ वस्तु ते अविनाश । मायिक पदार्थी असे नाश । कल्पनेचा नुरे लेश । कैंचा पाश मग तेथें ॥९५॥

हें वर्म न कळे संतांसी । जाणोनि रमती अविनाशी । अभेदत्वें ते मानसीं । सर्वात्मकासी पाहाती ॥९६॥

अद्वयपदातें पावतां । भेद नाहीं संत दत्ता । गुरुकृपेविण पंथा । कैंवी पावता जीव होय ॥९७॥

यदर्थ गुरुपदासी । शरण जावें अनन्यभावेंसी । तन मन धन अर्पोनिया पायांसी । सकळ अपायासी दवडावें ॥९८॥

उपायेंचि हरावे अपाय । अपाय सरतां कैचें भय । भय नसतांचि सहज निर्भय । होतां अभय सद्गुरुचें ॥९९॥

ऐसें कथितां निरोपण । अनसूया झाली तल्लीन । वृत्ति होवोनि निमग्न । नादी फण होय जेवीं ॥२००॥

पुढिले प्रसंगीं संवाद । प्रश्नोत्तरीं उद्धवतील आनंद । गुणग्राह्य गुरु प्रसिद्ध । दत्त विविध सांगतील ॥१॥

दत्त सकृप दयाघन । प्रबोधें करितील पावन । जें ऐकतां होय ज्ञान । सुख समाधान साधकां ॥२॥

साधक सिद्धांचे समूहीं । अविनाश वसे त्या ठायीं । तो संतकृपेवीण कांहीं । प्राप्त नाहीं कवणातें ॥३॥

म्हणोनिया संतपदा । अनंतसुत विनय सदा । त्यायोगें सच्चिदानंदा । आनंदकंदा भोगी तूं ॥२०४॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । यासि नारदपुराणींचें संमत । सदा परिसोत भाविक भक्त । षोडशोध्यायार्थ गोड हा ॥२०५॥

॥ इति षोडशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय सतरावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥

ॐ नमो सद्गुरु अभयकारा । सदय उदारा ज्ञानसागरा । अविनाशरुपा परात्परा । जगदोद्धारा जगत्पते ॥१॥

जय जगन्निवासा भयनिवारणा । जय अनाथनाथा भवभंजना । करुणाकर विश्वरंजना । रिपुकंदना नमो तुज ॥२॥

जय त्रिविधतापशमना शांता । जय त्रिगुणातीता भेदरहिता । अनंत कल्याणा अनंता । दत्त समर्था नमो तुज ॥३॥

तव कृपाकटाक्षें करुन । ग्रंथ वदविसी आपुला आपण । वाढविसी आपुलें महिमान । दासा पावन करोनिया ॥४॥

अद्भुत जे तुझी लीला कीर्ति । ते वर्णावया देवोनि मति । उदार चित्त लाविजे ग्रंथीं । हृदयीं प्रीती उद्भवोनी ॥५॥

गत कथाध्याय शेवटीं । मातेसि सांगे गुज गोष्टी । अत्रीसी शरण जाय उठाउठीं । करी साठी ज्ञान गुह्य ॥६॥

मायामोहो अनिवार । हा तुजसी बाधक थोर । हा तुटावया साचार । तुज विचार सांगितला ॥७॥

आशा लोभ हा कठिण । येणेंचि प्राणी पावले बंधन । सर्वस्वीं गेलेत भ्रमोन । नाश दारुण यायोगें ॥८॥

अनिवार ही ईश्वरी माया । हेंचि कारण उद्भव लया । जीव टाकिला भ्रमोनिया । क्रयविक्रया विषयार्थी ॥९॥

काम क्रोध मद मत्सर । दंभ आणि अहंकार । यांसंगें नाना विकार । घडती अनिवार नावरती ॥१०॥

लोभ मोहो आणि आशा । हेचि गुंतवी नेवोनि पाशा । मूळ होय जीवित्वनाशा । वाढवी दुराशा आगळीच ॥११॥

जैसा कोसला घर करी आपणासी । स्वकरें गुंतोनि पडे पाशीं । द्वार न ठेवी निघावयासी । शेवटीं घातासी पावला ॥१२॥

तेवीं विषयलोभीं जीव गुंतले । जन्ममरणाचें आवतणें घेतलें । फेरी फिरतां बहु कष्टले । परी न उबगले सर्वथा ॥१३॥

जया झोंबला विखार । तया निंब गोड फार । लवण तीक्ष्ण साखर । कटु निर्धार गूळ म्हणे ॥१४॥

शीत पदार्थ उष्ण लागती । उष्ण तेचि शीत बोलती । भ्रम निद्रा दाटती । मुंगिया चढती चरण जड ॥१५॥

कीं करी जो मदिरापान । तो अत्यंत जाय भ्रमोन । चिखलीं लोळे आनंदघन । बडबडी भाषण भलतैसें ॥१६॥

विटंबन व्यथा न कळे तयासी । सुख आनंद मानी मानसीं । हें दुःख न कळे निश्चयेंसी । उन्मादयोगेंसी तल्लीन ॥१७॥

त्या विरहित जे कोणी । याचें दुःख ओळखिले त्यांनीं । देऊं जातां शिकवणी । भ्रमित मनीं नावडे ॥१८॥

परी सावधानाचें तळमळे मानस । योजोनि सांगती उपायास । मानी ते पावती सुखास । न घडे नाश कल्पांतीं ॥१९॥

याचविषयीं विनंती । अंबे करितों तुजप्रती । उताऱ्यावीण निश्चिती । विष कल्पांतीं उतरेना ॥२०॥

रोग होतां शरिरासी । जाणेंचि लागे वैद्यापाशीं । औषध देवोनि वेगेंसीं । रोगा नाशी निश्चयें तो ॥२१॥

नाना परिचे विखार डसती । जीवीं व्याकुळ चरफडती । ते उताऱ्यावांचूनि न हरती । उतारे उतरती क्षणमात्रे ॥२२॥

तेवींच मार्गीं चालतां । पर्जन्यकाळीं अडवी सरिता । ते उताऱ्यावांचोन सर्वथा । पैल जातां नये कीं ॥२३॥

याचि प्रकारें करुन । जीव भवभ्रमें गेला गुंतोन । येथोनि काढवया समर्थ कोण । एका सद्‌गुरुविण दिसेना ॥२४॥

तो हा भवसागरीचा तारु । महा समर्थ सदयगुरु । भ्रांति छेदोनि पैलपारु । नेईल निर्धारु शरणागता ॥२५॥

भवभयातें सत्य वारी । भ्रांति कल्पनेसी निवारी । अभय देवोनिया तारी । समान करी आपुलिया ॥२६॥

आणिक अनसूये परियेसी । म्यांही उपाय केले भय हरावयासी । शरण जावोनि बहुत गुरुंसी । सकळ भ्रांतीसी वारिलें ॥२७॥

बहु उपदेश अंगीकारिले । त्या शस्त्रेंचि अज्ञान छेदिलें । विवेकज्ञान प्राप्त झालें । अविनाश पावलें पद मातें ॥२८॥

देहींचा गेला द्वैतभेद । चिंता निरसला गेला खेद । चित्त झालें निर्द्वंद्व । झाला बोध अनुपम्य ॥२९॥

बहु गुरुंचेनि मति । मज देहीं पावली शांति । वैराग्य आणि विरक्ति । सबळ अनुरक्ति बाणली ॥३०॥

बहुगुरुंची पावलों कृपा । तेणें पलविलें त्रिविधतापा । देहीं उजळिलें ज्ञानदीपा । जन्ममरणखेपा चुकविल्या ॥३१॥

देहींचें हरपविले विकार । मज केले अजरामर । वृत्ति झाली ब्रह्माकार । दुजें अणुमात्र दिसेना ॥३२॥

आब्रह्मस्तंबपर्यंत । मीच झालोंसे निभ्रांत । त्वांही व्हावें ऐसा हेत । म्हणोनि विनवीत तव पदा ॥३३॥

तंव अनसूया म्हणे बा दत्ता । तूं बोलिलासि जें जें हिता । ते ऐकोनि संतोष चित्ता । धन्य लाभता करवीसी ॥३४॥

परी एक परिसी माझा प्रश्न । बहु गुरुयोगें पावलासी ज्ञान । ते गुरु कितीक कोण । सांगें निवडून राजसा ॥३५॥

तुझे बोलाचें वाटतें नवल । बहु गुरु हे बोलिलास बोल । येणें कल्पना वाढली प्रबळ । तें तूं निर्मूळ करी आतां ॥३६॥

सद्‌गुरु तरी असे एक । तूं म्हणसी केले अनेक । मज न माने आवश्यक । बोलसी वितर्क बोल कैसे ॥३७॥

येथें मन माझे झालें चंचळ । कल्पनायोगें झाला मळ । तें उगवोनि सांगे निश्चळ । जेणें विमल चित्त होय ॥३८॥

ऐकोनि मातेच्या प्रश्नोत्तरा । परम सुख वाटले दिगंबरा । मागुतीं जोडोनिया करा । म्हणे अंगीकारा जी उत्तरें ॥३९॥

मी स्वइच्छें करितां गमन । अद्वय निःसंगें आनंदघन । तंव त्या मार्गें करुन । यदु येऊन भेटला ॥४०॥

तेणे माझी स्थिति पाहतां । नाना योगें झाला स्तविता । अनन्य भावें चरणीं माथा । झाला ठेविता सप्रेमें ॥४१॥

तया स्तुतिभावातें देखोन । अनन्य मुमुक्षू निरखोन । तया होवोनि सुप्रसन्न । अधिकार पाहुन बैसलों ॥४२॥

स्तुतिगौरवीं प्रश्न केले । ते म्यां त्याचे आदरिले । ज्यायोगें मज फळ पावलें । तें म्यां कथिलें बोधपर ॥४३॥

तेथेंहि बहु गुरुतें स्थापितां । संशय वाटला त्याच्या चित्ता । मग विवरोनि म्यां प्रतिपादितां । झालों निरसिता कल्पना ॥४४॥

तंव अनसूया म्हणे दत्तासी । यदु कोण कवणाचा कवण वंशी । तें सांगे मज निश्चयेंसी । म्हणे परिसी अविनाश ॥४५॥

सोमवंशी परम सुशीळ । नहुषनामें होता नृपाळ । तयाचा पुत्र ययाति प्रबळ । पराक्रमी सबळ धार्मिक ॥४६॥

तया ययातीपासून । यदुराव झाला निर्माण । परम तेजस्वी रुपें लावण्य । सुरस ज्ञान विवेकी ॥४७॥

तो शरण आला अनन्येंसी । तुजऐसाचि प्रश्न केला मजसी । तैं निवेदोनि बोधिलें तयासी । समसाम्यतेसी पावविला ॥४८॥

तेंचि तुज करुं निरोपण । तूंहि ऐके होवोनि सावधान। सोडोनि अवघे प्रपंचभान । करी श्रवण आदरें ॥४९॥

सत्यची असती गुरु बहुत । किती वदावे ते अगणित । दावितील जे सुपंथ । तेचि गुरुनाथ म्हणावे ॥५०॥

सुकर्म कुकर्मालागीं । गुरु असती सर्व प्रसंगीं । गुरुवांचोनि अणुमात्र जगीं । कार्य उमगीं पडेना ॥५१॥

पिंड ब्रह्मांड व्याप्ति । गुरुरुप असे निश्चिति । कोणतेही कारणाची गति । गुरुविण स्थिति न बाणे ॥५२॥

गुरु व्यापला अपरंपार । कार्यकारणकर्तृत्वाचा आधार । गुरु असे सर्वांतर । सकळ व्यवहार गुरुयोगें ॥५३॥

जाणावया गुरुमहिमान । वेदश्रुति शास्त्रा नाहीं आंगवण । भाटीव करिती पुराण । जेवी बंदिजन रायाचे ॥५४॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । तयां न कळे गुरुचा पार । कोण वर्णू शकेल पामर । शिणला फणिवर सहस्त्रमुखें ॥५५॥

हाट परिपूर्ण भरला वस्तुकारें । परिधनाऐसें घेईजे घेणारें । उदकें भरलीं सिंधुसरोवरें । प्यावें पिणारें तृषेऐसें ॥५६॥

तैसें माते म्यां अर्थपर । गुरुगुणसंग्रह केला साचार । तोचि निवडोनिया प्रकार । तुजसविस्तर सांगतों ॥५७॥

ते म्यां गुरु कोण केले । म्हणसी तरी ऐके वहिले । जे यदुपाशीं निवडोनि दाविले । तेचि बोले परियेसी ॥५८॥

पृथ्वी वायु आकाश । जळ अग्नि शीतांश । गभस्ती कपोता अजगरास । सिंधु पतंगास गुरु केलें ॥५९॥

मधुकर मक्षिका करी । मृग मीन वेश्या सुंदरी । टिटवा अर्भक कुमारी । एक विसावा निर्धारी शरत्कार ॥६०॥

सर्प आणि कातणी । पेष्कारही घेतला गुणी । एवं चोवीस संख्या नेमोनी । गुणालागोनी गुरु केलें ॥६१॥

नरदेह पंचविसावा । जेणें या गुरुचा लाभ बरवा । आणिक मानीक गुरुच्या समुदाया । त्याही भावा सांगतो ॥६२॥

मातागुरु पितागुरु । ज्येष्ठ बंधु जाणाही तो गुरु । गायत्रीउपदेशक कुलगुरु । मोक्षगुरु श्रेष्ठ सर्वा ॥६३॥

अनसूया म्हणे गा सुज्ञा । धन्य तुझी विशेष प्रज्ञा । तरी न मोडी माझी आज्ञा । सांगे गुणज्ञा गुण त्यांचे ॥६४॥

कोणापासोनि कोण गुण । कोण त्याग अंगीकार पूर्ण । तयांचें निवडोनि लक्षण । मजलागून सांग आतां ॥६५॥

मातेची देखोनि लालसा । संतोष वाटला अविनाशा । म्हणे माते स्वस्थ मानसा । करोनि विलासा श्रवण कीजे ॥६६॥

आतां एकएकाचे प्रकार । कैसा काय केला अंगीकार । ग्राह्यग्राह्य विचार । तेही प्रखर सदरें तीन ॥६७॥

सूप चाळणी रांधणें। येचि गुणें घेणें सांडणें । हें जाणिजे विचक्षणें । चतुर सज्ञानें निवडोनि ॥६८॥

सूप सत्त्वातें संग्रहवी । रजोगुणाचा त्याग करवी । अडसणीं खडेचि दावी । वेंचवितां उखवीख्यातें ॥६९॥

पैल पाहा ते चाळणी । अनेक भगें जयेलागुनी । सत्त्व देतसे त्यागोनी । रज धरोनि राहे पोटीं ॥७०॥

तिसरें नेमिलें रांधणें । तें उपेगी अनुतापपणें । स्वसंगें पक्व करणें । तृप्त्यर्थ यजणें अंशपर ॥७१॥

या त्रिगुणातें लक्षोनी । ग्राह्य अग्राह्य आणिजे मनीं । आतां निवेदितों येथोनि । सांठवीं श्रवणी गुरुक्रिया ॥७२॥

उभय ऋतूंचे समयकाळीं । पितृबीज जठरकमळीं । तृतीय वायूच्या समेळीं । संभव नव्हाळी गर्भाची ॥७३॥

दिवसमासें वाढला । जठरांतरीं उकडला । नरकमूत्रीं गद्‌बदिला । बहु उबगला ते ठायीं ॥७४॥

परिसी माते मूळिंचें कथन । विधींसी आज्ञापी नारायण । सृष्टिउद्भवाचें कारण । करावें पूर्ण साक्षेपें ॥७५॥

तुवां सृष्टीतें रचावें । म्यां विष्णुरुपें प्रतिपाळावें । रुद्रशक्तीनें संहारावें । एवं प्रतिपाळावें आज्ञेतें ॥७६॥

अवश्य म्हणोनि विधाता । जांली सृष्टि तेव्हां रचिता । चौऱ्याशीं लक्ष योनींची सिद्धता । करोनि दाविता पैं होय ॥७७॥

एकपदी आणि द्विपदी । त्रिपदी कोणी चतुष्पदी । पंचपदी केले षट्पदी । अष्टपदी नवपदी अपार ॥७८॥

बहुपदी केले अगणित । निष्पदी केले अखंख्यात । नाना जीव रचना समस्त । पाहे अनंत सर्वांतें ॥७९॥

तंव बोले नारायण । जीव निर्मिलें थोरसान । अवघे शिस्नोदरपरायण । न दिसे यावीण कोण्हीही ॥८०॥

मीं निरखिलें या जीवांतें । परी आनंद नुपजे कांहीं मातें । माझिया विश्रांतीतें । स्थान येथें दिसेना ॥८१॥

मजलागीं जाणती । सर्व रसांतें वोळखिती । यातें नोव्हे ही शक्ती । मूढमती हे जीव ॥८२॥

येणें कोण करावें कारण । यांचें रुप कैसेनि पूर्ण । केवी वोळखिती माझे मन । सकळ अज्ञान निर्मिलें ॥८३॥

तुवा निर्मिलेति बहुवस । येणें नोव्हेचि मज उल्लास । ऐसे बोलतां श्रीरमेश । चिंता विधीस वाढली ॥८४॥

मग विनवी जोडोनि कर । करुं स्वामी कोण विचार । आज्ञेऐसेंचि सत्वर । करोनि प्रकार दावितों ॥८५॥

दीनदयाळा पुरुषोत्तमा । मम अपराधाची करोनि क्षमा । आज्ञा करावी मेघःश्यामा । हे सर्वोत्तमा सर्वेशा ॥८६॥

मागुती बोले सर्वेश्वर । मजऐसेंच निर्मी द्विकर । अथवा निर्मी अधिकोत्तर । परी चतुःकर न करी त्यां ॥८७॥

तयां देईं सर्व ज्ञान । सकळां वरिष्ठ करी पूर्ण । हे निर्मित तयां आधीन । देईं करुन कमलोद्भवा ॥८८॥

वर्णाश्रम नेमी त्यांसी । वेदमर्यादा बोधी निश्चयेंसी । अधिकारपरत्वें धर्मासी । लावी आचरणासी तयांतें ॥८९॥

याग यज्ञादि क्रिया । लावोनि सुख भोगवी तयां । तयां खेळवील माझी माया

। केलें वांया नवजें तुझें ॥९०॥

ते वेदआज्ञें आघवे । मज यजतील सर्व भावें । त्या गुणें मी तयां पावें । कर्म प्रसवें तेंचि त्यांचें ॥९१॥

संकटीं करतील धांवा । तैं मज धांवणें केशवा । प्रसंग जाणोनी बरवा । करणें कुडावा मज लागे ॥९२॥

मद्भक्त ध्यातां निके । मज प्रगटणें त्यांचे हांके । त्यांतें पाळीन कौतुकें । देतां न चुके सर्वस्वा ॥९३॥

माझें नाम गा पुरुषोत्तम । तूंही पुरुषोद्भव उत्तम । जेणें तोषेन मी सर्वोत्तम । तोचि क्रम अवलंबी ॥९४॥

चौऱ्याशीं लक्षाहोनि वरिष्ठ । नरजन्मवी उत्तम श्रेष्ठ । हे माझी विश्रांति उत्कृष्ट । आज्ञापिलें स्पष्ट तुज आतां ॥९५॥

ते मज जाणावयासी । योग्य होतील सद्भावेसी । आणि पात्र उपभोगासी । सर्व कर्मांसी कारक ते ॥९६॥

हें मानिजे माझें वचन । न करोनि कांहीं अनमान । रची वेगीं त्वरें करुन । सांगे नारायण विधिसी ॥९७॥

पाणी जोडोनि विधाता । विनविता जाला त्या अनंता । म्हणे जी स्वामी कृपावंता । आज्ञा माथां वंदिली ॥९८॥

म्यां नेणोनि विचार । केला बहुतापरी विस्तार । न जाणें मी सारासार । अपराध थोर पैं जाला ॥९९॥

दैवताविण विशाळ मंदिर । नृपाहीन सेनाभार । प्राणाविण कलेवर । ऐवं विचार धडलासे ॥१००॥

अपराधाची क्षमा करोनी । मज सांभाळिजे मोक्षदानी । बोधिलें मातें कृपावचनी । सावध करोनि आज्ञापिलें ॥१॥

आतां आज्ञेऐसें वर्ततों । उत्तम नरदेह उभारितों । वेदमर्यादा बोधवितों । मान्य करवितों सकळांतें ॥२॥

अवधूत म्हणे अनसूयेसी । विधि उभारी या नरदेहासी । सृष्टिव्यवहार अनुक्रमेंसी । देखोनि हरीसी आनंद ॥३॥

जैं विधि आरंभी नरदेहासी । तैंच आज्ञापी जीवासी । भुलोनि न जावें सुखासी । पारमात्मयासी भजावें ॥४॥

जीवा राहे सावधान । तूं नरदेहीं पावसी जनन । तेथें मायामोहाचें आवरण । पडेल दारुण तुजवरी ॥५॥

काम क्रोध मद मत्सर । दंभ आणि अहंकार । हे षड्रिपु अनिवार । करितील जर्जर तुज तेथें ॥६॥

आशा मनीषा तृष्णा कल्पना । भ्रांति भूली इच्छा वासना । लोभ मोहोसंगे जाणा । होईल विटंबना पुढतीं ॥७॥

कैक कल्पना उठती । नाना द्वंद वाढविती । मोहो लोभें घात होती । फेरी पडती जीव तेणें ॥८॥

तेथें सुपंथ आणि कुपंथ । दोन्ही असती कर्मयुक्त । जें आचरशील तेंचि प्राप्त । कल्याण घात सम दोघे ॥९॥

सुख भोगितां संसारीं । कर्में करिसीं नाना परी । काळ उभाची लक्षित मापरी । फांसा आखरीं तयाचा ॥११०॥

कुकर्मातें अवलंबिसी । सुख मानोनि विख घेसी । तेणें गुंतोनि यमपाशीं । नरक भोगिसी अनिवार ॥११॥

यम प्रवर्तेल जैं घाता । तेथें कोण गा सोडविता । देखोनि आचारलिया दुरिता । योनी भोगविता होय तैसी ॥१२॥

एक एक योनीआंत । कोटि कोटि फेरे होत । पुण्य पाप समत्वा येत । तैंच पावत नरदेहो ॥१३॥

जंव जंव करी पापाचरण । तंव तंव प्राणी पावे बंधन । सुटका नोव्हे तयालागुन । दुःख दारुण भोगील ॥१४॥

यासांठीं सावधान वागे । वर्तूं नको या विकारसंगें । सुमार्ग सोडोनि कुमार्गें । कदा न रंगे लोभमोहीं ॥१५॥

ऐकोनि विधीचें वचन । भय पावला जीव दारुण । म्हणे नको मज तें जनन । सांगसी बंधन बहु घाता ॥१६॥

मायामोहो अनिवार । लोभें पावेन भ्रम थोर । जाचील म्हणतां षड्विकार । कैंचा धीर मज धरवे ॥१७॥

न घाली न घाली तये ठायीं । म्हणोनि लागे जीव पायीं । मी नवजेची त्या अपायीं । सुख तेंही पुरे नको ॥१८॥

जीवाचें देखोनि ग्लानोत्तर । विधि वदे गा धरीं धीर । तुज सांगतों मी विचार । करी अंगीकार तयाचा ॥१९॥

तूं तेथें सुपंथें चालतां । धर्ममार्गें आचरतां । मग नसे कांहीं भयचिंता । सुख पावता होसील ॥१२०॥

मोहो लोभा ना तळावें । विकाररहित वावरावें । पापकर्मा सत्य त्यजावें । मग भोगावें सर्व सुख ॥२१॥

जीव म्हणे कमलोद्भवा । तूं सांगसी योग बहु बरवा । कर्म नसतां कैंवीं व्हावा । धर्म आचरावा कोठोनी ॥२२॥

मुळींच स्थापिला निवाडा । कर्मधर्माचा असे जोडा । एकाविण एक बिघडा । कोण चाडा काय कीजे ॥२३॥

कर्मे करोनि धर्म करावे । धर्मेचि कर्म तें भोगावें । भोग भोगितां लोभीं पडावें । मोहीं गुंतावें सहजची ॥२४॥

मोहो तेचि ममता माया । गुंतवोनि घाली अपाया । कैंवीं घडविते उपाया । योनी फिरावया कारण ती ॥२५॥

ती सर्वस्वी भुलवील । जीवें जीता दीन करील । मुद्दल अवघें वेंचवील । बळें घालील जीव फांसा ॥२६॥

तेथें भय वाटे मजसी । म्हणोन न घाली त्या जन्मासी । हें ऐकोनि विधातियासी । विचार मानसीं पडियेला ॥२७॥

तेणें स्तविलें नारायणा । बहुतापरी केली प्रार्थना । उपाय जीवाच्या निरंतर । वसतों साचार सत्यत्वें ॥२९॥

मग प्रगटोनि अनंत । जीवात्म्याशी गुज बोलत । तुझियासंगे मी निश्चित । राहेन रक्षित सर्वदा ॥१३०॥

तुजसी आणि मजसी । बा संगम असे दोघांसी । तूं मातें जरी न विसरसी । तरी न भोगिसी दुःख कांहीं ॥३१॥

जें जें होईल कारण । तें तूं करी गा मदर्पण । तें माझें मी अंगीकारीन । वारीन शीण तुमचा ॥३२॥

नरदेहातें उत्तम अंगीकारी । मी असें तुझे बरोबरी । निर्भय वागोनि पाहे अंतरीं । न ये तुजवरी आळ मग ॥३३॥

जें जें कांहीं होत आहे । तें तें मम सूत्रेंचि पाहें । ऐकोनि उगलाचि तूं राहे । करीन साहे तव निष्ठें ॥३४॥

तूं मातें जरी स्मरोनि राहसी । तरी दुःख कधीं न पावसी । सुख भोगोनि मीच होसी । सांगूं तुजसी किती आतां ॥३५॥

जन्मोनि विसरसी मातें । भुलसील मायिक पदातें । ते दोष नाहीं आम्हांवरुते । तुझें तूतें भोगणें ॥३६॥

विषयीं सक्त म्हणोनि जीव । सर्वासक्त म्हणोनि शिव । तुज जें आवडेल वैभव । तोचि ठाव सांभाळी ॥३७॥

जीवात्मा आणि शिवात्मा । दोन्ही परी तो परमात्मा । उपासिलिया योगें जाणे क्रमा । सुशील उत्तमा प्राणप्रिया ॥३८॥

शब्दें जीव पावला गोडी । निमाली अंतरींचीं सांकडीं । परम उल्हासे लवडसवडीं । म्हणे जोडी झाली मज ॥३९॥

मागुतीं जगदीश वदे कमलासना । जीवा म्यां निवेदिली उपासना । तारकमंत्र झाला सांगे काना । करी प्रेरणा आतां या ॥१४०॥

वचन ऐकोनि विधाता । प्रभुआज्ञा वंदिली माथा । सोहंमंत्र झाला देता । म्हणे या सर्वथा न सोडी ॥४१॥

ऐसें बोधोनि जीवासी । गर्भागारीं संभवी त्यासी । दत्त विनवी अनसूयेसी । मागील कथेसी आठवीं ॥४२॥

तेथें अन्नोदकाचे मेळीं । जठराग्नीचेनि ज्वाळीं । परिपक्व तये स्थळीं । पिंड उकळीं उकडत ॥४३॥

दिवसमासे पक्व झाला । नरकमूत्रीं घाबरला । करपद ग्रीवेंसी बांधिला । मोटें आवळिला सबळ तो ॥४४॥

तेव्हां अंतर्दृष्टी करुन । शिवात्म्यासी करी अवलोकन । करुणा भाकी कर जोडोन । म्हणे मज येथून सोडवी ॥४५॥

देवाधिदेवा हृषिकेशी । येथोनि जरी मज सोडविसी । तरी मी न विसंबे तुजसी । पाव वेगेसी सदया तूं ॥४६॥

शंख, चक्र, गदा घेवोन । केलें त्वां आजवरी रक्षण । आतां मातें मुक्त करोन । करी पोषण पतिताचें ॥४७॥

ऐकोनिया करुणा उत्तर । काय बोले जगदोद्धार । माझा पडो नेदी विसर । असें बरोबर तुझिया मी ॥४८॥

तैं जीव अवश्य म्हणतां । कृपा उपजली त्या अनंता । करोनि त्याची मुक्तता । झाला लोटिता बाहेरी ॥४९॥

भरतां नवमास नवदिन । प्रसूतिवायो दाटला पूर्ण । माता झाली कंपायमान । दुःख साहोन कुसमुसी ॥१५०॥

महत्पुण्यें जन्म झाला । बंधना पासोनि जीव सुटला । वारा मायेचा लागला । कोहं बोलिला भ्रमयोगें ॥५१॥

माया लावी तै स्नेहासी । उष्णोदकें न्हाणी वेगेंसी । द्वारें फुंकोनि मधूसी । पाजी दुग्धासी आरंबळतां ॥५२॥

मुळीं जार वराचें प्रस्थान । त्याचें सुतक पाळीती दहा दिन । अक्राव्यासी शुद्ध होवोन । बारावा नेमून बारसें ॥५३॥

नामकर्म जातकर्म । तेराव्यासी केला बहुसंभ्रम । आदि अंतीं नेमिले सम । उत्तम अनुत्तम सारिखे ॥५४॥

दिवसमासाने वांढलें । मायामोहें वेष्टित केलें । पूर्वकर्म विसरलें । बहु भ्रमविलें आप्तलोकीं ॥५५॥

किंचित स्फूर्ती होतां जाण । होय स्वरुपाची आठवण । न भेटवे तयालागून । करी रुदन आक्रोशें ॥५६॥

माता बंधु आणि भगिनी । वेष्टुनी घेती बहु कामिनी । क्षुधानळें म्हणोनी । बळें स्तनीं लाविती ॥५७॥

हारकुर्रवा दे करिती । टाळ्या चुटक्या वाजविती । नाना नामें करोनि बाहाती । नादें लुब्धविती लक्ष त्याचें ॥५८॥

आवडी घेती जंव चुंबन । तंव बाळा दिसे तें वदन । विपरीत मनीं लक्षोन हांसे गद्गदोन बाळक तो ॥५९॥

माझें कोणीकडे गेलें । नानाविध हे कोण आले । तें आठवतां दुःख जालें । रडों लागलें मागुतीं ॥१६०॥

मासावरी चढतां मास । मूळ विसरलें दिवसेंदिवस । पुढिलियांचा लागे ध्यास । खेळीं मानस गुंतलें ॥६१॥

पांच मास पूर्ण भरतां । निखळ विसरला तो अच्युता । मग सर्वभावे आवडे माता । स्वजात गोता न्याहाळी ॥६२॥

दिवसेंदिवस कळों लागे । पडे झडे कांहीं रांगे । भिंती धरोनि स्वअंगे । चालविती वेगें बोटनेटे ॥६३॥

परम प्रीती करुन । बाळा करविती अन्नपान । लेववोनि अलंकारभूषण । शिकविती भाषण शब्द नाना ॥६४॥

रसना गुंतविली रसीं । अलंकार जडविले चित्तासी । खेळ रुचविती मानसीं । संग बाळासी योजविती ॥६५॥

सप्त वरुषें होतां कुमारा । मौंजीबंधन द्विजवरा । विद्याभ्यास करविती बरा । होइजे पुरा तोंवरी ॥६६॥

विद्येमाजी झाला प्रवीण । जगीं वर्णिले शहाणपण । सुख मातापितयांलागुन । म्हणती लग्न करावें ॥६७॥

जो तो म्हणे तुमचे घरीं । देतों आम्ही आपुली कुमरी । विधिनेमा ऐसी परी । घडोनि निर्धारीं येतसे ॥६८॥

लोक म्हणती झालें लग्न । लग्न नोव्हे तें आलें विघ्न । शृंखळा जडली पदीं येऊन । दृढ बंधन पावला ॥६९॥

माता निरवी सुनेसी । संसार करी तूं मजाऐसी । सर्वस्व सोंपिलें तुजसी । शीतळ कुसी प्रसवे तूं ॥१७०॥

वाढतां वाढली कांता । फळशोभनीं योग्य एकांता । जळूऐसी झोंबोनि स्वकांता । नग नसतां आकांता पाववी ॥७१॥

बाह्य द्रव्यातें सर्व आटी । शरीरद्रव्यातें तैसीच घोटी । निःशक्त होतां पदें लोटी । उपाधी मोठी वाढवी ॥७२॥

न पुरतां तिची आस । भ्रतार उपजवी परम त्रास । लोभमोहाचा पुरुषा पाश । पडे भ्रंश स्वहितातें ॥७३॥

जरा अवस्थें कासाविस प्राण । परी प्रपंचीं गुंतलेंसे मन । व्याधि रोगें गेला वेढोन । तरी वेध पूर्ण प्रपंचीं ॥७४॥

लाळ शेंबूड बरबरा वाहे । शौच मूत्र अंथरुणीं होये । मुरकुंडी वळोनी ठायीं राहे । तरी प्रपंच सोये न सांडी ॥७५॥

घरिंचे दारिंचे त्रासती । निष्ठुरपणें बहु गांजिती । सर्व भावें कंटाळती । कोण्ही न येती उपेगा ॥७६॥

चहुंकडोनी दुःख अनिवार । परी म्हणे मी वांचलों जर । करोनि दावीन संसार । कैंवि पामर निंदी मज ॥७७॥

जवळी पावलें मरण । परी न सांडी आंगवण । प्रपंचीं मोहित जालें मन । पडिला दारुण भवपाशीं ॥७८॥

करितां कल्पना प्रपंचविषयीं । प्राण गेला ठायिंचा ठायीं । पाशें बांधोनि यम नेई । भोग विदेहीं विटंबना ॥७९॥

जे आचरणाची स्थिती । तैसेच भोग भोगविती जन्मागारीं फिरविती । नेवोनि टाकिती नरकवासा ॥१८०॥

हें जन्ममरणाचें बहु दुःख । येणें कैंचे प्राणिया सुख । हेंचि वर्म जाणोनि देख । जालों आवश्यक सावध मी ॥८१॥

सर्वांमाजी उत्तम खरा । नरदेह हा सुंदर हिरा । पावोनि करी जो मातेरा । काय गव्हारा म्हणूं त्या ॥८२॥

या जन्मासी मार्ग दोन । ते तूं म्हणसील जरी कोण । तेही तुजप्रती सांगेन । सावधान परिसीजे ॥८३॥

एक पाववी बद्धतेसी । एक मुक्तमार्ग निश्चयेंसी । हें वर्म विवेकें मानसीं । उभय पक्षांसी वोळखिजे ॥८४॥

मुक्त होय तो गोमटा । बद्ध तो परम असे खोटा । लावी नरकाचिया वाटा । भरवी हाटा यमाच्या ॥८५॥

मुक्तपणाच्या साधनें योग । तया पाहिजे सदृढ वैराग्य । भोगाचा करणें सर्व त्याग । विवेकसंग सर्वदा ॥८६॥

अनसूयेसी म्हणे अवधूत । तुज विस्तार जाणविला नेमस्त । जयायोगें घडे घात । ते यथार्थ निवेदिलें ॥८७॥

परी याचा म्यां घेतला गुण । तो निरपितों तुजलागुन । लक्ष चौऱ्यांशी योनीसि जाण । गुरु पावन नरदेहो ॥८८॥

सर्व गुणांतें जाणता । रसज्ञपणें जाणे रसता । विवेकें निवडी बा कसता । सर्वांत ज्ञाता गुरु हा ॥८९॥

बीज गुरु पिता जाण । माता वाढवी प्रीतीकरुन । आवडीं लालन करी पालन । गुरुपित्याहून आगळी ॥१९०॥

शिक्षा करोनि विद्या होती । मान्य सकळांमाजी करविती । तया विद्यागुरु म्हणती । शरण त्याप्रती मी जालों ॥९१॥

ब्रह्मत्व दिधलें मजलागोनी । गायत्री उपदेश केला कानीं । वेदशास्त्रीं प्रवीण करवोनी । अर्थ बोधवोनी देती जे ॥९२॥

तो कुळगुरु म्यां वंदिला । वेदार्थबोध गुण घेतला । वेदमतें ज्येष्ठबंधु बोलिला । तो म्यां नमिला दुर्वास ॥९३॥

एवं वडिलांसि वंदावें । कनिष्ठांसि आशीर्वाद द्यावे । हें विचारें जंव पाहावें । गुंतोनि पडाव दोहींकडे ॥९४॥

पाहतां त्या वेदमतासी । वृद्धत्व नेमिलें बहुतांसी । त्यामानें नमनासी । विकल्प चित्तासी वाटतो ॥९५॥

म्हणोन विवेकगुरु केला । वैराग्य अनुताप बाणविला । वडीलां वडील जंव शोधिला । तंव तो व्यापिला सर्वांत ॥९६॥

वडिलपण तुजमाजी । तेवींच असे मजमाजी । व्यापलें सर्व समाजीं । प्रणिपात काजीं कोण उरे ॥९७॥

म्हणोनि न करावें जरी नमन । तरी वेदवृद्धाचारीं लागे दूषण । यालागीं त्यजोनि थोरपण । करावें नमन सर्वा भूतीं ॥९८॥

नारी नर थोर बाळ । पशुपक्ष्यादि जीव सकळ । स्थावर जंगम लघु स्थूळ । होवोनि प्रेमळ नमावें ॥९९॥

त्या विवेकें ऐसें केलें । थोरपणाचें ओझें टाळिलें । भेदाभेद अवघे उडविले । एकत्व भासविलें अनेकीं ॥२००॥

जीवशिवाचें द्वैतभाव न । निरसोनि पावलें एकपण । कोणें करावें कोणासि नमन । मन अमन होवोनि ठेलें ॥१॥

तथापि राखावया श्रेष्ठाचार । आठवला विवेकें विचार । अविनाश व्यापक सर्वांतर । पावनत्वें थोर हाचि पैं ॥२॥

नाशिवंत नरदेहो पतित । हा सर्वांत कनिष्ठ नेमस्त । येणें करावा प्रणिपात । व्हावया पुनीत अधिकार हा ॥३॥

आणि जें का स्वात्मस्वहित । तें जाणावया नरदेहोच समर्थ । सर्व ज्ञान येथेंचि प्राप्त । नाहीं इतरांत निश्चयें ॥४॥

यासाठीं नरदेहो गुरु । पाहिला सर्व गुणांचा आगरु । अलभ्य लाभला भवी थोरु । जाणोनि विचारु मानिला म्यां ॥५॥

सकळ योनींमाजी नरदेह श्रेष्ठ । परी ज्ञानहीन अति कनिष्ठ । अज्ञानभरित मतिभ्रष्ट । नाना अरिष्ट भोगवी ॥६॥

षड्रिपूंचे संगें मन । पंचविषयीं मोहिलें पूर्ण । आशा लोभ मोहें भ्रमोन । पाववी पतन नरकवासीं ॥७॥

हे वेदविद्या गुरुचें प्रसादें । हे चिन्हें वोळखिले त्याचि बोधें । कीं हे घातक उभारिलीं द्वंद्वे । अति विरुद्धें माजविती ॥८॥

याचें करावया निवारण । नाहीं कोण्हासी आंगवण । जें जें कर्म आचरावें जाण । अहंतागुण वाढवी तें ॥९॥

इत्यादि योगें अपायीं । बुडवी नेवोनिया भवडोहीं । जन्ममरणाच्या पंक्ती पाहीं । भोगवी नाहीं सुख जीवा ॥२१०॥

या दुःखापासोनि सोडविता । कोण्ही नाहीं गा तत्त्वता । हें जाणोनि अनुतापता । पावली चित्ता चिंता बहु ॥११॥

मग विवेके केला विचार । सर्वांहोनि सद्गुरु थोर । तोचि भवभय वारील निर्धार । निर्विकार करील मज ॥१२॥

हे सद्बुद्धीचेनि योगें । अनुतापाचेनि प्रसंगे । विवेकाचेनि अनुसंगें । उपाव वेगें सांपडला ॥१३॥

सरितेमाजी बुडतां । जेवीं तुंबणीफळ आलें हाता । दारिद्रयग्रस्त हाता । सांपदला अवचिता द्रव्यघट ॥१४॥

रोगी पाहे जंव मरण । तंव अकस्मात जालें अमृतपान । विखार बाधी देहा डंखोन । तों पडिला चरण मोहोऱ्यावरी ॥१५॥

तस्कर घाता प्रवर्तले । तंव उठोनि व्याघ्रे त्यां मारिलें । वनीं वणव्यानें वेढिलें । तंव पावलें मेघोदक ॥१६॥

तेवीं अनसूये मजसी । बुडतां तारुं सांपडले निश्चयेसी । आनंद उल्हासे दाटलों मानसीं । शरण सद्गुरुसी रिघालों ॥१७॥

श्रीसद्गुरु अत्रिलागोन । अनन्य अष्टभावें जालों शरण । दृढ प्रेमें धरितां चरण । केलें पावन गुरुरायें ॥१८॥

देखोनि आर्द्र अंतर । तेणें केला अंगीकार । तारकमंत्र उपदेश थोर । दिधला अभयकर मस्तकीं ॥१९॥

सद्गुरु ऐसा दयाळ । धुंडिता न दिसे ब्रह्मांड सकळ । उपमेरहित हें स्थळ । केलें तात्काळ आपणची ॥२२०॥

त्रिविधतापातें निरसिलें । समूळ अज्ञान छेदिलें । ज्ञानदीपातें उजळिलें । घटीं प्रकाशविलें निजतेज ॥२१॥

तयाचे कृपे करुन । मीच विश्वभरी जालों पूर्ण । अद्वय उन्मन केलें मन । मीतूंपण मावळले ॥२२॥

निर्भय केलें अंतर । नाथोनि टाकिले सर्व विकार । काय आठवूं उपकार । सद्गुरु दातार धन्य हा ॥२३॥

अविनाश वदे मातेसी । तूंही शरण होय सद्गुरुसी । तो दया करित पावसी । पूर्ण सुखासी अंतरी ॥२४॥

जे सद्गुरु चरणीं झालें शरण । त्यांचे चुकलें जन्ममरण । तयां नाहीं भवबंधन । मुक्त मान सर्वदा ॥२५॥

सद्गुरु अनंत दयासागर । त्या पदकमळीं सुतभ्रमर । मकरंद सेवी निरंतर । घाली गुंजार ग्रंथी या ॥२६॥

संत साधु जे सज्जन । त्यांचे लक्षोनिया चरण । ग्रंथीं मागतसें कृपादान । करा पावन म्हणोनी ॥२७॥

पुढील कथा वदवा अलोकिक । जे सकळांसि होय सुखदायक । अनंतसुत संतांचा पाइक । म्हणवी सेवक सांभाळीजे ॥२८॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । परिसोत भाविक श्रोतेसंत । सप्तदशोध्यायार्थ गोड हा ॥२२९॥

॥ इति सप्तदशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय अठरावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥

ॐ नमोजी सद्गुरुराया । ज्ञानसागरा परमात्मया । गुणातीता करी दया । हरी माया शरण तुज ॥१॥

सर्वज्ञा तूं सर्व साक्षी । औदार्यसदया माते लक्षी । मम रिपुसमूहा त्वरें शिक्षी । स्वपदीं रक्षी शरणागता ॥२॥

तूं भवभयाचें करिता नाशन । तुंझें नाम गा पतितपावन । तूं छेदिता माझें अज्ञान । तुज मी शरण गुरुराया ॥३॥

पादपद्म तुझ जे सकुमार । तेंचि माझें तारुं थोर । व्हावयालागीं भवपार । सत्य आधार हा माझा ॥४॥

तुझे चरणींचे जे रजकण । ते तीर्थरुप होती पूर्ण । तयांचें आवडीं करितां स्पर्शन । होय मोचन पापांचें ॥५॥

तुझिया चरणींचें पायवणी । तें सकळतीर्थां मुगुटमणी । प्राप्त होतांचि उद्धरोनी । जाती प्राणी मोक्षपदा ॥६॥

सर्व देवांचाहि तूं देव । दीनसखा तूं गुरुराव । तंव आधीन सर्व उपाव । जाणोनि भाव तारिसी ॥७॥

तुझिया कृपावलोकनें करुन । चालिलें या ग्रंथींचें निरोपण । दिवसेंदिवस रस गहन । देवोनि वरदान वाढविसी ॥८॥

गत कथाध्याय अंतीं । अवधूत बोले मातेप्रती । सद्गुरुकृपे पावलों आत्मस्थिती । भवभयभ्रांती वारिली ॥९॥

हे कथा श्रोते सज्जनीं । प्रीतिभरें ऐकिलीं श्रवणीं । पुढील कथेची आवडी मनी । बोलती म्हणोनी प्रेमादरें ॥१०॥

श्रोते बोलती वक्तयासी । बरवें शोधोनि निवेदिसी । ऐकोनि संतोष सकलांसि । सुख मानसीं अपार ॥११॥

तूं सद्भाग्य होसी संपन्न । आम्हां करविसी कथामृतपान । सद्गुरु दत्तप्रबोध सुलक्षण । देसी निवडून भवनाशा ॥१२॥

यदुप्रश्नाचे विचार । अनसूयेचा प्रश्नादर । करोनि अवधूत योगेश्वर । बोधपर व्याख्यान जें ॥१३॥

तें सुंदर गुरुगुणमाहात्म्य । निवडोनि निवेदिसी उत्तम । श्रवण करितां हरती श्रम । क्रोध काम वितुळती ॥१४॥

पावन अविनाशकथा हे सुधा । आता कैंची उरे भवभयबाधा । गुण ग्राहितां निवटी द्वंद्वा । भेदाभेदातीत हे करी॥१५॥

धन्य तुझे हे गोमटे बोल । आम्हां लागती बहु रसाळ । श्रवणीं पडतां करी शीतळ । वारी तळमळ जीवींची ॥१६॥

आम्हां श्रवणींची आवडी । मनभ्रमर लुब्धलें गोडीं । पुढील कथेची प्रौढी । चालवी चोखडी प्रेमळा ॥१७॥

श्रोतियांचा वाग्विलास । परिसोनि आनंदयुक्त जालें मानस । वक्ता विनवी सज्जनांस । पावन दीनांस कर्ते तुम्ही ॥१८॥

शरण जालों संतचरणीं । कळेल तैसी वदवा वाणी । माझी नोव्हे ही ग्रंथकरणी । बोलविते धणी तुम्हीच कीं ॥१९॥

तुमचें होतां कृपादान । मुका बोले पंडितासमान । अज्ञानासी होय प्राप्त ज्ञान । गाय गुण आवडी ॥२०॥

मी मूर्ख मूढ अत्यंत फार । अर्भका कैंचा ज्ञानविचार । परी तुम्हीं केला अंगीकार । पाहता पामर मी दीन ॥२१॥

माझिया बोबडया बोलासी । तुम्ही अंगीकरितां कृपाराशी । म्हणोनि सलगी करोनि पायांसी । निवेदितों कथेसी यथामति ॥२२॥

अवधूत म्हणे अनसूये । मज पावन केलें सद्‌गुरुरायें । दूर करोनि सकळ अपाये । अविनाश ठाये मज दिल्ला ॥२३॥

माते तया सुखासी । तूंही पावें अतिवेगेंसी । शरण जावोनि सद्‌गुरुसी । मिळे अविनाशी जननीये ॥२४॥

तंव अनसूया वदे गुणवर्या । निका बोध करिसी सत्य सखया । वारावया भवभया । सांगसी उपाया कळवळे ॥२५॥

हें हित वागलें माझे मनीं । परी एक विचारितें तुजलागूनी । हेतु गुंतला मागिले कथनी । तो निरोपोनि सांग मज ॥२६॥

यदुलागीं चोवीस गुरु । यांचे निवेदिले गुणप्रकारु । तो मज सांग सविस्तरु । वेधलें साचारुं मन तेथें ॥२७॥

आनंदोनि बोले दिगंबर । माते श्रोतेपण तुझें सत्य साचार । ऐकावया रंगलें अंतर । तरी ते प्रकार निवेदितों ॥२८॥

श्रीमत्सद्‌गुरु दयाघन । तेणें तारक उपदेश केला मजलागोन । तात्काळ केलें आपणासमान । द्वैतभाव निरसिले ॥२९॥

अनेकीं एकत्व दाखविलें । तत्त्वविचार जाणविले । परी म्हणे पाहिजे बाणविले । विवेकबळें करोनिया ॥३०॥

मन हेंचि असे चंचळ । याची निवारावी आधीं तळमळ । विषयलोभ त्यागावा निखळ । असक्त निर्मळ असावें ॥३१॥

उदकामाजी कमळिणी । पाहतां राहिलीसे व्यापोनी । परि पत्र नातळेचि जीवनीं । मेघस्त्रव धरोनि ते न राहे ॥३२॥

जगीं वर्तोनि ऐसें राहावें । विषयलोभ दिसोनि नातळावें । यालागीं शोधोनि गुण घ्यावें । अचळ व्हावें अमनस्क ॥३३॥

निर्विघ्न व्हावया पूर्ण योग । उत्तम गुणांचा कीजे संग । तेणें होसीं तूं अनुद्वेग । विचरसी निःसंग सर्वदा ॥३४॥

हें वाक्य ऐकोनि श्रवणीं । भाळ ठेविला सद्गुरुचरणीं । आज्ञे ऐसिया गुणग्रहणीं । गुरु शोधोनि म्यां केले ॥३५॥

अंगिकारितां त्या गुणांसी । पावलों मी अनुपम्य सुखासी । तोचि बोध केला यदूसी । पुसतां तुजसी तोचि सांगें ॥३६॥

येथें निर्विकल्प करीं मन । माते श्रवण करीं सावधान । जे म्यां ग्राह्य केले गुण । ते तुजलागुनी निवेदितों ॥३७॥

प्रथम गुरु केलें पृथ्वीसी । निरखितां लागलों त्रिगुणासी । पर्वत वृक्ष भूमीसी । घेतलें गुणासी ऐक तें ॥३८॥

पृथ्वीचा पाहतां गुण । तो विस्तारितों पृथकत्वें करुन । नांगरिती वखरिती तिजलागून । न दुखे मन पीक दे ॥३९॥

वापी कूप सरोवरें खाणिती । तयां भूमि जीवनची देती । मनीं न मानी खणिल्याची खंती । धरी शांतिं सर्वदा ॥४०॥

कोण्ही लघवी करिती शौच । नाना कर्म जीव करिती अशौच । शुची चांडाळ वागती पिशाच । नाना रेच वमनादी ॥४१॥

परी त्यां न म्हणेचि कदा कांहीं । सर्व अपराध सोसी देहीं । न विटे न दुखे कदाही । शांती पाही तिज अंगीं ॥४२॥

कोण्ही उत्तम पदार्थ पेरिले । कोण्ही गृहगोपुरें रचिले । कोण्ही घाट मंदिरें बांधिले । स्मशान केलें नरककूप ॥४३॥

परी सुख न मानी दुःखासी । द्वेष स्तुति नाणी मानसीं । अद्वय अभेद सर्वांसी । उपमा शांतीसी असेना ॥४४॥

मातें म्यां तो घेतला शांतिगुण । आणीक सांगतो वृक्षलक्षण । नाना परीचे तरुतृण । करिती छेदन सर्वही ॥४५॥

कोण्ही प्रेमें लावणीं करी । कोणी तोडी शस्त्रधारीं । परी छाया उभयांवरी । करोनि निवारी तापातें ॥४६॥

एकें लावोनि वाढविला चंदन । एक तोडी घाव घालोन । परी तो दोघांसि समान । न ठेवी विवंचून परिमळा ॥४७॥

अनेक वृक्षांतें माळियें लाविलें । पत्र फल पुष्पें रुपा आणिलें । तोडणारें इच्छेऐसें तोडिलें । मळ नाणितां दिल्हें इच्छित त्या ॥४८॥

माते पाहें ऊंस पेरिला । द्वादश मासीं वाढविला । सेखीं सेज धरोनि उपडिला । न सांडी गोडिला आपुल्या ॥४९॥

शस्त्रें खांडिलें तयासी । परी न सांडीच तो गोडीसी । चरकीं घाणीं घातला पिळणीसी । गोडी रसीं अधिकची ॥५०॥

रस तो पात्रीं घालोन । अग्निशिखें पचविला जाण । खोटी केलीसे आळोन । परी गोडपण न सांडी ॥५१॥

तयाचे करितां प्रकार । पडों नेदी गोडीस अंतर । त्या उसापासोनि गोड निर्धार । षड्गुण विस्तार होतसे ॥५२॥

प्रथम निघाला दिव्य रस । पाचितां आला गुळवण्यास । उत संघट्टनीं काह्याकवीस । आळवितां राबेस उतरवी ॥५३॥

मळ छाटितां कादवी । घोटितां साखर होय बरवी । हे झारियाची पदवी । अधिक मोलवी गुळाहोनी ॥५४॥

मळ छाटणीं जरी घोटिला । तरी तो गूळ होवोनि ठेला । जंव जंव छाटावें त्याचि मळा । तंव तंव आगळा रुपा ये ॥५५॥

इंतुकें जरी त्या छळिलें । परी गोडीतें नाहीं टाकिलें । एवं या गुणातें अंगींकारिलें । गुण घेतले वृक्षाचे ॥५६॥

आतां तिसरा गुण पृथ्वीचा । तो भाग जाणा पर्वताचा । परोपकारार्थ संग्रह वनस्पतींचा । अंगी साचा वागवी ॥५७॥

धन्वंतऱ्याचा होय दाता । बहु वनचरांतें पाळिता । स्थान न सोडी अचलता । गुणसंग्रहता केली हे ॥५८॥

अग्निवायूच्या न भी भया । कदा न सोडी बैसलिया ठाया । अग्नि दग्धवितां न सांडी जडिया । बीज विलया जाऊं नेदी ॥५९॥

नाना उपाधींतें सोशिलें । परी बीज तेणें नाहीं टाकिलें । वर्षावकाळीं प्रगटविलें । आपण उभविले परासाठीं ॥६०॥

याचि वर्मातें वोळखोनि । मातें गुण घेतलें वेचोनी । शांती दया अचलत्व मनीं । तूंही धरोनी अद्वय राहें ॥६१॥

एवं या पृथ्वीपासाव । म्यां स्वीकारिला जो गुणभाव । तो तुज निवेदिला अनुभव । न करी वाव धरीं मनीं ॥६२॥

वायुगुरुचें आतां लक्षण । तेंही द्विपक्षी असे जाण । अंगीं लागतसे स्पर्शोन । परि दृश्यमान दिसेना ॥६३॥

नाना वस्तूंतें तुरंबितां । न गुंतेचि तो पदार्था । परी त्या अंशा होय उडविता । मकरंददाता सकळांतें ॥६४॥

बाह्य हालवी बाह्य प्रकारा । अंतरींचा खेळवी शरीरा । आंगुळें चालतो बारा । नासिकाद्वारा वावरे ॥६५॥

याचा जो आसक्तव्याप्तिगुण । तोचि अंगीकारिला प्रीतीं करुन । उपाधिऐसा होवोन । उपाधिभिन्न गुण हा ॥६६॥

बाह्य अंतरीं सर्व गत । धरुं जातां सर्वातीत । करीं न येतां भासत । नवल सर्वांत वायूचें ॥६७॥

या अलिप्तें संसार । करी मातें प्रपंचीं व्यापार । मग तो न बाधी अणुभर राहाटी सुंदर जेवीं आम्हां ॥६८॥

आकाशगुरु केला मातें । तेहीं लक्षण सांगतों तूतें । अंत नाहींच जयातें । आकाश त्यातें म्हणावें ॥६९॥

आकाशाचिया पोटीं । ग्रह तारा सूर्य इंदू राहाटी । मेघमाळांची सघन होय दाटी । वायु धुधाटी अद्‌भुत ॥७०॥

पक्षी धुरोळा भरे गगनीं । पाहणारा दिसे गेलें व्यापुनी । परि तें निळें यापासोनि । निर्मळपणीं सर्वदा ॥७१॥

जीवनामाजी भरलें दिसे । घटीं घटरुपचि भासे । ढवळितां ढवळिलें नसे । जैसें तैसेंचि पाहातां ॥७२॥

अदृश्यीं दिसे आकाश । अदृश्य भंगतां न पावे भंगास । अभंगपणें अविनाश । कदाहि उपाधीस न गुंते ॥७३॥

वायुस्पर्शे जींवनीं हाले । परी तें कदा हाले ना डोले । ठायींचें ठायींच संचलें । व्यापोनि उरलें निर्मळत्वें ॥७४॥

भासमात्र होय नाश । अभासत्व नांवें तें आकाश । निश्चळ निर्मळ निर्दोष । अंत पार त्या असेचिना ॥७५॥

या ब्रह्मांडकरंडयासी झांकण । हें प्रत्यक्ष दिसे सकळांलागोन । परी धरावया नसे ठिकाण । भूषणें गगन नाममात्र ॥७६॥

चतुर्थ गुरु तो उदक । त्याचेहि गुण सांगतों ऐक । निर्मळत्व त्यातें आवश्यक । करीत चोख आणिकां ॥७७॥

पांतळपणें असे कोमळ । वाहतां पवने दावी झल्लाळ । सदा सर्व अंगें शीतळ । प्राशितां तापानळ विझवी ॥७८॥

प्राशितां लागे मधुर । व्यापक पाहतां सर्वांतर । संगाऐसा रसप्रकार । रंगाकार होतसे ॥७९॥

पवित्रपण त्या उदकासी । संगें पवित्र करी आणिकांसी । स्वतेजें जीववी जीवासी । हरी मळासी परांच्या ॥८०॥

जीवनीं योग्य तीर्थपण । स्नानें करी पापमोचन । पवित्रता देतसे परांलागुन । निंद्य गुण न पाहे ॥८१॥

जिकडे वेळोनिया नेलें । तिकडे तिकडे उगलेंचि गेलें । अनेक काजीं तया योजिलें । नाहीं कुसमुसिलें जळ कांहीं ॥८२॥

संगाऐसें जाय होवोन । स्वस्थळीं राखी स्वच्छपण । यालागी याचे घेतले गुण । तूंहि सेवन करी माये ॥८३॥

पांचवा गुरु तो अग्नि । शोभला असे पंचगुणी । तोही पृथक् तुजलागोनी । सांगतों निवडोनि ऐकिजे ॥८४॥

तेज असंभाव्य धगधगीत । व्यापलें असे सर्वगत । शक्ति त्याची अतिअद्भुत । त्यावीण रिक्त ठाव नसे ॥८५॥

दाहकपणें सबळ । उठे तेथें करी बंबाळ । ब्रह्मांड ग्रासील सकळ । कृतांतकाळ कायसा ॥८६॥

सांठवण पाहतां मोठे । दहनीं सर्वही त्या आटे । उरों नेदी कांहीं कोठें । सेखीं पोटें रिताची ॥८७॥

विशेष गुण असे त्याचा । सर्व भक्षणीं योग्य साचा । उत्तम न म्हणे हा नीचा । ग्रास सकलांचा घे मुखीं ॥८८॥

भक्ष्य अभक्ष्यादि भक्षोनी । सेखी पवित्रताचि त्यालागोनी । असतां नीच उच्च स्थानीं । कदा अवमानी न पावे तो ॥८९॥

नाना वस्तूंतें दाहितां । त्या आपणाऐसाचि होय करिता । विसरवी अवघी नामरुपता । गुण पाहतां थोर हे ॥९०॥

म्हणोनि गुरु केलें अग्नीसी । धगधगीत वैराग्य अनुताप मानसीं । रुची नाणी जिव्हेसी । अद्वय मानसीं वावरे ॥९१॥

आतां जो का चंडकीर्ण । तो म्यां गुरु केला असे जाण । त्याचे सांगतों मी गुण । सावधान परियेसी ॥९२॥

धगधगीत तेजें तापतां । दृश्य दावोनि मोडी शीतता । स्वतेजें तिमिर होय छेदिता । ज्ञानदाता वस्तूंचा ॥९३॥

आपुले रश्मियोगें जाण । शोषी सागरींचें जीवन । तेवींच शुष्क भूमी करोन । ऋतुमान मानवी ॥९४॥

सवेचि मेघें करोनि द्रवे । बीज भूगर्भी संभवे । जीवनें करोनि जीव जीवे । लवे ओलावे फळपुष्पीं ॥९५॥

षड्ऋतूंचें भोगी मान । तेवींच होवोनि दावी आपण । दक्षिणायन उत्तरायण । दावी प्रमाण गति लोकां ॥९६॥

जागवी जीवा प्रभाकर । जवळी न ठेवी अंधःकार । भ्रमणीं आनंद मानी थोर । दिगंतर उजळवी ॥९७॥

हें योगिया उत्तमगुण । म्यां ते घेतले अंगीं बाणोन । तुजलागीं करविलें श्रवण । अंगीकार पूर्ण असावा ॥९८॥

आतां शीतांशाचा योग । तोही सांगतों बरवा प्रसंग । श्रवण करोनि सर्व अंग । गुण अव्यंग सांठवी ॥९९॥

आपुले शीतत्व तेजाचिये बहुडी । उपजवी सुजनांत संतोष आवडीं । कुमतीतें पाववील लज्जा झोंपडी । दे सुखसुरवाडी वारी तापा ॥१००॥

अमृताचेनि पाझरी । नाना वनस्पतींची वृद्धि करी । जे सेवितांचि रोग वारी । सुख दे अंतरीं जीवांतें ॥१॥

गुण येथेंचि हा घेतला । तोही तुज म्यां निवेदिला । आणि त्वां गृहस्थाश्रमीं आग्रह केला । तो न अंगिकारिला तें एक ॥२॥

स्वईच्छें रमतां वनोपवनीं । तंव कपोताकपोती देखिली नयनीं । विषयासक्त होवोनी । भ्रम्ला कामिनी कामसंगें ॥३॥

अत्यंत विषयीं जडली प्रीति । स्त्रीसंग न सोडी कल्पांतीं । दोघे एकच ठायीं बैसती । गुज बोलती ऐक्यत्वें ॥४॥

एकमेकांतें विसंबोन । न राहती कदा एकही क्षण । नाना वनीं करिती भ्रमण । दोघेंजण सवेंची ॥५॥

तृप्ती होता गृहा यावें । रजनीं पक्षासनीं युग्म निजावें । अणुमात्र विभक्त न व्हावें । सुख भोगावें विषयाचें ॥६॥

ऐसे लोटतां कांहीं दिवस । गर्भ राहिला कपोतीस । आनंद झाला कपोत्यास । नाचे बहु वसति भोंवता ॥७॥

उभयतां बरोबरी जाती । चरोनी गृहा युग्म येती । कपोतीस जपे दिनरातीं । मनीं प्रीति उभयातें ॥८॥

तैं भाग्योदय झाला प्राप्त । कपोती झाली तेव्हां प्रसूत । आनंदें कपोता नाचत । अंडी निरखीत सप्रेमें ॥९॥

तृणसेजें अंडीं ठेवोनी । रक्षण ठेवी कपोतीलागुनी । आपण जावोनि काननीं ।

आहार आणोनी देतसे ॥११०॥

विषयलोभेंसी गुंतला । येरझारें श्रमता झाला । परी नुपजे त्या कंटाळा । सुख जिव्हाळा मानी जीवा ॥११॥

ऐसे लोटतां दिवस कांहीं । तंव अंडीं फुटलीं लवलाहीं । दोन बाळें निपजलीं पाहीं । आनंद देहीं उभयातें ॥१२॥

बाळें पाहतां मोहो जडला । चारा घालोनि पोसिती त्यांला । उभयीं विचार तेव्हां मांडिला । प्रपंच वाढला निजभाग्ये ॥१३॥

आतां या चहुंपोटांसी । भरलें जाईल कंवीं एकल्यासी । जाणेंचि आलें उभयांसी । या बाळांसी पोसावया ॥१४॥

ऐसिया विचारें दोघें जाती । चारा घेवोनि त्वरें येती । बाळ मुखीं नेवोनि घालिती । येरझारा करिती क्षणक्षणा ॥१५॥

स्वपोटा भरती अल्प कांहीं । सकळ जींव बाळांचें ठायीं । मुख भरतांचि लवलाही । उभयतांही देती बाळां ॥१६॥

आहार निद्रेतें त्यजिलें । मोहोलोभें वरपडे जालें । स्वशरीराकडे न पाहिलें । श्रमें वाढविलें सकुमारा ॥१७॥

पाद पक्ष चंचु नयन । अवयव लाधले तयां पूर्ण । उभय शिकविती खेळून। गमनागमन पक्षबळें ॥१८॥

बाळकां अंगीं नसे शक्ति । ठायींच ठायीं दोघें खेळती । कपोताकपोती आनंदती । उल्हास चित्तीं न समायें ॥१९॥

तंव कवणे एके काळीं । कपोताकपोती दूर स्थळीं । चारा घ्यावयालागीं लांबलीं । न मिळे जवळी म्हणोनी ॥१२०॥

प्रारब्धाची गति गहन । पारधी शोधीत आला कानन । पक्षी धरावयालागोन । जाळें पसरोन दीधलें ॥२१॥

तंव कपोतीचीं बाळें । उडतीं झालीं सहज लीळें । जाळियामाजी येवोनि पडिले । गुंतोनि मेले ते ठायीं ॥२२॥

तंव अकस्मात आली कपोती । बाळे पाहिलीं नेत्रपातीं । शोक मोहें आक्रंदती । पडली भ्रांति देहाची ॥२३॥

बाळांचें दुःख पाहोनी । अंग टाकिलें आक्रंदोनी । तेही पाशीं पडिली जावोनी । गेला प्राणी अट्टहास्यें ॥२४॥

तंव कपोता आला धांवत । स्वस्थलातें जंव अवलोकित । कांता बाळांसी निरखीत । तिघें जाळियांत देखिले ॥२५॥

नेत्रीं देखोनि तिघांसी । दुःखे आरंबळे तैं मानसीं । अहा नागवलों विषयसुखासी । मुकलों कुटुंबासी धिक् जिणें ॥२६॥

सकुमार दोघीं बाळकें । ते वाढविले म्यां कवण्या दुःखें । आतां कोठोनी प्राप्त हीं सुखें । मरण अचुकें मज आले ॥२७॥

विषय पूर्ण माझा नाहीं झाला । तों अकस्मात घाला कोठोनि आला । खेळतां पूर्ण नाहीं देखिलें बाळां । उठती ज्वाळा मोहाच्या ॥२८॥

विरहें दाटलासे कपोता । म्हणे त्यागोनि गेलीं बाळकांता । तरी वांचोनि काय आतां । देह सर्वथा त्यागीन ॥२९॥

पुत्रकांतेचा मनीं ध्यास । विषयीं गुंतली सक्त आस । दुःखें उबगोनी देहास । पावला पाश मोहो जाळीं ॥१३०॥

लोभ मोहो विषयप्रीति । येणें बद्ध कपोताकपोती । देखोनि अनुताप बाणला चित्तीं । धिःकार निश्चिती म्यां केला ॥३१॥

हा बाधकचि जाणिजे सत्य गुण । अनुताप अंगीकारी नंको म्हणोन । माते न गुंतावें त्वांही जाण । विवेक बंधन मुक्त करी ॥३२॥

अनसूया म्हणे दत्तासी । विषयलोभातें नातळसी । प्रीति मोहो दवडोनी देसी । वीतरागी होसी सर्वभावें ॥३३॥

परी या काया रक्षणा । कांहीं उपाय असावा कीं विचक्षणाः । ऐसें वाटतें माझिया मना । करी प्रश्ना यासाठीं ॥३४॥

मातेसि बोले योगिराज । प्रश्न केलासी तुवां मज । निरखोनि म्या हैंचि काज । अजगर वोज घेतली ॥३५॥

गुरु अजगर मानोन । घेतला म्यां तयाचा गुण । तुज सांगतां विवरोन । श्रवणीं कर्ण वोढवी ॥३६॥

सर्व सर्पांपरीस थोर । विशाळ शरीर अजगर । चपळगती नोव्हे निर्धार । चाले स्थिर मंद बहु ॥३७॥

नाना उपाधीपाठीं कडाडी । पुढेंही पातळी आडमोडी । पैरी कदा तो न हाडबडी । मनीं गडबडी करीना ॥३८॥

जैं कोणी तया डंवचिलें । कीं पायरें करोनि ताडिलें । यद्यपि पुच्छ धरोनि वोढिलें । परी तो न हाले चपळत्वें ॥३९॥

नाम तयाचें अजगर । सर्व योगें असे तो धीर । ठायींच करी वायो आहार । प्रयत्न व्यापार न करी तो ॥४०॥

आणीक एक तयाची वृत्ती । वृत्ति सदैव तया अयाचिती । सन्मुख जवळी पदार्थ येती । तेचि सेविती आनंदे ॥४१॥

नाहीं विवंचनेतें करणें । सव्य अपसव्य दूरीं न धांवणें । कदा कवण्यापाशीं न मागणें । ठायींच सेवणें आली वस्तू ॥४२॥

तो सर्वस्वें उद्योगरहित । न करीच कांहीं यातायात । देहीं असे चिंतारहित । त्यासी विश्वनाथ पुरविता ॥४३॥

प्रयत्न कांहीं न करितां । बैसलिया ठायीं पदार्था । ते सेवोनि होय सुख मानिता । म्हणोनी असक्तता त्या शोभे ॥४४॥

एवं ऐसिया गुणासी । माते म्यां अंगीकारिलें निश्चयेंसी । कासया चिंता व्हावी मानसीं । पाळिता सर्वांसी जगदीश्वर ॥४५॥

तळमळ न करावी अणुमात्र । दृढ विवेकें असावा विचार । सैराट न जाऊं द्यावा इंद्रियव्यापार । मर्यादा थोर पाहिजे ॥४६॥

यासाठीं म्यां माते । गुरु केलें सागरातें । स्वीकारिलें त्याच्या गुणवर्मातें । तेंहि तूतें सांगतों ॥४७॥

शत योजनें विस्तीर्ण । खोली त्याची अत्यंत गहन । उंची भेदिता दिसे गगन । जीवही दारुण जया पोटीं ॥४८॥

नाना रत्नें पोटीं निपजती । अगणित माजी असे संपत्ती । नामें उदंड तया असती । तीरें शोभतीं अनुपम्य ॥४९॥

प्रवाहाचा अमोघ खल्लाळ । गर्जना घोष महाप्रबळ । लाटा उसळती जैसे अचळ । पाहतां नेत्रकमळ चाकाटती ॥५०॥

नाना बेटें गर्भीं थोर । नाना जाति विशाळ तरुवर । स्थळोस्थळीं शोभलें बंदर । किराणें अपार वेव्हारिया ॥५१॥

तिरी पसरली मर्यांद वेली । लवलवीत पर्णें विराजलीं । ते सागरें मर्यांदा पाळिली । नाहीं उल्लंघिली अद्यापि ॥५२॥

पाहतां त्याचिया बळासी । क्षणें बुडवील पृथ्वीसी । सामर्थ्य असोनि मर्यांदेसी । न करी उल्लंघनेसी वेलीतें ॥५३॥

आपुले पात्राचे आंत । पूर्णपणें असंभाव्य वाहत । करोनि गर्जना लाटा सांडित । अचळवत स्वठायीं ॥५४॥

विशेष उदकाची निर्मळता । गढळू नेणेंचि कांहीं पडतां । सदा जीवनीं स्वच्छता । देहीं विमळता पाटव्य ॥५५॥

स्वदेहीं सदा आनंदघन । अणुमात्र नोव्हेंचि उद्विग्न । सदा सौभाग्यसंपन्न । औदार्यगुण विशेष ॥५६॥

करी जीवांचें पालन । मेघा उदक दे जीवालागोन । सदय उदार परिपूर्ण । नोव्हे अकिंचन कदा काळीं ॥५७॥

नित्य जाळीतसे वडवानळ । परी दुःख नमानीच अळुमाळ । राहावया उदरीं दिधलें स्थळ । सदय कृपाळ सागर हा ॥५८॥

एवं गुण यां उदधीसी । ते अवश्य पाहिजेत योगियासी । अंगीकारोनी निवेदी तुजसी । ऐसेंच यदूसी बिंबविलें ॥५९॥

त्यागीं पतंग घेतला । तोहि गुण पाहिजे निवेदिला । याविषयीं कथितों वहिला । सावध ऐकिला पाहिजे ॥६०॥

पुरुष स्त्रियेच्या रुपा भुलोनी । विषयासक्त झाला मनीं । दिनरात्र न सोडी कामिनी । गेला चेवोनी विषयांत ॥६१॥

उत्तम रुपी ज्या स्त्रिया असती । त्यांतें कामदृष्टीं न्याहाळिती । भोगालागीं सर्वस्व वोपिती । अंकित होती श्वानापरी ॥६२॥

कामे गंधर्व माजला अपार । खाय गर्दभीचे लत्ताप्रहार । परी वीट न मानी अणुभर । गोड फार देहीं मानी ॥६३॥

देह पावावया ये पतन । तरी न सोडी विषयाची अंगवण । स्त्रीरुपीं गेला भुलोन । राहिली जडोन वासना ते ॥६४॥

मग तो होय गा पतंग । दीपरुपा ओढवी अंग । झडपोनि करुं पाहतां संग । विषयीं दंग मन ज्याचें ॥६५॥

तो संगेचि पावे मरण । पाद पक्ष जाती जळोन । हें प्रत्यक्ष दृष्टी देखोन । दुजा धावोन उडी घाली ॥६६॥

ऐसे एकामागें एक मरती । परी विंषयसुख न सोडिती । अनिवार विषयाची भ्रांती । फेरी फिरती गर्भवासी ॥६७॥

आतां स्त्रियेचें कारण । तेंही सांगतों निवडोन । धनविषयीं होवोनि मोहित मन । करिती सेवन पर ठायां ॥६८॥

रुप वित्तातें भुलती । कळे त्याचा संग करिती । त्या ऊर्वशी जगीं होती । किंवा गति पतंगापरी ॥६९॥

पाप नानापरी करणें कुडें । त्या पापें पापची जोडे । जन्ममरणाचे पायीं खोडे । घालोनि वेडे वावरती ॥१७०॥

किंवा कामलोभें करोन । करी भ्रताराचें वरिवरी सेवन । भ्रतार जात देह त्यागून । मनीं उबगोन निघे सती ॥७१॥

मागें दुखवितील स्वजन । त्रासें त्रासवितील मजलागून । मरण्यापरी तें भोगावें हीन । यासाठीं मरण हेंचि बरें ॥७२॥

मी सवें सती जातां । तरी मागें उरेल लौकिकता । आणि हाचि पति पावेन मागुता । राहोनि सत्ता न चाले ॥७३॥

पतिव्रता जाती पतिसवें । हे वृद्धाचार असती बरवे । आतां निश्चयेंसी अंगीकारावें । सवें जावें पतीच्या ॥७४॥

न होता सतीपणाची वृत्ति । पतिसवें घालोनि घेती । अग्नि दाहितां तरफडती । रिपुत्व मानिती अग्नीसी ॥७५॥

त्या वैरदोषें करोनी । पतंगासवें पतंगी होवोनी । भ्रमतां दीपातें देखोनी । क्रोधें मनीं खवळे ती ॥७६॥

येणें जाळिला माझा भ्रतार । मम शरीरीं दाहो केला थोर । तरी आतां ग्रासीन या सत्वर । पक्ष प्रहार मारोनी ॥७७॥

तैं ते दीपातें झडपितां । जळोनी जाय मृत्युपंथा । केवढी म्हणावी मूर्खता । विषयीं घाता पावती ॥७८॥

अनिवार हा पंचशर । येणें बहुतांसी केलें जर्जर । याचेनि संगे घात थोर । भोगणें अघोर नरकातें ॥७९॥

या पतंगातें पाहोन । भयें चिळसावलें माझें मन । त्यागार्थ घेतला हा गुण । विषयभान निर्दाळिलें ॥१८०॥

माते या संसारीं । विषयीं न गुंतावें निर्धारीं । हें मायिक क्षणभरी । असक्त अंतरीं असावें ॥८१॥

एवं अक्रां गुरुंचें लक्षण । हें चोविसांतील सांगितलें निवडून । उरलें तेरांचें विवरण । तेही निवेदीन तुज माते ॥८२॥

या व्यतिरिक्त आठ गुरु । तो आदौ निवेदिला विचारु । अनेक बहुधा असती गुरु । परी सारासारु बोलिलों ॥८३॥

हें गुरुमाहात्म्य विख्यात । जे आदरें गा श्रवण करीत । विवेकें स्वीकारोनि रमत । तेचि पावत मुक्तदशा ॥८४॥

हेंचि श्रीकृष्ण उद्धवाप्रति । निवेदिता झाला भागवतीं । तें शुकमुखें परीक्षिती । श्रवण प्रीतीं करीतसे ॥८५॥

हें सुतमुखें करोनी । ऋषि परिसिती नैमिषारण्यीं । तेचि कथा श्रोतियांलागोनी । निवेदी विनवोनी अनंतसुत ॥८६॥

हे दत्त प्रासादिक वाणी । ज्याचा तोचि बोलविता धणी । हीं कर्णभूषणें संतालागोनी । ठेविलीं घडवोनी अवधूतें ॥८७॥

दत्त योगी दिगंबर । जो अविनाश परब्रह्म साचार । त्याचे आवडते प्रियकर । भाविक योगेश्वर संत साधु ॥८८॥

त्यांसी द्यावया दर्शन । शरणागता करावया पावन । दीनबंधु जगज्जीवन । उभा प्रगटोन पंढरीये ॥८९॥

कर ठेवोनि कटीवर । शोभविलें चंद्रभागातीर । उभा समपदीं विटेवर । जो का माहेर सर्वांचे ॥१९०॥

तो कृपादृष्टीं करुन । न्याहाळी अवघे भक्तजन । येत्या जना दे अलिंगन । वारी शीण तयांचा ॥९१॥

तया भाविकांची आवडी । सप्रेम कीर्तनीं बहुत गोडी । हांकेसरशी घाली उडी । संत परवडीं नाचतां ॥९२॥

संत कीर्तनीं देखोनि आनंद । तेथेंचि प्रगटे ब्रह्मानंद । सकळ आनंदाचा कंद । पुरवी छंद भक्तांचे ॥९३॥

भक्त तेचि साधुसंत । संत तेथेंच अनंत । अनंत तेथेंचि गुरुदत्त । त्या पदीं सुत प्रेमभावें ॥९४॥

भावेंचि विनवी तो सज्जना । गोड असे पुढील रचना । दत्त मातेसी करी सूचना । सावध श्रवणा राहिजे ॥९५॥

श्रवणांतीं कीजे मनन । मननीं निजध्यास करावा पूर्ण । ध्यास बाणतां तद्रूपपण । साक्षात्कार येऊन ठाके पुढें ॥९६॥

तया दर्शनातें पावतां । परमानंद उपजे चित्ता । सुख सदैव संतोषता । होय लाभता लाभ बहु ॥९७॥

दायक दाता लाभासी । होय सद्गुरु हा अविनशी । अनन्य होवोनि त्या चरणांसी । कृपादानासी मागावें ॥९८॥

मागावें भातुकें आवडीचें । हेचि हेतु असती मनींचे । म्हणोनि पाय धरावे संतांचे । आश्रय आणिकांचे सोडोनि ॥९९॥

सोडोनिया कुभावना । विनट व्हावें संतचरणां । ते सदयत्वें देती वरदाना । बहु करुणा अंतरीं त्या ॥२००॥

त्यांची सकुमार पाउलें । अनंतसुतें प्रेमें वंदिलें । संतसेवनीं मन रंगलें । जेंवी लुब्धले भ्रमर सुमनीं ॥२०१॥

मनीं धरोनिया आस । झालों संतपदाचा दास । ते मज न करिती उदास । अभयवरदास देती सुखें ॥२०२॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । भाविक परिसोत श्रोतेसंत । अष्टदशोध्यायार्थ गोड हा ॥२०३॥

॥ इति अष्टदशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय एकोणीसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ।

ॐ नमो सद्‌गुरु सर्वात्मका । गुणसिंधो कर्ममोचका । ज्ञानबोधा तिमिरछेदका । दीनपालका पावना ॥१॥

जय भवाब्धितारका करुणाकरा । जय निर्विकल्पा दुरितसंहारा । जय अनादिव्यापका जगदोद्धारा । जय परात्परा नमो तुज ॥२॥

जय सदय उदारा सच्चिद्धना । जय षड्गुणऐश्वर्यसंपन्ना । जय मायातीता निरंजना । जयजय सुखघना नमो तुज ॥३॥

ज्ञानबुद्धिविवेकदाता । तूंचि होसी गा सत्य समर्था । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । कृपावंता शरणागते ॥४॥

मी हीन दीन मतिमंद अज्ञान । परी तव पदीं अनन्य शरण । मम अंतरींचें वर्म लक्षोन । कीजे पावन स्वामिया ॥५॥

गत कथाध्यायीं अनसूयेसी । गुरुगुणग्राह्य तूं निवेदिसी । ते परिसोनि श्रोतियांसी । उल्हास मानसीं श्रवणार्थी ॥६॥

उरले तेरा गुरुंचें लक्षण । तें करावया आदरें श्रवण । वेधलें श्रोते सज्जनांचें मन । तोषवा वदवून गुरुराया ॥७॥

धन्य गुरुगुणाची ख्याति । श्रवणेंचि दिव्य होय मति । विवेकें आकळितां नुरवी भ्रांति । पावे शांति तव कृपें ॥८॥

हे सद्‌गुरु दत्त दयानिधी । अज्ञानतिमिर बोधें छेदी । कल्पविकल्पाची नुरवी उपाधी । ज्ञान प्रबोधी आपुलें ॥९॥

श्रवणीं वाट पाहे माउली । तेवींच श्रोतियांची मंडळी । चंद्रचकोर न्याय वेधली । याची आळी पुरविजे ॥१०॥

अनाथ दीनांचा कैवारी । होसी हीन पामरांचा साहाय्यकारी । पुरवी हेतू असती जे अंतरीं । आळस न करीं दयानिधे ॥११॥

तूंचि होवोनि कृपावंत । वदविलें अष्टदशाध्यायपर्यंत । येथोनि वदविता कथामृत । तूंची समर्थ दातारा ॥१२॥

परिसोनि बाळकाची आळ । पुरवी माऊली स्नेहाळ । तेवीं दत्त तूं होसी कृपाळ । कथा रसाळ चालवी ॥१३॥

अविनाश विनवी अनसूयेसी । तुज निरोपितों शेष कथेसी । सावध होवोनिया मानसीं । भूषण श्रवणासी वाणवी ॥१४॥

म्यां गुरु केला मधुकर । त्याचे सांगतों गुणप्रकार । वनोपवनीं करोनि संचार । तुरंबी सार पुष्परसा ॥१५॥

नाना परी पुष्पजाती । भ्रमर मकरंदा तुरंबिती । कुचंबूं अणुमात्र न देती । स्वच्छंदें भ्रमती ठाव नाना ॥१६॥

रसस्वादातें सेवोन । गुंजार घालती प्रेमें करुन । न राहती एके ठायीं भ्रमोन । असक्तपण वावरता ॥१७॥

हा उत्तम पुष्पकल्हार । वायांचि पुष्पीं नटले येर । हे न जाणोनि विचार । मकरंदें सार सेविती ॥१८॥

न जाणेचि तो वृक्षयाती । तया मकरंदींच लोभप्रीती । स्वाद आशा धरोनि चित्तीं । आनंदें क्रीडती अभेदत्वें ॥१९॥

या भ्रमराचे सेवोनि गुण । मीही माते करितों भ्रमण । एक ठाव नावडे मजलागोन । भिक्षाटन अवलंबी ॥२०॥।

नाना पुष्पांचे जेवीं मकरंद । तेवींच मज भिक्षेचे स्वाद । तया प्रेम मज अल्हाद । वर्ततों अभेद या जगीं ॥२१॥

आतां मक्षिकेचा गुण अनुवादूं । तयाचाही असे द्विधा भेदू । वन ग्रामवासी प्रसिद्धू । एक संबंधू असेना ॥२२॥

पृथग्भागें तयाचा गुण । तो तुज मी करितो निरोपण । मधुमक्षिकेचें लक्षण । सावधान परिसिजे ॥२३॥

नाना तरुवर सानथोर । याति वर्णभेदं असती अपार । तेथें मक्षिका करोनि संचार । रससार सेवीतसे ॥२४॥

मुखीं रस सांठवोनी । स्वमंदिरीं ठेवी नेवोनी । असंख्य मक्षिका एका स्थानीं । जमविती राहोनि मोहोळातें ॥२५।

अति विशाळ करिती मोहोळ । वंशवृद्धिस्तव केलें स्थळ । त्यामाजी भरिती रस रसाळ । मधु निर्मळ त्या म्हणती ॥२६॥

करिती त्याचे दृढ रक्षण । उपसर्ग लागतां वेंचिती प्राण । दंश तडतडा तोंडोन । भंवर घालोन झडपिति ॥२७॥

आशा लोभें गुंतोन । कित्येक पावती घातें मरण । सदयत्वें न करितीं दान । वृत्ति अकिंचन तयांची ॥२८॥

परी एक तयांचें दृढ व्रत । अन्य पदार्थालागीं नातळत । वृक्षरसातें प्रीतीं सेवीत। संग्रह करीत सहजत्वें ॥२९॥

प्रयत्नें आणिला तो रस । सकळही मानिती त्या सुरस । सेवितां करी तो पुष्टीस । आणी औषधीस कामा ये ॥३०॥

तया मक्षिकेचा मळ जाण । तें सौभाग्यतळवटीचें लेण । अन्य युक्ती नाना कारण । चतुर विचक्षण योजिती ॥३१॥

आतां ग्रामवासी मक्षिका । याचे गुण तेही ऐका । अभेदत्वें विचरे देखा । पाकाअपाका नेणेती ॥३२॥

पक्व अपक्व दिव्य अन्न । कीं नाना परी जालें वमन । कीं गलिच्छ नर्क दुर्गंधी दारुण । सेवी समान सारखें ॥३३॥

हें दिव्य पाटव्य सोवळें । कीं हें अमंगळ असें ओंवळें । हें नेणेंचि कदा काळे । सदा रुळें सर्वांवरी ॥३४॥

हें वंद्य म्हणोनी वंदावें । कीं हें निंद्य म्हणोनी त्यजावें । हें मक्षिकेच्या समुदावें । कदा ओळखावें घडेना ॥३५॥

नर्क आणि शर्करेसी । स्वादिष्ट आणी कटूसी । रसी नेणेचि विरसी । समान सरिसी सेवनीं ॥३६॥

नाहीं आश्रमाची चाड । प्राप्त रस जाला तोचि गोड । नाही संग्रहाची कदा आवड । झाडोनी पंखाड मोकळी ॥३७॥

इच्छें ऐसें दिवा फिरावें चंचलपणेंची बावरावें । भलत्या आश्रयें रजनीं बसावें । काळ सोसावें प्रासंगिक ॥३८॥

माते हे गुण योगियांसी । असत्य पाहिजे निश्चयेसीं । म्हणोनी ग्राह्य करोनिया गुणासी । असक्त मानसीं वर्ततों ॥३९॥

त्वांही प्रपंची राहून । वर्तावें अंगीकारोनि हे गुण । लोभ आशेचें व्यवधान । तोडी बंधन मोहपाश ॥४०॥

निर्मोह निरहंकार । निर्लोभ आणि निर्विकार । निर्द्वंद्व अभेद निर्मत्सर । नैराश्य प्रकार योगियांचा ॥४१॥

येच पदीं करितां वास । मग तूं सहज होसी निर्दोष । जंव जंव अंगीकारीसील गुणास । तंव तंव गुणास पावसी ॥४२॥

म्हणसलि हे गुण लाधतां । देहीं पावेल सत्य समता । परी जनउपाधीची वार्ता । तेणें क्षोभता उपजवी ॥४३॥

त्याक्षोभें क्षोभेल मन । संग्रहिलें जाय विटाळोन । यदर्थीं मातें म्यां विवेकें करुन । करी पाहून गुरु केला ॥४४॥

त्याचिया गुणाचा विचार । तो तुज मी सांगतों सविस्तर । उन्मत्तता अंगीं दुर्धर । सान थोर न मनीं तो ॥४५॥

सदा पाहे तो खालतीं । चालण्याची चपळ गती । सरळ पंथें पवनाकृति । वारण म्हणती त्या नांव ॥४६॥

नीट मार्गीं चालतां । न जायची वांकुडया पंथा । श्वानें नाना परी भुंकतां । नाणी चित्ता खेद कांहीं ॥४७॥

सहस्त्रावधी भुंकती श्वान । परी आपुलें विटाळों नेदी मन । धीर उन्मतमदें करुन । राहे झुलोन उभ्या ठायीं ॥४८॥

चरणींचे उचलोनि रज । शुंडेनें मस्तकीं टाकी सहज । वर्म दाखवीतसे गुज । येणें काज सर्व घडे ॥४९॥

श्वानापरिचे उपसर्ग । लावितील पिसून आप्तवर्ग । यालागीं शोधोनि केला संग । गुणी हा नग घेतला ॥५०॥

आणीक बुद्धि या गजाची । खूण दाविली या रजाची । निरभिमान वंदनें सर्वांची । कवचें अहंतेचीं गळती येणें ॥५१॥

आपुले स्वात्महितीं जो बोध । निज स्वरुपींचा जो ऐक्य छंद । सर्व भूतींचा विरतां भद । मग ब्रह्मानंद योगिया ॥५२॥

ब्रह्मैवाहं सर्व देहीं । द्वैत कोठेंचि उरलें नाहीं । त्या मदोन्मत्तें झुलावें ठायीं । हें वर्म पाही गोमटें ॥५३॥

परिसिजे अनसूये माते । मृगगुण आतां निवेदितों तूतें । परम भीति त्या जीवातें । मारकातें लक्षीत ॥५४॥

जीवलोभाची धुकधुक । भोंवतें पाहे सदा टकमक । किंचित दिसतां झकमक । मारी फेंक उड्डाणीं ॥५५॥

एका जीवाचिया भेणें । एकामागें एक पळणें । उडया मारितां दिशा अटणें । देहीं चमकणें क्षणक्षणां ॥५६॥

व्याधकाळ हा त्वरें येईल । केधवां फांसा घालोनि मारील । मागुता जन्म हा न पावेल । म्हणोनि पळ काढिती ॥५७॥

तेवींच काळाची भीती । जीवामागें आहे निश्चिती । यालागी जागोनि दिनरातीं । नं पावे हातीं ऐसें कीजे ॥५८॥

ऐसीं हीं मगें सावधान । परी वाद्यनादा गेलिं भुलोन । शिकाऱ्या हरितवर्ण देखोन । मानोनि तृण ठेलीं उभीं ॥५९॥

मृगें भुलतां तये काळीं । व्याधें गुंतविलें पाशजाळीं । कोण सोडविता तये वेळीं । जीव आरंबळी दैन्यवाणा ॥६०॥

आणिक एक ऐंकिजे वार्ता । वनीं मृगांचे भार फिरतां । तृषा लागे चरतां चरतां । शोष पडतां होय कंठीं ॥६१॥

शोषें करिती अवलोकन । तंव दूरी देखिलें विस्तीर्ण जीवन। मग उड्डाणावरी उड्डाण । घेती संपूर्ण त्यामार्गें ॥६२॥

धांवतां बहु मृगें शिणती । परि तें जीवन नलगेचि हातीं । ठायीं ठायीं सरोवरें दिसती । सरिता वाहती सोज्वळ ॥६३॥

फिरतां पाही श्रम पावले । तीर कोठेंचि नाढळे । धांवतां पुढेंचि ते गेले । तृषें वेधले न फिरती ॥६४॥

हें मृगजळ न कळे त्यांसी । तेवींच भ्रम झाला या जीवासी । भुलोनि मायामृग जळासी । सावध मानसीं न होती ॥६५॥

माते त्वां तरी सावध व्हावें । मायामृगजळीं न बुडावें । स्वहित आपुलें ओळखावें । शरण जावें गुरुवर्या ॥६६॥

ते करिती मायातीत । उडवितील अवघी भवभ्रांत । तळमळ वारोनि करितील शांत । अवघे आघात चुकवोनी ॥६७॥

सद्‍गुरुचरणीं होतां दासी । मग नेतील ते आत्मपदासी । कधीं न ठेवितील तुज उदासी । भावें त्यापदासी विनट तूं ॥६८॥

सद्‍गुरुपदा व्हावें लीन । म्हणोनि गुरु केला म्यां मीन । तो न सोडी जेवीं जीवन । सांडितां प्राण जाऊं पाहे ॥६९॥

मीनाचें जीवन उदक । तैसा सद्गुरु जीवा तारक । अनन्य जीवनीं मत्स्य देख । जडतां सुख पदीं तैसें ॥७०॥

पडतां पदासी अंतरता । मीनाऐसा होय घाबरता । तरीच त्यातें श्लाघ्यता । पावे सकृपता गुरुची तो ॥७१॥

आणिक एक कारण । सांगतो मीनाचें लक्षण । आमिषीं लुब्धतांची मन । पावे मरण गळयोगें ॥७२॥

धीवरें आमिष लावोनि गळा । उदकीं फेंकोनिया दिला । मीन ग्रासी तया डंडिला । गिळितां वेढिला त्या नष्टें ॥७३॥

गिळितां कांटा झोंबला जिव्हारीं । आसंडोनी फेंकिला तेणें वरी । मीन आदळला जीवनाबाहेरी । जाळ्यांतरी टाकिला ॥७४॥

एवं धीवरें घेतला प्राण । तेवीच व्यथा जीवालागोन । कनक आणि कामिन । लोभ दारुण पीडक ॥७५॥

हे माया मोह दुस्तर जीवन । जीव यांतील असती मीन । यांसी टपतसे रात्रंदिन । धीवर पूर्ण काळ हा ॥७६॥

पसरलें मायेचें जाळ विषयलोभाचा सिद्ध गळ । धनकामिनीचें आमिष प्रबळ । स्वीकारितां वेळ न टळे ती ॥७७॥

जीवा जिव्हारीं झोंबतां गळ । करुं लागले तेव्हां तळमळ । सोडवीना कोण्ही बहु व्याकुळ । धीवर खळ काळ ओढी ॥७८॥

जीवा जीवनाबाहेर काढिलें । ग्रंथी बांधोनि स्वपदा नेलें । कायाविटंबनीं मसाले । घालोनि पचविलें नाना रीतीं ॥७९॥

या दुःखातें भिऊन । माते मी झालों सावधान । प्रथम अन्वयाचा घेवोनि गुण

। तूतें निरोपण स्वहितार्थ ॥८०॥

मुख्य धनकामादि विषय । लोभमोहो करी अपाय । या निवारणाचा उपाय । कोण होय धुंडिला ॥८१॥

मातें मी अवनीं फिरतां । विदेहनगरा गेलों अवचितां । तेथें चमत्कार देखिला पाहतां । तो तुज आतां निवेदितों ॥८२॥

पिंगळानामें वेश्या जाण । सदा विषयव्यवहारीं तिचें कारण । भ्रतार पाहतां जिला धन । पुरुष भोगून संग्रही ॥८३॥

नित्य नूतन शृंगार । नूतनचि परिधान करी अंबर । नाना दीप्ति लागोनि अलंकार । उभी समोर मार्ग लक्षी ॥८४॥

दासी भोवत्या परिचारिका । मध्यें सुंदर चंपककळिका । क्षणक्षणां देती तांबूल निका । पात्रपिका सरसाविती ॥८५॥

प्रीतीं धनवंतातेच पालवी । विनोदें करोनि त्यातें बोलवी । संकेतें नेत्रातें हालवी । पुरुषा भुलवी क्षणमात्रें ॥८६॥

तयालागीं तोषवोन । करी द्रव्यमदाचें हरण । ऐसे लोटले बहुत दिन । अमित धन मेळविले ॥८७॥

परी आशालोभें ती चेवली । तृप्ति नोव्हेचि कदा काळीं । कधीं नोव्हेचि नेम टाळी । पुरवी आळी भलवेळे ॥८८॥

ऐसें असतां एके दिवसीं । श्रृंगारयुक्त बैसली ओटीसी । खुणावा पालवी बहुतांसी । तंव कोण्ही तिसी बोलेचिना ॥८९॥

दिवस गेला चार प्रहर । पुरुषीं विनोद न घडे अणुमात्र । क्षीण झालीं सर्व गात्र । म्लान वक्त्र पैं झालें ॥९०॥

मागुतीं धरुनिया धीर । सांवरिती झाली श्रृंगार । अद्यापि जाणें दोन प्रहर । प्राणेश्वर येतील ॥९१॥

परिचारिकेस बोले गुज । जा गे त्वरें करा सेज । नित्याहोनी अधिक आज । दिव्य सतेज मनोहर ॥९२॥

आज्ञेसरिस्या दासी जाती । रमणीक मंदिर दिव्य सजविती । छतें झालरा काच लाविती । सेज रचिती सुमनांची ॥९३॥

सुगंधिक दीप सरसाविले । दीप मणी छतीं योजिले । परिमळादि द्रव्य ठेविलें । हार गुंफिले सुमनांचे ॥९४॥

तांबूल ठेविलें त्रयोदशगुणी । फळें मेवापात्रीं भरोनी । गंगोदक झारीं ठेवी आणोनी । पीकपात्र धुवोनी ठेविती ॥९५॥

नाना परिंचे श्रृंगार । वस्त्रें भूषणे अलंकार । तबकीं भरोनी सुंदर । काच समोर पहावया ॥९६॥

चौपाळा सजविला पर्यंक । कौतुक खेळ ठेविले अनेंक । विषयीजना उपजे सुख । ऐसे अलोलिक सिद्ध केलें ॥९७॥

तळवटीं मांडिले चौरंग । द्यावया सन्मानीक उपभोग । बारीमाजी बैठका चांग । पाहतां दंग होय विषयी ॥९८॥

यापरी सर्व सेज सिद्ध केली । पिंगळेलागीं कळविली । येरी पाहतां सांजवेळ टळली । कोण्ही न पावली विषयमूर्ति ॥९९॥

मग उठोनी गोपुरीं जाये । सेजसमारंभ सर्व पाहे । प्रथम लेणें त्यजोनि लवलाहें । नूतन होये स्वीकारिती ॥१००॥

नेसोनिया कनकांबर । जडित घातले अलंकार । चंदन चर्चोनी अंतर । स्वीकारी हार पुष्पांचे ॥१॥

नेत्रीं सूदले अंजन । काची मुख करी अवलोकन । कुरळ बरवे सांवरोन । तांबूलचर्वण पैं केलें ॥२॥

अत्यंत शोभवोनि रुपासी । पाहतां काम भरला मानसीं । बारीं बैसोनि पुरुषांसी । न्याहाळोनि त्यासी पाचारी ॥३॥

पिंगळेसी लागलें विषयवेडें । कोण्ही पुरुष न पाहे तिजकडे । रजनीं घडिघडीं त्वरें वाडें । कोण्ही न भिडे तियेसी ॥४॥

ताल वाद्य सुरसंगीत । पिंगळा आरंभी रागगीत । कंठ कोयळस्वरकंपित । रसयुक्त आलाफ करी ॥५॥

पिंगळेचे ऐकतां गायन । मृग उरग जाले तल्लीन । मोहो पावलें गंधर्वमन । अप्सराहीन सलज्ज ॥६॥

पिंगळच्या अर्थ मनी । कामुक येईल गायना भुलोनी । विचित्र प्रारब्धाची करणी । पुरुष कोण्ही नयेची ॥७॥

तंव किंचित वाद्यें राहवितां । गजर जाली कानीं ऐकता । सखेद होवोनि परम चित्ता । मुखीं ग्लानता पावली ॥८॥

विषयज्वर चढला अंगीं । जावोनि पहुडली पलंगीं । परी ती सेज जैसी आगी । चित्त भोगीं वीटलें ॥९॥

तोडोनि टाकिले कंठिंचे हार । फेंकोनि दिधले अलंकार । फरफरां फेडोनिया चीर । टाकीं दूर क्रोधभरें ॥११०॥

गडबडा लोळे धरणीवरी । शोक करीतसे आक्रोश वरी । सखी धांवोनि तिसी आंबरी । परी ते दुरी झिडकावी ॥११॥

श्वास उश्वास टाकोन । परम धिःकारी आपणा आपण । म्हणे हें केवढें मूर्खपण । विषयीं भुलून गेलें मी ॥१२॥

किंचित विषयसुखासाठी । सोसिली दिनरजनीं आटाटी । काय उपयोगा येई शेवटीं । माया खोटी कळली मज ॥१३॥

नको नको हा दुष्ट विषय । येथें लोभ अशा तोचि अपाय । भुलवोनि हरपाविती सोय । नागवण होय सत्य येणें ॥१४॥

जळो जळो हा विषय काम । महा दुरत्यय घातक घाली भ्रमाविष ते सुखवत मानी उत्तम । घडवी अधर्म पापाचळ ॥१५॥

मूळ विटाळाचें शरीर । मळमूत्रें भरित संभार । त्यामाजी पावलें पापघर । कर्म अघोर विषयार्थीं ॥१६॥

नित्त विषयीं ठेवोनिया भान । कायाविक्रयें मेळविलें धन । जोड जोडिली पापाचरण । अविचार पूर्ण घडला कीं ॥१७॥

विषयभरें मी उन्मादलें । भक्ष्य अभक्ष्यादि भक्षिलें । गमन अगमनादि घडलें । नाहीं विचारिलें पात्रापात्र ॥१८॥

ऐसी मी हे दुष्ट मलिन । विषयभोग राहिलें भोगोन । परी न विचारिला परिणाम कोण । व्यर्थ जन्मोन नाडलें ॥१९॥

अहा हे देखोनि पापाचळ । अंतीं येईल यमराजाचें मूळ । शिक्षा करितील तीव्र प्रबळ । प्राण व्याकूळ होतील कीं ॥१२०॥

नानापरी शासतील कठिण । अघोर नरकीं बुडवितील नेवोन । तिरस्कारें घाबरतां प्राण । सोडवील कोण तें ठायीं ॥२१॥

आयुष्य विषयामाजी आटिलें । स्वहित कांहींच नाहीं केलें । वायांचि व्यर्थ वय गेलें । उपेगा न आलें या कुसंगे ॥२२॥

नाहीं केलें देवार्चन । नाहीं पूजिले म्यां सज्जन । नाहीं केलें धर्म दान । पाप दारुण आचरलें ॥२३॥

भोगोनि देहीं पाप विपत्ती । बळें जोडिली धनसंपत्ती । काय कामा येईल अंतीं । बरवी गति न दिसे मज ॥२४॥

आग लागो या संपत्तिधना । जळो जळो ही विषयवासना । होऊं पातली विटंबना । कोण कारणा योजूं यातें ॥२५॥

अवधूत म्हणे अनुसूयेतें । पिंगळा विटली विषयातें । मग पावोनि विरक्तीतें । उबगली चित्तें धनविषया ॥२६॥

सोडोनि लोभमोहो आशेसी । लुटविलें सर्व संपत्तीसी । निराश होवोनि मानसीं । बाणवी जीवासी विवेक ॥२७॥

विवेकें करितसे विचार । नश्वर देहो हा साचार । नाशिवंत अवघा प्रकार । कायसा बडिवार याचा आतां ॥२८॥

मिथ्या जाणोनि केला कोप । जीवीं विटोनी वरिला संताप । संताप नोव्हे अनुताप । होता पाप जळालें ॥२९॥

कर्म अकर्मा जाळिलें । तें भस्म अंगी चर्चिलें । वैराग्य चित्तीं बाणलें । मूळ शोधिलें तरावया ॥१३०॥

विवेके करोनी मंथन । नवनीत काढिलें शोधोन । म्हणे सकळांतर व्यापक नारायण । त्यासी शरण जातां भलें ॥३१॥

मग पिंगळा श्रीहरीसी । शरण गेली अनन्येंसी । तिची भक्ति देखोनि हृषिकेशी । नेली स्वपदासी उद्धरोनी ॥३२॥

ते म्यां गुरुगुणार्थ मानिली । विषयत्यागार्थ स्वीकारिली । नैराश्य पाहोनि विरक्ती बाणली । म्हणोनि संग्रहिली पिंगळागुणी ॥३३॥

जीवीं केथ लोभ वाढे । लोभयोगें अभिमान जोडे । अभिमानार्थ कल्पना चढे । कल्पनीं घडे जन्मपंक्ति ॥३४॥

याचें करावया निरसन । टिटवा गुरु केला जाण । त्याचे तुज सांगतो कथन । करी श्रवण माये तूं ॥३५॥

कोणी एका वनांतरी । टिटवे भ्रमती गगनोदरी । नाना शब्द करिती कुसरी । घालिती भंवरी आहारार्थ ॥३६॥

तंव एक टिटवा भ्रमण करितां । मांसकवळ देखिला अवचितां । तों चंचुबळें जाला उचलिता । सवेंचि उडता पैं होय ॥३७॥

मांसीं जडलीं त्याची प्रीति । घेवोनि जाय गगनपंथी । ते देखोनिया स्वजाति । मागें धांवती मांसलोभें ॥३८॥

बहुत टिटवे मिळोन । झडपिते झाले चहूंकडोन । परी तो न सांडी तयालागून । लोभें रक्षण करी जीवें ॥३९॥

लोभ हा परम अनिवार । उभय पक्षीं केला संचार । टिटवे करिती टिटव्यासी मार । अभिमान थोर माजला ॥१४०॥

सकळ टिटवे मिळोन । घेऊं पाहती त्या टिटव्याचा प्राण । दंशिती चंचुपटे करुन । पादें विदारण करिती काया ॥४१॥

सर्वांपुढें तो एकला । काय करी न चले बळा । लोभें न टाकवें अभिमानगोळा । न कळे कळा कोण हे ॥४२॥

म्हणे ही सर्व माझी याती । कां हो लागलीसे मजभोंवती । काय अपराध केले असती । म्हणोनी छळती मज सर्व ॥४३॥

विवेकें टिटवा करी विचार । कां हो बांधिला यातिनें वैर । पाहतां दोष नसे अणुमात्र । मांस हार माझा हा ॥४४॥

म्यांच पराक्रमें करुन । मांसकवळ आणिला उचलोन । तेथें वाद करावया हे कोण भोगविती शीण भोगिती ॥४५॥

तंव तडतडा टिटवे तोडिती । छेदोनि काया विटंबिती । टाकी आमिष हें वदती । तैं तो चित्तीं समजला ॥४६॥

या आमिषलोभासाठीं । रिपुत्वें लागले माझे पाठीं । भोगविती दुःख कचाटी । प्राण शेवटीं घेतील ॥४७॥

प्राण कायचा करणें नाश । यास निमित्त लोभ आमिष । टाकोनि द्यावें मानोनि त्रास । तरीच सुखास पावेन ॥४८॥

ऐसे विवेकाचेनि बळें । सांडिलें अमिषाचें कवळें । तें पाहोनि फांकले पाळे । जावोनि कोसळले मांसावरी ॥४९॥

आशा लोभ सोडोनि देतां । टिटवा पावला मुक्तता । सुखसंतोषें आसनीं बैसतां । जाला पाहतां चमत्कांर ॥१५०॥

टिटवे पडले मांसावरी । लोभें पेटले महामारी । येरयेरांचे होवोनि वैरी । मरती झुंजारी विषयार्थी ॥५१॥

ज्या टिटव्यानें आमिष त्यागिलें । लोभ आशेतें समूळ सोडिलें । सुखी तो साक्षभूत जालें । हेंचि पावलें गुरुत्व आम्हां ॥५२॥

एवं आशालोभविषय दंडी । कधीं न धरावी हे तोंडी । जीवें भावें करावी सांडी । असक्त परवडीं वर्तावें ॥५३॥

आणिक एक योगासि मारक । मान अपमान असे देख । जगीं थोर ह्या लौलिक । अत्यंत सुख मानती ॥५४॥

जगीं पावतांचि मान । तेणेंचि राहे महत्व मानोन । चढों लागे अभिमान । म्हणे मी धन्य जगीं या ॥५५॥

त्या मानासी व्यत्यय येतां । सहज आली अवमानता । शाहाणाच देहीं पावे खिन्नता । अंगीं रोषता चढे बहु ॥५६॥

त्या रोषें बोले वर्म । काढी उकरोनी गंजीत कर्म । प्रत्युत्तरीं न धरिती शर्म । घडे अधर्म उभयतां ॥५७॥

अधर्मे उपजे संताप । संताप तेथें महापाप । पाप तेथें ज्ञानलोप । आला विक्षेप सत्पदा ॥५८॥

यासाठीं अर्भक । पाहोनी गुरु केलें देख । अंगीकारिले गुण चोख । ते आवश्यक सांगतों ॥५९॥

अर्भक म्हणजे अज्ञानबाळ । क्षुधादुःखेंच करी कोल्हाळ । येऱ्हवीं आनंदे खेळे खेळ । अतिनिश्चळ निजछंदें ॥१६०॥

नाहीं पदार्थाची चाड । न सांगे रुचीचा निवाड । अग्नि दीपावरी घाली झड । आणील फोड कळेना ॥६१॥

सर्प विंचू उंदीर । कुतरे किंवा मांजर । दिसे भलता जो प्रकार । खेळीं कर वोढवी ॥६२॥

धरितां आपणालागीं पीडी । कांहीं कल्पना नुपजेच कुडी । सांपडे पदार्थ घाली तोंडीं । धरितां ओढी भल कांहीं ॥६३॥

कोणी पालखीं घातलें । कोणी भूमीच पहुडविलें । कोणीं अश्वीं बैसविलें । नाहीं विटलें मानसीं ॥६४॥

कोणीं रथावरी घातलें । कोणी शिबिकेमाजी मिरविलें । कोणी गजस्कंधीं वाहिल । नाहीं विटलें मानसीं ॥६५॥

कोणी बिदीमाजी ठेविलें । कोणी उकरडां लोळविलें । कोणीं चौरंगीं लोळविलें । नाहीं विटलें मानसीं ॥६६॥

कोणी आनंदें खेळविती । कोणी झिडकारोनि बोलती । कोणी त्राहाटोनि धमकाविती । परी खेद चित्तीं नये त्या ॥६७॥

कोणी बैसविती अंकावरी । कोणी नेवोनि ठेविती दुरी । कोणी ओढी चरण धरी । खेद अंतरीं नुपजे त्या ॥६८॥

कोणी म्हणती सखया बा रे। एक म्हणती मूर्खा कां रे । एक म्हणती झुडता रे । वेडाविती पोरें हांसे तें ॥६९॥

नाना परी जल्पती त्यासी । परी तें नेणे मानापमानासी । पाहोनि घेतलें त्या वृत्तीसी । निजकार्यासी साधावया ॥१७०॥

निजकार्यातें साधावे । म्हणोनिया गुणा अंगीकरावें । स्वात्मसुख प्राप्त व्हावें । याविषयीं धुंडावे वर्म कांहीं ॥७१॥

तें वर्म पुढीले प्रसंगीं । अवधूत सांगेल अनूसयेलागीं । तया सुखाचा उद्धव विभागी । तो कृष्णरंगीं रंगला ॥७२॥

कृष्ण तोचि दिगंबर । उभा पुंडलिकाचे समोर । क्षेत्रनामें पंढरपुर । वाहे सुंदर चंद्रभागा ॥७३॥

तेथें अविनाश नेमें करोन । नित्य करी तिलकधारण । भाविक अर्थिल्या दरुषण । कृपाधन प्रगट देतो ॥७४॥

प्रगट म्हणतां गुप्तपणा । लागूं पाहे या दूषणा । म्हणोनि करितों प्रार्थना । श्रोतेजनां पूढतीं ॥७५॥

जगदोद्धारास्तव अवतार । अविनाश हा दत्त प्रखर । गुप्त प्रगटाचा विचार । नसे अणुमात्र ते ठायीं ॥७६॥

प्रगटरुपीं तो विलसे । चर्या बालोन्मत्त पिशाच्च असे । रमतो जगीं अनंत वेषें । अज्ञाना दिसे हिरा गार ॥७७॥

पृथ्वीगर्भीं धन असे । अभागी पाहतां कोळसे । भाग्यवंता मांदुसें । अवलोकितां दिसे सहजची ॥७८॥

दर्शनधनाचे भाग्यवंत । ते हे तुम्ही साधुसंत । भक्तिभावा देखोनि दत्त । भेटे साक्षात सकृपें ॥७९॥

दत्त तोचि अनंत । अनंत घटीं व्यापला सत्य । निवासला राहे सर्वात । ओळखा महंत तुम्ही तो ॥१८०॥

तुम्हां असें सलगी त्याची । तुम्हीं पात्रें त्या कृपेचीं । करुणा येऊं द्या अनंतसुताची । सेवा पदाची मागतो ॥८१॥

आपले चरणींचें सेवन । निरंतर द्यावे मजलागून । कधींही न घडावे खंडण । व्हावे उन्मन त्या ठायीं ॥८२॥

सेवेमाजी मज उल्हास । समर्थे पुरवावी हेचि आस । म्हणविजे संतीं आपुला दास । न्यून सेवेस नाणिजे ॥८३॥

इति श्री दत्तप्रबोदह । श्रवणेचि पुरती मनोरथ । सदा परिसोत श्रोतेसंत । नवदशोध्यायार्थं गोड हा ॥१८४॥

॥ इति नवदशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय विसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥

श्रीसद्‍गुरु जगन्निवासा । मायातीता अविनाशा । हे दिगंबरा अनंतवेषा । पुराणपुरुषा तुज नमो ॥१॥

जय मायापुरनिवासिया । विज्ञानरुपा दत्त सदया । हे सर्वसाक्षी गुणालया । तुझिया पायां प्रणम्य ॥२॥

कर्मातीता कर्ममोचका । महामूर्ते तिमिरनाशका । पापदहना मोक्षदायका । भवतारका भाळ पायीं ॥३॥

मागां आपुले कृपें करुन । वदविलें तुझें त्वां गुणकथन । तैसेंचि चालवी निरोपण । जेणें श्रोतेजन संतोषती ॥४॥

श्रोते आर्थिक आणि चतुर । ज्ञाते विचक्षण धुरंधर । सप्रेम भक्तीं रंगले वीर । संधान सुंदर दृढासनीं ॥५॥

हें ग्रंथसरोवरींचे राजहंस । सेऊं इच्छिती अर्थमुक्तांस । निरोपणीं पुरविजे हेतूस । तेणेंचि उल्हास भाविकां ॥६॥

कुटिल भाविकां नावडे ग्रंथ । तयां वायसां नरकींच प्रीत । अमृतफळ होतां प्राप्त । रोग उद्भवत कंठमुखीं ॥७॥

शुंकेंचि सेवावें चूतरसा । तेचि स्वाद जाणती या सुरसा । अगस्ती पुष्पदेठीं झोंबे फारसा । तोही मधुरसा रस सेवी ॥८॥

हे दयानिधे करुणाकरा । तूं जाणसी सर्वांतरा । घालोनि कृपेच्या पांखरा । अंगीकारा शरणागता ॥९॥

श्रोतियां तुझें गोड चरित्र । तेंचि वदवी आतां पवित्र । भुकेलेति त्यांचे श्रवणीं श्रोत्र । लागले नेत्र मुखाकडे ॥१०॥

देखोनि आवडीचा प्रेमा । कृपा उपजली सर्वोत्तमा । आठव देवोनि चालवी क्रमा । माते भ्रमा टाकी म्हणे ॥११॥

गंत कथाध्यायाशेवटीं । म्यां निवेदिली अर्भकराहाटी । ते त्वां साठविली पोटीं । आणिक गोष्टी सांगेन ॥१२॥

अनसूया म्हणे रे कुमारा । अवतार घेतलासी जगदोद्धारा । जो जो सांगसी सुंदरा । तो तो खरा हितार्थ ॥१३॥

बोधप्रद करिसी निरोपण । तें मी ऐकतें सावधान। गोड लागे अमृताहुन । करितें श्रवण सांगे तूं ॥१४॥

पांचा गुरुंचे गुण उरले । कवणे कार्या कैसे घेतले । तें मज पाहिजे त्वां कथिलें । मन अर्थिलें श्रवणार्थी ॥१५॥

परिसोनि मातेच्या उत्तरप्रश्ना । अविनाश म्हणे ही सप्रेम तृष्णा । निरोपणीं पुरवूं कामना । जडली भावना धारणेची ॥१६॥

माते चोविसांतील एकोणीस । गुरुगुण सांगितलें म्यां तुम्हांस । मानोनि घेतले देहबुद्धीस । उपयोगी योगास म्हणोनी ॥१७॥

हें विवेकें घ्यावें बाणवून । करावा योग परिपक्व पूर्ण । परी अनेक दृश्य व्यवधान । न घडे कारण या गुणें ॥१८॥

गुरु धुंडिता म्यां यासाठीं । तंव कुमारी पाहिली एक दृष्टीं । तिचीं देखोनि म्यां राहाटीं । गुण पोटीं सांठविले ॥१९॥

त्या कुमारीचें लक्षण । तुज मी सांगतो सावधान । द्विजयाति परम पावन । कुळनिधान कुमारी ते ॥२०॥

अत्यंत उपवर ती कन्या । चतुर गुणे रुपलावण्या । एका उणें ती अमान्या । संकल्प अन्य न पाहे ॥२१॥

तीतें ठेवोनिया सदनीं । मातापिता गेले दूर स्थानीं । जातां सांगती कुमारीलागुनी । आतिथ्य जनीं करावें ॥२२॥

निवेदोनि गेले कार्यासीं । तंव अकस्मात एकेदिवशीं । पाहुणे पातल आश्रमासी । आसन तयांसी दीधलें ॥२३॥

आपण असे उपवर । लाजे हिंडावया समोर । मनीं ओळखोनी क्षुधातुर । साळी सत्वर काढिल्या ॥२४॥

यांचे करोनिया कंडण । करावया द्यावें भोजन । यासाठीं लगबगें करुन । उखळ झाडून बैसली ॥२५॥

न पडतां कवणाचे दृष्टीं । कार्य मांडिलें उठाउठीं । पाहतील म्हणोनि द्वार लोटीं । लाज पोटीं उपवराची ॥२६॥

मुसळ घेवोनिया करीं । घाव घाली साळीवरी । तव कंकणाचे गजरीं । खोंचला अंतरीं लज्जाशर ॥२७॥

हें थोंर कामिनींचें कंकण । नाद कळेल बाह्यालागून । वधूपणा येईल दूषण । लज्जा गहन उद्भवली ॥२८॥

मग विचारें काय केलें । स्वयुक्तीं कंकणे उतरिलें । दोन दोन करीं ठेविलें । पुढती मांडिलें कांडण ॥२९॥

घाव मुसळाचे घालिता । दोहींमाजी शब्द झाला निघता । म्हणे हें प्रर्वतलें लज्जाघाता । काय आतां करावें ॥३०॥

लोक अपवादालागून । सर्वापरी बैसलें झांकोन । तेथें हे नाद करिती कंकण । जाणतील खूण बाह्यार्थी ॥३१॥

म्हणतील हे वधू कैसी । धांगडी कळेल लोकांसी । युक्त योजावी कांहीं ऐसी । जेणें बाह्यांसी न कळे वर्म ॥३२॥

मग एक एक काढी कंकण । दोहीं करीं ठेविलीं दोन । सेखीं आरंभिलें कांडण । नाद संपूर्ण निमाला ॥३३॥

साळी कांडोनि तांदुळ केले । इंधनासहित बाहेर दिले । पाहुणे जेवोनि मार्गी गेले । कार्य साधिले कुमारीनें ॥३४॥

हा गुण घेतला साधनी । एकाकी राहिलों होवोनी । द्वैत टाकिलें नासोनी । अद्वयपणीं मिरवलों ॥३५॥

हा कुमारीचा गुण उत्तम । गुप्त आच्छादिलें आपुलें वर्म । एकाकीं साधिजे आपुला धर्म । लौकिकीं संभ्रम नसावा ॥३६॥

परी हें अनिवार मन । देखिलें तिकडे बहकें जाण । कैसे सिद्ध कारण । करवी भ्रमण ओढाळ हें ॥३७॥

मन चंचल हें अनिवार । कोण करावा या प्रकार । ऐसा जंव होतों चिंतातुर । तंव शरकार भेटला ॥३८॥

तो शरकार कोण म्हणसी । शरकर्ता होय निश्चयेंसी । त्याचें वर्म सांगतों तुजसी । सांठवी मानसीं गुण त्याचा ॥३९॥

तो शरकार दुकानीं बैसला । बरुभारा निवडिता जाला । दृढ कठिण निवडोनि काढिला । तोचि योजिला शरासी ॥४०॥

बेत प्रमाण तया खांडी । सहस्त्रावधि करोनि काडी । बैसवी तयांसित कोंडी । पराते जोडी वेष्टुनीं ॥४१॥

फळें नानापरीं घडित । तयां बाणमुखें ऐसें म्हणत । सतेज तीव्र धारा करोनि लखलखित । जोडोनि देत कुशलत्वें ॥४२॥

एकाग्र करोनी मन । पुच्छा पाहोनि मुखा योजून । साधी त्याचें सरळ संधान । वक्र गमन मोडीं त्याचें ॥४३॥

नाना परिंचें रोगणें रंग । देवोनि करीतसे सांगोपांग । तया मार्गे अनेक प्रसंग । वागती जग भूप दिसेना ॥४४॥

तों अकस्मात एक दूत आला । तो शरकर्त्यांसी पुसता जाला । राव येणेंचि मार्गें गेला । नाहीं देखिला येरु बोले ॥४५॥

दूत पेटोनि बोले क्रोधमाना । भूपासवें गेली अद्‌भुतसेना । काय न दिसे तुझिया नयना । गर्जना काना न कळेची ॥४६॥

इतर म्हणती सत्य गेला । तूं म्हणसी देखिला न ऐकिला । काय म्हणावें आतां तुजला । भ्रमी पडला कोणत्या तूं ॥४७॥

येरु म्हणे करितां हे शर । चित्त असतें एकाग्र । वृत्ति होतां तदाकार । पडे विसर देहाचा ॥४८॥

जेथें देहाचा होय विसर । तेथें कोण कैंचे आपपर । नाही साचि वाटे अन्य वेव्हार । एकाग्र विचार ऐसा हा ॥४९॥

एकाग्रते वांचोनिया । नयेचि कार्य कदा घडोनिया । स्वकार्यीं विनटलों ठायां । म्हणोनि वायां रे जाये ॥५०॥

हेचि एकाग्रतेची खूण । इंद्रियव्यापार जाती हारपोन । नाठवे कदा भूक तहान । गेले गुंतोन मन तेथें ॥५१॥

हा गुण माते म्यां घेतला । तेणेंचि मनोजय मज घडला । हितार्थ गुण हा फावला । म्हणोनि वंदिला शरकार ॥५२॥

साधन साधावया एकाग्र । मठ गुंफा पाहिजे मंदिर । आणि कांहीं संगविचार । ऐसें अंतर करुं इच्छी ॥५३॥

तंव पुढें म्यां सर्प देखिला । तो एकाकी फिरे एकला । निःसंग वावरों लागला । गुण घेतला तोचि म्यां ॥५४॥

मंदिर पाहतां तयासी । करणेंचि नाहीं निश्चयेंसी । कांहीं न करी संग्रहासी । आयत्या ठायासी राहतो ॥५५॥

प्रथम पिपीलिका करिती घर । मृत्तिका काढिती बाहेर । गर्भीं ठायीं ठायीं विस्तार । करिती प्रकार स्थळाचे ॥५६॥

तेथें मुंगळे रीघ करिती । मुंगिया समूळ पळोनि जाती । मुंगळे तेथें बहु प्रसवती । मृत्तिका काढिती करिती घरें ॥५७॥

खडे माती काढोन । स्थळें करिती विस्तीर्ण । वर्षाकाळीं निघती तेथून । उदकें भिजून स्थळें जातीं ॥५८॥

तेथें वाळव्या करिती संचार । ओली मृत्तिका काढिती बाहेर । आपुलाले जमवोनि स्थळप्रकार । बांधिती घर वेगळालें ॥५९॥

जंव जंव मृत्तिका काढिती । तंव तंव वरी वारुळे वाढती । ठायीं ठायीं द्वारें राखिती । माजी संतती तयांची ॥६०॥

वस्ती करितां बहुवस । वारुळें पावती वृद्धीस । नित्य भक्षिती गोमयास । नेवोनि विशेष सांचविती ॥६१॥

गोमय बाळव्याचे गद्‌बदे करोन । तेथें अळिका होती निर्माण । तेहि तेथें पावताती मरण । प्रारब्धें चुकोन क्वचित राहे ॥६२॥

ते बहु दिवस राहतां । तो कीटक पावे स्थूळता । सकुमार शुभ्र निर्मळता । होय भक्षिता वाळव्यातें ॥६३॥

तया कीटकासि म्हणती राजा । तो धातुक्षीणाचिया पडे काजा । अंजनींत या योजा । वदलो सहजा गोष्टी हे ॥६४॥

असो किडयाकीटकांचे जें स्थळ । तें उंचावतां म्हणती वारुळ । अंतरीं ठायीं ठायीं पोकळ । वरी सबळ कठिणत्वें ॥६५॥

तया आयते मंदिरांत । येवोनि सर्प राहे तो निवांत । श्रम न करितांची प्राप्तः । सुखें विचरत स्वानंदे ॥६६॥

स्वारस्य येथें हेंचि कारण । तेणें काय श्रम केलें गृहालागुन । भलतें बिळीं राहोन । काळ क्रमण करीतसे ॥६७॥

सर्प बैसे फिरे डोले । परी कोणासि कांहीं न बोले । मौनचि राहे सर्व काळे । हें वर्म आगळे उपेगी ॥६८॥

क्वचित भेटे स्वजातीचा । तो प्रश्न करी जरी आनंदाचा । तैंच उत्तर निघे वाचा । येऱ्हवीं त्याचा शब्द नाहीं ॥६९॥

एवं सर्पापासोनि गुण चार । गुरु मानोनि केला अंगीकार । येणें योगधारणा बाणे सुंदर । निःस्पृह निरंतर वागावें ॥७०॥

मातें या संसारी कैसें वर्तावें । काय आधार धरोनि वागावें । संदेह घेतला जीवें । न पडे ठावे जाला भ्रम ॥७१॥

याचिया शोधासाठीं । म्यां शोधिली सकळ सृष्टी । तंव कातणी पडिली दृष्टी । अगाध गोष्टी पाहिली ॥७२॥

तीचिये नाभीपासून । तंतु होतसे निर्माण । त्याची तंतु आधारे वावरें पूर्ण । जाय चढोन उतरे फिरे ॥७३॥

नाना मंडपांचे आकारे । त्या तंतूची बांधी घरें । पाहतां दिसती चमत्कारें । आपण वावरें तयांवरी ॥७४॥

तंतु उंच स्थानीं गुंतवोनी । आपण पावे तळवट भुवनीं । सर्वेची तंतु घे आंवरोनी । जाय चढोनी पूर्वस्थळा ॥७५॥

अनंतावधि घरें केलीं । परी तंतु न सरे कदाकाळीं । खेळखेळोनि राहे निराळी । गुंतोनि एक स्थळीं न बैसे ॥७६॥

न धरी मागिल्याची आस । क्षणाक्षणां रचि पुढें विशेष । पाहतां औडंबर दावी सोस । होतां नाश न दुखवे ॥७७॥

उपसर्गे गृहें मोडती । परी देहीं न मानीच ते खंती । दृढ तंतु धरोनि चित्ती । होय रचिती अनेक ॥७८॥

सर्व ठायीं भ्रमे आपण । क्षण एक बैसे स्थिर होवोन । मागुतीं तोच वेव्हार तिजलागोन । अनुसंधान तंतूचें ॥७९॥

एवं कातणीचा उपदेश । म्यां गुण घेतला विशेष । सोहंतंतु व्यापक सर्वांस । नाहीं नाश तयातें ॥८०॥

त्या तंतूचेनि आधारें । वावरति मणिवत शरीरें । वेव्हारती सोपस्कारें । भरोनि उरे आकळ तो ॥८१॥

आणिक एक व्यवस्था । तुज कल्पनीय सांगतो आतां । कातणी हे माया पाहतां । पुरुष सांठविता होय पोटीं ॥८२॥

ब्रह्मरुप पुरुष जाणा । तंतुरुपे नाभिस्थाना । त्या कातणीस उद्भवे कल्पना । प्रसव त्रिगुणा ऎंक्यत्वें ॥८३॥

ते त्रिगुण म्हणसी कैसे । कातणी कल्पना तंतु असे । त्या तंतूचेनि सौरसे । खेळ विलसें रची नाना ॥८४॥

धरोनि आधार तंतूचा । खेळ विस्तारला मायेचा । घटमठादि भाव त्या पटाचा । रची एकाचा अनेक ॥८५॥

अनेक पाहतां असे एक । अनेक दाविलें ते मायिक । मनीं करोनि पाहतां विवेक । अवघे ठक एक खरें ॥८६॥

पैल कापसापासोन । तंतु होतसे निर्माण । तयाचे पट नानाविध करोन । रंगें श्रृंगारोन विविध केलें ॥८७॥

नामें अनंतची प्रकार । धारणीं शयनीं प्रावरनीं अंबर । तयाचें घर आवार । छत्र चामर ध्वजादि ॥८८॥

पोतें भोत आणी गोणी । मूठवळी अनेक वहनीं । नाना वस्तु विस्तारोनी । प्रत्यक्ष जनीं पाहा हे ॥८९॥

रुचीं उपभोगें रमले । अंगीकारोनि त्यातें भ्रमले । हें प्रत्यक्ष तूंते दाविलें । त्वांही पाहिलें बहुतेक ॥९०॥

विवेकें याचा शोध करी । वरील रंगातें अव्हेरी । अंतर पटातें शोधी बरी । काय अंतरीं दिसे तुज ॥९१॥

अनसूया म्हणे रे दत्ता । रंग सरतां उरे पटता । पटामाजी निरखोनि पाहतां । तंतूची व्यापकता दिसतसे ॥९२॥

अविनाश म्हणे जननिये । सर्व कारण तंतू होये । अनेकत्वें होय जाये । सेखीं राहे कर्पासीं ॥९३॥

जैसी कापसाची मोट । तेवींच कातणीचें पोट । नाभिछिद्रीं निघें चोखट । सूत नीट वोढितां ॥९४॥

तो कापूस बीजां जाला । बीज असें वृक्षफळा । वृक्षबीजीं उद्भवला । उद्भवोनी राहिला बीजांत ॥९५॥

ते बीज प्रकार अनेक । अनेकांचे प्रकार एक । तें तुज कळावें आवश्यक । तरी उपाय एक सांगतों ॥९६॥

तें बीज वृक्षीं आहे । वृक्ष तरी तूंचि होसी पाहे । परी त्या बीजाची दावितां सोये । सद्गुरु होये निजदाता ॥९७॥

त्या बीजाचेंही गुज । एक जाणेअ सद्गुरुराज । तोचि साधविता होय काज । महाराज जगत्राता ॥९८॥

त्या शरण जाय सांडोनि लाज । त्यापाशीं असती सर्व इलाज । त्याची कृपा होतां सहज । पुरवील चोज अंतरीचें ॥९९॥

सद्‌गुरु कैसें काय करिती । ऐसी मज होती सबळ भ्रांती । या भ्रांतीची व्हावी निवृत्ती । फिरलो यदर्थी भूमी बहु ॥१००॥

तंव एका कानानाभीतरीं । रम्य स्थळीं बैसलों विश्रांतीवरी । दृष्टीं निरखितां ते अवसरीं । नवल परी देखिली ॥१॥

भ्रमण करीत पेष्कार । अळिका धरोनि पावला सुंदर । एका वृक्षी होतें घर । करवी संचार आळिकेसी ॥२॥

मंदिरी अळिकेतें ठेविलें । द्वार बुजवोनी त्यानें घेतलें । तें म्यां प्रत्यक्ष दृष्टीं पाहिलें । आश्चर्य वाटलें निरखितां ॥३॥

काय कैसें होईल याजला । हा छंद मातें दृढ लागला । मी नित्य अवलोकीं त्याला । नवलावो देखिला विशेष ॥४॥

तो भृंग नित्य येवोन । स्वकाटा टोंची त्यालागोन । ऐसे लोटतां कित्येक दिन । निघे आंतोन भृंगची ॥५॥

विवेकें मनीं विचारिलें । कीं अळिके प्रत्यक्ष घातलें । भृंगसंसर्गें भृंगत्व पावले । उडोन गेले भृंगांत ॥६॥

एकांत गुंफे अळिकेसी । पेष्कार भंग करी त्यासी । संस्कारें पाववी स्वस्वरुपासी । पूर्वता त्यासी नुरवीच ॥७॥

केवढी त्याची पहा नवलाई आपणाऐसेचि करी पाहीं । अणुमात्र तया भेद नाहीं । पेष्कार होई पेषस्कारा ॥८॥

तो गुण अंगीकारोन । मी सद्‌गुरुसी गेलों शरण । तेणें माझें हरो मीपण । केलें आपण तद्रूप ॥९॥

मी अनन्यभावें शरण जातां दयां उपजली कृपावंता । परीक्षोनि जाणीतली व्यथा । म्हणे न करा चिंता वत्सा तूं ॥११०॥

उदारतेंचे ऐकोनि उत्तर । सदृढ चरणीं ठेविलें शिर । तेणें देवोनि अभयकर । बीजमंत्र दीधला ॥११॥

कर्णद्वारें तें रसायन । देवोनि केलें पावन । बोधोनिया दिव्यज्ञान । समूळ अज्ञान नासिलें ॥१२॥

जें रचिलें असें ब्रह्मांडीं । तेंचि दाविलें मज पिंडी । तत्त्वज्ञानाची परवडी । अति चोखडी बोधिली ॥१३॥

जीवशिवाचा जो प्रकार । पंचभूतांचा वेव्हार । पंच प्राणांचा प्रसार । तो सविस्तर बाणवी ॥१४॥

हें हितार्थ आत्मज्ञान । तो सद्‌गुरु दे मजलागून । विकार त्यगवोनि संपूर्ण । निर्विकारण बिंबवी ॥१५॥

नाशिवंतातें नाथिलें । अविनाशवस्तूतें भेटविलें । तें सुख अत्यंत आगळें । योगिया कळे योगमार्गें ॥१६॥

तो योग साधावा शुद्ध । तेथें उपजे सत्य आनंद । अनेक आनंदाचा कंद । तो ब्रह्मानंद हातीं ये ॥१७॥

ब्रह्मानंद आलिया हाता । नुरे जन्ममरणाची व्यथा । वारे जीवींची तळमळता । निर्विकल्पता प्राप्त होय ॥१८॥

यासाठीं विनय होवोनी । माते लागें तुझिया चरणीं । प्रार्थीतसें जोडोनि पाणी । स्वहितसाधनीं सावध हो ॥१९॥

शाश्वत नाहीं या देहाचें । त्यांत नाहीं हें उपेगाचें । सर्व देहांमाजी नीचें । खादें काळाचें शेवटीं ॥१२०॥

अनेक देह नाना असती । मेलियाही त्यांचे उपयोग होती । किती म्हणोनी तुजप्रती । सांगूं ख्याति निवडोनी ॥२१॥

पशु जीतां करिती कामें । कोणी राहूं नेदे रिकामें । मेलिया उपयोगा येती चर्मे । मांससंभ्रमें भक्षिती ॥२२॥

अस्थि दंत गजाचे । सर्वही असती कामाचे । पुच्छें वारिती वनगायीचें । पक्षी पक्षाचे वस्तु नाना ॥२३॥

सर्वांमाजी नीच सूकर । तोही भक्षिती कित्येक नर । मेलिया दंत सुंदर । कुंचे अपार केशांचे ॥२४॥

नाडी पशूंच्या कामा येती । तयांपासोनि तांती होती । जलचरेंही त्याच रीतीं । सांगू किती वनचरें ॥२५॥

सकळांहोनि हीन नरदेहे । याचें कांहींच कामा नये । त्वचा मांस मेद शिरा नासोनि जाये । अस्थि अकय उपयोगी ॥२६॥

देहो अग्नीनें जाळिला । दशांग तो पुत्रें वेंचिला । शुद्ध करोनि ठेविला । सेखीं टाकिला तीर्थांत ॥२७॥

परी उपयोगा न मागें उरले । वायांचि तें व्यर्थ गेलें । जन्मोनिया काय केलें । शीण भोगिले प्रपंची ॥२८॥

जें देहाचें आयुष्यप्रमाण । त्यांत निद्रार्णवीं अर्ध जाण । निम्में उरलें त्याचें कारण । सांगतो निवडून पृथकची ॥२९॥

चतुर्थांश तें बाळपण । दोन भाग तें तारुण्य । उरल्या शेषीं वृद्धापमान । होय विटंबन शरिराचें ॥१३०॥

बाळपण गेलें खेळतां । तारुण्य विषयलोभ चिंता । आशा द्वैत वाढे अहंता । कोण स्वहिता उपजे जेथें ॥३१॥

स्वहित सुकृत न घडे तया । अंतीं जाणें यमालया । विषयभोगें विटंबिती काया । तेथें सुटावया ठाव नाहीं ॥३२॥

जैसे विषय भोगिले । स्वार्था परां पीडिलें । अहंतालोभे बहुतां त्रासिलें । सुख न दिधलें कवणातें ॥३३॥

मोहो ममतें होवोनि वेष्टित । प्रपंचहिता केले घात । कामलोभींच ठेविलें चित्त । मानिलें आप्त स्वजनासी ॥३४॥

गण गोत पुत्र मित्र । भ्रतार कांता कन्या कलत्र । श्यालाक मामे भाचे अन्यत्र । उभय गोत्र पोसिले ॥३५॥

जोंवरि भाग्याची दैवगती । तोंवरी हां जी हां जी म्हणती । मोहो ममतें फोलोनि खाती । सुख भोगिती सर्व गुणें ॥३६॥

जैं भाग्यओघ सरे । तैं यात्रा अवघी वोसरे । कितेक धरोनि बैसती आसरे । देती घसरे तोडिती ॥३७॥

अंतीं येतां हीनपण । मग सर्वही देती लोटोन । कामा येती आप्तजन । वांछिती मरण कधीं ये ॥३८॥

लोभ मोहीं गुंतोनि प्राणी मेला । लौकिकमोहें रडे पाळा । स्मशानीं बोळवीत आला । पुनरा गेला आश्रमा ॥३९॥

देह गेला जळोन । प्राणी दूतें नेला बांधोन । भोगा ऐसें शासन । देह देवोन करिताती ॥१४०॥

नाना परी तेथें जाचिती । असिपत्रीं लोळविती । कुंभीपाकीं पचविती । डोळे फोडिती कागमुखें ॥४१॥

तप्त स्तंभाते बांधोन । वरी नग्न शस्त्रें करिती छेदन। घायीं तीक्ष्ण रस ओतोन । शिस्त्र तोडोनि मुखीं देतीं ॥४२॥

प्राणी होतसे कासावीस । जीवीं मानीं बहु त्रास । सोडविण्याची पाहे वास । कोण्ही न तयास मुक्त करी ॥४३॥

जे का पोसले पाळिले । प्राणें आप्त ऐसें मानिलें । सोडवावया कोण्ही न आले । व्यर्थ पोसिले तैं कळे ॥४४॥

असो प्राणी स्तंभींचा सोडिला । पुनरा विखार झोंबवितां देहाला । लहरा वेग ना सोसिता जाला । सोडविता त्याला कोण्ही नसे ॥४५॥

सेखीं सांडसें तोडिती मास । सळ्या खोचिती कर्णास । सवेंचि ओतिती तीक्ष्ण रस । प्राणी कासावीस बहु होय ॥४६॥

जीवीं बहु त्रास मानी । म्हणे दुष्ट घडली मजपासोनि करणी । आतां किती सोसूं ही जाचणी । न दिसे निर्वाणीं कोण्ही मज ॥४७॥

विटंबनीं ये काकुळती । परी दया न ये कोण्हाप्रती । मस्तकावरी टोले देती । ग्रीवा पिळिती पाडोनी ॥४८॥

अंतर्माळाचे काढिती भार । पाषाण घालिती दंतांवर । भगद्वारीं तप्त पहार । खोंचोनि सदर फोडी माथा ॥४९॥

परी न जाती तेथें प्राण । यातना भोगविती दारुण । घाणीं घालती नेऊन । काढिती पिळोन तिळापरी ॥१५०॥

अट्टाहासें मारी जीव हांका । कोण्ही सोडवावया नाहीं सखा । केलें कर्म भोगणें देखा । कदा चुका न पडे तो ॥५१॥

अतिदुःखातें भोगविती । रवरवनरकामाजी लोटिती । मर्यादा तोंवरी राखिती । लोटोनि देती प्राणिया ॥५२॥

जैसें असें कर्माचरण । तैशाच योनीस पावे जनन । तेथें नाना दुःखें भोगोन । सेखी मरण गांठीसी ॥५३॥

एक एक योनी कोटि फेरे । ऐशीं लक्ष चौऱ्याशींचीं घरें । तैं हे आवघे वोसरे । लागे वारें मानवी मग ॥५४॥

त्या मानवदेहीं चुकतां । पुनरा मागुती भोगणे गोता । पापपुण्य समान होतां । लाभे अवचितां नरदेहो ॥५५॥

जेवीं कीटक काष्ठ ठकरी । नेणतां तो पडे अधरीं । कीं काग सांपडे जेवीं करीं । भानवसिवरी ससा जेवीं ॥५६॥

तेवीं हा अलभ्य नरदेह लाभे । सर्वां वरिष्ठ दिव्य शोभे । जो मान्य केला रमावल्लभें । ज्याचेनि लोभें लोभावला ॥५७॥

उत्तम हा मानुषदेहा । ऐसें बोलिला रमानाहो । तो वृथा गमवितां कां हो । करावा लाहो आत्महिता ।५८॥

उत्तम नरदेहो निर्धार । परी हा असे क्षणभुंगर । त्यांत दुर्लभ लाभविचार । या सर्वेश्वरप्राप्तीचा ॥५९॥

माते दुर्लभ नरदेह पावलीस खरा । याचा लोभमोहें न करी मातेरा । जोडोनि परब्रह्म सोयरा । परात्परतीरा पाव वेगीं ॥६०॥

हा नरदेह जातां हातिंचा । मग लाभ तरी जोडेल कैचा । यासाठीं कळवळे जीव साचा । विनवी वाचा माते तुज ॥६१॥

पावलीस तूं हें उत्तम क्षेत्र । स्वहित कारणा अतिपवित्र । आत्मज्ञान साधावया पात्र । यावीण अन्यत्र सत्य नाहीं ॥६२॥

क्षणक्षणा आयुष्य जाये । विचारोनि माते सत्य पाहे । देहीं वेगीं सावध होये । धरि पाये सद्गुरुचे ॥६३॥

मोह मायिकातें त्यागी । आत्मज्ञानपदार्था उमगी । तत्त्वज्ञानाचेनि संयोगी । सुख भोगीं चिद्रूपीं ॥६४॥

तंव अनसूया म्हणे रे बाळा । मजविषीं उपजला तुज कळवळा । ज्ञानसागरा परम सुशीळा । तारक सोहोळा बोधिसी ॥६५॥

भवभीतीचें करोनि विवरण । उपाव सांगसी व्हावया शमन । तो सत्य बाणला मजलागोन । जाईन शरण गुरुवर्या ॥६६॥

गुरुगुणाचे प्रकार । त्वां निरोपिले सविस्तर । तोही बाणला मजसी विचार । रहणी सुंदर योगासी ॥६७॥

ऐकोनि तुझें निरोपण । मज आठवलेति कांहीं प्रश्न । ते तूं करोनिया श्रवण । करी समाधान पैं माझें ॥६८॥

अवाढव्य रचिळें हें ब्रह्मांड । तेवींच म्हणसी असे पिंड । लघुमाजी हें प्रचंड । ऐकतां बंड दिसे मज ॥६९॥

तत्त्वज्ञान म्हणजे काय । कोनापासोनि कोण होय । त्रिगुणव्याप्तीची सोय । कैसा विलय तो सांग ॥१७०॥

हें म्यां तूतें विचारिलें । तें पाहिजे पुरविले । अवधूत बोले तये वेळे । उत्तम केलें प्रश्न मज ॥७१॥

मातें विनंती परीयेसि । मज भ्रमणें नित्य या जगतीसी । अस्तमानीं घ्यावया दर्शनासी । येणें तुजपाशीं जननीये ॥७२॥

नित्य रजनी माझारी । तुज तोषवीन प्रश्नोत्तरीं । सुचित होवोनि अंतरी । श्रवण करी साक्षेपें ॥७३॥

पुढलिये प्रसंगीं योगिराणा । माते निरोपील आत्मज्ञाना । योगी जाणती तेथिंच्या खुणा । अद्भुत रचना गुह्यार्थ ॥७४॥

आगमनिगमाचें गुह्यगुज । तें तुम्हां संतांचें असे निज । विरळाचि जाणे त्याची वोज । कृपेवीण काज घडेना ॥७५॥

प्राप्त व्हावया कृपादान । संत सज्जनांचे लक्षोनि चरण । अनंतसुत हा बंदीजन । कर जोडोन विनवीतसे ॥७६॥

तुमचा म्हणवीतसे किंकर । माझा तुम्हांवरी असे भार । आपुला म्हणवोनि कृपाकर । देवोनि अंतर तोषवा ॥७७॥

आपुला लडिवाळ जाणोनी । कृपा कीजे संतजनीं । मज पामरालागोनी । नसे कोण्ही तुम्हांविण ॥७८॥

तुम्ही संत साधु ज्ञानी महंत । उदार सर्वज्ञ पंडित । केवळ ईश्वरमूर्ती साक्षात । मायबाप सत्य तुम्ही माझे ॥७९॥

माझी बोबडी आर्षवाणी । तुम्ही स्वकृपें गोविली निरोपणीं । ते शब्द घेतां गोड करोनी । लेतां श्रवणीं अर्थमुक्ता ॥८०॥

सेवा घ्यवी दासा हातीं । ऐसें वागलें तुमचे चित्तीं । म्हणोनि ग्रंथीं देवोनि मती । कथा वदविती अद्‌भूत ॥८१॥

भृगुनारदाचें संमत । कांहीं दत्तमुखींचा इत्यर्थ । शोधोनियानिया नाना ग्रंथ । निवडोनि भावार्थ जाणविला ॥८२॥

प्रश्नादर हा सुरस निका । बोधप्रद लाभ सकळिकां । दत्तची वदवी नेटका । मज बाळका करोनि पुढें ॥८३॥

पुढें त्याचा तोचि वदेल । आपलें ज्ञान निरोपील । मातेचे मनोरथ पूर्ण करील । श्रवणीं तोषवील संतजनां ॥८४॥

कथा रसाळ हे पावन । गोड अधिकाधिक करितां श्रवण । निरसोनि जाय सकळ अज्ञान । होय ज्ञान दत्तकृपें ॥८५॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । यासी नारदपुराणींचें संमत । श्रोते परिसोत भाविकभक्त । विंशतितोध्यायार्थ गोड हा ॥१८६॥

॥ इति विंशतितमोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय एकविसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ।

ॐ नमो सद्‍गुरु सच्चिदानंदा । परमकृपाळा अद्वैतबोधा । अविनाशरुपा स्वतःसिद्धा । सर्वज्ञ अभेदा सुखाब्धे ॥१॥

आदि अनादि विश्वंभरा । सर्वात्मका तूं सर्वेश्वरा । गुणातीता निर्विकारा । दयासागरा दीनबंधो ॥२॥

हे ज्ञानप्रज्ञा चैतन्यघना । जय मायातीता निरंजना । हे अज्ञानच्छेदका भवभंजना । अनाथपावना आनंदकंदा ॥३॥

जय परब्रह्ममूर्ते परात्परा । जय शुद्धसत्त्वा वेदसारा । अखिल अभंगा उदारा । जगदुद्धारा जगत्पते ॥४॥

जयजयाजी अव्यक्तव्यक्ता । निर्विकल्पा अचल शांता । विमलरुपा सर्वातीता । स्वामी दत्त नमो तुज ॥५॥

तूं दीनदाता परम सदय । दूरी करावया हें भवभय । धरोनिया अवतार नामें दत्तात्रेय । दाविसी उपाय जडजीवां ॥६॥

प्रगटोनिया तूं त्रिगुणात्मक । त्रितापा वारिसी आवश्यक । रुपें धरोनिया अनेक । दाविसी कौतुक भुवनत्रया ॥७॥

तूं अलक्षण अगोचर । तुझे लीलेसि नाहीं पार । उपमा द्यावया विचार । न दिसे साचार धुंडितां ॥८॥

तूं निरुपम गा सर्वसाक्षी । तुझें सदयत्वें चित्त मुमुक्षीं । रक्षिसी त्या आपुलें पक्षीं । न घडे उपेक्षी तयां कधीं ॥९॥

एवं पावन ब्रीद चरणीं । तुझिया असे मोक्षदानी । हेंचि वर्म जी लक्षोनी । आलों लोटांगणीं शरण तुम्हां ॥१०॥

आपण सकृप उदाराचे राणे । ऐसें गातीं वेदपुराणें । पापाचळें घेतलीं राणें । नामस्मरणें हें कळे ॥११॥

ऐसीं तव नामाची प्रौढी । पळविली समूळ वासना कुडीं । रसनेसी उद्भवली गोडी । जडली आवडी तव गीतीं ॥१२॥

गावें गीत हें विशेष । वर्णावे तव कीर्तिघोष । हा छंद उद्भवला मनास । विनवी पदास यासाठीं ॥१३॥

प्रेमें भाळातें वोपोनी । विनत झालों तव चरणीं । साह्य कीजे कृपा करोनी । वदविजे वाणी रसाळ हे ॥१४॥

तव प्रासादिक हा संवाद । म्हणोनि ग्रंथा नाम दत्तप्रबोध । तें मागील निरोपण शुद्ध । आहे प्रसिद्ध वीस पैं ॥१५॥

त्या विसाव्याचे अंतीं गोसाविया । प्रश्न करिती झाली अनसूया । मज अध्यात्मज्ञान कथीं गुणवर्या । ज्ञानसूर्या प्रकाशका ॥१६॥

पिंडब्रह्मांडींची कैसी रचना । कोणा आधीं कोण जाणा । तत्त्वज्ञानाचिया विवरणा । सांगे सगुणा मज आतां ॥१७॥

मातेचे प्रश्न ऐकोनि सुंदर । अवधूत त्या प्रश्नाचा करी आदर । मातेसी विनवी जोडोनि कर । श्रवणीं सादर असावें ॥१८॥

माते म्यां शिष्य यदु बोधिला । तो भाग तूतें निवेदिला । त्यापरी सहस्त्रार्जुन शरण आला । तेणें प्रश्न केला ऐसाची ॥१९॥

बोधितां त्यातें ज्ञान झालें । उपरी आध्यात्मिक प्रश्न केले । तेवींच त्वांहीं मज विचारिलें । मन आनंदलें बहु फार ॥२०॥

ऐसाचि प्रश्न जोडोनि करा । उमा पुसती झाली शंकरा । अर्थभाव ओळखोनि ते अवसरा । सदय अंतरा शिव होय ॥२१॥

होवोनिया तो सुप्रसन्न । गौरीचे आदरिले प्रश्न । म्हणे होवोनिया सावधान । करी श्रवण आध्यात्मिक ॥२२॥

ते उभयांचे वाग्विलास । बोधिले सद्गुरुरायें मज विशेष । आर्थिक देखोनि सहस्त्रार्जुनास । निरोप सुरस भाग तया ॥२३॥

तो इतिहास आध्यात्मिक । मज तूं विचारिसी आवश्यक । तरी सिद्ध श्रवणीं होय नेटक । सागतों मी ऐक सप्रेमें ॥२४॥

कळा कुशळता विद्या ज्ञान । चौदा चौसष्टींचे प्रमाण । परि हे लौकिकसंबंधीचें लक्षण । नोव्हे कारण स्वात्महितीं ॥२५॥

स्वात्महिताची जया चाड । अध्यात्मश्रवणीं तया आवड । आपआपणियामाजी कळे निवड । अत्यंत जोड जोडी पुढें ॥२६॥

याचि विचारणीं जो बरवा । तोचि उत्तम नरदेही जाणावा । तो स्वात्मसुखाचा ठेवा । पावेल अवघा आनंद ॥२७॥

त्या आनंदाचा जो भाग । घ्यावया पावे बुद्धिलाग । त्याचेंचि पूर्वकर्म चांग । तया उद्योग आठवे हाची ॥२८॥

अनंत पुण्याच्या पूर्वराशी । तोचि पावे या आध्यात्मिकासि । येरा न पावे हे मूढासी । खीर खरासी काय ते ॥२९॥

माते तव भाग्य बुद्धि दैदिप्यमान । जेवीं पळोपळ वाढे चंडकीर्ण । तो जेविं रश्मीनें शोषी जीवन । तेवीं तूं ज्ञान स्वीकारिसी ॥३०॥

येणें मन माझें आल्हादे । वाटे कवळावीं तुझीं हीं पदें । तूं स्वीकारिसील तीन्हीं पदें । वाटतें संवादें माझिया ॥३१॥

धन्य माते तुझे हे प्रश्न । धन्य तुझें पवित्र श्रवण । धन्य संवाद हे पावन । जगदुद्धारण कर्ते जे ॥३२॥

आतां या प्रश्नाचें उत्तर । वदेल अवधूत योगेश्वर । तें श्रोतीं श्रवण कीजे सादर । अध्यात्मविचार सुरस ॥३३॥

श्रवणींच पावे सत्य ज्ञाना । मननीं राखिजे अनुसंधान । आपली ठेव पावे आपण । सुखसंपन्न निजभाग्यें ॥३४॥

अवधूत म्हणे वो जननी । एकाग्र लक्ष्य दीजे श्रवणीं । आध्यात्मिक सांगतो विवरोनी । मूळापासोनी सविस्तर ॥३५॥

मूळ आधीं निराकार । तेथें कैंचा कोण प्रकार । नवते पवन पाणी भू अंबर । तेज संस्कार कोठोनी ॥३६॥

चंद्र सूर्य तारा ग्रहगण । नव्हते भू पाताळ स्वर्ग स्थान । यक्ष राक्षस मनुष्यगण । नक्षत्रें कोठून मेघमाळा ॥३७॥

तीर्थ देव नव्हत्या देवता । ठाव कोठोनि वृक्ष पर्वता । कैंचे सागर कैंची सरिता । शब्द नामता वार्ता नसे ॥३८॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । नव्हते वेद शास्त्रप्रकार । कांहींच नसे आकार विकार । म्हणोनि निराकार त्या म्हणिजे ॥३९॥

मन बुद्धि नव्हतें चित्त । अहंकार चैतन्य नवतें सत्य । द्वीप खंडें कोठोनि असत । मेरुची अमत कोठोनि ॥४०॥

नाद बिंदु नाहीं कळा ज्योति । वर्णभेद शब्द वाचा नव्हती । नव्हती खाणी योनीची गती । निराकार म्हणती निःशून्य ॥४१॥

जया नाहीं कांहीं आकार । तया नाम म्हणिजे निराकार । तया निराकारापासोनि प्रकार । परियेसी विस्तार कैसा तो ॥४२॥

निराकार आणि निशूःन्य । येथें नाहीं द्वैतपण । त्या निराकारापासून । जालें शून्य निरालंब ॥४३॥

शून्य ब्रह्म तें साकारलें । तयापासोनि आकाश जालें । आकाश पवनातें प्रसवलें । पवनीं निपजलें तेज तें ॥४४॥

तेजापासोनि जालें जीवन । जीवनापासोनि भूमी जाण । एवं पंचभूतें निर्माण । एकापासूनि एक जालीं ॥४५॥

या पंचभूतांचे एकवटीं । येथोनि जाली हे भूतसृष्टी । चराचराची राहाटी । मूळ खटपटी येथोनी ॥४६॥

या पंचभूता कर्ते उद्भव । तें निराळेंचि गा प्रेमतत्त्व । सकळ उभाराचें वैभव । व्यापकत्व लाघव तयाचें ॥४७॥

आतां शुद्ध निखिल ब्रह्म जाण । चैतन्य इच्छा जाली जयापासून । तया महातत्त्व म्हणोन । नामाभिधान पैं जालें ॥४८॥

तेथोनिया माया प्रगट ॐकार । त्या इच्छामाये पासाव प्रकार । दो गुणें जाला विस्तार । तोहि विचार परियेसा ॥४९॥

पुरुष आणि प्रकृति । ऐसे हे दोन गुण प्रगटती । ऐसी व्हावया कोण गती । ती ही निगुती अवधारा ॥५०॥

शुद्ध ब्रह्म मुळीं असतां । इच्छा उद्गार जाला पावता । त्या अविद्येकरोनि जीवता । जाला पावता दशातें ॥५१॥

अहं ब्रह्मोस्मि हा उद्गार । हा महामायेचा उभार । तेथुनि इच्छारुपी माया सुंदर । ते इच्छा उत्तर बहुश्याम ॥५२॥

ऐसी उद्भवतां आशा । पावला पुरुष प्रकृतिदशा । यासी दृष्टांत म्हणाल जरी कैसा । घठमठआकाशासारिखा ॥५३॥

मायातीत तो परमात्मा । तत्पद जाणिजे या क्रमा । त्वं पद म्हणजे जीवात्मा । पावला भ्रमा मायिकदशा ॥५४॥

विकार मायेचा पावला । मूळ स्वरुपातें विसरला । अविद्यें वेष्टित जाला । जीव हें त्याला नाम जालें ॥५५॥

आणिक तया जाणावयासी । योग असे निश्चयेसी । तोही सांगतों परियेसी । विवेकें मानसीं सांठवी ॥५६॥

पूर्ण चैतन्य म्हणजे काय । तरी तोचि परमात्मा होय । प्रत्यङ् चैतन्याची नाम सोय । जीव पाहे तोचि तो ॥५७॥

या दोहींमिश्रित मंथनिक । साधनात्मक जाणिजे आवश्यक । त्रिगुण हे प्रापंचिक । येथोनि देख विस्तारले ॥५८॥

मूळ महातत्त्वचि हे माया । ॐकारस्वरुप साधिलें आया । ती अर्धमात्रा होऊनिया । ती गुणत्रया प्रसवली ॥५९॥

आकार उकार आणि मकार । त्रय मात्रा मिळोनि ओंकार । आतां देवतेचा प्रकार । तोही निर्धार परियसी ॥६०॥

आकारमत्रीं ब्रह्मदेव । उकारमात्रीं विष्णुस्वयमेव । मकारमात्रा तोचि शिव । गुण लाघव ऐक त्यांचें ॥६१॥

ब्रह्मयाचा असे रजोगुण । विष्णु सत्त्वगुणी प्रमाण । शिव तमोगुणी जाण । याहोनि भिन्न मूळ तत्त्व ॥६२॥

मूळ प्रकृति तोचि देहे । मातृकाअन्वयें पुरुष ॐकार होये । परवाचेचेनि सोये । अभिमानीं राहे सर्व स्वरुपीं ॥६३॥

परियेसी तेथील अवस्था । सर्व साक्षिणी दिसे पाहतां । सर्वाधिक्य तिची सत्ता । सकळ प्रसवता येथोनी ॥६४॥

आतां या त्रिगुणाचा त्रिभाग । तोही माते परियेसी प्रसंग । अंतरिंचे सांडोनि उद्योग । श्रवण चांग करी आतां ॥६५॥

येथें विलोमें करुन । तुज सांगतों त्रिमात्रेचें निरोपण । तयांचें कीजे अवधारण । एकाग्र मन करोनिया ॥६६॥

मायादेहो जेथें योजिला । तेथें अभिमानी रुद्र स्थापिला । वाचा पश्यंती बोले बोला । प्रळय अवस्थेला नेमिला ॥६७॥

हा मकारमात्रेचा विचार । तुज निरोपणीं निरोपिलें सार । आतां उकारमात्रेचा प्रकार । तोही सविस्तर परिसिजे ॥६८॥

हिरण्यगर्भ देहाआंत । उकार अभिमानी विष्णुदैवत । मध्यमा वाचा तेथें वदत । पालनार्थ रक्षिती तया ॥६९॥

दो मात्रेचा निवेदिला भाव । आतां उरला तृतीयेचा ठाव । तोही सांगतों अभिप्राव । न करीं वाव श्रवणीं तूं ॥७०॥

आकारमात्रा विराटदेहीं । तेथें अभिमानी ब्रह्मदेव पाहीं । वैखरीवाचा तये ठायीं । अवस्था तेही उद्भवार्थ ॥७१॥

रचावें सर्व या ब्रह्मदेवें । यातें विष्णूनें पाळावें । रुद्रें सकळां संहारावें । एवं करावें कार्या तिहीं ॥७२॥

आतां या त्रिमात्रेपासोन । तीन अहंकार जाले निर्माण । ते त्रिगुणिक अंशपूर्ण । यापासाव उत्पन्न ते ऐका ॥७३॥

सात्त्विक अहंकाराची उत्पत्ती । कोणती ऐकावी निगुती । निवडोनी सांगतों प्रचीती । घेईं निश्चिती बाणवोनि ॥७४॥

अंतःकरण आणी मन । बुद्धि चित्त चौथें जाण । अहंकार पांचवा निर्माण । वोळखे खूण तयाची ॥७५॥

याचा म्हणसी कोण प्रकार । तरी आत्म्याकडे करी संचार । विवेकादि सर्व विचार । येथोनि समग्र घडताती ॥७६॥

आतां राजस अहंकाराची वार्ता । परियेसी होय सावध चित्ता । श्रवण करीं एकाग्रता । तरीच सार्थकता निरोपणीं ॥७७॥

तंव अनसूया म्हणे योगिया । तूं शिणविसी निरोपणीं काया । तेवींच मी सादरें ऐकावया । नवजे वायां निरोपण ॥७८॥

आनंदोनि बोले अवधूत । राजस अहंकाराचें ऐके वृत्त । तयापासाव जाले जे निर्मित । ते मी श्रुत करितो तुम्हां ॥७९॥

पंच ज्ञानेद्रियातें व्यालें । तेवींच तन्मात्रेतें उदेलें । आणी पंच कर्मेंद्रियें निर्मिले । एवं हे जाले ते ठायीं ॥८०॥

पंच ज्ञानेंद्रियें म्हणसी कोन । तेंही सांगतो निवडोन । श्रवण घ्राण आणि नयन । रसना त्वक् नेमून स्थापिले ॥८१॥

आतां तन्मात्रेची नांवें । तेंहीं तुज सांगतो आघवें । शब्द स्पर्श रुप बरवें । रस गंध जाणावे हे पांच ॥८२॥

या कर्मेंद्रियांची खूण । सांगतों प्रगट नामाभिधान । वाचा पाणी आणी चरण । उपस्थ गुद मिळोन पांच हें ॥८३॥

ज्ञानेंद्रियें वोळखिजे ज्ञानासी । कर्मेंद्रियें राहटती कर्मासी । युक्त मात्रा या उभयांसी । सुखदुःखासी भोगविते ॥८४॥

आतां तामस अहंकारापासून । आकाश जालें हें निर्माण । आकाश उद्भव वायोपासून । वायो प्रसवून तेज दावी ॥८५॥

तेज व्यालेसें आपातें । आप व्यालें या भूमीतें । हें पूर्वीच निवेदिलें तूंतें । शून्य वीतें जालें या ॥८६॥

निशूःन्याचेंचि शून्य जालें । चैतन्यरुपें तुसावलें । इच्छामात्रें स्फुरण जालें । तत्त्व प्रगटलें महामाया ॥८७॥

तया अर्धमात्रेचा प्रसर । तोचि प्रकटला ओंकार । तेथुनी त्रिमात्रिक अक्षर । गुणप्रकार त्रिधैव ॥८८॥

उद्भव स्थिति प्रलय । त्रिकार्य हें तिघां होय । वृद्धयर्थ वेगळाचि उपाय । त्रिमात्रीं सोय काढिली ॥८९॥

त्रिमात्रिक तीन गुण । तीन अहंकार झाले उत्पन्न । तया अहंकारापासोन । वस्तु लक्षण वेगळेंची ॥९०॥

सात्विकापासोनि झाले पांच । राजसापासोनि एक पांच । तामसापासोनि एक साच । सह पांच अनुक्रम ॥९१॥

सात्त्विक अंतःकरणपंचक । राजसीं झालें त्रिपंचक । ज्ञानेंद्रिय तन्मात्रा कर्मेंद्रिय देख । एवं निःशंक उद्भवलीं ॥९२॥

तामसीं पंचभूतें झालीं । येरयेरातें प्रसवलीं । तयापासोनि जे विस्तारली । ते संख्या झाली पंचवीस ॥९३॥

आतां पंचविसांचा प्रकार । विभक्त असे गुणविचार । तें पुढील प्रसंगीं सुंदर । प्रश्नोत्तर गोड बहु ॥९४॥

अनुसूयेचिया प्रश्नासी । उत्तरें तोषवील अविनाशी । त्या निरोपणीं सुख श्रोतियांसी । योगी ज्ञातियासी आल्हाद ॥९५॥

सदयत्वें हा योगीराव । जाणे आर्थिकाचे सर्व भाव । तैसाचि दावितसे उपाव । तरावे जडजीव म्हणोनी ॥९६॥

न करी कांहीं विवंचना । बोधवी आपुलिया स्वात्मज्ञाना । आध्यात्मिक निरोपोनी खुणा । बाणवी सज्जना स्वकृपें ॥९७॥

उदार संपन्न हा गुरुदत्त । ज्ञानसूर्य हा प्रकाशवंत । विवेकें अज्ञान निरसित । ज्ञान बोधित निज दासां ॥९८॥

अनसूयेचे निमित्तें करोनी । ज्ञान प्रतिपादिता होय या जनीं । जया चाड उपजेल मनीं । तेची श्रवणीं सांठविती ॥९९॥

मुक्त मुमुक्षू अवघे जन । कराया ज्ञानगंगेमाजीं स्नान । श्रवणेंचि जाती दोष जळोन । विवरिता पावन पद पावे ॥१००॥

स्वपद करावें जीवा प्राप्त । म्हणोनि नामें प्रगटला दत्त । हा होय अनाथाचा नाथ । कृपावंत जिवलग ॥१॥

जिवाची जाणोनि वणवण । सदयत्वें बोधी आपण । जन्ममरणाचा वारी शीण । तोडी बंधन भवपाश ॥२॥

अनंत रुपीं जनीं वागें । भाविक भक्तजनीं रंगे । निवास करी संतसंगें । स्वहित सांगे गुजगोष्टी ॥३॥

जेथें संतांचे समाज । तेथेंचि वसे दत्त योगिराज । जया करुनी घेणें स्वहित काज । तेणेंचि बोज जाणिजेती ॥४॥

भावें संतसंगीं कीजे वास । पदसेवनीं असावा उल्हास । अनन्यपणें म्हणवावें दास । कधीं उदास न व्हावें तेथें ॥५॥

दिनरजनी न जाणोन । करावें प्रीतिभावें सेवन । मग तो वोळेल कृपाघन । देईल दर्शन संतसंगें ॥६॥

निष्ठाबळें घालोनि कास । भेटीविण मनीं न धरिजे आस । त्याग कीजे अन्य लाभास । राहिजे भेटीस इच्छोनी ॥७॥

संतसेवनी नुपुजे कंटाळा । ऐसिया ओळखी तो सुशीळा । मग अवधूतीं उपजे कळवळा । कळवळी बाळा माय जैसी ॥८॥

संतसेवेचें माहात्म्य विशेष । तें प्राप्त नोव्हे देवादिकांस । रात्रंदिन करिती आस । पावूं संगास म्हणोनी ॥९॥

संतचरणींची ही सेवा । कोठोनि प्राप्त आम्हां निर्दैवा । तो भाग प्राप्त मानावा । तेणेंचि या भवा दवडीती ॥११०॥

जया घडे संतसेवन । तया भाग्यासी पावेल कोण । स्वर्गादि पदें ओवाळून । टाकावे त्यावरुन यज्ञयाग ॥११॥

राम कृष्ण नामीं छंद । भावनिष्ट प्रेमें सद्गद । अद्वयपणें वागती अभेद । परमानंद गीत नृत्यीं ॥१२॥

तो ब्रह्मानंद विलोकोनी । तीर्थे पुनीत व्हावया येती धांवोनी । भावें जाती लोटांगणीं । दिव्य होवोनी स्तविती त्यां ॥१३॥

जो सकळ देवाचांही देव । जया हृदयीं ध्यातो शिव । तो हा अविनाश स्वयमेव । नाचे वैभव सर्व सांडोनी ॥१४॥

सांडोनिया मानापमान । सप्रेम कीर्तनी गेला भुलोन । सर्वातीत दिगंबर प्रगटोन । होवोनि तल्लीन भोवतां फिरे ॥१५॥

ते भाग्यवंत पाहिले । गुज संतांचें प्रगटलें । विठेवरी तें उभें ठेलें । अवीट संचलें सर्वाघटीं ॥१६॥

परी तें संतसेवेवांचोन । प्राप्त नोव्हे कवणालागोन । जरी घडे संतकृपा संपादन । तरिच कारण हातां ये ॥१७॥

संतकृपा व्हावयासाठीं । भावें जडावें चरणपुटीं । सेवा साधोनि गोमटी । घेइजे भेटी त्यायोगें ॥१८॥

संत सदय उदार शांत । पवित्र भजनीं सदा रत । अभय देवोनि शरणागत । प्रेमें आपंगीत पूर्णत्वें ॥१९॥

सकळ दुःखांतें हारिती । आपुलें सुख तया देती । स्वात्मीं सखया भेटविती । लोचनीं दाविती निजरुप ॥१२०॥

रुपीं रुपवोनि अरुपासी । नेवोनि पावविती अविनाशी । न वर्णवे तेथींचिया सुखासी । तें पद जीवासी लाभविती ॥२१॥

पहा याचि लाभासाठीं । नरजन्म दिधला शेवटीं । येथें गोष्टी त्यजोनी खोटी । साधिजे हतवटी स्वहितार्थ ॥२२॥

येथेंचि साधितां साधे स्वहित । बुद्धिबळें साधी प्याद मात । गंजिफाचा खेळितां खेळ अखेरींत । जाणा कार्यार्थ याचि गुणें ॥२३॥

हा व्हाया जरी लाभगुण । तरि धरावे संतांचे चरण । ते जीवाचें वारितील मरण । संशयछेदन करोनिया ॥२४॥

कृपें करितील अजरामर । निजधनें करितील सभाग्य थोर । खुंटवोनिया येरझार । पदा पर नेतील ते ॥२५॥

नेतां नेतील शिखरीं । कृपें ठेवितील चिदंबरीं । तेथून उठे द्वैतलहरी । लवण सागरीं मिळेल ॥२६॥

ऐसे साधु हे दयानिधी । यांतें शरण जावें आधीं । दर्शनेंचि तुटती आधिव्याधी । सर्व उपाधी तुटती संगें ॥२७॥

ते संत अनंत सद्गुरुनाथ । यांचे पदीं जडतां सप्रेमें सुत । वोळखोनि आपुला अंकित । हेतु पुरवीत आवडीचे ॥२८॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । नारदपद्मपुराणींचें संमत । सदा परिसोत भाविक संतमहतं । अध्याय समाप्त एकविसावा ॥१२९॥

## अध्याय बाविसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरु दत्तात्रेयाय नमः ॥

अहो जी ज्ञानोदयप्रकाशवंता । हे विभो सद्‌गुरु समर्था । अज्ञान अंधत्व होसी निरसिता । भवभयवारिता होसी तूं ॥१॥

तूं उदार आणि सर्वज्ञ । प्रबोधकर्ता होसी प्राज्ञ । गुणनियंता गुणज्ञ । सुप्रसन्न सुज्ञ वरदाता ॥२॥

वेदांताचा ज्ञान आगरु । सिद्धांतज्ञानें सुफळ सुतरु । अध्यात्मविद्येचा सागरु । परात्परपरु तूं गुरुवर्या ॥३॥

अनन्यभावें तुझिया चरणीं । भाळ अर्पोनी करी विनवणी । मां पाहि तूं कृपालोचनीं । भय निरसोनी अभयं दे ॥४॥

मी अज्ञान तुझें लडिवाळ । तूं सद्‌गुरु माउली स्नेहाळ । अंतरींचे जाणोनि हेतु सकळ । पुरवी आळ साह्यत्वें ॥५॥

कृपेचेनि करोनिया वाणी । तव कथामृतरस वदविजे वाणीं । भरवी आर्थिकाचे निर्वाणीं । गुह्य गीर्वाणीं प्रगटविते ॥६॥

ही नदी न सांभडे पामर । त्यासी तें जाणावया नसे अधिकार । यासाठीं प्रार्थी जोडोनि कर । वदविजे प्रखर प्राकृतीं ॥७॥

या प्रार्थनेसी देऊन मान । अंगीकारिलें बाळभाषण । मूळ आरंभापासून । प्राकृत निरोपण चालविसी ॥८॥

ऐसा तूं दत्त कृपावंत । पुरविसी अनन्याचे मनोरथ । अध्यात्मिक ज्ञान अद्‌भुत । जाणोनि भावार्थ निरोपिसी ॥९॥

गत कथाध्याय अंतीं । पंचभूतांची उत्पत्ति । अवधूत अनसूयेप्रति । भावें निवेदिती यथा क्रमें ॥१०॥

तेथोनि तत्त्वें पंचवीस । पृथकें विस्तारुं विशेष । ऐसें वदतांचि अविनाश । करी प्रश्नास अनसूया ॥११॥

या पंचवीस तत्त्वांचें विंदान । कवण जालें कवणापासून । किती तत्त्वसंख्या प्रमाण । सांगे निवडोन राजसा ॥१२॥

प्रश्न देखोनि नागर । आनंद पावला योगेश्वर । माते तुज निरोपितों विस्तार । साधी आवर ये ठायीं ॥१३॥

माते तुझा प्रश्न हा बरवंटा । योगी साधकां साधवी वाटा । हा तुझा उपकार जनासि मोठा । पाववी पेठा ज्ञानाचिया ॥१४॥

जे आध्यात्मिक ज्ञानाचे आर्थिक । त्यांसी लाभ झाला आवश्यक । त्वां हा मुमुक्षूलागीं देख । ज्ञानदीपक उजळिला ॥१५॥

या प्रकाशें विचारोनि चालती । ते मोक्षधामीं सत्य पावती । तयां नाहींच अधोगती । वाचे किती वदूं आतां ॥१६॥

माते त्वां जो प्रश्न केला । तो भाग निवेदितों तुजला । पंचभूतां पासाव तत्त्वाला । प्रसव जाला कैसा पहा ॥१७॥

एक एकापासोनि जाण । जाले असती पांच गुण । पांच पांचातें पांचीं विस्तारुन । पंचवीस प्रमाण मूळ पांच ॥१८॥

पंचभुतात्म करविला हा पिंड । पुढतीं रचिलेंसे ब्रह्मांड । आतां करुं तत्त्व निवाड । तुझी आवड पुरवावया ॥१९॥

अस्थि आणी मांस । नाडी त्वचा वरी केश । हे पृथ्वीपासाव जाणिजे अंश । गुण विशेष पांच हे ॥२०॥

वीर्य आणि हें रक्त । लाळ मूत्र स्वेद निश्चित । हे पांच गुण यथार्थ । आपीं निभ्रांत जन्मले ॥२१॥

निद्रा आणी मैथुन । क्षुधा तृषा आळस पूर्ण । हे तेजतत्त्वाचे गुण । जाले निर्माण पांच पैं ॥२२॥

चलन वलन आकुंचन । प्रसरण आणी निरोधन । एवं हे पांची उत्पन्न । वायुपासोन असती ॥२३॥

द्वेष आणी भय । क्रोध चौथा लोभ होय । मोहो पांचवा निश्चय । आकाशीं उद या तत्त्वां ॥२४॥

माते तुजलागीं भलें । तत्त्वें पंचवीस निवेदिलें । पांचांचे पृथक भाग दाखविले । वाटे राहिले गर्भींचे ॥२५॥

ते तुंज सांगतो विवरोन । तुवा ऐकिजे सावधान । तत्त्वगर्भींचे तत्त्वज्ञान । ठेवी सांठवोन सांगतो ॥२६॥

पृथ्वीपासोनि पांच जाले । ते भाग कोणाचे कोण वहिले । निवडोनि देतों पाहिजे आकळिले । वांया गेलें न कीजे हें ॥२७॥

रोमभाग आकाशाचा । नाडीभाग तो वायुचा । त्वचा भाग तेजाचा । असे आपाचा मांसभाग ॥२८॥

अस्थिभाग त्या पृथ्वीचा । एवं पर्याय अवनीतत्त्वाचा । आतां सांगतों विस्तार आपाचा । जीवीं साचा वोळखिजे ॥२९॥

वीर्य पाहतां आकाशींचें । लाल अंश त्या वायूचे । रक्त असे तेजाचें । वर्म आपाचें लघवीते ॥३०॥

स्वेद भाव या मेदिनीचा । एवं विस्तारु आपतत्त्वींचा । आतां निवेदितों भाग तेजतत्त्वीचा । घेईं जयाचा उमज देहीं ॥३१॥

आकाशाची निद्रा जाण । वायुस्वभावीं मैथुन । क्षुधातेजीं दैदीप्यमान । तृषाशोषण आपाचें ॥३२॥

पृथ्वी अंगींचा आळस । एवं तेजतत्त्वीं गुणविशेष । आतां निवेदितों वायुतत्त्वास । चंचळ मानस होउं नेदी ॥३३॥

आकाशाचें प्रसरण । वायूचा स्वभाव चंचळपण । तेजाचा स्वभाव गमन । भ्रमलपण आपाचें ॥३४॥

पृथ्वीभाग आकुंचन । एवं पंचभागीं वायुलक्षण । आतां आकाशाचें विंदान । तेंहि निरोपण ऐकिजे ॥३५॥

भयभाग आकाशीं । द्वेषभाग वायूसी । क्रोधभाग हा तेजासी । लोभ आपासी भाग होय ॥३६॥

मोहभाग हा पृथ्वीतें । एवं ओळखी आकाशातें । तत्त्वी तत्त्वें वर्तती मिश्रितें । आपुले स्वभाग ते जाणोनिया ॥३७॥

मूळीं जीं का पंच पृथक भूतें । तीं व्यालीं पंचविसातें । एवं तीस जालीं निरुतें । आणीक सहा त्यांतें मिश्रित ॥३८॥

सहा कोण तूं जरी म्हणसी । तेंहि सांगतों निश्चयेंसी । पूर्वाध्यायीं कथिले आणीं मानसीं । पंच तन्मत्रेसी वोळखिजे ॥३९॥

राजस अहंकारापासून । पंच ज्ञानेंद्रिय जालें निर्माण । पंच कर्मेंद्रिय सुलक्षण । तन्मात्रा जाण तेच ठायीं ॥४०॥

शब्द स्पर्श रुप रस गंध । ह्या पंच मात्रा प्रसिद्ध । एक एक तत्त्वीं नेमिल्या विविध । तयांचे भेद ऐकीजे ॥४१॥

शब्द आकाशीं योजिला । स्पर्श वायुतत्त्वीं भला । तेजीं नेमिले रुपाला । संयोजिला रस आपीं तो ॥४२॥

गंध पृथ्वीचे ठायीं । ऐशीं पांचीं पांच नेमिले पाहीं । यातें वोळखोनि घेइजे देहीं । जाणिजे नवलाई विवेकें ॥४३॥

अवधूत वदे अनसूयेस । पांच व्यालीं पंचवीस । एवं जालीते असती तीस । मात्रा सहांस मेळविले ॥४४॥

पांच मात्रा ह्या मेळवितां । पस्तीस जाले पाहे गणितां । या पस्तिसातें जो प्रसवता । ते तत्त्वतां पाहतां वेगळें ॥४५॥

तें प्रेमतत्त्व आगळें । असे सर्वां होवोनि निराळें । एका सद्गुरुवांचोनि न कळे । त्यावांचोनि पांगुळे सर्व तत्त्वे ॥४६॥

तें मूळ जाणिजे सर्वांचें । केवळ गुज आगम निगमाचें । जें निज योगीजनांचें । तें हें साचें सर्वात्मक ॥४७॥

या छत्तीस तत्त्वाचा झाडा । करोनि निवेदिला निवाडा । एवं रचिला हा देहो चोखडा । पाहे धडफुडा औट हात ॥४८॥

याचि देहाचे भीतरीं । तत्त्वें नांदती परस्परीं । दश पवन देहामाझारी । आपुले व्यापारीं वर्तती ॥४९॥

तव अनूसया काय बोले । त्वां मज तत्त्वें निवेदिले । तें परिसोनि आनंदलें । चित्त निवाल योगिया ॥५०॥

परि दश पवन जे तूं बोलसी । त्यांचे नाम कार्यं निवेदी मजसी । अवश्य म्हणोनी अविनाशी । निरोपी मातेसी आदरें ॥५१॥

प्राण अपान व्यान । उदान आणि पांचवा समान । हे मुख्य पंच प्राण । याहोनि भिन्न ऐक ते ॥५२॥

नाग कूर्म कृकटासी । जाणिजे देवदत्त धनंजयासी । एवं दशनामें वायूसी । आतां कार्यासी निवेदितों ॥५३॥

प्राण तो हृदयामाजीं वसे । अन्नोदक सांवरीतसें । व्यान स्वाधिष्ठानीं असे । रसशोषें करितसे धातुपुष्टी ॥५४॥

अपान वसे तो गुदस्थळीं । करी मळमूत्राची निर्वाळी । उदान वसे कंठनाळीं । अंतःकाळीं प्रगटे तो ॥५५॥

आतां पांचवा नामें तो समान । तयाचें वसतें नासिकस्थान । तो सकळ नाडींतें व्यापून । समसमान चालवी ॥५६॥

आतां पांच पवन जे राहिले । त्यांचें स्थळकार्य कोण बोलिलें । सांगतों पाहिजे स्वीकारिलें । श्रवणीं चांगलें सांठवी ॥५७॥

नाग वसे तालुकेसी । कूर्म राहे तो नेत्रासी । कृकट असे कर्णासी । विलसे मुखासी देवदत्त ॥५८॥

नासिकीं वसे धनंजय । स्थानयुक्त दाविली सोय । आतां कवणाचें कवण कार्य । तोही निश्चय अवधारीं ॥५९॥

देवदत्ताची ते जांमई । शिंक ते धनंजयाची पाही । कूर्म अवलोकीं नेत्रठायीं । कुकुट तो ऐकवी शब्द श्रवणीं ॥६०॥

तालुके नाग स्वासी । राहोनि लुब्ध तो सुवासीं । सरळत्व साधी जो अभ्यासीं । लाभ तयासी नेटका ॥६१॥

हें वर्म पाहिजे जया नरा । तेणें सद्गुरु जोडावा सोयरा । सेवेनें तोषवोंनि दातारा । मग या विचारा वर्मासी ॥६२॥

त्यांसी कृपा उपजतां पोंटीं । मग ते दावितील हातवटी । उल्लंघवोनि या त्रिपुटी । दावितील दृष्टी गुह्य गुज ॥६३॥

अविनाश म्हणे आईक । आणीक सांगतों माते कौतुक । उचकी ढेंकर अंगमोडा अचुक । निरोपणीं निःशंक राहिले ॥६४॥

यास्तव करोनी स्मरण । तुज मी करितों निरोपण । हास्य आणि रुदन । यांचेहि स्थान ऐकिजे ॥६५॥

उदानलिंगापासोन । गुचकी जाली असे निर्माण । उचलोनि प्रगटे स्वाधिष्ठान । जाणिजे खूण विचारणीं ॥६६॥

व्यानलिंगाचे ठायीं । अंगमोडा जन्मला पाहीं । तो उचंबळे सर्वदेहीं । खूण घेईअ वोळखोनि ॥६७॥

प्राणवायोपासाव । या ढेकराचा उद्भव । तृप्ति क्षुधेचा जाणवी भाव । अजीर्ण ठाव स्वाद दावी ॥६८॥

नाभीस्थानीं असे समान । तेथोनि प्रगटे हास्यरुदन । हें सुखदुःखी लाघवपूर्ण । पहां विचारुन विवेकीं ॥६९॥

आणिक एक असे प्रकार । उपप्राणाचा उद्भवविचार । कवणापासोनि कवण निर्धार । तोही सादर परियेसा ॥७०॥

आकाशापासाव कृकट जाला । वायोमाजीं नाग प्रगटला । तेजी कूर्म उद्भवला । आपीं उदेला देवदत्त ॥७१॥

धनंजय पृथ्वीपासोन । ऐसे हे पांचांचे पांच जण । आतां मुख्य प्राणाचें विवरण । तेहि सावधान श्रवण करीं ॥७२॥

वायोपासून वायो जाले । पृथक नामें प्रतिपादले । तत्त्व आश्रयें निवासले । तेहि विवरिल उपवायो ॥७३॥

उपवायों निवेदिले तूतें । आतां निरोपितों मुख्यातें । व्यान योजिला आकाशातें । समानवायोंत नेमिला ॥७४॥

उदान तेजातें योजिला । प्राण जळतत्त्वीं स्थापिला । अपान पृथ्वीतत्त्वीं भला । एवं नेम जाला मुळींचा हा ॥७५॥

मागुतीं बोधिष्णु अत्रिभार्या । सरसावलीसे प्रश्नकार्या । म्हणे अवधूता गुणवर्या । सांगे चातुर्या पुसेन जें ॥७६॥

प्राणतत्त्वाचा विचार । निरोपिला त्वां सविस्तर । आणिक एक भावितें अंतर । ऐके पुरस्कर हेतु माझा ॥७७॥

अवधूत वदे तैं माते । काय म्यां विवंचिलें तूतें । करिसील ज्या ज्या प्रश्नातें निवेदीन मी ते अर्थ तुज ॥७८॥

तुझें श्रोतेपण विशेष । मीही कांहीं नुरवीच लेश । प्रश्नाऐसें उत्तर सुरस । करोनि तव मानस तोषवीन ॥७९॥

निर्भय मनें करी प्रश्नासी । मीही उत्तरें सादर सेवेसीं । हें ऐकोनि अनसूयेसी । सुख मानसीं अपार ॥८०॥

म्हणे पंचतत्वांचें केलें निरुपण । परी नाहीं सांगीतलें आहारवर्ण । घर मुख स्वाद कोण । शस्त्रधारण काय कवणा ॥८१॥

हे श्रवणार्थी मज गोडी । तरी तूं सांगे करोनि निवडी । तत्त्वें विवरतीं कवणियाप वडीं । नुरवीं आवडी उगवोनि ॥८२॥

तंव अवधुत जोडोनि कर । मातेसी निवेदी प्रश्नोत्तर । हा श्रोतियांसी लाभ थोर । तत्वविचार फावला ॥८३॥

आतां तत्वाचा पृथकभाव । निवडोनि दावितों समुदाव । जेणें कल्पने नुरे ठाव । नलगे उगव करावया ॥८४॥

माते पृथ्वीचा पीतवर्ण । काळीज तयाचें वास्तव्यस्थान । मुख तयाचें जिव्हा जाण । आहारसेवन षड्रस ॥८५॥

स्वाद तयाचा गोड मधुर । शस्त्र पाहतां फरश सुंदर । गती षोडश अंगुळें निर्धार । जाणे प्रकार भूतत्त्वीं ॥८६॥

आपतत्त्वीं वर्ण श्वेत । तळघरीं वास त्या निश्चित । मुख इंद्रिय शोभत । आहारीं रत काममाने ॥८७॥

स्वादपाहतां जेवीं क्षीरीं । वाणी शस्त्र पाहतां सुरी । गती तया अंगुळें चारी । बावरे बाहेरी जीवनतत्त्व ॥८८॥

तेज रक्तवर्ण तें असे । हृदयीं पितृगृहींच वसे । नयन त्याचें मुख विलसे । देखणें भासे भक्ष्य त्या ॥८९॥

स्वाद तयाचा असे तीक्ष्ण । भाला शस्त्र विराजमान । प्रवाह अष्ट अंगुळें पूर्ण । जाणिजे प्रमाण तेजतत्त्वीं ॥९०॥

वायो नीलवर्ण सुंदर । फुफ्फुस तयाचें जाणिजे घर । मुख नासिक मनोहर । परिमळ आहार सेवनीं ॥९१॥

स्वाद तयाचा आंबट । खड्ग शस्त्र तया सुभट । द्वादश अंगुळ बरवंट । वावरे चोखट वायुतत्त्व ॥९२॥

कृष्णवर्ण आकाशाचा । चुनाळु ठाव त्या वस्तीचा । श्रवण मुखीं आहार शब्दाचा । स्वाद तयाचा कडवट ॥९३॥

शस्त्र तयाचें सतेज बाण । वीस अंगुळें गति प्रमाण । ऐसी आकशतत्त्वाची खूण । घ्यावी वोळखून बरवी हे ॥९४॥

हें तत्वज्ञान धन योगियाचें । लाधतील ते पुरुष दैवाचे । जे दास सत्य सद्गुरुचे । ते वर्म साचें जाणती ॥९५॥

ज्याचीं साधनें शुद्ध नेटकी । गुरुकृपा संपादी निकी । तया लोभे पवन वोळखी । होय सुखी तत्वज्ञानें ॥९६॥

हा ज्ञान जयां नाहीं । तो पशूच जन्मला नरदेहीं । लाभ न लाभेचि कांहीं । बुडतो भवडोहीं व्यर्थची ॥९७॥

काय म्हणावें तया खरा । केला नरजन्माचा मातेरा । विषयीं लुब्धोनि सैरा । जाय निगुरा नरकवासा ॥९८॥

विषयसुखातें भुलती । अहं मदें रेडे माजती । भेद अभेद उरीं वाहती । निंदा करती द्वेष बहु ॥९९॥

संत साधु गुरु देव । या सेवनीं ज्या अभाव । भोगी संपत्ति विषय वैभव । तया महोत्सव यमलोकीं ॥१००॥

तो या ज्ञानाचा न सेवी भागी । केलें कर्म तैसेंचि भोगी । नरककिडा नरकसंगीं । सुरसरंगीं रंगेना ॥१०१॥

मुक्ताफळ नावडे वायसा । तयाची प्रीति राजहंसा । भ्रमर न सेविती कुश्चळ रसा । आमोद फारसा आवडेना ॥२॥

जे सभाग्य ज्ञानी चतुर । ते अध्यात्मविद्येचें जाणती सार । नित्य ध्यानीं आणिती विचार । वस्तुपरात्पर धुंडिती ॥३॥

माते तुझी धन्य आवडी । घेसी आध्यात्मिकाची गोडी । येणें पावसी परात्पर थडी । जन्म सांकडी कैंची तुज ॥४॥

नरदहो हा दुर्लभ जाण । येथेंचि छेदितां छेदे अज्ञान । अध्यात्मविचारीं साधिजे साधन । घेइजे विचारुन गुरुमुखें ॥५॥

अध्यात्मज्ञान म्हणती कासया । पढिजे तत्त्वज्ञान व्हावया । तत्त्वाचे मूळतत्त्वीं पावावया । साधिजे उपाया आधीं आधीं ॥६॥

मूळ तत्त्व साधितां करोनि उपाय । मग ते टळती सर्व अपाय । यासाठीं धरिजे सद्गुरुपाय । वारील भय तो स्वामी ॥७॥

शरण जातां सद्गुरुसी । भय वारोनि देईल अभयासी । पद भेटवील अविनाशी । मीतूंपणासी हारपवी ॥८॥

हरपतांची मीतूंपण । अवघेंचि होईल चैतन्यघन । ब्रह्मानंदीं होय निमग्न । द्वैतपण मावळे पैं ॥९॥

सरतां द्वैताची काहाणी । अद्वय ठासावेल पूर्णपणीं । मग स्वानंद भोगिजे आत्मभुवनीं । सर्वात्मक धणी पावेल ॥१०॥

तंव अनसूया म्हणे सज्ञाना । निंबलोण करुं तुझीया गुणा । चळविलें माझिया चंचळ मना । जडविली भावना श्रवणार्थी ॥११॥

तुझें निरुपण ऐकतां । जीवीं पावली सुख समता । मायिक सांडविसी वार्ता । सावध भ्रांता त्वां केलें ॥१२॥

मोहो माया दुर्धर दरी । निबिड अज्ञानदशेचे अंधारीम । पहुडोनि लोभशय्येवरी । भ्रमित अघोरी गर्त निद्रे ॥१३॥

तंव तेथें सहा तस्कर । फोडित होते माझें घर । हें पाहती आप्तवर्ग दावेदार । मिळाले समग्र चोराकड ॥१४॥

सर्व मिळोनी एकवटले । घर फोडोनि आंत शिरले । येवोनि माते पूर्ण वेढिलें । मोहोनि केलें जडरुप ॥१५॥

ती अष्टशक्तीची मोहिनी । तिनें व्यापिलें मजलागोनी । जागृतीं नये लोचनीं । होय हानी दिसेना ॥१६॥

स्वकर्मसूत्रें पावलें बंधन । सर्वापरी होतसे हान । हें सत्पुत्रा त्वां विलोकोन । आलासि धांवोन सदयत्वें ॥१७॥

ज्ञानशस्त्र घेवोनि करीं । विवेके पिटविले शत्रु दूरी । बोध ठसवोनि अंतरीं । सावध सत्वरीं केलें मज ॥१८॥

अनुताप बाणाविला साच । लेवविलें वैराग्यकवच । तोडोनि मायिक विषयकाच । फेडिलें अशौच भ्रांतीचें ॥१९॥

आध्यात्मिक ह्या दिव्य रस । नेमिला व्हावया मज निर्दोष । तो प्रेमपात्रीं लावोनि सुखास । पाजुनी दुःखास निवटिसी ॥१२०॥

दुःख निवटूनि सुख द्यावें । जन्मरणापासोनि सोडवावें । अविनाशपदीं मिळवावें । इच्छिलें जीवें तुझिया ॥२१॥

सदय उदार तूं ब्रह्मवासी । कळवळा बहु तव मानसीं । दीनें करावीं आपणाऐसीं । सकळ जगतासी उद्धरावें ॥२२॥

तूं निरालंब निर्विकार । निष्कलंक निरहंकार । तूं चिद्घनवस्तु सर्वेश्वर । निर्विकल्प निराधार निरंजन ॥२३॥

तो तूं गा साकार होसी । त्रिगुणात्मक अवतार दाविसी । ह्या जगदोद्धार करावयासी । प्रगट होसी पुत्रत्वें ॥२४॥

म्यां तूंतें गा वोळखिलें । ज्ञानरहणीवरोनि जाणितलें । कर्तृत्वशक्तीतें पाहिलें । बोधीं पावलें आनंद मन ॥२५॥

तुजलागीं पुत्र म्हणतां । लाज उद्भवे माझिया चित्ता । तूं भवतारक होसी दाता । निमित्त योग्यता मज देंसी ॥२६॥

तंव अवधूत म्हणे माउली । ऐसी काय बोलसी बोली । अद्भुत तव कृपेची नव्हाळी । देहीं प्रज्वाळिली ज्ञानज्योति ॥२७॥

तुझिया कृपाबळें करुन । मज प्राप्त जालें सर्व ज्ञान । तें तूं बाळमुखें करुन । करिसी श्रवण प्रीतीनें ॥२८॥

ज्याचें त्यासी निवेदितां । कोण अधिक ते योग्यता । अहंता मानी हे अर्भकता । तेवीं माता नोव्हे मी गे ॥२९॥

माता पिताची मज गुरु । मज त्या कृपेचा आधारु । तुम्ही दाविला जो ज्ञानसागरु । केला अंगीकारु सांठविला ॥१३०॥

सांठविला या हृदयसंधीं । त्यातें रक्षी जीवीं सद्‍बुद्धी । विविकें लागू नेदी उपाधी । आधिव्याधि छेदक हे ॥३१॥

तुमचें ठेविक आहे हें धन । रक्षी या प्रासादिक म्हणोन । तुम्ही मागतां मजलागोन । संकट कोण तुम्हां देतां ॥३२॥

इतर धन घेतां देतां । सरोनि रिक्त उभयतां । हें तैसें नोव्हे पाहतां । न सरे वेचितां कल्पांतीं ॥३३॥

ठेविल्या ठायींचें जाईना । उणें वेंचितां होईना । घेत्याचेंही सरेना । आवरितां आवरेना विस्तारें ॥३४॥

विटेना मळेना सतेज । अंगीकारितां पावे गुज । पुरवी आवडीचें चोज । भेटवी निज नेटकेंची ॥३५॥

परिसोनि अविनाशवाणी । अनसूया अंतरीं संतोष मानी । उद्गार उदेला प्रश्न मनीं । वदे वचनीं ऐक म्हणे ॥३६॥

उदयो सांगितला तत्त्वाचा । विस्तारु निवेदिला त्याचा । ऐक्यव्यवहार सर्वांचा । वर्णादि वाचा निवेदिली ॥३७॥

परी आणिक कांहीं पुसावें । ऐसें इच्छिलें माझिया जीवें । तें आदरोनि निवेदावें । पूर्ण करावे हेतु माझे ॥३८॥

हें तत्त्वरुपें साकारलें । हें कोण गुणापासाव काय जालें । तें पाहिजे मज कळविलें । अवश्य बोले अवधूत ॥३९॥

मुख्य जो का तमोगुण । तेथोनि पंचमहातत्त्वें निर्माण । पृथ्वी आप तेज वायु आकाश जाण । हें नामाभिधान तयांचे ॥१४०॥

आतां रजोगुणाचा प्रकार । तोही ऐकें विस्तार । शब्द स्पर्श रुप मनोहर । रस गंध निर्धार विषय पंच ॥४१॥

सत्त्वगुणापासाव शुद्ध । बाहु पाणी आणी पाद । उपस्थ पांचवें गुद । निवेदिलें विविध करोनिया ॥४२॥

आतां समष्टीचे कोण । ते तूं ऐकें सावधान । श्रोत्र त्वक् आणि नयन । जिव्हा घ्राण पांचवें ॥४३॥

अत्यंत निखिल जें सत्त्व । सर्वां वरिष्ठ या महत्त्व । जया अंगीं असे शुद्धत्व । त्रिमात्रत्व प्रणवोक्त ॥४४॥

तयापासोनि अंतःकरण । मनबुद्धि चित्त जाण । पांचवा अहंकार निर्माण । जाणिजे खूण ऐसी हे ॥४५॥

हे पिंडब्रह्मांडी वार्ता । समत्वें निवेदिली आतां । देखुनी तुझी अर्थता । जालों पुरविता हेतु तैसे ॥४६॥

तंव ती पतिव्रता शिरोमणी । बोलती जाली मधुर वचनी । बा रे योगिया चूडामणी । पुरविसी अयनी इच्छिली जे ॥४७॥

सहज तूं बोलसी बोल । तेणें येती सुखाची डोल । वाढतांचि होय प्रश्नवेल । उत्तर सुफळ तुझेनी ॥४८॥

पिंडब्रह्मांडींची वार्ता एक । ऐकोनि संशय उद्भवला देख । तो संदेह फिटावया आवश्यक । प्रश्न चोख अवधारीं ॥४९॥

पिंडी वृद्धी कैसी कोठून । केवीं होय ब्रह्मांडसमान । कैसें आणिलें ऐक्यपण । आचंबित मन होतसे ॥१५०॥

केव्हडा ब्रह्मांडाचा विस्तार । पिंड पाहतां औटकर । मुंगी पोटीं साठवे सागर । नवल थोर मज वाटे ॥५१॥

ऐकोनि मातेच्या वचनासी । गद्गदा हांसे अविनाशी । केव्हडें आश्चर्य माते तुजसी । मन संशयासी पावलें ॥५२॥

तया संशयाचें निरसन । श्रीगुरुकृपें सत्य करीन । त्वांही वृत्ति राखिजे सावधान । श्रवणीं मन ठेविजे ॥५३॥

गुरु दत्तदया सागर । सिद्ध साधु योग्यांचे माहेर । सर्वेंद्र हा होय उदार । धीर गंभीर मोक्षदानी ॥५४॥

अवधूत योगियांचा राणा । होय संतांची उपासना । दत्त विश्रांतीचा ठिकाणा । संतसज्जनांवांचोनि नसे ॥५५॥

जया दत्तभेटीची आस । शरण जावें या संतांस । नित्य सेवोनि त्या चरणांस । म्हणवोनि दास पडावें ॥५६॥

संतकृपा होताचि जाण । घडविती दत्ताचें दर्शन । हें वर्म हृदयीं धरोन । अनन्य शरण अनंतसुत ॥५७॥

सप्रेम सुताचा देखोनि भाव । कृपें साहित्य पुरविती अपूर्व । आध्यात्मिक बोल अभिनव । दत्तलाघव प्रबोधपर ॥५८॥

पुढील प्रसंगीं रसभरित । प्रश्नोत्तर वदेल अवधूत । तें तुम्ही स्वीकारा गोड बहुत । गर्भस्थित गुह्य गोष्टी ॥५९॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । नारदपद्मपुराणींचें संमत । श्रोते परिसोत संतमहंत । अध्याय अद्भुत बाविसावा ॥१६०॥

॥ इति द्वाविंशतितमोध्यायः समाप्तः ॥

अध्याय तेवीसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीसद्‌गुरु दत्तात्रेयाय नमः ॥

जयजय सद्‌गुरु श्रीअनंता । सदय उदारा भाग्यवंता । अनाथनाथा कृपावंता । तव पदीं माथा समर्पिला ॥१॥

तुझे सुकुमार हे पादपद्म । भवाब्धि तरावया तारु उतम । जे भाविक सेवितील सप्रेम । स्वपदधाम देसी त्या ॥२॥

तुझिया चरणींचें तीर्थ । सकळ तीर्थां करी पुनीत । सेवितां पाप नुरवि देहांत । होय शुचिष्मंत ज्ञानप्राप्ती ॥३॥

तुझिया चरणींचे रजरेण । सहजीं पावले करितां नमन । त्याचें तुटलें भवबंधन । भानुनंदन शरण त्या ॥४॥

सहजें वंदोनि तुज कवटाळी । त्या भी काळ मग स्वकवटाळीं । देखोनि वाजवी वासव टाळी । योग्य पटाळी मान्य बहु ॥५॥

तुझी भावें घडतां प्रदक्षिणा । तो तव कृपें पावे सुलक्षणा । यम वर्णी न दे दक्षणा । करी रक्षणा गुरुपक्षा ॥६॥

तुझें प्रितीं करीं जो सेवन । तया आदरें वंदी त्रिभुवन । वर्णिती गुण करिती स्तवन । पद पावन प्राप्त तया ॥७॥

अनन्य प्रेमा धरोनि चित्तीं । भाव सद्‌गुरु तुज जे अर्चिती । त्यांच्या पुण्या नाहीं गणती । न कळे त्यांप्रती फळ कोण ॥८॥

हा शरण शरणागताचा महिमा । वर्णितां न वर्णवे जाली सीमा । तुझा पार सद्‌गुरुसर्वोत्तमा । अगमनिगमा न कळेची ॥९॥

तेथें मी गा अल्पमती । करुं काय जाणे तुझी स्तुती । म्हणोनि मौन्य सप्रेम चित्तीं । न्याहाळी मूर्ती करुणेची ॥१०॥

न्याहाळितां सदगुरु तव रुपासी । ठक पडले एकादश नेत्रांसी । पार न कळे द्विसहस्त्र नयनासी । केवीं अष्टदळासी मग पावे ॥११॥

नेत्र द्वादशें शिणला । संख्या सहस्त्राचा दीपोनि थिजला । जो जो स्वरुपा पाहूं गेला । तो तो विरला ते ठायीं ॥१२॥

तुझें स्वरुप काय कैसें । पाहतां न सांगवे जालों पिसे । वर्णावया अठावीस अतिसरसें । जालें बावळसे चांचरती ॥१३॥

रुप गुणा नाहीं अंतपार । शिणले पाहतां वर्णितां थोर थोर । तेथें केउता मी पामर । व्यर्थ बडिवार वाचा वंदू ॥१४॥

मी अत्यंत दीन अज्ञान । मतिमंद मूढ बुद्धिहीन । परी हाव मनीं वंदावे चरण । प्रेमें कवळून धरावें ॥१५॥

परी न सुचतो उपाय । तळमळ जीवीं करुं काय । कोण दावील मज सोय । म्हणोनी पाय आठविले ॥१६॥

संत सद्‌गुरु दयाघन । तेणें वोळखिलें माझें चिन्ह । वोळखोनि प्रीतीं मजलागून । सगुण ध्यान निवेदिलें ॥१७॥

ते आज्ञा वंदोनि शिरीं । ध्यान आरंभिलें हृदयांतरीं । नित्य नेमें पूजा बरी । निरोपिल्यावरी साधीत ॥१८॥

मनीं जडतां प्रेमभाव । तोचि सद्‌गुरु प्रगटला देव । मनोपचार समर्पितां सर्व । रुप अपूर्व पाहिलें ॥१९॥

षोडशोपचारें केलें अर्पण । सप्रेमें धरिलें दृढचरण । काया कुरवंडी करोन । स्तुती स्तवोन तोषविला ॥२०॥

दंडप्राय करितां नमस्कार । सद्गुरु समर्थ सदय थोर । माथां ठेवोनि अभयकर । दिधले प्रियकर आलिंगन ॥२१॥

आलिंगनीं पडतांची मिठीं । हितगुज सांगे कर्णपुटीं । म्हणे मद्रूप पाहें सर्व सृष्टी । मजविण गोष्टी आन नसे ॥२२॥

मीच बाप निर्विकार । स्वइच्छें जालों साकार । मीच नटलों चराचर । सर्व विस्तार माझाच मी ॥२३॥

मजपासाव हें ब्रह्मांड । मजमाजींच माझा पिंड । पिंडी दावीं मी सुरवाड । माझेनि गोड सर्व दिसे ॥२४॥

मी वसतां वसलें पाहीं । मी नसतां नसे कांहीं । मीतूंपण एक ठायीं । करोनि घेईं त्या अर्था ॥२५॥

मी तूं अक्षरें दोन । पाहे लोमविलोमें करोन । तोचि अर्थ राहे गिळोन । चकार घालोन मध्यस्त ॥२६॥

सद्गुरुकृपेची हे समज । साधवितां साधली तैं उमज । तो आनंद साठवोनी मज । सांगणें नुमज सांगवेना ॥२७॥

हें वर्म जेणें दाविले । तया हृदयस्थातें वंदिलें । सद्गुरु अनंता विनविलें । सबाह्य पाहिलें रुप त्याचें ॥२८॥

अनंत रुपीं नटला अनंत । तोचि जगद्गुरु प्रगटला दत्त । त्रिगुणात्मक मूर्ती गुणातीत । संख्या चोविसांत अवतार हा ॥२९॥

तो विदेहात्मक स्थिती वर्ते जगीं । अविनाश वृत्ती सदा निःसंगी । पंचमाश्रमी निजानंद भोगी । स्वात्मरंगी रंगला तो ॥३०॥

जगदोद्धाराचिया कारणा । अवतारचरित्रें दावी नाना । ये अवताराची अतर्क्य रचना । हो योगिराणा योगवासी ॥३१॥

सच्चिदानंदमूर्ती अविनाशी । स्मरगामी असती निश्चयेंसी । देती दर्शन भाविकांसी । पुरविती अर्थासी तयांच्या ॥३२॥

आपुलें जें गुह्यधन । द्यावयासी उदार पूर्ण । परी घेतां कोण्ही विरळाची जाण । कामीजन येर सर्व ॥३३॥

परी अद्वयपणें तो अभेद । जैसा जया मानसिक छंद । तो पुरवोनि दे त्या आनंद । कृपें आल्हाद उपजवी ॥३४॥

पूर्व सुकृत आचरणें भेटी । होय परि न घडे स्वात्मगोष्टी । सिद्धि विषय भोग चावटी । मागती हाटीं बैसोनिया ॥३५॥

मग जैं जया साचा निग्रह पुरा । तो कळतसे जगदोद्धारा । इच्छित मनोरथ करोनि पुरा । दिगंतरा जाय त्वरें ॥३६॥

अवघे विषयाच्या भ्रमणीं । निष्काम नैराश्य न भेटे कोण्ही । हेचि इच्छा अवधूताचे मनीं । स्वात्मत्व धणी द्यावयाची ॥३७॥

यास्तव न बोले कवणासी । मौनचि धुंडी सत्पात्रासी । तो अकस्मात सोमवंशी । यदु अवधूतासी भेटला ॥३८॥

अविनाशमूर्ती पाहतां । संतोष जाला यदूच्या चित्ता । अनन्यभावें जाला स्तविता । परम लीनता धरोनी ॥३९॥

विसरवोनि आपुले वैभवासी । दुरी त्यजोनि भूपत्त्वासी । किंचित ऊर्मी नाणोनि मानसीं । शरण पदासीं पैं जाला ॥४०॥

विषयसुखातें धिःकारिलें । आपुले वपूतें बहु निंदिलें । अनुतापें मन तापलें । हृदय जालें सद्गदित ॥४१॥

अष्टभाव दाटले हृदयीं । स्तवोनि प्रेमें लागला पायीं । अंतर वोळखोनि ते समयीं । जाला तये ठायीं स्थिर योगी ॥४२॥

निःस्पृहतेचें करोनि उत्तर । शोधिलें रायाचें अंतर । अहेरणघणीं हीरा गार । सोनें घेणार पाहती कसीं ॥४३॥

तेवी कसोनि पाहतां । खरी रायाअंगीं मुमुक्षुता । वोळखोनिया देवदत्ता । उपजली चित्ता दया बहु ॥४४॥

करोनि तयाचा अंगीकार । मस्तकीं ठेविला अभयकर । प्रबोध करोनि केला स्थिर । स्वात्मत्व विचार बाणविला ॥४५॥

आत्मस्वरुपीं बिंबवोन । अविनाशपदीं बैसविला नेवोन । मन करोनिया उन्मन । काजकारण आज्ञापिलें ॥४६॥

यदु प्रथम शिष्य दत्ताचा । अद्यापि वाखाणिती कवी वाचा । भागवतीं संवाद कृष्ण उद्धवाचा । चोवीस गुरुंचा गुणग्राह्य ॥४७॥

हे कथा पूर्वी निश्चिती । श्रवण केली संतश्रोतीं । किंचित अनुसंगें आली पुढती । तरी कृपावंतीं न कोपावें ॥४८॥

पात्रीं जेवण जेवितां । पदार्थ मात्र दिसे पाहतां । परी मागून सेवणें पुढतपुढतां । आपुलिया स्वार्था रुचीच्या ॥४९॥

तेवींच संदर्भसाधनी । वर्णिलेंचि आणावें वर्णनीं । यासी दोष न ठेविजे सुज्ञीं । विचार मनीं जाणोनिया ॥५०॥

असो हें कृतयुगींचें निरोपण । अवधूतें यदु केला पावन । त्रेतायुगीं सहस्त्रार्जुन । जाला शरण गुरुदत्ता ॥५१॥

अनन्यें तो विनय जाला । सेवनीं अवधूत संतोषविला । मुमुक्षूपणें प्रश्न केला । बहुत स्तविला जगद्‌गुरु ॥५२॥

देखोन तयाचा सेवाभाव । प्रसन्न जाला योगीराव । अनुग्रह देऊनी अपूर्व । स्वात्मानुभव बोधिला ॥५३॥

आध्यात्मिक जें वेदांतज्ञान । सिद्धांत कथिला तयालागोन । पिंडब्रह्मांड भूगोलवर्णन । आत्मत्व संपूर्ण बोधवी ॥५४॥

ज्ञान विद्या कला नीती । सकृपें अवधूत देत तयाप्रती । अभेदकवच लेववी विभूती । बळ संपत्ती पराक्रम दे ॥५५॥

क्षत्रियांमाजीं अनिवार । वीर पराक्रमी अति थोर । याचे उपमेसी अवनीवर । अस्त्रधर असेना ॥५६॥

या सहस्त्रार्जुनें बळें करोनी । पराक्रमें जिंकिली अवनी । कोण्हा न भिडवेचि समारांगणीं । राहती होवोनि शरण त्या ॥५७॥

तो अजिंक्य जाला सकळा । सुरां मानवां आणिली अवकळा । धाक लाविला कळिकाळा । प्रतापज्वाळा धडकल्या ॥५८॥

दत्तकवच तया अंगी । कोण्ही नसेचि बळिया भंगी । यश पावे सर्व प्रसंगीं । वीर निःसंगी सहस्त्रार्जुन ॥५९॥

तेजस्वी उगवतां भास्कर । नक्षत्रें लोपली समग्र । अंबरीं दिसे जरी निशाकर । होय साचार तेजहीन ॥६०॥

बृहस्पतीचिया वादापुढें । मूर्खसमुदाय दिसती बापुडे । गज पराक्रमी सिंहा भिडे । हें तों घडे तेजहीन ॥६१॥

तेवीं सहस्त्रार्जुन वीर निधडा । कोण्ही न पवेचि त्या पडिपाडा । दत्तप्रसादें करीत रगडा । नुरवी झगडा करील त्या ॥६२॥

प्रतापें भरलें भूअंबर । सर्वांतें केलें तेणें जर्जर । जैसादिवा तपें दिवाकर । दुजिया संचार करवेना ॥६३॥

हें अनिवारत्व पाहोन । चिंत्तार्णवीं पडले देव संपूर्ण । ते श्रीविष्णूचें करिती आराधना । स्तुतिस्तवन अनन्यत्वें ॥६४॥

तवं अभयाची वाणी । पडती जाली देवश्रवणीं । धरितो अवतार श्रेष्ठवर्णीं । स्वस्थ स्वस्थानीं असावें ॥६५॥

क्षत्रिय माजले अपार । पाप आचरती ते अनिवार । पीडा पावती ऋषिभार । मोडिती अध्वर द्वेषगुणें ॥६६॥

भलतेसे कर्म आचरती । मर्यादा कोण्हाची न मानितीं । मस्त रेडयापरी माजले क्षितीं । त्यांची अनीती न वर्णवे ॥६७॥

क्षितीस न साहे पापभार । हें देखोनिया सर्वेश्वर । त्वरें धरिता जाला अवतार । दुष्टसंहार करावया ॥६८॥

सर्व वर्णांसी गुरुत्वें ब्राह्मण । आणि क्षत्रिय शिक्षावया योग्य स्थान । तरी याच कुळीं अवतार धरुन । साधावें कारण सर्वहितां ॥६९॥

तंव तपोधनामाजीं श्रेष्ठ । मुनी जमदग्नी वरिष्ठ । तामसगुणें अति कोपिष्ठ । तप उत्कृष्ठ साधिलें ॥७०॥

तयाची कांता रेणुका । परम सुशील ती अंबिका । पतिव्रता शिरोरत्न जगदंबिका । न तुके तुका पार्वती ॥७१॥

परम पवित्र तिचें जठर । तेथें प्रभूनें धरिला अवतार । नवमास भरतां निर्धार । प्रसवे सुंदर योग साध्वी ॥७२॥

सहजीं कोण्ही लाभकारणा । करोनि जाती मुहूर्तविचारणा । हा तंव जगतीं उद्धारणा । करुं पालना अवतारे ॥७३॥

पूर्ण व्हावे सकळांचे मनोरथ । अवतारींचा साधावा कार्यार्थ । यास्तव निरखोनि सुमुहूर्त । प्रयाणी साधीत वेळ निका ॥७४॥

मंगळ सुकार्या निश्चित । संवत्सरीं साधिले दिवस सात । तयामाजीं रजनीचा संकेत । औट यथार्थ स्थापिला ॥७५॥

तैसेचि औट असती दिन । त्यांत नाहीं दोषगुण । सुमुहूर्त सकळां प्रमाण । ऐसें वचन वेदशास्त्रीं ॥७६॥

याचा विस्तार सांगतां । ग्रंथीं वाढेल बहुत कथा । सारचि घेतलें कार्यार्था । विस्तारवार्ता टाकोनी ॥७७॥

तवं श्रोते म्हणती वक्तिया । सांग जयंती निवडोनिया । उपासकालागीं कळावया । आचरावया व्रतसार ॥७८॥

जी जी श्रोते सावधान । करावें जन्मकथारसपान । विमानीं दाटले सुरगण । करिती अवलोकन समयासी ॥७९॥

भरोनि पुष्पांचे संभार । वाट पाहती अवघे सुर । किन्नर गंधर्व अप्सर । विद्याधर देवांगना ॥८०॥

सकळांचे लागलेति नयन । चातकाऐसें वेधलें मन । संधि ऐकावया योजिले कर्ण । तें पर्व कोण अवधारा ॥८१॥

वसंतऋतु वैशाखमास । शुक्लपक्षीं तृतिया दिवस । मृगसुकर्मायोग विशेष । प्रगट इंदूस अभेजितीं ॥८२॥

अवतार होतांचि प्रगट । विमानी तुरे वाजती अचाट । पुष्पें वरुषती घनदाट । वर्णिती भाट बंदीतें ॥८३॥

ताल मृदंग वाद्यें नाना । गाती गंधर्व संगीत नाना । दुंदुभी वाजती शब्द दनाना । घंटा घणाणा वाजती ॥८४॥

देखोनि सुरांचा आल्हाद । घोष करिती ऋषिवृंद । वेदोक्त देती आशीर्वाद । परमानंद नारीनरां ॥८५॥

प्रेमाचीं उभारलीं मखरें । स्वानंद तोरणें परिकरें । उल्हास गुढिया फडत्कारें । जिव्हाळा नीरें हेल वाहती ॥८६॥

द्विज मिळाल्या सुवासिनी । तोषविती सौभाग्य साखरपाणी । रात्रिवर्ग दाही दिनीं । केला द्विजगणीं गजराने ॥८७॥

शांतिपाठ दहा दिवस । शुद्ध स्नान अक्राव्यास । बारसें करोनि बाराव्यास । तेराव्यास पालख तो ॥८८॥

वाद्यें वाजती परोपरी । वाणें विडा आणिती नारी । न्हाणेनि माता बाळ शृंगारी । पालखातरीं घातला ॥८९॥

नाना प्रकारीं हाल्लर । गीत गाती गोड मधुर । पालख गावोनिया सुंदर । करिती गजर रामनामें ॥९०॥

शर्करा सुंठोडा पानें । हरिद्रा कुंकुम वांटिती मानें । नामकर्म जातकर्म क्रमानें । करोनि दानें देती द्विजा ॥९१॥

तेथें उपाध्या पुरोहित । अत्रि अग्रगण्य विख्यात । कौतुक पहावया स्वामी दत्त । पावला पुनीत त्यासंधीं ॥९२॥

सकळ विधी संपादिला । समूह सन्मानें बोळविला । देवऋषि वर्णीत बाळा । आपल्या स्थळा पावले ॥९३॥

दिवसमासें तो बाळ । वाढतां मौंजी केली तात्काळ । दीक्षा होतांचि विद्या प्रबळ । पढे सकळ गुरुआज्ञें ॥९४॥

गुरु आणि पितयापासून । संपादिलें अवघें विद्याधन । कला विद्या कौशल्य पूर्ण । लाधला आशीर्वचन गुरुचें ॥९५॥

आणिक बंधु असती । परि ऐसी नयेचि गति । हे प्रत्यक्ष अवतारमूर्ती । कोण पावती सरीया ॥९६॥

स्वकर्मी साधी तपाचरण । ब्रह्मचर्यव्रत निर्वाण । सर्वदा मुखीं वेदध्ययन । जेवीं नारायण तपतसे ॥९७॥

तया तपातें तोषोनि फार । प्रसन्न झाला श्रीगंगाधर । धनुर्विद्या देऊनी समग्र । अभयकर दीधला ॥९८॥

त्र्यंबक धनु आणि फरश । ते वज्रतुल्य दिधले त्यास । कदा न पावे हे अपेश । साधले यश समरांगणी ॥९९॥

भार्गवासि सांगे उमारमन । येणें शत्रू पावतील मरण । याचिया तेजा पुढें टिकोन । न राहे जाण कोण्हीही ॥१००॥

जया कारणासाठीं । तूं अवतरलासी या सृष्टीं । तया सहस्त्रार्जुना येणें निवटी । क्षत्रियां अटी येणेंची ॥१॥

यापरी प्रसाद करोनी । कैलासीं गेला शूळपाणी । रामें आयुधें अंगीकारोनी । शिवध्यानीं नित्य अर्ची ॥२॥

तो भार्गव महावीर । धरोनि मातेचा कैवार । क्षत्रियां करोनि समर । करी संहार पराक्रमें ॥३॥

महावीरांतें विभांडिलें । भूमि सांडोनि भयें पळाले । हरिलीं क्षत्रियांची बळें । पराभविलें परशरामें ॥४॥

हें सहस्त्रार्जुनें ऐकोन । करुं पावला समरांगण । फरशधरें त्र्यंबक सज्ज करोन । युद्ध निर्वाण पैं केलें ॥५॥

अनिवार योद्धा सहस्त्रकर । तेणें देखोनि विकट समर । पांच शत धनुर्ष्यी लावोनिशर । वर्षे अपार घनदाट ॥६॥

अस्त्र अस्त्रासी झगटती । रथ रथासी थडकती । शराग्नी रणीं भडकती । विमानें पळविती सुरभेणें ॥७॥

रामार्जुना होय झगडा । येर येरां करिती निकुरे रगडा । क्रोधें चाविती अधरदाढा । न धरोनि भिडा भिडती रणीं ॥८॥

राम योद्धा अनिवारु । करीत सेनेचा संहारु । छेदिले अर्जुनाचे रथ वारु । उडवी शीरु सारथ्याचें ॥९॥

सहस्त्रार्जुनें करोनि त्वरा । चढे दुसरिया रहंवरा । शर वर्षोनीं प्रळय थारा । पेटला मारा प्रळयत्वें ॥११०॥

दिव्य बाण वेगीं लावोन । तोडिला रामाचा स्यंदन । वारु सारथी मारोन । विरथ करोनि टाकिला ॥११॥

विरथ होतांचि फरशधर । क्रोधें पेटला अनिवार । बाणें छेदिला रहंवर । भेदिलें तूनीर चापमाळा ॥१२॥

जंव जंव तो सहस्त्रार्जुन । घे रथ तूनीर चाप बाण । तितुकेहि तोडी न लागतां क्षण । चपळ संधान रामाचें ॥१३॥

रथ शस्त्रें तोडिलीं असंख्यात । किती म्हणोनी नाहींच गणित । उभय वीर रथरहित । समरीं तळपत पदगामी ॥१४॥

उभयही करोनि गर्जना । वर्मीं खोंचती वाग्बाण । निकुरें साधोनि संधाना । वर्मस्थाना ताडिती ॥१५॥

एक मेरु एक मांदार । एक त्रिपुर एक शकर । कीं कश्यपू नरहर । ऐसे वीर दोघेही ॥१६॥

मदोन्मत्त दोघे भिडती । कोणी कोणासी नाटोपती । विमानीं देव अवलोकिती । धन्य म्हणती उभयतां ॥१७॥

राम ताडी क्रोधेंकरुन । परी सहस्त्रार्जुना न रुते बाण । फरशें करिता झाला ताडण । तेणें खंडण रोम नोहे ॥१८॥

आश्चर्य मनातें वाटलें । मग राम कैलासी पावले । शस्त्रें शिवातें अर्पिलें । काय बोले वचन त्या ॥१९॥

म्हणे शिवा चंद्रमौळी । तव प्रसादा म्हैसी लागली । युद्धीं धारा फिरोनि गेली । नाहीं रुपली सहस्त्रार्जुना ॥१२०॥

आतां तयाच्या वधासी । काय करावें सांग मसी । उणीव आलें आम्हातुम्हासी । हानी ब्रीदासी होउं पाहे ॥२१॥

ऐकोनि रामाचें उत्तर । तात्काळ उठला तैं शंकर । येवोनी सहस्त्रार्जुनासमोर । प्रकट सत्वर शिव झाला ॥२२॥

पाहोनिया स्मशानवासी । सहस्त्रार्जुन लागे चरणासी । पीनाकपाणी वदे तयासी । कां तुम्हांसी शस्त्र न रुपे ॥२३॥

मग सहस्त्रार्जुनें जोडोनि पाणी । बोले शिवासी प्रार्थोनी । आपण वर्म विचारितां मजलागोनी । करितों चरणीं विदीत ॥२४॥

महाराज स्वामी समर्थ । दत्त दिगंबर अवधूत । अत्रि अनसूयेचा म्हणवी सुत । तो सद्‌गुरुनाथ माझा कीं ॥२५॥

भावें विनटतां त्याचे चरणीं । तेणें तोषविलें मज कृपादानीं । अभेद कवच लेववोनी । आत्मत्व देवोनि मज गेले ॥२६॥

सद्‌गुरु माझा अविनाश । तोचि तूं होसी गा महेश । तुमच्या प्रसादा लावील दोष । हें तों आम्हास दिसेना ॥२७॥

ऐकोनि शिव रामा पाहे । म्हणे हें वर्म सत्यचि आहे । फरशधार केंवी वाहे । काळ राहे उगाची ॥२८॥

अद्‌भुत दत्ताची करणी । कोण उल्लंघू शके त्यालागोनी । तो प्रगटला विश्वोद्धारणी । अलोट देणी तयाची ॥२९॥

युगायुगीं अनंत अवतार । होती जाती न कळे पार । परी अवधूत अविनाश निर्धार । अगम अगोचर मूर्ति हे ॥१३०॥

तेणें पूर्वी यदु बोधिला । तेवीच हा सहस्त्रार्जुन उपदेशिला । यापुढें न चलती कांहीं कळा । बळें आगळा गुरु वर दे ॥३१॥

तवं भार्गव वदे शिवासी । अवतार संबंध तूं जाणसी । उभय पक्ष आणोनि मानसीं । योजी उपायासी सर्वेशा ॥३२॥

परिसोनि भार्गवाचें उत्तर । सहस्त्रार्जुनासी वदे शंकर । धन्य पावलासी सद्‌गुरुवर । कृपाकर मस्तकीं ॥३३॥

नधनें जालासि सधन । पावलासि दत्तकवच अभेद पूर्ण । भोगिलें संपत्ति वैभव स्वबळें करोन । आयुर्यशधन विपुलतें ॥३४॥

सकळ जगतींचे उपभोग । पराक्रमें भोगोनि केले योग । व्रतेंदानें सांगोपांग । फेडिलासे पांग क्षत्रियांचा ॥३५॥

जाणसी वेदशास्त्रींच्या भेदा । वोळखिसी गर्वपद आपदा । राखिसी सकळांची मर्यादा । अर्भकछंदा नातळसी ॥३६॥

विवेकी ज्ञाता प्रौढ होसी । पाहतां पद पावला अविनाशी । मग सांग कां गुंतावें वासीं । आयुर्मर्यादेशी उल्लंघोनि ॥३७॥

ऐकोनि शिवाची उक्ती । जाणीतल्या अंतरींच्या क्लृप्ती । मग अत्यंत करोनिया शिवस्तुती । करी विनंती आदरें ॥३८॥

अहो जी देवा शूळपणी । जें आपण उपदेशिलें मम श्रवणीं । तो गुह्यार्थ जाणितला मनीं । मजकारणीं अवतार हा ॥३९॥

तुझी आज्ञा नुल्लंघीं कदा । नेम नुल्लंघी मर्यादा । येथोनि पावे विशादा । आपुलिया पदा मज नेई ॥१४०॥

मदर्य अवतार ह्रा व्हावया मान । तव दत्तशस्त्रीं न घडो अवमान । सद्गुरुप्रसाद न घडो खंडण । राखिजे समान सर्व भावा ॥४१॥

ऐकोनी बोलाची चातुरी । संतोषता जाला त्रिपुरारी । म्हणे जैसें इच्छिलें त्वां अंतरी । पावसी निर्धारीं भाष्य माझें ॥४२॥

तुज न घडवितो निर्वाण । परी या स्पर्शाला क्षत्रियांचा दुष्ट गुण । तुज आश्रयें माजलें पूर्ण । पापाचरण आचरलें ॥४३॥

विषयलोभें बुद्धिमंद । अति उन्मादें जाले अंध । न विचारोनि शुद्ध अशुद्ध । बळे अपवाद घेतले ॥४४॥

आचरोनि नाना दुष्टचरणें । ग्राह्य केलीं दुर्व्यसनें । श्रेष्ठ पदा लाविली दूषणें । आणि विटंबणें आरंभिली ॥४५॥

उपसर्ग दिधले द्विजांसी । स्पर्धा केली महत्पदासी । त्रास दिधला सुजनांसी । यज्ञयागासी निर्भत्सिले ॥४६॥

अपराध आचरोनी बहुत । केले पापाचे पर्वत । अभक्ष्य भक्षणीं उन्मत्त । भोग भोगित अभोग्य जे ॥४७॥

त्यांचिये बुद्धीं तूं भ्रमलासी । तुजही घडलीं आचरणें तैसी । स्पर्धा करोन सुरां मानवांसी । नष्ट पदांसी त्या केलें ॥४८॥

वेदविरुद्ध कर्म केलें । गाई ब्राह्मणांतें पीडिले । याग यज्ञ तुच्छ मानिलें । बहुत पिडिलें संतद्विजां ॥४९॥

जाला भूमीसी क्षत्रियभार । न साहे इतें हा अणुमात्र । यदर्थी भार्गवाचा अवतार । करील संहार पराक्रमें ॥१५०॥

तुझें पूर्वीचें विशेष सुकृत । इह जन्मीं सद्गुरुकृपा प्राप्त । हें जाणोनि मी साक्षात । तुज बोधार्थ प्रगटलों ॥५१॥

बोध करितां बाणला तुजसी । त्वांही प्रार्थोनि मागितलें मजसी । तें पद तूं आतांचि पावसी । स्मरें मानसीं गुरुवर्या ॥५२॥

धन्य सद्गुरु दत्तयोगि राणा । त्याचिया करितां नामस्मरणा । तात्काळ पालटोनि देहभावना । शिवीं जीवपणा मुराला ॥५३॥

एवं श्रीदत्त अनुग्रहीं । दो युगांत दोन शिष्य पाहीं । आणि या द्वापारयुगाचे ठायीं । उपदेश नाहीं प्रगटविला ॥५४॥

परि या जगदोद्धाराठीं । दया फारसी दत्तपोटीं । म्हणोनि मातेसि सांगे गुह्यगोष्टी । अध्यात्मवृष्टी करोनिया ॥५५॥

जगतीं हेचि जाणिजे माता । अवधूत द्रवला जनांच्या हिता । बोधरुपें होय अनुग्रहिता । धन्य तारकता समर्थाची ॥५६॥

करावें मुमुक्षूंचें कल्याण । यदर्थींच अनसूयेचे असती प्रश्न । करी दत्त तयांचें निरसन । तेवींच ज्ञान आध्यात्मिक ॥५७॥

मागिले अध्यायाचे अंतीं । प्रश्न अनसूयेचे असती । ते ऐकिले परम प्रीतीं । तुम्ही श्रोतीं आदरें ॥५८॥

तया प्रश्नांचें उत्तर । बोलतसे पहा दिगंबर । श्रोते श्रवणीं होवोनि सादर । परिसा नागर पिंडरचना ॥५९॥

नाना शास्त्रींचें संमत । निवडोनि सांगतसे अवधूत । तो महाराज सदय समर्थ । कळावया अर्थ निवेदी ॥१६०॥

पिंडज्ञानावांचोनी । वेदांत बोलती कहाणी । आत्मानुभवाची लेणीं । तयां कोठोनी प्राप्त होती ॥६१॥

आपुलें आपणां न कळे कांहीं । श्रवणीक ज्ञान कथीं पाहीं । अनुभवावांचोनि लाभ नाहीं । जन्मोनि देहीं मूढ तो ॥६२॥

आत्मानुभव गांठीं धन । तो पुरुष गा सभाग्य पूर्ण । तोचि परतीरा पावे जाण । नेईल आन स्वसंगे ॥६३॥

तो पुरुष गा असे विरळा । त्याची न कळे कोण्हासी कळा । तो जगीं वावरोनि निराळा । खेळे खेळां अंतरंगीं ॥६४॥

स्फटिकापरी तो असे । रंगीं रंगातुल्य दिसे । कुरळीं ठेवितां भांग भासे । पाहतां नसे कांहीं तो ॥६५॥

म्हणोनीया जगासी । कदापि तो नये वोळखीसी । वर्म कळे वर्म ज्ञानियासी । येर इतरांसी काय कळे ॥६६॥

जग हें मायावेष्टित जाण । तिमिर अंधत्वें दाटलें दारुण । मोह लोभें गेलें भुलोन । ज्ञान कोठोन कैंचे या ॥६७॥

अज्ञानयोगें सर्व बुडती । म्हणोनि दया उपजली दत्तचित्तीं । जगद्गुरु हा कृपामूर्ती । रची युक्ती तरावया ॥६८॥

माता निमित्तासि योजून । जगोपकारार्थ निरोपी ज्ञान । प्रबोध अनुग्रह सर्वांलागोन । करीं आपण स्वयें दत्त ॥६९।

तो गुह्यार्थ प्राकृतीं । लिहितों श्रवण कीजे श्रोत्रीं । साठविजे एकाग्र चित्तीं ।

बुडी अर्थीं देवोनिया ॥१७०॥

तंव श्रोते म्हणे वक्तिया । क्षुधित श्रवण ऐकावया । कैसे संवाद होती उभया । ते विवरोनिया सांग आतां ॥७१॥

दत्तप्रबोधीं अद्भुतगोडी । ते ऐकावयाची आम्हां आवडी । तुझिया निरोपणें जोडेल जोडी । वासना कुडी खंडेल ॥७२॥

वक्ता विनवी कर जोडोन । श्रोतीं श्रवण कीजे सावधान । दत्त प्रार्थी मातेलागून । पिंडप्रकरन परियेसी ॥७३॥

शिव सांगे भवानीसी । ते कथा माते निवेदितों तुजसी । एकाग्र चित्त देइजे कथेसी । नाणीं मानसी अन्य वार्ता ॥७४॥

स्त्रीपुरुष हे उभयतां । स्वच्छंदें उल्हासें रमतां । रमणीसीं रममाण होतां । प्रेमचित्ता उद्भवे ॥७५॥

ब्रह्मस्थानींचा सिंधू । तो उचंबळतां पडे बिंदू । उत्तरें मणिपुरमार्गें न करोनि शब्दू । रवरव गद्गदू वदवेना ॥७६॥

उभय प्रेम ऐक्यवेळां । नळनीय बिंदू वोतिला । तो कमळगर्भीं प्रवेशला । त्रिगुणी जाला मेळ तेथें ॥७७॥

रक्तबिंदु तिसरा पवन । हे एकत्व जाले असती त्रिगुण । एक ठायीं गेले मुसावोन । वाढे तो गुण वेगळाची ॥७८॥

अमृताचा वर्षे तुषार । तो सत्रावींचा जाण प्रकार । त्यायोगें वृद्धि साचार । फुटती अंकुर भागात्मकें ॥७९॥

या स्वाधिष्ठानावरुती । आणि मणिपुराखालती । उभयांचे मध्यवर्ती । पिंड निश्चिती वाढूं लागे ॥१८०॥

प्रथम मासीं शुद्ध गोळा । तया अंगी वाढती कळा । द्वितीय मासीचा सोहळा । शिरकमळा प्रगटवी ॥८१॥

तिसरे मासीं चंद्रसूर्याचीं। बैसतीं ठाणें तयांचीं । देखती दृष्टी अंतरींची । आकृती कमळाची पसरली ॥८२॥

चौथे मासीं शाखा चार । तया नामें चरण कर । पल्लव फुटले अपार । जाला विस्तार अस्थि शिरा ॥८३॥

पांचवे मासाभीतरीं । पंचभूत आत्म निर्धारीं । पंचतत्त्वाची व्याप्ती बरी । सर्वांतरीं व्यापिली ते ॥८४॥

प्रेमतत्त्व तैं संचारलें । हंसत्वें माझारीं बिंबलें । साकार रुपें विस्तारलें । साक्षित्वें वसलें ते ठायीं ॥८५॥

षट्‌कमळें मासीं साहाविया । आणि फुटल्या अंगोळिया । मुखघ्राण आकृतिया । ठायठायां निपजती ॥८६॥

सप्तधातु सातवे मासीं । नखें केश उद्भवले देहासी । पिंड येतसे आकारासी । डोहोळे मातेसी जाणवती ॥८७॥

आठवे मासीं अष्टांग । सबळ जालीं सांगोपांग । तयामाजी न दिसे व्यंग । करी ढंग मग हाले चळे ॥८८॥

आठव्यांत जाली सिद्धता । जीवशिवा नेमिली स्थानता । तें सांगतों ऐकिजे आतां । सावध श्रोता लक्ष दीजे ॥८९॥

शंखिनीनाळें जीव संचरे । शिव विरुढे सुषुण्माद्वारें । बंकनाळें रस भरे । जीव पुरस्कारें ते सेवी ॥१९०॥

जीवा भोगणें गर्भवास । तेथें जपे सोहंमंत्रास । उबगोनि तेथें पावला त्रास । करुणा शिवास उदेली ॥९१॥

मास मानवतांचि नवम । बळावले तेव्हांअ इंद्रियग्राम । चलन करी व्हावया निर्गम । साधी क्रम प्रयाणीं ॥९२॥

ते व्यथा मायेसी जाणवली । कळाव्याप्ति उदरीं जाली । प्राणांत वेळ सोसिली । द्वारें फांकली आपोआप ॥९३॥

तैं प्रसूतीचा उद्भवला वात । कमळांतुनी गर्भ सुटत । माय अंगांतुनी रीग करीत । जननी आक्रंदत तेधवां ॥९४॥

उदरा बाहेरी तो आला । बाह्य वायो त्या स्पर्शला । मुख्य जपतपातें विसरला । टाहो फोडीला कोहं कोहं ॥९५॥

आपआपणातें विसरोन । कोहं टाहो फोडितां जाण । तव तो क्षुधानळ पेटला दारुण । माया आवरण वरी घाली ॥९६॥

असो आधीं रचिला पिंद । मग हें रचिलें ब्रह्मांड । नववें मासीं नवखंड । रचली प्रचंड धरा हें ॥९७॥

हें औट मात्रीं युक्त । येथेंचि औट लोकसमस्त । औट करायाची गणित । वोळखोनि निभ्रांत घेइजे ॥९८॥

माया हीच पंचभूतें । ती व्याली पंचभूतातें । माजीं मिळविलें पांचातें । वरी मुख्यातें ते स्थानें ॥९९॥

तें म्यां तूंतें मागें निवेदिलें । छत्तीसही विभक्त दाविले । दश प्राण योजुनी भले । श्रुत केलें कार्य आहारा ॥२००॥

रुचि शस्त्र वर्णद्वार । प्रचीतीस दाविलें सर्वांचें घर । इंद्रियाचें नेमुनी प्रकार । तोही विचार श्रुत केला ॥१॥

येथें किमपि द्वैत नाहीं । पिंडी ब्रह्मांड एकचि पाही । विवेकें शोधितां देहीं । सर्व ठायीं पडेल ॥२॥

शोध करुं जातां बळें । हातीं न चढे कदा काळें । गुरुकृपेवांचोनि आंधळे । पायावीण पांगुळे बोलती ॥३॥

लाधतां गुरुकृपेचा पाया । सहजची अज्ञान जाय विलया । ज्ञानगोपुरीं वेंधावया । उशीर कासया पाहिजे ॥४॥

यालागीं सद्‍गुरुनाथा । शरण जावें आपुल्या हिता । गुह्य गुप्त दावोनि पंथा । देतील स्वात्मता स्वकृपें ॥५॥

कृपाघन जगद्‍गुरु उदार । दत्त योगी हा दिगंबर । प्रबोधें करी जगदोद्धार । प्रश्नोत्तर वाढवोनी ॥६॥

पुढिले प्रसंगीं अनसूया । प्रश्न करील दत्तात्रेया । उत्तरें तोषवील तो माया । होईल श्रोतिया आनंद ॥७॥

अवधूत आनंदाची राशी । सप्त सागरींचा निवासी । दत्तवरद इच्छा मानसीं । तेणें संतांसी भजावें ॥८॥

संत महंत हे उदार । धीर सधन परम गंभीर । यांचें धरोनि राहिजे द्वार । म्हणवोनि किंकर निशिदिनीं ॥९॥

जे निर्धार धरोनि राहिले । तयां संती आपंगिलें । दत्तदिगंबरा भेटविलें । वोसंगा घातलें विनयेंसी ॥२१०॥

हे ऐकोनिया वार्ता । प्रेम दाटलें अनंतसुता । जीवभावें शरण संता । अर्पिला माथा पदकमळीं ॥११॥

इति श्रीदत्तप्रबोध ग्रंथ । यासी नारदपुराणींचें संमत । परिसोत भाविक संतमहंत । त्रयोविंशोध्यायार्थ गोड हा ॥२१२॥

॥ इति त्रयोविंशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय चोवीसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसद्‌गुरुदत्तात्रेयाय नमः । श्रीकुलस्वामिने नमः ।

जयजय जगद्‌गुरो जगन्निवासा । अविनाशा तूं चित्सुखविलासा । तूं रंजिता सज्जनमानसा । आणि तापसा योगीजना ॥१॥

स्वामी दयाळा श्रीदत्ता । तूं अज्ञानतिमिराचा हर्ता । सदय होसी तूं ज्ञानदाता । नुरविसी चिंता दासातें ॥२॥

सद्‌गुरु तूं अविनाश अभंग । करिसी दासाचा भवभंग । प्रबोधें करिसी निःसंग । आत्मरंग बाणविसी ॥३॥

या जगदोद्धारासाठीं । आत्मज्ञानाची खोलोनिया पेटी । निरोपणें सांठविसी मायपोटीं । सर्वा घटीं भरावया ॥४॥

आदरितां अनसूयच्या प्रश्ना । त्रासा न मानी धरिसी सहिष्णा । उत्तरें वारिसी तिची तृष्णा । शांतवोनि उष्णा वारिसी ॥५॥

गत कथाध्यायीं मातेसी । निवेदिलें तया पिंडोद्भवासी । ते ऐकतां सुख मानसीं । धन्य निरोपिसी म्हणे दत्ता ॥६॥

आजिचिया प्रसंगीं । श्रोते सावध होइजे वेगीं । मन न घालिजे आन उद्वेगीं । श्रवणरंगीं रंगावें ॥७॥

दत्तअनसूया संवाद । परिसोनि जाणिजे त्याचे भेद । मायिंक निरसेल अवघा खेद । श्रवणीं आनंद उपजेल ॥८॥

तुम्ही संत श्रोते शिरोमणी । तुम्हां योग्य हे असतीं लेणीं । म्हणोनि प्रार्थितों कर जोडोनि । भूषणें श्रवणीं लिइजे ॥९॥

भक्तिज्ञानवैराग्ययुक्त । तुम्ही ज्ञानी विचक्षण पंडित । सिद्ध साधु संत महंत । भाविक भावार्थ जाणते ॥१०॥

या आध्यात्मिकाचें ज्ञान । तुम्हांवांचोनि जाणेल कोण । तुमचा अधिकार श्रेष्ठ वोळखोन । करितों निवेदन कथा हे ॥११॥

कथा निवेदन करुं म्हणे । हेंही म्हणतां दिसे उणें । भास्करा उजेड दावणें । वातीपणें काय तें ॥१२॥

आपण ज्ञानाचे सागर । वाड दावी पुढें मी थिल्लर । तुम्ही शांत सतेज अंबुधर । काजवा समोर तैसामी ॥१३॥

न देखोनि आपुला अधिकार । बृहस्पतीसि भिडे जेवीं पामर । तोचि म्यां अर्भकें मांडिला विचार । तुम्हांसमोर होऊनी ॥१४॥

नसता कांहीं मजसी ज्ञान । न करितां ग्रंथ अवलोकन । कांहीं न करितां विद्याधारण । दावी शहाणपण मूर्खत्वें ॥१५॥

वेदांत सिद्धांत आध्यात्मिक । नाहीं केलें श्रवण चोख । अनधिकारी मी अर्भक । बोले सन्मुख तर्कटें ॥१६॥

ऐसा मी अपराधी खरा । तुम्ही जाणतसां दातारा । इच्छेऐसा दंड करा । वोपिलें शिरा तुमचे पदीं ॥१७॥

अन्याय करोनि अगणित । तुम्हां जालों शरणागत । तुम्ही अनाथाचे नाथ । करवि सनाथ शिक्षोनी ॥१८॥

तंव संत श्रोते योगी सज्जन । बोलती सकृपें काय वचन । त्वां पद घोवोनिया सान । दिधलें थोरपण आम्हांसी ॥१९॥

श्रीमद्दत्तकृपें करोनी । तुझी वदतसे ग्रंथीं वाणी । आम्ही न म्हणों तुझी करणी । वदविता धणी वेगळाची ॥२०॥

रायें घातलें पाठीसी । कोण सांग दंडींल त्यासी । अर्धांगीं बैसवितां दासी । निंद्य तिजसी कोण म्हणे ॥२१॥

रायें दुर्बळाचें बाळ । पट्टीं बैसविलें होवोनि कनवाळ । तया वंदी प्रजा सकळ । प्रधान दळ समवेत ॥२२॥

तेवीं या अवधूतें । कृपा केली सत्य तूतें । आम्हांमाजीं केलें सरतें । उणीव यातें कोण आणी ॥२३॥

पूर्वी निंद्य गांवींचा ओहोळ । परी गंगोस मिळतां गंगाजळ । तेवीं संतसागरी तुझा मेळ । दूषित विटाळ कैचा आतां ॥२४॥

लोहो परिसासी लागला । कृष्णपणा त्याचा समूळ गेला । सुवर्ण गोळ अवघा जाला । मोला चढला अपार ॥२५॥

तेवीं सद्गुरुकृपें करुन । तुज दत्तें केलें पावन । स्वकृपेचें देवोनि दान । वदवी महिमान आपुलें ॥२६॥

भूपाअंगीं सर्वसत्ता । होयचा मी दाम चालविता । शिक्षाचि लागे अव्हेरितां । वंदणेंचि माथा आज्ञा ती ॥२७॥

तेवीं दत्तसत्ता ही थोर । न घडे तियेचा अनादर । त्याचेचि कृपेचे उद्गार । करवी विस्तार या ग्रंथीं ॥२८॥

दत्तप्रबोध नाम ग्रंथा । येथें दत्तचि असे बोलविता । कोठोनि येईल न्यूनता । सर्व साहित्या पुरवी तो ॥२९॥

तूं निमित्तासी कारण । पत्रीं करिता होय लेखन । न धरोनि कांहींच अभिमान । चरणीं ध्यान असों दे ॥३०॥

दत्ताचें ठाण असे मुखीं । तो पडों नेदी कोठें चुकी । कथा चालवील नेटकी । न पडे फिकी गोड बहु ॥३१॥

अनुपम्य ही कथा गोड । दावी अज्ञानासी निवाड । परमार्थीचे पुरवी कोड । साधवी जोड साधकां ॥३२॥

तरी परियेसी अनंतसुता । आठवोनि त्या सद्‌गुरुदाता । चालवी आध्यात्मिकाची वार्ता । सुख संतोषता आम्हां तेणें ॥३३॥

सर्व रसाहोनि आगळें । श्रेष्ठ हें तें अमृत वर्णिलें । परी आम्हांतें गौण भासलें । सेवुनी पावले मृत्युलोका ॥३४॥

तया अमृताचे सेवून । येवोनि पावावें मृत्युभुवन । येणेंचि आलें तया दूषण । श्रेष्ठपण कैंचे या ॥३५॥

या अमृताहोनि विषेश । दत्तकथामृत असे सुरस । आवडी सद्भावें सेवितां तयास । पद अविनाश पाववी ॥३६॥

ही कथा करितां श्रवण । पापे जाती दग्ध होऊन । श्रवणाचें घडतां मनन । निवटे अज्ञान ज्ञान होय ॥३७॥

मनीं धरितां निजध्यास । साक्षात्कार होय त्यास । निःसीम आचरतां धारणेस । जन्ममरणास मिटवी ॥३८॥

कथा नोव्हे हीं निवृत्ती । उडवी भवभयादि भ्रांति । द्वैत नसोनी अद्वयस्थिती । उपजवी प्रीती आत्मत्वाची ॥३९॥

आत्मत्वी जडतां मन । मग तें सहजची होय उन्मन । सकळ सुखांचें सुखस्थान । तेंचि आपण होइजे ॥४०॥

यासाठीं आम्हां श्रवणीं चाड । वक्तिया कथींते कथा गोड । प्रश्नोत्तरी जडली आवड । पुरवी कोड निवेदी ॥४१॥

जी जी म्हणोनिया वक्ता । विनवी ठेवोनिया पदीया माथा । अनसूया म्हणे गा दत्ता । उद्धववार्ता निवेदिसी ॥४२॥

बाह्य देवाचे विवरण । तें म्यां ऐकिले निरोपण । परी अंतर्गर्भ निवडोन । सांगे संपूर्ण विस्तारें ॥४३॥

अवधूत म्हणे वो जननी । बरवा प्रश्न केला शोधोनी । तो तुज सांगतो विवरोनी । सांठविजे श्रवणी आदरें ॥४४॥

नव नाडी असती देहीं । त्या पृथक सांगतों पाहीं । नामें ऐकोनिया घेईं । स्थानें तेहीं निवेदिन ॥४५॥

सकळ नाडींचें अधिष्ठान । तें हें कुंडलिनीनामें जाण । आठ पृथकत्वें भिन्न भिन्न । किजे श्रवण सांगतो ॥४६॥

हंसरुपिणी प्राणवाहिनी । इडापिंगळा चौघी जणी । गांधारी आणि हस्तिनी । पुखा शंखिनी आठवी ॥४७॥

एवं नाडी ह्या नवं । यांचा कोठोनि कैसा ऐक प्रभाव । कर्णापासून करी धांव । गांधारी वैभव हस्तिनीचें ॥४८॥

पुखा शंखिनी भल्या । नेत्रांपासोनि निघाल्या । चरणांगुष्ठांतें पावल्या । तेथेंचि स्थिरावल्या जाणिजे ॥४९॥

इडा पिंगळ द्राणाहुनी । कंठीं राहिल्या व्यापुनी । हंस आणि प्राणवाहिनी । पावल्या जावोनी टाचेसी ॥५०॥

या आठींतें आवरुन । असे कुंडलिनीचें स्थान । तिचे बळें बळावोन । केलें आकर्षण देहासी ॥५१॥

आणीक एक असे गुज । तें मी निवोदितों तुज । सुषुम्णा वज्रनाडी सतेज । येथील गुज गुरु जाणे ॥५२॥

वज्रदंड मणिपुरमार्ग । तेथेंचि तिचा असे प्रसंग । तया जाणावयाचें अंग । करितां लाग न करवे ॥५३॥

हे नवाहोनि आगळी दावी । हे श्रीगुरुमुखें ओळखावी । त्या कृपेनेंचि गती साधावी । येरां ठावी न पडे ती ॥५४॥

जेवीं उदकीं संधी अवलोकून । नळिकायंत्रीं प्रेरिजे बाण । भेदिती मच्छाचा वाम नयन । टाकी भेदून तेवीं हें ॥५५॥

असो आतां सांधे सोळा । तुज मी सांगतो पाहे डोळां । घोटे गुडघे आणि कंठस्थळां । साही मेळा उभय पक्षीं ॥५६॥

मणगटें खुबे कोपर । साही मिळोनि दोन्ही कर । आतां उरले जे का चार । तोहि प्रकार निवेदितों ॥५७॥

एक हृदयातें जाणिजे । एक तो कंठ ओळखिजे । भव शिर दोनी देखिजे । एवं घेइजे ओळखी यांची ॥५८॥

हे प्रत्यक्ष सोळा सांधे असती । आतां बाहात्तर कोठयांची व्युत्पत्ती । निवडोनि सांगतों तुजप्रती । धरीं चित्तीं माते तूं ॥५९॥

आधारचक्रीं असे एक । स्वाधिष्ठानींचा दुजा देख । नाभिस्थानीं दहा चोख । द्वादश चोख अनुहातीं ॥६०॥

दोन स्थूळ उदरींचे । सोळा जाणिजे कंठींचे । चार वायोयंत्रींचे । ध्वनी सांठवणीचे दोन पैं ॥६१॥

अग्निचक्रीचे दोन सुरस । एवं झाले हे पन्नास । पश्चिमेचे एकवीस । एक उर्ध्वास ओळखी ॥६२॥

बहात्तर कोठडया नेमून । तुज म्यां केल्या निवेदन । अंतीं बीजरजाचें प्रमाण । तेहिं निवडून सांगतों ॥६३॥

या देहामाजीं सतेज । सवा घट असे रज । औटपळें दिव्य वीज । करित काज उद्भवाचें ॥६४॥

तंव अनुसया वदे सज्ञाना । निरोपणीं तोषविसी मना । परी आणिक पुसते लक्षणा । तें मज सगुणा सांग तूं ॥६५॥

पूर्वाध्यायीं पिंड निवेदिला । रजबीजापासोनि उद्भवला । वायो तिसरा मिश्रित केला । परी न निवडिला भाग त्याचा ॥६६॥

मातापितयाची वांटणी । कैसी ते सांग विवरोनी । काय झाले या वायोपासुनी । विभक्तलेणीं लेववी ॥६७॥

अविनाश म्हणे माते बरवे । ऐसेचि त्वां प्रश्न करावे । आनंदें तूतें म्यां निवेदावें । संवादी बोधावें मुमुक्षां ॥६८॥

रज अंश हा मातेचा । बीजांश हा होय पित्याचा । तृतीय भाग तो पवनाचा । वास त्रिगुणाचा ती ठायीं ॥६९॥

रजोगुण असे रजाचा । तमोगुण बीजाचा । सत्त्वगुण वायूचा । ऐसा तिघांचा नेम माते ॥७०॥

तिन्हीं ठायीं मात्रा तीन । तेवींच दैवतेंही जाण । देहभाग कवणाचा कवण । कीजे श्रवण तोहि आतां ॥७१॥

बीज अंशाचा भाग जाण । तेथोनि अस्थि त्वचा निर्माण । मेद मांस रजापासोन । भाग हे दोन दोघांच ॥७२॥

आतां पवनाचा प्रकार । दशविध तयाचा विस्तार । त्यांचें वावरतें घर । नाडी निर्धार असती ॥७३॥

हे त्रिभाग म्यां तूतें । निवडोनि सांगितलें माते । तंव अनसूया म्हणे संख्येतें । करोन अस्थींतें दावी मज ॥७४॥

यावरी बोले तो अवधूत । तीनशें साठ हाडें देहांत । त्यामाजी एक अद्भुत । गणतीस राहात हाड एक ॥७५॥

परि हें योगिसिद्धसाधकांचें स्थान । भ्रमरगुंफेची हे खूण । या शवामाजीं असती तीन । जाणिजे लक्षण बरवें हें ॥७६॥

त्या तिहींचा पाहे लाग । त्रिस्थानींचे तीन मार्ग । त्रिकुटाचळींचा संधान भाग । हा तंव योग साधकांचा ॥७७॥

अनंत सिद्धांचे सिद्धांत । तो हा योग आणिजे लक्षांत । सर्व सुखाचें सुख प्राप्त । आहे तुम्हांत मजमाजीं ॥७८॥

वडील ठेवीचें गुप्त धन । दारिद्र्य भोगी मंदिरीं असोन । तें प्राप्त व्हावयालागोन । पाहिजे प्रयत्न करावया ॥७९॥

तेथें पायाळूच सांगेल । परितया अंजन लागेल । मग तो पाहोनि परीक्षील । बोलतां बोलेल काय ऐका ॥८०॥

म्हणे पैल हें धन दिसे । तेथें रक्षणास बैसले असे । पंचाक्षऱ्यावांचोनि सांधेल कैंसें । हें तों न दिसे तो म्हणे ॥८१॥

तैं पंचाक्षरी उत्तम चांगला । दैवदशें हातीं लागला । तेणें बळी वोपोनि साधिला । उत्तम लाभविला द्रव्यघट ॥८२॥

तेवींच माते हेंहि जाण । सद्गुरु पंचाक्षरियावांचुन । न लाधे ह्या लाभ पूर्ण । तयासी शरण जाइजे ॥८३॥

असो कान डोळे नाक । ह्या तिन्ही वाटा चोख । येथील वर्म हें अलौकिक । भोगिल सुख तो धन्य ॥८४॥

आणीक एक भले । छपन्न सांधे असती उरले । तेही स्थानें वेगळाले । पाहिजे ऐकिले जननीये ॥८५॥

चरणांगुळीचे तेरा असती । द्वय मिळोन सव्वीस गणती । करांगुळीचे पंधरा दिसती । युग्में होती तीस पैं ॥८६॥

तीस आणी सव्वीस । छपन्न जाणावे गणतीस । प्रथम सोळा मिळवितां त्यास । आले भरतीस बाहात्तरीं ॥८७॥

सांधे कोशे बरोबरी । माते असती देहांतरीं । दश इंद्रियांची परी । मागेच उजरी केली तुज ॥८८॥

तंव अनसूया आणिक पुसे । अंतःकरणचतुष्टय कैसें । ऐकावया हर्षित मानसें । निवेदी विशेषें पृथकत्वें ॥८९॥

तंव बोलतसे योगेश्वर । मन बुद्धिचित्त अहंकार । हें चतुष्टय जाणिजे निर्धार ।

त्याचा प्रकार निवेदितों ॥९०॥

मन संकल्पविकल्प करी । बुद्धि बोधव्य लक्षण विवरी । अहंकार तो अभिमान धरी । चेतना करी चित्त हें ॥९१॥

आणि एक गुज खूण । ते तुज करितो मी निरोपण । शरीरीं वावरे प्राणपवन । गमनागमन दिवानिशीं ॥९२॥

कोण अक्षरीं येतसे बाहेर । कोण अक्षरीं करी संचार । हा तुज निवेदितों विचार । बहुत अक्षर नसती ते ॥९३॥

हं क्षं अक्षरें दोन । येणें त्रैलोक्य गेलें व्यापोन । हं तोचि शिव जाण । क्षंकार पूर्ण शक्तिरुपें ॥९४॥

हं अक्षरें श्वास बाहेरी । क्षंकारें प्रवेशे अंतरीं । अहोदिन अहोरात्रीं । रमतीं येरझारी संयुक्त ॥९५॥

क्षं वामदलीं इडेचे ठायीं । हं दक्षणदळीं पिंगळेसी पाही । येरयेरां सोडोनि नाहीं । वर्तणें काहीं तयांतें ॥९६॥

ऐकोनि दिगंबराचे बोल । आनंदें अनसूया देतसे डोल । म्हणे बा शब्द तुझे अमोल । परम रसाळ वाटती ॥९७॥

ऐकावेंचि वाटे निरोपण । यालागीं वारंवार करितें प्रश्न । किती वाचा सांगें नेमून । जाल्या कोठून काय नामें ॥९८॥

अवधूत म्हणे ऐकिजे मात । चारी वाचा असती निभ्रांत । नामें तयांची विख्यात । असती विभक्त पृथकचा ॥९९॥

परा आणि पश्यंती । मध्यमा वैखरी म्हणती । आतां जन्मल्या या कैंसे रीतीं । हेंहि निगुतीं परिसिजें ॥१००॥

मनासहित पवन । गगनीं आदळे जाऊन । तेथींचें ध्वनींचेपासून । परा जनन पावली ॥१॥

तेथुनी पवन मुरडतां । पश्चिमनळेमाजी भरतां । काकी मुखासी येतां । होय उद्भवता पश्यंतीसी ॥२॥

तेथूनि वायो उदेला । तो हृदयामाजीं भरला । तया स्फुरणें मध्यमेला । जन्म जाला पाहे माते ॥३॥

समीर उसळला तेथोनी । पावला येवोनि नासिकस्थानीं । वैखरी जन्मली तेंथोनी । चौघी जणी ऐशा ह्या ॥४॥

एवं ह्या वाचा चारी । तुज निरोपिल्या निर्धारीं । पांचवी वाचा निराकारी । जाणिजे परी अनिर्वाच्य ॥५॥

तेविंच चार देह असती । स्थूळ सूक्ष्म कारण म्हणती । चौये महाकारण बोलती । पांचवें निश्चिति अतिकारण ॥६॥

या देहींच देह जाणावे । विचारेंचि यातें वोळखावें । दश देहांतें अनुभवावें । सुख भोगावें देहींचें ॥७॥

अनुसूया म्हणे बरवें बोलसी । ते दश देह सांगें आम्हांसी । कैसेनि वोळखावें त्यांसी । त्या खूण मुद्रेसी निवेदी ॥८॥

एक एक देहा आंत । कोण वस्ती काय प्राप्त । तो पृथक निवडोनि तेथील भावार्थ । सांगें प्रचीत जेणें घडे ॥९॥

बहुत अथवा थोडा । विस्तारु असेल तैसा निवाडा । तो करुनी दावीजे उघडा । साधे रोकडा ऐसें करी ॥११०॥

अवधूत म्हणे तुज । सांगतों ऐक येथिंचें बीज । आम्हां योगीया हें सहज । बरवी वोज तूं राखी ॥११॥

हें ज्ञान जाणावया । पाहिजे सद्गुरुची दया । तरीच लाभेल माते तया । निरोपण वायां नवजे मग ॥१२॥

तुझा आग्रह पडला थोर । म्हणोनि सांगणेंचि साचार । तरी वृत्ति आतां करी स्थिर । राखी आवर बहुसाळ तूं ॥१३॥

येरळ नोव्हे हें बोलणें । शुद्ध खरेंचि हें नाणें । यातें गुरुपुत्रचि एक जाणें । तुजसी घेणें तरी घेई ॥१४॥

माते विनवितों तुज पाहीं । श्रवणीं एकाग्र लक्ष देई । हृदयीं सांठवोनिया घेई । वदतों दाही देहवार्ता ॥१५॥

प्रथम स्थूळ देहाचे ठायीं विलास । तो तुज सांगतों ऐक सुरस । पृथ्वीतत्व ऋग्वेद यास । वर्ण विशेष पीत तो ॥१६॥

ऱ्हस्वमात्रा रजोगुण । अकारपूर्वक तेथें पवन । अवस्था जागृती नेमोन । इंद्रियकारण तेथींचें ॥१७॥

वाचा नेमिली वैखरी । विश्व अभिमानी निर्धारीं । उदात्त वाहिजे त्या स्वरीं । या त्रिकुटपरी जाणिजे ॥१८॥

सलोकता तेथें मुक्ती । अंगासन ते होय निश्चिती । अहंदीक्षा शोभे निगुतीं । घडे वस्ती सत्यलोकीं ॥१९॥

अन्न कोश वडवाग्नी । क्रिया शक्तीची असे रहणी । क्षर निर्णय तये स्थानीं । गायत्री नेमुनी प्रथम पदा ॥१२०॥

विघ्नेशतेयिंची दैवता । वाद्यतंतू होय वाजता । नेत्रस्थान दिसे पाहतां विष्टयानंदता जाणिजे ॥२१॥

तेथें पाहतां घटाकाश । गुप्त षण्मुखी मुद्रा विशेष । पिपीलिकामार्ग कळा ऊर्मीस । चाचरीमुद्रेस योजिलें ॥२२॥

एवं हे स्थूळाचें प्रकरण । पूर्ण त्रिकुटीचें परि ज्ञान । तूतें केलें म्यां निरोपण । सूक्ष्माचें श्रवण करी आतां ॥२३॥

श्रींहाटीचा प्रकार । सूक्ष्मदेह निर्धार । आपतत्त्व ऋषीश्वर । अनाहत स्वर सत्त्वगुण ॥२४॥

यजुर्वेद मध्यमा वाचा । तैजस अभिमानी साचा । जन मुक्ती समीपतेचा । कुंभक पवनाचा रीघ तेथें ॥२५॥

कोशअंशें प्राणमय । स्वप्न अवस्था तेथींची होय । त्वमहं दीक्षेची तया सोय । लोकठाय वैकुंठ तो ॥२६॥

तेथें नेमिला वर्णश्वेत । भास्कर सतेज असे दैवत । ज्ञानशक्ति परम विख्यात । निर्णय होत अक्षराचा ॥२७॥

ऊदराग्नी सत्यत्त्वें नेमिला । नेमोनि योगानंद बोलिला । द्विपरा गायत्री जपाला । कंठस्थान कळा जाणिजे ॥२८॥

मठाकाश ऊभारिलें सत्य । वितंतवाद्य तेथें वाजत । ऊन्मनी मुद्रा अंतर्गत । मार्ग विख्यात विहंगम ॥२९॥

नेमिली असे धूम्रकळा । भूचरीमुद्रा बाह्य लीला । गुरुलिंगाचा सोहोळा । भक्ति सुढाळा विष्णुत्वें ॥१३०॥

दीर्घ मात्रैक कारण । हें सूक्ष्मदेहींचें विवरण । आतां कारण देहींचें लक्षण । तेंहि निरोपण अवधारीं ॥३१॥

आतां गोल्हाटीचे जाणिजे भेद । ते मी सांगतो कारणी विविध । अंतःकरण करोनिया शुद्ध । करी सावध श्रवण हें ॥३२॥

तेथें शिवलिंग असे सुढाळ । रुद्रभक्ती वसे प्रेमळ । तमोगुणाचें असे बळ । मात्रा प्रज्वाळ स्फुल्लिंग ॥३३॥

सुषुप्तिअवस्था श्यामवर्ण । प्राज्ञ तेथींचा अपान । प्रत्याहार रेचक पवन । वाचा जान पश्यंती ॥३४॥

स्वरित तेथिला स्वरु । सरुपता मुक्ति निर्धारु । मनोमय कोश गंभीरु । दीक्षा विचारु कोहंत्वें ॥३५॥

लोक पाहतां कैलास । अद्वैतानंदीं विलास । शोकाग्नीचा तेथें वास । विचार कूटस्थास निर्णय ॥३६॥

येथें इच्छा शक्ती जाणिजे । विष्णुदेवता वोळखिजे । त्रिपदा गायत्री जपिजे । साम समजे वेद येथें ॥३७॥

या देहींचें हृदयस्थान । महदाकाश असे व्यापून । वाद्य वाजे पाहतां सघन । शांभवी जाण अंतर्मुद्रा ॥३८॥

कपीमाग असे निका । ज्योतीकळा ती साम्यका । बाह्य अगोचरी मुद्रा देखा। वर्मिक निका वर्म जाणे ॥३९॥

आतां अनाहतीचा संवाद । तुज निरोपणीं करितों बोध । जाणवितों पर्यें विविध । श्रवणीं सावध सांठवी ॥१४०॥

अनाहती देह महाकारण । जंगमलिंग असे स्थापन । ईश्वर देव स्वयें आपण । सेवाधन वेंची तेथें ॥४१॥

नीलवर्ण औटपीठीं । अर्धमात्रा वसे गोमटी । तेथें परा वाचा बरवंटी । वेदराहटी अथर्वणी ॥४२॥

वायुऋषि प्रसिद्ध । तुर्यावस्था विदेहानंद । त्राहाटक पवनाचा छंद । विकार विविध चित्ताचे ॥४३॥

गुरुप्रसाद जंव पाविजे । तवं सायुज्जमुक्ती भोगिजे । धारणा अंग वोळखिजे । आणीक ऐकिजे सांगतों पुढें ॥४४॥

येथील कोश विज्ञानमय । शिवोहं दीक्षा येथें होय । लोक येथिंचा आश्रय । आत्मनिर्णय जाणिजे ॥४५॥

येथील देवी आदिशक्ती । रुद्र दैवत होय निश्चिती ॐकार चतुष्पदा गायत्री । वाद्य असती वोषादी ॥४६॥

प्रत्यगात्मा अभिमानी । स्थान पाहतां मूर्ध्नी । प्रज्वलत्वें तो कामाग्नी । राहिलें विस्तारोनी चिदाकाश ॥४७॥

आत्मनिमुद्रा चांग । अति सोज्वळ मीनमार्ग । ज्वाळा कळा अव्यंग । खेचरीसंग मुद्रेचा ॥४८॥

एवं हे देह चार । यांचा निवेदिला विस्तार । आतां पंचम देहाचा प्रकार । होवोनि सादर ऐकिजे ॥४९॥

आतां भ्रमरगुंफा अगोचर । जाणती गुरुचे कुमर कुळवर्ण तेथें निरंतर । तो देह सुंदर अतिकारण ॥१५०॥

तेथें प्रसादलिंग असे । भक्तिसी सदाशिव विलसे । आकाश तत्त्व ऋषी भासे । अनिर्वाच्य वसे वाचा ते ॥५१॥

प्रतिशब्दें करोनी । ज्ञानदेह म्हणिजे त्यालागोनी । सूक्ष्म वेदांत ये स्थानीं । अवस्था उन्मनी तेथींची ॥५२॥

आनंदमय कोश सुंदर । कैवल्यमुक्ती मनोहर । अनामयोहं दीक्षा परिकर । ब्रह्मानंद निर्धार ते ठायीं ॥५३॥

तेथील निराश्रय लोक । ब्रह्माग्नि हा प्रदीप्त देख । क्षेत्रज्ञ निर्णय सुरेख । परा देख शक्ती तेथें ॥५४॥

शक्तिच तेथील दैवता । अनाहत वाद्याची ध्वनिता । निरंजन अभिमानी पुरता । शिखास्थानता जाणिजे ॥५५॥

तेथील गायत्री म्हणसी कोण । पंचपदा परमार्थपद जाण । निराकाश तेथें विस्तिर्ण । घ्यावे वोळखून गुरुमुखें ॥५६॥

अंतमुर्द्रा पूर्ण बोधुनी । शेषमार्ग तये स्थानीं । कळातीत कला भव्यपणीं । बाह्य लक्षणीं अलक्षमुद्रा ॥५७॥

हे पंच देह निवेदिले । माते तुवां श्रवण केले । तेविं साहव्याचीं भलें । लक्षणें ऐकिले पाहिजे ॥५८॥

साहावें तें गुणगुज । तें मी सांगतों आतां तुज । कठिण असे तेथील समज । बहुतांसि उमज न पडे तें ॥५९॥

तेथें ब्रह्मरंध्राचें स्थान । तेथें महालिंग प्रभायमान । तेथें पुरुष स्वयें आपण । करी अर्चन निष्ठध्यानीं ॥६०॥

तया महालिंगापासीं पाहीं । हेतुविकार समूळ नाहीं । तेथें निश्चळयोगें पाहीं । समाधिस्थ राही कोटियुगें ॥६१॥

ते प्रकाश परं ज्योती । वाटे कोटि भानु तपती । परि दाहकत्त्व नसे निश्चिती । लज्जित होतीं मंडळें ॥६२॥

भास कोटि शशकांचा । म्हणूं तरी लेश नसे शीताचा । तो स्वामि अनंत ब्रह्मांडींचा । तेथें चंद्रसूर्याचा कोण कैंवा ॥६३॥

अद्भूत तेजाचा बंबाळ । तया पुढें अग्नी पांगुळ । त्याहून सर्वही निर्मळ । खेळोनि खेळ निराळे ते ॥६४॥

त्यासी उपमाचि नाहीं । तें अनुपम असे पाहीं । त्याची अद्भूत नवलाई । सांगतांचि कांहीं न येते ॥६५॥

जया सद्गुरु असेल श्रेष्ठ । तोचि दावील तेथींची वाट । केवीं साधितील वाचक चावट । करितां वटवट न लभे ते ॥६६॥

असो त्या ब्रह्मरंध्रापासोनी । महालिंग तें ऐलस्थानीं । तया पैल जातां वोलांडोनि । तेथील पाहणी वेगळीच ॥६७॥

ते निर्गुण निरामय । निर्विकार निराभास होय । तयाची आणावया सोय । न चले उपाय आगमनिगमा ॥६८॥

हें अद्भूत तुजसी कथिलें । गुप्त तेंचि प्रगट केलें । असो जगदोद्धारार्थ भलें । उपयोगा आलें योगिसंतां ॥६९॥

माते तुझियायोगें करुन । बहुतांचे होतअसे कारण । साधक साधील गुरुसेवन । त्यासी हें धन लाभेल ॥१७०॥

अनसूया म्हणे योगिराया । परी अवसानिक बोलसी सखया । चारी देह ठेविसी निरोपणी या । हें मम हृदया कळों आलें ॥७१॥

बोलतां बोल समवावे । आजिच्या निरोपणा संपवावें । हेंचि इच्छिलें तुझिया जिवें । जाणें मी बरवें शब्दरसें ॥७२॥

परिसोनि उत्तर मातेचें । गजबजिलें चित्त दत्ताचें । इनें परिक्षिलें मज साचें । संपविलें कैसें निरोपण ॥७३॥

देखोंन श्रवणाची अर्थता । मातेसी अविनाश जाला विनविता । माते सत्य परीक्षिलें ममचित्ता । धन्य योग्यता तुझी हे ॥७४॥

निरोपणीचें शेष राहिलें । माते मन तुझें तेथें गुंतलें । यदर्थी मज त्वां सावध केलें । मजही कळलें श्रवण तुझें ॥७५॥

वक्तियासी सावध करुन । श्रोता भावें करी श्रवण । तरि तो जाणिजे विशेष गुण । त्याचेनि पावन अन्य श्रोत्यां ॥७६॥

श्रेष्ठ तयाचा अधिकार । प्रेमें आलिंगी श्रीकरधर । देवही तिष्ठती जोडोनि कर । देती आदर श्रेष्ठासनी ॥७७॥

ज्याची श्रोतव्यता सावधान। भावार्थ आवडीं प्रेमपूर्ण । तयालागीं तो नारायण । न विसरे आपण अंकीं घे ॥७८॥

श्रोते बहुतेक असती । कीर्तनपुराणीं जाऊनी बैसती । कितेक बहुमान तेथें इच्छिती । न होता पावती दुःख मनीं ॥७९॥

अवमानींच कोण्ही परतले । कोण्ही लोकेषणासाठीं बैसले । भोळें भाविक बहु दाटले । श्रेष्ठ बैसले श्रेष्ठासनीं ॥१८०॥

वैदिक पंडित शास्त्रज्ञ । पुराणिक प्रौढज्ञानी सुज्ञ । दशग्रंथी ज्योतिषी प्राज्ञ । चतुर गुणज्ञ विद्यार्थी ॥८१॥

संत साधु योगिजन । ज्ञानी अनुभवी सिद्ध पूर्ण । आबाल वृद्ध अवघे जन । करुं श्रवण बैसले ॥८२॥

जितुक्या मूर्ती तितुक्या प्रकृती । प्रकृति ऐसेंचि श्रवण करिती । आपुलाले गुणें विलोकिती । पावता होती हर्षयुक्त ॥८३॥

आपुल्या ऐसा गुण नसे । खालाउनी मान उगा बैसे । चित्त त्यांचे श्रवणीं नसे । उगाच विरसे मनांत ॥८४॥

कोण्हीं शोधिती वर्णासी । कोण्ही निरसिती शब्दासी । कोण्ही पाहती अर्थासी । कोण्ही कथारसीं लुब्धले ॥८५॥

कोण्ही ऐकती सुरताल । तेथेंचि खाती स्वयें झोल । कोण्ही विनोदें देती डोल । कोण्ही कलकल करिताती ॥८६॥

कोण्ही ऐकती कोण्ही बोलती । अन्य वार्ता श्रवणीं करिती । उपलक्षणें शिक्षितां दुखवती । दंश धरिती अविवेके ॥८७॥

वक्ता चुकतां निरोपणीं। कागपरी करिती तेच क्षणीं । हीनत्व आणिती वक्तिया लागुनी । विरुढ अपमानी होताती ॥८८॥

कितेक कीर्तनीं येवोनि बैसती । प्रापंचराजिक गोष्टी बोलती । कितेक कीर्तनीं झोंपीं जाती । आळेपिळे देतो दुर्मती ॥८९॥

कितेक मान कलांडोन । कितेक भिंती खांबी ठेवून । कितेक घालिती दंडासन । कीर्तनीं राहून काय तें ॥१९०॥

कोणा लोडी टेकून बैसती । कोण्ही कीर्तनी तांबूल सेविती । कोण्ही हुक्का झर्झरी लाविती । वेष्टोन बैसती कितेक ॥९१॥

माते ऐसे हे अवगुणी । काय बैसोनिया कीर्तनीं । अधिकची पावती बंधनीं । दुराचरणीं गर्भवासा ॥९२॥

कैसेनि सुटे त्यांचें बंधन । केला कीर्तनीं तेणें अवमान । तयांसी दंडी सूर्यनंदन । भोगीपतन नरकवास ॥९३॥

म्हणसील जरी कां ऐसें । जेविं अपराध दंड तैसे । याचे भोग कोण कसे । श्रवणीं सरसें भरवितों ॥९४॥

जेथें होय कीर्तनपुराण । तेथें तिष्ठतसे नारायण । वक्ता यथामती करुन । करी निरोपण श्रोतियां ॥९५॥

ती कीर्ति वाखाणितां । परमानंद वाटे अनंता । एकविध श्रोते न ऐकतां । क्षोभे चित्तां माधव ॥९६॥

अवमान होतां कीर्तनाचा । तोचि शत्रु होय त्या हरीचा । म्हणोनि वरी दंड यमाजीचा । योग तया भोगाचा योजिला ॥९७॥

कीर्तनीं बडबड जे करिती । ते बेडुकजन्म पावती । मृत्तिकाभक्षण तयांप्रती । भोग निश्चिती भोगणे ॥९८॥

निद्रा घेती जे कीर्तनीं । ते महांडुळ अजगर पडती होउनी । जे कां बैसती वेष्टोनी । ते कोसला होउनी मरती घरीं ॥९९॥

कीर्तनी तांबूल भक्षण । तें रजस्वलेचें शोणित जाण । कागजन्म तयालागून । करी भक्षण नरक मांस ॥२००॥

कीर्तनीं वोढी झर्झरीस । तया यमदंडी आणी हरिस । तया नेमिला जन्म रीस । अहा रीस म्हणोनी अवमानिलें ॥१॥

कीर्तनीं इच्छी जो लोडतिवासा । तेणें अवमानिलें जगन्निवासा । तया स्थळ न मिळेची निवासा । रवरववासा जन्म पावे ॥२॥

कीर्तनाचा उच्छेद करी अनादर । तो जन्मोनि भोगी रोग उदर । वपु न राहे कदा सुंदर होउनी वांदर वनी वसे ॥३॥

कीर्तनीं वाद करी वक्तियासीं । तो पडे गा सदां आयासीं । पोटशूळ जाची तयासी । नेमिला यासी उलूकजन्म ॥४॥

असो ऐसे सांगतां बहु प्रकार तरी ग्रंथीं वाढेल विस्तार । पुढील निरोपणा होईल उशीर । म्हणोनि आवर पैं केला ॥५॥

श्रोता असावा शांत । भाविक प्रेमळ विरक्त । श्रवणींच जडे ज्याचें चित्त । न करी मात येरं वांया ॥६॥

ज्ञानी व्युत्पन्न असोनि चतुर । निरभिमानें श्रवणीं सादर । युक्त भाषणी नम्र फार । न करीं अनादर वक्तियाचा ॥७॥

वक्ता निरोपणीं चाचरतां । त्याची करावी साह्यता । विरसीं होय रस भरवितां । त्या नांव श्रोता ज्ञानी तो ॥८॥

श्रोता असोनि सर्वज्ञ । वाढवी वक्तियाचें महिमान । श्रवणीं चुकों नेदी संधान । आवडी करोन स्वीकारी ॥९॥

यातेंच म्हणावें सत्श्रोता । उद्भवे आनंद उभय चित्तां । त्यागुणें होय रस वाढता । धन्य सार्थकता श्रवणाची ॥२१०॥

माते असें तुझें श्रवण । प्रीतियुक्त दिसे सावधान । येणेंचि उल्हासलें माझें मन । सरसावे निरोपण करावया ॥११॥

देह सहा तुज निवेदिले । तंव त्वां मज आणिक पुसिलें । चार देह किमर्थ ठेविले । तेही निरोपिलें पाहिजे ॥१२॥

हे तुवां जे आज्ञा केली । ते म्यां सत्य शिरीं वंदिली । निरोपितों सांठवी हृदयकमळीं । भोगिजे नव्हाळी तेथींची ॥१३॥

अर्धशून्य देह एक । ऊर्ध्वशून्य दुसरा देख । तृतीय मध्यमशून्य आवश्यक । चौथें निःशंक महाशून्य ॥१४॥

असे हे चारी देह असती । करोनि निवेदिली म्यां विभक्ति । चारी मिळोनि निश्चिती । एकचि व्यक्ती महाशून्य ॥१५॥

तया शून्यापासोनिया । साकारलें हें रमावया । विस्तारिली हे ईश्वरी माया । अंत ना तया पार कांहीं ॥१६॥

जया शून्याचेनि बळें । उभारलीं हें तिन्ही ताळें । एकवीस स्वर्गाचीं अंतराळें । सप्त पाताळें मंडले तारा ॥१७॥

जीव जंतु काष्ठ पाषाण । वाणी खाणी वर्णावर्ण । कांहींच नसे त्यावीण । लयोत्पत्तिस्थान शून्य हे ॥१८॥

शून्य कैसेनि वोळखा । तयासि नाहीं नामरुप देखा । अगोचर असे देह देखा । अनुपम्य जे का अपरंपार ॥१९॥

तेथें रात्र ना दिवसमान । जागृती नाहीं कांहीं स्वप्न । दृश्य ना अदृश्य भान । आपणचि दर्पण होवोनि ठेलें ॥२२०॥

हे व्यापक अभ्यंतरी । यावीण नसे कांहींच निर्धारीं । यातें जाणितलियावारी । कैंची उरीं ते मग उरे ॥२१॥

यातें जाणलियावांचोन । मिथ्याचि अवघें सर्वं ज्ञान । आम्ही नायकूं त्याचे भाषण । अनुभवावांचून कांहीं तें ॥२२॥

न करी अनुभवीं अभ्यास । वृथाचि बडबडी वायस । भुंकतां भुंकणें श्वानास । काय ऐसियास करावें ॥२३॥

वितंड भाषणिक ज्ञान । येणें नोव्हेचि समाधान । अनुभव असल्यावांचोन । कोरडा पाषाण जाणावा ॥२४॥

अनुभवज्ञान पाहिजे । तेणें सद्‌गुरुसी शरण जाइजे । सेवोनि कृपा संपादिजे । विनयें अनुभविजे तें ज्ञान ॥२५॥

अनुभवाची जया चाड । तेथें उपजे पूर्ण आवड । सद्‌गुरुसेवनीं तो जोडी जोड । पुरती कोड सत्वर त्याचे ॥२६॥

तंव अनसूया म्हणे हें सत्य । तूं हितार्थ उपदेशिसी कृत्य । याचा अभ्यास ठेवील जो नित्य । तोचि वस्तु अगत्य पावेल ॥२७॥

तुझिया निरोपणें आम्हांस । सुख वाटे दिवसेंदिवस । लाभ घडत सेवी शेष । म्हणोनि प्रश्नास तुज करीं ॥२८॥

आतां एक मातें आठवलें । पुसतां पाहिजे निवेदिलें । चंद्र सूर्य त्वां मातें कथिले । तयांचें राहिलें निरोपण ॥२९॥

चंद्रसूर्यासी असती कळा । तयासी म्हणती बारा सोळा । तयांचा नामभाग सांगे निराळा । सत्रावी कळा ते सांग ॥२३०॥

ऐकोनि प्रश्न मातेचा । स्वामी आनंदला योग्यांचा । पुढिले प्रसंगीं निवाडा याचा । करील साचा अवधूत ॥३१॥

अवधूत दयेचा सागर । पूर्ण ज्ञानाचा होय आगर । श्रोत्यांचे मनोरथ समग्र । पुरवी कृपाकर जगद्गुरु ॥३२॥

याचि कारणासाठीं । येणें अवतार धरिला सृष्टीं । जीव कळवळा बहु पोटीं । कृपादृष्टीं न्याहाळी ॥३३॥

अनन्यातें ओळखोन । तया देतसे कृपादान । अनाथासी करी पावन । हें महिमान दत्ताचें ॥३४॥

अनंतरुपीं हा अनंत । लीला दावीतसे स्वामी दत्त । यातें जाणती साधुसंत । भाविक महंत योगीजन ॥३५॥

म्हणोनि संतांचे सेवनीं । अनंतसुत रतला अनुदिनीं । लक्ष ठवोनिया चरणीं । कृपादानीं तिष्ठत ॥३६॥

दीन वत्सलातें देखोन । गाउली धांवे हुंबरोन । मोहें चाटी पान्हा घालोन । करवोनि पान संरक्षी ॥३७॥

तेविं हे संतमाउली । कळवळे मज दीनातें द्रवली । करोनि कृपेची साउली । पूर्णत्वें न्याहाळी कूर्मदृष्टीं ॥३८॥

अंतरींचें जाणोनि आर्त । पूर्ण करिती मनोरथ । न्यून पडतां सांभाळित । धन्य संत उदार हे ॥३९॥

मज दीनाचा प्रतिपाळ । करिती हे संतदयाळ । मज आधार त्यांचें चरणकमळ । अर्पिला मौळ निजभावें ॥४०॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । श्रीनारदपद्मपुराणींचें संमत । ते परिसोत भाविक संत । चतुर्विंशोध्यायार्थ गोड हा ॥२४१॥

॥ इति चतुर्विंशोध्यायः समाप्तः ॥

## अध्याय पंचवीसावा

श्रीगणेशाय नमः । श्रीसद्‌गुरुदत्तात्रेयाय नमः ॥

जय सद्‌गुरुस्वामी अनंता । अनाथनाथा तूं समर्था । कृपें सांभाळी शरणागता । दीनमाता तूं होसी ॥१॥

तूं शरणागताचें माहेरु । दीनदुर्बळांचा दातारु । सर्वस्वीं आम्हां तुझाचि आधारु । हा भवपारु कर्ता तूं ॥२॥

तूं सद्‌गुरुमाउली दयाळ । तुझे आम्ही लाडके लडिवाळ । आमुचे अंतरींची आळ । तूंचि सकळ पुरविता ॥३॥

तव कृपा होतांचि पाहीं । ज्ञान प्रगटे दिव्य देहीं । न होतां कृपा न घडे कांहीं । ऐसी नवलाई कृपेची ॥४॥

सद्‌गुरु तुझें अभय होतां । कोठोनि देहीं बाधे चिंता । दुःख दारिद्रय व्यथा । क्षण न लागतां निवटेल ॥५॥

म्हणोनि तुझिया चरणीं । शरण झालों मोक्षदानी । सर्व अपराध क्षमा करोनी । कृपा करोनि अंगीकारी ॥६॥

सद्‌गुरु अनंता कृपाराशी । मम अंतरींचे हेतू जाणसी । ते पुरवावया समर्थ होसी । अपंगी दीनासी स्वामिया ॥७॥

तुझिया कृपाबळें करुन । चालिलें या ग्रंथीं निरोपण । कर्ता करविता तूंचि पूर्ण । निमित्तासि दीन किंकर हा ॥८॥

सद्‌गुरु तूंचि या ग्रंथींचा वक्ता । तूंचि स्वामिया होसी श्रोता । ग्रंथीं अक्षरें लिहविता । कथानुसंगविता तुझा तूं ॥९॥

शुद्ध अशुद्ध आणि प्रसिद्ध । तूंचि जाणता भेदाभेद । रस उद्भवोनि आनंद । कर्ता स्वतः सिद्ध तुझा तूं ॥१०॥

मागां तुझें त्वांचि निरोपिलें । तेवींच पुढें चालवी रसागळें । श्रोती श्रवणीं क्षुधित बैसलें । तयां तोषविलें पाहिजे ॥११॥

हे सद्गुरु अविनाश दत्ता । श्रवणीं वाट पाहे अनसूयामाता । तिचे प्रश्न आदरोनि आतां । पुरवी मनोरथा स्वामिया ॥१२॥

केले प्रश्न गताध्यायीं । कीं चंद्रसूर्यकळा सांगे लवलाहीं । सत्रावी कोणती निरोपी तेही । उत्साह देहीं श्रवणार्थी ॥१३॥

यदर्थी श्रोते सावधान । प्रश्नोत्तरें कीजे श्रवण । सकृपें अवधूत दयाघन । करिती निरोपण साक्षेपें ॥१४॥

अविनाश प्रार्थी मातेसी । प्रश्नोत्तरें निरोपितों तुजसी । तें तूं सांठवी निजमानसीं । नाणीं देहासी आळस श्रवणीं ॥१५॥

माते चंद्रसूर्य कोठें राहती । या देही तयांची सांगतों वस्ती । ते तूं परिसोन ओळखी चित्तीं । स्थानें त्यांप्रती पृथकची ॥१६॥

त्या चंद्राचें तालुकास्थान । जेणें शोभविलें तें गगन । सोळा कळा परिपूर्ण । प्रभायमान शीतळ तो ॥१७॥

आतां त्या कळा परियेसी । पृथक नामें सांगतों तुजसी । शंखिनी पद्मिनी लक्ष्मिणीसी । एवं तिघांचीं नामें हे ॥१८॥

कामिनी पुंखिणी शापिनी । विद्या मोहिनी प्रमोदिनी । मंथुवी आणि विकाशिनी । अमृता अमृतश्रवणी तेरावी ॥१९॥

निजन विज्ञान दृष्टी पाहावी । एवं सोळांची संख्या जाणावी । अनुभवियें ओळखावी । केवीं लक्षावी अज्ञानमूढें ॥२०॥

सोळा कळांसहित शशी । अधोमुखें धांवे पूवसी । हें वर्म ओळखी जो निश्चयेंसी । तोचि ज्योतिषी ज्ञानी पुरा ॥२१॥

आतां या भानूचें निरोपण । यथाक्रमें सांगतों निवडोन । तें माते करी श्रवण । कळा संपूर्ण निवेदितों ॥२२॥

बाराही कळांसमवेत । नाभोमुळीं सूर्य तपत । तेथें असतें निभ्रांत । तेज लखलखीत तयांचे ॥२३॥

त्या बारा कळांची नामें । तुज मी सांगतों अनुक्रमें । तें तूं सांठवी संभ्रमें । स्वानंदप्रेमें करोनिया ॥२४॥

ज्वालिनी करुणी दहनी । दीपिनी ज्योतिनी तेजिनी । विद्या आठवी मोहिनी । ज्वाळा जेतिनी दहावी ॥२५॥

प्रकाशिनी दीपकळिका । ह्या बारा कळी सूर्य देखा । पश्चिमे चाले चालणीं निका । अतिसुरेखा सोज्वळ ॥२६॥

कळांसहित सूर्यभानू । यांचें करोनि सांगितलें प्रमाणू । यांतें ओळखावयाचें कारणू । मुख्य पवनू पाहे नाकीं ॥२७॥

नासिकींचे दोन्ही दळ । तेथें पवन वाहे हा सरळ । यामाजीं रविशशीचा खेळ । होय निश्चळ वामसव्य ॥२८॥

डावे अंगीं चंद्र जाण । उजवे अंगीं उगवे भान । चंद्र म्हणजे तो मन । सूर्यं पवन होय हा ॥२९॥

अडीच घटिका यांची चाल । एक एकाच नेम निश्चळ । न वाढे कोणीही एक पळ । उणेही विपळ न होती ॥३०॥

दोन्ही स्वर वाहती समान । तया म्हणिजे संक्रमण । सर्व कार्यासी होय शून्य । आणी वैगुण्य निश्चयें ॥३१॥

या चंद्रसूर्याचे प्रवाहीं । तत्त्वें असती पांचही । कैसे म्हणसील तरी तेंही । सांगतों लवलाही परियेसी ॥३२॥

न लगतां कवणे स्थानीं । मध्यें वाहे ते जाणा धरणी । अधोमुख जयाची वाहणी । आप जाणोनी घेईजे ॥३३॥

ऊर्ध्वा वाहे जे सतेज । त्या नांव ओळखिजे तेज । जो धरोनि वाहे भुज । वातराज होय तो ॥३४॥

हेचि ओळखी आकाशाची । व्यापकता सर्व ठायाची । अर्ध ऊर्ध्व वाम सव्याची । पूर्व पश्चिमेची दिशायुक्त ॥३५॥

शुक्ल पक्ष तो चंद्राचा । कृष्ण पक्ष तो सूर्याचा । प्रतिपदेंपासोनि तृतीयेचा । भोग एकाचा जाणिजे ॥३६॥

एकाआड एक येती । दिवस तीन तीन भोगिती । एवं मास पाक्षिक तिथी । उभयांप्रती योजिल्या ॥३७॥

तेवींच उभयातें वासर । तुज सांगतों ऐक विचार । रवि शनि भौमवार । हा तो प्रकार भानूचा ॥३८॥

सौम्य सोम आणि भृगु । हा नेमिला असे चंद्रभागू । संक्रमणीं गुरुसंयोगू । नक्षत्रविभागू ऐसाची ॥३९॥

चंद्र विभाग नक्षत्र । अश्विनीपासोनि सलग चार । आर्द्रेपासोनि तत्वपर । नव निर्धार हे झाली ॥४०॥

पूर्वषाढापासोनि तीन । रेवती अनुराधा निवडून । हे चंद्रनक्षत्रें चौदा जाण । रविसी कोण तें ऐके ॥४१॥

पूर्वापासून सलग सहा । धनिष्टा चार मिळोनि दहा । मृग ज्येष्टा मूळ पहा । तेरा मुदा वहा रवीचीं ॥४२॥

संक्रमणीं असे अभिजित । हा सर्वामाजी व्यापक सत्य । सांपडावया युक्त बहुत । करोनि थकित पैं होती ॥४३॥

असो आतां हें बहु वर्णन । ग्रंथीं घेतलें कार्याकारण । तें सांगतोकिंचित निवडोन । साधेल साधन तरीं साधा ॥४४॥

चंद्रसूर्य माझारीं । तत्वओळखी साधिजे बरी । मग कार्यअकार्याची उतरी । किंचित परी निवेदितों ॥४५॥

चंद्रसूर्य सुफळ असती । परि त्यांची जाणिजे अंतरगती । तत्वा ऐसे प्रकार घडती । तेही निश्चिती ऐकिजे ॥४६॥

पृथ्वीं धीर कार्य कीजे । सुलग्न आपतत्त्वीं साधिजे । तेजीं शीघ्र इच्छिलें होइजे । वायुनें रोखिजे समत्व ॥४७॥

आकाश करितसे निष्फळ । संक्रमण नाशक प्रबळ । जाणती हें ज्योतिष्य सकळ । गुरु कृपाळ भेटतां ॥४८॥

इडा चंद्र तो वामांगीं । पिंगळा सूर्य तो दक्षिणभागीं । संक्रमण सुषुम्णा संयोगीं । मध्यरंगीं रंगली ते ॥४९॥

इडा तेचि भागीरथी । पिंगळा ते यमुना निश्चिती । सुषुम्णा मध्यें सरस्वती । पाहा हे वाहती वरोनी ॥५०॥

हें इतुकें तुज केलें श्रवण । आतां सत्रावीचें ऐक निरोपण । तया नांव निरंजन । दैदीप्यमान जिव्हा ते ॥५१॥

तया शक्तिबळें पाहे । देहीं प्राण सुखी या राहे । औट हितातें पुष्टी होये । तिचेनि सोये इंद्रिया ॥५२॥

ती सतरावी जीवनकळा । तियेपासोनि अमृतगरळा । वाहतसे घुळघुळा । वृद्धि सकळां तिचेनी ॥५३॥

अक्षय ओलावा जिव्हेसी । त्यांत मिष्टता उद्भवें अमृतरसीं । हें कां न कळे या रुचीसी । शोधुनी मानसीं पहा बरें ॥५४॥

ते या पंचप्राणातें वाढवी । हे बाह्यदृष्टीं ओळखावी । ज्ञानदृष्टीं पहावी । जीवीं ओळखावी सोळांत ॥५५॥

जियेचेनि बळाश्रयें । पंचभूतांचा विस्तार होये । आनंद तिन्ही ताळीं न समाये । डोलत राहे सुखी एकी ॥५६॥

ते अमृतसंजीवनी । होय सतरावी जननी । योगियांचे ध्यानीं मनीं । दिवारजनीं वसतसे ॥५७॥

सद्‌गुरुप्रसादें ध्यान हातवटी । पावतां होय ऊर्ध्वदिठी । ते समावेल जैं पोटीं । तै ती भेटी अभ्यासें ॥५८॥

सत्रावीचें दर्शन । होता नुरेची अज्ञान । जया सत्रावीचें पान । तो पुरुष धन्य ये लोकीं ॥५९॥

सत्रावीतें जो पावला । सर्व सिद्धी वोळंगती त्याला । त्यांतें लोटोनि सरसावला । अविनाश पावला पद तोची ॥६०॥

जैं समर्थ सद्‌गुरु भेटेल । तैंच हा मार्ग दावील । अभ्यासबळें रिघवील । प्राप्त करवील गुज हें तो ॥६१॥

येथें दाविलें असोनि नाहीं । ज्ञानिकावांचोनि कळे कायी । जो हातवटी वळखोनि घेई । तोचि ठायीं ठसावे ॥६२॥

हें सिद्धयोगियांचें ज्ञान । संत साधूची वर्मखूण । या सत्रावे कामधेनूचें लक्षण । न कळे यावीण आणिकां ॥६३॥

पाहिलें जरी नाना मत । ग्रंथ अवलोकोंनि झाला पंडित । कथिता झाला जरी वेदांत । अभ्यासरहित वृथा सर्व ॥६४॥

नाना पदार्थिक नांवें घेतलें । बहु मिष्ट म्हणोनि वाचें वर्णिलें । तेणें क्षुधार्थी तृप्त झाले । ऐसें वागले काय तुम्हां ॥६५॥

जेवीं वांझेचा डोहोळा । गर्भावांचोनि फोल जाला । तेवीं अनुभवावांचोनि ज्ञानाला । काय त्याला करावें ॥६६॥

अनुभवी अभ्यास नाहीं । त्याचें कोरडे ज्ञान ऐकोनि काई । उभय नारी रमतां पाही । फळ न देहीं संभवे ॥६७॥

यदर्थ समर्थ गुरु करावा । अभ्यास बरवा साधावा । उगवा करोन सर्व घ्यावा । प्रसाद पावावा कृपेचा ॥६८॥

तंव अनसूया म्हणे रे बाळा । तुझिया निरोपणीं अद्‌भुत लीला । ऐकता उद्भवे आनंद सोहळा । ब्रह्मांडगोळा उजेडवी ॥६९॥

जंव जंव करावें श्रवण । तंव तंव आठवती मज प्रश्न । देहीं सप्तद्वीप सागर पूर्ण । अद्री ते कोण कवणे ठायीं ॥७०॥

आणी नव खंडे कोठें वसती । कवणिये नामें विराजती । हें पृथक सांगे मजप्रती । इच्छा श्रवणार्थी उदेली ॥७१॥

तुझें निरोपण बहु गोड । मज श्रवणीं विशेष आवड । तें पुरवी माझे कोड । साधवी जोड परमार्थाची ॥७२॥

परिसोनि मातेचे शब्द । अवधूतासी जाला परमानंद । धन्य म्हणे तुझी मती शुद्ध । बरवें साधन श्रवण तुझें ॥७३॥

प्रथम सांगतो तुज द्वीपावळी । ते तूं सांठवी हृदयकमळीं । नामें निवेदितों निराळीं । स्थानादि वेगळीं करोनिया ॥७४॥

जंबुद्वीप शंखद्वीप । कुशद्वीप क्रौंचद्वीप । श्वेतद्वीप पुष्करद्वीप । शाल्वद्वीप सातवें ॥७५॥

कोण कोणे ठायी वसती । तें परियेसीं तूं निगुतीं । अस्थिठायी जंबूची वस्ती । मेदीं निश्चिती शंखद्वीप ॥७६॥

मांसी कुशद्वीप जाणिजे । शिरीं क्रौंचद्वीप वोळखिजे । त्वचें शाल्वद्वीप वोलिजे । रोमीं निरस्विजे श्वेतद्वीप ॥७७॥

पुष्करद्वीप तें नाभीसी । एवं सप्तद्वीपें जाणिजे ऐसीं । आतां निवेदितों सागरासी । स्थान नामेंसीं युक्त तुज ॥७८॥

नीर क्षीर दधी पक्ष । सागर रत्नाकर मधु प्रत्यक्ष । हे सप्त सागर सरिताध्यक्ष । स्थानीं लक्ष देई आता ॥७९॥

नेत्रीं नीर समुद्र वाहे । क्षीरसागर सतरावीसीं राहे । दधीसमुद्र नासिकीं पाहे । क्षार तो आहे तळवटीं ॥८०॥

नाभीं वसे रत्नाकर । मधुसमुद्राचे स्थान शीर घृतसमुद्र हृदयांतर । वसती सागर स्थाननेमें ॥८१॥

आतां गिरीचें प्रमाण । स्थानासहित करितों निरोपण । पूर्वे उदयेगिरी जाण । अस्ताचळ स्थान पश्चिमे ॥८२॥

उत्तरे गिरी असे कनक । दक्षिणे शेषगिरी देख । नैऋत्ये नारायणगिरी वोळख । वसे औषधिक वायवे ॥८३॥

इशान्यकोनीं महिगीरी वसे । अग्निकोणी सिंहाद्री असे । एवं अष्टगिरी विलसे । अष्ट दिसे पाहे पां ॥८४॥

अष्ट गिरीहुनी मेरु आगळा । हा याहोनी असे निराळा । जैशा कमळीच्या अष्ट कळा । तैसे भूगोळा शोभविती ॥८५॥

सर्व गिरीमाजीं श्रेष्ठ । मेरु सर्व गुणें वरिष्ठ । हें भूमीचें मध्यपीठ । दिसे गोमठ कनकाचें ॥८६॥

सर्व लोकांची रचणुका । त्यावरी असे देखा । तयाचा न पवे कोण्ही तुका । वास देवादिकां ते ठायीं ॥८७॥

आतां नवखंडींचे भाग । ते मी निवेदितों सांग । सोडोनिया अनेक उद्योग । श्रवणीं लाग करि माये ॥८८॥

भरतखंड व्रतखंड । रमेशखंड द्राक्षखंड । द्राक्षमाळखंड केतुखंड । विधिवंशखंड सातवें ॥८९॥

हरिखंड तें आठवें । नवम सुवर्णखंड जाणावें । हे खंडांचीं वोळखिजे नांवें । नव इंद्रियें बरवें नवखंड ॥९०॥

दहावें खंड ते कासी । दशमद्वार निश्चयेंसी । विश्वनाथदेव तया स्थळासी । आनंदवासी आनंदवनी ॥९१॥

पूर्वदिशेसी भरतखंड आहे । अग्निकोणीं व्रतखंड पाहे । दक्षिणे रम्यखंड होये । द्रामळाखंड राहे नैऋतीं ॥९२॥

पश्चिमे केतुखंड वसे । वायव्ये हरिखंड असे । उत्तरे द्राक्षमाळाखंड विलसे । रामेश्वर वसतसे ईशानें ॥९३॥

सुवर्णखंड मध्यस्थानीं । ते हे मेरुची मांडणी । दहावें खंड दशम स्थानीं । योगियां ध्यानीं सदा वसे ॥९४॥

मातें त्वां प्रश्न केले चार । ते तुज म्यां सांगितलें निर्धार । आतां खाणींचा विचार । तोहि सुंदर निवेदितों ॥९५॥

जारज आणी स्वेदज । अंडज आणी उद्भिज । यांची कोठोनि देहीं उपज । बोलतों सहज निरोपणीं ॥९६॥

स्वेदीं असे स्वेदजखाणी । अंडज होती अस्थिस्थानीं । मज्जा जारज निवडोनी । रोमस्थानीं उद्भिज ॥९७॥

तवं अनसूया म्हणे कुमारा । तूं हेतु पुरविसी माझा खरा । उरलें निरोपण स्मरण करा । कथा विस्तारा मेरुची ॥९८॥

मातेची देखोनि सावधता । पुनरा दत्त जाला निरोपिता । तरी सावधान होवोनि श्रोता । संवादीं अवधानता देईजे ॥९९॥

दत्त म्हणे सकळ गिरींत । विशाळ असे मेरुपर्वत । तो पीत सुवर्ण लखलखीत । विस्तार अद्‌भुत जयाचा ॥१००॥

ऊंची योजनें खर्व तीन । ऐसें शास्त्राचें प्रमाण । रुंदीची संख्या नेमून । चार लक्ष करुन ठेविली ॥१॥

सोळा सहस्त्र भूमिगर्भात । टेकणें लागले तीन पर्वत । कमलपुष्पाऐसा विकासित । शिखरें शोभत तीन वरी ॥२॥

बाहात्तर द्वारें तया शोभती । टाकें नव विराजती । नवग्रह तेथें वसती । रक्षण करिती सर्वदा ॥३॥

ऐसा हा जाणिजे मेरु । सर्वांमाजीं श्रेष्ठ गंभीरु । ग्रामदेवीचा अंकुरुं पंच प्रकारु मंडित ॥४॥

मेरु दक्षिणभागीं निर्धार । असे जें अमरावतीनगर । नव सहस्त्र योजनें विस्तार । तेंथें अमरेंद्र देवांसह ॥५॥

वरी तीन शिखरें असती । त्यांची परिसिजे विभक्ती । पूर्वभागीं विधी बसतीं । लोक म्हणती सत्य तया ॥६॥

तेरा सहस्त्र योजनें विस्तीर्ण । तेथें राहती ब्रह्मगण । करितसे उत्पत्तिकारण । ललना तीन शोभती ॥७॥

आतां पश्चिम शिखराचे ठायीं । वैकुंठ वसतसे पाहीं । अद्‌भुत तेथील नवलाई । भक्तसमूहीं नांदे विष्णू ॥८॥

तया रुंदीची गणित । सात सहस्त्र योजनें नेमस्त । रजाकरी रमायुक्त । शरणागत देव सारे ॥९॥

आतां उत्तरेचें शुभ्र शिखर । त्या कैलासीं नांदे शंकर । अर्धांगी अपर्णा सुंदर । एकोणीस सहस्त्र विस्तीर्ण तें ॥११०॥

रुद्रगण तेथें वसती । अनन्यें शिवातें भजती । सुरवर दर्शना येती । कैलासपती पाहावया ॥११॥

एकवीस स्वर्ग सप्त पाताळ । यांतची आलें भूमंडळ । हें देहींच वोळखिजे सकळ । निरोपितों निवळ परिसीजे ॥१२॥

अतळ वितळ सुतळ । तळ तळातळ रसातळ । सातवें जाणिजे पाताळ । कंठापासोनि सरळ जाणिजे ॥१३॥

आतां यांची वोळखी । तुम्हां निवेदितों निकी । राहती कोण कोणत्यां लोकीं । हेंही आवश्य कीं ऐकिजे ॥१४॥

पायातळींतें अतळ । त्याउपरी उर्ध्व वितळ । घोटे जाणिजे सुतळ । पोटरी महातळ वोळखा ॥१५॥

सांधे तळातळ जाणिजे । मांडया रसातळ वोळखिजें । कंठीं तळपाताळ म्हणविजे । एवं विलोकिजे सात हे ॥१६॥

पहिलें पाताळ सुंदर । तेथें पुष्पावतीनगर । रक्तगुंज असे नृपवर । परम सुखकर राज्य करी ॥१७॥

दुसरिया पाताळीं जाण । शैल्यपुरनगर विस्तीर्ण । तेथें गंधनामा नृपनिधान । राज्यकारण चालवी ॥१८॥

तिसरिया पाताळाआंत । नरुकुमळजा विख्यात । श्रीघरपट्टण शोभत । दिव्य विराजत तें ठांयीं ॥१९॥

चौथिया पाताळाभीतरीं । चातकपुर नाम नगरी । मलुध्वनराजा राज्य करी । सहपरिवारीं आनंदें ॥१२०॥

पांचवे पाताळीं विलसे । रुद्रावतीनगर असे । ईशान्यराजा नागु वसे । सुखसंतोषें राज्य करी ॥२१॥

साह्याविया पाताळभुवनीं कंजवायुनगरी तये स्थानीं । तेथें चक्रनाग राज्यांसनीं । अति सन्मानीं नांदत ॥२२॥

सातवें जें का पाताळ । तेथें उग्रावतीनगर विशाळ । शत्रुत्वती असे नृपाळ । परम सबळ राव तो ॥२३॥

एवं पाताळें हीं सात । निवेदिलीं असतीं भूपासहित । हे जाणिजे या देहांत । विवेकयुक्त ज्ञानदृष्टीं ॥२४॥

ठरले एकवीस जे का स्वर्ग । ते मणी एकवीस सुभंग । तो योगिजनांचा होय मार्ग । तेचि लाग साधिती ॥२५॥

येरा पामरा न घे गती । गुरुकृपें मुकुक्षू पावती । यालागीं सेवन साधिजे प्रीतीं । लीनवृत्ति करोनिया ॥२६॥

हे ज्ञान गुह्यात्मक असे । गुरुकृपें होतील लाभ सरसे । हे बोलणें नोहे अन्या ऐसे । अनुभव दिसें अभ्यासिया ॥२७॥

प्राण अपाना होय भेटी । तो भरे कुंडलिनी पोटीं । परेपासुनी खाय उठी । जाय भेटी मणिमार्गें ॥२८॥

व्यानमार्गे त्वरें जाइजे । प्राण आवरते तें साहिजे । सोळापासोन उड्डाण साधिजे । मग पाविजे रंध्रद्वारीं ॥२९॥

असो तेथील परिजाण । साहणें असे परम कठिण । कुंडलिनी जातसे भडकोन । वाद्यें दारुण वाजती ॥१३०॥

तेथें सर्व भावें होय घाबरा । पळों पाहे सैरावैरा । धारिष्टें साधिजे वायो आवरा । फुटों बाहेरा न दीजे ॥३१॥

हें गुरुकृपें साधन । जैं परिपक्व होय पूर्ण । तैं पूर्वद्वारीं घडे गमन । स्वरुपीं संधान लाधला ॥३२॥

असो हें बोलिलों उघड । परी तें करणें असे अवघड । गुरुकृपेवीण नुघडे कवाड । न जोडे जोड फुकट हे ॥३३॥

सहस्त्रामाजीं विरळा । जाणे आत्मगुह्याच्या कळा । तो पुरुष होय दैवागळा । त्या चरणकमळा वंदिजे ॥३४॥

मागुतीं अनसूया म्हणे दत्ता । तुवां अद्‌भुत निवेदिली हे गुह्य वार्ता । सद्‌गुरुची दावील या पंथा । त्यावीण सर्वथा सापडेना ॥३५॥

तूं जग तारावयासी । प्रगट जालासि गा अविनाशी । जे जे मार्ग तूं बोधिसी । ते ते हितासी मज होय ॥३६॥

परी आणिक एक आठवलें । तेंही पुंसू तुज वागलें । तें ऐकोनि उगवी भलें । निरोपण चांगलें करोनिया ॥३७॥

सांगे त्रिगुणाचें वर्णन । देहीं स्थळें सांग नेमून । हें निवडोनिया प्रमाण । बाणवीं पूर्ण अंगीं मज ॥३८॥

दुसरा प्रश्न अवधारीं । पदपिंड निवडोनि सत्वरीं । कोण रुप तें विस्तारी । रुपातीत परी कैसी तें ॥३९॥

सखोल प्रश्न मातेचे । ऐकोनि उल्हासलें चित्त दत्ताचें । म्हणे धन्य माते श्रवण तुमचें । धन्य बुद्धीचे तर्क तुझ्या ॥१४०॥

ऐसी हे विचारणा । नुपजे कवणाचिया मना । ते अतर्क्य रचिसी तूं प्रश्ना । पुससी खुणा जीवींचिया ॥४१॥

हे अत्यंत प्रश्न नागर । ऐकतां सुखावे मम अंतर । निरोपणीं उद्भवे उल्हास थोर । सेवेसि तत्पर अनुसरतों ॥४२॥

हें एकाग्रतेचें निरोपण । सर्व त्यजोनि व्यवधान । सावध कीजे माते श्रवण । आदरें निवेदन करितों तुज ॥४३॥

रजोगुण तमोगुण सत्त्वगुण । हे मागां केले तुज निरोपण । आतां यांचें कोन वर्णन । तेंही निवडून सांगतों ॥४४॥

सत्त्व हा गौर जाणिजे । रजते पीत ओळखिजे । निबिड काळें देखिजे । तम म्हणजे त्या नांव ॥४५॥

प्रभाते सत्त्व सात्त्विक । माध्यान्हीं तामस वोळख । अस्तीं राजस चोख । तिन्ही प्रकाशक स्वतेजें ॥४६॥

या त्रिगुणांपासोनि । असे या देहाची उभारणी । परी राहती कवणियें स्थानीं । तेंही श्रवणीं सांठवीं ॥४७॥

रजोगुण तो स्वाधिष्ठानीं वसे । सत्वगुण नामीस्थानीं विलसे । तमोगुण अनुहातीं असे । त्रिगुण दिसे पिंड हा ॥४८॥

अनसूया म्हणे हे त्रिगुण । यांचें निवेदिलें लक्षण । परी एक आठवलें मजलागून । करी श्रवण किंचित ॥४९॥

या पिंडाच्या पोषणा । जीव सेविती उदक अन्ना । हे जाय कवणिया स्थाना । तेथील खुणा सांग मज ॥१५०॥

तंव दत्त म्हणे जी माते । दोन कोठे विशाळ उदरातें । ते सांठवण अन्नोदकातें । तया नामातें परियेसी ॥५१॥

पोटीं उजवे अंगीं जीवन । डावे अंगीं असे अन्न । ऐसे दोहीं कोठयामाजीं जाण । अन्नोदक जाऊन सांठवे ॥५२॥

उदरीं जठराग्नी प्रदीप्त असे । तो अन्नातें पचवींतसे । रसइंद्रियां देवोनि सुरसे । बाकस त्यागितसे तळकोठीं ॥५३॥

तळीं कोठे दोन असती । तेथें मळमूत्र जावोनि बैसती । तेथील काजकर्ते दोघे निश्चितीं । तेहीं निगुतीं निवेदितों ॥५४॥

प्राण आणि अपान । तेथील कर्मे दोघे पवन । आपुलाले करिती कारण । परम सावधान सर्वकाळ ॥५५॥

प्राण रसातें घेतसे । भाग इंद्रियांतें देतसें । अपान मळमूत्रा लोटीतसे । करिती ऐसे उभय काज ॥५६॥

प्राण तृप्तीचा देववी ढेंकर । न्यूनाधिक जाणवी प्रकार । समत्व स्वादाचा उद्गार । दावी बाहेर करावया ॥५७॥

तेवींच अपानवाया साचा । त्याग करवी अन्नोद्भव वायोचा । कोठा शुद्ध ठेवी करवोनि रेचा । जीर्णअजीर्णाचा प्रकार दावी ॥५८॥

जेव्हां जागृत होय अग्नी । तेव्हां मागे अन्नपाणी । शांत असतां समाधानीं । प्रकृतिस्थानीं शांत राहे ॥५९॥

तोच अग्नि सक्रोधें भडकतां । होय अस्थिमांसातें दाहितां । तेणें बाह्य उद्भवें ज्वरता । होय अरुचिता जिव्हेसी ॥१६०॥

तोचि अग्नि मंद होये । प्राणि न जाणतां अन्न खाये । तेणें ती पाचणिक सोयें । जेथिंची राहे तेथेंची ॥६१॥

तेणें रस न मिळे इंद्रियांसी । तेणें क्षीणतां पावे त्यासी । त्या मोडसीपासोनि रोगासी । आरंभ निश्चयेसी जाणिजे ॥६२॥

त्याच अग्निमुखीं देख । उदक न्यून अन्न अधिक । तें पचवितां कर्पे आवश्यक । ढेंकर भडक नाकीं उठे ॥६३॥

तया मोडसीचे विकारें । दिवसेंदिवस व्याधी भरे । हे अनुभव देही जाणवती खरे । केविं विस्तारें निवेंदू ॥६४॥

यदर्थ राहिजे सावधान । जाणोनि सेविजे अन्नपान । चतुर्थांश क्षुधा ठेवून । सुखसमाधान राहिजे ॥६५॥

असो आतां हा विस्तार । वदूं पदपिंडाचा विचार । रुपरुपांतीत प्रकार । तो निर्धार निरोपितों ॥६६॥

पद परमात्मा जाणिजे । तोचि ओंकार आदिपुरुषा बोलिजे । सकळ आदींचें बीज बोलिजे । गुरुगमें निरखिजे या पदा ॥६७॥

पिंड म्हणजे कुंडलिनी । आदिशक्ति सकळस्वामिनी । दश वायोगुण अधिष्ठानी । पिंडव्यापिनी ही होय ॥६८॥

रुप म्हणजे नादबिंद । कळा ज्योती वर्णभेद । हे साकारले प्रसिद्ध । रुप विविध दाविलें ॥६९॥

रुपातीत ते निरंजन । निराकार पाहे ते निर्गुण । तेंचि अरुप होय निर्वाण । निरामय जाण निःसंग ॥१७०॥

एवं हें ज्ञान जीवींचें । तें म्यां निवेदिलें सत्य साचें । ओळखावया अधिकार गुरुपुत्राचे । येर इतरांचे असेना ॥७१॥

हें ज्ञान जाणावया । शरण जाई जीवें गुरुराया । ते दावितील करोनि दया । निरसोनि माया अंतरींची ॥७२॥

अनन्यभावें जाता शरण । ते तात्काळ छेदितील अज्ञान । दिव्य दृष्टीं प्रकाशवून । आत्मज्ञान बाणविती ॥७३॥

तया ज्ञानासी पावतां । तात्काळ तुटे देहीं अहंता । देहातीत होय अवस्था । स्वप्नींहि चिंता नुपजे कधी ॥७४॥

तवं अनसूया म्हणे राजसा । श्रवणीं आनंद उपजे मानसा । जे रत जालेती अभ्यासा । त्यांच्या विलासा कोण पावे ॥७५॥

ते सुखानंदसागरीं । बुडोनि भोगिती स्वरुप लहरी । तया नावडती मोक्ष चारी । सुख चिदबंरीं सर्वदा ॥७६॥

अभ्यास करणें असे कठीण । परी वाटे करावें श्रवण । यदर्थीं आठवा ऐसे प्रश्न । तुजलागीं करुन ऐकते ॥७७॥

जें जें तुवां निरोपिलें । तें आवडीनें म्यां श्रवण केलें । श्रवणज्ञानें आणिक सुचले । सुचवितां निवेदिलें पाहिजे ॥७८॥

ते प्रश्न कोण म्हणसी । ऐक निरोपितें आतां तुजसी । कोठें वस्ती नादबिंदासी । मनपिंडपवनासी योजिले कोठें ॥७९॥

यावरी वदे स्वामी दत्त । या ब्रह्मांडशिखरांआंत । नादबिंद वास्तव्य करीत । हे जाण निश्चित अंबिके ॥१८०॥

हृदयी वसतसे हें मन नाभीं वसतसे पवन । एवं चौघांचें स्थान । तुज निवेदन पैं केलें ॥८१॥

या शरीराभीतरीं । यांचें वास्तव्य असे निर्धारीं । या पिंडाची कर्तृत्वपरी । यांचेनि बरी चालतसे ॥८२॥

तंव आणिक अनसूया पुसे । हृदय नसतां मन कोठें वसे । नाभी नसतां पवन विलसे । ठायीं बैसे कवणिया ॥८३॥

तंव उत्तर निरोपी दिगंबर । जंव नव्हतें हृदयभांडार । तंव शून्यामाजीं निर्धार । होत साचार मन तेथें ॥८४॥

नव्हतें जेव्हां नाभीस्थान । तैं निराकारीं होता पवन । ऐसें उभयांचें निरोपण । करविलें श्रवण जीवीं धरी ॥८५॥

हें परिसोनि अनसूया । म्हणे बरवें निरोपिलें प्राणसखया । आणिक मन इच्छी पुसावया । तेंही सदया ऐक तूं ॥८६॥

निराकार साकार आलें । पंचभौतिक विस्तारलें । शेवटीं कैसे समावलें । तें मज वहिलें सांग आतां ॥८७॥

तंव अवधूत म्हणें वो जननी । हे पंच प्रळयाची विंदानी । तूं पुससी मजलागोनी । तेचि निरोपणीं निवेदितों ॥८८॥

जीवमात्र हे वावरती । अन्नोदकांतें सेविती । नाना उपभोग क्रीडा भोगिती । सुखें पहुडतीं स्वानंदे ॥८९॥

वावरती असतां दिनमान । रजनींत करिती शयन । हा नित्य प्रळयो जाण । पुनरा जनन प्रभातीं ॥१९०॥

ऐसा आयुष्यमर्यादेचा भर । तोंवरी नित्य मृत्युजनन साचार । तें आयुष्य सरतां निर्धार । होय हरिहर देहाचा ॥९१॥

हे दोन प्रळय जीवां असती । तिसऱ्या प्रळयातें ऐक निश्चिती । चार युगें सहस्त्र वेळां जाती । तो दिवस म्हणती ब्रह्मयाचा ॥९२॥

तो नित्य करी उत्पत्तिकारण । तया प्रपंचाचा लोटतां दिन । होतां विधातियाचा अस्तमान । करी शयन सुखासनीं ॥९३॥

विधि करितांचि शयन । मर्यादा देतील अवघे सांडोन । अद्भुत होईल पापाचरण । कंपायमान होय धरा ॥९४॥

पापें न पिके धरणी । जीव मरती अन्नावांचोनी । अर्काची पडेल बहुतपणी । मेघ गद्‌बदोनी सुटती ॥९५॥

ते उदक शोषितील सैरा । वर्षतील तेव्हां मुसळधारा । बुडोनीया जाईल अवधी धरा । ठाव सागरा मग कैचा ॥९६॥

अवघे जळबंब होईल । सत्यलोकातें पाणी चढेल । निशी सरतां अगुष्ट भिजेल । तैं जागेल तो विधी ॥९७॥

एवं हा देखिजे तिसरा प्रळयो । पाहोनि विधीसी होय विस्मयो । अहा केलियाचा जाला लयो । निद्रेंत क्षयो जाला की ॥९८॥

ब्रह्मपळयो म्हणती यासी । मागुती विधाता सावध मानसीं । होवोनि रचिता होय सृष्टीसी । स्वसंसारासी जाण तूं ॥९९॥

एवं उत्पत्तिलयो होतां । पूर्ण आयुष्यीं विधी भरतां । मग रुद्रप्रळयाची ऐसी वार्ता । पृथक सांगतां ग्रंथ वाढे ॥२००॥

पुढें शक्तीचा महाप्रळय । सर्व एवं आटोनिया जाय । पंचभौतिकां होय लय । पावती ठाय जन्मतांतो ॥१॥

आपीं शोषिलें पृथ्वीतें । तेज शोषी त्या आपातें । पवन शोषी तेजातें । गगन पवनातें गिळीतसे ॥२॥

शून्यें ग्रासिलें तें गगन । साकार गेलें मावळोन । शून्याकार निराकारीं जाण । बीजीं समावोन वृक्ष गेला ॥३॥

तत्त्वापासाव तत्वें जालीं । तत्त्वींच तत्त्वें समावलीं । निराकार होवोनि ठेलीं । जळीं विरालीं जळगार ॥४॥

जितुकें हें दृश्य दिसे । तितुकेंही अवघें नासे । सांडी मिथ्या भ्रम कैसे । जावोनि बैसे अविनाशीं ॥५॥

जीव न गुंते मायापाशीं । तरी हाचि होय अविनाशी । मायायोगें जीवपणासी । नाम यांसी स्थापिलें ॥६॥

पाहतां अरुप रुपा आलें । मायादेवीनें नाम केलें । अहं उद्धारेंची प्रगटलें । रुप उदेले मायेचें ॥७॥

आपआपुली छाया । तैसीच जाण ईश्वराची मामा । आप आपणातें विसरोनिया । भुलला वांया छायेसी ॥८॥

जैं छाया अचळ राहे खरी । ते सत्य माय जाण निर्धारी । छाया माया बरोबरी । पाहे विचारीं शोधोनीं ॥९॥

छायेची करोनिया सांडी । विवेकें आत्मविचारणा मांडी । शोधोनि घेईं आपुले भांडी । वाउगी वितंडी सांडोनी ॥१०॥

सांडी जो मायिक पसारा । तोचि पावे आत्मिक सारा । हाचि तूंतें दिधला विसारा । टाकोनि आसरा सार घेईं ॥११॥

सार ज्याचें त्यापासीं आहे । आत्मविचारणीं विचारोनि पाहे । ज्याचा लाभ त्यासी होये । जाणिजे सोये गुरुकृपें ॥१२॥

श्रीगुरुकृपायोगें प्रसिद्ध । जाणिजे षड्चक्रींचे भेद । ते गती जाणोनिया शुद्ध । घेइजे बोध सातव्याचा ॥१३॥

जो सर्वज्ञानाची जाणे वोज । तो सातव्याची घेईल समज । साधील आपुलें स्वहित गुज । आपुलेंचि बीजा आपण पाहे ॥१४॥

तें बीज जया हातीं आलें । गुरुप्रासादें पूर्ण लाधलें । ते जन्ममरणापासो चुकले । पद पावले अविनाश ॥१५॥

नाश नाहीं जयासी । अविनाश म्हणविजे तयासी । तया भेटतां तेंचि होसी । ये वोळखीसी वर्म ऐका ॥१६॥

भ्रमरीचे स्पर्शे करुन । भ्रमरीच जाली आळिका पूर्ण । अग्निसंगें काष्ठपण । होउन हरण अग्नि होय ॥१७॥

वाती दीपा भेटूं जातां । स्वयेंचि पावली ती दीपता । बिंदु सिंधुमाजीं पडतां । नये काढितां सिंधु होय ॥१८॥

तेवीच हेंही जाण माते । वर्म निवेदिलें सत्य तूंतें । अभ्यासीं योजि या मनातें । साधी कार्यातें स्वदिताच्या ॥१९॥

येचि कारणासाठीं । पावली नरदेहाची कोटीं । येथचि होय श्रमनिवटी । साधितां हातवटी गुरुकृपें ॥२२०॥

तंव अनसूया म्हणे गुणनिधाना । निंबलोण करुं तुझिया निरोपणा । जेणें बोध केला माझिया मना । भाविक सज्जना लहानथोरां ॥२१॥

बोध नोहे हा उपदेश । नुरवी अज्ञानाचा लेश । श्रवण करितां दिवसेंदिवस । ज्ञान विशेष लाधवी ॥२२॥

श्रवणेचि करीतसे सधन । मननीं अधिकार वाढे गहन । निजध्यासें अभ्यासितां पूर्ण । सत्वर दर्शन पावेल पैं ॥२३॥

निजतत्त्वीं होतां भेटीं । मुसवळोनी होय खोटी । सबाह्य तोची पाठींपोटीं । द्वैत गोष्टी हारपली ॥२४॥

द्वैत अवघें निरसलें । अद्वयत्व जीवीं ठसलें। तें निराकारीं जावोनि वसलें । घृतीं समरस जालें नवनीत ॥२५॥

असें तुझें हें निरोपण । तेणें तृप्त केलें माझें श्रवण । परि आणिक ऐकावया इच्छी मन । उबग वाटो नये जीवा ॥२६॥

षट्चक्राचे ऐकावे भेद । येविसीं उपजला जीवीं आनंद । तूं ज्ञाता होसी स्वतःसिद्ध । निरोपी सावध श्रवणीं मी ॥२७॥

मज श्रवणावांचोनि पाहीं । गोड न लगे आन कांहीं । जागृतीं स्वप्न सुषुप्तीठायीं । श्रवणचि देहीं आठवंते ॥२८॥

श्रवणीं चित्त जडलें मातेचें । हें अवधूतासी कळलें साचें । निरोपणीं पात्र नोव्हे काचें । सांठवण सुरसाचें होय निकें ॥२९॥

हें जाणोनि मानसीं । अंतरीं उल्हासला अविनाशी । म्हणें निरोपणीं तोषवूं मातेसी । जेणें तिजसी सुख होय ॥२३०॥

हा अवधूत सदय उदार । आर्त भूतांचें जाणतो अंतर । पुरवी मनोरथ समग्र । दयासागर दीनबंधु ॥३१॥

पुढीले प्रसंगीं निजमायेसी । निरोपणीं तोषवील श्रोतयांसी । सांगेल षट्चक्राचिया भेदासी । अनुक्रमेंसी आदरें॥३२॥

अहो तुम्ही संत श्रोते जन । तुम्हा विनवितों कर जोडून । हें पिकलें क्षेत्र तुम्हांलागोन । अधिकारी पूर्ण येथिंचे तुम्ही ॥३३॥

आवडी करोनी रस सेविजे । तृप्तीपर्यंत स्वीकारिजे । पंक्तीं अनंतसुता घेइजे । लाभ देइजे निजशेष ॥३४॥

इति श्रीदत्तप्रबोधग्रंथ । श्रीनारदपुराणींचें संमत । परिसोत भाविक ज्ञानी पंडित । पंचविंशोध्यायार्थ गोड हा ॥२३५॥

॥ इति पंचविंशोध्यायः समाप्तः ॥

श्रीदत्तात्रय - मानसपूजा

श्रीगणेशायनमः । श्रीगुरुभ्योनमः ।

प्रथम होवोनि सुस्नात । मन करुनिया पवित्र । आसनी बैसावें स्वस्थचित्त । श्रीगुरुमानसपूजेसी ॥१॥

सिद्धासनारुढ ध्यानीं । खेचरी मुद्रा धारणीं । तूंचि तारक आम्हां लागुनी । हरि स्वरुपी दत्तगुरु ॥२॥

मानसपूजें कारणें । परिवारासह तुम्ही येणें । उतावीळ मी दर्शनाकारणे । ऐसी प्रार्थना करावी ॥३॥

सुवर्णयुक्त रत्नजडित । देवतामय सुंदर खचित । सिंहासन मी कल्पिलें येथ । बैसावें जी सद्गुरु मूर्ती ॥४॥

कर्पुर चंदन मिश्रित तेलें । पादप्रक्षालना जल कल्पिलें । स्वीकार कर हो येवेळें । तव चरण प्रक्षाळितों ॥५॥

गंधतुलसी बिल्वपत्र । उदक अक्षता शमी पवित्र । यांनीं भरलें हें सुवर्णपात्र । सुवास तयांचा घ्याहो स्वामी ॥६॥

सुवासिक जल मनांत आणिलें । सुवर्णपात्रीं मग तें भरलें । भक्तीनें तुम्हा अर्पण केलें । आचमन मधुपर्क दिगंबरा ॥७॥

सुगंधित सुंदर तेलें । स्नानालागीं मी कल्पियलें । पंचामृतें गंगोदकें न्हाणिलें । स्वीकारजी देवराया ॥८॥

दिगंबराहो आचां त्यजलें । भक्तीनें तुम्हां अभिषेकिलें । भगवें वस्त्र मृगचर्म अर्पिलें । स्वीकार करा हीच प्रार्थना ॥९॥

बहू सूत्रांनीं असे युक्त । ऐसें हे ब्रह्मसुत्र । म्हणूनी देवतामय सूत्र । धारण करा गुरुवर्या ॥१०॥

भस्म कस्तुरी आणि केशर । चंदनयुक्त परिकर । रत्नाक्षता असती तयार । अलंकृत तुम्हां करितसें ॥११॥

तुळसीगंध शमिबिल्वपत्र । सुवासिक नानापुष्पें येथ । मनात कल्पिलीं म्यां बहूत । अर्पिली ती सद्गुरुचरणी ॥१२॥

लाक्षासिता अभ्रक श्रीवास । श्रीखंड अगरु गुग्गुल खास । युक्तअग्नींत धूपास । घातलासे यतिराया ॥१३॥

सुवर्णपात्र मी कल्पिलें । तयांमध्यें दीप लाविले । कर्पुरयुक्त प्रज्वाळिलें । स्वीकाराहो दत्तप्रभू ॥१४॥

षड्रसाचें पक्वान्न परिकर । गोरसयुक्त मिष्टान्न साचार । सुवर्णपात्रीं ठेविलें सत्वर । भक्षण जलपान करावें ॥१५॥

हस्तमुख प्रक्षालून । सवेचि आचमन करुन । तांबुल दक्षिणादिफलेन । संतुष्ट व्हावें स्वामिया ॥१६॥

रत्नदीपांची आरती लावून । आणि आपणा नमस्कार करुन । करितों तवगुण वर्णन । प्रदक्षिणा सहितपैं ॥१७॥

दिगंबराहो तव मस्तकीं । अर्पिली मंत्रपुष्पांजली कीं । गायन वादन नर्तनादि । उपचार षोडश अर्पिले ॥१८॥

तव प्रेरणेनें प्रेरित । अज्ञान पामर मी खचित । पूजा केलीहो त्वरित । प्रेरक तुम्हीं संतुष्ट व्हावें ॥१९॥

मग घालोनि प्रदक्षिणा । करितों साष्टांग नमना । करद्वय जोडोनि जाणा ।
तव प्रार्थना करीतसें ॥२०॥

जयजयाजी दिगंबरा । जयजयाजी अत्रीकुमरा । ब्रह्मा विष्णू महेश्वरा ।
सांभाळावें बालकांसी ॥२१॥

तूं दीनांचा कैवारी । अवतरलासी अनुसूयोदरीं । तुझी भक्ती जो निरंतरीं ।
प्रतिपाळिसी वरदहस्तें ॥२२॥

ऐसी प्रार्थना करुन । मागतसें तुजलागुन । या मानसपूजेचें पठण । करितां
दुःखें हरावीं ॥२३॥

भक्तांची व्हावी कामना पूर्ण । पिशाच्चादि बाधा निरसन । अनेक संकटांपासून
। मुक्त व्हावे भक्तानें ॥२४॥

येणेंपरी मागतां वर । प्रसन्न झाला यतिवर । जो भक्तिभावें पठण करील नर
। संकटें त्याचीं दूरी पळती ॥२५॥

विश्वास धरील जो मानसीं । त्यासी कृपा करील औदुंबरवासी । न म्हणाहो
असत्य यासीं । अनुभवें कळों येईल ॥२६॥

इति श्री दत्तदास विरचितं दत्तात्रय मानसपूजास्तोत्रं संपूर्णम् ।

॥ श्रीदत्तार्पणमस्तु ॥

॥ दिगंबर दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥

**http://www.khapre.org**